कौरवपांडवांचा इतिहास.

प्रस्तावना.

भारतकथामृताचा वर्ष जया कल्पतरुंतुनी वाहे ॥
त्याचीं सुनवसुमें हीं बालकरीं बाल आजि देताहे ॥ १ ॥

आज हिंदूमध्यें अनेक जातिभेद व धर्मपंथ असूनही आपण सर्व एका राष्ट्राचे घटकावयव आहों असें भासविण्याला साधनीभूत आदिकविश्रेष्ठ व्यासवाल्मिकींचे अलौकीक ग्रंथ भारत व रामायण हे आहेत. या कविश्रेष्ठांचे हे मूळ ग्रंथ सर्व हिंदुस्थानांत—एवढेंच नव्हे, तर हल्लींच्या प्रगतीच्या काळीं सुद्धां सर्व जगभर—लोकमान्य झाले असून विद्वान् लोक मोठ्या आदरानें हे वाचीत असतात; व संस्कृत न कळणाऱ्यांसाठीं निरनिराळ्या प्राकृत भाषांतून यांचीं गद्यपद्यात्मक अनेक रूपांतरें झालीं आहेत. त्याला अनुसरूनच सद्यःस्थिति लक्ष्यांत घेऊन हे ग्रंथ सरळ व सोप्या भाषेंत गोष्टींच्या रूपानें मराठींत उतरून सध्यांच्या सामान्य जनतेच्या गरीब स्थितीकडे लक्ष्य देऊन यांच्या किंमती अल्प ठेविल्या असतां यांचा प्रसार लोकांत चांगला होऊन इष्ट परिणाम घडून येईल असें वाटल्यावरून दहा वर्षांच्या मागें आह्मीं महाभारताचें भाषांतर हातीं घेतलें; आणि तें व तसेंच रामायणाचें भाषांतर छापून प्रसिद्ध करून त्यांच्या किंमती अगदीं स्वल्प ह्मणजे पांच व तीन रुपये ठेविल्या. त्यांची भाषा लोकांना पसंत पडून केसरी, काळ यांसारख्या विद्वान् पत्रकारांचे यांवर उत्तम अभिप्राय पडून खपही चांगला होत आहे; यावरून यांची लोकप्रियता कळून येणार आहे.

याप्रमाणें महाभारत अगदीं साध्या भाषेंत व स्वल्प मूल्यांत

महाभारतांतील

कौरवपांडवांचा इतिहास.

लेखक

बळवंत त्र्यंबक द्रवीड,

यांनीं

पुणें मेहूणपुरा येथें रावजी श्रीधर गोंधळेकर यांच्या 'जगद्धितेच्छु' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

सन १९०६.

किंमत एक रुपाया.

आणिलें तरी त्यांतील बरेच विषय गहन असून भाषाही त्यांना शोभेलशी प्रौढ ठेवावी लागल्यानें तें लहान मुलामुलींच्या आवाक्याच्या बाहेर गेलें आहे, व यामध्यें अनेक प्रसंगीं ज्या उपकथा गोंविल्या आहेत, त्यामुळें मुख्य कथाभाग चटकन् मुलांच्या ध्यानांत न येतां त्यांना अनेक ठिकाणीं मागचा पुढचा संदर्भ लक्ष्यांत आणण्याला गोंधळ पडतो; तेव्हां त्यांतील सर्व उपकथा निराळ्या काढून त्यांचें इसापनीतिसारखें एक निराळें उपदेशपर पुस्तक करून कौरवपांडवांच्या उत्पत्तीपासून युद्धाच्या अखेरपर्यंतचा सरळ कथाभाग एका निराळ्या पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध केला असतां या दोन्हींच्या वाचनानें महाभारताचें एकंदर स्वरूप लहानपणींच मुलांच्या मनांत उतरून त्यांतील सामान्य नीतितत्त्वांचा ठसा लहानपणींच त्यांच्या हृदयावर चांगला उठून राहील ह्मणून अशीं दोन पुस्तकें तयार करण्याबद्दल अनेक देशबंधूंच्या सूचना आल्यावरून हें व ‘ भारतांतील उपदेशपर गोष्टी ’ अशीं दोन पुस्तकें आह्मीं मुद्दाम मुलामुलींच्या उपयोगासाठीं तयार केलीं आहेत. आतां हा इष्ट हेतु कितपत शेवटास गेला आहे हें पुढें अनुभवान्तीं कळणार आहे.

हीं दोन्ही पुस्तकें समग्र वाचून ठिकठिकाणीं उपयुक्त सूचना करून मोठें साहाय्य दिल्याबद्दल आमच्या दोन मित्रांचे आभार मानून या नूतन आवळ्याजावळ्या भावंडांचा यांच्या वडील भावंडाप्रमाणेंच आमचे प्रिय देशबांधव लडिवाळ करतील, अशी पूर्ण आशा धरून यांना त्यांच्या हातांत देतों.

सदाशिव पेठ,
पुणें सिटी.

ब. त्र्यं. द्रवीड.

अनुक्रमणिका.

कौरवपांडवांचा इतिहास.

कुरूचा जन्म.

सूर्याची एक रूपगुणसंपन्न तपती नांवाची मुलगी होती. ती कोणाला द्यावी ह्याची सूर्याला काळजी पडली. कौरवश्रेष्ठ संवरणाचें थोर कूळ मनांत आणून तो आपल्या मुलीला योग्य पति आहे असें समजून सूर्यानें त्याचें तपतीशीं लग्न लावून दिलें. पुढें तिच्यापासून संवरणाला कुरु नांवाचा मुलगा झाला, ह्मणून त्याच्या वंशजांना कौरव नांव पडलें. दुष्यंताचा मुलगा जो भरत त्याच्यापासून हा वंश झाला असल्यानें याला भारतवंश असेंही नांव आहे, व ययातीचा मुलगा जो पुरु त्यापासून हा झाला असल्यानें याला पुरुवंशही ह्मणतात.

भीष्म जन्म.

पुरुवंशामध्यें प्रतीप नांवाचा कोणी राजा झाला. तो गंगाद्वारीं जाऊन पुष्कळ वर्षें तप करीत असतां कोणे एके वेळीं रूपगुणांनीं संपन्न स्त्रीरूपधारी गंगा पाण्यांतून बाहेर येऊन त्याच्या उजव्या मांडीवर बसली. त्यावेळीं 'हे कल्याणि,' तुझी काय इच्छा आहे ? ह्मणून प्रतीपानें तिला विचारिलें; तेव्हां ती ह्मणाली, ' माझा अंगीकार करा. ' राजा म्हणाला, ' परस्त्रीशीं किंवा अन्य वर्णाच्या स्त्रीशीं संबंध ठेवावयाचा नाहीं असा माझा नेम आहे. ' हें ऐकून ती म्हणाली, ' जवळ करण्याला मी अपात्र नाहीं, मी कुलीन देवकन्या आहें. ' प्रतीप म्हणाला, ' तूं ह्मणतेस तसें अ-

सलें तरी सुनांना वगैरे उचित अशा उजव्या मांडीवर तूं येऊन बसली आहेस, ह्मणून तुझ्याशीं संबंध केल्यानें मी दोषाला पात्र होणार आहें. पाहिजे तर तूं माझी सून हो.' तिनें तें कबूल केलें. पुढें या राजाला एक मुलगा झाला. म्हातारपणीं शांत प्रकृति झाल्यानंतर तो झाला म्हणून त्याचें नांव शांतनु असें ठेविलें. या शांतनूशीं पुढें गंगेचें लग्न लागून त्यापासून भीष्म झाले.

शांतनुसत्यवतीविवाह व भीष्मप्रतिज्ञा.

हा शांतनु राजा आपल्या प्रजेचें मुलाप्रमाणें पालन करीत कौरवांची राजधानी जी हास्तिनापूर तेथें समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य करीत असतां त्याच्या राज्यांत पशुपक्ष्यांचा सुद्धां वध होत नसून श्रेष्ठ अहिंसा धर्म सर्व जन पूर्णपणें पाळीत असत. तो सर्वांशीं सारखा होता. तो कोणालाही अन्यायानें शिक्षा देत नसे. दुःखी व अनाथ यांना तो बापासारखा असे. आचार, शील, व विद्या ह्यांमध्यें त्याच्या तोडीचा असा त्याला भीष्म हा पुत्र झाला; तेव्हां पुढें या गुणवान् मुलाला राजानें यौवराज्याचा अभिषेक केला. भीष्मांनींही आपल्या गुणांनीं बापाला व राष्ट्राला संतुष्ट ठेविलें. पुढें कोणे एके वेळीं शांतनु वनांतून यमुनेच्या कांठानें फिरत असतां त्याला कांहीं चमत्कारिक वास आल्यामुळें तो त्याच्या मागून चालला; तेव्हां एक लावण्यवती कोळ्याची मुलगी त्याच्या दृष्टीस पडली. तिला पाहून, 'तूं कोणाची कोण, येथें काय करीत असतेस,' ह्मणून त्यानें तिला विचारिलें. 'मी कोळ्याची मुलगी, माझें नांव सत्यवती,' ह्मणून तिनें उत्तर दिलें. त्याचें तिच्यावर मन बसल्यानें तिच्या बापाकडे जाऊन त्यानें तिच्या बद्दल मागणी केली. आपण हिच्याशीं लग्न करून घेऊन तिच्या मुलाला राज्य द्याल तर ही मी आपल्याला

देतों, ' असें तो कोळ्यांचा नायक ह्मणाला. भीष्म वडील मुलगा असल्यानें राजाला तें कबूल करतां येईना, व तसाच तो व्यग्र मनानें नगराकडे गेला. पुढें एके वेळीं तो चिंतातुर बसला असतां भीष्म त्याकडे येऊन ह्मणाले, ' सर्व राजे आपले आज्ञांकित आहेत; मग आपण असे नेहमीं चिंतातुर कां दिसतां ? माझ्याशीं बोलतांना एखादा मोठा गूढ प्रश्न आपल्या मनांत घोळत असावा अशा तऱ्हेनें आपण नेहमीं मजकडे पहातां. तोंड पांढरें फटफटीत पडून तोंडावरचें तेज जात चाललें आहे. आपण अगदीं झुरणीला लागलां आहां. घोड्यावर बसून कधीं मृगयेला वगैरे जात नाहीं. आपल्या चिंतेचें कारण कळेल तर कांहीं उपाय तरी करतां येईल. ' हें मुलाचें भाषण ऐकून राजा ह्मणाला, ' माझ्या मनांत कांहीं विचार घोळत आहे हें खरें आहे. आपल्या ह्या एवढ्या मोठ्या कुलांत तूं एकच मुलगा असून तूंही नेहमीं शस्त्र घेऊन कोणत्याना कोणत्या तरी स्वारींत गुंतलेला असतोस. बाळा, मानव देहाची नश्वरता मनांत येऊन मला काळजी वाटत आहे. मुला, कोणत्याही कारणानें तुला जर कांहीं अपाय झाला तर ह्या आमच्या कुळाची काय वाट होणार ? तुझ्या सारखा एकच मुलगा शंभरांपेक्षां अधिक आहे हें मी जाणतों; पण कुळाला खंड पडूं नये ह्मणून फिरून लग्न करावेंसें मला वाटूं लागलें आहे. धर्मवादी लोक एक पुत्रत्व निपुत्रिकत्वाप्रमाणेंच समजतात. ' यावरून बापाचा हेतु ताडून भीष्म त्या कोळ्यांच्या नायकाकडे गेले व त्यांनीं त्याला त्याची मुलगी आपल्या वडिलाकरितां मागितली. त्यांचा आदर करून त्या कोळ्यानें आपली अट त्यांना कळविली. तेव्हां बापाचा उद्देश शेवटास नेण्यासाठीं ते ह्मणाले, 'तुझें म्हणणें मला कबूल आहे. हिचाच मुलगा राज्याचा उपभोग घेईल. ' हें ऐकून कोळी म्हणाला, ' ही दुर्घट प्रतिज्ञा

करणाऱ्या आपलें सौजन्य विलक्षणच आहे. आतां माझें आणखी एक म्हणणें ऐका. माझ्या मुलीच्या कल्याणासाठीं हें मी बोलतों. सर्व राजे लोकांसमक्ष केलेली ही प्रतिज्ञा आपण खचित खरी कराल ह्याविषयीं मला शंका नाहीं; पण आपल्या मुलापासूनही मला तितकीच भीति आहे.' ह्यावर भीष्मांनीं उत्तर दिलें, 'सर्वां समक्ष मी फिरून प्रतिज्ञा करितों कीं, मीं स्वतः तर ह्यापूर्वींच राज्यावर पाणी सोडिलें आहे. मुलासंबंधानें ह्मणशील तर आजपासून मी ब्रह्मचारी राहून अपुत्र असूनही मरणोत्तर उत्तम लोक मिळवून घेईन.' ही प्रतिज्ञा ऐकून त्या कोळ्यानें आपली मुलगी शांतनूला दिली सर्वांनीं त्यांच्या त्या दुर्घट प्रतिज्ञेबद्दल त्यांची प्रशंसा केली. ह्यानें शांतनूला संतोष होऊन 'तुला इच्छामरण येईल,' ह्मणून त्यानें भीष्मांला वर दिला. पुढें हिच्यापासून शांतनूला विचित्रवीर्य मुलगा झाला.

धृतराष्ट्र, पंडु व विदुर यांचा जन्म.

शांतनूचा मुलगा विचित्रवीर्य निपुत्रिक मेल्यावर व्यासांपासून विचित्रवीर्याच्या बायकांना धृतराष्ट्र व पंडु झाले, आणि त्यांच्या दासीला विदुर झाले.

धृतराष्ट्र व पंडु यांच्या जन्मकाळची राष्ट्राची स्थिति.

धृतराष्ट्र, पंडु व विदुर जन्माला आले त्या वेळीं कुरुदेश व त्यांतील प्रजा ह्यांची मोठी भरभराट होती. राष्ट्रामध्यें जिकडे तिकडे कृतयुग भासूं लागलें. नेकी ठेवून लोक एकमेकांशीं प्रेमानें वागत. अहंकार, राग व लोभ हे लोकांच्या गांवींही नसून एकमेकांचें बरें झालेलें पाहून त्यांना संतोष होत असे. मेघमंडळाप्रमाणें दारांवर टांगलेल्या उंच उंच तोरणांनीं व भव्य हवेल्यांनीं

त्या नगराला अमरावतीची शोभा आली असून रत्नाकराप्रमाणें सर्व रत्नांनीं तें भरून निघालें होतें. उत्तर व दक्षिण कुरूमधील जन एकमेकांशीं मोठ्या स्नेहानें रहात असत. गरीबी कोणाला ठाऊक नसे. राष्ट्र जिकडे तिकडे ब्राह्मणांचीं घरें, विहिरी व पुष्पवाटिका ह्यांनीं भरलें असून सर्व वैभवांनीं संपन्न असल्यामुळें नेहमीं जिकडे तिकडे उत्सव सुरू असलेले दिसत. धर्मानें रक्षिलेल्या त्या राष्ट्राला भीष्मांनीं जिंकून संपादिलेल्या पुष्कळ राष्ट्रांची भर पडून त्याचा विस्तार फारच वाढला होता. चोहोंकडे भीष्मांनीं घालून दिलेल्या धर्माप्रमाणें लोक वागत. ह्या भाग्यशाली मुलांचे मौंजीबंधनादि संस्कार केले त्यावेळीं सर्व पौरजनांची धांदल उडून गेली. राजवाड्यांत व पौरांच्या घरोघर ‘ द्या,द्या ’ हेच शब्द ऐकूं येत होते. ह्या तिन्ही मुलांचें भीष्मांनीं लहानपणापासून आपल्या मुलांप्रमाणें पालन केलें. मुंज करून वेदाध्ययनांत, व्यायामांत व शारीरिक श्रमाच्या खेळांत त्यांनीं त्यांना हुषार केलें. ते यौवन दशेंत आले तेव्हां धनुर्विद्या, गदायुद्ध, दांडपट्टा आदिकरून मर्दानी व्यवसाय आणि त्याचप्रमाणें नीतिशास्त्र, इतिहास, पुराणें इत्यादि अनेक विद्यांचें शिक्षण त्यांना दिलें. धनुर्विद्येंत पंडूच्या तोडीचा कोणी नव्हता. धृतराष्ट्राइतकें सामर्थ्य दुसऱ्या कोणाला नव्हतें. शांतनूचा नाहींसा झालेला वंशवृक्ष फिरून ह्याप्रमाणें जोमदार फुटलेला पाहून सर्व राजांची दांडगाई बंद पडली. अंधत्वामुळें धृतराष्ट्राला व शूद्रयोनीपासून जन्म झाल्यामुळें विदुराला राज्यपद न मिळतां पंडूच गादीला मालक झाला.

धृतराष्ट्राचें गांधारीशीं लग्न.

गांधारदेशच्या सुबल राजाची कन्या गांधारी हिला भीष्मांनीं

धृतराष्ट्राकरितां मागणी घातली; तेव्हां धृतराष्ट्र अंधळा असला तरी त्याचें कुल व लौकिक मनांत आणून तो आपली मुलगी त्याला देण्याला कबूल झाला. धृतराष्ट्र अंधळा असून बापानें आपल्याला त्याला देण्याचें ठरविलें आहे ही गोष्ट कानीं पडतांच पतिसंबंधानें मनांत मत्सर येऊं नये म्हणून त्या पतिव्रतेनें आजन्म फडक्याची जाड पट्टी डोळ्यांवर बांधण्याची शपथ घेऊन लगेच त्याप्रमाणें केलें. तिचा भाऊ शकुनि आपल्या बहिणीला घेऊन हास्तिनापुराला आला. तेथें धृतराष्ट्राशीं तिचें मोठ्या थाटानें लग्न झालें. पुढें ती शील, आचार इत्यादि गुणांनीं सर्व कुरुकुलाला तोषवीत नवरा हें आपलें दैवत समजून मोठ्या संतोषानें सासरीं राहिली.

पंडूचें कुंतीशीं लग्न.

यदुकुलोत्पन्न शूर नांवाच्या राजाला कुंति नांवाची मुलगी होती. ती त्यानें आपला आतेभाऊ व स्नेही जो कुंतिभोज त्याला कांहीं अपत्य नसल्यानें देऊन टाकिली. ही कुंति यौवन दशेंत आली असतां पुष्कळ राजांच्या तिला मागण्या येऊं लागल्या. त्यावेळीं स्वयंवरामध्यें तिला देण्याचा तिच्या बापानें विचार केला. राजमंडळामध्यें सर्वांचें तेज झाकून टाकणाऱ्या, सूर्यासारख्या तेजस्वी, महाशक्तिमान्, पंडूला पाहून कुंतीनें त्याच्या गळ्यांत माळ घातली; नंतर पित्यानें तिचें पंडूबरोबर लग्न लावून दिलें. विवाहविधि आटोपल्यावर पुष्कळ संपत्ति देऊन राजानें त्याला त्याच्या नगरीला पाठविलें. आपल्या नगरीला आल्यावर आपल्या बायकोसाठीं निराळें मंदिर तयार करवून त्यांत त्यानें तिला ठेविलें.

पंडूचें माद्रीशीं लग्न.

पंडूचें दुसरें लग्न करण्याच्या उद्देशानें भीष्म मद्रदेशच्या राजाकडे गेले. भीष्म आले आहेत अशी वर्दी लागतांच मद्राधिपति त्यांना सामोरा गेला, व त्यांचा सन्मान करून त्यांना नगरांत घेऊन गेला, आणि त्यांचा चांगला सत्कार करून त्यानें त्यांना येण्याचें कारण विचारिलें. तेव्हां भीष्मांनीं 'तुमची मुलगी माद्री पंडूसाठीं मागण्याकरितां मी आलों आहे,' असें सांगितलें. तेव्हां तो मद्रराज म्हणाला, ' ह्यापेक्षां इष्टसंबंध मिळणें खचित शक्य नाहीं. ' असें म्हणून त्यानें आपल्या मुलीला सालंकार भीष्मांच्या स्वाधीन केलें. भीष्म तिच्यासह हास्तिनापुराला आले. त्या ठिकाणीं उत्तम मुहूर्तावर पंडूचें विधिपूर्वक माद्रीशीं लग्न लागलें. विवाहविधि आटोपल्यावर त्यानें तिला एक निराळें मंदिर बांधून देऊन त्यांत ठेविलें.

पंडूचा दिग्विजय.

पुढें हत्ती, घोडे, रथ इत्यादि चतुरंग सैन्यानिशीं पंडु दिग्विजयाला निघाला. प्रथम दशार्णवासी लोक त्यानें युद्धांत जिंकिले. नंतर शक्तीचा मोठा अभिमान बाळगणारा मगधाधिपति दीर्घ ह्याला त्यानें युद्धांत ठार केलें. तेथून पुष्कळ संपत्ति व वाहनें घेऊन मिथिलेला जाऊन तो देश त्यानें काबीज केला; त्याचप्रमाणें काशीमध्यें व सुम्ह आणि पुंड्र या देशांत त्यानें कौरवांचें वर्चस्व स्थापित केलें. बाणांचा वर्षाव ह्याच ज्याच्या ज्वाला, शस्त्रें हींच ज्याची ज्योती, अशा पंडूरूपी अग्नीच्या तोंडीं पडून राजे होरपळून निघाले. सैन्याच्या साहाय्यानें त्यानें बलवान् राजांची शक्ति हरण करून त्यांना अगदीं कौरवांचे आज्ञांकित करून सोडिलें. त्यानें जिंकलेले सर्व राजे त्याला इंद्राप्रमाणें मानूं लागून

त्याच्यापुढें हात जोडून उभे राहूं लागले. संपत्ति, नानाविध रत्नें, सोनें, रुपें, उत्तम गाई, उत्तम घोडे, उत्तम रथ, हत्ती, गाढव, उंट, ह्मशी त्याचप्रमाणें मौल्यवान् लोकरी वस्त्रें व हरणाचीं कातडीं हीं ते त्याला करभार ह्मणून आणून देऊं लागले. त्या सर्वांचा स्वीकार करून हास्तिनापुराला परत येऊन स्मरणांतून निघून गेलेल्या शांतनु व भरत यांच्या कीर्तीची लोकांना फिरून त्यानें आठवण करून दिली. अनेक राष्ट्रें जिंकून कृतार्थ होऊन आलेल्या पंडूला भीष्मांनीं आलिंगन देऊन आनंदाश्रु ढाळिले. त्या पराक्रमशाली मुलाला आलिंगन देऊन सत्यवतीलाही फार आनंद झाला. तलवार व धनुष्यबाण घेऊन व अभेद्य कवच घालून मृगयेसाठीं वनांतून यास फिरतांना पाहून सर्व वनवासी लोकांना तो देवासारखा वाटे. एक शूद्रयोनींत ब्राह्मणापासून झालेली मुलगी पाहून त्यानें तिच्याशीं विदुरांचें लग्न लावून दिलें. तिला विदुरांपासून त्यांसारखे विनयसपन्न मुलगे झाले.

पांडवांचा जन्म.

कोणे एके वेळीं पंडु अनेक श्वापदांनीं गजबजलेल्या एका निबिड अरण्यामधून हिंडत असतां त्याला एका हरणाचा शाप झाल्यावरून, राज्यभार धृतराष्ट्रावर टाकून अरण्यवास पतकरण्याच्या निश्चयानें तो वनाला निघाला. त्याच्या कुंति व माद्री या दोन बायकाही त्याची सेवा करीत वनांत त्याच्याबरोबर राहण्यासाठीं निघाल्या. तेथें यम, वायु व इंद्र यांच्या प्रसादानें कुंतीला तीन मुलगे झाले व अश्विनीकुमारांच्या कृपेनें माद्रीला दोन मुलगे झाले. कुंतीला कौमारावस्थेंत कर्ण झाला होता. त्याला तिनें सोडून दिल्यानें दुर्योधनाच्या सारथ्याला तो नदींत वहात जात असतां सांपडून त्यानें त्याला वाढविलें. याच्या बायकोच्या नां-

वावरूनच याला राधेय नांव पडलें. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर पंडु मेला. माद्री त्याबरोबर सती गेली व कुंति लहान मुलांना संभाळण्यासाठीं मागें राहिली.

कौरवांचा जन्म.

कोणे एके वेळीं व्यासांची गांधारीनें चांगली सेवा करून त्यांना संतुष्ट केलें. त्यांनीं तिला वर मागण्यास सांगितलें. तिनें आपल्या नवऱ्यासारखे शंभर मुलगे आपल्याला व्हावे असा वर मागितला. पुढें धृतराष्ट्रापासून तिला गर्भ राहिला. दोन वर्षें तो तिच्या उदरांत होता. इतक्यांत कुंतीला प्रभातकालच्या सूर्याप्रमाणें तेजस्वी मुलगा झालेला ऐकून तिला मत्सर उत्पन्न होऊन आपल्या पोटांत गर्भ किती तरी दिवस राहिला ह्मणून तिला सखेद आश्चर्य वाटून मत्सरामुळें तिनें तो गर्भ उदरांतून उपसून काढिला. तेव्हां रक्तानें भरलेला मांसपिंड बाहेर पडला. दोन वर्षें उदरांत धारण केलेल्या ह्या गोळ्याला ती टाकून देण्याला तयार झाली. इतक्यांत अंतर्ज्ञानानें तें जाणून व्यास तिच्याकडे आले, व तो मांसपिंड पाहून ' हें काय केलेंस, ' ह्मणून म्हणाले. तिनें कांहीं गुप्त न ठेवितां मनांतलें सर्व त्यांना कळविलें. नंतर व्यासांच्या आज्ञेवरून त्यावर तिनें थंड पाणी शिंपडिलें. त्याबरोबर त्याचे शंभर तुकडे झाले. ते सूक्ष्म गर्भपिंड तिनें व्यासांच्या आज्ञेनें तुपानें भरलेल्या भांड्यांत घालून त्यांचें मोठ्या काळजीनें जतन केलें. पुढें त्यांपासून दुर्योधन, दुर्मर्षण इत्यादि शंभर मुलगे व दुश्चला नांवाची एक मुलगी अशीं एकशें एक मुलें झालीं; पैकीं दुर्योधन वडील होता. दुर्योधन जन्मला त्याच दिवशीं बलशाली भीम जन्माला आला. ह्या दुर्योधनानें जन्मतांच गाढवासारखा शब्द केला, व त्याच वेळीं चोहोंकडे दुश्चिन्हसू-

चक कोल्हीं ओरडूं लागलीं. तें पाहून विदुर धृतराष्ट्राला ह्मणाले ‘ तुझ्या वडील मुलाच्या जन्मकालीं हे अशुभ शकून होत आहेत. ह्यावरून तो कुलाचा अंत करणार ! ह्या एकाला टाकून कुलाचें व जगाचें कल्याण करणें चांगलें. कुलासाठीं एकाला, एका गांवासाठीं कुलाला, एका देशासाठीं गांवाला व आपल्यासाठीं सर्व पृथ्वीला सोडावें हें चांगलें. ’ असें जरी त्यांनीं सांगितलें तरी पुत्रप्रेम अनावर होऊन धृतराष्ट्रानें त्यांच्या ह्मणण्याकडे दुर्लक्ष्य केलें.

कृपांचा जन्म.

थोर गौतम ऋषींचे शरद्वत नांवाचे पुत्र होते. त्यांचें लक्ष्य धनुर्विद्येकडे जसें लागे तसें वेदाकडे लागत नसे. इतर ब्रह्मचारी तप व वेद ह्यांचें साधन करून घेत, तसें त्यांनीं सर्व अस्त्रांचें साधन करून घेतलें. धनुर्विद्येंतल्या त्यांच्या प्राविण्यानें व उग्र तपानें इंद्राला देखील काळजी पडली; त्यामुळें इंद्रानें जानपदी नांवाच्या देवकन्येला त्यांच्या तपांत विघ्न करण्यास पाठविलें. तिची व त्यांची दृष्टादृष्ट होतांच त्यांना एक जुळें झालें. लगेच शरद्वत त्यांना तेथें सोडून तेथून निघून गेले. पुढें कोणे एके वेळीं शांतनु राजा स्वेच्छाचारानें अरण्यांत मृगया करीत असतां त्याच्या सेवकांपैकीं एकाच्या दृष्टीस तें जुळें पडलें व त्यानें तें राजाला दाखविलें. राजाला त्या मुलांची दया येऊन तो त्यांना आपल्या नगरीला घेऊन गेला, व पोटच्या मुलाप्रमाणें त्यानें त्यांचें पालन केलें. पुढें तें जुळें मोठें झाल्यावर त्याचा त्यानें संस्कार करविला. कृपायुक्त होऊन त्यानें त्यांना वाढविलें ह्मणून त्यांचीं कृप व कृपी अशीं नांवें ठेवण्यांत आलीं. पुढें शरद्वत त्या ठिकाणीं आले व त्या मुलांची गोत्रादि सर्व माहिती सांगून

त्यांनीं त्यांना चार प्रकारची धनुर्विद्या, अनेक शास्त्रें व सर्व गुप्त विद्या शिकविल्या. हे कृप पुढें लवकरच मोठ्या आचार्य पदाला चढले; आणि यादव, कौरव, पांडव इत्यादि सर्व क्षत्रिय ह्यांच्यापासून धनुर्विद्या शिकले.

कौरवपांडवांचें बालपण.

वेदोक्त संस्कार झाल्यावर पांडव व धृतराष्ट्राचे मुलगे अनेक सुखांचा यथायोग्य उपभोग घेत पितृगृहीं सुखानें वाढत होते. पांडवांच्या नैसर्गिक बुद्धीच्या योगानें त्यांची सर्व विद्यांत व खेळांत सरशी असे. धावून दूरची एखादी वस्तू आधीं घेऊन येण्यांत, खाण्यांत व धूळखेळांत भीमसेन सर्व कौरवांना हटवून टाकी. ते मोठ्या आनंदानें खेळत असतां त्यांवर तुटून पडून तो त्यांच्या खेळाचा विरस करी. त्यांना डोक्यावर घेऊन पांडवांची व त्यांची झुंज लावी, शंभर कौरवांची तो एकटा एकदम खोड मोडीत असे. जोरानें त्यांच्या शेंड्या ओढून लाथेखालीं तुडवून त्यांना जमिनीवरून कोस कोस फरफटत ओढीत नेत असे. पाण्यांत खेळतांना दहा दहा मुलांना बगलेंत कच्च धरून तो पाण्यांत बुडून रहात असे. कौरव झाडांवर चढून फळें तोडूं लागले म्हणजे लाथेनें तो तीं अगदीं हलवून सोडी, व कधीं कधीं लाथेच्या जोरानें झाडें उमळून त्या मुलांसह खालीं पडत. कौरव त्याचा हेवा करीत; तरी धावण्यांत व कुस्त्यांत त्यांच्यानें त्याची बरोबरी करवत नसे. ह्याप्रमाणें भीमाच्या हूडपणामुळें त्याबद्दल कौरवांचा द्वेष दिवसानुदिवस वाढत चालला, व तो त्यांच्या डोळ्यांत सलूं लागला. भीमसेनाचें तें लोकविश्रुत बल पाहून दुर्योधन त्याविषयीं उघड द्वेष दाखवूं लागला. नेहमीं मनांत पाप घोळत असल्यानें मूर्खपणामुळें व ऐश्वर्यलोभानें त्याच्या मनांत दु-

ष्टबुद्धि येऊं लागली; म्हणून भीम निजला असतां कपटानें त्याला बांधून गंगेंत फेकून द्यावा व त्याच्या वडील भावाला बंदींत टाकून पृथ्वीचें राज्य आपण करावें अशी पापवासना त्याच्या मनांत येऊं लागली. पुढें तसें करण्याचा निश्चय ठरल्यावर तो दुष्ट नेहमीं संधीची वाट पहात राहिला. कोणे एके वेळीं नगराबाहेर तंबू वगैरे देवऊन आणि त्यांत खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था करवून त्यानें जलक्रीडेचा बेत ठरविला. हत्ती, घोडे, रथ इत्यादि वाहनांतून ते सर्व जलक्रीडेला निघाले. बागेजवळ आल्यावर बाकीच्या लोकांना रजा देऊन ते सर्व कुमार त्या बागेंत शिरले. तेथें मनोरम फलपुष्पें पाहून त्यांच्या मनाला फार आनंद झाला. फरासांनीं झाडून उत्तम उत्तम बिछायती जमिनीवर पसरल्या होत्या. त्या ठिकाणीं खेळत असतां ते सर्व एकमेकांच्या तोंडांत खाण्याचे पदार्थ देत होते. त्यावेळीं पापी दुर्योधनानें भीमसेनाला मारण्याच्या उद्देशानें अन्नांत कालकूट विष पुष्कळ कालवून तें त्याला आपण स्वतः आग्रह करून यथेच्छ चारिलें, व आपल्याला धन्य मानून घेऊन मनांतल्या मनांत तो हासत होता. जलक्रीडा संपल्यावर दमल्यामुळें संध्याकाळीं तेथेंच निजण्याचें त्यांनीं ठरविलें. त्या ठिकाणीं व्यायामाच्यायोगानें दमून गेलेल्या भीमसेनाला त्या विषामुळें गुंगी येऊन तो मेल्याप्रमाणें पडला; तेव्हां दुर्योधनानें स्वतः त्याला बांधून गंगेंत फेकून दिलें. गुंगींतच भीम पाण्याच्या तळाशीं गेला. तेथून नागांना तुडवीत तो नागलोकामधून चालला असतां पुष्कळ नाग त्याला चावले; त्यामुळें त्याच्या अंगांत भिनलेलें कालकूट विष त्या नागांच्या विषानें नाहींसें झालें. पुढें भीमानें जागें होऊन नागांचा विध्वंस मांडिला. भीमाच्या तडाक्यांतून सुटलेल्या नागांनीं जाऊन सर्व हकीकत वासुकीला कळविली. नंतर वासुकी नागासहवर्तमान भीमाकडे

आला. कुंतीचा आजा आर्यक या नांवाचा नाग त्या ठिकाणीं होता. त्यानें मोठ्या प्रेमानें भीमाला दृढालिंगन दिलें. वासुकीलाही संतोष होऊन आर्यकाच्या विनंतीवरून त्यानें ज्या कुंडामध्यें हजार हत्तींचें बल देणारें अमृत होतें, अशा आठ कुंडांतून यथेच्छ अमृत प्राशन करण्यास भीमाला आज्ञा दिली; तेव्हां भीमानें तीं आठही कुंडें गट्ट केलीं. नंतर त्या अमृताचें पूर्ण पचन झाल्यावर अंगांत विलक्षण बल येऊन भीम चांगला हुषार झाला. त्याच्या अंगीं दहा हजार नागांचें बल आलें. पुढें नागांचा निरोप घेऊन तो मोठ्या आनंदानें पाण्यांतून वर येऊन हास्तिनापुराला आला.

द्रोणांचा मानभंग.

द्रोण म्हणून भारद्वाज ऋषींचें मुलगे होते. ते व द्रुपद लहानपणीं अग्निवेशापाशीं एकत्र अस्त्रविद्या शिकत होते. पुढें द्रुपद उत्तर पांचालाचा राजा झाला, व द्रोण आपल्या वडिलांच्या आश्रमांत तपाचरण करीत राहिले. कांहीं दिवसांनीं कृपाचार्यांच्या बहिणीशीं त्याचें लग्न झालें. त्यांच्यापासून तिला अश्वत्थामा नांवाचा मुलगा झाला. कोणे एकेवेळीं श्रीमंतांचीं मुलें दूध पितांना पाहून अश्वत्थामा ‘ मला दूध पाहिजे, ’ म्हणून हट्ट घेऊन रडत बसला. त्यांची बायको अश्वत्थाम्याला दूध म्हणून पिठवणी देई. तें पिऊन ‘ मीही दूध प्यालों,’ म्हणून तो मुलांमध्यें आनंदानें नाचत असे. हें पाहून द्रोणांच्या पोटांत भडभडून येई. त्यांना आपल्या गरीबीचें फार वाईट वाटलें; पण पैशासाठीं दुसऱ्याची नोकरी करावयाची नाहीं असा निर्धार असल्यानें पूर्वस्नेह मनांत आणून ते द्रुपदाकडे गाय मागण्याकरितां गेले. तेव्हां द्रुपद हासून त्यांना म्हणाला, ‘हे ब्राह्मणा, म्हातारपणामुळें तुझ्या

बुद्धीला भ्रम पडल्यासारखें दिसतें;' म्हणून मूर्खपणामुळें तूं मला मित्र म्हणून हाक मारतोस. धनवानाची निर्धनाबरोबर, विद्वानाची मूर्खाबरोबर, राजाची सामान्य जनाबरोबर मैत्री कधीं कोणीं ऐकिली आहे काय? सख्य जुळण्याला बरोबरी लागते. उगीच ह्या पूर्वींच्या मैत्रीच्या भ्रांतींत राहूं नको. तें विसर.' ह्याप्रमाणें द्रुपदानें धिक्कार केल्यावर बायकोला घेऊन कुरुदेशाला येऊन ते कृपांच्या घरीं राहिले व पुढें त्यांनीं कौरवांचें गुरुत्व पतकरिलें.

द्रोणांचें आचार्यत्व.

द्रोण आपल्या शिष्यांसह आनंदांत राहून सर्व मुलांना धनुर्विद्या व अस्त्रविद्या शिकवीत असतां बाकीच्या सर्व शिष्यांना भरण्याला उशीर लागेल असे बारीक तोंडांचे चंबू देऊन व आपल्या मुलाला लवकर भरणारा गडवा देऊन ते पाण्याला पाठवीत, व दुसरे परत येण्यापूर्वीं आपल्या मुलाला ते शेलके शेलके प्रयोग शिकवून ठेवीत. हें कपट अर्जुनानें ओळखून वारुणास्त्राच्या प्रयोगानेंच आपला चंबू भरून घेऊन तो आचार्य पुत्राबरोबर परत येऊं लागला. तो बुद्धिमान् व अस्त्रविद्येंत निष्णात असल्यामुळें ह्या विशिष्ट अस्त्रांत आचार्यपुत्राला हार गेला नाहीं. गुरुभक्तीमुळें तो द्रोणांना आवडता झाला. त्याला बाणांचा नेम मारण्यांत नेहमीं गर्क पाहून द्रोणांनीं आचाऱ्याला ' अर्जुनाला अंधारांत तूं कधीं जेवायाला वाढूं नको,' अशी ताकीद दिली. पुढें एके वेळीं अर्जुन जेवीत असतां वाऱ्यानें दिवा विझला, तरी संवयीच्या योगानें हात नीट तोंडांत जातांना पाहून रात्रींच्या वेळीं धनुर्विद्येचा अभ्यास करावा, असें त्याच्या मनांत आलें, व त्याप्रमाणें सर्व झोपीं गेल्यावर तो धनुष्याचा टणत्कार करूं लागला. तो ऐकून द्रोणांनीं प्रेमपूर्वक जवळ जाऊन त्याला आलिं-

गन दिलें, आणि ह्या भूतलावर तुझ्या तोडीचा धनुर्धर कोणी होणार नाहीं, ' असा त्यास आशीर्वाद दिला.

कौरवकुमारांचें अस्त्रपरीक्षण.

पुढें पांडवकौरव सर्व अस्त्रविद्यांमध्यें निष्णात झालेसें पाहून विदुरभीष्मादि शहाण्या लोकांसमक्ष एका मोठ्या पटांगणांत त्यांची परीक्षा घेण्याविषयीं द्रोणांनीं धृतराष्ट्राला सांगितलें; तेव्हां फार संतुष्ट होऊन 'आपण हें महत्कार्य केलें आहे,' असें त्यांना म्हणून, ' आचार्य सांगतील त्याप्रमाणें सर्व व्यवस्था ठेव, ' असें विदुरांना धृतराष्ट्रानें सांगितलें. नंतर द्रोणांसहवर्तमान विदुर नगराबाहेर पडले, व ज्या ठिकाणीं झाडझुडूप वगैरे कांहीं नसून पाण्याचे स्वच्छ झरे होते, अशी सपाट जमीन स्वतः मापून त्या ठिकाणीं राजघराण्यांतील लोक व स्त्रिया यांसाठीं उत्तम प्रेक्षागृह तयार करवून तेथें सर्व आयुधें तयार ठेवविलीं. भोंवतालीं प्रेक्षकांसाठीं पुष्कळ चढत्या जागा तयार करविल्या. श्रीमान् लोकांसाठीं तंबू देवविले. नेमलेला दिवस आल्यावर भीष्म, कृप व त्यांच्या मागून राजा हे सर्व मोठ्या थाटानें तेथें आले. भाग्यशाली गांधारी, कुंति व इतर राजस्त्रिया आपल्या दासी व लवाजमा ह्यांसहवर्तमान मोठ्या आनंदानें तें कौतुक पहाण्यासाठीं तेथें आल्या. त्या कालीं ब्राह्मणक्षत्रियादि चारी वर्णांच्या लोकांचे थवेच्या थवे कुमारांची शिक्षणपरीक्षा पहाण्यासाठीं नगराबाहेर त्या पटांगणाकडे धावत होते. वाद्यांच्या नादानें व जनसमूहाच्या गलबल्यानें तो समाज एखाद्या महासागराप्रमाणें क्षुब्ध झाला होता. इतक्यांत शुभ्र धोतर नेसून, रुद्राक्षाची माळ घातलेले पिंगट जटाधारी द्रोणाचार्य कुमारांसहवर्तमान त्या ठिकाणीं आले. नंतर समयानुरूप बलिदान वगैरे झाल्यावर कांहीं लोक नाना आयुधें

घेऊन त्या ठिकाणीं आले. मग अंगुलीत्राण घालून महावीर कुमार खाकेंत भाता लटकावून कंबर खेचून यथाक्रमानें आपली अस्त्रविद्या दाखविण्याला तयार झाले. त्याबरोबर क्षणांत जिकडे तिकडे शांतता झाली. त्या कुमारांनीं घोड्यांवरून धावतां धावतां अनेक नामांकित बाणांनीं दूरदूरचीं निशाणें पाडलीं. विस्मयानें डोळे प्रफुल्लित होऊन सहस्रावधि जन ' शाबास, शाबास ' म्हणून ओरडत होते. धनुर्विद्येमध्यें आपलें नैपुण्य व चलाखी दाखविल्यावर रथपरीक्षा देऊन ते सर्व कुमार ढालतरवारी घेऊन तरवारीच्या फेका करूं लागले. त्या कुमारांचा प्रयोग, संहार, हस्तलाघव, लालित्य, स्थैर्य, बाहुवीर्य, इत्यादि अनेक गुण लोकांच्या उत्तम प्रकारें नजरेस आले. इतक्यांत आपापलें शौर्य दाखवून एकमेकांवर सरशी करण्यास आतुर झालेले दुर्योधन व भीमसेन गदा घेऊन मैदानांत उतरले. मत्तगजांप्रमाणें गुरगुरत ते घेर घेत होते. कुमारांचें हें सर्व कौतुक विदुर धृतराष्ट्राला, कुंतीला व गांधारीला सांगत होते. दुर्योधन व भीमसेन तेथें आले तेव्हां पक्षपातामुळें त्या समुदायामध्यें एकदम दुफळी झाली. ' कायहो हा वीर दुर्योधन ! केवढा पराक्रमी हा भीम ! ' असे शब्द एकदम कानीं येऊं लागले. तो प्रेक्षकसमुदाय याप्रमणें क्षुब्ध झालेला पाहून बेरंग होऊं नये म्हणून भीम व दुर्योधन यांनीं आपापलें कौशल्य दाखविल्यावर सुज्ञ द्रोणांनीं आपल्या मुलाला त्यांना वेगळें करण्यास सांगितलें. नंतर गंभीर नाद देणारें वाद्य बंद करवून, ' सर्व शस्त्रास्त्रांत निष्णात जो हा माझा प्रिय पार्थ याचें शिक्षण पहा, ' म्हणून द्रोणांनीं मोठ्यानें जमलेल्या समाजाला विनंति केली; तेव्हां बाहुत्राण व अंगुलित्राण बांधून, भाता बाणांनीं पूर्ण भरून घेऊन, सोन्याचें चिलखत चढवून व धनुष्य हातांत घेऊन अर्जुन रंगामध्यें शिरला. त्यावेळीं

प्रेक्षकांना मोठा हर्ष होऊन जिकडे तिकडे एकच गडघड उडून राहिली. सभोंवार शंख व इतर वाद्यें ह्यांचा गजर होत होता. त्या वेळीं " हा कुंतिपुत्र," "हा श्रीमान् मध्यम पांडव," " हा कुरूंचा रक्षणकर्ता, " " हा अस्त्रविद्येमध्यें श्रेष्ठ, " " हा धार्मिक, " " हा शील व ज्ञान यांचा निधि ! " असे उद्गार जिकडे तिकडे कानीं पडूं लागले. ते शब्द ऐकून अश्रूंनीं कुंतीचें उरःस्थळ भिजून निघालें. ' हे विदुरा, खवळलेल्या महासागराच्या गर्जनेप्रमाणें आकाशाला जाऊन भिडणारा हा मोठा शब्द कशाचा उठला आहे ? ' म्हणून धृतराष्ट्रानें विदुरांला विचारिलें. तेव्हां ' पार्थ रंगभूमीवर आल्यामुळें समाजाची ही धांदल उडून गेली आहे,' असें विदुरांनीं त्याला सांगितलें. तो हर्षसागरांत बुडालेला समाज फिरून स्थिरस्थावर झाल्यावर अर्जुनानें गुरूसमक्ष सर्वांना आपलें अस्त्रलाघव दाखविलें. आग्नेयास्त्रानें अग्नि, वारुणानें पाणी, वायव्यानें वारा, पार्जन्यानें ढग व पार्वतानें पर्वत उत्पन्न करीत भौमास्त्राचा प्रयोग करून तो भूमीमध्यें शिरून अंतर्धानास्त्रानें अदृश्य झाला. क्षणांत वर, क्षणांत खालीं, क्षणांत रथाग्रीं, क्षणांत त्याच्या मध्यभागीं, क्षणांत भूमीवर, अशा प्रकारें त्याची विद्युल्लतेप्रमाणें हालचाल चालली होती. त्याचें लाघव विलक्षण असल्यामुळें नानाविध शरांनीं त्यानें अनेक सूक्ष्म निशाणें मारिलीं. त्या ठिकाणीं धावणाऱ्या डुकराची प्रतिमा निशाणादाखल ठेविली होती, तिच्या तोंडांत एकाच वेळीं त्यानें पांच बाण सोडिले. गाईच्या शिंगांमधून एकदम एकवीस बाण मारिले. याप्रमाणें शस्त्रांत, तरवारींत, गदाविद्येंत व अशा प्रकारच्या अनेक विद्यांत कौशल्य दाखवून तो घेर घेत फिरत होता. त्यानें आपल्या सर्व विद्यांची परीक्षा दाखविल्यावर वाद्यें बंद पडलीं. इतक्यांत विजेच्या गडगडाटाप्रमाणें महाशब्द समाजाच्या का-

नावर पडला. तो ऐकून पर्वत फाटताहेत कीं काय, किंवा भूमि दुभंगते कीं काय, असा संशय पडून एकदम प्रेक्षकांची दृष्टि प्रेक्षागृहाच्या दाराकडे गेली. दुर्योधन एकदम उठला असतां अश्वत्थाम्यानें त्याला जाग्यावर बसविलें. अंगच्या कवचकुंडलांनीं ज्याच्या मुखाला अवर्णनीय शोभा आली होती, व ज्यानें हातांत धनुष्यबाण घेऊन कंबरेला तरवार लटकाविली होती, असा कीर्तिमान् सूर्यपुत्र कर्ण प्रफुल्लित नेत्रांनीं जनसमूहामधून वाट काढीत रणांगणांत येत होता. त्याकडे डोळे लावून, 'हा कोण, येथें कशाला आला,' म्हणून तो क्षुब्ध समाज जिज्ञासापूर्वक विचारपूस करीत असतां अर्जुन आपला बंधु आहे हें न ओळखतां कर्ण त्याला म्हणाला, 'पार्था, तूं जे जे कांहीं म्हणून चमत्कार करून दाखविलेस, ते ते मी लोकांना तुझ्यापेक्षां अधिक चांगल्या तऱ्हेनें करून दाखवितों. स्वतःच्या संबंधानें मोठा अभिमान बाळगूं नकोस.' हें त्याचें भाषण ऐकून तो समाज चित्राप्रमाणें गप्प झाला. दुर्योधनाला मोठा आनंद झाला व अर्जुनाला अगदीं त्वेष चढला. द्रोणांची आज्ञा घेऊन अर्जुनानें जे जे म्हणून चमत्कार करून दाखविले होते ते सर्व कर्णानें त्याहून वरचढ रीतीनें करून दाखविले. दुर्योधनानें मोठ्या आनंदानें त्याला आलिंगन देऊन जवळ केलें. नंतर कर्णानें अर्जुनाबरोबर द्वंद्वयुद्ध करण्याची इच्छा दाखविली असतां चीड येऊन अर्जुन त्याला म्हणाला, 'आगांतुकांना जो लोक मिळतो तेथें आज मी तुला पाठवितों.' कर्णानें उत्तर दिलें, 'ह्या रणभूमीवर येण्याला सर्वांना सारखा अधिकार आहे. राजांना श्रेष्ठत्व त्यांच्या अंगांतील वीर्यामुळें येतें. धर्मही बलालाच धरून असतो. आज गुरूच्या समक्ष बाणानें हें तुझें डोकें उडवितों पहा.' हें ऐकून द्रोणांची आज्ञा घेऊन अर्जुन युद्धाला तयार झाला, व कर्णही ध-

नुष्य बाणांनिशीं पुढें सरसावला. त्या वेळीं विद्युल्लता व इंद्रधनुष्य ह्यांनीं युक्त अशा गरजणाऱ्या मेघांनीं सर्व आकाश भरून गेलें. सर्व कौरव कर्णाच्या बाजूला ओळीनें उभे राहिले. द्रोण, कृप व भीष्म अर्जुनाच्या बाजूला होते. ह्याप्रमाणें त्या रणांगणामध्यें दुफळी झाली होती. स्त्रियांमध्यें सुद्धां दोन पक्ष दिसून येत होते. आपापलीं धनुष्यें सज्ज करून उभे असलेल्या ह्या वीरांना कृप म्हणाले, ' हा पृथेचा धाकटा मुलगा पंडुनंदन अर्जुन तुझ्याबरोबर युद्ध करण्याला तयार आहे. तूंही आपल्या आईबापांचीं नांवें व कुल सांग. तें कळल्यावर मग युद्ध करण्याला तूं योग्य आहेस किंवा नाहीं ह्याचा हा विचार करील. ' हें ऐकून कर्णाचें तोंड खरकन् उतरलें. दुर्योधन म्हणाला, ' आचार्य, थोर कुलीं जन्म, शौर्य व सेनानायकत्व अशी तीन प्रकारची राजांची योग्यता शास्त्रांत सांगितली आहे. अराजाबरोबर अर्जुनाची युद्ध करण्याची इच्छा नसेल तर हा पहा मी आतां कर्णाला अंगदेशच्या राज्याचा अभिषेक करतों. ' असें म्हणून लागलाच त्यानें लाह्या व फुलें यांनीं भरलेल्या सुवर्ण कलशांनीं कर्णाला सुवर्णपीठावर बसवून त्यावर छत्रचामर धरवून मंत्रज्ञ ब्राह्मणांकडून जयजयकारपूर्वक राज्याभिषेक करविला. त्या उपकाराबद्दल ' आजन्म दुर्योधनाला सोडावयाचें नाहीं, ' अशी कर्णानें शपथ घेतली. त्या वेळीं कर्णाचा मानलेला बाप दुर्योधनाचा सारथी तेथें आला असतां कर्णानें बापाला योग्य असा त्याचा सत्कार केला. तें पाहून तो सारथ्याचा पोरगा आहेसें वाटून भीम त्याची थट्टा करून म्हणाला, ' हे सारथ्याच्या पोरा, रणांत अर्जुनाच्या हातून मरण्या एवढी तुझी योग्यता नाहीं. चाबूक हातीं घेऊन स्वकुलाला शोभणारा घोडा हाकण्याचें काम कर. ' हें ऐकून दांतओंठ चावीत कर्णानें दीर्घोच्छ्वास टाकीत वर सूर्याकडे दृष्टि फे-

किली. तेव्हां दुर्योधन पुढें येऊन भीमाला म्हणाला, 'याला असें टाकून बोलणें तुला शोभत नाहीं. बलच क्षत्रियामध्यें श्रेष्ठ समजलें असून क्षत्रिय उठला असतां त्याबरोबर युद्ध करणें हा क्षत्रियाचा धर्म आहे. शूर व नद्या यांच्या उगमाचा कोणी विचार करूं नये. हा आपल्या बाहुवीर्यानें ह्या पृथ्वीचेंच काय, पण नागलोकाचें देखील राज्य करण्याला पात्र आहे. माझें हें करणें ज्याला पसंत नसेल त्यानें खुशाल धनुष्य घेऊन माझ्यापुढें उभे रहावें.' हें ऐकून जिकडे तिकडे गडबड उडून राहिली. 'वाहवा, वाहवा,' असा शब्द होत असतां सूर्य अस्ताला गेला, आणि पटांगणांतून दुर्योधन कर्णाचा हात धरून बाहेर पडला. द्रोण, कृप व भीष्म यांसहवर्तमान पांडव आपल्या वाड्याकडे गेले. कर्ण आपल्या बाजूला मिळाल्यामुळें अर्जुनाच्या संबंधानें दूर्योधन निःकाळजी झाला. युधिष्ठिराला देखील कर्णासारखा योद्धा कोणी नाहीं असें वाटूं लागलें.

द्रुपदावर सूड.

पांडव व कौरव अस्त्रविद्येंत निष्णात झाले, तेव्हां गुरुदक्षिणा मागण्याची वेळ आलीसें वाटून सर्व शिष्यांना द्रोणांनीं आपल्या जवळ बोलाविलें, व 'गुरुदक्षिणेबद्दल द्रुपदाला पकडून आणा' ह्मणून आज्ञा केली. 'बरें' ह्मणून द्रोणांसहवर्तमान ते द्रुपदाकडे निघाले. पांचाल देशाला पोहोंचल्यावर मोठमोठे पराक्रमी दुर्योधन प्रभृति कौरवकुमार कर्णासह मीपणाच्या घमेंडींत नगरावर चालून गेले. द्रुपद राजाही अंगांत कवच घालून बंधूसहवर्तमान सैन्य घेऊन नगराबाहेर पडला, व त्यानें चाल करून जाऊन कौरवांवर शरवर्षाव सुरू केला. प्रथमच गुरूंना एकांतांत गांठून ' पांचाल राजा कौरवांच्या हातीं लागणें शक्य नाहीं, त्यांचा पराक्रम दि-

सून आल्यावर मागून मला जें कर्तव्य तें मी करीन,' असें सांगून अर्जुन भावांसहवर्तमान मागें राहिला होता. द्रुपदाच्या तीक्ष्ण बाणांनीं कौरव सैन्य अगदीं जेरीस आलें. दुर्योधनादि कौरव मोठ्या त्वेषानें द्रुपदावर बाण सोडीत होते; पण त्या महा धनुर्धरापुढें त्यांची डाळ शिजेना. तेव्हां सर्व नगरवासी लोकांनीं हातांत मुसळ व काठ्या घेऊन मुसळधारा वर्षणाऱ्या मेघाप्रमाणें कौरवांवर मारा केला. आबालवृद्ध त्यांवर चालून गेले. त्यांत जर्जर होऊन मृगाप्रमाणें दीन झालेल्या कौरवांनीं पांडवाकडे धाव घेतली. नंतर युधिष्ठिराला स्वस्थ बसण्यास सांगून व माद्रीकुमारांना *चक्ररक्षक करून गदाधारी भीमासह अर्जुन द्रुपद सैन्यावर चालून गेला, व सर्व दिशा दणाणून सोडीत काळासारखे भीमार्जुन त्या अफाट द्रुपद सैन्यांत शिरून त्यांनीं हत्ती, घोडे, रथ आणि पायदळ अशा चतुरंग सैन्याची दाणादाण उडविली. अर्जुनानें आपल्या बाहुवीर्यानें व भीमानें आपल्या गदेनें हत्तींचीं गंडस्थळें फोडिलीं. अर्जुनानें पांचालांना त्राहि त्राहि करून सोडिलें. तो धनुष्याला बाण जोडतो केव्हां व सोडतो केव्हां हें देखील कळून येत नव्हतें. ह्याप्रमाणें पांचाल सैन्य अगदीं जेरीस आलें असतां ' शाबास शाबास ' अशा उद्गारांसह जिकडून तिकडून सिंहनाद ऐकूं येऊं लागले. त्यावेळीं द्रुपदानेंही अर्जुनाला बाणांनीं झाकून टाकिलें. तेव्हां महासिंह गजपोताला गिळून टाकतो आहे कीं काय असा संशय पडून जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. याप्रमाणें तुंबळ युद्ध चाललें असतां पांचालाच्या रथाच्या चाकांचा कणा मोडला. ही संधि साधून अर्जुन त्याच्या रथांत शिरला व त्याला त्यानें जिवंत पकडून गुरूंकडे आणिलें. सर्व पांचाल सैन्याची दाणादाण झाली. ह्याप्रमाणें द्रुपदाला ता-

---

* रथाचीं चाकें संभाळणारे.

वडींत सांपडलेला पाहून गतगोष्टीची आठवण देऊन किंचित् हासून द्रोण म्हणाले, 'तूं प्राणाची भीति बाळगूं नकोस. आम्ही ब्राह्मण क्षमावान् आहोंत. पूर्वीं आश्रमांत आपण बरोबर खेळत होतों, तेव्हांपासून माझें तुजवर प्रेम आहे. त्याच स्नेहाचें पुनरुज्जीवन व्हावें एवढी माझी इच्छा आहे. राजाचा सामान्य मनुष्याशीं स्नेह राहत नाहीं म्हणून मला एवढी खटपट करावी लागली !' असें म्हणून बहुमानपूर्वक त्याचें अर्धें राज्य त्याकडे ठेवून अर्धें त्यांनीं आपल्याकडे घेतलें.

पांडवांचा उत्कर्ष.

कौरवपांडव विद्यासंपन्न होऊन एक वर्ष झालें नाहीं तोंच गुणवान् युधिष्ठिराला धृतराष्ट्रानें यौवराज्याचा अभिषेक केला. पुढें लौकरच आपल्या सद्गुणांनीं त्यानें आपल्या वडिलांचें नांव मागें पाडिलें. असियुद्ध, गदायुद्ध व रथांतून युद्ध करणें इत्यादि विद्यांत बलरामाकडून भीमाला आणखी शिक्षण मिळतच होतें. अर्जुन अनेक प्रकारच्या धनुर्विद्येंत व बाणांच्या सरळ, वाकड्या, दूर अशा अनेकविध प्रयोगांत निष्णात झाला. 'अर्जुनासारखा धनुर्धारी कोणी नाहीं,' असा डंका सर्व पृथ्वीभर गाजला. नीतिमान् सहदेव भावांच्या अगदीं अंकित होता. नकुलालाही चित्रयोधी व अतिरथी असें नांव मिळालें. गंधर्वांचा त्रास होत असूनही ज्यानें त्रैवार्षिक यज्ञ केला होता, त्या अति बलाढ्य सौवीराला, व जो पंडूला देखील अजिंक्य झाला होता व ज्यापुढें कौरव थरथर कांपत होते, त्या यवनाधिपतीला अर्जुनानें भावांच्या साहाय्यानें मुठींत आणिलें. त्यानें सर्व पाश्चात्य व दाक्षिणात्य राजांना जिंकिलें. ह्याप्रमाणें पंचपांडवांनीं परराष्ट्रें काबीज करून स्वराष्ट्राला भर घातली. पुढें ह्या विख्यात धनुर्धारी पां-

डवांच्या सामर्थ्याचा डंका त्रिभुवनांत गाजलेला पाहून धृतराष्ट्राचें मन त्यांच्याविषयीं दूषित झालें. चिंतेनें त्याला झोप देखील येईना. तो ह्याप्रमाणें चिंतेमध्यें मग्न असतां एके वेळीं राजनीतिकुशल मांत्रिश्रेष्ठ जो कणिक त्याला बोलावून तो म्हणाला, 'पांडव दिवसानुदिवस आपल्या तेजानें पृथ्वी व्यापून टाकीत आहेत,' हें मला कांहीं बरें वाटत नाहीं; तर अशा स्थितींत त्यांबरोबर प्रेमभाव ठेवणें नीतीचें होणार कां द्वेषभाव ठेवणें नीतीचें होणार आहे, हें आपण मला सांगा; म्हणजे तसा मी पुढें वागेन. ' हें ऐकून राजनीतींतील मृदु व तीक्ष्ण दोन्ही नीतितत्त्वें त्यानें त्याला सांगून पांडवांसंबंधानें त्यानें त्याचें मन कलुषित करून टाकिलें.

पांडवांचा लाक्षागृहीं वास.

भीम व अर्जुन यांचे गुणानुवाद पौरजन गाऊं लागले, व वडील धर्मराजाच्या राज्यावरील हक्कासंबंधानें तर भरसभेंत व चव्हाट्यावर चर्चा होऊं लागली. हा मोठा नेकीचा व दयावान् असल्यानें याला राज्यभिषेक व्हावा अशी सर्वांची इच्छा दिसूं लागली. पौरांचें हें प्रेमदर्शक भाषण दुर्योधनाच्या कांनीं पडलें, तेव्हां संतप्त होऊन बापाला एकांतांत गांठून तो ह्मणाला, ' बाबा, प्रजेची भलती सलती बडबड माझ्या कानावर येऊं लागली आहे. तुह्माला राज्यावरून काढून टाकून भीष्मांना आपले नायक करण्याची त्यांची फार इच्छा आहे. भीष्म तर त्यासंबंधानें निरपेक्ष आहेत. पौरजन आम्हाला पाण्यांत पहातात. पूर्वीं पंडूनें वडिलोपार्जित गादीला आपल्या गुणांनीं बळकटी आणिली. आपण अंध असल्यामुळें त्यावेळीं आपला हक्क असून ती आपल्याला मिळाली नाहीं. आतां ही जर परंपरानुक्रमानें युधिष्ठिराला मिळेल तर पुढेंही त्यापासून ती त्याच्या मुलाकडे खास जाणार

व त्याचेच वंशज पुढें हिचा उपभोग घेणार. आमचाही प्रत्यक्ष राजवंशांत जन्म झाला असून पुत्रपौत्रांसह आह्मी मागें पडून नेहमीं परान्नजीवी होणार. तर आह्मांवर हा कष्टद प्रसंग येणार नाहीं, अशी कांहीं तरी तजवीज करा.' हें मुलाचें भाषण ऐकून धृतराष्ट्र मोठ्या विचारांत पडला. काय करावें हें त्याला सुचेना. पुढें दुर्योधन, कर्ण, शकुनि व दुःशासन ह्यांनीं आपसांत मसलत करून पांडवांना कांहीं सामोपायांनीं वारणावताला रहाण्याला पाठवावें असें ठरवून दुर्योधनाकडून धृतराष्ट्राला त्यांनीं तसें कळविलें. नंतर दुर्योधनानें आपल्या लोकांकडून शंकराप्रीत्यर्थ वारणावत येथें मोठी जत्रा भरणार आहे, अशी कंडी पिकविली. धृतराष्ट्रानें पांडवांना उत्सव पाहण्यास जाण्यास सांगितलें, व युधिष्ठिरही त्याला कबूल झाला. इकडे दुर्योधनानें आपल्या पुरोचन नांवाच्या विश्वासू नोकराला पांडवांच्या आधीं वारणावताला पाठवून त्याकडून त्यांना रहाण्यासाठीं लाक्षागृह तयार करवून ठेविलें. कुरुवृद्धांचे पाय धरून त्यांना नमस्कार करून पांडव निघाले. विदुर, इतर कुरुश्रेष्ठ व पौरजन अश्रु ढाळीत त्यांना पोहोंचविण्याला गेले. परततेवेळीं विदुरांनीं भावी संकटाची थोडी इशारत युधिष्ठिराला देऊन ठेविली होती. पुढें युधिष्ठिरानें त्याची आज्ञा घेतली. ते वारणावताला येऊन पोहोंचले त्यावेळीं सर्व पौरजन त्यांला सामोरे आले. आंत शिरल्यावर ग्रामाधिकाऱ्यांची व गांवांतील ठळक ठळक लोकांची भेट घेऊन पुरोचनासहवर्तमान त्यांच्यासाठीं तयार केलेल्या वाड्यांत ते रहाण्यास गेले. त्या ठिकाणीं पुरोचनानें त्यांची खाण्यापिण्याची सर्व उत्तम प्रकारें तरतूद ठेविली. चरबी, लाख वगैरे पदार्थांच्या उग्र वासावरून तें घर ज्वालाग्राही असावें असा तर्क करून विदुरांच्या सूचनेप्रमाणें त्यांतून बाहेर पडण्याला गुप्तरीतीनें विवरमार्ग तयार करण्याच्या

ते नादीं लागले; मृगयेच्या मिषानें हिंडून रानांतल्या सर्व वाटा त्यांनीं माहित करून घेतल्या. रात्रीं ते सर्व हत्यारबंद त्या ठिकाणीं रहात, व दिवसां मृगयेसाठीं ह्मणून रानांतून हिंडत. विश्वास नसतां पूर्ण विश्वास दाखवून वरून आनंदित असल्यासारखें दाखवीत. त्यांना तेथें पूर्ण एक वर्ष लोटल्यावर त्यांच्या मनांत कांहीं संशय नाहींसा पाहून पुरोचन खुलला. एके दिवशीं मध्यरात्रीच्या वेळीं भयंकर वारा सुटला असून दिशा सुंद झाल्या होत्या. लोक जिकडे तिकडे गाढ झोपीं गेले होते. अशा वेळीं पुरोचन निजला होता त्या ठिकाणीं घर पेटवून देऊन चोहोंकडून तें पेटल्यावर भीम आपल्या सर्व मंडळीला घेऊन भुयारांत शिरला. तें घर पेटलेलें पाहून गांवकऱ्यांना फार दुःख झालें; कारण त्यांत पांडव जळले असें वाटून तें दुर्योधनाचेंच कृत्य असावें असा संशय येऊन ते त्याला शिव्या देऊं लागले. इकडे पांडव त्या विवरमार्गांतून सुरक्षितपणें बाहेर पडून एका जंगलांत गेले.

हिडिंबेशीं भीमाचें लग्न.

पांडव भयाण अरण्यांतून चालले असतां कुंतीचा प्राण तहानेनें व्याकुळ झाला. तें पाहून भीमाच्या पोटांत भडभडून आलें; तेव्हां बाकीच्यांना एका दाट छायेच्या झाडाखालीं बसवून तो पाण्याचा शोध करीत चालला, व जवळच पाणी सांपडल्यावर धोतराच्या पिळ्यांत पाणी घेऊन तो परतला. भाऊ व आई यांना अनाथासारखीं जमिनीवर पडलेलीं पाहून कष्टी होऊन त्यानें दीर्घोच्छ्वास टाकिला. ज्यांना आपल्या घरीं मऊ बिछान्यावर देखील झोप येत नसे त्यांना आज जमिनीवर पडलेलें पाहून त्याला फार वाईट वाटलें. ते उठण्याची तो वाट पहात बसला. तेथें जवळच

एक क्रूर, नरमांसभक्षक, अक्राळविक्राळ राक्षस रहात होता. तो भुकेनें पीडला असल्यामुळें त्याची दृष्टि सहजच ह्यांवर गेली. तेव्हां एकदम वर हात करून डोकें खाजवीत खाजवीत जांभई देत त्यानें त्यांना नीट टेहळिलें, व आतां नरमांस खचित मिळणार ह्या आशेनें हर्षभरित होऊन जिभळी चाटीत 'ते कोण निजले आहेत त्यांचा शोध करून ये,' म्हणून त्यानें आपल्या बहिणीला त्यांकडे पाठविलें. भावाच्या आज्ञेनें ती त्या ठिकाणीं गेली. तेथें भीमाला पाहून त्यावर तिचें मन गेलें. वाटेल तें रूप घेण्याचें सामर्थ्य असल्यानें उत्तम स्त्रीरूप धरून लाजत लाजत ती त्याच्याजवळ गेली, व हासत हासत 'आपण कोण? कोठून आलांत? हे येथें कोण निजले आहेत? ही स्त्री कोण आहे?' वगैरे त्याला विचारून तिनें त्याला आपल्याशीं लग्न लावून घेण्यास विनविलें. इतक्यांत तिला जाऊन फार वेळ झाला म्हणून हिडिंब झाडावरून खालीं उतरून पांडवांकडे आला. तो विक्राळ राक्षस आलासें पाहून हिडिंबा घाबरून गेली. आपल्या बहिणीच्या त्या रूपावरून मानव प्राण्यावर तिचें मन गेलें असावें असें वाटून तो अगदीं खवळून गेला. डोळे वटारून तिला 'राक्षसकुलकलंके,' ह्मणून तिची त्यानें पुष्कळ निर्भर्त्सना केली व डोळे लाल करून दांत खात त्या दोघांनाही ठार करण्याच्या उद्देशानें तो त्यांकडे धावला. त्याला आपल्या बहिणीवर याप्रमाणें संतापलेला पाहून भीम त्याला हासून म्हणाला, 'हें दुष्टा, हे माझे भाऊ व आई सुखानें झोप घेत आहेत, त्यांना जागें करशील तर खबरदार. तुला काय करणें असेल तें मला कर. मी तुझ्याशीं तोंड देण्याला तयार आहें. स्त्रियांना मारणें शास्त्रविरुद्ध आहे. ही तुझ्याच आज्ञेनें ह्या ठिकाणीं आली, व पुढें मला पाहून मोहित झाली, ह्यांत तिचा काय दोष? तुला वाटेल तर माझ्याशीं दोन

हात कर. आजपर्यंत नरवधानें तूं हें वन दूषित करून टाकिलें आहेस; पण आज मी ह्यांतील राक्षसरूपी कांटा उपटून टाकून लोकांना येथें निर्धास्त फिरण्याला मोकळीक करून देतों. ' असें म्हणून त्यानें त्याला तेथून दूर फरफटत ओढून नेलें. त्या राक्षसानें भीमाला मगरमिठी मारून मोठी किंकाळी फोडिली. त्या दोघांची निकराची झटापट लागली. त्यांच्या त्या गरजण्यांनीं कुंति व पांडव जागे झाले. भीमानें त्याला जोरानें जमिनीवर आपटून एखाद्या पशूप्रमाणें त्याचा जीव घेतला. हिडिंबा मायावी राक्षसी असून आपल्या भावाला मारल्याबद्दल ती आपल्यावर सूड उगवील या भीतीनें भीम तिला मारण्याला निघाला असतां युधिष्ठिर त्याला म्हणाला, ' रागाच्या झपाट्यांत स्त्रीला मारूं नकोस. आम्हाला मारण्याला म्हणून आलेल्या ह्या बलाढ्य राक्षसाला देखील तूं पुरून उरलास; तेव्हां त्याच्या बहिणीच्या हातून तुझें काय होणार ? ' असें ह्मणून हिडिंबेच्या विनवणीवरून त्यानें भीमाला तिच्याशीं लग्न करून घेण्यास सांगितलें व भीमानें ती वडील भावाची आज्ञा मान्य करून तिच्याशीं लग्न करून घेतलें.

बकासुराचा वध.

हिडिंबाला मारून पांडव तापस वेषानें मत्स्य, त्रिगर्त, पांचाल, कीचक वगैरे रमणीय प्रदेश ओलांडून एकचक्रानगरीस येऊन पोहोंचल्यावर त्या ठिकाणीं ते एका ब्राह्मणाच्या घरीं भिक्षेवर उपजीविका करीत राहिले. तेथें लवकरच आपल्या गुणांनीं त्यांनीं लोकप्रियता संपादिली. नित्य रात्रीं भिक्षान्न कुंतीच्या स्वाधीन करून तिनें वाटून दिलेले निरानिराळे भाग ते खात असत. ती व चार पांडव मिळून निम्में अन्न खात व एकटा भीम निम्में खाई. कोणे एके वेळीं त्या ब्राह्मणाच्या घरीं एकाएकीं रडण्या-

चा मोठा शब्द कानीं पडला. कुंतीचा स्वभाव जात्या उदार व कनवाळू असल्यामुळें तिला तो ऐकवेना, म्हणून मोठ्या काकुळतीनें ती भीमाला म्हणाली, ' बाळा, ह्या ब्राह्मणाच्या घरीं मोठ्या सुखानें आपण रहात आहों. तो आमचा मोठा सत्कार करीत असतो. त्याच्या ह्या उपकाराची फेड आपल्या हातून कशानें होईल हा विचार नेहमीं माझ्या मनांत घोळत आहे. ज्यावर केलेला उपकार निष्फळ होत नाहीं त्यालाच मनुष्य म्हणावें. लोकांनीं केलेल्या उपकाराची सविशेष फेड करण्यांतच मोठेपणा आहे; तर ह्या ब्राह्मणावर काय प्रसंग गुदरला आहे त्याचा शोध करून त्यांत जर त्याच्या उपयोगीं आपल्याला पडतां आलें तर मोठें काम होणार आहे.' पुढें 'कोणतेंही दुष्कर कार्य करून त्यांचे उपकार फेडण्यास मी सिद्ध आहें, ' असें भीमानें आश्वासन दिल्यावर कुंति त्या ब्राह्मणाकडे गेली. तेव्हां तें कुटुंब तोंड खालीं घालून शोक करीत असतां त्या ब्राह्मणानें आपल्या स्त्रीजवळ काढिलेले उद्गार तिनें ऐकिले. ' निरर्थक व परावलंबी ह्या जीविताला धिक्कार असो. आतां जिवंत रहाणें मोठ्या दुःखाला कारण आहे. आपल्यावर गुदरलेल्या ह्या संकटांतून पार पडण्याला मला कांहीं मार्ग दिसत नाहीं. तुझ्या त्या अनावर गृहप्रेमामुळें हा गांव सोडण्याचा मीं पूर्वीं केलेला प्रयत्न फुकट गेला. स्वतः जिवंत राहून निष्ठुरपणें माझ्या कुटुंबांतील कोणाही मनुष्याला मृत्यूच्या तोंडीं देणें माझ्या हातून होणार नाहीं. तूं माझी धर्मचारिणी असून आईप्रमाणें तूं मला जपत आहेस. दैवानें तुझ्यासारख्या उत्तम मित्राची गांठ घालून दिली असून मला उत्तम गति मिळण्याला तूंच कारण आहेस. तुझ्या आईबापांनीं माझ्या गृहस्थाश्रमाची तुला वांटेकरीण केली आहे. तुझ्या सारख्या अशा साध्वीला तुझा कांहीं अपराध नसतां मी कसें बरें सोडूं ? स्वतः-

पासून झालेल्या ह्या अर्भकाला तरी माझ्यानें कसें टाकवेल ? ही मुलगी अद्यापि पोर असून ती मजपाशीं दुसऱ्याची ठेव म्हणून आहे. जिच्यावर उत्तम लोक, वंशवृद्धि व भावी सुख हीं अवलंबून आहेत, अशा ह्या बिचाऱ्या पोरीला स्वतः जन्म देऊन निर्दयपणें सोडून देणें माझ्या हातून कसें व्हावें ? बरें, आत्मत्याग तरी मला तापालाच कारण होणार. कारण माझ्या मागें माझें कुटुंब खचित जिवंत रहाणार नाहीं; पण स्वतः होऊन यांना सोडणें निष्ठुरतेचें असून शहाण्यांना ही गोष्ट खपत नाहीं. माझ्यामागें माझीं माणसें मेलीं तर त्याबद्दल मी कांहीं मोठासा जबाबदार नाहीं. कोणत्याही दुसऱ्या उपायानें ह्या संकटांतून पार पडण्याला मला मार्ग दिसत नाहीं. अरेरे ! ह्या कुटुंबाची काय दशा होणार ? सर्वांना एकदम मरण आलें तर तें एका अंशीं बरें ! ’ हें त्याचें शोकाकुल भाषण ऐकून त्याची बायको म्हणाली, ‘ सामान्य जनांप्रमाणें असा संताप करून घेणें आपल्यासारख्यांना शोभत नाहीं. मरण सर्वांना लागलेंच आहे. तर ह्या अवश्य घडून येणाऱ्या गोष्टीसंबंधानें संताप कशाला ? बायकापोरें हीं सर्व आत्मसुखासाठीं आहेत. प्राण खर्चीं घालून देखील पतीचें प्रिय करावें हा स्त्रियांचा परंपरागत धर्म आहे; व ह्या प्रसंगीं मी जें करणार तें आपल्या हिताचें असून मला सुखकर व इहपरलोकीं यशस्कर होणार आहे. लग्न ज्यासाठीं करावयाचें तो हेतु मूल झाल्यानें सफल होऊन आपण मला ऋणांतून मुक्त केलें आहे. मुलांच्या पालनपोषणाला आपण समर्थ आहां; पण माझ्या हातून तसें होणें शक्य नाहीं. आपल्याशीं संबंध करण्याला अयोग्य अशा गर्विष्ठ लोकांनीं, ह्या मुलीबद्दल मागणी केली असतां त्या नरपशूपासून हिचें रक्षण माझे हातून कसें व्हावें ? आपल्यावांचून, जलावांचून तडफडणाऱ्या माशाप्रमाणें आम्ही तड-

फडून मरूं. पतीच्या पूर्वी मरणें हें स्त्रीचें मोठें भाग्य आहे. अनेक प्रकारच्या नियमांपेक्षां पतिहित स्त्रियांना विशेष श्रेयस्कर आहे. लाडकीं मुलें, पैसा, जिव्हाळ्याचे लोक व आवडती बायको हीं सर्व संकटसमयासाठीं लागतात. हीं सर्व स्वतः-च्या पासंगाला देखील लागणार नाहींत. शिवाय शास्त्रांत स्त्रिया अवध्य मानल्या आहेत, व राक्षसांना देखील धर्म कळतो. कदाचित् तो मला मारणार नाहीं. तुमचें मरण खात्रीचें असून माझ्यासंबंधानें संशय आहे. तेव्हां हें लक्ष्यांत घेऊन आपण मला त्या राक्षसाकडे पाठवा.' यावर मुलगी म्हणाली, ' बाबा, असे तुम्ही कष्टी होऊं नका. मुलगी ही दुसऱ्याचीच असल्यानें मला एकटीला देऊन टाकून तुह्मी सुखी व्हा. हें मला तारील अशी आशा धरूनच लोक मूल मागतात. आतां आईबापांना येथें तरी तारावें किंवा परलोकीं तरी तारावें. त्यांतून जिवंतपणीं तारण्याचा सुयोग आल्यावर त्यांहून विशेष आणखी काय पाहिजे ? ' याप्रमाणें सर्व कुटुंब दुःखसागरांत बुडालें असतां तेथें खेळत असलेलें त्या ब्राह्मणाचें मूल हातांत काडी घेऊन त्यांच्याकडे आलें व ' ह्या कालीनें मी त्या लाछसाला मालून ताक्तों, तुमी काल्जी कशाला कलता ? ' असें म्हणालें. हे त्याचे बोबडे बोल ऐकून एवढ्या दुःखामध्यें देखील त्यांना मोठें कौतुक वाटलें. कुंति हा सर्व प्रकार ऐकत होती. पुढें जाण्याला हीच वेळ योग्य आहे असें वाटून ती त्याकडे धावत गेली, व त्यांना धीर देऊन म्हणाली, ' ह्या तुमच्या दुःखांचें कारण मला कळेल व माझ्या हातून त्याचें निवारण होण्यासारखें असेल तर मी तुम्हाला मदत करीन. ' ब्राह्मण म्हणाला, ' तपोधने, हें तुझें भाषण सज्जनांना शोभणारें आहे; पण आमचें दुःख मनुष्याच्या हातून निवारण होण्याजोगें नाहीं. ह्या जवळच्या पर्वतावर ह्या

प्रांताचा रक्षणकर्ता बक नांवाचा एक बलाढ्य राक्षस रहातो. त्याच्यामुळें परचक्रापासून किंवा दुसऱ्या प्राण्यापासून आम्ही निर्धास्त आहों. पण प्रत्येक दिवशीं त्याला एक मोठें भाताचें तपेलें, दोन रेडे व तें अन्न घेऊन जाणारा मनुष्य, असें खाद्य वेतन म्हणून द्यावें लागतें. ह्या नगरांतील प्रत्येक घरांतून दररोज हें त्याचें खाद्य आळीपाळीनें जात असतें. ही घातुक पाळी लोकांवर पुष्कळ वर्षांनीं एकदां येते. ती टाळण्याचा कोणीं यत्न केला असतां राक्षस त्याच्या सर्व कुटुंबाचा फडशा उडवितो. ही कुलविनाशक पाळी आज आमच्यावर आली असून द्रव्यानें कोणी मनुष्य विकत घेऊन त्याच्याकडे पाठवावें तर तसें करण्यास आमच्यापाशीं द्रव्य नाहीं. ज्याच्या योगानें हा प्रदेश ह्या संकटांतून मुक्त होईल असा एखादा उपाय करण्याविषयीं आमचा मंदबुद्धि राजा कांहीं देखील यत्न करीत नाहीं, व आह्मालाही हीच शिक्षा योग्य आहे; कारण आह्मीं तरी ह्या दुर्बुद्ध व नेभळ्या राजाचा आश्रय करून येथें कां रहावें ?' कुंति ह्मणाली, 'एवढेंचना, माझ्या पांच मुलांपैकीं एक तुमच्यासाठीं राक्षसाकडे अन्न घेऊन जाईल. तुम्ही काळजी करूं नका.' हें कुंतीचें धीर देणारें भाषण ऐकून ब्राह्मण म्हणाला, 'आपल्यासाठीं ब्राह्मणाचा—विशेषतः अतिथीचा-बळी देण्याला मी तयार होणार नाहीं. हीनकुल पाखंड्याच्या हातून देखील अशी गोष्ट घडणार नाहा. ब्राह्मणासाठीं आपला किंवा प्रसंगीं मुलांचा देखील त्याग करणें उचित आहे. प्राणरक्षणाहून खरें कल्याण कशांत आहे हें मला प्रथम पाहिलें पाहिजे. आत्महत्याच मला बरी वाटते.' तेव्हां कुंतीनें आपल्या मुलाचें सामर्थ्य व अतिबलाढ्य राक्षसाला देखील मारण्याची त्याची शक्ति त्या ब्राह्मणाला सांगितली; तें ऐकून मोठ्या आनंदानें तो तिच्या म्हणण्याला कबूल झाला. 'ही गोष्ट

बाहेर फोडूं नका,' म्हणून मात्र कुंतीनें त्या ब्राह्मणाला सांगितलें. नंतर भीमाकडे येऊन ती सर्व हकीकत तिनें त्याला सांगितली; तेव्हां तो तिच्या आज्ञेनें त्या राक्षसाला मारण्याला तयार झाला. हें ऐकून 'तूं हें काय आरंभिलें आहेस,' म्हणून युधिष्ठिरानें तिला विचारिलें असतां कुंति म्हणाली, 'ह्या ब्राह्मणाच्या घरीं मोठ्या आदरांत आपण सुखानें दिवस काढिले, त्या उपकाराची फेड करण्यासाठीं मी हें करूं इच्छितें. भीमाचा पराक्रम लक्ष्यांत घेऊन मीं हें ब्राह्मणाचें काम हातीं घेतलें आहे. प्रत्युपकार व धर्म ह्या दोन्ही गोष्टी ह्यापासून साधणार आहेत.' पुढें बरीच रात्र झाल्यावर तें अन्न त्या राक्षसाच्या रहाण्याच्या ठिकाणीं घेऊन जाऊन भीमानें त्याला लांबून हाक मारली. ती ऐकून तो राक्षस भीमाजवळ येऊन पहातो तों तोच तें अन्न खातो आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. नंतर भिवया चढवून दांत चावीत डोळे वटारून आणि मोठी गर्जना करून त्याला मारण्याच्या उद्देशानें तो राक्षस त्याच्या अंगावर धावला, व त्याच्यामागें उभा राहून हातांनीं त्यानें त्याला यथेच्छ मुष्टिमोदक दिले; पण भीमानें बेगुमानपणें त्या राक्षसाकडे पहात पहात तें अन्न सावकाश खाल्लें. नंतर हात धुवून हासत हासत त्याच्या मनगटाला धरून त्यानें त्याला आपल्याकडे खेचलें. परस्परांचें द्वंद्वयुद्ध जुंपून त्यांत राक्षस अगदीं जेरीला आला. तो दमला आहेसें पाहून त्याला जमिनीवर मांड्यांखालीं दाबून डाव्या हातानें त्यानें त्याला उभा चिरला. त्याच्या ओरडण्यानें घाबरून त्या ठिकाणीं आलेल्या त्याच्या आप्तांकडून व सेवक लोकांकडून यापुढें आम्ही मनुष्य खाणार नाहीं म्हणून वचन घेऊन व त्या प्रेताला वेशीपाशीं टाकून कोणाच्या दृष्टीस न पडतां, तो बिऱ्हाडीं परत आला व झालेला सर्व वृत्तांत त्यानें युधिष्ठिराला कळविला.

अंगारपर्णाचा पराभव.

पांडव एकचक्रा नगरींत बरेच दिवस राहिल्यावर ते त्या ब्राह्मणाचा निरोप घेऊन पांचालाला निघाले. वाटेंत गंगातीरीं संध्याकाळीं ते सोमाश्रयण तीर्थाला येऊन पोहोंचले. तेथें आल्हाद्दायक गंगेच्या पाण्यांत गंधर्वराज अंगारपर्ण स्त्रियांसह जलक्रीडा करीत होता. पांडवांनीं नदीकडे येऊन आपल्या क्रीडेला विघ्न करावें हें त्याला बरें वाटलें नाहीं; ह्मणून तो रागानें त्यांच्याशीं युद्धाला उठला. तेव्हां अर्जुन ह्मणाला, 'मूर्खा, सागरतीर, हिमालयाचा पायथा, व नदीचें तीर ह्यांवर कोणाचीच विशेष मालकी नसून सर्वांना ह्या ठिकाणीं फिरण्याचा हक्क सारखा आहे. आह्माला प्रतिबंध करणारा तूं कोण? तूं इकडे तिकडे करशील तर तुझ्याशीं दोन हात करण्याला हा मी तयार आहें. ज्यांच्या मनगटांत जोर नसेल ते तुमच्या धमकावणीला भितील.' यावर त्या दोघांचें घोर युद्ध जुंपून अर्जुनानें त्या गंधर्वाच्या शेंडीला धरून त्याला फरफरां ओढिलें. नवऱ्याचे प्राण वांचविण्यासाठीं रदबदली करण्याला त्या गंधर्वाची बायको युधिष्ठिराला शरण गेली. 'युद्धांत पाडाव झालेल्याला मारणें योग्य नाहीं,' असें सांगून युधिष्ठिरानें अर्जुनाच्या तडाक्यांतून त्या गंधर्वाला सोडविलें. अर्जुनावर संतुष्ट होऊन जीवदान दिल्याबद्दल अर्जुनाला चक्षुर्विद्या देऊन त्या गंधर्वानें शंभर अस्सल घोडे पांडवांना दिले. जातांना मंत्रविशारद धौम्यांना आपले पुरोहित करण्यास सांगून तो निघून गेला. उघडच आहे कीं, थोरांचा समागम कधीं फुकट जात नाहीं.

द्रौपदी व धृष्टद्युम्न यांचा जन्म.

द्रोणांनीं आपला पराभव केला ही गोष्ट द्रुपदाच्या मनाला

लागून राहिल्यानें सूड घेण्याच्या इच्छेनें त्यांना मारण्याला समर्थ असा मुलगा व्हावा म्हणून कर्मसिद्ध ब्राह्मणाचा तपास करीत अनेक महान् महान् ब्रह्मवृंदांनीं पूर्ण अशीं स्थळें पहात पहात तो गंगातीरीं कल्माषपाशीं आला. तेथें ब्रह्मचिंतनामध्यें गढलेले याज आणि उपयाज या नांवाचे दोन ब्रह्मर्षि त्या राजाला भेटले. त्यांचें सामर्थ्य कळल्यावर त्यांपैकीं याजाकडे जाऊन तो त्यांना म्हणाला, ' भो ब्रह्मन, द्रोणासंबंधाच्या वैराग्नीनें मी होरपळलों आहें. मला शांत करणें आपल्याकडे आहे. ब्रह्मास्त्रांत त्यांच्या तोडीचा कोणी नाहीं. पूर्वस्नेह मी विसरल्यामुळें त्यांनीं माझी खोड मोडली. ब्रह्मक्षत्रिय तेज त्याच्या ठिकाणीं जुळलें असल्यानें माझ्या तेजाचें त्यांच्यापुढें कांहीं चाललें नाहीं. यासाठीं मीं ब्रह्मतेजाकडे धाव घेतली आहे. ज्याच्या योगानें द्रोणांचा अंत करणारा मुलगा मला होईल असें कर्म आपण करा. आपणाला मी दहा कोटी गाई देतों. ' बरें, म्हणून याजांनीं मुलासाठीं वैतानकर्म सुरू केलें. वीर्य, तेज व बल ह्यांनीं संपन्न असा पुत्र होणें हें त्याचें फल होतें. द्रुपदानें कर्मसिद्धीला लागणारी सर्व सामुग्री सिद्ध केली. नंतर याजांनीं अग्नींत आहुति दिली असतां त्यापासून एक जोडपें बाहेर आलें. त्यांपैकीं मुलगा होता तो त्या अग्नीच्या ज्वालेसारखा दैदीप्यमान् व किरीटकवचधारी असून त्याच्या हातांत तलवार व धनुष्यबाण हीं आयुधें होतीं, व मुलगी होती ती श्यामवर्ण असून लावण्यवती होती. मनुष्यरूपानें अप्सराच ह्या भूतलावर अवतरली आहे कीं काय, असें तिला पहाणारांना वाटत होतें. ती जन्मल्याबरोबर ही कृष्णा क्षत्रियांचा अंत करण्यासाठीं अवतरली आहे, अशी आकाशवाणी झाली. मुलाचें धृष्टद्युम्न व मुलीचें कृष्णा अशीं नांवें ठेवण्यांत आलीं. हा धृष्टद्युम्न द्रोणांकडे अस्त्रविद्या शिकण्यासाठीं गेला असतां त्यांनीं

भवितव्यता टाळतां येणें अशक्य आहे असा मनांत विचार क-रून आपला लौकिक संभाळण्यासाठीं त्याला आपल्या घरीं ठेवून घेऊन सर्व अस्त्रविद्या शिकविली.

द्रौपदीचें स्वयंवर.

पुढें पांडव अनेक रम्य प्रदेश पहात पांचाळ नगरीला येऊन पोहोंचले. तें नगर व स्वयंवराकरितां तेथें उभारलेला भव्य मंडप पाहून त्यांना मोठा आनंद झाला. ते तेथें एका कुंभाराच्या सो-प्यांत बिऱ्हाड करून ब्राह्मण ह्मणून सांगून भिक्षा मागून उदर-निर्वाह करीत राहिले. ह्या वेषांत त्यांना कोणीं ओळखिलें नाहीं. द्रुपदाच्या मनांतून द्रौपदी अर्जुनाला देण्याचें फार असल्यामुळें कोणाला वाकवितां न येणारें एक धनुष्य त्यानें सज्ज करून ठे-विलें, व एक फिरतें यंत्र करून त्याला एक निशाण चिकटवून तें वर गरगर फिरत राहील अशी व्यवस्था केली; व त्या यंत्रा-मधील निशाण पांच बाणांत जो खालीं पाडील त्याला द्रौपदी द्यावयाची असा आपला संकल्प त्यानें सर्व राजांना कळविला. दुर्योधनप्रभृति कौरव व दुसरे राजे तसेच ऋषी व ब्राह्मण तो स्वयंवरसमारंभ पाहण्यासाठीं नानादेशांहून आले होते. द्रुपदाचा सत्कार घेऊन राजांनीं स्वयंवर मंडपांत आपापल्या जागा घेतल्या. मंडपाच्या चोहोंबाजूंनीं मंदिरें उठवून दिलीं होतीं आणि तट व खंदक तयार केले होते. मुख्य द्वारांना तोरणें बांधलीं होतीं. चित्रविचित्र छत लाविलें होतें. वाजंत्र्याचे ताफे त्या ठिकाणीं उभे केले होते. उत्तम अगरूनें तो मंडप सुवासिक केला होता, चंदन शिंपडलेल्या सुवासिक माळा जिकडे तिकडे टांगल्या होत्या, त्यामुळें त्या मंडपाला अवर्णनीय शोभा आली होती. त्या ठिकाणीं मोठा अलौकिक प्रेक्षकसमुदाय जमला होता. तो समाज पूर्ण भर-

ल्यावर न्हाऊन व उत्तम वस्त्रालंकार घालून द्रौपदी सुवर्णमाला हातांत घेऊन धृष्टद्युम्नाबरोबर सभेंत आली. सोमकांच्या पुरोहितानें अग्नीमध्यें विधिपूर्वक तुपाची आहुती देऊन त्याला तृप्त करून ब्राह्मणांकडून स्वस्तिवाचन ह्मणविल्यावर वाजंत्री बंद होऊन सभेंत जिकडे तिकडे शांतता झाली. नंतर धृष्टद्युम्न मेघगर्जनेप्रमाणें ओरडून ह्मणाला, ' हें येथें धनुष्य आहे व हे पांच बाण ठेविले आहेत. हें धनुष्य व हे बाण घेऊन ह्या यंत्राच्या भोकांतून जो हें निशाण पाडील त्याला माझी बहीण माळ घालील. ' असें सांगून तेथें जमलेल्या प्रत्येक राजाचें नांव, गोत्र व बल यांची माहिती त्यानें आपल्या बहिणीला करून दिली. द्रौपदीला पहातांच ते एकमेकांकडे ईर्षेनें पाहूं लागले. द्रौपदीवर मन गेलें असल्यामुळें मित्र होते ते देखील परस्परांचे शत्रु बनले. पांडवांना पाहून कृष्णानें बळरामाला हळूच इषारत दिली. किरीट, कुंडलें, हार, बाहुभूषणें इत्यादि अलंकारांनीं विभूषित असे राजे, राजपुत्र व पौत्र ह्यांनीं एकामागून एक तें धनुष्य सज्ज करण्यासाठीं वाटेल तेवढी खटपट केली; पण ती सर्व व्यर्थ गेली. प्रयत्न करीत असतां तें जड धनुष्य पुष्कळांच्या अंगावर येऊन त्यांना जमिनीवर लोटांगण घालण्याची पाळी आली. त्यांचीं किरीटकुंडलें, हार इत्यादि भूषणें भूमीवर तुटून पडून ते धापा टाकीत खालीं निचेष्ट पडले. अशा प्रकारें फजीति झाल्यामुळें द्रौपदी मिळविण्याविषयीं निराश होऊन तें राजमंडळ दीर्घोच्छ्वास टाकूं लागलें असतां धनुर्धरांमध्यें श्रेष्ठ जो कर्ण त्यानें धनुष्य उचलून सज्ज करून त्याला बाण लाविला. त्याला पाहून व त्याचें नांवकुलादि ऐकून ' मी सारथ्याला वरणार नाहीं, ' असें द्रौपदी ह्मणाली. तें तिचें भाषण ऐकून कर्णाला फार संताप आला; पण तो मनांतल्या मनांत दाबून सूर्याकडे दृष्टि देऊन त्यानें धनुष्य खालीं ठे-

विलें. त्यानंतर धनुष्य उचलण्याची गोष्ट दुसऱ्या कोणाही राजाच्या मनांत येईना. इतक्यांत धनुष्य सज्ज करून त्याला बाण लावण्याच्या उद्देशानें अर्जुन ब्रह्मसमुदायांतून उठला. त्याला पाहून ब्राह्मणांनीं आपापलीं चर्मासनें फडकावून आनंद प्रदर्शित केला; कांहींनीं उदास वृत्ति धारण केली व कित्येक 'शाबास, शाबास' असे उत्तेजनपर शब्द उच्चारूं लागले. 'जें धनुष्य कर्ण, शल्य प्रभृति जगमान्य क्षत्रियवीरांनासुद्धां वाकवितां आलें नाहीं तें ज्याला अस्त्रविद्येचा गंधही नाहीं अशा ब्राह्मणकुमाराच्या हातून कसें वाकविलें जाणार, अविचारानें हें काम हातीं घेतल्यावर त्यांत यश न येईल तर व्यर्थ सर्व ब्रह्मवृंद क्षत्रियांच्या थट्टेला पात्र होणार आहे, अहंपणामुळें म्हणा किंवा द्रौपदीसाठीं हपापल्यामुळें म्हणा, या साहसाला हा जो प्रवृत्त झाला आहे, त्याला आपल्या जागीं बसविणें आपलें काम आहे, व्यर्थ फजिती पावण्याची व विनाकारण राजे लोकांच्या द्वेषाला पात्र होण्याची आमची इच्छा नाहीं,' असें कित्येक शहाणे म्हणूं लागले. कित्येक म्हणाले, 'हा श्रीमान् कुमार नागराजासारखा दिसतो आहे, ह्याचे खांदे व बाहू पहा कसे पुष्ट आहेत, याचें चालणें पहा कसें सिंहासारखें ऐटबाज आहे! ह्याच्या उत्साहवृत्तीवरून ह्याच्या हातून हें काम खास शेवटास जाईल असें आम्हास वाटतें. ब्राह्मण पाण्यावर राहोत, वायु भक्षण करून राहोत किंवा फलाहार करून राहोत, ते शरीरानें किरकोळ असले तरी तेजानें कोणाला हार जाणारे नाहींत. जमदग्निपुत्र रामांनीं युद्धांत क्षत्रियांना जर्जर करून निःक्षात्रिय पृथ्वी केली. अगस्त्यांनीं ब्रह्मतेजानें अगाध समुद्र पिऊन टाकिला.' असें त्यांचें नानाप्रकारचें भाषण चाललें असतां अर्जुनानें धनुष्यापाशीं येऊन त्याला प्रदक्षिणा केली. नं-

तर कृष्णाचें ध्यान करून हं हं म्हणतां धनुष्य सज्ज करून त्यानें तें निशाण बाणांनीं खालीं पाडिलें! त्यावेळीं जिकडे तिकडे मोठी चळवळ उडून राहिली. देवांनीं पुष्पवृष्टि केली. ब्राह्मणांनीं वस्त्रें वर फडफडाविलीं. ह्या अप्रतिष्ठेनें राजमंडळांत जिकडे तिकडे हाहाःकार उडून राहिला. बाजेवाल्यांनीं नानाप्रकारचे बाजे सुरू केलें. द्रुपदाला संतोष होऊन प्रसंग पडल्यास अर्जुनाचें साह्य करण्यास तो तयार होऊन उभा राहिला. अशाप्रकारें मोठी गडबड उडून राहिली असतां अर्जुनाच्या सांगण्यावरून युधिष्ठिर नकुळसहदेवासहवर्तमान आपल्या बिऱ्हाडाकडे निघून गेला. त्या निशाणाकडे व इंद्रतुल्य अर्जुनाकडे दृष्टि देऊन पांढरें शुभ्र पातळ नेसलेल्या द्रौपदीला आश्चर्य व आनंद होऊन ती त्याकडे माळ घेऊन आली, व सर्वांदेखत तिनें त्याच्या गळ्यांत माळ घातली. नंतर ब्राह्मणांच्या जयजयकारामध्यें तो तिच्याबरोबर मंडपांतून बाहेर पडला. द्रुपद आपली मुलगी ब्राह्मणाला देत आहे असें पाहून राजे एकमेकांकडे टकमक पाहूं लागले. ते अगदीं खवळून जाऊन म्हणूं लागले, 'आम्हीं ह्या ठिकाणीं जमलों असतां आम्हाला तुच्छ करून हा ब्राह्मणाला द्रौपदी देऊं इच्छीत आहे. ह्या दुरात्म्याला ठार करून हिचें हरण करूं या. हा वेळपर्यंत आमचा चांगला मानमरातब ठेवून आतां हा आम्हाला तुच्छ करीत आहे. ह्या देवतुल्य राजसमाजामध्यें ह्याला तिला अनुरूप असा कोणीच पति दिसला नाहीं काय? ब्राह्मणाला स्वयंवराचा अधिकार नाहीं. तो क्षत्रियांनाच आहे. कोणाही राजाला वरण्याची जर तिची इच्छा नसेल तर हिला अग्नींत फेकून देऊन आपण आपापल्या राष्ट्राला चालते होऊं या. ह्या ब्राह्मणाच्या हातून हें कृत्य अविचारानें किंवा लोभानें झालें आहे म्हणून त्याला मारण्यांत देखील मोठेंसें पाप होणार नाहीं. आपली अप्रतिष्ठा होऊं नये

व पुढें एखाद्या स्वयंवरांत असा घोटाळा होऊं नये म्हणून ह्याला मारणेंच इष्ट आहे.' असें म्हणून आयुधें घेऊन ते द्रुपदावर धावले. सांखळदंड तोडून टाकून मोकळा झालेल्या हत्तीप्रमाणें ते आवेशानें धावून येत असतां भीमार्जुन हे त्यांना तोंड देण्याला तयार झाले. भीम आजूबाजूचे वृक्ष हातांनीं उपटून त्यांनीं त्यांना झोडीत सुटला. त्या त्याच्या कृत्यानें अर्जुनालाही आवेश चढून तो आपलें धनुष्य सज्ज करून तयार झाला. कृष्णाजिनें व कमंडलू उडवीत 'आह्मी तुमच्यामागें आहों; भिऊं नका,' असें म्हणून ब्राह्मण त्यांना धीर देत होते. 'आपण मुकाट्यानें काय होतें तें पहात बसा म्हणजे झालें,' असें हासत हासत त्यांना सांगून स्वयंवरांत मिळालेलें धनुष्य घेऊन अर्जुनानें कर्णशल्यादि वीरमुख्यांशीं तुंबळ युद्ध केलें. ब्रह्मतेजापुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं असें समजून कर्ण मागें हटला. भीमानें शल्याला उचलून खालीं आपटलें. तें पाहून ब्राह्मण खदखदां हासूं लागले. ह्याप्रमाणें कर्णशल्यांची उडालेली दुर्दशा पाहून परशुराम, द्रोण, अर्जुन, कृष्ण व कृप ह्यांखेरीज दुसरा कोणी कर्णाची, व बलराम, भीम किंवा दुर्योधन यांखेरीज दुसरा कोणी शल्याची खोड मोडण्याला समर्थ नाहीं, अशी मनाची खात्री असल्यामुळें 'ब्राह्मण अपराधी असले तरी त्यांचें रक्षण करणें आमचें कर्तव्य आहे, त्यांवर शस्त्र उचलणें आम्हाला उचित नाहीं,' असें मिष करून सर्व राजे थक्क होऊन जागचेजागीं गप्प झाले. इकडे कृष्णाला ते पांडव असावे असें वाटून 'ह्यानें द्रौपदी न्यायानें मिळविली आहे; ह्याबरोबर वृथा वैर करूं नका,' असें सांगून सर्व राजांची समजूत घालून त्यानें त्यांना आपापल्या नगराकडे परत पाठविलें. इकडे भीमार्जुन चालले असतां त्यांचे वैरी बनलेले राजे त्यांकडे मत्सरदृष्टीनें पहात होते. पौर्णिमेच्या संध्याकाळीं

एकाच वेळीं दृष्टीस पडणाऱ्या सूर्यचंद्रांप्रमाणें शोभा देणारी द्रौपदी त्यांच्यामागून चालली होती. भिक्षेची वेळ टळून गेली तरी हे दोघे परत आले नाहींत असें पाहून कुंतीच्या मनांत नानाप्रकारचे तर्क येऊं लागले. तिसऱ्या प्रहरच्या वेळेस जिकडे तिकडे सामसूम असून भीमार्जुन बिऱ्हाडीं आले असतां ' आई ही पहा भिक्षा आणिली आहे, ' असें अर्जुन कुंतीला म्हणाला. न पाहतां आंतूनच ' सर्वजण ती वांटून घ्या ' असें तिनें उत्तर दिलें. नंतर द्रौपदीला पाहून तोंडांतून चुकून भलतेंच निघून गेल्यामुळें खोट्याचा दोष येऊं नये म्हणून तिला हातांत धरून कुंति युधिष्ठिराकडे जाऊन म्हणाली, ' ह्या द्रुपदकन्येला तुझ्या धाकट्या भावानें भिक्षा म्हणून मजकडे आणिली असतां न पाहतां चुकीनें 'ती सर्वजण वांटून घ्या' म्हणून माझ्या तोंडून निघून गेलें. तेव्हां खोटें बोलण्याचें पाप माझ्या माथीं न लागतां हिचेंही अधर्मापासून रक्षण होईल अशी कांहीं तरी तोड निघाली पाहिजे. ' पुढें द्रुपदालाही यासंबंधानें विचार पडला. तेव्हां व्यासांनीं तेथें येऊन ' द्रौपदीचा अवतार पांच पांडवांसाठींच झाला असल्यानें सामान्यतः एका स्त्रीशीं पुष्कळांनीं लग्न करणें जरी अशास्त्र आहे तरी ह्या ठिकाणीं कांहीं हरकत नाहीं,' असें सांगून पांच पांडवांशीं तिचें लग्न करून देण्यास त्याला सांगितलें. विवाहविधि उरकल्यावर कृष्णानें पांडवांना हिरे, जवाहीर, मौल्यवान् अलंकार, वस्त्रें, मऊ कांबळीं, बिछायती, आसनें, नानाविध पात्रें, नानादेशच्या शाली, तरुण दासी, हत्ती, रथ व घोडे यांचे आहेर पाठविले.

पांडवांचें हास्तिनापुराला परत येणें.

विवाहाचा मंगलविधि उरकून पांडव द्रुपदाच्या घरीं रहात

असतां ज्यानें लक्षवेध केला तो अर्जुन होता व ज्यानें शल्याला जेरीस आणिलें तो भीम होता, ही बातमी हं हं म्हणतां जिकडे तिकडे पसरून सर्वांनीं धृतराष्ट्राचा व त्याच्या मुलांचा धिक्कार केला. कर्ण, शकुनि, अश्वत्थामा, दुर्योधन व त्याचे बंधु हे सर्व खजिल झाले. विदुरांना ही बातमी ऐकून संतोष झाला. पण दुर्योधन ती ऐकून धृतराष्ट्रास म्हणाला, 'आतां पांडवांसंबंधानें काय केलें पाहिजे तें सांगतों ऐका. कुशल ब्राह्मण पाठवून कुंतीचे मुलगे व माद्रीचे मुलगे ह्यांमध्यें फूट पाडिली पाहिजे. द्रुपद किंवा त्याचा मुलगा ह्यांना पुष्कळ द्रव्य देऊन मुठींत आणिलें पाहिजे, व पांडवांना इकडे राज्यांत न येऊं देतां बाहेरच ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेंच द्रौपदी पांचाजणांची बायको असल्यामुळें तिच्या मनांत त्यांच्या संबंधानें द्वेष उत्पन्न करणें फार सोपें आहे. किंवा सर्वांत उत्तम गोष्ट म्हटली म्हणजे हुषार मारेकऱ्यांकडून भीमाला मारून टाकवावें. तोच त्यांच्यामध्यें बलानें अधिक आहे; म्हणून त्या सर्वांची त्या एकट्यावर फार भिस्त आहे. त्याचा आधार आहे म्हणूनच अर्जुन आम्हाला तुच्छ करीत आहे. भीम मेल्यावर बाकीचे पांडव बलहीन व उत्साहहीन होऊन राज्याकरितां मुळींच यत्न करणार नाहींत. तो पाठीवर आहे तोंपर्यंतच अर्जुन जिंकण्याला कठीण; नाहीं तर तो कर्णाच्या पासंगाला सुद्धां लागणार नाहीं. भीम मेल्यावर ते निमूटपणें आमच्या आज्ञेंत वागूं लागून आमच्या मुठींत येतील. द्रुपदाचें व त्यांचें जोंपर्यंत पूर्ण ऐक्य जुळलें नाहीं तोंपर्यंतच त्यांना जिंकतां येणार आहे.' कर्ण म्हणाला, 'कपटानें त्यांना मारण्याची ही तुझी मसलत मला पसंत नाहीं. पराक्रम हाच क्षत्रियांना श्रेयस्कर असून तो शूरांचा धर्म आहे; म्हणून आपण आपल्या चतुरंग सैन्यानिशीं द्रुपदाला जर्जर करून पांडवांना

जिंकूं. सामदानभेदांचा ह्या ठिकाणीं उपयोग होईल असें मला वाटत नाहीं. ह्मणून दंडानेंच त्यांना जिंकून तूं राज्याचा उपभोग घे.' नंतर भीष्म, द्रोण व विदुर ह्यांना बोलावून 'आमच्या हिताचा मार्ग कोणता असेल तो ठरवा.'' असें धृतराष्ट्र त्यांना म्हणाला असतां भीष्म म्हणाले, 'पांडवांबरोबर भांडण करणें मला पसंत नाहीं. मला दोघेही सारखे आहां. मला ज्याप्रमाणें त्यांची काळजी घेतली पाहिजे त्याचप्रमाणें धृतराष्ट्रा, तुलाही घेतली पाहिजे. असें असल्यामुळें त्यांच्याबरोबर स्नेह राखून त्यांना अर्ध राज्य दे. दुर्योधना, ज्याप्रमाणें तुला हें राज्य तुझें वडिलोपार्जित वाटत आहे तसेंच त्यांनाही वाटत आहे. त्यांना जर हें मिळणार नाहीं तर तुला किंवा दुसऱ्या कोणाही भरत-कुळांतल्याला तें कां मिळावें? धृतराष्ट्रा, हें राज्य तूं अन्यायानें बळकाविलें आहेस; पण तुझ्यापूर्वींच न्यायानें त्यांना ह्याचा हक्क मिळाला आहे. सलोख्यानें राहून अर्ध राज्य त्यांना देणें हें तुम्हाला व सर्व जगाला हितावह होणार आहे. ह्याच्या उलट वागाल तर तुमचें हित होणार नाहीं. त्यांत तुझी केवळ अपकीर्ति मात्र होणार आहे. कीर्तीचें रक्षण कर. कीर्ति हें मोठें बल आहे. नष्टकीर्ति मनुष्य जगून मेल्यासारखा आहे. कीर्तीचा नाश झाला नाहीं तोंपर्यंतच मनुष्य जिवंत आहे असें समजलें पाहिजे; म्हणून कुरुकुलाला उचित व पूर्वजांच्या नांवाला अनुरूप असें जें हें मी तुला सांगतों त्याप्रमाणें करून टाक. कुंतिपुत्रांना जाळल्याची बातमी ऐकल्यापासून राजा, तुझ्याकडे मला पहावत देखील नव्हतें. कुंतीला व तिच्या मुलांना जाळल्याबद्दल लोक तुला ज्याप्रमाणें दोष देतील त्याप्रमाणें ते पुरोचनाला दोषी धरणार नाहींत; म्हणून ते आतां सुरक्षित येऊन भेटले म्हणजे, राजा, तुझ्यावरचा मोठा आळ जाणार आहे. ते वीर जिवंत अ-

सून त्यांच्या अंशाचा अपहार करण्याची प्रत्यक्ष इंद्राची देखील छाती नाहीं. त्या सर्वांचें यथायोग्य वर्तन असून ते एकमतानें आहेत. राज्यावर दोघांचा सारखा हक्क असून अन्यायानें त्यांना तूं त्यापासून दूर करूं इच्छीत आहेस. जर तुला सरळ मार्गानें जाणें असेल, माझें प्रिय करणें असेल, व सर्व जगाचें कल्याण करणें असेल, तर त्यांना अर्धें राज्य दे.' यावर द्रोण म्हणाले, 'धृतराष्ट्रा, सल्ला घेण्याकरितां म्हणून बोलाविलें असतां हितचिंतकांनीं योग्य, हितावह व कीर्तिकर असाच सल्ला दिला पाहिजे. ह्या थोर भीष्मांनीं दिलेल्या सल्याप्रमाणेंच माझाही सल्ला आहे. पांडवांना त्यांचा अंश देणें न्यायाचें आहे; म्हणून पुष्कळ संपत्ति देऊन जासुदाला द्रुपदाकडे पाठीव. तेथें जाऊन त्यानें 'तुमचा संबंध झाल्यानें दुर्योधन प्रभृतींना फार आनंद झाला आहे,' म्हणून बोलावें, व या योग्यसंबंधाविषयीं प्रशंसापूर्वकही चार शब्द बोलावे. पांडवांचें अनेक प्रकारें समाधान करून त्यांना व द्रौपदीला मौल्यवान् अलंकार व रत्नें देऊन इकडे बोलाविलें आहे ह्मणून सांगावें. द्रुपदाची आज्ञा घेऊन ते इकडे येण्यास निघाले असें कळल्यावर त्यांना आणण्याकरितां उत्तम सैन्य पाठीव. तूंही त्यांच्यावर योग्य लक्ष्य ठेवून वडिलोपार्जित राज्याचा त्यांना उपभोग मिळेल अशी तजवीज कर. हाच तुझ्या मुलांच्या व त्यांच्या हिताचा मार्ग आहे.' विदुर म्हणाले, 'पुरोचनाच्या कृत्यानें तुला लागलेला कलंक त्यांवर अनुग्रह करून धुवून काढ. हा तुझा त्यांवरचा अनुग्रह तुझी कुलवृद्धि व कल्याणच करील. द्रुपद मोठा पराक्रमी असून आमच्याशीं त्याचें पूर्वींपासून वैर आहे. त्याला आपलासा करून घेतल्यानें आपलें मोठें कार्य होणार आहे. दशार्हांचे बलाढ्य लोक कृष्णाच्या बाजूलाच असणार व जयश्रीही कृष्णाच्या पक्षालाच वरणार. जें काम गोडीनें

साधण्याजोगें आहे, तें कोणता अभागी मनुष्य भांडणानें तडीस नेण्यास इच्छील ? पांडव जिवंत आहेत ही बातमी ऐकल्यापासून सर्वजण त्यांच्या दर्शनासाठीं फार आतुर झाले आहेत, त्यांनाही संतोष होईल असें कर. दुर्योधनादिकांच्या बुद्धी दुष्ट असून अल्लडपणामुळें अधर्माकडे त्यांची प्रवृत्ति आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें वागूं नकोस. त्यांच्या अपराधामुळें सर्व प्रजेचा समूल नाश करण्याला प्रवृत्त होऊं नकोस. ' हा भीष्मादिकांचा सल्ला ऐकून धृतराष्ट्रानें पांडवांना आणण्यासाठीं जासूद पाठविले. द्रुपदानेंही डोळ्यांतून पाणी काढून मोठ्या प्रेमानें त्यांना निरोप दिला. निघते वेळीं युधिष्ठिर ह्मणाला, ' प्रेमपाशानें बांधून आपण आम्हाला अगदीं परतंत्र केलें आहे. आपली कोणतीही आज्ञा आम्हाला मोडतां येणार नाहीं. ' असें म्हणून निरोप घेऊन द्रौपदी व कुंति ह्यांसह मजल दरमजल करीत ते हास्तिनापुराला येऊन पोहोंचले. त्यांना सामोरे जाऊन आणण्याकरितां धृतराष्ट्रानें कौरवांना पाठविलें. ' पांडव शतायु होऊन येथें राहून ते आमचें पालन करोत, ' असे लोकांचे आनंदाचे उद्गार ऐकत ते नगरांत शिरले.

पांडवांचा इंद्रप्रस्थीं वास.

पांचालाहून परत येऊन पांडव हास्तिनापुरांत कांहीं दिवस राहिल्यावर भीष्मांसमक्ष धृतराष्ट्र त्यांना हाक मारून म्हणाला, ' युधिष्ठिरा, तुम्हा भावांभावांमध्यें भांडण होऊं नये म्हणून अर्धे राज्य घेऊन तूं आपल्या भावांसह खांडवप्रस्थाला जाऊन तेथें राज्य कर. ' ही गोष्ट मान्य करून सर्व पांडव द्रौपदीसह त्या घोर खांडवप्रस्थ नांवाच्या वनाला गेले व तेथें जाऊन त्या वनाला त्यांनीं स्वर्गाची शोभा आणिली. त्या पवित्र जागेची

शांति करून व्यासप्रभृतींनीं त्यांना नगरासाठीं जागा मापून दिली. समुद्रासारखा खोल खंदक खणून व आकाशाला जाऊन भिडलेले तट बांधून ते त्या ठिकाणीं राहूं लागल्यानें त्या जागेला त्यांच्या योगानें नागलोकाची शोभा आली. उंच उंच वेशींनीं, मोठमोठ्या गगनचुंबित हवेल्यांनीं व अनेक आयुधागारांनीं तें नगर अप्रतिम दिसूं लागलें. श्यामवर्ण गोपुरांनीं तें द्विजिव्ह सर्पांनीं वेष्टिल्याप्रमाणें भासूं लागलें. त्याचप्रमाणें अनेक वीरांनीं रक्षण केलेल्या त्या नगराला सहस्त्रावधि सूर्यकिरणांना दाद लागूं न देणाऱ्या जलयंत्रांनीं फारच शोभा आली होती. त्यामध्यें सुशोभित व रुंद असे मोठमोठे रस्ते केले असून ठिकठिकाणीं कैलासाला तुच्छ करणारे असे क्रीडापर्वत केले होते. युधिष्ठिराचें राहण्याचें जलमंदीर कुबेरभुवनाला मागें सारणारें होतें. सर्व वेदपारंगत ब्राह्मण, धनार्थी वैश्य, सर्व कलेंत निष्णात असे कारागीर, नानादेशांतून येऊन तेथें मोठ्या आनंदानें राहिले होते. त्या नगराच्या असमंतात् भागीं मनोहर व सुवासिक पुष्पांचीं रम्य उद्यानें असून त्यांत फलभारांनीं वाकलेलीं आंबे, फणस, डाळिंब, कळंब, सुपारी, लिंब इत्यादि अनेक जातींचीं झाडें लाविलीं होतीं. त्यांवर मत्तमयूर, कोकिळ, हंस, कारंडक इत्यादि नानाविध पक्षी सुखांत रहात होते. तेथें आरशासारख्या स्वच्छ पाण्याचे हौद, तळीं व विहिरी इत्यादि रम्य जलाशय असून प्रफुल्लित कमलांनीं ते फारच शोभायमान दिसत होते. पुण्यशील जनांनीं परिपूर्ण अशा त्या नगरांत शिरतांना पांडवांचें मन फारच सुप्रसन्न झालें. त्यांची तेथें सर्व प्रकारची सोय करून देऊन श्रीकृष्ण बळरामासह द्वारावतीला निघून गेला. मिळालेल्या राज्यांत संतोष मानून त्या ठिकाणीं पांडव आनंदांत राहिले. सत्यसंध युधिष्ठिर बंधूंसहवर्तमान धर्मानें प्रजेचें पालन करूं लागला, व सर्व पौरकार्यांत

दक्ष राहून व दुसऱ्या राजांवर वजन बसवून त्यानें राज्याचा पाया भक्कम केला.

अर्जुनाच्या तीर्थयात्रेचें कारण.

एका बायकोच्यापायीं आपसांत भांडण होऊं नये म्हणून नारदांच्या सांगण्यावरून द्रौपदी एकांतांत एकाबरोबर असतांना दुसऱ्यानें तिकडे जावयाचें नाहीं म्हणून संकेत ठरवून पांडव सुखानें राज्यशकट हाकीत असतां कोठें अन्याय न होतां प्रजा सुखी होती. इतक्यांत एके दिवशीं कांहीं चोरांनीं एका ब्राह्मणाची गाय चोरून नेली; त्यामुळें संतापून त्या ब्राह्मणानें पांडवांकडे येऊन अशी ओरड केली कीं, ' षष्ठांश कर घेऊन जो राजा प्रजेचें रक्षण करीत नाहीं त्याचे माथीं प्रजेचें सर्व पाप बसतें, माझी गाय चोर घेऊन चालला आहे. ' हें त्याचें करुणापर शब्द ऐकून अर्जुनानें ' भिऊं नकोस ' ह्मणून त्याला धीर दिला; परंतु आयुधागारांत धर्मराज द्रौपदीबरोबर एकांतांत असल्यामुळें त्याला विचार पडला. ब्राह्मणाची गाय चोर घेऊन चालले असतां त्याला संकटांतून न सोडविलें तर क्षात्रधर्माला बट्टा लागतो. बरें, वडील भाऊ एकांतांत असतां आंत जावें तर नियम मोडल्याबद्दल वनवासाला जावें लागणार; परंतु प्रजेचा दोष येण्यापेक्षां स्वतःला वनामध्यें मरण आलें तरी बेहेत्तर, असा विचार करून तो अंतःपुरांत शिरला व धनुष्यबाण घेऊन ब्राह्मणाच्या मागून जाऊन त्यानें त्याची गाय चोरांपासून सोडवून त्याला ती परत आणून दिली.

अर्जुनाची तीर्थयात्रा–सुभद्रेशीं लग्न.

ब्राह्मणाची गाय त्याला परत मिळवून देऊन अर्जुन ठरल्या-

प्रमाणें वनाला निघाला असतां ' ब्राह्मणासाठीं तुझ्या हातून ही गोष्ट घडल्यानें करार मोडल्याचा दोष तुला बिलकुल लागला नाहीं, ' असें म्हणून धर्म अर्जुनाची समजूत घालूं लागला. तेव्हां अर्जुन म्हणाला, ' धर्माचरणामध्यें लपंडाव उपयोगी नाहीं. सत्यापासून मी कधीं ढळणार नाहीं. ' असें म्हणून राजाची आज्ञा घेऊन तो बारा वर्षें वनवास करण्यासाठीं निघाला. अनेक रम्य तीर्थें पहात पहात तो गंगाद्वाराला येऊन पोहोंचला. विद्वान् महात्म्यांचा तेथें वास असल्यामुळें त्या स्थलाला फार शोभा आली होती. तेथें अर्जुन गंगेंत उतरून स्नान करून व पितरांना तर्पण देऊन वर येत असतां उलूपी नांवाच्या नागकन्येनें त्याला पाण्यांत ओढून नागलोकीं नेलें. तिच्या अत्याग्रहानें अर्जुनानें तिच्याशीं लग्न केलें. पुढें ' जलांत तुह्मी कोणालाही हार जाणार नाहीं व सर्व जलचर तुमच्या आज्ञेंत रहातील, ' असा अर्जुनाला वर देऊन तिनें त्याला फिरून पृथ्वीवर आणून सोडून दिलें. पुढें तो फिरतां फिरतां मणिपुराला गेला. तेथें चित्रांगदेशीं त्यानें लग्न केलें. त्याच्यापासून तिला बभ्रुवाहन मुलगा झाला. पुढें अर्जुन फिरून देशपर्यटणाला निघाला. पशुपतीचें मुख्य स्थान जें गोकर्णक्षेत्र तेथें जाऊन पश्चिमेकडील तीर्थें पहात पहात तो प्रभासाला येऊन पोहोंचला. तेथें तो आल्याची बातमी श्रीकृष्णाला लागून तो त्याच्या भेटीला आला. एकमेकांला आलिंगन देऊन कुशल प्रश्न झाल्यावर ते आनंदांत तेथेंच कांहीं दिवस राहिले. त्या वेळीं श्रीकृष्णानें त्या वेषांत फिरण्याचें कारण विचारल्यावरून अर्जुनानें सर्व इत्थंभूत हकीकत त्याला सांगितली. तेथें कांहीं दिवस सुखांत काळ घालविल्यावर श्रीकृष्ण त्याला पाहुणचार देण्यासाठीं द्वारकेला घेऊन गेला. त्या ठिकाणीं सर्वांचा सत्कार घेत तो कृष्णाच्या मंदिरांत राहिला. पुढें थोडक्याच

दिवसांनीं रैवतक पर्वतावर एक मोठा उत्सव झाला. त्या वेळीं जिकडे तिकडे चित्रविचित्र अशा हवेल्या उभारल्या असल्यामुळें तो सर्व प्रदेश लखलखीत दिसत होता. वाद्यांचा गजर चालूं होता. त्या ठिकाणीं लोकांचे थवेच्याथवे, कांहीं रथांतून, कांहीं हत्तींवरून, कांहीं घोड्यांवरून व कांहीं पायांनीं ती मौज पाहण्याला चालले होते. बलराम वगैरे मंडळीही तेथें उत्सव पहात फिरत होती. तेथें रत्नालंकार घालून सुभद्रा आपल्या सख्यांसह फिरतांना कृष्णार्जुनांच्या दृष्टीस पडली; तेव्हां कृष्णाच्या विचारानें अर्जुन तिला मुकाट्यानें रथांत बसवून घेऊन निघून गेला. याप्रमाणें अर्जुनानें सुभद्रेला न विचारतां नेल्याचें ऐकून बलराम संतापून श्रीकृष्णाला म्हणाला, ' त्या नीचाचा आदरसत्कार आह्मीं तुझ्यासाठीं केला. या उपकाराची त्यानें फार चांगली फेड केली, ' हें बलरामाचें भाषण ऐकून भगवान् श्रीकृष्ण ह्मणाला, ' आम्हाला तुच्छ करण्याचा अर्जुनाचा मुळींच उद्देश नाहीं. नेहमींचा तुमचा पैशाकडचा ओढा पाहून त्याला तुमचा भरंवसा बसेना. स्वयंवरावर त्याला विसंबून रहातां येईना. ह्या सर्व गोष्टी मनांत आणून त्यानें तिचं हरण केलें आहे. हा संबंध उभयपक्षीं ठीक आहे. कुंतीच्या मुलाशीं संबंध कोणाला आवडणार नाहीं ? रणांगणांत एका शंकरांखेरीज दुसरा कोणीही त्याला जिंकण्याला समर्थ नाहीं; तर तुह्मी जाऊन त्याला सामोपचारानें परत आणावें व त्याचें सुभद्रेशीं लग्न लावून द्यावें, असें माझें मत आहे. त्याच्याशीं युद्ध करून त्यांत त्यानें तुम्हाला जिंकिलें तर त्या योगानें तुमची अपकीर्ति होणार आहे. मुकाट्यानें झाल्या गोष्टीस अनुमोदन देण्यांत कांहीं कमीपणा नाहीं. ' हा श्रीकृष्णाचा हेतु पाहून बलरामानें अर्जुनाला सामोपचारानें परत आणून आपल्या बहिणीचें त्याच्याशीं लग्न लावून दिलें. द्वारकेंत यथेच्छ सु-

त्यांत एक वर्षभर राहिल्यावर उरलेले दिवस पुष्कर तीर्थी काढून बारा वर्षे संपल्यावर सुभद्रेसहवर्तमान अर्जुन इंद्रप्रस्थाला आला. हा संबंध जुळल्याबद्दल युधिष्ठिराला आनंद झाला.

अर्जुनाला गांडीव धनुष्याची प्राप्ति.

श्वेतकी नांवाचा कोणी बलाढ्य राजा होता. त्यानें बारा वर्षे ब्रह्मचर्यानें राहून अग्नीवर तुपाची संततधार धरली. तेव्हां यथेच्छ तूप प्याल्यानें अग्नीला अजीर्ण झालें व तो पांढरा फटफटीत पडला. त्याच्या तोंडाला वीट येऊन तोंडांत कांहीं घेण्याची त्याला इच्छा उरली नाहीं; तेव्हां ब्रह्मदेवांकडे जाऊन त्यानें आपली हकीकत त्यांना कळविली. तेव्हां ब्रह्मदेव म्हणाले, ‘ खाण्डव अरण्यांत पुष्कळ प्राणी रहातात. त्यांची चरबी भक्षण करण्यास मिळाली तर तुला पूर्वस्थिति प्राप्त होईल. म्हणून तूं जाऊन तें वन खाऊन टाक. ’ त्यांच्या आज्ञेनें खाण्डव वनांत येऊन अग्नि तें जाळून टाकण्याला सुरवात करता झाला. पण तेथील गजव्याघ्रादि प्राण्यांनीं पाणी शिंपडून तो सात वेळ विझाविला. याच सुमारास श्रीकृष्ण पांडवांना भेटण्यासाठीं इंद्रप्रस्थाला येऊन त्यांसहवर्तमान तेथें रहात असतां कृष्णार्जुन यमुनेच्या कांठीं मृगया करीत होते. तेव्हां अग्नि ब्राह्मणवेषानें त्यांकडे आला व त्यानें त्यांपाशीं खाण्डववन खाण्यास मागितलें. तेव्हां बरें म्हणून अर्जुनानें आपल्या धनुष्याच्या जोरावर तेथील प्राण्यांना बाहेर जाऊं न देतां तें वन अग्नीला यथेच्छ खाऊं दिलें. त्या उपकाराची फेड करण्यासाठीं अग्नीनें, कोणत्याही शस्त्राला दाद न देणारें, सर्व आयुधांना पुरून उरणारें, अलौकिक गांडीव धनुष्य, सदा बाणांनीं भरलेला भाता व दिव्य घोडे जुंपलेला असा कपिध्वज रथ ही सामुग्री अर्जुनाला दिली; व कृष्णाला वज्रनाथ नांवाचें चक्र देऊन

हें शत्रूवर सोडिलें असतां इष्ट हेतु शेवटास नेऊन तें परत हातांत येईल, ' असें सांगितलें.

राजसूय यज्ञाचा विचार.

पुढें कांहीं कालानें राजसूय यज्ञ करण्याविषयीं पंडूचा नारदांच्या तोंडचा निरोप ऐकून शिष्टांच्या विचारानें तो यज्ञ करण्याचा युधिष्ठिरानें निश्चय ठरविला. मंत्री व आप्तवर्ग यांना बोलावून त्यानें त्यांचा सल्ला घेतला, तेव्हां यज्ञ करण्याची त्याची विशेष इच्छा पाहून त्यांनींही मोठ्या आनंदानें त्याला आपला रुकार दिला. आपलें सामर्थ्य, मित्रसाहाय्य, देशकाल व कर्तव्याकर्तव्य यांचा पूर्ण विचार करून यज्ञ करावासें त्याला वाटलें तरी अशा महत्कृत्याला आरंभ केवळ आपल्याच जबाबदारीवर न करतां श्रेष्ठ अशा भगवान् श्रीकृष्णाचा सल्ला घेऊन नंतर तो करावा असा विचार करून त्यानें त्याकडे दूत पाठविला. दूतमुखांतून निरोप ऐकून श्रीकृष्ण इंद्रप्रस्थाला आला. त्याचाही या यज्ञाला रुकार पडला, व या महत्कार्याची सर्व जबाबदारी त्यानें आपल्या शिरावर घेतली. प्रथम फार माजलेल्या जरासंधाला मारून मग हा यज्ञ करावा असा त्याचा सल्ला पडला. यावर धर्मराज ह्मणाला, 'तूं विचारपूर्वक सल्ला दिलास हें योग्यच आहे. परंतु तुझ्या, बलरामाच्या, भीमसेनाच्या किंवा अर्जुनाच्या हातून त्याचा नाश होईल किंवा नाहीं याचा मला संशय वाटतो.' हें ऐकून भीम ह्मणाला, 'जो राजा कोणतेंही कृत्य कधींच हातीं घेत नाहीं, तो वारुळाप्रमाणें हळू हळू नाहींसा होतो. एखादा दुबळा राजा देखील नीतीनें व हुषारीनें वेळींच योग्य उपायांचा उपयोग करून बलवान् शत्रूचा मोड करूं शकतो. कृष्णाच्या ठिकाणीं नीति, माझ्या ठिकाणीं बल व अर्जुनाच्या ठिकाणीं विजय वसत अस-

त्यामुळें या तिहींच्या योगानें जरासंधाचा आह्मी शेवट लावूं.' श्रीकृष्ण ह्मणाला, 'एखादें अज्ञान बालक परिणामाकडे लक्ष्य न देतां एखादें कृत्य हातीं घेतें, ह्मणून त्या अज्ञान बालाला शत्रू क्षमा करतात अशी गोष्ट कधीं घडत नाहीं. ह्या भूतलावरील सर्व राजे जरासंधाशीं टक्कर न मारतां त्याच्यापुढें हात जोडून उभे रहातात. आपणाला सर्वांचा स्वामी समजून अनेक राजांवर अन्यायानें तो स्वाऱ्या करतो. ज्याच्यापासून त्याला करभार येत नाहीं असा एकही राजा नाहीं. कोणताही राजा त्याच्यावर चालून जाईल असें कधीं घडावयाचें नाहीं. शिवालयामध्यें त्यांना पशूप्रमाणें बली देण्याला ठेविले असल्यामुळें त्यांना मानहानि वाटत नसेल काय? क्षत्रियाला धारातीर्थी मरण येणें हेंच भूषणावह व पुण्यप्रद आहे. त्यावर चालून जाऊन त्याच्याशीं युद्ध करणें हेंच आह्माला श्रेयस्कर आहे. त्यानें आजपर्यंत शायशी राजे देवालयांत कोंडले आहेत, व शंभर पुरे होण्याला चवदाच कायते कमी आहेत. तेवढे मिळाले ह्मणणे त्याचा क्रूर नृपमेध सुरू होणार आहे. त्याच्या ह्या कृत्याला जो विघ्न आणील तो खात्रीनें मोठें यश मिळवील, व त्याला जो जिंकील त्याला सार्वभौमपद मिळेल, याची मुळींच शंका नाहीं.' युधिष्ठिर ह्मणाला, 'सार्वभौमपद मिळविण्याच्या केवळ स्वार्थबुद्धीनें मी तुह्माला हें साहसकृत्य करण्यास कसें पाठवूं? भीम व अर्जुन हे माझे दोन डोळे असून श्रीकृष्णा, तूं माझें मन आहेस. मन व डोळे यांनीं हीन अशा मनुष्याचें अस्तित्व तरी कसें शक्य असणार? जरासंधाच्या मोठ्या सैन्याशीं युद्ध करून यमाला देखील जय येणें शक्य नाहीं. मग त्या ठिकाणीं तुमच्या प्रयत्नांचा काय उपयोग होणार? हें भलतेंच काम हातीं घेऊन एखादा अनर्थ मात्र आपल्यावर ओढवणार आहे; ह्मणून या भानगडींत न पडतां

स्वस्थ रहाणें हेंच मला बरें दिसतें.' यावर अर्जुन युधिष्ठिराला म्हणाला, 'धर्मराज, मीं धनुष्य, बाण, शस्त्र, वीर्य, अनुयायी, भूमि, यश इत्यादि अनेक दुष्प्राप्य वस्तु प्राप्त करून घेतल्या आहेत. उत्तम कुलांत ज्याचा जन्म झाला असेल, त्याची शहाणे प्रशंसा करतात. बलासारखें तर दुसरें या जगांत कांहींच नाहीं, व वीर्याहून मला दुसरें कांहींच प्रिय वाटत नाहीं. प्रसिद्ध कुलांत जन्म झाला असूनही मनुष्य निर्वीर्य असेल तर त्याच्या हातून कांहीं होणार नाहीं. वीर्यवान् मनुष्य हीन कुलामध्यें जन्मला असला तरी तो श्रेष्ठ समजला पाहिजे. ज्याचा सर्व व्यवसाय शत्रूला जिंकण्याचा आहे तोच खरा क्षत्रिय. एकाग्रता, व्यवसाय व दैव हीं तीन विजयाला मुख्य साधनें आहेत. सामर्थ्य असूनही निःकाळजी राहिल्यानें यश न येतां उलट पराभव होतो. दैन्य दाखविल्यानें ज्याप्रमाणें दुर्बलांचा नाश होतो त्याप्रमाणेंच मूर्खपणानें बलवानाचा नाश होतो. म्हणून दैन्य व मौर्ख्य हीं दोन्ही जयप्राप्तीची इच्छा करणाऱ्या राजानें आपणापासून दूर केलीं पाहिजेत. जरासंधाचा नाश व राजांचें रक्षण ह्या दोन्ही गोष्टी यज्ञसिद्धीसाठीं हातीं घेणें इष्ट आहे. हें काम हातीं न घेतल्यानें आम्ही ह्या कृत्याला असमर्थ आहों असा जगाचा समज होणार आहे. युद्ध न केल्यानें आजपर्यंत कोणी अमर झाल्याचें आमच्या ऐकण्यांत नाहीं. न्यायानें व दैवसाहाय्यानें शत्रूला पादाक्रांत करून आत्म्याला तुष्ट करणें हेंच प्रत्येक वीराचें कर्तव्य आहे.सुविचाराला दैवाचें पाठबळ मिळालें तर ही जोडगोळीच सिद्धीला कारणीभूत होते. अविचारानें व कौशल्याशिवाय जर आपण युद्धाला गेलों तर मात्र आपण खचित अपयशाचे वांटेकरी होऊं. अशी जर स्थिति आहे तर सुनीतीचें अवलंबन करून शत्रूवर चालून जाऊन आपण त्याचा नाश कां करूं नये?

बांधवांच्या रक्षणासाठीं आम्ही त्याला युद्धामध्यें एक मारूं तरी किंवा मरूं. बरें, त्यानें आम्हाला मारल्यास आम्ही स्वर्गसुख घेऊं.' याप्रमाणें भवति न भवति झाल्यावर जरासंधाला मारून दिग्विजय करून मग राजसूय यज्ञ करावा असें सर्वानुमतें ठरलें.

जरासंधाची गोष्ट.

बृहद्रथ नांवाचा मगधाधिपति मोठा पराक्रमी असून त्याजवळ तीन अक्षौहिणी सैन्य होतें. तो अतुल पराक्रमी व मोठा अभिमानी होता. त्यानें काशीराजाच्या जुळ्या मुलींशीं लग्न लाविलें. पुष्कळ दिवसपर्यंत त्याला मुलगा झाला नाहीं. कोणे एके वेळीं गौतमकुलोत्पन्न चंडकौशिक ऋषि फिरत फिरत त्याच्या नगराबाहेर एका झाडाखालीं येऊन उतरले. तेव्हां तो त्यांच्या भेटीला गेला, व ते प्रसन्न झाले असतां त्यानें त्यांच्याजवळ मुलगा मागितला. तेव्हां ते मुनि ध्यानस्थ झाले असतां आंब्याचें फल त्यांच्या मांडीवर पडलें. तें राजाच्या हातीं देऊन 'आपल्या बायकांना खाण्याला दे ह्मणजे तुझें काम होईल,' असें ते त्याला म्हणाले. तें ऐकून मुनींच्या पायांवर डोकें ठेवून राजा नगराला परत गेला, व योग्य वेळीं आपल्या दोन स्त्रियांना तें फल त्यानें खाण्याला दिलें. त्यांनीं त्याच्या दोन फाका करून प्रत्येकीनें एकेक खाल्ली. होणारी गोष्ट चुकावयाची नसल्यामुळें त्या दोघींनाहीं तें फल खाल्लयावर गर्भ राहिला, व कालेंकरून एक डोळा एक हात, एक पाय, अर्धें पोट, अर्धें तोंड व अर्धी कंबर अशा प्रकारचीं दोन शरीरशकलें प्रत्येकीला एक एक झालीं. तीं पाहून त्या बिचाऱ्या खिन्न झाल्या व तीं सजीव शरीरशकलें बाहेर नेऊन टाकण्यास त्यांनीं आपल्या दासींना सांगितलें. त्यांनीं तीं चांगलीं झांकून घेऊन नगराबाहेर नेऊन फेकून दिलीं. तीं जरानामक रा-

क्षसीच्या हातीं लागलीं. तीं अनायासानें नेतां यावीं म्हणून तीं जोडण्याचें तिच्या मनांत आलें. त्याप्रमाणें तिनें केलें तों तीं दोन्ही शकलें एकत्र जुळून त्यांपासून एक मुलगा तयार झाला. त्याला पाहून विस्मयानें तिचे डोळे खुलले. त्या मुलानें आपल्या हाताची मूठ वळून तोंडांत घातली व तो मोठ्यानें गरजला. त्या शब्दानें अंतःपुरातल्या स्त्रिया घाबरून जाऊन राजाला घेऊन त्या ठिकाणीं आल्या. त्या मुलाला पाहून राजस्त्रियांच्या स्तनाला पान्हा फुटला. त्यांना याप्रमाणें मुलासाठीं हापापलेल्या पाहून जरेनें तो मुलगा त्यांना दिला. जरेनें सांधून तो झाल्यामुळें त्याला जरासंध नांव दिलें. राजस्त्रियांनीं आपल्या स्तनांतील दुधानें त्याला न्हाऊं घातलें. राजालाही त्याला पाहून फार आनंद झाला व त्यानें जिकडे तिकडे महोत्सव सुरू केले. पुढें जरासंधाला राज्याभिषेक झाल्यावर कृष्णानें कंसाला मारल्यामुळें त्याच्याशीं त्याचें वैर पडलें. तो युद्धामध्यें देवासुरांना देखील अजिंक्य असल्यामुळें मल्लयुद्धामध्यें त्याला जिंकण्याचा श्रीकृष्णानें विचार केला. त्याला बाहुवीर्याचा मोठा गर्व असल्यामुळें भीमाबरोबर युद्ध करण्याला तो खचित तयार होईल व महाबाहु भीम त्याला मारील, असा विचार करून श्रीकृष्ण भीमार्जुनांना आपल्याबरोबर घेऊन मगध देशाला निघाला. सूड घेण्याच्या इच्छेनें रागावून निघालेल्या या तिघांचें तेज त्यावेळीं असह्य भासत होतें. ते इंद्रप्रस्थाहून निघून कुरुजांगल देश ओलांडून पद्मसर नांवाच्या रम्य सरोवराला येऊन पोहोंचले. पुढें कालकूट, गंडकी, शोण व रम्य सरयू वगैरे ओलांडून गिरिव्रजाच्या वेशीजवळ येऊन ते दाखल झाले. नंतर वेशीचा विध्वंस करून ते शहरांत शिरले. व *स्नातक वेषानें निः-

---

* धर्मार्थ भिक्षा मागणारा भिक्षुक.

शस्त्र असे राजवाड्यांत शिरून बिनदिक्कत राजापुढें येऊन उभे राहिले. त्यांना सामोरे जाऊन आणि पाद्यमधुपर्कादि पूजासाहित्यांनीं त्यांची यथाविधि पूजा करून जरासंधानें त्यांचें स्वागत केलें. ह्यासमयीं भीमार्जुनांनीं मौन धारण केलें होतें. कृष्ण राजाला ह्मणाला, ' राजा, हे दोघे नियमस्थ आहेत. मध्यरात्र होईपर्यंत हे कोणाशीं बोलणार नाहींत, पुढें हे तुझ्याशीं बोलतील. ' राजानें त्यांना आपल्या होमशाळेमध्यें जागा दिली व मध्यरात्र झाल्यावर तो फिरून त्यांची कोणतीही इच्छा परिपूर्ण करावयाच्या इराद्यानें त्यांना भेटण्याला आला. त्यानें त्यांना नमस्कार केला असतां ' राजा, तुला अनायासानें शाश्वत सुख मिळो, ' असें म्हणून ते एकमेकांकडे पाहूं लागले. नंतर जरासंधानें त्यांना आपली वेस फोडून नगरांत शिरण्याचें कारण विचारिलें; तेव्हां कृष्णानें शांतपणें उत्तर दिलें. 'शहाणे शत्रूच्या घरीं आडमार्गानें व मित्राच्या घरीं सरळ मार्गानें शिरतात. कांहीं हेतु मनांत धरून आह्मी शत्रूच्या घरीं आलों आहों. तूं मोठा अपराध केला आहेस. तो कोणता तो ऐक. अनेक राजांना बंदिवान करून आणून त्यांना तूं पशूप्रमाणें बळी देऊं इच्छीत आहेस. राजांचा अपमान राजांनींच करणें उचित आहे काय ? धर्मरक्षण करण्याला समर्थ असूनही अपराध करणाऱ्याचा आह्मीं जर प्रतिकार केला नाहीं, तर तें पाप आमच्या माथीं बसेल. नरबळी आजपर्यंत कधीं कोणीं ऐकिला नाहीं. तूं तर तुझ्यासारख्या राजांनाच पशू करून सोडिलें आहेस. मनुष्य जें जें कर्म करतो त्याचें त्याला फल मिळावें हें योग्य आहे; ह्मणून आह्मी त्या संकटांत पडलेल्या राजांना सोडवून तुला मारण्यासाठीं येथें आलों आहों. क्षत्रियांमध्यें माझ्या तोडीचा कोणी नाहीं, अशी तुला घमेंड असेल तर तुझी मोठी चूक आहे. रणयज्ञाची दीक्षा घेतलेले क्षत्रिय स्वर्ग मिळवून आणखीही अनेक श्रेष्ठ

लोक मिळवितात. शक्ति ही सर्वांच्याच ठिकाणीं कमी अधिक वसत आहे. तुझ्या तोडीचे अगर तुझ्याहून श्रेष्ठ अनेक वीर निघतील. जोंपर्यंत ते बाहेर पडले नाहींत तोंपर्यंतच ह्या तुझ्या वल्गना. तुझ्याशीं आम्ही युद्ध करूं इच्छितों. मी तुझा वैरी कृष्ण असून हे दोन नरवीर भीमार्जुन आहेत. आम्ही तुला युद्धाला बोलावीत आहों. आम्हापुढें उभा राहून युद्ध कर अगर बंदिवान केलेल्या सर्व राजांना सोडून दे.' जरासंध म्हणाला, 'बळी देण्याच्या उद्देशानें त्यांना येथें आणून आतां केवळ भीतीनें क्षात्रधर्म बाजूला ठेवून मी त्यांना सोडून देईन असें तुला वाटतें काय? तुमची मर्जी असेल त्याप्रमाणें युद्ध करण्याला मी सिद्ध आहें.' हे जरासंधाचें भाषण ऐकून तो मधूंना अवध्य आहे हें ब्रह्मलिखित लक्ष्यांत आणून आपण स्वतः जरासंधाला मारण्याचा विचार बाजूला ठेवून 'आम्हा तिघांपैकीं कोणाशीं युद्ध करण्याची तुझी इच्छा आहे,' असें कृष्णानें त्याला विचारिलें. तेव्हां जरासंधानें भीमाशीं युद्ध करण्याची आपली इच्छा दर्शविली, व तो क्षात्रधर्माला अनुसरून युद्धाला तयार झाला. किरीट काढून ठेंवून केस चांगले बांधून तो भीमावर चालून आला. इकडे भीमही श्रीकृष्णाची आज्ञा घेऊन युद्ध करण्याच्या उत्कट इच्छेनें जरासंधावर चालून गेला. ते दोघे ईर्षेला पेटून हातांत हात घालून सलामी देऊन युद्धाला तयार झाले. हातमुरड करून खोच देण्याचा त्यांनीं प्रयत्न केला व धक्का देऊन भूमि हादरून सोडिली. त्यांनीं एकमेकांच्या मानगुटी धरण्याचा प्रयत्न केला. एकमेकांवर मुष्टिप्रहार केले. अंगाला अंग वरचेवर घासटून चित्रहस्तादिक पेच करून त्यांनीं एकमेकांच्या कमरेला मिठी मारिली. पुढें, मागें, वर, खालीं, ह्याप्रमाणें नानाविध रीतींनीं हात चाळवून एकमेकांना आवळण्याची त्यांनीं खटपट चालविली. मानेवर मान व डोक्या-

वर डोकें आपटलें जात असतां त्यांच्या घर्षणापासून विद्युल्लतेच्या ठिणग्यांप्रमाणें अग्निकण उत्पन्न होत होते. मर्मस्थळाला जाऊन भिनतील असे एकमेकांना लत्ताप्रहार करीत भक्कम मुष्टींनीं ते एकमेकांच्या छातीवर गुद्दे मारीत. आयुधांच्या ऐवजीं बाहूंचा उपयोग करून मेघाप्रमाणें गर्जना करीत दोन मत्त गज ज्याप्रमाणें एकमेकांना सोंडेनें प्रहार करतात त्याप्रमाणें ते एकमेकांना प्रहार करीत होते. दोघेही बलाढ्य असून दोघांनाही ह्या प्रसंगामध्यें आनंद होत होता. ते एकमेकांना पाडण्याची संधि पहात होते. कार्तिकी प्रतिपदेपासून त्रयोदशीपर्यंत हें त्यांचें युद्ध कांहीं खळ न पडतां चालून चतुर्दशीच्या दिवशीं रात्रीं जरासंधाला दमलेला पाहून कृष्णानें त्याची लवकर वाट लावण्यास भीमाला अप्रत्यक्ष रीतीनें इषारत दिली. तेव्हां जरासंधाकडे दृष्टि लावून त्याला ठार करण्याची हीच वेळ असें जाणून भीमानें त्याच्या मांड्यांना धरून त्याला गरगरां फिरवून त्याची गठडी वळून त्याला पायांखालीं तुडविलें व त्याच्या पाठीचें हाडनहाड चिरडून टाकिलें; व त्याला उभा चिरून त्यानें मोठ्यानें गर्जना केली. याप्रमाणें जरासंध मरतांच सर्व मगधदेशाचे लोक घाबरून गेले. नंतर राजद्वारीं त्या शवाला टाकून देऊन सर्व बंदिवान राजांना मोकळे करून ते तिघे जरासंधाचा मोठा रथ जुंपून परत जाण्यास निघाले. नगराबाहेर पडल्यावर बंधमुक्त केलेले राजे त्यांना भेटण्याला येऊन जरासंधरूपी कांटा नाहींसा केल्याबद्दल त्यांची वाहवा करून त्या तिघांचा त्यांनीं सत्कार केला. ते ह्मणाले, ‘ प्रेमानें आम्हाला तुम्ही जखडून टाकिलें आहे. आह्मी तुमच्या सेवेला हजर आहों. ’ हें ऐकून कृष्ण म्हणाला, ‘ राजा युधिष्ठिर राजसूय यज्ञ करूं इच्छीत आहे. धर्मानें सर्व राजांवर श्रेष्ठत्व मिळवूं इच्छिणाऱ्या त्या राजाचें तुम्ही साहाय्य करा. त्यांनीं

बरें ह्मणून यज्ञाला आपली अनुमति दिली. नंतर कृष्ण पुष्कळ संपत्ति घेऊन भीमार्जुनासह इंद्रप्रस्थाला आला व ती सर्व संपत्ति युधिष्ठिराच्या पायांवर ठेवून झालेला सर्व वृत्तांत त्यांनीं त्याला कळविला.

राजसूययज्ञ.

नंतर राजसूय यज्ञापूर्वीं युधिष्ठिराची आज्ञा घेऊन भीम, अर्जुन नकुल व सहदेव हे क्रमानें पूर्व, उत्तर, दक्षिण व पश्चिम दिशांना दिग्विजय करण्यासाठीं सैन्यासहवर्तमान बाहेर पडून त्यांनीं चारी दिशांच्या राजांना जिंकून यज्ञासाठीं पुष्कळ करभार आणिला. पुढें युधिष्ठिर भावांसहवर्तमान राजसूयाच्या तयारीला लागला, व त्या यज्ञासाठीं ब्राह्मण व धौम्य सांगतील तीं सर्व यज्ञसाधनें बराबर तयार ठेवण्यास त्यानें वीरश्रेष्ठ सहदेवाला आणि मंत्रिवर्गाला आज्ञा दिली. इंद्रसेन, विशोक व पूर यांच्याकडे अन्नाचा पुरवठा करण्याचें काम सोपविलें होतें. ऋत्विक्स्थानीं बसण्याकरितां प्रत्यक्ष वेदमूर्ति असे ब्राह्मण व्यासांनीं मिळविले, व स्वतः त्यांनीं ब्रह्मत्व पतकरिलें. धनंजय कुलांतील सुसामन् हे सामवेद म्हणण्याला आले होते.याज्ञवल्क्य अध्वर्यु होते. पैल व धौम्य हे दोघे होतृस्थानीं होते. यांचे पुत्रवर्ग व शिष्यवर्ग होतृक (होत्याचे मदतनीस) होते. पुण्याहवाचन केल्यावर शास्त्रोक्त विधीनें त्यांनीं भव्य यज्ञमंडपाच्या जागेची पूजा केली. दैत्यांचा शिल्पकार जो मय त्यानें तो अप्रातिम यज्ञमंडप तयार केला. तशाच उत्तम प्रकारच्या होमशाला वगैरे त्या ठिकाणीं तयार करण्यांत आल्या. नंतर ब्राह्मण, राजे, वैश्य व ठळक ठळक शूद्र ह्यांना निमंत्रण देण्यासाठीं सहदेवानें दूत पाठविले. इकडे ब्राह्मणांनीं युधिष्ठिराला राजसूय यज्ञाची दीक्षा दिली. यज्ञमंडपांत

नानादेशांतील सकल विद्यासंपन्न ब्राह्मण, राजे, वैश्य व शूद्र यज्ञासाठीं जमले होते. त्यांच्यासाठीं अन्नवस्त्रांनीं पूर्ण अशा राहण्यासाठीं जागा तयार केल्या होत्या. ' या, खा, ' अशाच प्रकारचे शब्द नित्य जिकडे तिकडे ऐकूं येत होते. नंतर यज्ञ सुरू झाला. पुढें युधिष्ठिरानें भीष्म, द्रोण, धृतराष्ट्र, विदुर व आपले प्रिय बंधुवर्ग ह्यांना निमंत्रण देण्यासाठीं नकुलाला हास्तिनापुरास पाठविलें. शकुनि, कर्ण इत्यादि आप्त बांधवांसहवर्तमान ते नानाप्रकारचीं मौल्यवान् रत्नें घेऊन यज्ञ पहाण्यासाठीं आले. त्याचप्रमाणें दुसरेही अनेक राजे व राजपुत्र तो यज्ञ व तो अप्रतिम यज्ञमंडप पहाण्याच्या इच्छेनें इंद्रप्रस्थाला आले होते. धर्मराजानें त्या सर्वांचा सत्कार करून त्यांना निरनिराळ्या ठिकाणीं रहाण्यास जागा दिल्या. जिकडे तिकडे फुलें पसरिलीं असून चंदन व अगरू यांचा घमघमाट चालला होता. चंद्राप्रमाणें पांढऱ्या शुभ्र हवेल्या अनेक कोस लांब पसरल्या होत्या. त्यांचीं दारें एकसारखीं रांगेनें लागून राहिलीं होतीं. ब्राह्मण व राजमंडळ ह्यांनीं गजबजलेल्या त्या यज्ञमंडपाला स्वर्गाची शोभा आली होती. यज्ञारंभीं भीष्म व गुरुजन यांकडे जाऊन त्यांना अभिवादन करून युधिष्ठिर म्हणाला, ' आपला सर्वांचा मजवर अनुग्रह व्हावा, ही माझी सर्व संपत्ति आपली आहे. आपणा सर्वांचीं आज्ञा मला शिरसा मान्य आहे. ' असें म्हणून त्या सर्वांना त्यांच्या योग्यतेनुरूप त्यानें कामें नेमून दिलीं. खाण्यापिण्याच्या व्यवस्थेकडे दुःशासनाची योजना केली. ब्राह्मणांचा सत्कार करण्याचें काम अश्वत्थाम्याकडे सोपविलें. राजांचा मानमरातब राखण्यासाठीं संजयाची योजना केली. यज्ञांतील बरें वाईट कर्म पहाण्याकडे लक्ष्य ठेवण्याचें काम भीष्मद्रोणांकडे होते. हिरे, माणकें, सोनें व मोतीं कृपाचार्यांच्या ताब्यांत दिलीं असून तीं ब्राह्मणांना वा-

टण्याची कामगिरीही त्यांच्याकडेच होती. खर्चाचें काम विदुरांकडे असून लोकांचे नजराणे घेण्याचें काम दुर्योधनाकडे होतें. यज्ञापैकीं उत्तम फल आपल्याला मिळावें म्हणून ब्राह्मणांचे पाय धुण्याचें काम श्रीकृष्णानें आपण होऊन आपल्याकडे घेतलें होतें. आपण दिलेलें द्रव्य यज्ञ शेवटास नेण्यास युधिष्ठिराच्या उपयोगीं पडावें असें सर्व राजांना वाटून ते चढाओढीनें त्याला द्रव्य आणून देत होते. विपुल द्रव्य वेचून युधिष्ठिरानें षडग्नियुक्त यज्ञ केला. त्या ठिकाणीं जमलेल्या सर्व जनांची इच्छा पूर्ण करून सर्वांना त्यानें संतुष्ट केलें. अन्न, द्रव्य व रत्नें यथेच्छ वाटलीं गेल्यामुळें त्या ठिकाणीं कोणाची कांहीं इच्छा अपुरी राहिली नाहीं. श्रुति, मंत्र व शिक्षा ह्यांमध्यें निष्णात अशा ब्राह्मणांनीं दिलेल्या घृतादिकांच्या आहुतींनीं देव तृप्त झाले. विपुल दक्षिणेच्या योगानें ब्राह्मणांची तृप्ति झाली. सारांश सर्व वर्णांचे लोक त्या यज्ञामध्यें मोठ्या आनंदांत होते. तो यज्ञ संपण्याच्या दिवशीं धर्मराजावर यज्ञाचें पवित्र तीर्थ शिंपडण्यासाठीं नारदप्रभृति महान् महान् ऋषि व मोठमोठे राजे वेदींत शिरले. कर्म चाललें असतां फुरसुतीच्या वेळीं ‘ हें असेंच असलें पाहिजे, हें तसें असणें शक्य नाहीं, ’ इत्यादि ब्राह्मणांचे वितंडवाद सुरू होते. त्यांमध्यें कांहीं वादांत निष्णात होते ते आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर न्यूनपक्ष सप्रमाण सिद्ध करून दाखविण्याला व कित्येक सप्रमाण गोष्टींत न्यूनता दाखविण्याला पहात होते. नंतर भीष्मांच्या सांगण्यावरून तेथें जमलेल्या मंडळीची संभावना सुरू झाली. प्रथम सर्वश्रेष्ठ कृष्णाची संभावना झाली. ती शिशुपालाला सहन न होऊन तो गुरकावूं लागून तंट्याला उभा राहिला. तेव्हां दोघांचें युद्ध जुंपून श्रीकृष्णानें युद्धांत त्याला ठार केलें.

दुर्योधनाचा मत्सर.

राजसूययज्ञ संपल्यावर दुर्योधन शकुनीबरोबर त्या अलौकिक मयसभेचें वैभव पहात फिरत असतां कोठें पाणी म्हणून कपडे सावरून जपून चालूं लागे तों तो धाडकन् खालीं आपटे. कोठें जमीन म्हणून निर्धास्त चालला असतां पाण्यांत पडून त्याचें कपडे भिजत. कोठें दार म्हणून आंत शिरूं लागे तों भिंतीला कपाळ आपटून टेंगूळ येई. याप्रमाणें फजीत पावून खजील होऊन तो हास्तिनापुराला परत आला. युधिष्ठिराचा तो भव्य यज्ञ व त्याचें तें थोर वैभव मनांत आणून तो झुरणीला लागला. पुढें शकुनीच्या विचारानें द्यूतांत त्यांना पूर्ण बुचाडून वनाला पाठवून देण्याचा त्यानें बेत केला. ही गोष्ट धृतराष्ट्राच्या कानावर गेली, तेव्हां ती त्याला आवडली नाहीं. तो दुर्योधनाला म्हणाला, 'आपल्या बलशाली भावांशीं असा द्वेष करणें चांगलें नव्हे. तुला कांहीं कमी नाहीं. हा द्यूताचा विचार सोडून दे. द्यूतामुळें तुह्मामध्यें फूट पडण्याचा संभव आहे व फुटीच्या योगानें राज्याला धक्का बसेल. वडिलांनीं मुलासाठीं जें करणें शक्य आहे तें सर्व मीं तुझ्यासाठीं केलें आहे. वडिलोपार्जित ही गादी तुला मिळवून दिली आहे. तूं नशीबवान आहेस. सामान्य लोकांना मिळण्याला कठीण असें अन्नवस्त्र तुला मिळतें आहे. मग हा वृथा संताप कां ?' हें ऐकून दुर्योधन म्हणाला, 'मला अन्नवस्त्र मिळतें हा विचार मनांत आणून जो क्षुद्र मनुष्य समाधान मानून राहतो, तो अगदीं नीच समजला पाहिजे. माझ्या एवढी किंबहुना माझ्याहून अधिक चुलत भावांची संपत्ति पाहून माझ्या जिवाला कसें बरें वाटेल ? हरिश्चंद्रासारखें त्यांचें तें वैभव पाहून आम्ही सुखी असें आपल्याला कसें वाटतें ?' धृतराष्ट्र म्हणाला, 'पण पांडवांचा वृथा द्वेष करूं नकोस. ज्याचा मत्सरी स्वभाव आहे त्याला कधीं

सुख न होतां त्याचा नाश होतो. ज्याला कपट म्हणून माहीत नाहीं व ज्याची संपत्ति तुझ्या एवढीच आहे, अशा सर्वांशीं गोडीनें वागणाऱ्या युधिष्ठिराचा तुझ्यासारख्यांनीं हेवा करावा ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे. तेव्हां असें करूं नकोस. विनाकारण मनाला संताप करून घेऊं नकोस. दुसऱ्याच्या पैशावर डोळा ठेवणें हें भल्याचें काम नाहीं. आपल्याजवळ आहे तेवढ्यामध्यें जो संतुष्ट रहातो त्याला सुख मिळतें. मित्रद्रोहापासून अनेक मोठे अनर्थ ओढवतात.' दुर्योधन म्हणाला, 'स्वतःला अक्कल नसून जो केवळ बहुश्रुत आहे त्याला शास्त्राचें खरें रहस्य मुळींच समजत नाहीं. आपण उगीच मोहामध्यें पडलां आहां व आम्हालाही त्यांत पाडीत आहां. आम्हाला आपल्या सारखे उपदेष्टे मिळाल्यावर आमचा नाश होण्याला मुळींच वेळ लागणार नाहीं. जें आतां केलें पाहिजे तें पुढें कालांतरानें आपोआप घडून येईल असें आपलें नेहमीं म्हणणें असतें. ज्याचा पुढारी दुसऱ्यांच्या ओंजळीनें पाणी पिणारा असतो तो स्वतः भलत्या मार्गाला लागून आपल्याबरोबर असणारांनाही आपल्याबरोबर खड्ड्यांत पाडतो. आम्ही आपलें कर्तव्य करण्याला निघालों असतां आम्हाला उगीच असे मोहांत कां पाडतां? लोकवृत्ताहून राजवृत्त अगदीं निराळें आहे, असें प्रत्यक्ष बृहस्पतीचें म्हणणें आहे. म्हणून राजानें नेहमीं दक्षतेनें स्वार्थाचा विचार करीत असावें. जय मिळविणें हेंच क्षत्रियांचें पहिलें कर्तव्य आहे. मग या स्ववृत्तीसंबंधानें विचार तो कसला करावयाचा? गूढ किंवा उघड ज्या कांहीं उपायांची शत्रूवर मात्रा चालते तेच उपाय हें शास्त्रज्ञांचें शस्त्र होय. केवळ शत्रूला कापून काढणाऱ्या शस्त्रालाच शस्त्र हें नांव नाहीं. शत्रु व मित्र याच्या संबंधानें गुणावगुण किंवा लहानथोरपणा मनांत आणतां कामा नये. कोणी कोणाचा जात्या शत्रु नसतो. जो ज्याला

ताप देतों तोच त्याचा शत्रु समजला जातो. अभ्युदयासाठीं जो झटतो तोच मोठा लौकिक मिळवितो.' धृतराष्ट्र म्हणाला, 'बलवानाबरोबर भांडणें मला बरें दिसत नाहीं. वैरापासून वैमनस्य उत्पन्न होऊन तेंच अनायासें नाशाला कारण होतें. ही अनर्थमूलक गोष्ट हिताची समजून भांडणाला तूं मूळ करून ठेवीत आहेस. यापासून पुढें घोर प्रसंग ओढवण्याचा संभव आहे.' इतका धृतराष्ट्रानें उपदेश केला तरी तो दुर्योधनाला न पटतां तो आपला हट्ट सोडीना; म्हणून धृतराष्ट्रानें निरुपाय होऊन त्याला आपली संमति दिली व पांडवांना घेऊन येण्यासाठीं त्यानें विदुरांना इंद्रप्रस्थाला पाठविलें.

द्यूत.

इंद्रप्रस्थाला जाऊन धृतराष्ट्राचा निरोप विदुरांनीं युधिष्ठिराला कळविला असतां युधिष्ठिरानें त्याच्या युक्तायुक्ततेसंबंधानें त्यांनाच सल्ला विचारिला; तेव्हां विदुर म्हणाले, 'द्यूत हें अनर्थाला मूळ आहे हें जाणून धृतराष्ट्राचें मन त्यापासून फिरविण्याचा माझ्या हातून होईल तेवढा यत्न मीं केला. राजानें मला तुझ्याकडे पाठविलें आहे. त्या ठिकाणीं ज्याचे फासे अगदीं हुकमी आहेत असा वाटेल तो पण लावून द्यूत खेळणारा शकुनि व दुसरे पुष्कळ द्यूतपटु भामटे हजर आहेत; हें लक्ष्यांत घेऊन तुला जसें योग्य वाटेल तसें कर.' युधिष्ठिर ह्मणाला, 'मला स्वतःला द्यूत नको आहे. पण कोणीं बोलाविलें असतां मागें घ्यावयाचें नाहीं हा माझा नियम आहे.' असें ह्मणून भाऊ, द्रौपदी व नोकरलोक यांसह त्यानें निघण्याची तयारी केली. दैव हें मनुष्याच्या बुद्धीला भ्रम पाडून एखाद्याला मुसक्या बांधलेल्या मनुष्याप्रमाणें काळाच्या तावडींत नेतें. म्हणूनच धृतराष्ट्राच्या बोलाव-

ण्याला मान देऊन दैवलिखित टाळतां येत नाहीं हें खरें करून दाखविण्यासाठीं युधिष्ठिर निघाला. हास्तिनापुराला येऊन त्यानें सर्वांची भेट घेतली. राजानें त्याचा बहुमान केला. व्यायामादि आपलीं रोजचीं सर्व कामें आटोपून मंगलस्नान करून पूजादिकानंतर सुग्रास अन्न घेऊन तांबूलादि पदार्थ सेवन केल्यावर त्यांनीं विसावा घेतला. दुसरे दिवशीं सभेमध्यें येऊन त्या ठिकाणीं यथाक्रमानें असनावर बसल्यावर शकुनीनें युधिष्ठिराला द्यूताला बोलाविलें. द्यूताचें निमंत्रण झालें असतां नाहीं ह्मणावयाचें नाहीं असा युधिष्ठिराचा नियम असल्यानें तो पण लावून द्यूत खेळण्याला तयार झाला; व पणांत, राज्य, भाऊ या सर्वांना हरल्यावर द्रौपदीला पणाला लावून त्यांतही तो हरला. ह्याप्रमाणें पांडवांचें सर्वस्व लुबाडण्यासाठीं हें घोर द्यूत चालू असतां विदुर धृतराष्ट्राला म्हणाले, 'राजा, डोळे उघड. मरावयाला टेकलेल्या मनुष्याला ज्याप्रमाणें औषध गोड लागत नाहीं. त्याप्रमाणें माझें हितकर भाषण तुला गोड वाटत नाहीं. तरीपण मी सांगतों ऐक. ह्या दुष्ट दुर्योधनानें जन्मल्याबरोबर कोल्ह्याप्रमाणें शब्द केला होता, हें तुला ठाऊक आहेच. तो हा अशुभसूचक, कुलविनाशी व कालरूपी मुलगा तुझ्या मुळावर आला आहे. दुर्योधनरूपानें घरांत शिरलेल्या ह्या कोल्ह्याला तूं अज्ञानामुळें ओळखत नाहींस. मध गोळा करणारा जसा पुढचा परिणाम न पाहातां मधाच्या आशेनें झाडावर चढून खालीं पडून सर्वस्वी नाश पावतो, त्याप्रमाणें ह्याचें अक्षद्यूतानें डोळे धुंद होऊन ह्या महारथ पांडवांबरोबर हा वैर बांधीत आहे. ह्यावरून ह्याचा सर्वस्वी नाश खास होणार. भोज देशामध्यें दुष्ट कंस जन्मला. त्याला ज्ञातींच्या सांगण्यावरून पौराच्या कल्याणाकरितां कृष्णानें ठार मारिलें, हें तुला ठाऊकच आहे. त्याप्रमाणें तुझ्या सांगण्यावरून

अर्जुनानें दुर्योधनाची खोड मोडिली तर तुझें बांधव शंभर वर्षें सुखानें राहातील. एका कोल्ह्याचा मोबदला करून हे पांच वाघ विकत घे. उगीच शोकसागरामध्यें बुडूं नकोस. कोणी एक राजा सोन्याच्या लोभानें तोंडांतून सुवर्ण टाकणाऱ्या कांहीं वनवासी पक्ष्यांना घरीं घेऊन आला; व अति लोभानें त्यानें त्यांना ठार मारिलें. त्यामुळें पळत्याला मुकून वर हातच्यालाही तो मुकला. त्याप्रमाणें द्रव्यलोभानें तूं पांडवांचा द्वेष केलास तर तुझा सर्वस्वी नाश होऊन मागून तुला पश्चात्ताप होईल. माळी ज्याप्रमाणें बहाराच्या वेळीं बहार येईल तसतशीं फुलें तोडतो, त्याप्रमाणें पांडवांच्या अभ्युदयापासून तूं आपला फायदा करून घे. ह्या अप्रबुद्धाच्या नादीं लागून आगींत उडी घेणें तुला शोभत नाहीं. हा द्यूतमद उतरल्यावर पांडव ज्यावेळीं खवळतील तेव्हां त्या बिकट प्रसंगीं तुम्हाला मग याचें सुख कळून येईल. तुजपाशीं जी विपुल संपत्ति आहे त्याहून अधिक संपत्ति पांडवांपासून बुचाडण्याची हाव उगीच कशाला पाहिजे. पांडवरूपी धनच मिळविण्याला झट. हा शकुनि कपटद्यूतांत फार हुषार आहे हें आम्हाला ठाऊक आहे. ह्या राजगृहांत शिरलेल्या कवड्याला आला तसा परत हाकलून लाव.' यावर दुर्योधन म्हणाला, 'आपण सदा आमची निंदा करून शत्रूच्या गुणांचे पोवाडे गात असतां. आपला ओढा कोणीकडे आहे हें मी जाणतों. आम्हाला पोरें समजून नेहमीं आपण तुच्छ करतां. आपली जीभच आपलें हृदय उघडें करून दाखवीत आहे. सर्पाप्रमाणें आह्मी उगीच आपल्याला दूध पाजून मांडीवर थोपटीत आहों. आपल्या दुष्टपणाचा संशयच उरला नाहीं. लोकांनीं स्वामिघातक ह्मणूं नये एवढ्याची तरी लाज बाळगा. शत्रूला हिताच्या गोष्टी सांगण्याकडे नेहमीं आपलें लक्ष्य

असल्यामुळें आमचे विचार व आमचीं कृत्यें आपल्याला नेहमीं वाईट दिसतात. लावून बोलणारा मनुष्य आपल्याला द्वेषाला मात्र पात्र करून घेतो. मनुष्यानें शत्रूची कितीही स्तुति केली तरी त्यामध्यें स्वपक्षाची निंदा नसावी. आपण तर निर्लज्जपणें आम्हाला मनःपूत टाकून बोलतां. राजश्री, असें आम्हाला तुच्छ करूं नका. आम्ही आपल्याला पुरे ओळखून आहों. मीच काय तो कर्ता व शहाणा असा वृथाभिमान सोडून द्या. आमचें हित आम्ही आपल्याला विचारावयाला आलों नाहीं. आम्ही मुकाट्यानें सहन करतों म्हणून वाटेल तसें आह्माला टाकून बोलूं नका.' विदुर ह्मणाले, 'मंदबुद्धे, स्वतःला शहाणा समजून तूं मला पोर समजतोस अं ? जो प्रथम एखाद्याशीं सख्य करून मागून त्याला दूषण देतो त्यालाच पोर समजलें पाहिजे. माझा उपदेश तुला मूढाला रुचत नाहीं. विचित्रवीर्याचें व त्याच्या पुत्रपौत्रांचें यश व संपत्ति कायम रहावी अशी माझी इच्छा आहे; ती ज्याच्या योगानें सफल होईल अशा प्रकारें वाग म्हणजे झालें. यावर मी कांहीं सांगत नाहीं. मूर्खाला खवळविण्यांत कांहीं अर्थ नाहीं.' इकडे सर्वस्व जिंकल्यावर द्रौपदीला पणाला लावून युधिष्ठिर त्यांतही हरला असतां तेथें असलेल्या संभावितांच्या तोंडांतून एकदम 'धिक्कार! धिक्कार!' असे उद्गार निघून जिकडे तिकडे चळवळ उडून राहिली. राजांना वाईट वाटलें. भीष्म, द्रोण, कृपादिकांच्या अंगांतून दरदरून घाम आला. विदुरांना तर मेल्यासारखें होऊन त्यांनीं डोकें हातावर टेकिलें व दीर्घोच्छ्वास सोडून खालीं तोंड घातलें.

द्रौपदीचे धिंडवडे.

द्रौपदीला पणांत हरल्यावर 'पांडवांची लाडकी बायको आतां सभेंत येऊन आमची दासी होऊं द्या,' म्हणून दुर्योधन वि-

दुरांना लावून बोलला असतां ते म्हणाले, ' अशा दुर्भाषणानें तूं आपल्याला वैररूपपाशांनीं अधिकच जखडून घेत आहेस. मोठा विषारी साप तुझ्या डोक्यावर पडून तूं फुकट मरणार आहेस हें तुला अद्यापि कोठें कळलें आहे ? द्रौपदी कशाची तुझी दासी होते ? तुलाच तिचा दास व्हावें लागेल!' या त्यांच्या भाषणाकडे दुर्लक्ष्य करून दुर्योधनानें दुःशासनाला द्रौपदीस सभेंत आणण्यास सांगितलें. त्याबरोबर तो द्रौपदीकडे जाऊन म्हणाला, ' द्यूतांत अंध झालेल्या युधिष्ठिरापासून दुर्योधनानें तुला जिंकिलें आहे, म्हणून मी आलों आहे. ' द्रौपदी म्हणाली, ' सुखदुःखांनीं शहाण्यांना किंवा मूर्खांना कधीं सोडिलें आहे असें नाहीं. ह्या जगांत धर्म हाच कायतो श्रेष्ठ आहे. तो यथान्याय पाळला तरच खरें हित साधत असतें. ह्यासाठींच कौरवांनीं धर्माला झुगारून देऊं नये. ' हें ऐकून, ती अस्पर्श असून एकवस्त्रानिशीं होती तरी, त्या नराधमानें धावून जाऊन तिच्या लांबसडक व काळ्याभोर केसांना धरून तिला भर सभेंमध्यें फरफरां ओढीत नेलें. ' मी रजस्वला आहें, एका वस्त्रानिशीं मला अशी सभेंत ओढून नेऊं नकोस, ' म्हणून ती दया भाकीत असतां ' संकटांतून सोडविण्यासाठीं कृष्णाला हाक मार, तूं आतां आमची दासी आहेस, ' असें हासत हासत तो तिला म्हणाला. तेव्हां लज्जेनें व रागानें लाल होऊन ती म्हणाली, ' असें करणें भल्यांना शोभत नाहीं, मला अशी फरफरां ओढूं नकोस. इतके वीर येथें जमले असून ह्या निंद्य कृत्याबद्दल कोणालाच कां कांहीं त्वेष येत नाहीं ? धिक्कार असो या सभेला! भारतांच्या धर्माला व चालीरीतीला आज हरताळ लागला असें मला वाटतें. भरसभेमध्यें आर्यधर्माची मर्यादा उल्लंघन होत असतां हे मुकाट्यानें पहात बसले आहेत, अं! कुरुवृद्धांचें देखील तेज आज कोठें लपलें मला कळत नाहीं ! '

ह्याप्रमाणें करुणा भाकीत दीन मुद्रेनें पांडवांकडे पहात असतां आपल्या कटाक्षांनीं पांडवांचा क्रोधाग्नि तिनें अधिकच पेटविला. ह्याप्रमाणें दीन होऊन पतींकडे केविलवाण्या मुद्रेनें ती पहात असतां ' दासी, दासी, ' म्हणून दुःशासन, कर्ण, शकुनि यांनीं तिला हाक मारिली. दुःशासन वस्त्र फेडीत असल्यामुळें जिचा संतापाग्नि भडकून राहिला होता, त्या द्रौपदीकडे आणि त्याचप्रमाणें युधिष्ठिराकडे पाहून भीम संतापून जाऊन म्हणाला, 'घरीं राखलेल्या बटकींना देखील जुगारबाज पणाला लावीत नाहींत व आपण तर आपल्या बायकोला पणाला लावून तिचे याप्रमाणें चाललेले धिंडवडे असें डोळ्यानें पहात आहां ! पांडवांशीं लग्न करून ह्या बिचारीला हे क्लेश सोसावे लागत आहेत ! हे आपले जुगारी हात आगींत जळून कां नाहीं गेले ! ' असें भीम धर्मराजाला टाकून बोलत असतां ' वडील भावाला असें टाकून बोलूं नकोस, ' म्हणून अर्जुनानें त्याला निवारिलें. द्रौपदीचे ते हाल चाललेले पाहून व कोणी कांहीं बोलत नाहींसें पाहून हात चोळीत विकर्ण म्हणाला, ' सर्वजण असे मुकाट्यानें बसलां आहां हें चांगलें नव्हे. मला जें न्यायाचें दिसतें तें मी सांगतों. मृगया, मद्यपान, द्यूतकर्म व विषयासक्ति हीं चार राजामध्यें व्यसनें गणलीं जातात. मनुष्य यांच्या नादीं लागला कीं, धर्माला सोडून त्याचें पाऊल वाकडें पडूं लागतें. ह्या पांडुपुत्राला द्यूतकारांनीं मुद्दाम बोलावून आणून द्रौपदीला पणास लावण्याला लाविलें. शिवाय सर्व पांडवांची ही बायको असून द्यूतांत प्रथम स्वतः हरलेल्या ह्या युधिष्ठिरानें तिला शकुनीच्या सूचनेवरून मागून पणाला लाविलें. ह्या सर्व गोष्टी लक्ष्यांत आणतां हिला पणाला लावण्याचा अधिकारच युधिष्ठिराला नाहीं. ' जसें जसें दुःशासन तिचें वस्त्र फेडूं लागला तसें तसें तशाच प्रकारचें दुसरें वस्त्र तिच्या अंगावर दिसूं लाग-

लें. तो चमत्कार पाहून सभ्यांनीं दुःशासनाची निर्भर्त्सना करून द्रौपदीची प्रशंसा केली. हा सर्व प्रकार चालला असतां संतापानें ओठ थरथरां कांपवीत भीम हात चोळीत होता. मोठ्यानें ओरडून तेथें जमलेल्या सर्व राजांसमक्ष ' ह्या दुर्बुद्धि, पापी, भरतकुलाला कलंक लावणाऱ्या अधमाचा ऊर फोडून मी जर याचें रक्त प्यालों नाहीं तर मला कधीं उत्तम गति मिळणार नाहीं, ' अशी त्यानें घोर प्रतिज्ञा केली. सभेमध्यें वस्त्रांचा ढीग पडला तरी द्रौपदी वस्त्रहीन होईना हें पाहून दुःशासनाचा हिरमोड होऊन वस्त्रें फेडण्याचें काम त्यानें बंद केलें. पुढें ' या दासीला दुर्योधनाच्या वाड्यांत घेऊन जा, ' असें ह्मणून कर्णानें तिला हिसडा दिला असतां कष्टी होऊन द्रौपदी रडूं लागली. ती म्हणाली, 'स्वयंवर झाल्यापासून आजपर्यंत जी मी कोणाच्या दृष्टीस देखील पडलें नाहीं, त्या माझी भरसभेमध्यें अशी विटंबना व्हावी हें केवढें दुर्दैव ! काळच फिरला त्याला हे तरी काय करतील ? आज ह्या राजांचा धर्म तरी कोठें लपला कळत नाहीं. पुरातन भारतधर्म कौरवांना सोडून गेला आहे. मी पांडवांची धर्मपत्नी व कृष्णाची बहीण आहें, एवढें मला ठाऊक आहे. मी कोणाची दासी असल्याचें मला ठाऊक नाहीं. हा नराधम मला फार पीडा देत आहे. माझ्यानें हे हाल आतां सोसवत नाहींत.' भीष्म म्हणाले,'कल्याणि, धर्माची गति फार गहन असून शहाण्यांना देखील ती कळत नाहीं. ह्या जगांत बलाढ्य मनुष्य ज्याला धर्म ह्मणतो तो अधर्म असला तरी धर्म ठरतो, व दुर्बल मनुष्यानें सांगितलेला धर्म खरा असला तरी त्याला कोणी विचारीत नाहीं. हा तुझा प्रश्न फार बिकट व सूक्ष्म असल्यामुळें कार्यगौरव मनांत आणून त्याचा निवाडा आह्माला देतां येत नाहीं. एकंदरीनें ह्या कुरुकुलाचा अंतकाल अगदीं जवळ आला आहे एवढें खास आहे; आणि म्हणू-

नच हे अशीं अनान्वित कृत्यें करण्याला तयार झाले आहेत. हा द्यूताचा कळस, भरसभेमध्यें झालेली स्त्रीची अशा प्रकारची विटंबना व पांडवांशीं अशाप्रकारचें अन्यायाचें वर्तन, ह्या सर्वांमुळें कौरवांवर मोठें भयंकर संकट येणार आहे. ' याप्रमाणें इकडे प्रकार चालला असतां धृतराष्ट्राच्या होमशाळेंत कोल्ह्यांचा शब्द होऊन गाढवांनीं त्याला प्रतिशब्द दिला. हें दुश्चिन्ह पाहून धृतराष्ट्र घाबरून ह्मणाला, ' हे मंदबुद्धे दुर्योधना, द्रौपदीसारख्या स्त्रीला भरसभेमध्यें टाकून बोलून तूं आपला सर्वस्वी घात मात्र करून घेत आहेस. ' असें ह्मणून ' मी तुझ्यावर संतुष्ट आहें, वर माग, ' असें तो द्रौपदीला ह्मणाला. ' आपण मला वर देत असाल तर श्रीमान् पांडवांना मोकळे करा, ' असा तिनें वर मागितला. तें ऐकून धृतराष्ट्रानें सर्वांना दास्यांतून मुक्त केलें आणि तो युधिष्ठिराला ह्मणाला, ' ज्या ठिकाणीं बुद्धि आहे त्याच ठिकाणीं शांति असणार. शांत हो. ज्यांना वैर कधीं ठाऊक नसून जे दुसऱ्यांचे गुण तेवढे घेऊन त्यांच्या दुर्गुणांकडे दुर्लक्ष्य करतात तेच उत्तम पुरुष समजले पाहिजेत. सज्जनांची सर्व खटपट दुसऱ्याच्या हितासाठीं असून प्रत्युपकाराची ते परवा ठेवीत नाहींत. जे अधम असतात ते मात्र भाषणांत कटुशब्दांचा उपयोग करतात. पण जे उत्तम पुरुष असतात त्यांना कोणीं कसेंही चिडविलें तरी त्यांच्या तोंडांतून निष्ठुर शब्द कधीं निघत नाहींत. ते आपल्यावरून जगाची पारख करून थोरांनीं घालून दिलेली मर्यादा न सोडतां सर्वांशीं गोड असतात. ह्या सभेमध्यें तुझें वर्तन असेंच थोरपणाचें झालें आहे. वत्सा युधिष्ठिरा, दुर्योधनाचें भाषण मनावर घेऊं नकोस. मी तुझ्या वृद्ध पित्याच्यठिकाणीं आहें. मी व गांधारी कधीं तुझ्याकडे आलों असतां आमच्याशीं स्नेहानें वाग. कौरवांचा मार्गदर्शक तूं आहेस. विदुरा-

सारखा शाहणा तुह्माला सल्ला देणारा असून तूं प्रत्यक्ष धर्माची मूर्ति आहेस. अर्जुनाच्या ठिकाणीं धैर्य व भीमाच्या ठिकाणीं पराक्रम वसत आहेत. तशीच नकुळसहदेवांच्या ठिकाणीं शुद्ध गुरुशुश्रूषा दिसून येते. तुमचें कल्याण असो. तुम्ही सुखानें खांडवप्रस्थाला जा.' ह्याप्रमाणें सांगून धृतराष्ट्रानें पांडवांना इंद्रप्रस्थाला पाठविलें; तेव्हां शकुनीनें युधिष्ठिराला फिरून द्यूताला बोलावून डाव हरणारानें बारावर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास काढावा व या अज्ञातवासांत सांपडल्यास फिरून बारावर्षें वनवास करावा, अशी पैज लावून त्याला डावांत जिंकिलें व द्रौपदीसह सर्व पांडवांना त्यानें वनवासाला पाठविलें.

पांडवांचें वनवासाला निघणें.

पांडव वनवासाला निघाले असतां विदुर म्हणाले, ' युधिष्ठिरा, लबाडीनें पराभव झाला असतां त्याबद्दल कोणी वाईट वाटून घेत नाहीं. तुला सर्व धर्म कळत आहे. युद्धामध्यें जय अर्जुनाकडे आहे. भीमसेन शत्रूंना मारण्याला समर्थ आहे. अर्थसंग्रह करण्यांत नकुळ कुशल आहे, व राज्यव्यवस्था नीट ठेवण्याचें सामर्थ्य सहदेवाच्या अंगीं आहे. धौम्यांसारखे ब्रह्मवेत्ते पुरोहित तुला मिळाले आहेत व धर्मार्थ जाणणारी द्रौपदी तुझी धर्मचारिणी आहे. इतक्या गोष्टी तुला अनुकूळ आहेत ह्मणून तुमचा हेवा करणारे ह्या जगांत पुष्कळ लोक निघतील. यासाठीं तुह्मी एकमेकांशीं प्रेमानें वागून एकजुटीनें रहा. कल्याणप्रद अशा तुझ्या ऐहिक सुखासंबंधाच्या निरपेक्ष बुद्धीचा तुला मोठा उपयोग होईल. प्रत्यक्ष इंद्रासारख्या शत्रूला देखील तुम्हाला जिंकतां येणें कठिण आहे. पूर्वीं वारणावतींत व्यासांनीं हिमाचलावर मेरुसावर्णींनीं, भृगुतुंगीं परशुरामांनीं व दृषद्वतीमध्यें प्रत्यक्ष शंकरांनीं

तुला उपदेश केलाच आहे. कश्माषी नदीच्या तीरावर असणाऱ्या भृगूंचाही तूं शिष्य आहेस. वारंवार नारद तुला दर्शन देतच आहेत. ऋषींना मान्य अशी आजपर्यंत धरलेली बुद्धि कायम ठेव. तुमचें कल्याण असो. परत आल्यावर फिरून तुमची भरभराट होईल. संकटसमयीं जशी वेळ येईल तसें वागून त्याला धैर्यानें डोकें द्या. आजपर्यंत तुमचें कधीं वाकडें पाऊल पडलें नाहीं हें जरी खरें आहे, तरी संकटकालींच मनुष्याची खरी परीक्षा होत असते. ' हा विदुरांचा उपदेश ऐकून घेऊन भीष्मद्रोणांना नमस्कार करून पांडव निघाले. द्रौपदी त्यांच्याबरोबर जाण्यास तयार होऊन अंतःपुरांतील स्त्रियांना नमस्कार करून कुंतीकडे निरोप घेण्यासाठीं आली, तेव्हां गळा दाटून येऊन कुंति म्हणाली, ' मुली, संकटसमयीं मन डगमगूं देऊं नकोस. स्त्रीधर्म तुला पूर्ण माहीत आहेच. तशांत तूं सुशील व आचारसंपन्न आहेस. पतीशीं कसें वागावें हें मीं तुला शिकवावयाला नको. गुणसंपन्न अशा तुझ्यासारख्या साध्वीमुळें दोन्ही कुलांना शोभा आली आहे. तुझ्या रागानें हे कौरव जळून भस्म झाले नाहींत, हें त्यांचें दैवच समजलें पाहिजे. मी तुमचें कल्याण चिंतीत बसतें. तुमच्यावर कांहीं अरिष्ट येणार नाहीं. होणाऱ्या गोष्टी अपरिहार्य जाणून साध्वी स्त्रिया आपल्या मनाची कधीं चलबिचल होऊं देत नाहींत. सर्वश्रेष्ठ जो धर्म त्याचा तुला पाठिंबा असल्यामुळें लवकरच तूं चांगले दिवस पहाशील. महामती सहदेवाच्या कोवळ्या मनाला वनवासांत ह्या प्रसंगामुळें दुःख होणार नाहीं अशी व्यवस्था ठेव. ' ' बरें ' ह्मणून द्रौपदीनें कुंतीला नमस्कार केला; व तशीच एका वस्त्रानिशीं बाहेर पडली. तिच्या डोळ्यांतून ढळढळां पाण्याच्या धारा चालल्या असल्यामुळें तिचें तोंड मळकटलें होतें. तिचे केस पाठीवर मोकळे पडले

होते. दुर्योधनानें पांडवांचीं वस्त्राभरणें काढून घेऊन त्यांना कातडीं नेसावयाला देऊन बाहेर काढिलें, तेव्हां कुंति शोकाकुल होऊन आपल्या मुलांना म्हणाली, ' मुलांनो, तुह्मी सद्धर्मानें चालत असून तुमचें वर्तन चांगलें आहे. तुमचें आचरण व तुमचा संभावितपणा तुह्माला भूषणप्रद आहे. तुमच्या अंगांत क्षुद्रबुद्धि मुळीं नसून निंद्य कृत्य तुमच्या हातून कधीं घडणार नाहीं. सर्वांवर तुमचें प्रेम आहे व देवावर श्रद्धा आहे. असें असून हें संकट तुमच्यावर कसें ओढवलें तें त्या एका जगन्नियंत्याला ठाऊक. ज्या मीं तुह्माला जन्म दिला, त्या ह्या अभागिणीच्या पूर्वजन्मींच्या पातकाचें तर हें फळ नसेलना ? इहलोक सोडून गेलेले तुमचे वडील व माद्री यांना मी धन्य समजतें; कारण मुलांचे हे हाल पहाण्याचें तरी त्यांच्या कपाळीं आलें नाहीं. ब्रह्मदेव माझें मरण लिहून ठेवण्यास विसरला असावा ह्मणून हा प्राण ह्या कुडीला सोडीत नाहीं. हे द्वारकावासी कृष्णा, तूं ह्या वेळीं कोठें दडला आहेस ? मला व ह्या नरश्रेष्ठांना दुःखांतून कां सोडवीत नाहींस ? जे तुझ्याकडे अनन्यभावानें धाव घेतात त्यांना तूं संकटांतून सोडवितोस अशी मी आजपर्यंत तुझ्यासंबंधानें ऐकत आलेली गोष्ट खोटी आहे असें आतां मला वाटूं लागलें आहे. ह्या सद्धर्मानें वागणाऱ्या पांडवांवर दया कर. ' ह्याप्रमाणें कुंति शोकाकुल झाली असतां तिला चार समाधानाच्या गोष्टी सांगून तिचें शांतवन करून स्वतः तिच्यापेक्षां अधिक कष्टी झालेले विदुर तिला घेऊन घराकडे गेले. इकडे पांडव, त्यांच्या बरोबर निघण्याला तयार झालेल्या नागरिकांची समजूत घालून त्यांना परतवून उत्तरेकडे वनाला निघाले.

असो. ज्याला विपत्तींत पाडण्याचें दैवाच्या मनांत येतें, त्याचीं तें प्रथम बुद्धि हरण करतें; व मग त्याला सर्व विपरीत भासूं

लागतें. बुद्धिनाश होऊन विनाशकाल आल्यावर अन्यायच मनुष्याला न्याय भासूं लागून तो त्याला घट्ट धरून बसतो. हानिकारक गोष्टी हितकारक व हिताच्या गोष्टी अहितकारक दिसूं लागून त्या त्याच्या नाशासाठीं त्याच्यापुढें हजर होतात; व त्याला त्याच आवडूं लागतात. प्रत्यक्ष दंड घेऊन काळ कधीं कोणाच्या नाशाला उभा रहात नाहीं. "बरें तें वाईट व वाईट तें बरें" असें दाखविणें एवढेंच कालाचें काम आहे; आणि म्हणूनच कौरवांना यावेळीं अशी बुद्धि झाली.

पांडवांनीं केलेलें पौरांचें समाधान.

पांडव हास्तिनापुरांतून बाहेर पडले असतां दुष्ट दुर्योधनाच्या राज्यामध्यें धर्म व सुख याला आपण मुकणार असें वाटून पौरजन दयाभूत पांडवांच्या मागून जाण्यासाठीं त्यांकडे येऊन हात जोडून म्हणाले, 'न्यायाला झुगारून देऊन शत्रूंनीं अधर्मानें तुह्माला जिंकिलें. तुमच्याविषयीं आमच्या अंतःकरणांत मोठें प्रेम आहे; म्हणून आम्हाला येथें सोडून जाणें तुह्माला उचित नाहीं. अधर्मी राजाच्या राज्यांत राहिल्यानें आमचा सर्वस्वी नाश होईल. दुष्टाच्या संगतीनें मन दुष्ट होतें. साधूंचा समागम कल्याणप्रद होतो. वाईटांच्या दर्शनानें, संबंधानें, त्यांच्याशीं संभाषण केल्यानें व त्यांच्या बरोबर एकत्र राहिल्यानें धर्मावर पाणी पडून मनुष्य उन्नतीला मुकतो.' ह्याप्रमाणें त्यांचे स्नेहयुक्त भाषण ऐकून धर्मराजाला समाधान वाटलें. 'हास्तिनापुराला परत जाऊन भीष्मादिकांच्या मनाप्रमाणें तुह्मी वागल्यानें मला संतोष होऊन तुह्मीं माझा मोठा आदर केल्यासारखें होणार आहे,' असें त्यानें त्यांना विनविलें. तेव्हां प्रजाजन पांडवांचे गुणानुवाद गात नाइलाज होऊन माघारे परतले.

वनवास व स्थालीप्राप्ति.

पांडव वनाला आल्यावर कांहीं वनवासी ब्राह्मण आपल्या शिष्यांसमवेत त्यांच्या बरोबर राहण्यासाठीं त्यांकडे आले असतां युधिष्ठिर त्यांना म्हणाला, ‘ आमचें सर्वस्व हरण होऊन आह्मी कंदमूलांवर उदरनिर्वाह करून अनेक प्रकारच्या भयांनीं पूर्ण अशा वनांत रहाणार; त्या ठिकाणीं आमच्या सहवासांत खात्रीनें तुम्हाला कष्ट होणार; म्हणून कृपा करून आमचे बरोबर येऊं नका. ’ ब्राह्मण म्हणाले, ‘ भक्तियुक्त अंतःकरणानें आम्ही तुमच्या मागून येत असतां आम्हाला सोडून जाणें तुम्हाला उचित नाहीं. आमच्या पोषणाची तुम्ही यत्किंचित्‌ही काळजी करूं नका. आम्हीं स्वतः आपलें अन्न मिळवूं, व आराधना व जपजाप्य यांच्या योगानें तुमचें कल्याण चिंतीत मनोरंजक गोष्टींनीं आम्ही तुमची करमणूक करूं.’ यावर धर्मराज म्हणाला, ‘ तुमचें पोषण कसें होईल याची मला काळजी पडली आहे. गृहस्थाश्रमामध्यें राहून आमच्या सारख्यांनीं आमच्या मागून येणाऱ्यांचें पालनपोषण न करतां कसें रहावें ? जे अन्न शिजवीत नाहींत त्यांचें पोषण गृहस्थानें केलें पाहिजे. तृण, भूमि, उदक व गोड भाषण यांची तरी उणीव भल्यांच्या घरीं नसावी. श्रमलेल्याला आंथरूण, उभा राहून थकलेल्याला आसन, तान्हेल्याला पाणी व भुकेल्याला अन्न देणें गृहस्थाचें कर्तव्य आहे. दृष्टीनें, प्रेमानें, गोड शब्दानें व उठून आसन देऊन अतिथीचा आदर केल्यानें गृहस्थानें स्वकर्तव्य बजावल्यासारखें होतें. उठून सामोरें जाऊन यथान्यायानें अतिथीचा सत्कार करणें हा पंचविध यज्ञच आहे. स्वतःकरितांच कधीं अन्न शिजवूं नये; ज्या अन्नांतून विधिपूर्वक बलि दिला जात नाहीं, अशा प्रकारचें अन्न खाऊं नये. कुत्र्यांना, चांडाळांना, पक्ष्यांना सकाळ संध्याकाळ जमिनीवर अन्न

टाकणें यालाच वैश्वदेव म्हणतात. जो गृहस्थाश्रमी मनुष्य थकून आलेल्या अनोळखी मनुष्याला देखील उत्तम अन्न जेवूं घालतो त्याला मोठें पुण्य लागतें. ' यावर शौनक ब्राह्मण म्हणाला, 'काय चमत्कार ! ही केवढी दुःखाची गोष्ट आहे ! हें जग फार विपरीत आहे ! ज्या गोष्टीची साधूला लाज वाटते तींतच दुष्ट मनुष्य फुशारकी मिरवितो. ह्या पोटासाठीं शहाणा देखील मोठें पाप करण्यास तयार होतो. मोहरागादि विकारांच्या तावडींत सांपडून इंद्रियोपभोग्य वस्तूंचा समजून उमजून बंदा गुलाम बनतो, व भलत्या मार्गाला नेणाऱ्या इंद्रियांच्या योगानें अक्कलशून्य होऊन उधळलेले घोडे ज्याप्रमाणें सारथ्याला भलतीकडे नेतात त्याप्रमाणें हा भलत्या मार्गाकडे वळतो. जेव्हां ह्या सहा इंद्रियांची एखाद्या विषयाशीं गांठ पडते, तेव्हां संकल्पजन्य इच्छेचा प्रादुर्भाव होऊन त्याकडे मन वेधतें व मनुष्य ती गोष्ट करण्याला निघतो. संकल्पजन्य इच्छा उत्पन्न झाली म्हणजे पतंग ज्याप्रमाणें दिव्यावर झडप घालतो, त्याप्रमाणें हा प्राणी लोभाग्नीमध्यें जाऊन पडतो. नंतर हा आहारविहारादि भुरळ पडणाऱ्या सुखांत दंग होऊन जाऊन आपल्याला विसरतो. ही मूर्खाची गोष्ट झाली. आतां शहाण्या लोकांसंबंधानें विचार केला असतां, ते ' कर्म कर, फलाची इच्छा धरूं नकोस,' या वेदवचनाला बळकट धरून धर्मानें निष्काम कर्म करीत जगांत वावरत राहतात.' हें शौनकाचें भाषण ऐकून युधिष्ठिरानें पुरोहिताकडे वळून पुढें काय करावें म्हणून विचारिलें व त्यांच्या सांगण्यावरून सूर्याची प्रार्थना करून त्यापासून स्थाली मिळवून घेतली. तिच्यांतील अन्न द्रौपदीचें जेवण होईपर्यंत सरत नसे. त्याच्या योगानें वाटेल तेवढ्या ब्राह्मणांचें रोज पोषण होऊं लागलें.

दुर्योधनाला मैत्रेयशाप.

कोणे एके वेळीं मैत्रेय ऋषि तीर्थयात्रा करीत फिरत असतां वनवासी युधिष्ठिराला भेटण्यासाठीं कुरुजांगलाला आले. तेथें कौरवांचा अन्याय ऐकून, धृतराष्ट्राकडे येऊन ते म्हणाले, 'तूं आणि भीष्म जिवंत असतां तुझीं मुलें पांडवांबरोबर भांडतात हें चांगलें नव्हे. त्यांना योग्य शासन करून दाबांत ठेव. प्रत्यक्ष तूं जिवंत असतांना ह्या अनन्वित कृत्याकडे दुर्लक्ष्य करून उगीच पहात कां बसला आहेस ? सभेमध्यें घडलेल्या ह्या चौर्यकर्मासंबंधानें तुला काळिमा लागला आहे.' पुढें दुर्योधनाकडे वळून ते ह्मणाले, 'पांडवांचा हेवा करण्याचें सोडून दे व त्यांचें वीर्य आणि बल लक्ष्यांत घेऊन त्यांच्याशीं सलोख्यानें वाग.' तेव्हां दुर्बुद्धि दुर्योधन तें ऐकून हासला व पायाच्या बोटानें जमिनीवर रेघोट्या काढीत कांहीं न बोलतां गप्प राहिला. त्यानें सोटासारख्या आपल्या मांडीवर हातानें थाप दिली. तें मैत्रेयांना सहन न होऊन रागानें 'ही तुझी द्वेषबुद्धि मोठ्या घोर युद्धाला कारणीभूत होऊन त्यामध्यें भीम गदेच्या प्रहारानें ही तुझी मांडी फोडील,' असा त्यांनीं त्याला शाप दिला.

किर्मीराचा वध.

पांडव वनवासांत काम्यक वनाला येऊन पोंचल्यावर एक धिप्पाड राक्षस आपले विशाळ बाहू व विक्राळ तोंड पसरून त्यांच्यापुढें आला. त्याचे डोळे लाल होते. पांडवांना हा मोठा प्रबल शत्रु उत्पन्न झालेला पाहून द्रौपदी अगदीं घाबरली. तिला धीर देऊन 'तूं कोण, कोणाचा, आमच्याकडे तुझें काय काम आहे,' ह्मणून युधिष्ठिरानें त्या राक्षसाला विचारिलें, तेव्हां तो राक्षस म्हणाला, 'मी किर्मीर नांवाचा बकाचा भाऊ ह्या वनांत तावडींत

सांपडलेल्या लोकांवर आपला उदरनिर्वाह करून निःशंकपणें फिरत असतों. आज बरेच दिवसांनीं माझी इच्छा परिपूर्ण झाली. भावाचा वध करणाऱ्या भीमावर सूड घेण्याकरितां मी आज पुष्कळ दिवस सशस्त्र होऊन ही पृथ्वी धुंडाळीत आहें. माझा मित्र जो हिडिंब त्यालाही त्यानेंच मारिलें आहे. आज ह्या फार दिवसांपासून पेटून राहिलेल्या वैराग्नीला शांत करण्याची संधि आली आहे. ह्याच्या रक्तानें त्या दोघांना तृप्त करून त्यांच्या ऋणांतून आज मी मुक्त होईन. ' हें त्याचें उद्दामपणाचें भाषण ऐकून युधिष्ठिरानें त्याची निर्भर्त्सना केली. नंतर भीमानें एक मोठें झाड जोरानें उपटून तें त्यावर फेकिलें. त्याला धरून गदगदां हालविलें, व गरगरां फिरवून एखाद्या पशूप्रमाणें जमिनीवर आपटून मारून टाकिलें.

मार्कंडेयांची भेट.

काम्यक वनांत वनवासाचे कांहीं दिवस काढिल्यावर पांडव पुढें द्वैतवनाला गेले. तेथें सुद्धां पुष्कळ महात्मे ऋषि त्यांच्या भोंवतीं गोळा झाले. तेथें पांडव तपस्वी जनांचा सन्मान घेत त्या ठिकाणीं रहात असतां एके दिवशीं तेजःपुंज मार्कंडेय ऋषि त्यांच्या भेटीला आले. त्यांचें योग्य आदरातिथ्य केल्यानंतर ते ऋषिश्रेष्ठ तपस्विसमुदायामध्यें आपणाकडे पाहून हासत आहेत असें पाहून थोडें वाईट वाटून ' तपस्व्यांच्या देखत आपण आमची स्थिति पाहून असें कां हासतां, ' म्हणून धर्मराजानें विचारिलें. तेव्हां मार्कंडेय म्हणाले, ' राजा, मला तुमची स्थिति पाहून आनंद झाला नाहीं व मी तशा भावानें हासलों नाहीं. राजा, काय सांगूं ! आज तुझी विपत्ति पाहून पित्याच्या आज्ञेनें लक्ष्मणासह ज्यानें वनवास स्वीकारिला त्या सत्यप्रिय रामचंद्राची मला आठ-

वण झाली ! वाटेल तें करण्याचें सामर्थ्य अंगांत असतांही सर्व सुखोपभोग सोडून केवळ सत्य राखण्यासाठीं बापाच्या आज्ञेनें त्यानें वनवास पतकरिला. शक्तीच्या जोरावर कधीं अधर्माचरण करूं नये. सत्यानें, धर्मानें व योग्य वर्तनानें सर्व प्राणिमात्रांवर श्रेष्ठता पावून प्रतिज्ञा केल्याप्रमाणें कष्टमय वनवास कंठल्यावर द्यूतांत गमाविलेली संपत्ति तूं आपल्या तेजानें कौरवांपासून परत मिळविशील. ' असें म्हणून मार्कंडेय निघून गेले.

धृष्टद्युम्नादिकांच्या प्रतिज्ञा.

या वनवासांत एके वेळीं श्रीकृष्ण वगैरे मंडळी पांडवांना भेटण्याकरितां आली असतां द्रौपदी श्रीकृष्णाला म्हणाली, 'हे सर्व सृष्टिचालका, तुझ्यापुढें स्नेहभावामुळें मी आपल्या दुःखाचें रडगाणें गात आहें. मी पांडवांची बायको, तुझी सखी व धृष्टद्युम्नाची बहीण असून स्त्रीधर्मानें वागत असतां मला त्या दुष्टांनीं तशा स्थितींत सभेमध्यें ओढून नेली, ते दुष्ट मजकडे पाहून हासले, व मला आपली दासी ठरवून भरसभेंत त्यांनीं माझी दुर्दशा केली. दुबळ्या मनुष्यानें सुद्धां बायकोचें रक्षण करावें हा पूर्वापार धर्म आहे. पण माझे धिंडवडे हे माझे पती निमूटपणें पहात बसले. तेव्हां यांच्या सामर्थ्याला धिक्कारच नव्हे का ? कौरवांच्या या अनन्वित कृत्यापासून अनेक दुःखें सहन करीत मी फार दिवस जळफडत आहें. पूर्वपुण्याईनें माझा जन्म मोठ्या कुलांत झाला आहे, पांडवांची मी धर्मपत्नी आहें व पंडूंची सून आहें. अशा वीरपत्नीची त्या अधमांनीं वेणी धरून ओढावी, यापेक्षां अधिक दुःखकारक विटंबना ती कोणती ? ' असें म्हणून तोंडावर हात ठेवून ती ढळढळां रडूं लागली. नंतर डोळे पुसून व वरचेवर येत असलेले हुंदके दाबून ती पांडवांकडे वळून म्हणाली, ' मला पती

नाहींत, मुलगे नाहींत, बंधू नाहींत, बाप नाहीं, आई नाहीं, कोणी नाहीं. त्या अधमांनीं माझी दैना मांडली असतां तुमच्या मनाला कांहीं वाईट न वाटतां तुह्मी खुशाल माझे हाल पहात बसलां. आप्तसंबंध, स्नेहसंबंध, आत्मीयाबद्दल अभिमान व सेव्य-भाव या चार कारणांनीं कृष्णा, तुला नेहमीं माझें रक्षण केलें पाहिजे. ' यावर श्रीकृष्ण ह्मणाला, ' द्रौपदी ज्यांनीं तुझा एवढा अपमान केला आहे, त्यांच्या स्त्रियाही याचप्रमाणें रडतील. आकाश कोसळेल, हिमाचल फुटेल, पृथ्वीचे तुकडे तुकडे होतील, समुद्र आटून जाईल, पण ही माझी वाणी कधीं खोटी होणार नाहीं, यावर धृष्टद्युम्न ह्मणाला, ' ताई, तूं कांहीं काळजी करूं नकोस. मी द्रोणांला मारीन, शिखंडी भीष्मांला मारील, भीमसेन दुर्योधनाला मारील, व अर्जुन कर्णाला मारील. रामकृष्णाचा आश्रय केल्यामुळें रणामध्यें आम्हाला जिंकणारा कोणीही वीर राहिला नाहीं.' इतकें संभाषण झाल्यावर श्रीकृष्ण वगैरे मंडळी आपल्या गांवाकडे परत गेली.

द्रौपदीयुधिष्ठिर संवाद.

द्वैतवनांत धर्मराज सुखानें राहिला असतां एके वेळीं द्रौपदी त्याला म्हणाली, ' त्या दुष्ट दुर्योधनाला आमच्या संबंधानें अगदीं वाईट वाटत नाहीं. आपल्याला साली नेसावयाला लावून वनांत पाठविल्याबद्दल त्याच्या मनाला एवढा देखील संताप होत नाहीं ! खरोखर त्याचें हृदय दगडाचेंच बनलें असलें पाहिजे. आपण वनाला निघालों असतां त्या चौघा पाप्यांच्या डोळ्यांतून एक टिपूस तरी निघावयाचें होतें! पण नाहीं! किती झाले तरी दुष्टच ते ! आपल्याला असें वनवासी पाहून मला फार वाईट वाटतें. घरांत मिळत असलेल्या हजारों वस्तूंपैकीं येथें आपल्याला

एकही मिळत नसल्यामुळें माझ्या अंगाचा तिळपापड होत आहे. रणामध्यें सर्व कौरवांचा नाश करण्याचें अंगीं सामर्थ्य असतांही आपल्या वचनामुळें हे आपले भाऊ निमूटपणें दुःख सोशीत आहेत. मला व आपल्या भावांना ह्या स्थितींत पाहून आपल्या मनाला कांहींच वाईट वाटत नाहींना? ह्यावरून राग हा मनोविकार आपल्या ठिकाणीं मुळीं नाहीं, असें मला वाटतें. ज्याला राग नाहीं तो क्षत्रिय नव्हे. जो क्षत्रिय वेळ आली असतां आपलें तेज दाखवीत नाहीं, त्याला सर्व नेहमीं तुच्छ करतात. क्षमा नेहमींच चांगली नाहीं. जो नेहमीं क्षमा करतो त्याचें पुष्कळ नुकसान होतें. नोकर तसेंच शत्रु त्याला जुमानीत नाहींत. कोणीही त्याच्यापुढें वाकत नाहीं. त्याचे नोकर त्याचें सर्वस्व लुबाडण्याला टपलेले असतात. यजमानाला उचित असा मान ते त्याला देत नाहींत. अपमान हा या जगांत मरणाहून अधिक आहे. आतां रागापासूनही अनेक तोटे असल्यानें रागही नेहमीं उपयोगी नाहीं हें खरें. पण जो प्रसंग पाहून सदय किंवा निष्ठुर बनतो त्यालाच इहपरलोकीं सुख मिळतें. प्रसंगीं शौर्य दाखविणेंच योग्य आहे. म्हणून लोभी व नेहमीं आपला अपकार करणारा जो दुष्ट दुर्योधन त्यावर शौर्य गाजविण्याची ही वेळ आहे, असें मला वाटतें. त्याच्यासंबंधानें आतां क्षमेची वेळ उरली नाहीं. मृदु केव्हां असावें, निष्ठुर केव्हां व्हावें, हें जो जाणतो, त्यालाच ' पृथ्वीचा स्वामी ' ही पदवी शोभते.' हें द्रौपदीचें भाषण ऐकून युधिष्ठिर म्हणाला, ' मनुष्याच्या अस्तित्वाला व नाशाला राग हाच कारण आहे. ज्याला आपला राग आवरतां येतो तोच ह्या जगांत दिवस काढूं शकतो. राग आवरतां आला नाहीं तर तो वाढ घेतो. ह्या जगांत लोकांच्या नाशाला राग हाच कारण होतो. म्हणून असा हा राग माझ्यासारख्यानें कसा दाख-

वावा? मनुष्य रागाच्या झपाट्यांत वाटेल तें पाप करतो; प्रसंगीं गुरूला देखील मारतो. आपल्या निष्ठुर भाषणानें तो कल्याणाला लाथाळतो. मग बोलावें काय, न बोलावें काय, करावें काय, न करावें काय, हें त्याला कळत नाहीं. प्रसंगी तो प्राणाला देखील मुकतो. या प्रकारचे रागामध्यें अनेक दोष आहेत; हा विचार मनांत आणून मी आपला राग वाढूं देत नाहीं. रागावलेल्यावर उलट न रागावणारा मनुष्य आपलें व दुसऱ्याचें अशा दोघांचें कल्याण करतो; म्हणून राग आवरणें चांगलें. शहाणा मनुष्य शक्तिमान् असून जरी त्याला दुसऱ्यानें राग आणिला तरी तो रागवत नाहीं; म्हणून मनुष्य बलवान् असो वा दुर्बळ असो, त्यानें नेहमीं क्षमा धरावी. दूरदर्शी शहाणे लोक ज्याला तेजस्वी म्हणतात, त्याच्या पोटांत कधीं राग नसतो. तो आलेला राग विचारानें नाहींसा करतो. रागावलेल्या मनुष्याला प्रसंग व वेळ कळत नाहीं. सभ्यपणा, सूड घेण्याची शक्ति, शौर्य व हुषारी हे तेजाचे गुण रागानें झपाटलेल्या मनुष्याच्या अंगीं असूं शकत नाहींत. राग टाकल्यानें खरें तेज अंगीं येतें. तमोगुण मनुष्यामध्यें त्याच्या नाशाकरितां उत्पन्न केला आहे. रागीट मनुष्याहून धर्मलंड मनुष्य देखील बरा. जर पृथ्वीसारखे क्षमाशील लोक जगांत नसते तर त्याच्यांत शांतताच राहिली नसती. तंट्याला कारण राग. त्याच्या झपाट्यांत कोणी दुसऱ्याच्या अंगावर तुटून पडतो, कोणी मारलें असतां उलट तो मारतो; आपल्या नांवानें कोणी ओरड केली असतां उलट तो त्याच्या नांवानें ओरड करतो, बाप मुलाला मारतो, मुलगा बापाला मारतो; याप्रमाणें रागाच्या योगानें सर्व प्रकारें नाश ओढवतो. कोणी आपल्या नांवानें उगीच ओरड केली असतां राग आला असूनही जो क्षमा धरतो तोच उत्तम पुरुष समजावा. क्षमा हाच श्रेष्ठ धर्म

आहे. क्षमावान् मनुष्याला या जगांत सन्मान मिळतो. भारतांच्या भावी समूळ नाशाचा हा भयंकर काळ आला आहे, असें मला वाटतें. सुयोधन पात्र नसल्यामुळें क्षमा त्याकडे ढुंकून पहात नाहीं.' द्रौपदी म्हणाली, 'ज्या ब्रह्मदेवानें आपल्या मनाला अशी भुरळ पाडिली, त्याला नमस्कार असो. क्षमाशीलतेच्यासंबंधानें आपलें विलक्षण मत आहे. दोरीला बांधिलेल्या पक्ष्याप्रमाणें किंवा वेसण घातलेल्या बैलाप्रमाणें, हें जग केवळ ईश्वराधीन आहे. बऱ्या अथवा वाईट कामाला सर्व प्राणिमात्रांना लावणारा ईश्वर सर्वव्यापक आहे; तो आपल्या मायेनें सर्वांना मोहून टाकतो. या जगांत बळ हेंच सुखाला कारण आहे, असें मला वाटतें आणि म्हणूनच दुबळ्यांसंबंधानें मला कींव येते.' यावर युधिष्ठिरानें उत्तर केलें, 'द्रौपदि, या तुझ्या भाषणांत थोडा अविचार दिसतो. कर्मफलाची अपेक्षा न करतां मी कर्म करीत असतो. धर्मफलाची इच्छा करणारा मनुष्य धर्मामध्यें व्यापार करणारा सौदागर समजला पाहिजे. मूर्खाला सर्व शहाणे मूर्ख दिसतात. मूर्ख आपलेंच मत खरें समजून अनेक वेळां कल्याणाला लाथाळतो. सागर तरून जाणारास जशी लाकडाची नाव, तशी हा भवसागर तरूं इच्छिणाराला धर्म ही नाव आहे. धर्मानें वागणाऱ्यांनीं आचरलेला धर्म जर विफल असतां तर आज हें जग अंधःकारांत बुडून गेलें असतें. शहाण्याला कर्माचें फल मिळतें, व थोड्यानें देखील त्याची तुष्टी होते. मूढ जनांना पुष्कळ मिळूनही संतोष होत नाहीं. कर्माचें फल मिळालेंच पाहिजे हें पक्कें लक्ष्यांत ठेव.' द्रौपदी ह्मणाली, 'यासाठींच मी सांगतें कीं आपण कर्म करा; असें गप्प बसूं नका. दैववाद किंवा यदृच्छालाभवाद फुकट आहे. कर्मबुद्धीच प्रशस्य आहे. दैवावर अवलंबून जो कांहीं न करतां स्वस्थ झोप घेतो, तो पाण्यांत टाकलेल्या मातीच्या कच्च्या मडक्याप्रमाणें नाश पा-

वतो. त्याचप्रमाणें कर्म करण्याचें सामर्थ्य असून मिळेल त्यावर संतुष्ट राहून कर्म न करतां जो स्वस्थ असतो, तोही फार दिवस टिकत नाहीं. या जगांत एकाएकीं जो पैसा मिळतो त्याला यदृच्छालाभ म्हणतात. त्याला कोणाचा यत्न लागत नाहीं. दैविक उपायांनीं जें कांहीं मनुष्य मिळवितो त्याला दैवदत्त म्हणतात. स्वतः कर्म करून त्याचें फळ मनुष्याला मिळालें ह्मणजे त्याला पौरुष म्हणतात. स्वाभाविक रीतीनें एखाद्या कृत्यांत प्रवृत्ति होऊन कारणाशिवाय जी अर्थप्राप्ति होते, तिला स्वाभाविक हें नांव आहे. ह्याप्रमाणें दैवानें, यदृच्छेनें व स्वभावतः, अशा तीन उपायांनीं पुरुष आपल्या कर्माचें फळ मिळवितो. तिळांत तेल असतें, गाईच्या स्तनांत दूध असतें व लाकडामध्यें अग्नि असतो, हें जाणून आपल्या बुद्धिबलानें मनुष्य उपायांचीं योजना करून त्याच्या सिद्धीकडे लागतो. हुषार कारागिरानें केलेलें काम चांगलें वठतें. एखादें कृत्य बरें अगर वाईट झालें आहे, हें फलावरून कळतें. कर्तृत्वशक्तीनें कर्मसिद्धि झाल्यानें मनुष्याची प्रशंसा होते. कर्म तर केलेंच पाहिजे. कर्म करणाऱ्यालाच फलसिद्धि होते; परंतु कर्मफलाविषयीं निःसंदेह असे विचारी व कर्मनिष्ठ पुरुष क्वचित् आढळतात. कर्म केल्यानें मनुष्य ऋणमुक्त होतो. झोप घेणारा आळशी मनुष्य आकाबाईच्या फेऱ्यांत सांपडतो. शहाणे लोक कर्मामध्यें गढून निःशंक असतात. हा जो आमच्यावर मोठा अनर्थ ओढवला आहे, तो आपण हातपाय हालविण्याचें मनांत आणिलें तर खात्रीनें दूर होणार आहे. बरें, कदाचित् यश न आलें तर आपल्या भावांचा आपल्यावर बोल तरी राहणार नाहीं. कर्म करणाराला आज नाहीं उद्यां फल मिळेलच. शेतकरी जमीन नांगरून बीं पेरून मग स्वस्थ रहातो. कारण, पुढें सिद्धीला कारण पाऊस आहे. आतां पाऊसच जर न

पडेल तर त्यांत शेतकऱ्याचा कांहीं दोष नाहीं. दुसऱ्याला कर्म केलें असतां जसें यश येतें, तसेंच आपण करून आपल्याला जर तें न येईल तर मग शहाण्यानें त्यांत आपला दोष मानून घेऊं नये, व झटूनही मला फल मिळालें नाहीं ह्मणून खेद मानून घेऊं नये. सिद्धि मिळो वा न मिळो, आपण प्रयत्न केल्यानें लोकापवादापासून मुक्त होतों; परंतु प्रयत्न न करणें ह्मणजे मात्र तसें नाहीं. कर्मसिद्धीला अनेक कारणें लागतात. अंगीं कुशलता नसेल तर कमी फल मिळतें; परंतु कोणतेंही काम हातीं न घेतल्यानें फलही मिळत नाहीं व कुशलताही दिसून येत नाहीं. शहाण्यानें कल्याणप्राप्तीकरितां देशकालादि उपायांची यथाशक्ति बुद्धीशीं जोड लावून दिली पाहिजे. शत्रूचें छिद्र नेहमीं पहात बसणारा यशस्वी होऊन आपल्या व शत्रूच्या ऋणांतून लवकरच मुक्त होतो. मनुष्यानें स्वतःची हयगय कधीं करूं नये. असा मनुष्य कधीं उदयाला येत नाहीं. अशी ही जगाची रहाटी आहे. यश हें काळ व स्थिति यांवर अवलंबून आहे. '

भीमयुधिष्ठिरसंवाद.

यावर भीम धर्मराजाला ह्मणाला, ' दुर्योधनानें आमचें राज्य कपटद्यूत खेळून एकाद्या बलिष्ठ सिंहाची शिकार कपटी, दुबळ्या कोल्ह्यानें उपटावी त्याप्रमाणें अधर्मानें व कपटानें उपटलें आहे. उगीच धर्म धर्म ह्मणून पोकळ धर्माच्या नादीं लागून धर्मकामांला उपयोगीं पडणाऱ्या अर्थाला मुकून आपण विनाकारण आपल्याला क्लेश करून घेत आहां. आपलें मन न दुखवावें एवढ्याचसाठीं ही मानहानि आह्मी सोशीत आहों. त्याच वेळीं आह्मीं दुर्योधनाला चिरून टाकिलें नाहीं, ही आमच्या हातून वाईट गोष्ट झाली. आमच्या अंगात शक्ति असून देखील दुबळ्या लोकांनीं

स्वीकारण्याचा पशुतुल्य मार्ग आह्मीं स्वीकारिला आहे. आपण धर्ममूर्ति असल्यानें हा निंद्य मार्ग धरिला आहे. गतवैभव परत मिळविण्याला असमर्थ असे नेभळे लोक मात्र स्वार्थाच्या आड येणाऱ्या कुचकामी निराशेला आपल्या पोटाशीं कवटाळतात. आमच्यामधील पराक्रम आपणास दिसत असूनही अनर्थपरंपरा आपण व्यर्थ ओढवून घेत आहां. ह्या कौरवांना आह्मी दुबळे वाटत आहों. न्यायानें लढून लढाईतून आम्ही मागें फिरलों नाहीं, म्हणजे आम्हाला मरण आलें तरी चांगलें. ज्या धर्माच्या योगानें मित्रांना व आपल्याला पीडा होते त्याला धर्म म्हणण्यापेक्षां व्यसन हें नांव अधिक शोभतें. केवळ धर्म म्हणूनच जो धर्माचरण करीत राहतो त्याला शहाणा म्हणतां येत नाहीं. आंधळ्याला ज्याप्रमाणें सूर्याचें तेज दिसत नाहीं, त्याप्रमाणें धर्माचें खरें इंगित त्याला कळत नाहीं. अर्थाला मूळ जरी धर्म आहे तरी धर्म अर्थावर अवलंबून आहे. कामानें व लोभानें ज्याला धर्माचें स्वरूप दिसत नाहीं तो कुचकामी ठरतो. पैसा मिळविण्याला देखील पैशाचेंच साधन लागतें, हें आपल्याला माहीत नाहींसें दिसतें. आपल्याला नेहमीं धर्म धर्म करीत राहिलेले पाहून आपले जिव्हाळ्याचे लोक आपल्याला कर्म करण्यास सांगत आहेत. द्रव्याशिवाय कांहींच होणें शक्य नाहीं. पैसा नसेल तर इतर गुण व्यर्थ आहेत; व पैसा उगीच मिळत नसतो. पराक्रम करून पैसा मिळविणें हाच आमचा धर्म आहे. तो आपण पाळला पाहिजे. ज्याला पाहून शत्रु थरथरां कांपतात, अशा क्रूरकर्म करणारांच्या कुळांत आमचा जन्म झाला आहे. प्रजापालनापासून मिळणारे फल फार मोठें आहे. तें न मिळविलें असतां लोकामध्यें आपली किंमत नाहींशी होणार व स्वधर्मापासून भ्रष्ट होणें हेंही योग्य नाहीं. म्हणून मनाचा हा कोंवळेपणा सोडून द्या. नुसती धर्माची जपमाळ

घेऊन आजपर्यंत कोणत्या राजानें पृथ्वी, मोठेपणा अथवा संपत्ति मिळविली आहे ? तसेंच संपत्तीचें मूळ शक्ती आहे. ह्याचप्रमाणें मोठ्या धर्मलाभासाठीं अल्प धर्म बाजूला ठेवणें इष्ट आहे. एकवटलेले दुर्बल लोकही बलवानाला अपाय करूं शकतात, भूमीचें पालन करणें हेंच क्षत्रियाचें मोठें तप आहे. युद्धामध्यें जय मिळवून क्षत्रिय जसा उत्तम गतीला पोहोंचतो, तसा तो तपानें पोहोंचत नाहीं. 'कुत्र्याच्या कातड्याच्या पिशवींत ठेविलेल्या दुधाप्रमाणें हें दुर्योधनानें मिळविलेलें राज्य,' अशी लोकांत म्हण पडली आहे; तेव्हां आजच हास्तिनापुराला चला व शत्रूंना आपल्या पराक्रमानें चिरडून टाकून गमाविलेलें वैभव परत मिळवा.' यावर युधिष्ठिर म्हणाला, ' भीमा, तूं जें बोललास तें अक्षरशः खरें आहे. त्याबद्दल मी तुला यत्किंचितही दोष देत नाहीं. माझ्याच अपराधामुळें तुम्ही मोठ्या संकटांत पडलां आहां. माझ्यापाशीं कपट वगैरे कांहीं नसल्यामुळें त्या कपटपटु शकुनीनें मला जिंकून संकटांत पाडिलें. शकुनीचे हुकमी फासे त्याच्या म्हणण्याप्रमाणें पडतांना पाहून मीं सावध व्हायाला पाहिजे होतें; पण ईर्षा मनुष्याची अक्कल नाहींशीं करते. परंतु आतां भल्यांच्या समक्ष केलेली प्रतिज्ञा मला मोडतां येत नाहीं. धर्माला झुगारून देऊन पृथ्वीचें राज्य सुद्धां आर्याला मरणाहून वाईट आहे. ज्यावेळीं द्यूतामध्यें माझे हात जाळून टाकण्याला तूं तयार झाला होतास, त्याचवेळीं तूं तसें केलें असतेंस तर त्यांत तुला पाप लागलें नसतें. वेळ निघून गेल्यावर आतां उगीच टोचींत बसण्यांत काय अर्थ ? बीं पेरणारा ज्याप्रमाणें फळाची वाट पहात बसतो, त्याप्रमाणें अभ्युदय काळाची आतां वाटच पहात बसलें पाहिजे. आपण कपटानें फसले गेलों खरें; पण आतां त्याचा सूड योग्य वेळीं उगविण्यांतच भूषण आहे. सध्यांच्या व पुढच्या कालासं-

बंधानें जो योग्य विचार करतो तोच शहाणा. केवळ साहसानें जीं मोठीं कामें आपण हातीं घेतों, तीं पुढें आपल्यालाच त्रासदायक होतात. योग्य विचारानें बळाचा पूर्ण विचार करून कोणतीही गोष्ट हातीं घेतली ह्मणजे तींत यश येतें आणि दैवही त्याला अनुकूल होतें. केवळ घमेंडींत अविचारानें कोणतीही गोष्ट आरंभूं नये. भीष्मद्रोणादि सर्व योद्धे अस्त्रविद्येंत प्रवीण असून प्राण जाईतोंपर्यंत मागें हटणार नाहींत; त्यांना जरी आह्मी व कौरव सारखेच आहों तरी राजपिंड त्यांनीं खाल्ला आहे. त्यांची ते फेड केल्याशिवाय रहाणार नाहींत. त्याचप्रमाणें आमच्यापासून त्रास झालेल्या दुसऱ्या राजांना देखील दुर्योधनानें मानपानादि सत्कारानें वश करून घेतले आहेत; ते दुर्योधनासाठीं रणामध्यें प्राण सोडण्याला सुद्धां मागेंपुढें पहाणार नाहींत. दुसऱ्याच्या साहाय्याखेरीज या मंडळींना युद्धांत जिंकून दुर्योधनाचा नाश तुला करतां येईल, असें मला वाटत नाहीं. सर्व धनुर्धरांमध्यें श्रेष्ठ असे कर्णादि इतर योद्धेही त्यांच्या पक्षाला आहेत. त्यांच्या संबंधानेंही विचार केला पाहिजे. ' याप्रमाणें बोलाचाल होऊन अखेरीस प्रथम अर्जुनानें शंकरांपासून पाशुपतास्त्र व दुसऱ्या देवांपासून दुसरीं अस्त्रें मिळवून घ्यावीं व वनवास आणि अज्ञातवास काढून वचन पूर्ण करून मग युद्धाला उठावें, असें सर्वानुमतें ठरून अर्जुन त्याप्रमाणें शंकरांपासून पाशुपतास्त्र मिळवून घेण्यासाठीं तपश्चर्येला निघून गेला.

किरातार्जुनयुद्ध—पाशुपतप्राप्ति.

अर्जुन शंकरांपासून पाशुपतास्त्रप्राप्तीसाठीं तप करीत बसला असतां शंकर किरातवेष घेऊन त्याकडे आले. अर्जुनाच्या पुढून एक डुक्कर पळत असतां शंकर अर्जुनाला म्हणाले, ' ही शिकार

प्रथम मीं टेहेळली आहे; ह्मणून ती माझी आहे.' अर्जुनानें या बोलण्याकडे दुर्लक्ष्य करून त्या डुकरावर बाण सोडिला. किरातानेंही त्याच वेळीं एक बाण त्यावर सोडिला. हे त्या दोघांनीं सोडलेले दोन बाण एकदम त्या डुकराला लागून त्यांनीं जखमी होऊन तो मरून पडला. अर्जुन ह्मणाला, 'ही शिकार मीं मारिली.' किरात ह्मणाला, 'मीं आधीं सोडलेल्या बाणांनीं हा मरून पडला आहे. प्रथम तो मला दिसला असल्यानें ही माझीच शिकार होय.' हें ऐकून रागानें खवळून जाऊन अर्जुनानें त्यावर बाण सोडिले. याप्रमाणें दोघे परस्परांवर बाणवृष्टि करीत असतां यत्किंचित्‌ही पीडा झाल्याचें न दाखवितां शंकर उभे होते. इकडे आपले सर्व बाण व्यर्थ गेलेले पाहून आपण सोडलेले बाण सहन करण्याची शक्ति शंकरांखेरीज दुसऱ्याला नाहीं हें माहीत असल्यानें अर्जुन विस्मयचकित झाला व भात्यांतले बाण सरलेले पाहून तो मनांत किंचित् कचरला. पूर्वीं खांडव वनांत अग्नीनें आपल्याला ज्यांतील बाण कधींही सरणार नाहींत असे दोन भाते दिले होते, त्यांची त्याला आठवण झाली. त्यांतही बाण नाहींसे झाल्यावर धनुष्यांच्या टोकानें किराताला खेचून वज्रासारख्या कठिण मुष्टीचा प्रहार त्यानें त्यावर केला. किरातानें अगदीं न डगमगतां तो सहन केला व त्यानेंही उलट अर्जुनावर मुष्टिप्रहार केले. याप्रमाणें त्यांचें तुंबळ द्वंद्वयुद्ध झालें. बाहूला बाहू व उराला ऊर घसटून त्यांच्या अंगांतून ठिणग्या बाहेर पडत होत्या. इतक्यांत शंकरांनीं त्याला बराच जेरीला आणून अगदीं मोहित केलें, त्यामुळें तो जमिनीवर निचेष्ट पडला. क्षणभरानें शुद्धीवर येऊन शरण्य जो शंकर त्याला शरण जाऊन त्यानें पार्थिव केला व त्याच्यावर फुलें वाहून त्याची पूजा केली. तीं वाहिलेलीं फुलें किराताच्या डोक्यावर पाहून आनंदभरित होऊन त्यानें त्याच्या पायां-

वर डोकें ठेविलें. त्या दमलेल्या अर्जुनाकडे विस्मित मुद्रेनें पाहून शंकर प्रेमळ शब्दांनीं म्हणाले, ' बा अर्जुना, तुझ्या ह्या अलौकिक कृत्यानें मी फार संतुष्ट झालों आहें. तुझ्यासारखा पराक्रमी व धैर्यशाली दुसरा क्षत्रिय सांपडणार नाहीं. तुझी भक्ति पाहून मी प्रसन्न झालों आहें. माझें आवडतें पाशुपतास्त्र मी तुला देतों. तूंच हें जवळ ठेवण्याला, सोडण्याला व ओढून घेण्याला समर्थ आहेस. हें अस्त्र वाटेल त्यावर सोडूं नकोस. क्षुद्र प्राण्यांवर हें सोडलें असतां त्याच्या योगानें सर्व जगाचा नाश होईल. चराचर अशा तिन्ही लोकांत याला अवध्य असें कांहींच नाहीं. ' असें ह्मणून त्या अस्त्राचा उपयोग कसा करावा हें शंकरांनीं त्याला शिकविलें. पुढें अर्जुन इंद्राकडून दुसरीं अस्त्रें प्राप्त करून घेण्यासाठीं इंद्रलोकाला गेला.

अर्जुनाचा इंद्रलोकीं वास.

इंद्रलोकीं अर्जुन इंद्राच्या आज्ञेनें अस्त्रविद्या, आणि चित्रसेनापासून वाद्य, गायन, नृत्य इत्यादि कला, शिकत राहिला असतां एके वेळीं त्याची दृष्टि उर्वशीवर लागलेली पाहून इंद्रानें चित्रसेनाला तिची व त्याची एकांतांत गांठ घालून देण्यास सांगितलें. चित्रसेनानें तिच्याजवळ ती गोष्ट काढतांच अर्जुनाच्या अनेक गुणांचा लौकिक पूर्वीं ऐकिल्यामुळें व आतां त्याचें प्रत्यक्ष दर्शन झाल्यामुळें हा आपल्यावर प्रसादच झाला असें मानून तिनें त्याला झटकन् रुकार दिला, व नटून सजून मोठ्या झपाट्यानें ती अर्जुनाकडे आली; तेव्हां अर्जुन साशंक मनानें तिला सामोरा गेला व तिला अभिवादन करून गुरुजनाला उचित असा तिचा त्यानें बहुमान केला. तिच्या येण्याचा हेतु समजल्यावर कानांवर हात ठेवून तो म्हणाला, 'अशी गोष्ट तूं माझ्यापाशीं

काढूं नकोस. मला तूं गुरुपत्नीच्या ठिकाणीं आहेस. ह्या ठिकाणीं दुसरा कोणताही विचार मनांत आणणें योग्य होणार नाहीं. इंद्रसभेंत मीं तुझ्याकडे लक्ष्यपूर्वक पाहिलें, त्याचें कारण एवढेंच कीं, तूं पुरुवंशाची जननी आहेस, हा विचार माझ्या मनांत येऊन त्यावेळीं माझे डोळे आनंदानें भरून आले. माझ्या वंशवृक्षाला वाढ देणारी तूं मला माझ्या गुरूहून श्रेष्ठ आहेस. माझ्या माता कुंति व माद्री यांच्यापेक्षांही तूं मला पूज्य आहेस. मी तुझ्या पायांवर डोकें ठेवितों. तूं येथून जा.' हें त्याचें भाषण ऐकून रागानें 'तूं माझें ऐकत नाहींस तर स्त्रियांमध्यें मान न मिळतां तूं षंढाप्रमाणें रहाशील,' असा त्याला शाप देऊन ऊर्वशी परत गेली. इंद्राला ती हकीकत कळल्यावर गोड शब्दांनीं अर्जुनाचें शांतवन करून तो म्हणाला, 'तुझ्या योगानें कुंति आज धन्य आहे. निश्चयामध्यें तूं आज ऋषींना देखील मागें सारिलें आहेस. वत्सा, ऊर्वशीचा शाप देखील तुझ्या हिताचाच होईल. तेराव्या वर्षीं तुम्हाला अज्ञातवास काढावयाचा आहे; त्यावेळेस षंढत्वानें एक वर्ष राहून पुन्हा तुला पुरुषत्व येईल.' पुढें अर्जुन इंद्रलोकीं पांच वर्षें राहून इंद्रापासून सर्व अस्त्रविद्या शिकून द्वैतवनाला आपल्या भावांकडे परत आला.

लोमशयुधिष्ठिरसंवाद.

कोणे एके वेळीं लोमश ऋषि युधिष्ठिराकडे आले असतां, 'धर्मनिष्ठ लोकांना दुःख कशासाठीं भोगावें लागतें व अधर्मी लोक वैभवांत कां असतात,' म्हणून युधिष्ठिरानें विचारल्यावरून लोमश म्हणाले, 'राजा, अधर्मानें वागणारे लोक कांहीं काल उदयाला येतात म्हणून वाईट वाटून घेण्याचें कारण नाहीं; कारण अधर्मानें जरी मनुष्य उदयाला येऊन कांहीं कालपर्यंत सु-

खाचा उपभोग घेत राहिला तरी शेवटीं त्याचा समूळ नाशच होतो. दैत्यांची अधर्मानें भरभराट होऊन पुढें त्यांची काय दशा झाली हें तुला माहीतच आहे. पूर्वीं देवांनीं धर्ममार्ग व असुरांनीं अधर्ममार्ग पतकरला. दैत्य अधर्ममूलक अहंकाराच्या आधीन झाल्यामुळें मोठे गर्विष्ठ झाले व गर्वामुळें विकारवश होऊन त्यांचें वर्तन बिघडलें. तेव्हां क्षमा, लक्ष्मी व स्वधर्म यांनीं लवकरच त्यांना सोडिलें. लक्ष्मीनें देवांचा आश्रय केला व आकाबाईनें असुरांची कास धरली. नंतर लवकरच कलीनें त्यांच्यांत प्रवेश केला व अखेरीस दुर्दशा होऊन कीर्तीला मुकून त्यांचा समूळ नाश झाला. इकडे देवांनीं धर्मशील राहून सुख मिळविलें.'

कृष्णबळरामसंवाद.

कोणे एके वेळीं बळराम व कृष्ण पांडवांना वनवासांत भेटण्याला आले असतां पांडवांना वनवास दुःख भोगतांना पाहून बळराम श्रीकृष्णाला म्हणाला, 'कृष्णा, ह्या जगांत धर्माचरणापासून सुख व अधर्माचरणापासून दुःख प्राप्त होतें, असेंच निश्चयानें ह्मणतां येत नाहीं; कारण, युधिष्ठिर धर्मापासून कधीं यत्किंचित् ढळला नसून त्याला हे क्लेश सोसावे लागत आहेत, व दुर्योधनाला धर्म कधीं स्वप्नीं देखील ठाऊक नसून तो मोठ्या वैभवाच्या शिखराला चढून बसला आहे. तेव्हां धर्मापेक्षां अधर्मच चांगला, असा कोत्या बुद्धीच्या लोकांचा ग्रह होण्याचा संभव आहे. दुर्योधनाचें वैभव व युधिष्ठिराचे क्लेश पाहून कसें वागलें असतां कल्याण होईल, ह्यासंबंधानें लोक बुचकळ्यांत पडणार आहेत. धर्मानें वागणाऱ्यावर प्रसंगविशेषीं संकट येणें शक्य आहे; पण धर्म ज्यानें बाजूला झुगारून दिला आहे, असा मनुष्य वैभवाला कां चढावा? पार्थांना वनवासाला पाठविण्यांत भीष्मद्रोणादिकांच्याही मनाला

कांहीं किंतु वाटला नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे. कुलवृद्ध असा हा सर्व पृथ्वीचा स्वामी ह्मणविणारा पापी धृतराष्ट्र पितृलोकीं गेल्यावर पितरांना काय सांगेल? बिचाऱ्या निरपराधी पुतण्यांशीं सरळ वर्तन न ठेवतां त्यांना राज्यांतून घालवून दिलें, असेंच कीं नाहीं? पूर्वी कोणतें पाप करून ह्या जन्मीं आंधळा झाला आहे, आणि प्रस्तुतच्या अनुचित कृत्यानें पुढील जन्मीं याची काय दशा होणार, हें त्या मूढाच्या मनांत देखील येत नाहीं! खचित स्मशानभूमीवर दैदीप्यमान सुवर्णवृक्ष त्याच्या दृष्टीस पडून त्याला भुलून त्याच्या हातून हें दुष्ट कृत्य होत आहे. हे पांडव धार्तराष्ट्रवनांतील एकंदर वृक्षांचा उच्छेद करण्याला समर्थ असून केवळ युधिष्ठिरासाठीं हे सर्व अपमान निमूटपणें सोशीत आहेत. कौरवांचा समूळ नाश करण्याला भीमार्जुनांना ह्या वनवासाची नुस्ती आठवण पुरे आहे. द्रौपदीला आजपर्यंत कष्ट म्हणून माहित नसून तिला हा दुःसह वनवास सोसावा लागत आहे!' ह्यावर श्रीकृष्ण म्हणाला, 'तुह्मी ह्मणतां हें खरें आहे; पण हा कुरुश्रेष्ठ युधिष्ठिर स्वताच्या बाहुबलानें जी जिंकली नाहीं, अशा भूमीचा उपभोग घेऊं इच्छीत नाहीं. कामानें, लोभानें किंवा भयानें स्वधर्म सोडण्याला हा कधीं तयार होणार नाहीं. ज्यांच्यासारखे पराक्रमी ह्या जगांत कोणी नाहींत,' असे हे भाऊ त्याला साह्याला असतां सर्व पृथ्वीचें राज्य मिळविणें त्याला दुर्घट आहे कीं काय? वेळ येईल तेव्हां आह्मी सर्व रणामध्यें आपापलें शौर्य दाखवून शत्रूंना मारूंच मारूं. राज्यापेक्षां सत्याची याला विशेष चाड आहे, म्हणून कांहीं दिवस कालाकडे दृष्टि देऊन राहिलें पाहिजे.' पुढें श्रीकृष्णबलराम पांडवांचा निरोप घेऊन द्वारकेला निघून गेले.

मारुतीची व भीमाची गांठ.

पुढें एके वेळीं द्रौपदीच्या सांगण्यावरून भीम कुबेराच्या सरोवरांतून आपल्या मनगटाच्या जोरावर सौगंधिक कमलें आणण्याला निघाला असतां त्याला कोणाचा शाप होईल किंवा कोणाशीं त्याची चकमक उडेल ह्या भीतीनें त्याचा भाऊ जो मारुती त्यानें त्याच्यापुढें पडून त्याचा मार्ग अडविला. जांभई देत त्यानें आपली शेपटी जमिनीवर आपटली, व त्याचा भयंकर शब्द झाला. त्यानें आनंदभरित होऊन भीमाच्या अंगावर हर्षरोमांच उभे राहिले. विजेच्या चमकेप्रमाणें ज्यावर नजर ठरत नाहीं, अशा त्या धिप्पाड व बलशाली वानराला आपली वाट अडवून पडलेला पाहून मुळीं न भितां त्याजवळ जाऊन भीमानें गर्जना करून त्याजपाशीं वाट मागितली. मारुती म्हणाला, 'तूं कोण आहेस ? जेथें मनुष्याचें वास्तव्य नाहीं, अशा ह्या वनामध्यें कां आला आहेस ? तूं कोठें निघाला आहेस ? हा देवलोकांचा मार्ग असून सिद्धांशिवाय ह्या मार्गानें कोणाला जातां यावयाचें नाहीं. हीं अमृततुल्य फळें मजपाशीं आहेत तीं खाऊन तूं परत जा. विनाकारण काळाच्या तोंडांत पडूं नकोस.' हें ऐकून भीमसेनानें आपली हकीकत व येण्याचा हेतु सांगून 'तूं कोण,' म्हणून विचारिलें. मारुती म्हणाला, 'मी वानर आहें, मी व्याधिग्रस्त आहें, माझ्यानें हलवत नाहीं. तुला जाणेंच असेल तर मला ओलांडून जा.' भीमानें उत्तर केलें; परमात्मा सर्वांमध्यें व्यापून असल्यानें माझ्या हातून तुझा असा अपमान कधीं होणार नाहीं. वेदाध्ययनानें ह्या परमात्म्याला मीं ओळखलें नसतें तर मारुतीनें ज्याप्रमाणें समुद्र ओलांडला त्याप्रमाणें तुलाच काय पण हा पर्वत देखील ओलांडण्याला मी समर्थ आहें.' 'तूं जें हें मारुतीचें नांव घेतलेंस तो मारुती कोण,' असें मारुतीनें

बळेंच त्याला विचारिलें, तेव्हां भीम म्हणाला, ' हा वानरश्रेष्ठ माझा भाऊ होय. रामायणामध्यें हा फार प्रसिद्ध आहे. ह्यानें रामाच्या बायकोसाठीं शंभर योजनेपर्यंत विस्तीर्ण समुद्र एका उडीसरशी ओलांडला. माझें तेज त्याच्यासारखेंच असून तुला दंड करण्याला मी समर्थ आहें. ऊठ, मला वाट दे. नाहींतर मी तुला ठार करीन. ' ह्याप्रमाणें भीमाच्या ठिकाणीं बलाचा व बाहुवीर्याचा गर्व पाहून मनांतल्या मनांत हासून मारुती म्हणाला, ' कृपा कर. ह्मातारपणामुळें मी उठवणीला आलों आहे. कृपा करून ही माझी शेपटी बाजूला सारून तूं जा. ' भीमाला हें त्याचें भाषण खरेंच वाटून हासत हासत त्यानें आपल्या डाव्या हातानें त्याची शेपटी सहज धरिली, परंतु त्यानें पुष्कळ खटपट केली तरी त्याला ती उचलेना. त्याचें सर्व अंग घामानें डवडवून गेलें. तेव्हां लाजेनें मान खालीं घालून त्या वानरापुढें हात जोडून उभा राहून माफी मागून ' तूं कोण, खरें सांग, ' म्हणून त्यानें त्याला विचारिलें. तेव्हां आपली खरी हकीकत सांगून मारुती त्याला ह्मणाला, 'तूं पुढें गेलास तर कोणाबरोबर तुझी चकमक उडेल किंवा कोणी तुला शाप देईल, एवढ्याचसाठीं हा तुझा मार्ग मीं अडविला.' हें ऐकून भीमाला फार संतोष झाला. गोड शब्दांनीं तो म्हणाला, ' मला आज आपल्यासारख्या थोरांचें दर्शन झालें आहे तेव्हां मी आपल्याला मोठा धन्य समजतों. माझ्यावर आपला हा मोठा अनुग्रहच झाला. पुढें भीमाला सौगंधिक वनाचा मार्ग दाखवून देऊन मारुती म्हणाला, ' कुरुश्रेष्ठा, ह्या मार्गानें तूं यक्षराक्षसांनीं रक्षित अशा कुबेराच्या सौगंधिक वनाला जाऊन पोहोंचशील. स्वधर्मानें वागून कार्याकार्याचा विचार करून तसें वाग. धर्माला न ओळखतां व वृद्धांची सेवा न करतां धर्मार्थांची प्राप्ति कोणालाही होणें शक्य नाहीं. ज्याठिकाणीं अधर्म धर्मप्र-

माणें दिसतो, व धर्म अधर्माप्रमाणें दिसतो, अशा ठिकाणीं मोठ्या हुषारीनें विचाराचें वर्तन ठेविलें पाहिजे. मूर्ख लोकांना ह्या ठिकाणीं भ्रम उत्पन्न होतो. शुचिर्भूतादिक आचारापासून धर्माची उत्पत्ति आहे. विनयसंपन्न राहून दुसऱ्याचें रक्षण करणें हा जो क्षात्रधर्म त्याचें तूं पालन कर. जो राजा सन्मार्गानें जाऊन वृद्ध, शहाणे, बुद्धिमान् व विद्वान् अशा लोकांच्या सल्ल्यानें वागतो त्याचा राज्यशकट सुरळीत चालतो. निग्रहानुग्रहामध्यें ज्या वेळीं राजा योग्य विचार करतो, त्याचवेळीं लोकमर्यादा कायम रहाते. ह्मणूनच शत्रूचा राष्ट्रविस्तार किती आहे, त्याचा किल्ला कसा आहे, त्याच्या बाजूला मित्र किती आहेत, मंत्रगुप्ति कशी आहे, त्याची भरभराट आहे किंवा पडता काळ आहे, इत्यादि गोष्टींसंबंधानें हेराकडून नेहमीं खबर मिळवीत असावी. गुप्त हेर, बुद्धि, मसलत, पराक्रम, युक्ति, शिक्षा व दक्षता हेच राजाला कार्यसिद्धीच्या कामीं उपयोगीं पडतात. साम, दान, दंड, भेद व उपेक्षा ह्यांना एकाच वेळीं किंवा भिन्न भिन्न वेळीं कामीं लावून आपला कार्यभाग साधून घ्यावा. चांगल्या सल्ल्यानें कार्यसिद्धि होते. स्त्री, मूल, मूर्ख, लोभी, हलकट व अर्धवट अशांशीं आपल्या गुप्त गोष्टींचा विचार कधीं करूं नये. समर्थ असतील त्यांच्याकडूनच कारस्थानें चालवावीं. आपल्या व शत्रूच्या लोकांकडून शत्रु काय करतो आहे, काय नाहीं, त्याचें बल किती आहे, इत्यादि गोष्टी नेहमीं काढून घेत असाव्या. आपण होऊन शरण आलेल्या भल्या गृहस्थावर अनुग्रह करावा. भीमा, मीं तुला हा धर्म सांगितला आहे. सविनय राहून तुझ्या वर्णाला सांगितलेल्या धर्माचें तूं अवलंबन कर.' असा उपदेश करून भीमाला त्यानें घट्ट आलिंगन दिलें. स्नेहामुळें डोळे अगदीं पाण्यानें भरून येऊन व गळा दाटून येऊन त्यानें त्याला ' कौरवांचा फडशा पाड़

का, ' ह्मणून विचारिलें. तेव्हां भीम हर्षभरित होऊन ह्मणाला, 'ह्या सर्व गोष्टी झाल्यासारख्या समजून आपण खुशाल असा. आपण आमच्या बाजूला मिळाल्यानें आह्मीं सनाथ झालों आहों. आपल्या केवळ तेजानें आह्मीं शत्रूंना जिंकावें एवढें आपल्यापाशीं माझें मागणें आहे.' मारुतीनें उत्तर दिलें. 'भावाच्या नात्यानें व स्नेहभावानें तूं म्हणतोस तें सर्व मी करीन. शत्रुसैन्यांत शिरून त्यांची दाणादाण उडवून ज्या वेळीं तूं मोठा सिंहनाद करशील, त्या वेळीं अर्जुनाच्या ध्वजावर बसून त्या शब्दाला मी भर पाडीत राहीन व शत्रूंचे प्राणहरण करणाऱ्या मोठ्या आरोळ्या देऊन त्यांना मारण्याचें काम तुम्हाला सोपें करून देईन. ' असें म्हणून मारुती त्या ठिकाणीं गुप्त झाला, आणि द्रौपदीची आज्ञा हीच वाटेला बरोबर शिदोरी घेऊन निघालेला भीम श्रम वगैरे न जुमानतां सौगंधिक कमळें द्रौपदीला आणून देता झाला.

जटासुराचा वध.

पांडव बदरी आश्रमांत रहात असतां कोणी जटासुर नांवाचा राक्षस ब्राह्मणाच्या वेषानें पांडवांच्या आश्रयाला येऊन त्यांच्या सर्व शस्त्रास्त्रविद्येवर बारीक नजर देत, द्रौपदीला उपटून नेण्याची संधि पहात राहिला. त्याला न ओळखतां इतर ब्राह्मणांप्रमाणेंच युधिष्ठिर त्याचीही बरदास्त ठेवी. कोणे एके वेळीं भीम मृगयेला ह्मणून बाहेर गेला असून घटोत्कचही त्याच्या साथीदारांसह बाहेर गेला होता, व लोमशादि महर्षी स्नानाला गेले होते. ही संधि साधून त्या पापबुद्धि राक्षसानें आपलें विक्राळ स्वरूप प्रगट केलें व द्रौपदी व तिन्ही पांडव यांना तो घेऊन निघाला. सहदेवानें आपली शिकस्त करून त्याच्या कचाट्यांतून आपल्याला सोडवून घेतलें व मोठ्यानें भीमाला हाक मारिली. धर्मराज

त्या राक्षसाला ह्मणाला, 'मूढा, मित्र, आपल्यावर विसंबून रहाणारा, ज्याचें आपण अन्न खाल्लें आहे तो व ज्याच्या आपण आश्रयाला राहिलों तो, इतक्यांना पीडा देणें मोठें पाप आहे. तूं आमच्या आश्रयानें सुखांत राहून आमचें अन्न खाल्लें आहेस. असें असून मूर्खाप्रमाणें ही कुबुद्धि तुला कशी आठवली? या कुबुद्धीला अनुरूपच तुला मरण येईल. ह्या पांचालीवर हात टाकून विषाचा पेला तळापासून हलवून तूं गट्ट करीत आहेस.' इतक्यांत गदाधारी भीम त्या ठिकाणीं आला व द्रौपदीला राक्षस उपटून नेत आहेसें पाहून त्वेष चढून तो त्याला ह्मणाला, 'तूं आमच्या शस्त्रास्त्रांची टेहेळणी करीत होतास तेव्हांच मीं तुला जाणलें आहे. तुझ्यासंबंधानें मला मुळीं खातर वाटत नसल्यामुळें मीं त्यावेळीं तुझ्याकडे दुर्लक्ष्य केलें. त्या वेळीं तूं आमचा कांहीं अपराध ही केला नव्हतास. निरपराधी अतिथीला मारणें कोणत्याही कारणानें रास्त नाहीं. म्हणून आजपर्यंत मीं तुझी गय केली. आतां मी तुला तुझ्या बुद्धीप्रमाणें फल देतों. कालसूत्राला अडकविलेला हा गळच तूं गिळला आहेस.' असें ह्मणून ओठ चावून त्वेषानें तो त्यावर तुटून पडला. एकमेकांना आपल्याकडे ओढून गुद्दे देत असतां त्या राक्षसाला अगदीं दमून गेलेला पाहून भीमानें त्याला उचलून चुरगळून त्याचा चेंदा उडवून दिला व एका गुद्यासरशीं त्याचें मस्तक धडापासून वेगळें करून त्याला खालीं पाडिलें.

अजगराची गांठ.

वनवासांत पांडव एकेवेळीं हिमाचलाच्या बिकट देशीं यमुनाकाठीं रहात असतां हातांत धनुष्यबाण घेऊन तेथील प्रदेशांतून यथेच्छ मृगया करीत भीम तोंडानें शिटी वाजवीत मोठ्या

दिमाखानें फिरत असतां, पहातांक्षणीं अंगावर शहारे उत्पन्न करणारा, एक धिप्पाड अजगर पर्वताच्या बेंचक्यांतील एक मोठी दरी अडवून पडलेला त्याच्या दृष्टीस पडला. अंगावरच्या चित्रविचित्र रंगानें तो तकतकीत दिसत होता. चार विक्राळ दांतांनीं व आरक्त नेत्रांनीं त्याचें तोंड उग्र दिसत होतें. जिभेनें ओठ चाटीत कालरूपी तो आपल्या फूत्कारानें त्या ठिकाणीं येणारांना जणूं काय तुच्छच करीत आहेसें वाटत होतें. त्या अजगरानें भीमावर झडप घालून त्याचे दोन्ही हात घट्ट धरिले. वरप्रभावाच्या योगानें त्याचा स्पर्श होतांच भीम त्यापुढें लुला पडला. त्यानें पुष्कळ झटापट खाल्ली तरी यत्किंचितही त्याला स्वतःला सोडून घेतां येईना. त्या अजगरानें आपल्या अजस्त्र अंगानें त्याला वेटाळून घेतलें. त्याचें तें विलक्षण सामर्थ्य पाहून हा एखाद्या वराचा प्रभाव असावा, असें भीमाला वाटलें व शक्तीचा गर्व व्यर्थ असून दैवापुढें कोणाचें कांहीं चालणें शक्य नाहींसें वाटून पुढें धर्मराजाचें कसें होईल या काळजींत तो तेथें अडकून पडला.

इकडे युधिष्ठिराला अनेक दुष्ट शकुन होऊं लागले व त्याचें मन जाग्यावरून उडून गेलें. त्यामुळें त्याला मोठी चिंता उत्पन्न झाली व कांहीं तरी संकट गुदरलें असलें पाहिजे, असें वाटून एकदम 'भीम कोठें आहे,' ह्मणून त्यानें द्रौपदीला विचारिलें. 'त्यांना बाहेर जाऊन बराच वेळ झाला,' असें ती म्हणाली. तें ऐकून धौम्यासहवर्तमान त्याच्या पावलांच्या खुणेनें त्याचा शोध करीत तो निघाला. तेव्हां एका बिकट दरीच्या बेंचक्यामध्यें भीम एका मोठ्या अजगराच्या तावडींत सांपडलेला त्याच्या दृष्टीस पडला. जवळ जाऊन, 'वत्सा, हें संकट तुझ्यावर कसें ओढवलें,' असें म्हणून त्यानें लगेच त्या अजगराची आपल्या भावाला सोडण्याविषयीं विनंति केली. अजगर म्हणाला, 'आल्या वाटेनें परत जा.

नाहींपेक्षां उद्यां तुझीही हीच वाट लागेल. ह्या प्रदेशीं जो येईल त्याला खाऊन टाकण्याचा माझा संकल्प आहे. मी जो प्रश्न तुला विचारीन त्याचें उत्तर देशील तर मी तुझ्या भावाला सोडीन.' युधिष्ठिर म्हणाला, 'खुशाल विचार. माझ्या शक्तीप्रमाणें मी तुझ्या प्रश्नांचें उत्तर देईन. ब्राह्मणाला जेवढें म्हणून कळतें तेवढें सर्व मीं तुला सांगावयाला पाहिजे असें नाहीं.' सर्प म्हणाला, 'हे राजा, ब्राह्मण कोणाला म्हणावें? ह्या जगांत ज्ञान करून घेण्याला योग्य अशी वस्तु कोणती आहे.' युधिष्ठिरानें उत्तर दिलें. 'सत्य, दान, क्षमा, शील, सद्भाव, तप व दया हीं ज्याच्या ठिकाणीं दिसून येतात त्याला ब्राह्मण ह्मणावें.' अजगर ह्मणाला, 'तूं सांगतोस हे गुण शूद्रामध्यें देखील दिसून येतात.' युधिष्ठिरानें उत्तर दिलें, 'जर मीं सांगितलेलें लक्षण शूद्रामध्यें असेल व ब्राह्मणामध्यें नसेल तर त्या शूद्राला शूद्र म्हणतां येणार नाहीं व ब्राह्मणाला ब्राह्मणही म्हणतां येणार नाहीं. मीं सांगितल्याप्रमाणें ज्याचें वर्तन दिसून येईल, तोच ब्राह्मण समजला पाहिजे, व ज्याच्या ठिकाणीं हें दिसून येणार नाहीं, त्याला शूद्रच म्हटलें पाहिजे. जाति, धर्म, आचार वगैरे गोष्टींत आचारच ब्राह्मणत्वाचें मुख्य लक्षण आहे. एखाद्या दुर्वर्तनी नटाप्रमाणें वेदाची कितीही घोकंपट्टी केली तरी त्यांत कांहीं अर्थ नाहीं. धर्माचारानें वागणाराच थोर समजला पाहिजे. धर्मरक्षण काळजीपूर्वक केलें पाहिजे. निर्धन झाल्यामुळें मनुष्याला कमीपणा येत नाहीं; परंतु तो धर्म सोडील तर मात्र त्याचा घात झालाच. एखाद्या दुष्टानें आपल्या थोर कुलाची शेखी मिरविण्यांत कांहीं हशील नाहीं. पुष्कळ सुवासिक फुलांना काय किडे थोडे चिकटले असतात. म्हणून आचारच ब्राह्मणाचें मुख्य लक्षण असून दुराचारी पुरुष जरी चारी वेद पढला असला, तरी त्याला शूद्रापेक्षां नीच

समजलें पाहिजे. प्राणिमात्रांच्या हितामध्यें दक्ष, सर्वांशीं स्नेहानें वागणारा, लोकांचे गुण तेवढे घेऊन दोष मुळींच उघड न करणारा, दीनांची कींव करणारा, सज्जनांवर प्रेम करणारा, व स्वस्त्रीलाच धरून राहणारा, अशालाच ब्राह्मण समजावें.' सर्पानें विचारिलें. ' जर तूं वर्तनावरून ब्राह्मण ठरवितोस तर जोंपर्यंत कृत्य होत नाहीं तोंपर्यंत जातिभेदही नाहींच म्हटलें पाहिजे. ' युधिष्ठिर म्हणाला, ' ह्या मानवसमाजांत सर्व वर्णांचा संकर होत असल्यामुळें जाति ओळखून काढणें कठिण आहे. वाणी, स्त्रीसंबंध, जन्म व मरण हीं सर्वांनाच सारखीं आहेत. माझ्या म्हणण्याला ऋषिवचन देखील प्रमाण आहे. ' ब्राह्मण अगर अन्य जे कोणी आम्ही आहों ते आम्ही यज्ञ करतों, ' असें ते यज्ञाचे पूर्वी म्हणत असतात; म्हणून तत्त्वदृष्ट्या शील हेंच प्रधान गणलें आहे. नाळ कापण्यापूर्वी मनुष्याच्या जातकर्माच्या वेळीं आईला सावित्रीच्या ठिकाणीं व बापाला आच्यार्याच्या ठिकाणीं समजतात. वेद पढेतोंपर्यंत तो शूद्रच समजला जातो. ' असें सांगून ' तूं इतका विद्वान् दिसत असून तुला ही स्थिति कशी प्राप्त झाली, ' म्हणून युधिष्ठिरानें विचारल्यावरून सर्प म्हणाला, ' सोमापासून पांचवा आयूचा पुत्र तुमचा पूर्वज जो नहुष राजा तोच मी. तपादि साधनांच्या योगानें त्रैलोक्यामधलें ऐश्वर्य मला मिळालें, व त्या ऐश्वर्याबरोबरच मला अहंकार उत्पन्न झाला. हजार ब्राम्हण माझा रथ ओढण्याला असत. भल्या शहाण्याच्या देखील डोळ्यावर लक्ष्मीचा धूर येतो. सुखांत मनुष्य स्वतःला विसरतो. मी दिव्य विमानांतून फिरत असें त्यावेळीं अहंकारानें जो जो ह्मणून माझ्यासमोर येई त्याचें त्याचें तेज मी हरण करीत असें. कोणे एके वेळीं अगस्त्यऋषि माझा रथ वाहून नेत असतां माझा पाय त्यांना लागला. 'दूर हो सर्पा, ' असें ते म्हणाल्याबरोबर मी आ-

पल्या वैभवाला मुकून सर्प होऊन खालीं पडलों. ' चुकीनें मज मूढाच्या हातून हा अपराध घडला, त्याबद्दल क्षमा असावी, ' म्हणून मीं त्यांना हात जोडिले. त्यावेळीं दयार्द्र होऊन ते म्हणाले, ' युधिष्ठिर तुला शापयुक्त करून अहंकाररूपी घोर पापाचें फल अनुभवल्यावर फिरून तूं आपल्या पुण्यफलाचा उपभोग घेशील, ' म्हणून ब्राह्मणासंबंधानें तुला मीं प्रश्न केला. खरोखरच सत्य, तप, अहिंसा, दान व धर्म हींच मनुष्याला ब्रह्मसाधन करून देणारीं साधनें आहेत. जाति किंवा कुल व्यर्थ आहे. मी अधोगतीला प्राप्त झालों असून तुझ्यामुळें मला पूर्वस्थिति मिळाली आहे. तूं हे मजवर मोठे उपकार केले आहेस. सत्पात्रीं दान करून गोड व सत्यभाषण करून व अहिंसा हाच श्रेष्ठ धर्म पाळून मनुष्याला स्वर्गप्राप्ति होईल, असा माझा समज आहे.' पुढें 'कर्मांचीं निश्चित फळें किंवा उपभोग यांचा अनुभव कसा येतो,' ह्मणून युधिष्ठिरानें प्रश्न केला असतां सर्पानें उत्तर दिलें, ' राजा, मनुष्यत्व, स्वर्गवास व तिर्यग्योनी अशा तीन गती मनुष्याला आपल्या कर्मांनीं प्राप्त होतात. ह्या तिन्हींमध्येंही मनुष्याला आपल्या कर्मांनीं उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशा तीन गती प्राप्त होतात. काळजीपूर्वक दानादि क्रिया करून, अहिंसादि नियम पाळल्यानें स्वर्गप्राप्ति होते. पापपुण्यमिश्रित कर्मानें मनुष्ययोनि येते. कामक्रोधाच्या तावडींत सांपडून लोभानें प्राणी ज्या वेळीं हिंसा करतो त्यावेळीं तो मनुष्यत्वापासून भ्रष्ट होऊन तिर्यग्योनीमध्यें जन्माला जातो. तिर्यग्योनींतूनही पुन्हा मनुष्यत्व पावतो. गाई व घोडे यांना देवत्व देखील आलेलें मीं पाहिलें आहे; म्हणून प्राणी कर्मानुसारानें ह्या तीन गतींमधून फिरत असतो व ज्ञानी नित्य ब्रह्माशीं आपलें ऐक्य करण्यास झटत असतो. ' ह्याप्रमाणें बोलून युधिष्ठिराला व भीमाला आशीर्वाद देऊन नहुष सर्परूप टाकून

स्वर्गाला गेला, व युधिष्ठिर भीमासह आपल्या आश्रमाला आला.

श्रीकृष्णाची भेट.

एके वेळीं श्रीकृष्ण पांडवांबरोबर बोलत बसला असतां तो युधिष्ठिराला म्हणाला, ' युधिष्ठिरा, राज्यलाभापेक्षां धर्मरक्षण श्रेष्ठ आहे. तप हें त्याचसाठीं सांगितलें आहे. तें साधन तूं करून घेतलें आहेस. ऐहिक विषयांवर तुझी आसक्ति नसून तूं कोणतेंही काम इच्छा धरून करीत नाहींस. अर्थलोभानें धर्माची तुझ्या हातून हेळसांड होत नाहीं. म्हणूनच तुला धर्मराज हें नांव मिळालें आहे. अनेक राष्ट्रें, संपत्ति व उपभोग्य वस्तु तुझ्या स्वाधीन असतांही सत्य, दान, तप, क्षमा व सहनशीलता ह्यांवरची तुझी निष्ठा कायम आहे. ज्यावेळीं सर्व कौरवांसमक्ष द्रौपदीला अनाथाप्रमाणें सभेमध्यें फरफरां ओढीत आणिलें, त्यावेळीं धर्म व लौकिक ह्यांच्या विरुद्ध असें तें कृत्य तुझ्याखेरीज दुसऱ्या कोणींही निमूटपणें सहन केलें नसतें. खचित तुझी सर्व कामना पूर्ण होऊन लवकरच तूं प्रजेचें यथायोग्य पालन करशील. तुझी प्रतिज्ञा जर पुरी झाली असेल तर हें आह्मी कौरवांना त्यांच्या कर्मानुसार प्रायश्चित्त देण्याला तयार आहों.' असें म्हणून द्रौपदीकडे पाहून तो म्हणाला, ' अर्जुनाची फिरून गांठ पडली हेंही ठीकच झालें. द्रौपदी तुझे मुलगे सद्वर्तनानें वागून केवळ धनुर्विद्येकडेच लक्ष्य देऊन आपल्या भल्या आप्तांचा ते कित्ता वळवीत आहेत. तुझा पिता व भाऊ राज्यलोभ दाखवून त्यांना बोलावतात तरी ते तिकडे जात नाहींत. तूं अगर कुंति त्यांना जसें वळण लावून देत असा, हुबेहुब तसेंच सुभद्रा त्यांना वळण लावीत आहे. माझ्या रुक्मिणीचा मुलगा ज्याप्रमाणें अनिरुद्ध, अभिमन्यु व सुनीथ यांची काळजी घेतो,

त्याचप्रमाणें तो त्यांची काळजी घेत आहे. दांडपट्टा करणें, ढाल धरणें, अस्त्रें सोडणें, रथ हाकणें, घोड्यावर बसणें, इत्यादि गोष्टींत तो त्यांना योग्य शिक्षण देत आहे. तुझ्या मुलांचा व अभिमन्यूचा पराक्रम पाहून त्याला मोठें कौतुक वाटतें ? ' ह्याप्रमाणें तिला पुत्रकुशल सांगून तो फिरून युधिष्ठिराला म्हणाला, ' दाशार्ह, कुकुर, अंधक इत्यादि योद्धे फक्त तुझ्या आज्ञेची वाट पहात आहेत. पाप्यांचा शिरोमणी दुर्योधन त्याच्या अनुयायांसहवर्तमान नरकासुर व शिशुपाल यांची वाट केव्हां धरतो असें त्यांना झालें आहे. तूं पाहिजे तर आपला संकेत पाळ; पण दाशार्ह योद्ध्यांना शत्रुपक्षाकडील वीरांना ठार करून तुझ्या स्वागतासाठीं हास्तिनापूर तयार करून ठेवण्याला काय हरकत आहे ? क्रोधाग्नि शांत होऊन प्रतिज्ञा पुरी होईपर्यंत तूं पाहिजे तर वाटेल तेथें हिंड व मनाची हुरहुर दूर झाल्यावर मग आपल्या राष्ट्रांत पाऊल टाक. ' श्रीकृष्णाचा हा विचार ऐकून युधिष्ठिर त्याकडे पाहून त्याची प्रशंसा करून म्हणाला, ' कृष्णा, पांडवांना निःसंशय तूंच आश्रय आहेस. त्यांना आधार काय तो तुझाच आहे. वेळ येईल तेव्हां एवढेंच काय पण ह्यापेक्षांही जास्त मोठें कृत्य तुझ्या हातून खात्रीनें होणार आहे. प्रतिज्ञा केल्याप्रमाणें बारा वर्षें तर निर्जन अरण्यांत घालविलीं. आतां अज्ञातवास पुरा झाल्यावर पांडव तुझ्याच स्वाधीन आहेत. आमच्यासंबंधानें तुझी बुद्धि नेहमीं अशीच राहो म्हणजे झालें. पण कृष्णा, सत्यापासून ढळणें पांडवांच्या हातून कधींही घडावयाचें नाहीं. '

मार्कंडेयांची व पांडवांची भेट.

कोणे एके वेळीं मार्कंडेय ऋषि पांडवांना भेटण्याला आले

असतां उपोद्घातरूपानें धर्मराजानें त्यांना प्रश्न केला, ' भगवन्, मी न्यायानें चालत असून सुखाला मुकलों आहें व धार्तराष्ट्र अन्यायानें चालत असून ऐश्वर्योपभोग घेत आहेत, ह्यावरून मनुष्याला त्याच्या बऱ्यावाईट कर्माचेंच फल मिळतें असें म्हणतां येत नाहीं. मनुष्य आपल्या मनगटाच्या जोरावर सुख मिळवून घेऊं शकतो तर मग ईश्वराकडे कर्तृत्व तें काय राहतें. मनुष्य आपल्या कृत्याचें सुखदुःखरूपी फल केव्हां व कोठें भोगतो ? ' मार्कंडेय म्हणाले, ' मनुष्य, काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादि विकारांच्या तावडींत जाऊन आपल्या दुष्कृत्यांचें प्रायश्चित्त भोगण्याला नरकाला जातात, व ह्या विचित्र संसारामध्यें पुनरपि जननं पुनरपि मरणं याच्या फेऱ्यांत सांपडतात. अनेक रोग मी मी म्हणून त्यांच्या मागें लागतात. त्यांची बुद्धि भ्रष्ट होते. मनुष्य शुभाशुभ कर्में करून आयुष्य सरल्यावर एक शरीर टाकून त्यांचीं फलें भोगण्यासाठीं पुन्हा जन्म घेतो, त्या ठिकाणीं त्याचें पूर्वकर्म छायेप्रमाणें त्याच्या मागून जातें, व तदनुसार सुखाला किंवा दुःखाला जसा तो पात्र असेल तसें तें त्याला मिळतें. काळानें प्राण्याला नशीबाशीं जखडून टाकिलें असून आपल्या कृत्यांचें फल टाळण्यास तो असमर्थ आहे. कांहींना इहलोकीं उत्कृष्ट सुख मिळून परलोकीं तें मिळत नाहीं. कांहींना परलोकीं मिळून इहलोकीं मिळत नाहीं. कांहींना दोन्हीं ठिकाणीं मिळत नाहीं. कांहींना दोन्हीं ठिकाणीं मिळतें. शरीरसुखांत गढलेल्यांना परलोकीं सुख मिळत नाहीं, व अहिंसापर लोकांना परलोकीं सुख मिळतें. प्रथमपासून धर्मानें वागून न्यायानें द्रव्यार्जन करून जे परोपकार करतात, त्यांना इह व पर अशा दोन्ही लोकीं सुख मिळतें, व वरील कोणत्याच गोष्टी न करणारांना कोठेंच सुख मिळत नाहीं.

द्रौपदीसत्यभामासंवाद.

द्वैतवनांत श्रीकृष्ण पांडवांना भेटण्याला आला असतां सत्यभामा त्याबरोबर आली होती. ती कोणे एके वेळीं द्रौपदीशीं बोलत बसली असतां द्रौपदीला ह्मणाली, 'द्रौपदी, तूं आपल्या पांच नवऱ्यांना असें आपल्या मुठींत कसें ठेविलें आहेस? ते कधींच तुझ्यावर रागावत नाहींत. असा काय मंत्रतंत्र तूं केला असशील तो मला सांग, ह्मणजे मीही त्यानें कृष्णाला आपल्या मुठींत ठेवीन.' हें ऐकून भाग्यशाली द्रौपदी ह्मणाली, 'सत्यभामे, पर्यायानें तूं मला कजाग बायका कशा वागतात हेंच विचारतेस? ती वाटच मला ठाऊक नसल्यानें तें मला कसें सांगतां येणार? तुझ्यासारख्या शहाण्या बायकोला असें विचारणें शोभत नाहीं. नवऱ्याला आपली बायको मंत्रतंत्रांत गढली आहे, असें समजल्यावर घरांत शिरलेल्या सापाप्रमाणें तो तिला पाहून भीत असतो, आणि अशा प्रकारें मनानें एकवार कचर खाल्यावर त्याच्या मनाला शांति मुळीं मिळत नाहीं, व शांति नसेल तर सुख तरी कोठून मिळणार? पति कधीं मंत्रतंत्रानें स्वाधीन होत नसतात. बायको एकवार या नादीं लागली म्हणजे तिच्या नवऱ्याच्या वाइटावर असणाऱ्यांना खाण्याला किंवा अंगाला चोपडण्याला औषध म्हणून विष देऊन रोग उत्पन्न करून त्याला मारण्याची संधि सांपडते. अशा नादीं लागून जलोदर, कुष्ठ, म्हातारपण, वगैरे किती तरी रोग दुष्ट बायकांनीं आपल्या नवऱ्यांना जडविले आहेत? बायकांनीं नवऱ्यांच्या मताविरुद्ध कधीं वागूं नये. मी आपल्या पतींशीं कशी वागतें ऐक. मीपणा, राग, लोभ इत्यादि टाकून देऊन सवती असतांही मी काळजीपूर्वक त्यांची शुश्रूषा करतें. मत्सरभाव बाजूला ठेवून सवतींचीं देखील कामें करून मी पतींची मनधरणी करतें. भलतें बोलणें, भलत्या ठिकाणीं बसणें,

भलत्याकडे बघणें, भलतीकडे जाणें याबद्दल नेहमीं खबरदारी घेतें. परपुरुष माझ्या मनामध्यें देखील कधीं येत नाहीं; मग तो देव असो, गंधर्व असो, तरुण असो, किंवा श्रीमान् असो. माझ्या पतींचें जेवण झाल्याखेरीज मी अन्न घेत नाहीं. त्यांचें स्नान झाल्याखेरीज मी अंग धूत नाहीं. ते निजल्याखेरीज मी निजत नाहीं. शेतांतून, वनांतून अगर गांवाहून पति घरीं आले असतां उठून उभी राहून त्यांना पाय धुवावयाला पाणी व बसावयाला आसन देऊन त्यांचा मी मान ठेवितें. उत्तम जेवण तयार करून वेळच्यावेळीं मी त्यांच्या जेवणाची तयारी ठेवितें. मन नेहमीं जाग्यावर ठेवून घरांतील सामानसुमानाची काळजी घेतें. झाडलोट सुद्धां स्वतः करून घर स्वच्छ ठेवितें. वाईट शब्द कधीं बोलत नाहीं, व वाईट स्त्रियांच्या सावलीला सुद्धां कधीं उभी रहात नाहीं. नित्य त्यांना अनुकूल असें वागून आळसाला जवळ येऊं देत नाहीं. थट्टेशिवाय हासणें, दारांत वरचेवर उभें रहाणें, परड्यांत अथवा बागेंत फार वेळ रमणें, इत्यादि गोष्टी मी टाळतें. फार हासणें अगर फार रागावणें मला ठाऊक नाहीं. कामाकरितां पती परगांवाला गेले असतां पुष्पादिकांचा शृंगार न करितां व उटी न लावितां मी व्रतस्थ रहातें. पती जे खातपीत नाहींत किंवा सेवन करीत नाहींत, त्याला मी शिवत नाहीं. पतींच्या सांगण्याप्रमाणें शुद्ध रीतीनें वागून भिक्षा, बली, श्राद्ध, स्थालीपाक, मान्यांचा सत्कार इत्यादि विधि जे घरीं सासूबाईनीं मला सांगितले आहेत व जे मला माहीत आहेत ते मी अहोरात्र, आळस बाजूला ठेवून, पाळीत असतें. जे सौम्य, भले, सत्यशील, सत्यधर्माचें रक्षण करणारे असे असून रागावले असतां सर्पासारखे क्रूर दिसतात, अशा माझ्या पतींची याप्रमाणें मी सेवा करतें. माझा सर्व धर्म पतींना धरून आहे. स्त्रियांचा हा सनातन

धर्म आहे. पती हाच त्यांचा देव असून त्यांना गति तोच आहे. वीरसू कुंति सासूंची खाण्यापिण्याची व कपड्यालत्त्याची व्यवस्था करून मी स्वतः त्यांची शुश्रूषा करीत असें. अन्नवस्त्र व अलंकार त्यांच्यापेक्षां चांगले मी कधीं वापरीत नसें. त्यांना मी कधीं टाकून बोललें नाहीं. पूर्वी महाराजांच्या घरीं भोजन करणाऱ्या सर्व वेदपारंगत ब्राह्मणांची खाण्यापिण्याची वगैरे व्यवस्था मी स्वतः लावीत असें. महाराजांकडे हजारों दासी असत, त्यांची नांवें, स्वरूप, त्या काय खातात, काय पितात, काय नेसतात, त्यांनीं आपआपलीं कामें केलीं किंवा नाहीं, ह्या सर्व गोष्टींची मी चौकशी ठेवी. अंतःपुरांतील सर्व नोकरलोक, गुराखी, मेंढपाळ यांनीं आपापलीं कामें केलीं किंवा नाहींत याची मला माहिती असे. महाराजांचा आदा व खर्च यांची सुद्धां पूर्ण माहिती एकट्या मला असे. घरकारभार सर्व माझ्यावर सोपवून ते सर्व आपापल्या उद्योगांत गढले असत. मीही सर्व सुखाला बाजूला ठेवून तो असामान्य भार रात्रंदिवस काळजीपूर्वक वहात असें. पतींचा सर्व खजिना कायतो मला एकटीला माहीत असे. दिवस असो, रात्र असो, त्यांना भूक, तहान लागली असतां त्यांच्या शुश्रूषेला मी तत्पर असल्यामुळें मला रात्र आणि दिवस सारखेच वाटतात. मी त्यांच्या अगोदर उठून त्यांच्यामागून निजावयाला जातें. सत्यभामे, मजपाशीं मंत्रतंत्र कायतो एवढाच आहे. याहून विशेष मंत्रतंत्र मला माहीत नाहीं. वाईट स्त्रियांचा कित्ता मीं कधीं गिरविला नाहीं व तो गिरविण्याची माझी इच्छाही पण नाहीं. पतींचें मन आपल्याकडे ओढून घेण्याला हा खात्रीचा मार्ग मीं तुला सांगितला. या मार्गानें जाशील तर खात्रीनें तूं दुसऱ्या स्त्रियांपासून पतींचें मन आपल्याकडे ओढून घेशील. लोकांमध्यें पतीसारखें दुसरें दैवत नाहीं. त्याच्या प्रसादानें सर्व इच्छा परि-

पूर्ण होतील, व त्याच्या रागानें आपला नाश होईल. अपत्य, नानाप्रकारचे भोग, उत्तम वस्त्रालंकार, स्वर्ग व थोर कीर्ति, हीं त्यापासूनच मिळतात. सुखापासून सुखाची प्राप्ति कधीं होत नाहीं. कष्ट सोसले तरच पुढें सुख मिळतें; ह्मणून प्रेमळ अंतःकरणानें तूं कृष्णाची आराधना कर. दासीला कोठें बाहेर पाठविलें असशील तर तिचें सर्व काम तूं स्वतः कर. पूर्ण भावानें ही मला भजते आहे असा तुझा भाव कृष्णाला कळूं दे. पतीनें तुझ्यापाशीं एखादी गोष्ट सांगितली असतां ती फोडण्याजोगती असली तरी बाहेर सांगत बसूं नकोस. कारण कोणी सवत तीच गोष्ट फिरून श्रीकृष्णाला जाऊन सांगेल व त्याच्या योगानें त्याचें तुझ्यावरचें प्रेम उडेल. तुझ्या पतीला कोणी प्रिय असून त्यावर प्रेम करणारे व त्याचें हित पाहणारे कोणी असतील त्यांना हरतऱ्हेनें संतुष्ट ठेव. जो त्याचा द्वेष करीत असेल, ज्याकडे त्याचे दुर्लक्ष्य असेल त्यापासून आणि जे त्याच्याशीं वाकडे व कपटानें वागत असतील त्यांपासून तूं दूर रहा. दुसऱ्याशीं प्रसंग आला असतां गर्व व हलगर्जीपणा टाकून मौन धरून आपला भाव तूं उघड करीत जाऊं नकोस. प्रद्युम्न व सांब या तुझ्या मुलांबरोबर देखील फार गोष्टी सांगत बसूं नकोस. मोठ्या कुलीन व निष्पाप अशा साध्वी स्त्रियांशीं तुझें सख्य असूं दे. कजाग, मस्त, खादाड, चोरट्या अशा दुष्ट बायकांशीं संबंध ठेवूं नकोस. हें मीं सांगितलेलें वशीकरण साधन यशस्कर व भाग्य उदयाला आणणारें आहे.'

दुर्योधनाचा हिरमोड.

कोणे एके वेळीं कर्ण, दुर्योधन, शकुनि व दुःशासन यांची चौकडी बोलत बसली असतां शकुनि ह्मणाला, 'बा दुर्योधना, पांडव

वनवासी झाले आहेत. जी राज्यलक्ष्मी पूर्वीं पांडवांना धरून होती ती आज तुझी झाली आहे. इंद्रप्रस्थीं युधिष्ठिराचें जें राज्य-वैभव होतें तें आज तुला मिळालें आहे. त्याचप्रमाणें सर्व राजे तुला करभार देत असून ' जी महाराज ' ह्मणून तुझा हुकूम मानण्यास एका पायावर तयार आहेत. पांडव वैभवाला मुकून वनवासी होऊन द्वैतवनांत राहिले आहेत. तेव्हां त्यांना हिण-विण्यासाठीं आपण तिकडे जाऊं या. जें आपलें थोर वैभव मित्र व शत्रु या दोघांना पहावयाला सांपडतें त्याचाच योग्य उपयोग झाला ह्मणावयाचा. स्वतः सुखांत असून दुःखांत असलेल्या आपल्या वैऱ्यांना पाहण्यापलीकडे आणखी सुख तें काय आहे ? शत्रूची हीन अवस्था पाहून होणाऱ्या समाधानाहून विशेष समाधान मुलगा, पैसा अथवा राज्य मिळाल्यांत देखील नाहीं. अर्जुनासारख्याला कातडीं व साली नेसून आश्रमामध्यें पाहिल्यानें किती बरें सुख होणार आहे ? झाडाच्या साली नेसून राहणाऱ्या द्रौपदीला तुझ्या बायकोला उत्तम वस्त्र ल्यालेली पाहून विशेष वाईट वाटेल; हें ऐकून आनंदानें दुर्योधन ह्मणाला, ' माझ्याही मनांत हीच गोष्ट आली होती. परंतु तातांचा याला रुकार मिळणार नाहीं. ते त्यांच्या संबंधानें खंती बाळगीत असून तपाच्या सामर्थ्यानें ते आमच्याहून श्रेष्ठ आहेत अशी त्यांची समजूत आहे.' तेव्हां आमचा हेतु त्यांना कळला असतां पुढचा परिणाम टाळण्यासाठीं ते आह्माला जाण्याला परवानगी देणार नाहींत. पांडवांना खिजविण्याखेरीज द्वैतवनामध्यें आमचें दुसरें कांहीं काम नाहीं, हें त्यांना माहीत आहे. त्या भीमार्जुनाला व त्या द्रौपदीला अरण्यामध्यें केविलवाणें पाहून मला जो आनंद होईल तो पृथ्वी मिळाल्यानें सुद्धां होणार नाहीं. त्यांनीं हें माझें वैभव पाहिलें ह्मणजे माझें जीवित सफल झालें. पण कोणत्या सबबीवर निघावें

हेंच मला कळत नाहीं.' यावर कर्ण ह्मणाला, 'मीं एक उपाय योजिला आहे. द्वैतवनामध्यें गोकुळें आहेत त्यांची तूं फार दिवसांत पहाणी केली नाहींस; तर त्यांची पहाणी करण्याच्या मिषानें आपण जाऊं. यांत कांहीं वावगें नाहीं व महाराजांचीही या कामाला संमति मिळेल.' ह्याप्रमाणें ठरवून धृतराष्ट्राची परवानगी घेऊन दुर्योधन, कर्ण, शकुनि व दुःशासन राजास्त्रियांना बरोबर घेऊन मोठ्या थाटानें द्वैतवन पहाण्याकरितां निघाले. मजल दरमजल मुक्काम करीत गोकुळाजवळ येऊन, जलानें व वृक्षांनीं रमणीय आणि अनेक प्रकारांनीं सोईस्कर अशा ठिकाणीं त्यांनीं तळ दिला. तेथें दुर्योधनानें शेंकडों हजारों गाईंची पहाणी केली, व त्यांच्या खुणा तपासल्या. नव्या वासरांना खुणा केल्या व कामाला लावण्याच्या उपयोगीं असलेल्या वासरांचीही नोंद केली. अगदीं लहान वासरें किती आहेत हेंही त्यानें पाहिलें. तीन वर्षांचीं वासरें किती आहेत वगैरे सर्व त्यानें टिपलें. पुढें त्या ठिकाणीं शिकार करीत ते मजेंत राहिले. यावेळीं राजर्षीला उचित असा साद्यस्त नांवाचा यज्ञ वनामध्यें ज्या रीतीनें करतां येणें शक्य होतें, त्या रीतीनें युधिष्ठिरानें आरंभिला होता. दुर्योधनानें आपल्या सेवकांना त्यांच्या जवळच सरोवरावर जलक्रीडा करण्याकरितां तंबू ठोकण्यास पाठविलें. ते तेथें जातात तोंच गंधर्वांनीं त्यांना अटकाव केला. गंधर्वांचा राजा आपल्या लोकांसह अप्सरांना घेऊन त्या सरोवरामध्यें क्रीडा करण्याकरितां पूर्वींच आला होता. दुर्योधनाच्या लोकांनीं त्याच्याकडे येऊन त्याला ती वर्दी दिली; तेव्हां गंधर्वांचें व दुर्योधनाच्या लोकांचें युद्ध जुंपलें. त्यांत दुर्योधनाच्या लोकांचा पाडाव होऊन गंधर्वराज स्त्रिया वगैरे सर्वांसह दुर्योधनाला बांधून घेऊन चालला. दुर्योधनाच्या लोकांनीं पांडवांकडे येऊन ' कौरव व राजस्त्रिया यांना गं-

धर्व घेऊन चालले आहेत, त्यांना सोडवायला चला,' म्हणून दीनवाणीनें धर्मराजाला विनविलें; तेव्हां भीम त्यांना म्हणाला, 'युद्धाची जय्यत तयारी करून मोठ्या कष्टानें जी गोष्ट आम्हाला घडवून आणावयाची होती ती आज अनायासें गंधर्वांनीं घडवून आणिली आहे. आडमार्गानें जाणाराला असेंच फल मिळत असतें. अनाथांचा जो द्वेष करतो, त्याचा पाडाव तिसऱ्याकडूनच होत असतो, असें आह्मीं ऐकिलें होतें, तें आज गंधर्वांनीं हें थोर कृत्य करून प्रत्ययाला आणून दिलें. आज या भूतलावर आमचें प्रिय करणारा कोणी तरी आहे, हें आमचें भाग्यच म्हणावयाचें; कारण आज आह्मी हातपाय बांधून बसलों असतां त्यानें तरी आमची लाज राखिली. उन्ह थंडी, वारा सोसून तपानें शरीर झिझवीत दुःखांत काळ काढीत असणाऱ्या आह्माला हा मूढ आपल्या वैभवानें खिजविण्याला येथें आला;' नाहीं! याप्रमाणें जे वागतात त्यांची खोड अशीच मोडत असते. 'पांडव काय निरुपद्रवी आहेत,' या घमेंडींत तुह्मीं हा खेळ मांडला होता नव्हे का?' याप्रमाणें भीमसेन रागानें बोलत असतां युधिष्ठिर त्याला म्हणाला, 'बा भीमा, निष्टुर भाषण करण्याची ही वेळ नव्हे. भयभीत होऊन आश्रयासाठीं ते आमच्याकडे आले आहेत. अशा संकटांत सांपडलेल्यांना तूं असें लावून बोलूं नयेस. ज्ञातीमध्यें दुही असते, भांडणें असतात व हाडवैरही असतें; परंतु कुलधर्माचा कधीं लोप होत नसतो. जेव्हां कोणी ज्ञातीबाहेरचा आपल्या कुलावर उठतो तेव्हां या तिऱ्हाइतानें केलेला हा अपमान भले लोक कधीं सहन करीत नाहींत. दुर्योधनाला पकडल्यामुळें व स्त्रियांना परपुरुषाचा स्पर्श झाल्यामुळें आपल्या कुळाला बट्टा लागणार आहे. शरण आलेल्यांचें, तसेंच कुलाचें संरक्षण करण्याकरितां, बाबांनो, उठून तयार व्हा, आणि दुर्योधनादिकां-

ची सुटका करा. जो म्हणून क्षत्रिय आहे तो आपल्याला शरण आलेल्याचें त्याच्या शत्रूपासून रक्षण करीत असतो. 'धावा धावा,' ह्मणूत तोंड पसरून शरण आलेल्या शत्रूला आधार देणारे फार विरळ असतात. वरदान, राज्यदान आणि पुत्रजन्म ह्या तीन गोष्टी एका बाजूला, व संकटापासून शत्रूची मुक्तता करणें ही गोष्ट एका बाजूला ठेवून विचार केला असतां हीं तिन्हीं याच्या तोडीला लागणार नाहींत. संकटांत सांपडलेला दुर्योधन तुमच्या बाहुसामर्थ्यानें आपला जीव परत मिळविण्याची इच्छा करतो यापेक्षां आणखी काय पाहिजे ? मीं जर हा यज्ञ सुरू केला नसता तर स्वतःच एकदम धावून गेलों असतों.' अशी धर्मराजाची आज्ञा होतांच सर्व पांडव दुर्योधनाला सोडविण्यासाठीं आयुधांनिशीं निघाले. एका क्षणामध्यें निर्धास्तपणें त्या वनांत शिरून गंधर्वांचा मोड करून दुर्योधन वगैरे मंडळीला त्यांनीं सोडविलें. तेव्हां चित्रसेन म्हणाला, ' नेहमीं धर्मराजाशीं कपटानें वागणारा हा पापी सुटावा हें ठीक नाहीं. धर्मराज अजून याची करणी ओळखीत नाहीं. ' असें ह्मणून सर्व धर्मराजाकडे आले. तेव्हां युधिष्ठिर प्रेमपूर्वक दुर्योधनाला म्हणाला, ' बाबा, पुन्हा असें साहस करूं नकोंस. साहसी लोकांना कधीं सुख मिळत नाहीं. आतां सर्व बंधूंसह खुशाल नगराला परत जा. मनाला वाईट वाटून घेऊं नकोस. ' याप्रभाणें धर्मराजानें आज्ञा दिल्यावर त्याला नमस्कार करून इंद्रियें गळून गेलेल्या एकाद्या रोग्याप्रमाणें लाजेनें अंतःकरण फाटून दुर्योधन तेथून बाहेर पडला, तेव्हां तो कर्णाला ह्मणाला, ' कर्णा, मीं गंधर्वांशीं निकरानें युद्ध केलें व दोन्ही बाजूंच्या सैन्यांचा पुष्कळ नाशही झाला; परंतु मायायुद्धामध्यें गंधर्व अधिक असल्यामुळें आमचा जोर कमी पडून आमचा पराभव झाला व शत्रूंनीं आह्माला बांधिलें; व आमच्या बायकामुलांसह

ते आह्माला घेऊन चालले. तेव्हां आमच्या कोणी सैनिकांनीं पांडवांपुढें जाऊन दांत विचकले. त्यावरून धर्मराजानें आपल्या भावांना गोडीगुलाबीच्या दोन गोष्टी सांगून आमच्या सुटकेकरितां पाठविलें. त्यांनीं आम्हाला सोडवून युधिष्ठिराकडे नेलें; तेव्हां मी इतका लज्जित झालों कीं, भूमी मला शिरण्याला एखादें विवर देईल तर बरें असें मला वाटलें. स्त्रियांच्या समोर अशा दीन स्थितींत मी आपल्या शत्रूच्या तावडींत सांपडलों, यापेक्षां आणखी मानहानि ती काय असावी ? ज्यांचा मी नेहमीं द्वेष करतों, त्यांनीं मला सोडवून जीवदान दिलें ! त्या रणामध्यें जर मला मरण आलें असतें तर तें मला अशा प्रकारानें जगण्यापेक्षां पुष्कळ बरें वाटलें असतें. गंधर्वांनीं मला मारिलें असतें तर पृथ्वीवर माझी कीर्ति होऊन मला उत्तम लोकप्राप्ति झाली असती. आतां पुढचा माझा बेत ऐक. मी उपास काढून मरणार. तुह्मी सर्व नगराला परत जा. शत्रूकडून फटफजीति पावून मी नगराला कधीं परत येणार नाहीं. नगराला येऊन मी तातांना किंवा दुसऱ्या लोकांना काय सांगूं ? आपल्या हातानें आपल्या पायावर धोंडा ओढून घेऊन आतां मी त्यांना तोंड कसें दाखवूं ? ' स्वभावदुष्ट लोकांना संपत्ति, विद्या व ऐश्वर्य हीं मिळालीं असतांही तीं फार दिवस टिकत नाहींत. असें मीं करावयाचें नव्हतें. मूर्खपणानें मी आपण होऊनच हें अनुचित कृत्य करून संकटांत सांपडलों; म्हणून आतां जिवंत राहण्याची सोय नाहीं. ज्याला शत्रूंनीं संकटांतून सोडविलें आहे, असा कोण मानी पुरुष हतवीर्य होऊन शत्रूचा उपहास सहन करीत जिवंत राहील ?' याप्रमाणें कष्टी होऊन तो दुःशासनाला म्हणाला, 'मीं तुला अभिषेक केला आहे असें समजून तूं राजा होऊन कर्णसौबलांच्या साहाय्यानें ह्या भव्य पृथ्वीचें राज्य कर. भावांचें पालन कर. ते तुझ्या पूर्ण

कह्यांत राहतील. ब्राह्मणांच्या ठिकाणीं दक्षतापूर्वक चांगलें वर्तन ठेव. बंधू व मित्र ह्यांना तूं आधार दे. ज्ञातीकडे तुझें लक्ष्य असूं दे. गुरूंचें पालन कर. मित्रांना आनंद दे व शत्रूंना तापद हो.' पुढें त्याची कशीबशी समजूत घालून कर्ण, दुःशासन, शकुनि त्याला नगराकडे घेऊन गेले.

कर्णाचा दिग्विजय.

पांडवांच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकून तें सहन न होऊन एके वेळीं कर्णानें दुर्योधनाची आज्ञा घेऊन स्वारीची तयारी करवून सुमुहूर्तावर तो दिग्विजयाला निघाला. प्रथम द्रुपदनगराला येऊन त्याला त्यानें वेढा दिला व तुंबळ युद्ध करून नानाप्रकारचीं रत्नें करभार म्हणून घेऊन पुढें तो उत्तर दिशेला गेला, आणि भगदत्तादि अनेक राजांना त्यानें जिंकिलें. पुढें हिमाचलावर चढून तेथील राजांना मांडलिक करून नेपाळामध्यें जे राजे होते, त्यांना त्यानें जिंकिलें. नंतर पर्वतावरून खालीं येऊन पूर्वदिशेकडील अंग, वंग, कलिंग, शुंडिक इत्यादि राजांना त्यानें जिंकिलें. पुढें वत्सभूमी जिंकल्यावर मोहन, पत्तन, त्रिपुरी इत्यादि देश हस्तगत करून तो दक्षिण दिशेला आला. तेथें रुक्मिण राजाशीं त्याचें तुंबळ युद्ध झालें. रुक्मिणानें क्षात्रियाला साजेलसें निकरानें युद्ध केल्यावर त्याला विघ्न न करतां प्रेमपूर्वक त्यानें त्याला पुष्कळ सोनें करभार म्हणून दिलें. पुढें पांड्य, शैल, केरल, नील, शिशुपालपुत्र यांना व त्यांच्या आजूबाजूच्या राजांना जिंकून तो पश्चिम दिशेला गेला. तेथें बर्बर, म्लेंच्छ, आटविक इत्यादिकांना जिंकून विपुल संपत्ति घेऊन तो हास्तिनापुराला परत आला. त्याला सामोरा जाऊन त्या रणशूर कर्णाचा जयजयकार करीत दुर्योधन त्याला नगरांत घेऊन आला. या वेळीं नगरामध्यें सत्कार

व धिक्कारयुक्त शब्द कानीं येऊं लागले. कोणी कर्णाची स्तुति तर कोणी त्याची निंदा करीत होते, व कोणी कांहींच न बोलतां स्वस्थ होते. कर्णानें त्या अलोट संपत्तीनिशीं वाड्यांत जाऊन धृतराष्ट्र व गांधारी यांचे पाय मुलाप्रमाणें घट्ट धरिले. धृतराष्ट्रानेंही त्याला आलिंगन दिलें. त्या वेळेपासून दुर्योधनाला व शकुनीला, कर्णाच्या हातून पांडवांचा पराभव झालाच असें वाटूं लागलें.

दुर्योधनाचा वैष्णवयज्ञ–कर्णप्रतिज्ञा.

युधिष्ठिराच्या राजसूययज्ञानें मत्सर उत्पन्न होऊन आपणही तो यज्ञ करावा असें दुर्योधनाच्या मनांत आलें; तेव्हां 'युधिष्ठिर जिवंत असे तोंपर्यंत या कुलांत तो यज्ञ दुसऱ्याला करतां येणार नाहीं,' असें सांगून पुरोहितांनीं त्याला त्याच्याच तोडीचा वैष्णवयज्ञ करण्यास सांगितलें. तेव्हां यज्ञाची सर्व तयारी करून जिकडे तिकडे बोलावणीं पाठविलीं असतां पांडवांना हिणविण्यासाठीं दुर्योधनानें त्यांना बोलावण्यास दुःशासनाला त्यांकडे पाठविलें. तेव्हां युधिष्ठिर ह्मणाला, ' हा थोर यज्ञ करून दुर्योधन पूर्वजांची कीर्ति वाढवीत आहे हें ठीकच आहे. आह्मी सुद्धां आलों असतों; परंतु नाइलाज आहे. तेरा वर्षांचा करार मोडतां येत नाहीं. ' यावर भीमानें ' तेरा वर्षांनंतर रणसत्रामध्यें शस्त्रास्त्रांनीं पेटलेल्या अग्नीमध्यें त्याची आहुती देण्याला आम्ही तिकडे येऊं, ' असा दुर्योधनाला निरोप सांगितला. इकडे नानादेशांहून ब्राह्मण व राजे हास्तिनापुराला आले. त्यांचा यथाविधि व यथाक्रम सत्कार होऊन अन्नाच्या योगानें सर्व तृप्त झाले. नंतर सर्व राजांना त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें अहेर देऊन निरोप दिल्यावर वैभवशाली दुर्योधन नगरांत प्रवेश करीत असतां भाट त्याचा स्तुतिपाठ गात होते. अशा रीतीनें

मिरवत येऊन तो मुख्य आसनावर बसल्यावर कर्ण त्याला ह्मणाला, ' हे भरतश्रेष्ठा, हा यज्ञ शेवटास गेला. आतां पांडवांना युद्धांत मारून राजसूययज्ञ तूं करशील तेव्हां फिरून तुझें अभिनंदन करण्याची मला पाळी येईल. ' यावर ' तूं ह्मणतोस तो योग केव्हां येणार कोणाला ठाऊक, ' असें दुर्योधनानें चिंतापर भाषण केलें; तें ऐकून कर्ण फिरून म्हणाला, ' माझी प्रतिज्ञा ऐक. अर्जुन मेला नाहीं तोंपर्यंत मी आपले पाय रगडून घेणार नाहीं, मांस भक्षण करणार नाहीं, मद्य प्राशन करणार नाहीं, व कोणीही याचना करण्यास आला असतां त्याला 'नाहीं' ह्मणणार नाहीं. ' ही कर्णाची प्रतिज्ञा जेव्हां युधिष्ठिराच्या कानावर गेली, तेव्हां त्याचें तें अभेद्य कवच व अलौकिक वीर्य मनांत येऊन त्याच्या मनाला काळजी पडली.

व्यासांचा युधिष्ठिराला उपदेश.

पांडव वनवासांत कष्ट सोशीत राहिले असतां कोणे एके वेळीं व्यास त्यांची भेट घेण्याकरितां आले. वनवासानें त्यांना कृश झालेले पाहून सद्गदित अंतःकरणानें ते युधिष्ठिराला म्हणाले, ' बा धर्मा, क्लेश भोगून तपाचरण केल्याशिवाय मनुष्याला कोठेंच सुख मिळत नाहीं. सुखदुःखें मनुष्याला आळीपाळीनें येतात. सतत सुखच कोणाला मिळत नाहीं. ब्रह्मज्ञानानें शहाणा मनुष्य सुखाचा काल व संकटकाल ओळखून आनंदी अगर कष्टी होत नाहीं. मिळणारें सुख तसेंच दुःखही अनुभविलें पाहिजे. बी पेरून बसलेल्या शेतकऱ्याप्रमाणें वेळीं जें हातीं पडेल त्यावर संतुष्ट असावें. सत्य, सरलता, कोप नसणें, आपलें दुसऱ्याला वांटून देणें, दम, शम, असूया, अहिंसा, शौच व इंद्रियनिग्रह हीं मनुष्याला पावन करणारीं आहेत. अधर्मप्रिय मूर्ख लोकांचा नी-

चयोनी प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न असतो आणि ती दुःखद योनी मिळाली असतां त्यापासून त्यांना कधीं सुख होत नाहीं. येथें केलेल्या कर्माचें फळ परलोकीं भोगण्यास मिळतें; ह्मणून धर्मामध्यें शरीर झिजवावें. अतिथींचा आदरसत्कार करून योग्यकालीं संतोषवृत्तीनें यथाशक्ति दान करावें. खरें बोलणाराला सुखाचें आयुष्य घालवावयाला सांपडतें. ज्याचें मन आपल्या स्वाधीन आहे, त्याला आपली संपत्ति दुसऱ्याच्या ताब्यांत गेली असतां दुःख होत नाहीं. जो आपली प्राप्ति दुसऱ्याला वांटून देतो व जो दाता आहे, त्याला सर्व भोग व सुखें मिळतात. तो हिंसापराङ्मुख असून त्याला आरोग्यप्राप्ति होते. मानार्ह लोकांना मान देणारे लोक मोठ्या कुलामध्यें जन्माला येतात. जितेंद्रियावर संकट कधीं येत नाहीं. चांगल्या गोष्टीकडे ज्याचा कल आहे, तो मेला असतांही चांगली बुद्धि घेऊनच पुन्हा जन्माला येतो. दान मोठें दुष्कर आहे. मनुष्याला पैशाची हाव फार असते, व तो मोठ्या कष्टानें मिळतो. पैशाकरितां, प्रिय अशा प्राणाचीही पर्वा न करतां लोक समुद्रांत अगर घोर वनांत देखील शिरतात. कोणी शेती करतात, कोणी गाई पाळतात, कोणी बंदेगुलाम होऊन देशोधडी भटकतात; पण अशा दुःखानें मिळविलेला पैसा हातांतून सोडणें कठिण असल्यामुळें दानापेक्षां दुष्कर कांहीं नाहीं. आतां त्यांतल्या त्यांत न्यायानें मिळविलेला पैसा देशकाल पाहून योग्य मनुष्याला दान करावा. अन्यायार्जित द्रव्यानें जो दानधर्म होतो, त्याचें फळ दान करणाराला मिळत नाहीं. शुद्ध मनानें योग्य मनुष्याला स्वल्पदान केलें असलें तरी तें अनंत फलदायक होतें.

दुर्वासांची फजीति.

पांडव वनवासाचे दिवस कंठित असतां त्यांची फजीति करण्याकरितां कोणे एके वेळीं दुर्वासऋषि दुर्योधनाकडे आले असतां त्यांना त्यानें आपल्या शिष्यांसह पांडवांकडे जाऊन त्यांचा आतिथिसत्कार घेण्यास सांगितलें. त्यावरून दुर्वास पांडव जेऊनखिऊन बसले असतां त्यांकडे जाऊन 'भोजन पाहिजे' असें म्हणाले. जेवण वगैरे होऊन स्थाली पालथी पडली असल्यानें आतां काय करावें, म्हणून द्रौपदी काळजींत पडली. युधिष्ठिरानें दुर्वासांना आपल्या शिष्यांसह नदीवर जाऊन स्नान करून येण्यास सांगितलें. द्रौपदीनें श्रीकृष्णाचा धावा केला; तेव्हां श्रीकृष्ण तिच्याकडे येऊन 'मला भूक लागली आहे खायाला दे,' असें तिला ह्मणाला. तेव्हां द्रौपदी लाजून त्याला म्हणाली, 'सूर्यानें दिलेल्या स्थालीमध्यें अन्न माझें जेवण होईपर्यंतच असतें. माझें जेवण झालें आहे; तेव्हां आतां त्यांत अन्न मुळींच नाहीं.' हें ऐकून भगवान् म्हणाला, 'मला फार भूक लागली आहे. ही थट्टेची वेळ नाहीं. लवकर जाऊन ती स्थाली आणून मला दाखीव.' याप्रमाणें बोलून ती स्थाली आणवून तिच्या तोंडाला चिकटून राहिलेलें एक शीत त्यानें खाल्लें, व 'यज्ञभुक् विश्वात्मा यानें तृप्त होवो,' असें म्हणून सहदेवाला ऋषींना भोजनाला हाक मारण्यास सांगितलें. इकडे दुर्वासप्रभृति ऋषि नदींत उतरून स्नान करून वर येतात तों पोट भरून सर्वांना ढेकरा आल्या. दुर्वास म्हणाले, 'पांडवांना तयार करण्यास सांगितलेलें अन्न फुकट घालविल्यानें आपल्या हातून मोठें पाप होणार आहे. अंबरीषांचा प्रभाव मनांत येऊन हरिभक्तपरायण लोकांची मला फार भीति वाटते. पांडव धर्मपरायण असून भगवान् श्रीकृष्णाचें त्यांच्याकडे पूर्ण लक्ष्य आहे. ते रागावले असतां अग्नीप्रमाणें आह्माला जा-

ळून टाकतील. आतां त्यांचा निरोप न घेतांच येथून पळ काढणें बरें.' असें ह्मणून ते सर्व तेथूनच पळून गेले. इकडे सहदेव त्यांचा त्या ठिकाणीं शोध करीत असतां ते निघून गेल्याची बातमी त्याला लागली; ती त्यानें युधिष्ठिराकडे येऊन त्याला कळविली. कदाचित् अपरात्रीला येऊन ते आपला छळ करतील तेव्हां या संकटापासून आपण कसे सुटणार, अशा विचारांत युधिष्ठिराला पडलेला पाहून भगवान् श्रीकृष्ण ह्मणाला, 'तुला आतां त्यांची भीति बाळगण्याचें मुळीं कारण नाहीं. तुमच्या तेजानेंच भिऊन त्यांनीं यापूर्वीच पळ काढिला आहे. नित्य धर्मानें वागणारांवर कधीं मोठें संकट येऊन पडत नाहीं.

जयद्रथाचे पांचपाट.

कोणे एके वेळीं पांडव चारी दिशांना ब्राह्मणांसाठीं मांस आणण्याकरितां मृगयेला गेले होते. द्रौपदी आश्रमामध्यें एकटीच होती. अशा वेळीं सिंधु देशाचा राजा जयद्रथ लग्न करण्यासाठीं शाल्व देशाला मोठ्या थाटानें निघाला होता. तो त्या ठिकाणीं आला असतां पहाण्याबरोबर डोळे दिपवून सोडणारी अप्रतिम लावण्यवती द्रौपदी त्या निर्जन वनीं आश्रमद्वारीं त्याला उभी दिसली. तेव्हां तो तिच्याकडे टकमक पहात उभा राहिला असतां तिलाच उपटून घेऊन जावें असें त्याच्या मनांत येऊन तिच्याजवळ जाऊन 'तूं माझ्याबरोबर चल,' असें तो तिला ह्मणाला. तेव्हां अंगावरील पैठणी हळू हळू सांवरीत द्रौपदी म्हणाली, 'माझ्यासारखीनें तुझ्याशीं बोलूं नये हें मी जाणतें; परंतु तुला उत्तर देण्याला येथें दुसरें कोणी नाहीं, म्हणून मला तुझ्याशीं बोलावें लागत आहे. मी द्रुपदराजकन्या कृष्णा पांच पांडवांची बायको आहें, हें तुला ठाऊक आहेना?' यावर 'राज्याला कायमचे मुक-

लेल्या पांडवांचा इतका दिमाख कशाला दाखवितेस, ' असें जयद्रथ म्हणाला असतां ती फिरून म्हणाली, 'कांहीं तरी थोडी लाज धर; ज्यांचें तेज मोठें असह्य आहे व जे यक्षराक्षसांनासुद्धां डगमगणार नाहींत, अशा इंद्रतुल्य महारथ्यांना माझ्यापुढें तुच्छ करण्याला तुला लाज कशी वाटत नाहीं? भले लोक वनांत राहोत, गृहस्थ धर्मानें राहोत, तपस्वी असोत, विद्यासंपन्न असोत, दुष्टांना त्यांच्या ठिकाणीं स्तुत्य असें कांहींच दिसत नाहीं. ते केवळ कुत्र्याप्रमाणें त्यांच्यावर तोंड टाकीत असतात. आज तूं जो नरकामध्यें पडत आहेस, त्या तुला हाताला धरून बाहेर काढणारा ह्या क्षत्रिय मंडळांत मला कोणी दिसत नाहीं. हिमाचलाच्या पायथ्याशीं संचार करणाऱ्या पर्वतप्राय मदोत्कट हत्तीला ज्याप्रमाणें मूर्ख माणूस केवळ हातांत काठी घेऊन त्याच्या कळपांतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करितो, त्याप्रमाणें तूं मोठ्या बलाढ्य सिंहाच्या छातीवर पाय देऊन त्याचे कल्ले उपटण्याची खटपट करीत आहेस. कळक, केळी, शामा यांना फळें आलीं असतां त्यामुळें केवळ त्यांचाच नाश होतो, तसा तूं आपल्या धाष्टर्यानें आपला नाश करून घेत आहेस.' यावर जयद्रथ तिला बलात्कारानें घेऊन निघाला असतां ती म्हणाली, 'माझें सामर्थ्य तूं ओळखिलें नाहींस. तुझ्या ह्या बलात्कारानें मी तुझ्यापुढें वाकेन असें तूं समजूं नकोस; कारण, माझी खात्री आहे कीं, कृष्णार्जुन माझा शोध करीत आल्याखेरीज कधीं रहाणार नाहींत. आणि जिची काळजी वहाणारे हे आहेत, तिला हरण करण्याची प्रत्यक्ष इंद्राची छाती नाहीं, मग दीन अशा मनुष्याची काय कथा? सूं शब्द करणारे त्यांच्या हातून सुटलेले टोळधाडीसारखे बाण जेव्हां तुझ्या सैन्यांत शिरतील, तेव्हां तुझ्या ह्या दुष्ट बुद्धीबद्दल तुझें तुलाच वाईट वाटूं लागेल. हातांत गदा घेऊन क्रोधविष सोडीत

भीमसेन महाराज तुझ्याकडे धावून येतील, तेव्हां तुला पश्चात्ताप होईल. मी आज खात्रीनें तुला सांगतें कीं, पांडव आज तुला फरफर ओढतांना मी पाहीन. तुझ्यासारख्या दुष्टानें माझा किती जरी छळ केला तरी मी गांगरून जाईन असें समजूं नकोस.' असें म्हणून डोळे वटारून तिनें त्याची निर्भर्त्सना केली. जयद्रथानें न जुमानतां तिच्या लुगड्याला धरून तिला ओढिलें; परंतु तिनें हिसडा दिल्याबरोबर मुळासकट उपटून पडलेल्या झाडाप्रमाणें धाडकन् तो खालीं पडला; परंतु फिरून झटकन् उठून त्यानें तिला धरून रथांत बसविलें. ' ही तुला अशी पचणार नाहीं. क्षात्रधर्म कसा आहे हें तूं लक्ष्यांत आण. ह्या निंद्य कृत्याचें तुला खात्रीनें फल मिळेल, ' असें म्हणत धौम्य तिच्यामागून चालले. इकडे चारी दिशांना फुटून शिकार करून धनुर्धर पांडव फिरून एकत्र होऊन आश्रमाकडे परत येतात तों द्रौपदीच्या दासीला रडत समोर येतांना त्यांनीं पाहिली. ' तूं अशी कां रडतेस, ' असें त्यांनीं तिला विचारिलें असतां ती ह्मणाली, ' बाईसाहेबांना जयद्रथ बलात्कारानें उपटून घेऊन चालला आहे त्यांना सोडवा. ' तेव्हां तिचें समाधान करून पांडव जयद्रथावर चालून गेले. घोड्याच्या टापांनीं उधळलेली धूळ त्यांना पुढें दिसत होती. पायदळामधून ' भीमा धाव ' म्हणून आक्रोश करीत धौम्य चालले होते, त्यांना गांठून ' आपण खुशाल परत जा, ' असें सांगून एखाद्या बहिरीससाण्याप्रमाणें शत्रुसैन्यावर ते तुटून पडले. जयद्रथाला व त्याच्याच रथामध्यें द्रौपदीला बसलेली पाहून त्यांच्या अंगाची लाही उडाली. त्यांनीं मोठ्यानें जयद्रथाला हाक मारिली. पांडवांचीं निशाणें पाहून गाळण उडून जाऊन पळत सुटलेल्या आपल्या सैन्याला ' उभे रहा, हाणा, मागें परता, ' अशा रीतीनें जयद्रथ दम देत होता, तरी त्याच्या सैन्याचा या नरव्या-

थ्रांपुढें दम निघेना. प्रचंड गदा हातांत घेऊन भीमसेन जयद्रथाकडे धावला व तोंडाला असणारा हत्ती व त्यावरील माहुत यांना त्यानें आपल्या गदेनें ठार केलें. इतर पांडवांनींही जयद्रथाच्या सैन्याची मोठी कत्तल उडवून देऊन शिरांवेगळीं धडें व धडांवेगळीं शिरें यांनीं ती रणभूमि झाकून काढिली. कुत्रे, गिधाडें, कोल्हीं, कावळे इत्यादिकांची त्या ठिकाणीं मोठी चंगाळी उडाली. याप्रमाणें सैन्याचा फडशा उडाला असतां घाबरून जाऊन जयद्रथ द्रौपदीला खालीं सोडून देऊन जीव घेऊन पळूं लागला. द्रौपदीला खालीं पाहून धर्मराजानें नकुलाकडून तिला रथांत घेवविलें. जयद्रथ पळून गेल्यानें त्याच्या सैन्याची दाणादाण उडाली असतां त्याचा फडशा उडविण्याचा भीमाचा क्रम चाललाच होता. ‘ अमिषाशिवाय शिकार व्यर्थ आहे, ’ असें ह्मणून अर्जुनानें त्याचें निवारण केलें; व द्रौपदी, धौम्य व नकुळसहदेव यांसह आश्रमाकडे परत जाऊन धर्मराजास द्रौपदीचें समाधान करण्यास सांगून जयद्रथ पाताळांत गेला तरी त्याला आणण्याच्या निश्चयानें तो भीमासह निघाला. तेवेळीं संतापून गेलेली द्रौपदी त्यांना म्हणाली, ‘ तुह्माला जर माझ्या मनासारखें करावयाचें असेल तर त्या परस्त्रीवर हात टाकणाऱ्या सैंधवकुलकलंक्याला तुह्मी ठार करा. त्यानें जीवदानासाठीं तोंड पसरलें तरी त्याला सोडूं नका. ’ नंतर युधिष्ठिरप्रभृति मंडळी परतल्यावर भीमार्जुनांनीं जयद्रथाचा पाठलाग सुरू करून अर्जुनानें कोसावरून बाण सोडून जयद्रथाचे घोडे ठार केले. त्या नरवीराचें तें दुष्कर कर्म पाहून ते जवळ येतांच जयद्रथ अगदीं घाबरून गेला. तेव्हां अर्जुन ह्मणाला, ‘ मूर्खा, अंगामध्यें अशा प्रकारचें शौर्य असून स्त्रियांना बलात्कारानें उपटण्याची हाव कशाला धरतोस? आपल्या लोकांना शत्रूच्या तोंडीं देऊन असा पळ काढण्यास तुला

लाज नाहीं वाटत ? ' पुढें त्वेषानें धावून जाऊन भीमानें त्याची शेंडी धरून त्याला फरफर रथाखालीं ओढिलें, व उचलून जमिनीवर आपटून खूप चेचलें, व तोंड वर करून मुखश्रींतही बऱ्याच लगाविल्या; व थोडा शुद्धीवर येऊन पळण्याच्या बेतांत आहे तोंच त्याच्या ओरडण्याला न जुमानतां त्यानें त्याच्या डोक्यावर खूप लाथा दिल्या, व गुडघे छातीवर देऊन त्याला पुष्कळ कुदललें. याप्रमाणें तो बेशुद्ध झाला असतां आपली बहीण जी दुश्शला तिच्यासाठीं अर्जुन त्याचें निवारण करूं लागला, तेव्हां भीम ह्मणाला, ' हा पापी माझ्या हातून जगूं नये; परंतु त्या दयाशील धर्मराजापुढें, व पोरबुद्धीनें तूं आड येऊं लागलास ह्मणजे तुझ्यापुढें, माझें कांहीं चालत नाहीं. ' असें ह्मणून अर्धचंद्र बाणानें जयद्रथाचे पांचपाट काढून ' मूर्खा, ज्या ज्या मंडळींत किंवा सभांमधून तूं जाशील तेथें तेथें ' मी दास आहें, ' असें कबूल करशील तर मी तुला जीवदान देतों, ' असें तो जयद्रथाला ह्मणाला. जयद्रथानें तें कबूल केल्यावर धुळीनें भरून बेशुद्ध झालेल्या स्थितींत त्याला त्यांनीं रथांत बसवून धर्मराजापुढें आणून उभें केलें. त्याला तशा स्थितींत पाहून धर्मराजानें त्याला सोडून देण्यास सांगितलें. तेव्हां ' याला द्रौपदीची संमति पाहिजे, ' असें भीमानें ह्मटल्यावरून द्रौपदी भीमाकडे व युधिष्ठिराकडे पाहून म्हणाली, ' हा दास बनला आहे व आपण याचे पांच पाटही काढिले आहेत, तेव्हां द्या झालें सोडून. ' पुढें धर्मराजाला नमस्कार करून तो निघाला असतां धर्मराज त्याला म्हणाला, ' तुला मी दास्यांतून मोकळा करून सोडतों. जा. फिरून मात्र असें करूं नकोस. स्त्रियांना उपटण्याची इच्छा धरणें फार वाईट आहे. तूं स्वतः किती हीनबल आहेस व तुला साहाय्य करणारेही किती क्षुद्र आहेत याचा विचार कर. यापुढें

धर्माकडे विशेष लक्ष दे. अधर्माकडे प्रवृत्ति ठेवूं नकोस.' असें ह्मणून त्यानें त्याला निरोप दिला. हें धर्मराजाचें भाषण ऐकून तो तोंड खालीं घालून मुकाट्यानें निघून गेला.

कर्णाचें कवचकुंडल हरण.

पांडवांचा वनवास संपत आला असतां त्यांचा हितकारी इंद्र कर्णाकडे त्याचीं कवचकुंडलें मागण्यासाठीं निघाला; तेव्हां त्याचा तो हेतु ओळखून सूर्य, पुत्रस्नेहानें मनांत कर्णाची कींव करून कुंडलांसंबंधानें त्याकडे आला व वेदसंपन्न अशा ब्राह्मणाच्या वेषांत स्वप्नांत त्याला भेट देऊन म्हणाला, 'बा सत्य भाषण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ अशा तात कर्णा, स्नेहामुळें मी तुला तुझ्या हिताची गोष्ट सांगत आहें ती तूं ऐक. इंद्र पांडवांचें हित करणाच्या इच्छेनें ब्राह्मणवेष घेऊन तुझीं कुंडलें हरण करण्याकरितां तुजकडे येईल. भल्यांनीं याचना केली असतां तूं तुजपाशीं जें कांहीं असेल तें देतोस, नाहीं म्हणत नाहींस; हा तुझा नियम सर्व जगाला माहीत आहे, तसा तो त्यालाही पण माहीत आहे. तो मागावयाला आला असतां त्याला तूं कुंडलें देऊं नकोस. तुझ्या हातून होईल तेवढें करून त्याला दुसऱ्या तऱ्हेनें संतुष्ट कर. त्याला संपत्ति दे, रत्नें दे, वाटेल तें दे; परंतु कांहीं तरी सबब सांगून त्याला परत पाठीव. जर हीं अंगचीं कवचकुंडलें तूं त्याला देशील तर तूं मृत्युमुखीं पडशील. हीं कवचकुंडलें तुझ्या अंगांत आहेत तोंपर्यंत रणामध्यें कोणी तुला मारण्याला समर्थ नाहीं. अमृतापासून यांची उत्पत्ति आहे. जर तुला जिवाची पर्वा असेल तर तूं यांचें जतन कर.' हें ऐकून 'ब्राह्मणवेषधारी मजवर इतकें प्रेम दाखविणारे आपण कोण,' म्हणून कर्णानें त्याला विचारिलें. तेव्हां 'वत्सा, मी सूर्य पुत्रप्रेमामुळें तुला हें सां-

गत आहें, तरी मीं सांगितल्याप्रमाणें वाग, ' असें सूर्य म्हणाला. तें ऐकून कर्ण म्हणाला, ' आपण जी मला ही हिताची गोष्ट सांगत आहां, ती माझ्या कल्याणाचीच असली पाहिजे; पण माझें म्हणणें ऐका. आपण माझ्या या व्रतापासून मला ढळवूं नये एवढें मी आपल्याला हात जोडून मागणें मागतों. इंद्र जर पांडवांच्या हितासाठीं ब्राह्मणवेषानें मजकडे मागावयास येईल तर त्याला मी आपलीं कुंडलें देणार; पण त्रैलोक्यांत दुमदुमणारी माझी कीर्ति जाऊं देणार नाहीं. माझ्यासारख्यांना अपकीर्ति होऊन जीव राखणें चांगलें नाहीं. कीर्ति मिळवून लोकमान्य असें मरण मला पसंत आहे. इंद्र पांडवांसाठीं कुंडलें मागावयाला येईल तर तें मला कीर्तिकर होऊन त्यालाच अकीर्तिकारक होणार आहे. प्राण देऊन सुद्धां मी कीर्ति मिळवूं इच्छितों. कीर्तिमान् पुरुषालाच स्वर्ग मिळतो. नष्टकीर्ति नाश पावतो. मातेप्रमाणें कीर्ति पुरुषाला जन्म देते. उलटपक्षीं अपकीर्तिमान् शरीरानें जिवंत असला तरी मेल्यासारखा आहे. परलोकीं पुरुषाला मुख्य आधार कीर्तीचाच असून इहलोकीं आयुष्य वाढविणारी तीच आहे. म्हणून हीं अंगचीं कवचकुंडलें देऊन सुद्धां मी शाश्वत कीर्ति मिळवीन, व रणांत घोर कर्म करून शत्रूंना जिंकून भीतांना अभय देऊन बाल, वृद्ध, ब्राह्मण यांना महाभयापासून सोडवीन व या शरीराची रणामध्यें आहुती देऊन स्वर्ग देणारी कीर्ति वरीन. प्राण खर्चीं घालून देखील कीर्ति मिळवावयाची हा माझा संकल्प आहे. ' हें ऐकून सूर्य म्हणाला, ' बा कर्णा, आपलें व आपल्या इष्टमित्रांचें अहित करूं नकोस. शरीराला अपाय न करतां प्राणिमात्र यशाची व कीर्तीची इच्छा करतात. तूं जो प्राण खर्चीं घालून शाश्वत कीर्ति मिळविण्यास पहात आहेस, ती कीर्ति खात्रीनें तुझे प्राण घेऊन जाईल. मनुष्य जिवंत असेल तरच त्याला बाप, आई,

मुळें यांचें हित करतां येतें; म्हणून आपण जिवंत असलों तर कीर्ति मिळविण्यांत फायदा. मेल्यावर या भस्मीभूत देहाला कीर्ति घेऊन काय करावयाचें ? मेलेल्याला कीर्तीचें ज्ञान रहात नाहीं व तिचा त्याला उपभोगही मिळत नाहीं. मेल्या मनुष्याला ज्याप्रमाणें माळा घालावी, त्याप्रमाणेंच त्याला कीर्तीचा उपयोग होतो. मी तुला तुझ्या हिताची गोष्ट सांगत आहे; म्हणून मनांत कांहीं विचार न करतां मी सांगतों तसें कर. मी आणखी एकवार तुला सांगतों, हीं कुंडलें इंद्र मागावयाला आला असतां तूं त्याला तीं देऊं नकोस. त्याची कुंडलांसंबंधाची मागणी अनेक प्रकारच्या सयुक्तिक शब्दांनीं मोडून काढ. ही माझी बुद्धि ऐक. तूं नेहमीं ज्या अर्जुनाशीं स्पर्धा करीत आहेस, तो अर्जुन युद्धामध्यें तुझ्यापुढें उभा राहील. हीं कुंडलें तुझ्या कानांत असलीं म्हणजे प्रत्यक्ष इंद्रानें जरी त्याला साहाय्य केलें, तरी त्याच्यानें तुला जिंकवणार नाहीं. म्हणून जर अर्जुनाला युद्धांत जिंकण्याची तुला इच्छा असेल, तर हीं कुंडलें तूं इंद्राला देऊं नकोस.' कर्ण म्हणाला, 'आपण म्हणतां तें खरें; पण याचकाला मला अदेय कांहींच नाहीं हें लक्षांत ठेवा; म्हणून फिरून एकवार आपल्या पायांवर डोकें ठेवून मागतों, मी खोट्याला जितका भितों तितकी मला मृत्यूचीही भीति नाहीं. खऱ्यासाठीं प्राण खर्ची घालण्यालाही माझ्या मनांत विचार येणार नाहीं. आपण जें अर्जुनासंबंधानें बोललां त्यासंबंधानें आपल्याला काळजी नको. त्याला मी खात्रीनें जिंकीन. मी परशुराम व द्रोण यांपासून अस्त्रविद्या मिळविली आहे, व ती कशी आहे हें आपण जाणतांच. परंतु इंद्र मागावयाला आला असतां मी त्याला आपले प्राण देखील देणार. आपण मात्र कृपा करून या माझ्या व्रताच्या आड येऊं नका.' हा कर्णाचा निर्धार पाहून 'निदान इंद्रापासून उलट त्याची अमोघ शक्ति

मागून घेऊन मग त्याला तूं आपलीं कवचकुंडलें दे,' असें सांगून सूर्य निघून गेला. कर्ण भर बारा वाजतां पाण्यांतून उठून हात जोडून सूर्याची प्रार्थना करीत असे. त्या वेळीं द्रव्य मागण्याकरितां पुष्कळ ब्राह्मण त्याकडे येत, व तो त्यावेळीं कोणाला कांहीं नाहीं म्हणत नसे. कोणे एके दिवशीं अशा वेळीं इंद्र ब्राह्मणवेष घेऊन 'भिक्षा दे,' म्हणून त्याकडे आला. कर्णानें त्याचें स्वागत करून 'काय भिक्षा पाहिजे,' ह्मणून विचारिलें. तेव्हां इंद्रानें त्याचीं कवचकुंडलें त्याजपाशीं मागितलीं. तेव्हां कर्ण हासून म्हणाला, 'तूं देवेंद्र आहेस हें मीं पूर्वींच जाणलें आहे. तूं मजपाशीं फुकट याचना करावीस हें तुला शोभत नाहीं; कारण, तूं प्रत्यक्ष देवांचा स्वामी आहेस. मीं हीं कवचकुंडलें तुला दिलीं तर त्यापासून मी शत्रूला वध्य होऊन लोकांमध्यें तूंही उपहासाला पात्र होणार आहेस; म्हणून तूं आपली अमोघ शक्ति मला देऊन हीं कवचकुंडलें घे.' हें कर्णाचें भाषण ऐकून क्षणभर विचार करून इंद्र ह्मणाला, 'बरें आहे. पण ही अट लक्ष्यांत ठेव कीं, ही शक्ति माझ्या हातून सुटली असतां हजारों दैत्यांचा नाश करून फिरून ती माझ्या हातीं येते. तशी ती तुझ्या हातीं न येतां एका प्रबल व तापद शत्रूला मारून ही मजकडे परत येईल.' असें ह्मणून ती शक्ति कर्णाला देऊन त्याचीं कवचकुंडलें घेऊन इंद्र निघून गेला.

यमधर्माची भेट.

पांडव द्वैतवनांत राहिले असतां कोणे एके वेळीं एक हरीण झाडाला शिंगें घाशीत असतां एका तपस्वी ब्राह्मणाची अरणी व मंथा त्याच्या शिंगाला अडकून त्यासह तो पळून चालला. तेव्हां पांडवांकडे धाव घेऊन त्या ब्राह्मणानें त्या परत आणून दे-

ण्याविषयीं त्यांची प्रार्थना केली; तेव्हां सर्व पांडव धनुष्यबाण घेऊन त्या हरणाच्या मागून गेले. त्यांनीं पुष्कळ बाण सोडिले तरी त्यांपैकीं एकही त्या हरणाला न लागतां तो हरीण लवकरच दिसेनासा झाला. हरीण दिसेनासा झाल्यामुळें उद्विग्न होऊन तहान लागून एका वडाच्या छायेखालीं ते बसले. तेव्हां युधिष्ठिरानें नकुलाला कोठून तरी पाणी शोधून आणण्यास सांगितलें. 'बरें' म्हणून नकुल जलाश्रयानें असणारीं झाडें जिकडे होतीं व सारस पक्ष्यांचा किलकिल शब्द जेथून ऐकूं येत होता, त्या दिशेनें पाण्याचा शोध करीत चालला. जवळच त्याला स्वच्छ पाणी दिसलें. तें पाहून तो तें पिण्याला निघाला. 'तेव्हां माझा याच्यावर ताबा आहे, म्हणून माझ्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन मग हें पी व घेऊन जा,' अशी आकाशवाणी झाली. तिला न जुमानतां फार तान्हेला असल्यामुळें नकुल तें पाणी प्याला. त्याबरोबर तो तेथें मरून पडला. त्याला उशीर लागलासें पाहून युधिष्ठिरानें त्याच्या शोधाला व पाणी आणण्याला सहदेवाला पाठविलें. त्याचीही नकुलासारखीच वाट लागली. पुढें भीम व अर्जुन यांना युधिष्ठिरानें पाठविलें असतां त्यांचीही तीच वाट झाली. तेव्हां ते फार वेळ आले नाहींतसे पाहून चिंताकुल होऊन त्या निर्जन वनामध्यें तो स्वतः शिरला. तेथें एका गर्द झाडींत स्वच्छ पाण्याचें एक सरोवर त्याच्या दृष्टीस पडलें. त्याच्याजवळच आपले भाऊ मरून पडलेले पाहून त्याला फार दुःख झालें. तो आपल्या भावांबद्दल शोक करीत असतां त्याच्या अंगाला दरदरून घाम येऊन त्याचा घसा कोरडा पडला. तेव्हां पाणी प्यावें म्हणून तो जलांत शिरणार तोंच 'मी शेवाळ व मासे खाऊन रहाणारा बक असून मींच तुझे भाऊ मारले आहेत. तूं माझ्या प्रश्नांचीं उत्तरें न देतां हें पाणी पिशील तर तूं यांच्यामध्यें पांचवा होशील,'

असा शब्द त्यानें ऐकिला. तेव्हां 'बरें' म्हणून युधिष्ठिरानें त्याच्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें बरोबर दिलीं. तीं ऐकून तो बकरूपी यक्ष ह्मणाला, 'तूं माझ्या प्रश्नांचीं उत्तरें दिलींस तेव्हां ह्या तुझ्या भावांपैकीं कोणाला उठवूं तें सांग.' तेव्हां युधिष्ठिर म्हणाला, 'तर मग हा नकुल उठूं दे.' हें ऐकून यक्ष म्हणाला, 'भीम व अर्जुन हेच कायते तुमचे मुख्य आधारस्तंभ आहेत. तेव्हां ज्याचें बल दहा हजार हत्ती बरोबर आहे, त्या भीमाला सोडून किंवा ज्याच्या बाहुबलावर सर्व पांडव अवलंबून आहेत, त्या अर्जुनाला सोडून हा सावत्र भाऊ जिवंत होण्याविषयीं तूं कां इच्छितोस?' युधिष्ठिर म्हणाला, 'धर्मावर पाणी सोडिलें असतां तो आपला घात करतो व तो राखला असतां आपल्याला तो राखतो. सत्यापेक्षांही सारखी बुद्धि मी श्रेष्ठ धर्म समजतों. कुंति व माद्री ह्या दोघीही माझ्या पित्याच्या बायका असून त्यांच्या ठिकाणीं माझा कमीजास्त भाव मुळींच नाहीं. त्या दोघींचेंही सारखें कल्याण असावें म्हणून हा नकुल जिवंत झाला पाहिजे.' हें ऐकून यक्ष म्हणाला, 'अर्थकामांपेक्षांही ज्याअर्थीं समबुद्धि तुला विशेष वाटली, त्याअर्थीं तुझे सर्व भाऊ उठतील.' असें तो यक्ष म्हणतांच सर्व पांडव उठून त्यांची तहान नाहींशीं झाली. यक्ष धर्मास म्हणाला, 'मी यमधर्म तुला भेटण्याकरितां आलों आहें. अहिंसा, समता, शांति, तप, शुद्धता, निर्मात्सर्य हीं माझ्या प्राप्तीचीं द्वारें आहे. कामक्रोधादि सहा विकार तूं जिंकले आहेस. या सहांपैकीं दोन पूर्ववयामध्यें, दोन मध्य वयामध्यें व दोन वृद्धापकालीं संकटाला कारणीभूत होतात. मीच मृगरूप घेऊन ही अरणी घेऊन पळालों होतों. ही नेऊन त्या ब्राह्मणाला दे.'

धौम्यांचा पांडवांना उपदेश.

बारा वर्षे वनवास संपवून अज्ञातवासाला निघतांना पांडवांनीं आचारी व द्रौपदीच्या दासी वगैरे आश्रितांना घेऊन द्रुपदाकडे जाण्यास धौम्यांना सांगून, इंद्रसेनादि सेवकांना, रथादि वाहनें घेऊन द्वारावतीला जाण्यास सांगितलें. तेव्हां धौम्य त्यांना म्हणाले, ' महात्मे पांडव हो, लोकांत कसें वागावें, हें मीं तुम्हाला सांगावयास नको. तथापि जिव्हाळ्यामुळें मीं सांगतों तें नीट लक्ष्यांत घ्या; म्हणजे राजकुलामध्यें कोणत्याही प्रकारची तुम्हाला अडचण येणार नाहीं. राजाच्या पदरीं रहाणें विशेषतः शहाण्याला मोठें कठिण काम आहे. मानापमानाकडे विशेष लक्ष्य न देतां कसेंबसें अज्ञातवासामध्यें तुम्ही हें वर्ष काढा. राजानें हाक मारिल्याशिवाय त्याची भेट घेऊं नये, किंवा त्याच्या खासगी माणसांवर विश्वास टाकूं नये. ज्या जागेवर दुसरा येण्याचा संभव नाहीं, अशाच ठिकाणीं बसावें. मी राजाच्या प्रीतींतला आहें, असें समजून त्याच्या वाहनांत, त्याच्या पलंगावर, त्याच्या तख्तावर किंवा त्याच्या हत्तीवर बसूं नये. ज्या ठिकाणीं आपण असूं असा दुष्ट हेरांना संशय येणें संभवनीय आहे, त्या ठिकाणीं कधीं राहूं नये. मुकाट्यानें त्याची सेवा करावी. प्रसंगीं त्याची स्तुतीही करावी. खोटें बोलणारांचा राजे तिरस्कार करतात. राजस्त्रियांशीं, अंतःपुरांतील जनांशीं व ज्यांचा राजेलोक द्वेष करतात, अशांशीं अतिप्रसंग करूं नये. क्षुल्लक गोष्ट देखील राजाच्या कानावर घातल्याशिवाय करूं नये. मोठा हुद्दा मिळाला असतां देखील न विचारतां किंवा राजाची आज्ञा न होतां मर्यादा सोडूं नये. मर्यादा सोडणारा, मग तो मुलगा असो, नातु असो अथवा भाऊ असो, त्यावर राजाची इतराजी होते. अग्नि व देव याप्रमाणें मोठ्या हुषारीनें राजाची सेवा केली पाहिजे. त्यांत

कपटभाव धरिला कीं खात्रीनें प्राणावर गदा येते. जें जें म्हणून राजा सांगेल तें तें करून हलगर्जीपणा, अहंपणा किंवा राग बाजूला ठेवावा. कार्याकार्यसंबंधीं प्रश्न उद्भवला असतां राजाला जें प्रियकर व हितकर असेल तेंच सांगावें, व अशाप्रसंगीं प्रियापेक्षां हिताकडे विशेष लक्ष्य द्यावें. सर्व कृत्यांत व सर्व गोष्टींत त्याला अनुकूल असावें. त्याला जें अप्रिय व अहिताचें असेल तें कधींही सांगूं नये व करूं नये. राजसेवा करतांना मी त्याच्या मर्जींतला आहें, हा विचार शहाण्यानें मनांत ठेवूं नये. त्याच्या शत्रूशीं संभाषण करूं नये. राजाच्या उजवीकडे अगर डावीकडे बसावें; कारण पार्श्वभाग हा शस्त्रधारी राजाच्या शरीररक्षकांसाठीं आहे. राजाच्या पुढें उच्च आसनावर बसणें हें कधींच प्रशस्त नाहीं. राजाच्यासमक्ष जरी लूट चालली तरी तिच्यांत आपण पडूं नये; कारण गरीबांना तिचा परिणाम भोगावा लागतो. राजा एखादी गोष्ट थट्टेंत बोलला असतां ती लोकांमध्यें सांगत फिरूं नये. मीच शहाणा, मीच शूर व मीच बुद्धिमान् अशी घमेंड कधीं बाळगूं नये; कारण अशांना राजे लोक तुच्छ करतात. राजाचें प्रियच करीत राहिल्यानें त्याची मर्जी संपादन होऊन अनेक भोग भोगण्यास मिळतात. ज्याच्या कोपाचा परिणाम मोठा अनर्थकारक होतो व ज्याचा प्रसाद मोठा फलप्रद होतो, अशा राजाचें मनानें सुद्धां शहाण्या मनुष्यानें वाईट इच्छूं नये. राजाशीं संभाषण करतांना तोंड वेडेंवाकडें करूं नये. हातापायांचे चाळे सुरू ठेवूं नयेत, वेडेवाकडे शब्द बोलूं नये व खोंकणें, थुंकणें इत्यादि क्रियाही फार जपून कराव्या. एखादी हासण्यासारखी गोष्ट घडली असतांही वेड्यासारखें खदखदां हासूं नये, किंवा फार गंभीरताही आणूं नये; कारण त्यामुळें आपल्याला आढ्य म्हणतात. राजप्रसाद झाला असतां अति आनंद मानूं नये; अगर अप्रतिष्ठा झाल्यानें फार वाईटही

चाटून घेऊं नये. हुशारीनें राहून राजाची व राजपुत्राची जो नेहमीं स्तुति करतो तोच मोठ्या पदाला चढतो, व मान मिळवून चिरकाल राजाच्या मर्जीत रहातो. आपल्याला विनाकारण धरून तुरुंगांत टाकिलें असतांही जो प्रधान राजाची निंदा करीत नाहीं, तोच फिरून वैभवाला चढतो. जो राजाच्या समोर अथवा त्याच्यामागें राजाचे गुणानुवाद गाण्यामध्यें पटाईत असतो, तोच राजसेवक होण्याला योग्य आहे. जो प्रधान जुलुमानें राज्य करण्यास राजाला भर देतो, तो लवकरच स्थानभ्रष्ट होऊन प्राणाला मुकतो. राजापासून आपलें कल्याण झालें आहे, हें लक्ष्यांत ठेवून बोलण्यामध्यें त्याच्याशीं अतिप्रसंग करूं नये; परंतु योग्य प्रसंगीं आपलें वर्चस्व स्थापित करण्यास मागें पुढें पाहूं नये. कधींही हिरमुसलें तोंड न करतां नेहमीं छायेप्रमाणें राजाच्या मागून असणाऱ्या मनुष्याची राजापाशीं डाळ शिजते. कोणालाही हाक मारिली असतां ' काय आज्ञा आहे,' ह्मणून आपण झटकन् पुढें जावें. खासगी अथवा सार्वजनिक कशाही प्रकारचें काम राजानें सांगितलें असतां मागें पुढें पाहूं नये. आपल्या घरांतील माणसांशीं वियोग झाला असतांही त्याबद्दल खेद करीत बसूं नये, व दुःखामध्येंच सुख मिळवून घ्यावें. राजासारखा पोषाख करूं नये. त्याची एखादी मसलत पुष्कळांच्या कानांवर जाऊं देऊं नये. एखाद्या कामावर आपली नेमणूक झाली असतां पैशाला शिवूं नये. पैशाच्या लालचीनें तुरुंग पहाण्याची वेळ येऊन प्रसंगीं मनुष्य प्राणालाही मुकतो. राजा जें आपल्याला वाहन, वस्त्र किंवा अलंकार देईल, तींच आपण नेहमीं वापरावीं, ह्मणजे राजाची आपल्यावर मर्जी बसते. ह्याप्रमाणें एक वर्षभर आत्मनिग्रहानें मीं सांगितल्याप्रमाणें वर्तन ठेवा, ह्मणजे तुमचें राज्य तुम्हाला मिळून पुढें वाटेल तसें वागण्याला तुह्मी मोकळे व्हाल.'

याप्रमाणें धौम्यांचा उपदेश ऐकून घेऊन अज्ञातवासासाठीं विराटनगरी पसंत करून पांडव व द्रौपदी कंक, बल्लव, बृहन्नला, ग्रंथिक, तंतिपाल व सैरंध्री याप्रमाणें नांवें घेऊन वेषांतरांत विराट राजाच्या आश्रयाला येऊन राहिले.

जिमूताचा पाडाव.

पांडव विराटनगरामध्यें अज्ञातवासांत राहिले असतां ब्रह्ममहोत्सव आला, तेव्हां चोहोंकडून तेथें बरेच लोक आले. त्यांमध्यें मोठे शक्तिमान्, धिप्पाड, असे बरेच मल्ल तेथें आले होते. कुस्ती करण्यासाठीं दंगलेंत शिरल्यावर लोकांचा बराच मोठा जमाव त्यांची कुस्ती पाहण्यासाठीं जमला. त्यांमध्यें एक धिप्पाड मल्ल मोठमोठ्यानें वल्गना करीत सर्व मल्लांना कुस्तीला बोलावीत होता. तेव्हां बाकीच्या मल्लांच्या तोंडचें पाणी पळून जाऊन त्यांचीं तोंडें चिमणी एवढीं झालीं. तें पाहून विराटानें आपल्या बल्लवाला त्याबरोबर सामना देण्यास सांगितलें. भीमानें त्या राजाज्ञेला नाइलाजास्तव रुकार दिला; कारण उघडपणें त्याला राजाज्ञा मोडतां येईना. सावकाश पावलें टाकीत दंगलेंत शिरून विराटाला सलाम करून त्यानें आपली कंबर कचली, व ज्यानें आपली कीर्ति दिगंत स्थापित केली होती, अशा त्या जीमूतमल्लाला कुस्तीला बोलाविलें. त्या दोघांमध्यें कुस्ती जुंपली असतां ते समबल असल्यामुळें एकमेकांवर जय मिळविण्याच्या इच्छेनें एकमेकांला पकडण्याला झटपटत होते. नानाप्रकारचे पेच, तोडी, दंडाला दंड भिडविणें, अंगावर तुटून पडणें, फिरून जरा माघार घेणें, स्वारी भरणें, उखाड उचलणें, टांग मारणें, रग्गे देणें, तळहातानें प्रहार करणें, टकरा देणें व गुडघा रेटणें इत्यादिकांनीं त्यांनीं एकमेकांस अगदीं जेरीला आणिलें. त्यानें मजा वा-

टून ज्याची सरशी होई त्याच्या नांवानें मधून मधून ' शाबास ' ह्मणून समाजामधून शब्द निघत असे. ओढून आवळणें, ओढून गरगर फिरवून मागें पाडणें, इत्यादिकांनीं एकमेकांना जेरीला आणून गुडघ्यांनीं ते एकमेकांना रेटीत होते. असें चाललें असतां भीमानें आपल्या कणखर बाहूंनीं त्याला आवळून शंभर वेळां गरगर फिरवून जमिनीवर आपटून चीत केलें. तें पाहून विराटाला मोठा संतोष झाला.

कीचकाचा वध.

याप्रमाणें विराटनगरींत पांडवांचे अज्ञातवासांत दहा महिने लोटले. या अवधींत द्रौपदी सुदेष्णेच्या तैनातींत असतां विराटाचा सेनापती जो महाबलशाली कीचक त्याच्या ती दृष्टीस पडली. प्रतिदेवतेसारख्या तिला त्या ठिकाणीं पाहून त्याचें तिच्यावर मन गेलें, व त्यानें ती आपल्याला मिळवून देण्यास आपल्या बहिणीला सांगितलें; त्यावरून सुदेष्णेनें कांहीं काम सांगून तिला कीचकाकडे पाठविलें. तेव्हां तो तिच्यावर हात टाकूं लागला असतां द्रौपदी म्हणाली, ' हे सूतपुत्रा, हलक्या कुळांतली, दासी, अमंगळ, वेणीफणी करणारी, लोकांचें जिच्याकडे कधीं लक्ष्य देखील जाणार नाहीं, अशा माझ्यावर तुझी नजर कां ? मी दुसऱ्याची बायको आहें. तुझें हें करणें उचित नाहीं. सर्व प्राणिमात्रांना आपापल्या बायका प्रिय असतात. धर्माचाही विचार कर. परस्त्रीवर तूं डोळा ठेवूं नयेस. भलत्या कामाकडे प्रवृत्ति ठेवणें हें भल्याचें काम नव्हे. वेडेपणानें भलती इच्छा करणारा पापी मनुष्य अपकीर्तीला मात्र पात्र होतो, व प्रसंगीं मोठें संकटही त्यावर ओढवतें. ' हें द्रौपदीचें भाषण ऐकून कामांध झालेला कीचक परस्त्रीशीं अतिप्रसंग करण्यांत प्राणावर बेतणारे

व लोकांनीं छीः थुः करण्याजोगे अनेक दोष आहेत, हें कळत असून सुद्धां इंद्रियांच्या ताब्यांत गेल्यानें त्यानें तिच्या उजव्या हाताला धरिलें. द्रौपदी म्हणाली, ' मनानें देखील जर माझें आजपर्यंत पतीसंबंधानें वाकडें पाऊल पडलें नसेल, तर तें सत्य आज माझ्या कामीं पडून तूं मरशील. ' अशा तऱ्हेनें डोळे वटारून ती त्याची निर्भर्त्सना करीत होती, आणि कीचक तिच्या पदराला झोंबतच होता. इतक्यांत जोरानें हिसडा देऊन तिनें आपल्याला सोडवून घेतलें, आणि त्यासरसा समूळ उपटून पडलेल्या झाडाप्रमाणें तो धाडकन् जमिनीवर आपटला. 'हा एकदाचा मरेल तर बरें,' असें म्हणून मनांत जळफळत द्रौपदी अंतःपुराकडे गेली, व हात, पाय, अंग आाणि वस्त्रें धुवून शुद्ध होऊन आतां या संकटाचें निवारण कसें करावें ह्मणून विचारांत पडली. तेव्हां भीमावांचून दुसरा कोणी हें कृत्य करण्याला समर्थ नाहीं, असें तिला वाटून मोठ्या आशेनें तिनें भीमसेनाच्या राहण्याच्या ठिकाणाकडे धाव घेतली व झोपीं गेलेल्या त्याला जागें करून ती त्याला म्हणाली, ' महाराज उठा, मेल्यासारखे असे कां पडलां आहां ? कारण जिवंत माणसाच्या बायकोवर हात टाकून कोणी पापी मनुष्य आजपर्यंत जिवंत राहिला नाहीं, म्हणून मला असें म्हणावें लागत आहे. ' हें तिचें भाषण ऐकून भीमसेन खडबडून जागा होऊन ' काय झालें, ' म्हणून तिला विचारता झाला. तेव्हां द्रौपदी ह्मणाली, ' माझीं दुःखें आपल्याला कळत नाहींत असें नाहीं. असें असून आपण मला उगीच कांहीं तरी विचारतां. दासी म्हणून पूर्वीं मला सभेंत ओढिली तें अजून माझ्या मनांत जळत आहे. त्याचप्रमाणें त्या दुरात्म्या जयद्रथानें वनवासामध्यें जे माझे धिंडवडे केले तेही माझ्याखेरीज दुसरें कोणी सहन करणार नाहीं. आज तो विराटाचा से-

नापती कींचक माझ्या पाठीस लागला आहे. हा मेला राजशालक, सैरंध्री वेषानें मला अंतःपुरांत पाहून ' माझी बायको हो, ' म्हणून दररोज मला टोचतो. महाराज, कोपानें माझें हृदय उकलत चाललें आहे. पांडवांची बायको व द्रुपदाची मुलगी, अशी मी असून आज मला ही दशा आली आहे ! ह्या माझ्या दुःखामुळें सर्व कौरवांना, द्रुपदांना व पांडवांना तोंडावर पदर घेण्याची वेळ आली आहे. भाऊ, सासरे, व मुलें एवढा परिवार असून भाग्याला चढलेल्या दुसऱ्या कोणच्या स्त्रीवर अशीं दुःखें ओढवलीं आहेत ? महाराज, माझा रंग सुद्धां कसा पालटून गेला आहे तो आपल्याला दिसत नाहीं काय ? अरण्यांमध्यें इतकीं दुःखें सोशीत असतां देखील माझी अशी स्थिति झाली नव्हती. पूर्वीं मी किती सुखांत होतें, त्या मला आज हा बटीकपणा आल्यामुळें क्षणभर सुद्धां चैन पडत नाहीं. हा आपल्यावरचा प्रसंग कधीं कोणाच्या ध्यानींमनीं सुद्धां नसेल. इंद्रासारखें आपण ज्या माझें तोंड नित्य पहात असां, त्या मला आज क्षुद्र स्त्रियांच्या तोंडाकडे पहावें लागत आहे. ही समुद्रवलयांकित पृथ्वी जिच्या आज्ञेंत असे, तिला आज सुदेष्णेच्या आज्ञेंत रहावें लागत आहे; जिच्या मागेंपुढें सेवकजन धावत असत, तिला स्वतःला आज दुसऱ्याच्या पुढें धावावें लागत आहे. पण ज्याचें मला सर्वांत अधिक दुःख होत आहे, ती गोष्ट ही कीं, ज्या मीं आजपर्यंत कुंति सासूबाईच्या अंगाला लावण्याखेरीज दुसऱ्या कोणाकरितां गंध उगाळिलें नाहीं, त्या मला आज दुसऱ्याकरितां तें उगाळावें लागत आहे. महाराज, हे माझे हात तरी पहा. ह्यांना असे घट्टे पूर्वीं तुह्मीं कधीं पाहिले होते काय?' असें ह्मणून आपले घट्टे पडलेले हात त्याच्यापुढें करून तिनें आपलें भाषण फिरून सुरू केलें. ' ज्या मला कुंतिसासूबाईची

अगर तुम्हा कोणाची भीति वाटत नसे, त्या मला, ' महाराज काय म्हणतील, गंध चांगलें उगाळलें आहे म्हणतील किंवा वाईट म्हणतील, ' असे विचार मनांत येऊन विराटांच्या पुढें भीत भीत उभें रहावें लागतें. ' ह्याप्रमाणें भीमाला आपलीं दुःखें सांगत त्याकडे पहात असतां तिचे डोळे पाण्यानें भरून आले, आणि दीर्घ सुस्कारे टाकीत ती म्हणाली, ' महाराज, मीं देवांचा यत्किंचितूही अपराध केलेला मला आठवत नाहीं. मरणाला माझ्याकडून हरकत नाहीं, परंतु कर्तव्याला जागून मी जिवंत आहे.' हें तिचें हृदयभेदक भाषण ऐकून भीमाचें हृदय फाटलें व तिचे हात आपल्या तोंडापाशीं नेऊन घळघळां अश्रू ढाळून तोही रडूं लागला. तो म्हणाला, ' आजपर्यंत रक्तवर्ण असलेल्या तुझ्या कोमल हातांना असे घट्टे पडलेना ! धिक्कार असो माझ्या बाहुबलाला आणि अर्जुनाच्या गांडीवाला ! त्या कीचकाचें मी तुकडे उडवून देतों; कीचकाला त्याच्या बांधवांसह आज ठार करतों. आज संध्याकाळीं सारा शोक बाजूला ठेवून त्याची गांठ घे; आणि विराट राजानें जी नवीन नर्तनशाला बांधविली आहे, तेथें रात्रीं भेटण्याचा त्याच्याशीं संकेत कर. ह्मणजे मी जाऊन त्याची व त्याच्या स्वर्गस्थ पूर्वजांची गांठ घालून देतों. ' याप्रमाणें ठरल्यावर द्रौपदी निघून गेली, व ठरल्याप्रमाणें कीचकाला रात्रीं नव्या नृत्यशाळेंत येण्यास तिनें सांगितलें. तेव्हां कीचक आनंदभरित झाला; पण त्या मूढाला आपण सैरंध्रीरूपानें मृत्यूलाच पाचारण केलें आहे हें कळलें नाहीं. चंदनादि सुवासिक पदार्थ अंगाला लावून अलंकार, माळा, इत्यादिकांनीं शरीर विभूषित करण्यामध्यें तो सर्व दिवसभर अगदीं गर्क झाला होता. जळणाऱ्या दिव्याच्या विझतां वेळच्या ज्योतीप्रमाणें त्याचें त्या दिवशींचें सौंदर्य दिसत होतें. त्या आनंदामध्यें तो दिवस गेलेला

सुद्धां त्याला कळला नाहीं. भीम प्रथमच जाऊन गुप्तपणें त्या नृत्यशाळेंत कीचकाची वाट पहात पडला होता. इतक्यांत उत्तम प्रकारें नटलेला हा नराधम अंधारामध्यें त्या ठिकाणीं येऊन द्रौपदीच्या विटंबनेमुळें जळफळत पडलेल्या भीमाला द्रौपदी समजून त्याजवळ जाऊन त्याला स्पर्श करून आनंदानें म्हणाला, 'प्रिये, लावण्यसंपन्न स्त्रियांनीं विभूषित व क्रीडेचें अग्रस्थान असें माझें अंतःपुर सोडून हा मी तुझ्यासाठीं येथें आलों आहें पहा.' भीम म्हणाला, 'तूं कामशास्त्रांत मोठा निपुण असल्यामुळें तुला स्पर्शज्ञान तरी किती सुरेख आहे? स्त्रियांना वेड लावून सोडणारा तुझ्यासारखा दुसरा पुरुष सांपडावयाचा नाहीं यांत शंका नाहीं.' असें म्हणून त्याच्या केसाला त्यानें धरिलें. तेव्हां बलशाली कीचकानेंही हिसडा देऊन भीमाच्या दंडाला धरिलें. तेव्हां ईर्षेला पेटलेल्या ह्या दोघांचें बाहुयुद्ध सुरू झालें. नागाच्या फडाप्रमाणें हात वर उगारून क्रोधरूप विषानें भरलेले ते दोघे नखें व दाढा यांनीं एकमेकांना प्रहार करीत होते. कीचक जोरानें गुद्दे देत होता तरी भीम आपल्या जागेवरून मुळीं ढळला नाहीं. त्या दोन बलशाली वीरांचे दंड एकमेकांवर घासले जात असल्यामुळें मोडून पडणाऱ्या कळकाप्रमाणें त्यांपासून करकर असा भयंकर शब्द निघत होता. कीचकानें आपली शिकस्त करून भीमाला ओढिलें; त्या गुडघ्याच्या रग्यांनीं जाग्यावरून पाऊल थोडेसें सरून भीम जमिनीवर येतो न येतो तोंच फिरून ताठ उभें राहून त्यानें त्याच्या उरावर जोराची थाप मारिली. ती त्यानें जरी सहन केली, तरी तिनें तो जरा खचल्यासारखा दिसूं लागला. तेव्हां भीमानें त्याला छातीवर घेऊन मुष्टिमोदकानें खूप मऊ केलें, व द्रौपदीचा राग शमविण्यासाठीं खालीं पाडून पायांनींही खूप तुडविलें. त्याच्या

कमरेवर गुडघा रेटून व ढोपरें रेचून त्यानें त्याची खूप कणीक तिंबली, व त्याला गरगर फिरवून ह्मणाला, ‘ लोकांच्या बायका उपटूं पहाणाऱ्या अधमांची अशी खोड मोडत असते. ’ रागानें डोळे लाल करून त्यानें त्याचे हातपाय, मानगुटी व डोकें या सर्वांची गठडी वळली, व मांसाच्या गोळ्याप्रमाणें सर्व अंग ठेचून त्याला ठार केलें आणि साध्वी बायकांवर दृष्टि ठेवणारांची काय दशा होते, ती जगास दाखवून तो पाकशाळेकडे निघून गेला.

दक्षिण गोग्रहण.

यापुढें विराटाची युधिष्ठिरावर बरीच भिस्त राहिली. अशा समयीं कृष्णपक्षाच्या त्रयोदशीच्या शेवटीं गोप मोठ्या लगबगीनें, ‘ सुशर्म्यानें गाई हरण केल्या आहेत, ’ म्हणून विराटाला सांगण्यासाठीं नगराकडे धावत आला. तें ऐकून राजानें चतुरंग सैन्य तयार करण्यास हुकूम दिला. सैन्यांतील निरनिराळ्या योध्यांनीं शूरांना शोभणारीं नानाप्रकारचीं लखलखीत चिलखतें आपापल्या हुद्याप्रमाणें अंगावर चढविलीं, मत्स्य राजानेंही उत्तम अभेद्य कवच आपल्या अंगावर चढविलें, व उत्कृष्ट रथांना सोन्याच्या सामानांनीं सजविलेले घोडे जोडून त्यावर विजयशाली ध्वज उभारिले. याप्रकारें तयारी झाल्यावर, कंक, बल्लव, तंतिपाल व ग्रंथिक या वेषांतल्या पांडवांनाही बरोबर घेऊन राजा आपल्या सैन्यानिशी नगराबाहेर पडला, व सूर्य कलत असतांना त्यानें त्रिगर्तांना गांठिलें. गाई परत मिळविण्याला आतुर झालेले त्याचे वीर गर्जना करीत शत्रूवर तुटून पडले. त्यांचें, अंगावर रोमांच उभे करण्यासारखें तुंबळ युद्ध चाललें असतां पायदळ, रथी, स्वार यांच्यामध्यें यमपुरीला भर टाकणारी कत्तल सुरू झाली. एकमेकां-

वर ते तुटून पडत असतां सैन्याच्या धामधुमीमुळें जिकडे तिकडे इतकी धूळ उडून राहिली होती कीं, कांहींच ओळखूं येत नव्हतें. भिरीरी वर जाणाऱ्या बाणांनीं सूर्य अगदीं झाकून गेला. डाव्या व उजव्या हातांनीं धनुर्धारी लोकांनीं सोडलेल्या बाणांनीं आकाश भरून जाऊन ते तेथें काजव्याप्रमाणें चमकूं लागले. रथाला रथ, हत्तीला हत्ती, पायदळाला पायदळ अगदीं भिडून घनचक्कर युद्ध चाललें. वरचे ओठ तुटून पडलेलीं, केस साफ पार झालेलीं व कुंडलादि भूषणांनीं युक्त अशीं हजारों शिरें व बाणांनीं सर्वांग जखमी झालेल्या वीरांचीं हजारों धडें जिकडे तिकडे पसरलीं. नागाच्या फड्याप्रमाणें चंदनचर्चित बाहूंनीं झाकून गेलेल्या त्या भूमीला एक प्रकारची विलक्षण शोभा आली होती. पुढें रक्ताचे पूर वाहूं लागल्यानें जमिनीवरची धूळ दबली. जिकडे तिकडे हाहाकार उडून राहून युद्धाला मर्यादा उरली नाहीं. बाणांनीं संत्रस्त झालेले गरुड आकाशमार्गांतील त्यांची गति बंद झाल्यामुळें ध्वजांला चिकटून राहूं लागले. लोखंडाच्या कांबीप्रमाणें कणखर बाहूंचे वीर एकमेकांवर मोठ्या निकरानें प्रहार करीत असतां परस्परांना हटविण्याचें कोणाच्या हातून होईना. विराटाच्या भावांनीं त्रिगर्तांचे अनेक वीर मारून ते यांच्या अफाट सैन्यामध्यें शिरले, व रथाला रथ भिडवून एकमेकांच्या शेंड्या धरून निकरानें लढूं लागले. विराटानेंही पांचशें रथी, आठशें स्वार व पांच महारथी यांना मारून रथांतून त्या गर्दींमधून सुशर्म्याकडे धावून जाऊन त्याला गांठिलें. युद्धामध्यें कधीं हार न जाणारा सुशर्माही द्वंद्वयुद्ध करण्यासाठीं मत्स्यराजावर चालून आला व त्यांनीं पावसाच्या संततधारेप्रमाणें एकमेकांवर बाणवृष्टि सुरू केली. इतक्यांत अंधार पडूं लागून अंधारानें व धुळीनें सर्व आकाश भरून राहिल्यामुळें योध्यांनीं क्षणभर युद्ध बंद ठेविलें;

पण लवकरच चंद्रोदय होऊन अंधःकार नाहींसा झाला. निर्मळ चांदण्यानें रात्र अगदीं स्वच्छ होऊन त्या वीरांच्या मनाला आल्हाद देऊं लागली. नंतर चंद्रप्रकाशामध्यें फिरून त्यांनीं घनघोर युद्ध केलें. त्यावेळीं कोणीं कोणाची गय केली नाहीं. विराट राजाच्या सर्व सैन्याचा फडशा उडवून सुशर्मा विराटावर धावून गेला, व त्याचा पृष्ठरक्षक आणि सारथि ह्यांना ठार करून त्याला रथाखालीं ओढून जिवंत पकडलें व त्याला आपल्या रथांत बसवून रथ वेगानें हाकून घेऊन चालला. याप्रमाणें तो विराटाला घेऊन निघाला असतां विराटसैन्य घाबरलें. तें पाहून शत्रूला त्राही त्राही करून सोडणाऱ्या भीमसेनाला युधिष्ठिर म्हणाला, ' बा भीमा, विराट राजाची लवकर सुटका कर. त्याच्या राष्ट्रामध्यें आपण मोठ्या इतमामानें आजपर्यंत सुखांत राहिलों व यानें आजपर्यंत आपल्याला एवढेंसुद्धां दुखविलें नाहीं. हे दोघे नकुलसहदेव चक्ररक्षण करतील, यांच्या साहाय्यानें विराटाला सोडवून त्याच्या उपकाराची फेड कर. ' 'बरें' ह्मणून उत्तम धनुष्य हातांत घेऊन भीमसेन मोठ्या आवेशानें सुशर्म्यावर धावून गेला, व एका निमिषामध्यें हजारों घोडे, रथ, हत्ती, माहुत, त्याचप्रमाणें कधीं हार न जाणारे धनुर्धारी वीर, लक्षावधि पायदळ यांना त्यानें मारून टाकिलें. पुढें सुशर्म्याचे घोडे त्याचप्रमाणें त्याचे पृष्ठरक्षक व सारथि यांना ठार करून भीमसेनानें घोर युद्ध चालविलें असतां विराट राजाही सुशर्म्याच्या रथांतून खालीं उतरला व त्याचीच गदा घेऊन तो त्याच्यावर उलटला. सुशर्म्याला पळ काढतांना पाहून भीमसेन म्हणाला, ' हे राजपुत्रा, परत फीर. अशाप्रकारें पळ काढणें तुजसारख्याला शोभत नाहीं. अशा प्रकारच्या शौर्यानें गाई पळवून नेण्याचा तूं विचार केलास हें मोठें नवल आहे ! आपल्या अनुयायांना शत्रूच्या तावडींत देऊन

याप्रमाणें पळणें तुला शोभत नाहीं.' असें म्हणून रथाखालीं उडी घेऊन तो सुशर्म्यावर धावून गेला, व त्याच्या केसाला धरून मोठ्या त्वेषानें त्यानें त्याला जमिनीवर पाडलें. याप्रमाणें त्याला पकडून विरथ केलें असतां त्रिगर्तांच्या सैन्याची भयानें दाणादाण उडाली. याप्रमाणें सुशर्म्याला जिंकून भीम त्या अधमाला विराटापुढें आणून उभा करून म्हणाला, 'हा अधम आपला दास असून याला जिवंत ठेवणें योग्य नाहीं.' तें ऐकून विराट भीमसेनाला ह्मणाला, 'तो बोलून चालून दास बनला आहे, त्याला सोडून दे.' असें ह्मणून त्यानें त्याला सोडून दिलें.

उत्तर गोग्रहण.

याप्रमाणें पांडवांच्या शोधासाठीं सुशर्म्यानें मत्स्यपुरीच्या दक्षिण भागावर हल्ला केला असतां, भीष्म, द्रोण, कर्ण, अश्वत्थामा इत्यादि मोठमोठ्या अस्त्रवेत्त्यांना बरोबर घेऊन दुर्योधनानें तिच्या उत्तर भागावर हल्ला केला, व गुराख्यांना पळवून अनेक रथांचा गराडा देऊन तो बलात्कारानें गाई घेऊन निघाला. गुराख्यांचा नायक घाबरून रथांत बसून घाईघाईनें राजवाड्याकडे गेला, व विराटाच्या मानी उत्तर नांवाच्या मुलाची गांठ घेऊन ती हकीकत त्यानें त्याच्या कानावर घातली. तेव्हां अंतःपुरांतील बायकांपुढें फार बडबड करून उत्तर म्हणाला, 'हा मी गाईंच्या मागून जाण्याला तयार आहें. माझ्या धनुष्याची बळकटी मजपाशीं आहे; परंतु घोड्यांना आवरण्याला एखादा सारथि मला पाहिजे. उत्तम सारथि जर मिळेल तर हत्ती, घोडे, रथ यांनीं पूर्ण अशा त्या कौरवसेनेमध्यें शिरून दुर्योधन, कर्ण, भीष्म इत्यादिकांना त्राही त्राही करून सोडून ह्याच सुमुहूर्तावर मी गाई परत आणीन.' ही त्याची गर्वोक्ति

ऐकून प्रतिज्ञेचा काल संपला आहेसें पाहून 'हा अर्जुनाच्या मोठा प्रीतींतला अनुभवशीर सारथि बृहन्नला तुझें सारथ्य करील,' असें अर्जुनानें द्रौपदीला त्याला सांगण्यास सांगितलें. ही पतीची आज्ञा होतांच बिचारी द्रौपदी लाजत हळू हळू उत्तराकडे जाऊन तिनें त्याप्रमाणें उत्तराला कळविलें. तें ऐकून उत्तर ह्मणाला, 'तुला जर तसें ठाऊक असेल तर माझी कांहीं हरकत नाहीं.' नंतर उत्तरानें आपल्या बहिणीला बृहन्नलेला घेऊन येण्यास सांगितलें. वडील भावाची आज्ञा होतांच ती वीरकन्या उत्तरा नृत्यशाळेत अर्जुनाकडे जाऊन त्याला ह्मणाली, 'बृहन्नले, कौरव गाई घेऊन चालले आहेत, त्यांना जिंकण्यासाठीं दादा निघाला आहे. नुकताच त्याचा सारथि युद्धामध्यें मेला असल्यानें त्याचें सारथ्य करण्याला योग्य असा सारथि नाहीं. तो सारथ्याच्या चौकशींत असतां तूं त्या कामांत पटाईत असून अर्जुनाचें सारथ्य करीत होतीस असें सैरंध्री ह्मणाली; ह्मणून कौरव गाई घेऊन लांब जाण्यापूर्वीं तूं दादाचें सारथ्य करून ह्या कामाला मदत कर. स्नेहभावानें मी हें सांगत आहें. एवढें माझें ह्मणणें तूं ऐकिलें पाहिजेस?' हें तिचें निकराचें भाषण ऐकून वीर्यशाली अर्जुन राजपुत्राकडे जाऊन ह्मणाला, 'माझ्या हातून रणभूमीवर सारथ्य कसें होणार? गाईन, हवें तर नाचेन किंवा निरनिराळ्या प्रकारचीं वाद्यें सांगाल तर वाजवीन; पण हें सारथ्यकर्म माझ्या हातून कसें होणार?' उत्तर ह्मणाला, 'बृहन्नले, तूं गा, नाच किंवा वाद्यें वाजीव; पण ह्या प्रसंगीं लवकर रथांत बसून माझें सारथ्य कर.' हें ऐकून सर्व कांहीं ठाऊक असतांही उत्तरेला हासविण्यासाठीं अर्जुनानें वेडगळ चाळे सुरू केले. खालीं पडलेलें कवच उचलून तो अंगांत उलटेंच घालूं लागला. तें पाहून तेथील मुली खदखदां हासूं लागल्या. त्याला याप्रमाणें गांगरलेला पाहून उत्तरानें

स्वतः त्याच्या अंगांत कवच चढवून त्याला सारथि बनवून उत्तम धनुष्य व पुष्कळ चांगले चांगले बाण घेऊन तो त्यासह रथांत बसून निघाला. त्यावेळीं 'आमच्या बाहुल्यांसाठीं लढाईंत भीष्म-द्रोणादिकांना जिंकून चित्रविचित्र, मऊ, बारीक व चांगलीं वस्त्रें घेऊन ये बरें,' ह्मणून उत्तरा व मुली बृहन्नलेला ह्मणाल्या. तेव्हां युद्धांत उत्तरमहाराज जर मोठमोठ्या योद्धयांना जिंकतील तर मी तुमच्यासाठीं वस्त्रें घेऊन येईन,' असें ह्मणून तो रथ हाकूं लागला. तो व उत्तर रथामध्यें बसून निघाले असतां 'आज कौरवांवर रणामध्यें तुम्हाला जय मिळो,' म्हणून स्त्रियांनीं व मुलींनीं त्यांना आशीर्वाद दिले. अर्जुनानें घोड्यांना चुचकारल्या बरोबर ते आकाशाला जाऊन भिडत आहेत कीं काय, अशा रीतीनें वायुवेगानें चालले. हे दोघे रथी व सारथि फार दूर गेले नाहींत तोंच स्मशानाजवळच त्यांनीं कौरवसैन्य गांठिलें. त्या सागरासारख्या अफाट सैन्याच्या हालचालीनें उठून आकाशाला जाऊन भिडलेल्या धुळीच्या योगानें त्या ठिकाणी कांहीं दिसेनासें झालें होतें. तेव्हां तें अफाट सैन्य पाहून अंगावर कांटा उभा राहून उत्तर गर्भगळित होऊन अर्जुनाला म्हणाला, 'बृहन्नले, कौरवांशीं युद्ध करण्यास मला धैर्य होत नाहीं. माझ्या अंगावर कसा कांटा उभा राहिला आहे पहा. असंख्य वीरांनीं भरलेल्या देवांना देखील अजिंक्य अशा या सैन्यामध्यें माझ्यानें शिरवत नाहीं. हें चतुरंग सैन्य पाहूनच माझ्या मनाची धांदल उडून गेली आहे. ह्या जय्यत कुरुसेनेला पाहून मी गांगरून गेलों आहें. तात नगरामध्यें मला एकट्याला ठेवून सर्व सैन्य घेऊन त्रिगर्तांना जिंकण्याला गेले आहेत. येथें मजपाशीं सैन्य मुळींच नाहीं. मी एकटा या शस्त्रास्त्रविद्येमध्यें परिश्रम केलेल्या अनेक कौरवांशीं कसा युद्ध करूं? तेव्हां नगराला परत चल.' बृहन्नला म्हणाली, 'भयानें याप्रमाणें

दीन होऊन आपण केवळ शत्रूचा आनंद वाढवीत आहां. अद्यापि शत्रूकडून रणामध्यें असें कांहींच अचाट कृत्य झालें नाहीं. आपण होऊनच कौरवांकडे घेऊन चल ह्मणाला. आतां जेथें तें असंख्य ध्वज फडकत आहेत, तिकडे मी आपल्याला घेऊन चलणार. कौरव जीव बचाविण्यासाठीं पृथ्वीच्या पाठीवर कोठें जरी गेले, तरी मी आपल्याला त्या ठिकाणीं घेऊन जाईन. स्त्रियांमध्यें त्याप्रमाणें शौर्याची बडबड करून व लांब लांब वचनें देऊन नगराबाहेर पडल्याबरोबर आतां असा पाय मागें कां घेतां? गाई परत न मिळवितां आपण जर नगराला परत जाल, तर सर्व स्त्रीपुरुष आपल्याला हासतील. मोठा उत्तम सारथि ह्मणून माझीही सैरंध्रीनें सर्वांपुढें शिफारस केली आहे. तर मलाही गाई परत मिळविल्याशिवाय नगराला परत जातां येत नाहीं.' उत्तर ह्मणाला; कौरवांना आमची वाटेल तेवढी संपत्ति हरण करूं दे, त्याचप्रमाणें बायका व पुरुष मला हासूं देत. त्यांना गाई खुशाल नेऊं देत. मला युद्ध कर्तव्य नाहीं. नगरांत कोणी नाहीं. बाबा रागावतील, त्याची मला भीति वाटते.' असें म्हणून तो बावरलेला उत्तर मान, अभिमान, सर्व गुंडाळून ठेवून रथाखालीं उडी घेऊन धनुष्यबाण फेकून देऊन पळूं लागला. बृहन्नला म्हणाली, 'क्षत्रियांनीं रणांतून पळ काढावा हा त्यांचा धर्म नव्हे. युद्धांत मरणें याहून फार चांगलें.' असें म्हणून स्वतः रथांतून खालीं उडी घेऊन त्या पळणाऱ्या राजपुत्राच्या मागून अर्जुन धावूं लागला. ज्याची लांब वेणी व रक्तवस्त्र हीं वाऱ्यानें हालत होतीं, अशा त्याला उत्तराच्या मागून धावतांना पाहून कुरुसैन्यांतील लोक हासूं लागले. त्याला त्या वेषांत पाहून 'राखेमध्यें झाकलेल्या अग्नीप्रमाणें स्त्रीवेषधारी हा कोण असावा,' म्हणून तर्क करूं लागून एकंदर त्याच्या लक्षणांवरून तो अर्जुन असावा असें

त्यांना वाटलें. आतां काय करावें हें कोणाला कांहीं सुचेना. अर्जुन उत्तराच्या मागें शेंपन्नास पावलें जाऊन त्यानें त्याच्या केसाला धरिलें. तेव्हां तो मोठ्या काकुळतीस येऊन म्हणाला, 'हे कल्याणि, माझें ऐक. रथ लवकर मागें परतीव. मनुष्य जगून वांचून राहिला तर सुखाचे दिवस पहातो. मी तुला शुद्ध सोन्याच्या शंभर मोहोरा देईन, सोन्यांत गुंफलेला रत्नांचा हार देईन; आणखीही वाटेल तें तुला देईल. तूं मला सोड.' अशा प्रकारें वेडावून जाऊन बडबडत रडणाऱ्या उत्तराला, हासत हासत रथाजवळ आणून अर्जुन म्हणाला, 'शत्रूबरोबर युद्ध करण्याला जर तुला धीर होत नसेल तर मी युद्ध करतों, तूं माझे घोडे आवर. मी तुझा पाठराख्या आहें असें समजून ह्या अजिंक्य सैन्यावर रथ हाक. तूं खऱ्या क्षात्रियबीजाचा आहेस. शत्रूच्या समोर हातपाय कां गाळतोस? मी कौरवांशीं युद्ध करून गाई परत आणतों.' याप्रमाणें उत्तराला धीर देऊन त्या भयत्रस्ताला अर्जुनानें त्याच्या इच्छेविरुद्ध रथांत बसविलें व त्याला घेऊन तो शमीवृक्षाकडे चालला. तें पाहून भीष्मद्रोणप्रमुख कौरव योद्धे अर्जुनाच्या भीतीनें मनांत घाबरले. त्या सर्वांना उत्साहशून्य झालेले पाहून द्रोणाचार्य म्हणाले, 'प्रचंड व रुक्ष वारा सुटला असून त्यांतून धोंड्यांची वृष्टि होत आहे. नानाविध हत्यारें म्यानांतून पटापट बाहेर निसटताहेत. कोल्हीं भयंकर शब्द करीत आहेत. घोड्यांच्या डोळ्यांतून अश्रु गळत आहेत. निशाणें हालत आहेत. ह्या सर्व दुश्चिन्हांवरून कांहीं तरी मोठें संकट खास येऊन गुदरणार आहे. तेव्हां सर्वजण हुशार राहून गाईंचें संरक्षण चांगलें करा. मोठी कत्तल सुरू होणार. हा वीर धनुर्धारी सर्व शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ पार्थच क्लीबवेषानें आला आहे, यांत बिलकुल संशय नाहीं. हा आम्हा सर्वांना जिंकून खात्रीनें गाई परत नेणार. वनवासानें

पीडून जाऊन खवळलेल्या याच्याशीं, प्रत्यक्ष इंद्रानें याला सर्व शस्त्रास्त्र विद्या शिकविली असल्यामुळें, तोंड देणारा मला तरी कोणी दिसत नाहीं. हिमाचलावर प्रत्यक्ष किरात वेषधारी शंकरांना यानें युद्धांत संतुष्ट केलें आहे.' पुढें उत्तराला फारच घाबरलेला पाहून शमीच्या वृक्षावरून आपलीं आयुधें वगैरे काढून उत्तराला सारथ्य करण्याला सांगून अर्जुन स्वतः युद्धाला तयार झाला व शत्रूच्या अंगावर कांटा उभा करणारा आपला मोठा शंख त्यानें जोरानें फुंकला. त्याबरोबर उत्तर भयत्रस्त होऊन रथांत जागच्याजागीं खिळून गेला. तेव्हां घोड्यांचा लगाम ओढून त्यांना उभे करून अर्जुन उत्तराला धीर देऊन शत्रूवर सरसावला असतां, 'अर्जुनच आपल्यावर चालून येत आहे, सावध असा,' अशी द्रोणांनीं आपल्या लोकांना इषारत दिली. तेव्हां दुर्योधन भीष्मांना म्हणाला, 'तात, पांडवांनीं बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास करावा, ह्याप्रमाणें पूर्वीचा पण आहे. हल्लीं तेरावें वर्ष सुरू असून त्यांतच अर्जुन प्रगट होऊन युद्धाला उभा राहिला आहे; तर मग ह्यांनीं फिरून बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास केला पाहिजे कीं नको?' हें ऐकून भीष्म म्हणाले, 'कालगतीनें नक्षत्रांमध्यें अंतर पडत असल्यानें दर पांचव्या वर्षाला दोन महिने अधिक पडतात व याप्रमाणें तेरा वर्षांमध्यें पांडवांचे पांच महिने बारा दिवस जास्त झाले आहेत असें मला वाटतें. यांनीं आपली वनवासाची प्रतिज्ञा बराबर शेवटास नेली आहे, आणि हेंच जाणून अर्जुनही प्रगट झाला आहे. ते सर्व थोर व धर्मज्ञ असून युधिष्ठिर त्यांचा पुढारी आहे; तेव्हां धर्मामध्यें त्यांची चूक कशी होईल? योग्य उपायाखेरीज राज्य मिळविण्याची ते कधीं खटपट करणार नाहींत. तसें नसतें तर त्याचवेळीं त्यांनीं आपला पराक्रम दाखविला

असता. परंतु धर्मपाशानें जखडले गेल्यानें क्षत्रियवृत्तीपासून ते अणुभर देखील ढळले नाहींत; त्यांना अन्यायानें दोष देणारेच नाश पावतील. प्रसंगीं ते मृत्यु वरतील; परंतु असत्याचा अंगीकार कधीं करणार नाहींत; पण योग्य वेळीं त्यांना मिळावयाचें तें न मिळेल तर प्रत्यक्ष इंद्र रक्षण करण्याला असलेल्या शत्रूला देखील ते जुमानणार नाहींत. आज सर्व शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ जो अर्जुन त्याच्याशीं गांठ आहे.' असें म्हणून त्यांनीं सर्व सेनानायकांना व्यवस्थित उभे करून सेना नीट तयार ठेविली. याप्रमाणें कौरवसैन्य सज्ज उभें राहिल्यावर रथघोषानें ती भूमि दणाणून सोडीत अर्जुन क्षणमात्रांत तेथें येऊन थडकला. भीष्मांच्या सांगण्यावरून दुर्योधन कांहीं सैन्यानिशीं गाई घेऊन रणांतून निघून गेला होता. अंगावर शहारे आणणारा गांडीवाचा शब्द ऐकून, त्या गांडीव धनुष्यधारी अर्जुनाकडे पाहून द्रोणाचार्य म्हणाले, 'हा अर्जुनाचा ध्वजाग्र दुरूनच झळकत आहे. रथाचा त्याचप्रमाणें त्यावरील वानराचा शब्द ऐकूं येत आहे. या सर्वश्रेष्ठ रथामध्यें बसून हा गांडीवधन्वा आपलें वज्रासारखें शब्द करणारें गांडीव धनुष्य पहा कसें वर उचलीत आहे! हे पहा त्याचे दोन बाण माझ्या पायापाशीं येऊन पडले आहेत, व हे दोन माझ्या कानाला चाटून जात आहेत. जणूं काय वनामधून अमानुष कृत्य करून आलेला अर्जुन मला प्रणिपात करून माझ्या कानाला लागून मजपाशीं युद्धाची अनुज्ञाच मागत आहे! आप्तबांधवांना प्रिय असा हा अर्जुन फार दिवसांनीं आपल्या दृष्टीस पडला.' याप्रमाणें इकडे द्रोणाचार्य विस्मय करीत असतां अर्जुन उत्तराला म्हणाला, 'उत्तरा, कौरवसैन्य माऱ्याच्या टप्प्यांत आलें आहे. आतां घोडे आवरून धर. कोण कोण कुरुकुलाधम या सैन्यामध्यें आहेत ते मला पाहूं दे. या सर्वांना सोडून

त्या अहंतापिशाच्चानें झपाटलेल्या दुर्योधनावर चालून जाऊं, म्हणजे यांचा मोड झाल्यासारखा आहे. पुढें द्रोणाचार्य, अश्वत्थामा, कृप, कर्ण, वगैरे मला दिसत आहेत; परंतु राजा कोठें दिसत नाहीं. आपल्या जिवाला जपणारा तो दक्षिण दिशेनें गाई घेऊन निघून गेला असावा असें मला वाटतें; म्हणून ह्यांना सोडून दे, आणि दुर्योधन ज्या ठिकाणीं असेल तिकडे रथ घेऊन चल. तेथेंच मी युद्ध करीन. खाऊशिवाय युद्धामध्यें कांहीं विशेष गोडी नाहीं.' असें हें अर्जुनाचें भाषण ऐकून दुर्योधन जिकडे पळाला होता तिकडे उत्तरानें घोडे वळविले. याप्रमाणें तो रथसमुदाय सोडून अर्जुन निघून गेला असतां कृपाचार्य त्याचा अभिप्राय ताडून ह्मणाले, 'राजाशिवाय दुसऱ्याशीं युद्ध करण्याचा अर्जुनाचा बेत दिसत नाहीं. ह्मणून त्याच्या मागोमाग निघालेल्या अर्जुनाच्या पाठोपाठ आपण जाऊं. या खवळलेल्या अर्जुनाबरोबर युद्धामध्यें इंद्र अगर श्रीकृष्ण यांखेरीज दुसरा कोणीही एकटा टिकाव धरूं शकणार नाहीं. पार्थरूपी जलामध्यें दुर्योधनरूपी नौका बुडत चालली असतां गाई किंवा धन घेऊन आह्माला काय कर्तव्य आहे?' इकडे अर्जुनानें पुढें जाऊन टोळधाडीप्रमाणें बाण सोडून ती सर्व सेना झाकून टाकिली. त्याच्या त्या वर्षावानें सर्व सेनेची दाणादाण उडून गेली. अर्जुनाच्या शंखाच्या व रथांच्या चाकांच्या शब्दानें, गांडीवाच्या टणत्कारानें व ध्वजावरील भूतांच्या आरोळ्यांनीं घाबरून गाई आपलीं शेपटें उभारून हंबडा फोडून दक्षिण दिशेनें पुन्हा परत वळल्या. त्यांना घेऊन अर्जुन व उत्तर विजयी होऊन मोठ्या थाटानें नगरांत आले.

अभिमन्यूचा विवाह.

उत्तर गोग्रहणानंतर पांडवच कंक वगैरे वेषानें आपल्या प-

दरीं राहिले आहेत, असें विराटाला कळल्यावर त्यानें आपली मुलगी उत्तरा अर्जुनाला देण्याचें ठरविलें. तेव्हां अर्जुन त्याला ह्मणाला, ‘ सून म्हणून मी हिला पतकरण्याला तयार आहें. आपला परस्परसंबंध वावगा नाहीं. पण मी नेहमीं अंतःपुरामध्यें आपल्या कन्येच्या दृष्टीसमोर राहिलों आहें आणि गुप्त किंवा उघड गोष्टी हिनें बापाप्रमाणें निःशंकपणानें मजपाशीं सांगितल्या आहेत. नृत्य गायन शिकविणाऱ्या गुरूप्रमाणें ती मला मानीत आली आहे. तर अशा वयांत आलेल्या हिच्याशीं एक वर्षभर मी एकत्र राहिलों असल्यानें आपल्याला व लोकांना संशयाला जागा उरूं नये, म्हणून मी सून म्हणून हिला मागणी घालतों. ह्मणजे मी जितेंद्रिय व शुद्ध राहिल्याचें चीज होऊन कोणालाच यापासून लोकापवादाची भीति नको. कृष्णाचा आवडता भाचा व सर्व अस्त्रांमध्यें निष्णात असा माझा मुलगा अभिमन्यु आपल्याला योग्य जावई असून आपल्या मुलीलाही तो योग्य वर आहे.’ हें ऐकून विराटानें ‘ बरें ’ म्हणून याला आपली अनुमति दिल्यावर सर्व मित्र व आप्तवर्ग त्याचप्रमाणें भगवान् श्रीकृष्ण यांजकडे विराटानें दूत पाठविले. आनर्तापासून दाशार्हांना आणविलें. काशीराज शैब्य त्याचप्रमाणें यज्ञसेन, धृष्टद्युम्न, द्रौपदीचे मुलगे, आणि शिखंडी इत्यादि पांडवांवर प्रेम करणारे महावीर, आपापल्या स्वारीनिशीं लग्नाला आले. त्याचप्रमाणें भगवान् श्रीकृष्ण, बलराम, कृतवर्मा, हार्दिक्य, सात्यकि, सांब इत्यादि यादव मंडळी, सुभद्रा व अभिमन्यूसहवर्तमान मोठ्या थाटानें लग्नाला आली. विराटाच्या वाड्यामध्यें शंख, नगारे, संबळ, चौघडे, आडंबर इत्यादि वाद्यांचा लग्नसमारंभाच्या वेळीं गजर चालला होता. खाण्यापिण्याची रेलचेल उडून राहिली होती. गवई, कथेकरी, नट भाट इत्यादिकांची मजलस चालली होती. उत्तमोत्तम वस्त्रालंकार केले-

त्या मत्स्य राजाच्या स्त्रिया सुदेष्णेला पुढें करून लग्नमंडपांत येऊन, उत्तम वस्त्रालंकारांनीं विभूषित अशा उत्तरेला पुढें करून तिच्या भोंवतीं उभ्या होत्या. अर्जुनानें त्या विराटतनयेला अभिमन्यूची बायको म्हणून घेऊन विवाहविधि उरकल्यावर सात हजार वायुगति घोडे व दोनशें हत्ती बंधुधन म्हणून विराटानें पांडवांना दिले. पेटलेल्या अग्नीमध्यें यथाविधि आहुति दिल्यावर भगवान् श्रीकृष्णानें आणलेली संपति युधिष्ठिरानें ब्राह्मणांचा सत्कार करून त्यांना देऊन टाकिली. नंतर मनाला आल्हाद देणारे जेवणाखाणाचे समारंभ मोठ्या थाटानें उरकले. यावेळीं जिकडे तिकडे आनंदी आनंद उडून राहिला असून त्या नगरीला अवर्णनीय शोभा आली होती. याप्रमाणें लग्न समारंभ मोठ्या कडाक्यानें उरकल्यावर अहेर वगैरे होऊन लग्नसोहाळा आटोपला.

पांडवांचा युद्धासंबंधानें विचार.

अभिमन्यूचें लग्न उरकल्यावर पांडव एके दिवशीं विराट राजाच्या भव्य दरबारांत आप्तस्वकीय मिळून पुढील विचार करण्याकरितां बसले. त्यासमयीं वृद्ध व मान्य विराट व द्रुपद आपापल्या आसनावर विराजमान झाले असून सात्यकि, बलराम, श्रीकृष्ण, युधिष्ठिर, इतर पांडव, धृष्टद्युम्न आणि शूर पांडवकुमार हें दुतर्फा आसनांवर अधिष्ठित झाले होते. कामासाठीं जमविलेल्या त्या राजसिंहाच्या पुढें श्रीकृष्णानें याप्रमाणें गोष्ट काढिली. तो म्हणाला, 'कौरवांनीं या युधिष्ठिराला कपटानें जिंकून याचें राज्य घेऊन या पांडवांना वनवासाला पाठविलें. सर्व पृथ्वी जिंकण्याला समर्थ असूनही केवळ सत्यासाठीं या श्रेष्ठ पांडुपुत्रांनीं आपलें वचन आज तेरा वर्षे पाळलें. तेरावें सर्वांत कठीण वर्ष तर यांनीं अज्ञातवासांत तुमच्याजवळच घालविलें. पुढें आ-

पलें वडिलार्जित राज्य मिळेल, म्हणून या महात्म्यांनीं दुसऱ्याचें दास बनून अनेक प्रकारचे असह्य क्लेश सोसले आहेत. हें सर्व तुम्हाला ठाऊकच आहे. अशी वस्तुस्थिति असतां धर्मराजाचें त्याचप्रमाणें दुर्योधनाचें ज्यानें हित होईल, असा कांहीं योग्य विचार काढा. अन्यायानें देवांचें आधिपत्यसुद्धां धर्मराज मिळवूं इच्छीत नाहीं. धर्म व अर्थ हीं साधून जेवढें मिळेल तेवढें त्याला पुरें आहे. हा कौरवांचें वाईट मुळीं इच्छीत नाहीं. जें या पांडवांनीं राजांना जिंकून मिळविलें आहे, तेंच यांचें यांना परत मिळावें, अशी यांची इच्छा आहे. हे लहान असतां दुष्ट व क्रूर अशा नाना उपायांनीं कौरवांनीं यांना मारण्याची खटपट केली. हेंही तुम्ही पक्कें जाणतां. तेव्हां हा त्यांचा वाढत चाललेला लोभ, युधिष्ठिराची धर्मनिष्ठा व या परस्परांचा संबंध लक्ष्यांत घेऊन सर्व मिळून काय तो विचार करा. सत्याविषयीं दक्ष अशा या पांडवांनीं आपला पण बरोबर पाळला असून आतां जर ते यांच्याशीं अन्यायानें वागूं लागतील तर त्या सर्व धृतराष्ट्रपुत्रांना हे खास ठार मारतील. तरी पण दुर्योधनाचा विचार कळल्याखेरीज पुढें काय करावयाचें हें ठरवितां येणार नाहीं, म्हणून या कामाला योग्य असा एखादा उत्तम दूत निवडून या दोघांचा समेट करून कौरवांकडून अर्धें राज्य युधिष्ठिराला देवविण्यासाठीं धृतराष्ट्राकडे प्रथम पाठवावा.' यावर गोडीगुलाबीनेंच दुर्योधनाशीं वागून आपलें काम साधून घ्यावें ह्मणून बलरामाचा सल्ला ऐकून द्रुपद ह्मणाला, 'दुर्योधन कधीं गोडीगुलाबीनें राज्य देणार नाहीं. धृतराष्ट्र आपल्या मुलावरच्या प्रेमामुळें, भीष्मद्रोण मिंधेपणामुळें आणि कर्ण व शकुनि मूर्खपणामुळें त्याच्या अनुषंगानें वागणार. आपला हेतु साधण्यास दुर्योधनाशीं गोड भाषण करून उपयोगी नाहीं. गोड भाषणानें हा पापबुद्धि कधीं ताळ्यावर येणार नाहीं.

याच्याशीं गोड भाषण करणें म्हणजे गाढवाला गोंजारण्यासारखें आहे. दुष्ट मनुष्य मृदु भाषण करणाऱ्याला दुर्बल समजतो. आपण यावेळीं आपल्या इष्टमित्रांकडे दूत पाठवून आपलें सैन्य तयार ठेविलें पाहिजे. दुर्योधनही चोहोंकडे दूत पाठवील आणि थोर लोक, प्रथम जे त्यांच्याकडे येतात त्यांची विनंति मान्य करतात. म्हणून सर्वांकडे लवकर दूत पाठवावे. ह्या माझ्या विद्वान् पुरोहिताला युधिष्ठिराचा निरोप घेऊन दुर्योधनाकडे हवें तर जाऊं दे. जशास तसाच पेच घातला पाहिजे. हा तेथें संधीची बोलाचाल करीत असतां कौरव स्वस्थ रहातील, व आपल्याला सैन्याच्या जुळवाजुळवीला वेळ सांपडेल; हाच याला पाठविण्याचा मुख्य फायदा. बाकी दुर्योधन किती वळणार हें आह्माला ठाऊकच आहे.' याप्रमाणें ठरल्यावर द्रुपदानें आपला वकील कौरवांकडे पाठविला. नंतर मंडळी आपापल्या गांवाला परत गेली.

दुर्योधनाच्या अकलेची परीक्षा.

द्रुपदानें आपल्या वकिलाला हास्तिनापुराला पाठवून दूतांना चोहोंकडे निरनिराळ्या राजांकडे पाठविल्यावर अर्जुन श्रीकृष्णाकडे द्वारकेला स्वतः गेला. इकडे बलराम व श्रीकृष्ण द्वारकेला ज्या वेळीं जाऊन पोहोंचले त्याच वेळीं दुर्योधनाच्या गुप्त हेरांकडून त्याला पांडवांच्या सर्व हालचाली कळल्या. अर्जुन श्रीकृष्णाकडे जाण्याला निघाला आहे, ही बातमी ठेवून तोही मोठ्या लगबगीनें अर्जुन ज्या दिवशीं द्वारकेला आला, तेच दिवशीं तेथें येऊन पोहोंचला. ते दोघे कृष्णाकडे गेले, तेव्हां श्रीकृष्ण निजला होता. प्रथम दुर्योधन आंत जाऊन त्याच्या उशाशीं बसला. अर्जुनही त्याच्या मागून जाऊन नम्रपणें त्याच्या पायांशीं बसला. श्रीकृष्ण उठला तेव्हां प्रथम अर्जुनाकडे त्याची दृष्टि गेली. त्या

दोघांचें स्वागत करून त्यानें त्यांना येण्याचें कारण विचारिलें. तेव्हां दुर्योधन त्याला ह्मणाला, 'तुला मी व अर्जुन सारखेच असल्यानें पुढें होणाऱ्या युद्धामध्यें तूं मला साहाय्य दिलें पाहिजे. मी आधीं आलों आहें व थोर लोक आधीं येणाराच्या विनंतीला मान देतात.' श्रीकृष्ण ह्मणाला, 'तूं आधीं आला आहेस खरा, पण या अर्जुनाला मीं आधीं पाहिला; ह्मणून तुझ्या प्रथम येण्यानें व याला प्रथम पाहिल्यानें मला दोघांनाही साहाय्य दिलें पाहिजे; परंतु लहानाची समजूत प्रथम घालावी हा सामान्य नियम आहे, ह्मणून अर्जुनाची समजूत प्रथम घातली पाहिजे. माझ्या तोडीचे नारायण नांवाचे प्रसिद्ध अर्बुद गोपाल एकीकडे देऊन, मी एकटा एकीकडे येईन, आणि मी रणांत युद्ध करणार नाहीं अगर शस्त्रही हातांत धरणार नाहीं. तर या दोहोंपैकीं अर्जुना, तुला कोण पाहिजे?' हें श्रीकृष्णाचें भाषण ऐकून 'तूंच मजकडे ये तर मग. तूं युद्ध न करतां स्वस्थ बसलास तरी चालेल,' असें अर्जुनानें भगवानापाशीं मागितलें. दुर्योधनानें तें सर्व नारायण सैन्य पतकरिलें, आणि याप्रमाणें कोटी सैन्य मिळवून श्रीकृष्णाला फसविलें असें वाटून मोठ्या आनंदानें तो हास्तिनापुराला निघून गेला. दुर्योधन परत गेल्यावर श्रीकृष्णानें अर्जुनाला पुसलें, 'युद्ध सुद्धां न करतां उगीच बसणाऱ्या मला काय ह्मणून तूं पतकारिलेंस?' तेव्हां अर्जुन ह्मणाला, 'कृष्णा, त्या सर्वांना मारण्याला तूं एकटा समर्थ आहेस, तसाच मीही पण एकटा त्यांना मारूं शकेन; परंतु या लोकांमध्यें तूं कीर्तिवान् असल्यामुळें यश हें तुझ्याच बाजूला येणार, आणि मला यशावांचून दुसरें कांहीं नको आहे. ह्मणून मीं तुला पतकरिलें.' हें ऐकून श्रीकृष्णाला संतोष होऊन त्यानें अर्जुनाचें सारथ्य करण्याचें कबूल केलें.

शल्याचा आशाभंग.

पांडवांच्या बाजूनें लढण्यासाठीं शल्य आपली मोठी सेना घेऊन मजल दरमजल करीत पांडवांकडे निघाला असतां दुर्योधनाला ही बातमी लागून त्यानें वाटेंत आपल्या लोकांकडून त्याची नीट बरदास्त ठेवविली. पांडवांनींच आपली ही सारी व्यवस्था ठेविली आहे, असें वाटून प्रसन्न होऊन तो ही उत्तम बरदास्त ठेवणाराला वर देण्याला तयार झाला असतां दुर्योधनानें पुढें येऊन युद्धांत आपल्याला साह्य करण्याविषयीं त्याची प्रार्थना केली. निरुपाय होऊन शल्याला त्याचें ह्मणणें मान्य करावें लागलें; तेव्हां ' पांडवांची भेट घेऊन तुझ्याकडे येतों, ' असें सांगून शल्य पांडवांना भेटण्याकरितां गेला. सर्वांची भेट घेऊन त्यांना प्रेमपूर्वक आलिंगन देऊन आसनावर बसल्यानंतर वाटेंत घडलेली सर्व हकीकत युधिष्ठिराला सांगून आपण दुर्योधनाला चुकून वर दिला, हेंही त्यानें त्याच्या कानावर घातलें. तेव्हां युधिष्ठिर म्हणाला, ' दुर्योधनानें आपली मोठी बरदास्त ठेविली, तो उपकार फेडण्यासाठीं आपण त्याला वचन दिलें तें ठीकच केलें; परंतु आह्मा गरीबांची आठवण ठेवून आमचेंही थोडें काम करा. युद्धांत आपण भगवान् श्रीकृष्णाच्या तोडीचे आहां. अर्जुन व कर्ण यांचें युद्ध होईल तेव्हां कर्णाचें आपण सारथ्य करणार हें ठरल्यासारखें आहे; तर माझें कल्याण व्हावें अशी आपली इच्छा असेल तर आपण त्यावेळीं कर्णाचा तेजोभंग करून अर्जुनाला जय मिळवून द्या. ' शल्यानें होय ह्मणून तें कबूल केलें व तो आपल्या सैन्यानिशीं दुर्योधनाकडे निघून गेला.

द्रुपदपुरोहिताचा निरोप.

द्रुपदानें पाठविलेला दूत कौरवांकडे येऊन भरसभेंत म्हणाला, ' तुह्मा सर्वांना राजधर्म ठाऊकच आहे. तो मीं तुह्माला सांगावा असें नाहीं. धृतराष्ट्र व पांडु हे एकापासून झाले असल्यामुळें वडिलोपार्जित मिळकतीवर दोघांचा सारखाच हक्क आहे. असें असून कौरवांना वडिलोपार्जित दौलत मिळून ती पांडवांना यापूर्वीं कां मिळाली नाहीं, हेंही तुम्हाला ठाऊकच आहे. त्यांचा प्राण घेण्याचे अनेक उपाय यांनीं केले, तरी यांना त्यांना मारतां आलें नाहीं, व ते अद्यापि जिवंत आहेत. त्यांनीं आपलें राज्य आपल्या बलावर वाढविलें तेही कौरवांनीं कपटानें हिरावून घेतलें. त्या अन्यायाला धृतराष्ट्राचीही संमति मिळाली. बारा वर्षें घोर अरण्यामध्यें व एक वर्ष विराट नगरीमध्यें त्यांनीं नानाप्रकारचे क्लेश सोसले, तरी ते मागील सर्व अपराध विसरून कौरवांबरोबर स्नेहानेंच राहूं इच्छीत आहेत. त्यांचें व दुर्योधनाचें वर्तन लक्ष्यांत घेऊन दुर्योधनाला ताळ्यावर आणणें हें तुह्मा भल्या लोकांचें काम आहे. कौरवांबरोबर युद्ध करण्याचा त्यांचा हेतु मुळीं नसून लोकांचा नाश न होतां आपलें स्वस्व आपल्याला मिळावें, अशी त्यांची इच्छा आहे. आतां युद्ध करण्यांत दुर्योधनाचा जो हेतु आहे, तिकडेही तुह्मीं लक्ष्य देतां कामा नये; कारण सर्व पांडव वीर्यशाली असून सात अक्षौहिणी सैन्य त्यांच्या बाजूला जमलें आहे, आणि ते कौरवांबरोबर युद्ध करण्यासाठीं युधिष्ठिराच्या आज्ञेची वाट पहात आहे. शिवाय सात्यकि, भीमसेन प्रभृति मंडळी प्रत्येकी हजार हजार अक्षौहिणीच्या तोडीचे आहेत; व तुमच्या ह्या अकरा अक्षौहिणी एका बाजूला व एकटा अर्जुन एका बाजूला असला तर तुमच्या एवढ्या सर्व सैन्याला तो पुरून उरणार आहे. तर ह्या सर्व गोष्टींचा विचार

करून वेळ गेली नाहीं, तोंवर त्यांचें त्यांना देऊन टाकाल तर बरें. ' परंतु हें दुर्योधनाला न पटल्यामुळें द्रुपदपुरोहित आला तसाच परत गेला.

संजयशिष्टाई.

पांडवांना चार गोडीच्या गोष्टी सांगून युद्धप्रसंग टाळण्यासाठीं धृतराष्ट्रानें संजयाला पाठविलें; तेव्हां तो पांडव उपप्लव्य येथें येऊन राहिले होते, त्यांकडे येऊन कुशल प्रश्न विचारून नंतर युधिष्ठिराला म्हणाला, ' बा युधिष्ठिरा, दुर्योधनाजवळ जसे चांगला उपदेश करणारे वृद्ध आहेत, तसेच त्याला वाईट बुद्धि देणारेही आहेत. पूर्वीं कौरवांनीं अनेक अपराध केले असतांही तुह्मीं ते निमूटपणें सहन केलेत; तेव्हां आतां असें निष्ठुर होणें तुह्माला बरें दिसतें काय ? दुर्योधनाच्या कृत्याला महाराजांची संमति नसून त्याबद्दल त्यांना फार वाईट वाटत आहे. मित्रद्रोहाचें पातक किती मोठें आहे हें ते जाणतात. तुम्हाला ते पूर्ण जाणतात. ऐहिक सुखाकरितां तुह्मी धर्म कधीं सोडणार नाहीं; म्हणून ज्यायोगानें त्यांचें कल्याण होईल, अशा रीतीनें तूंच त्यांच्याबरोबर सख्य कर. तुह्मा दोघांमध्यें सख्य असावें, असें महाराजांना वाटत आहे. तुह्मा सर्वांना मी म्हणतों हें पटो. मनोनिग्रह, मनाचा कोमलपणा, सरळपणा, इत्यादि गुण तुमच्यांत आहेत. तुमचा जन्म थोर कुलांत झाला आहे. तुमच्या ठिकाणीं क्रौर्य नसून तुह्मी दानशूर व विनयसंपन्न आहां. कोणत्या कृत्याचा काय परिणाम होईल हें तुम्ही जाणतां. आतां एवढें प्रचंड सैन्य जरी तुम्हीं जमविलें आहे, तरी तुमच्यासारख्या थोर बुद्धीच्यांना अशा प्रकारचें घोर कृत्य करणें शोभत नाहीं. कारण, तुमच्या हातून एखादें वाईट कृत्य घडलें असतां पांढऱ्या

शुभ्र कापडावरील डागाप्रमाणें तें स्पष्टपणें लोकांच्या नजरेपुढें येणार आहे. सर्वांचा नाश नरकाला मात्र साधन होणार. ज्यांत जय किंवा अपजय यांपासून सारखाच फायदा होणार, असें काम कोणीं हातीं घ्यावें ? तुह्मी युद्ध करून त्यांना मारण्याला तयार व्हाल, तर ज्ञातीला मारून जिवंत रहाणें हें तुम्हाला मरणप्रायच होणार आहे. धृष्टद्युम्नासारखा तुमचा पाठराख्या असतां तुम्हाला भगवान् श्रीकृष्णाला, चेकितानाला अगर सात्यकीला, इंद्रादि देवांचें साह्य घेऊन देखील कोणी जिंकण्याला समर्थ होणार नाहीं, हें जरी खरें आहे, तरी भीष्म, द्रोण, अश्वत्थामा, कर्ण यांसारख्या वीरांचें ज्यांना पाठबळ आहे त्या कौरवांना तरी कोणाच्यानें जिंकवणार ? आपला सर्वस्वीं नाश करून न घेतां दुर्योधनाच्या त्या प्रचंड सैन्याचा तुमच्यानें मोड होईल काय ? म्हणून या जयांत किंवा अपजयांत नफानुकसान मला सारखेंच दिसतें. ह्मणून हीन कुलांत जन्मलेल्या नीच लोकांप्रमाणें, ज्यांत धर्म, अर्थ किंवा लाभ नाहीं, असें कृत्य तुमच्यासारख्यांनीं कां करावें ? याकरितां मी श्रीकृष्णाच्या व वृद्ध द्रुपदांच्या पायांवर डोकें ठेवून हात जोडून तुम्हाला विनवितों; कुरु व सृंजय ह्या दोघांचें कल्याण होईल अशा रीतीनेंच वागा. तोंड पसरलें असतां जे स्वतःचे प्राण देखील देण्यास तयार होतील, ते कृष्णार्जुन माझें ह्मणणें मोडतील असें कधीं होणार नाहीं; म्हणूनच महाराजांच्या मनांत तुह्मा दोघांमध्यें सख्य असावें असें आहे, हें तुम्हाला कळविण्याकरितां मी आलों आहें.' युधिष्ठिर म्हणाला, 'अहो संजय, युद्ध होण्यापेक्षां तें न व्हावें हेंच अधिक हितावह असून तें न करतां जर इष्ट हेतु साधत असेल तर युद्ध कोणाला हवें ? देवांची ज्यावर अवकृपा झाली असेल तोच मग युद्धाला उठेल. पांडवांना राज्य हवें असलें तरी तें मिळविण्यासाठीं धर्माच्या

आड न येणारें, सर्व लोकांना हितावह असेंच कृत्य त्यांच्या हातून घडेल. केवळ इंद्रियविषयांच्या मार्गे लागून सुख तेवढें मिळवून दुःख तेवढें टाळण्याची ज्यांची खटपट चालली असते, त्यांच्या हातून प्रायः परिणामीं दुःखकारक असें कृत्य घडत असतें, व त्यापासून त्यांनासुद्धां कष्ट होतात. अग्नीच्या ज्वाळा तूप ओतल्यानें ज्याप्रमाणें वाढतच रहातात, तसेंच हवें तें मिळाल्यानें कामवासना अधिकाधिकच पेट घेते. हा दुर्योधन स्वतः संकटांत सांपडला असतां मात्र दुसऱ्याच्या साहाय्यानें त्यांतून सुटण्याची इच्छा धरतो, मग त्यानेंही दुसऱ्यासंबंधानें तसें कां न वागावें ? दाट गवतानें भरलेल्या अशा अरण्यांत उन्हाळ्यांत आपल्या जवळचा अग्नि फेकून देऊन मग वाऱ्यामुळें त्यानें पेट घेतला म्हणजे त्यांतून सुरक्षितपणें बाहेर पडतां येत नाहीं ह्मणून रडत बसण्याची पाळी येते; त्याचप्रमाणें आज ऐश्वर्य मिळालें असूनही दुर्बुद्धि, कुटिल, मूढ व अविचारी मुलांच्या नादानें चालल्यामुळें तुमच्या राजाला शोक करण्याची पाळी आली आहे. दुसऱ्याच्या अप्रतिष्ठेंत आपली प्रतिष्ठा वाढवून घेणारा, परोत्कर्षासहिष्णु, तापट, धर्मकामाची पर्वा न करणारा, दुर्भाषण करणारा, रागाच्या आधीन होणारांच्या मतानें वागणारा, कामाधीन झालेला, दुष्टांची वाहवा घेणारा, सदुपदेशाचें कांहीं चालूं न देणारा, दुर्भाग्यवान्, दीर्घद्वेषी, मित्रद्रोही अशा पापबुद्धि मुलाचें कोड पुरविण्याच्या मागें लागून समजून उमजून हितार्थवादी विदुरांचें भाषण कटु वाटून तुमच्या राजानें धर्म व काम बाजूला झुगारून दिले आहेत. द्यूताचे वेळीं विदुरांचें पोक्त भाषणही जेव्हां दुर्योधनाला पटलें नाहीं, तेव्हांच कौरव नामशेष होण्याची वेळ जवळ आली आहे असें मला वाटलें. जोंपर्यंत हा त्यांच्या विचारानें चालत होता, तोंपर्यंत राष्ट्राची भरभराट होत चालली

होती; व जेव्हां तो त्यांचें ऐकेनासा झाला, तेव्हांच राष्ट्राला उतरता पाया लागला. या लोभी दुर्योधनाचे सल्लागार कोण आहेत, तर दुःशासन, कर्ण व शकुनि! तेव्हां मी पुष्कळ विचार करून पहातों तरी कौरव व पांडव या दोघांचें कल्याण ज्यानें होईल, असा मार्ग कांहीं मला दिसत नाहीं. दुसऱ्याचें ऐश्वर्य हरण करून दीर्घदर्शी विदुरांनाही हाकलून देऊन या सर्व पृथ्वीचें राज्य निष्कंटक आपल्याला असावें, असें याला वाटत आहे. आम्हाला वनाला हाकलल्यानें सर्व संपत्ति आपलीच झाली, असें त्याला वाटूं लागलें आहे. तेव्हां त्याबरोबर खरें सख्य जुळणें फार कठिण आहे. दुर्योधनाला मला इंद्रप्रस्थ देऊं दे, मग तेथें मी स्वस्थ राज्य करीत राहीन. नाहीं तर निदान आह्मा पांचांच्या उदरनिर्वाहासाठीं पांच खेडीं तरी त्याला मला देऊं दे.' हें युधिष्ठिराचें भाषण ऐकून संजय म्हणाला, 'बा युधिष्ठिरा, तुझें प्रत्येक कृत्य नेहमीं धर्माला अनुसरून असतें, अशी तुझी कीर्ति आहे व तें मला प्रत्यक्ष दिसूनही येत आहे. हें जीवित फार अशाश्वत आहे, हें लक्ष्यांत घेऊन महाराजांचा नाश करण्यास प्रवृत्त होऊं नकोस. युद्धाखेरीज दुसऱ्या उपायांनीं कौरव तुझा अंश तुला देण्याला जर तयार होणार नाहींत, तर भिक्षा मागून पोट भरणें हें देखील युद्ध करून राज्य मिळविण्यापेक्षां तुला अधिक श्रेयस्कर आहे. ह्या विषयवासना मनुष्यामध्यें उत्पन्न झाल्या असतां त्या त्याला पाशांत गुंतविण्याला कारण होतात; व त्यांच्या पाठीस लागल्यानें धर्मामध्यें व्यत्यय येतो; म्हणूनच त्यांना आवरणारा शहाणा मनुष्य लोकस्तुतीला पात्र होतो. धर्माला धरून चालणाराच या जगामध्यें शहाणा होय. विषयामध्यें मन घालणारा मनुष्य अर्थाच्या मागें लागून नाश पावतो. इतके दिवस मन आवरून आतां जर सूड घेण्याला तुह्मी प्रवृत्त

झालां आहां, तर तुह्मांला इतकीं वर्षें दुर्योधनानें वनवासदुःख भोगावयास लाविलें, यांत त्यानें तरी काय मोठें वाईट केलें ह्मणावयाचें? शिवाय तुमचा पहिल्यापासून जर हा उद्देश होता, तर तुह्मी वनवासाला तरी कशाला गेलां? कारण त्या वेळीं तुमच्या बाजूला अनुकूलता विशेष होती. श्रीकृष्ण, सात्यकि, विराटप्रभृति मंडळी तर पहिल्यापासूनच तुमच्या बाजूला आहेत. तेव्हां पूर्वींच त्या सभेंत दुर्योधनाची खोड मोडिली असती तर बरें झालें असतें. आतां आपलें सामर्थ्य कमी करून घेऊन, शत्रूचें वाढूं देऊन व अनेक वर्षे वनवास काढून, वेळ निघून गेल्यावर ही युद्धाची इच्छा कशाला? रागाच्या झपाट्यांत तुझ्या हातून कधीं पाप घडलें नाहीं. असें असून तुझ्या नांवाला न शोभणारें हें कृत्य करण्यास तूं कसा बरें उठलास? व्याधीवांचून तोंडाला कडूपणा आणणारा, व यश हरण करून अखेर पापरूप फल पदरीं बांधणारा हा राग शांतपणें आवर. ज्यासाठीं भीष्मद्रोण प्रभृतींना मारावें लागणार, अशा सुखोपभोगापेक्षां गय खाणेंच विशेष चांगलें. यांना मारून तुला जरी वैभव मिळालें, तरी त्यापासून तुला कितीसें सुख होणार, हें तूंच पहा.' हें संजयाचें भाषण ऐकून युधिष्ठिर ह्मणाला, 'अहो संजय, सर्वांत धर्म श्रेष्ठ आहे असें जें आपण ह्मणतां, तें अगदीं खरें आहे; परंतु माझ्या हातून तरी कोठें अधर्म घडत आहे? प्रत्येकानें आपला वर्णाश्रमधर्म पाळावा हें उचित आहे. मनुष्य निर्वाहाच्या साधनाला मुकला असतां वर्णाश्रमधर्माला योग्य असेंच कृत्य त्यानें करावें; ब्राह्मणांना जें कर्म उचित नाहीं, तें त्यांनीं आत्मसंरक्षणार्थ केलें असतां त्याबद्दल त्यांना प्रायश्चित्त सांगितलें आहे; यावरून लोकांनीं वर्णाश्रमधर्म पाळावा हें सिद्ध होत आहे. उलट ते तसे न वागतील तर निंदेला पात्र होतील. आमचे वाड-

वडील अशाच प्रकारचें कर्म करीत आले; तेव्हां माझ्या हातून यांत कांहीं वावगें घडत नाहीं, असें मला तरी वाटतें. ह्या पृथ्वीवरील सर्व संपत्ति सुद्धां मी अधर्मानें मिळवूं इच्छीत नाहीं. बुद्धिशाली, नीतिमान्, सर्व क्षत्रियांचा स्वामी व सर्व धर्म जाणणारा भगवान् श्रीकृष्णच सांगूं दे कीं, सामानें काम होत असून दुराग्रह धरून मी लोकनिंदेला पात्र होत आहें, व युद्ध करण्यांत माझ्या हातून धर्म सुटत आहे ह्मणून. हा भगवान् कोणत्याही कृत्याचे परिणाम नीट ओळखतो, तर तो सांगेल तसें वागण्याला मी तयार आहें.' यावर श्रीकृष्ण ह्मणाला, 'बा संजया, नाश न पावतां पांडवांनीं वैभवाला चढावें अशी माझी इच्छा आहे, तरी दुर्योधनही वैभवशाली असावा अशीच माझी नेहमीं इच्छा आहे; ह्मणून दोघांमध्यें सख्य असूं द्या, असेंच मी वरचेवर दोघांनाही सांगत आलों आहें. तुझ्या सांगण्यावरून राजाचीही दोघांमध्यें सख्य असावें अशीच इच्छा दिसते. युधिष्ठिरानें तर आजपर्यंत विलक्षण शांति धरिली आहे; परंतु धृतराष्ट्र व त्याचा मुलगा यांचा लोभ मात्र दिवसेंदिवस फार वाढत चालला आहे. माझ्याकडून किंवा युधिष्ठिराकडून धर्माला सोडून वर्तन झाल्याचें तुझ्या कधीं तरी कानावर आलें आहे काय? असें असून धर्मानें स्वकर्म करण्याची इच्छा धरणाऱ्या युधिष्ठिराला तूं कसा बरें दोष देतोस? कोणी परलोक कर्मानें मिळतो ह्मणतात, कोणी त्याला कर्माची गरज नसून ज्ञानानेंच तो मिळतो ह्मणतात; परंतु ही गोष्ट सर्वांना मान्य आहे कीं, मनुष्याला भक्ष्यभोज्याचें केवळ ज्ञान असून तीं तो सेवन न करील तर त्यापासून त्याची तृप्ति कधीं व्हावयाची नाहीं. कर्म करावयाला लावणारें ज्ञानच इहलोकीं उपयोगीं पडतें. कर्माचें फलही प्रत्यक्ष दिसून येतें. कारण पाणी प्याल्यावरच तहान भागते; ह्मणून ज्ञानाची व कर्माची सां-

गड घातल्यानेंच कर्माचा उच्छेद होतो. कर्माशिवाय दुसऱ्याला जो कोणी चांगलें ह्मणत असेल, त्या अविचारी मनुष्याचा तो बाष्कळपणा मी फुकट समजतों. स्वर्गीं देवसुद्धां कर्मानेंच झळकत आहेत. सूर्य उदयास्तरूप कर्मानेंच प्राणिमात्रांच्या सुखाला कारणीभूत होतो. कर्मानेंच इंद्रानें देवांवर श्रेष्ठत्व मिळविलें आहे. तेव्हां हा सर्व प्राणिमात्रांचा धर्म तुला कळत असून कौरवांसाठीं ही तुझी वृथा खटपट कां? कौरवांचा नाश न होतां आपला हेतु साधण्याला युधिष्ठिराला जर एखादा उपाय दिसेल, तर तो करण्याला तो मोठ्या खुषीनें तयार होईल, व त्या थोर कृत्याला भीमसेनाचेंही मन वळवितां येईल; परंतु युद्ध करण्याचाच प्रसंग आला तरी त्याला ते कोणत्याही भीतीनें मागें सरणार नाहींत. यांनीं शांतीच धरावी असा तुझा आग्रह असेल, तर राजांनीं प्रसंग पडला असतां युद्ध करणें वाजवी आहे कां तें न करणें वाजवी आहे, हें तूंच सांग. चारी वर्णांना वांटून दिलेले कर्मविभाग लक्ष्यांत आणून व तुह्मा उभयतांचें वर्तन लक्ष्यांत घेऊन मग तूं वाटेल तर युधिष्ठिराला दोष दे. स्वतः जितेंद्रिय राहून राजानें मोठ्या दक्षतेनें प्रजेचें पालन करून तिची कर्माकडे प्रवृत्ति ठेवावी, लोभानें धर्मलंडांना आश्रय देऊं नये, हा राजाचा मुख्य धर्म आहे; आणि अशाप्रकारें राज्य करण्याला एक युधिष्ठिरच योग्य आहे. एखाद्या दुष्ट राजाला स्वतः त्याच्या मनगटाच्या जोरावर दुसऱ्याच्या संपत्तीचा अपहार करण्याची बुद्धि उत्पन्न होईल, ह्मणूनच युद्धरूप कर्म व त्याबरोबरच शस्त्रास्त्रादिक अनेक आयुधें निर्माण झालीं आहेत. दुष्ट राजांना शासन करण्यांत पाप मुळीं नसून उलट पुण्य आहे. आतां या कौरवांच्या हातून केवढालीं घोर पातकें घडलीं आहेत, हें तुला ठाऊक नाहीं असें नाहीं. एक तर वंचनारूपी घोर पातक करून

सनातन धर्माकडे लक्ष्य न देतां न्यायानें पांडवांचें असलेल्या राज्याचा हे अपहार करूं पहात आहेत. अप्रत्यक्ष किंवा प्रत्यक्ष जो दुसऱ्याचें द्रव्य हरण करतो, तो चोरच समजावयाचा. या दृष्टीनें पहातां हें कौरवांचें कृत्य चौर्यकर्माहून निराळें म्हणतां येणार नाहीं. आमचा राज्याचा हिस्सा कौरवांपाशीं ठेव म्हणून ठेविला असून त्याचा अपहार करण्याची त्यांनीं इच्छा कां धरावी? आणि तो परत मिळविण्यासाठीं युद्ध करून आम्हाला मरण्याची पाळी आली तरी आह्मीं मागें कां घ्यावें? द्रौपदीचे दुःशासनादिकांनीं भरसभेंत जे धिंडवडे केले, त्याकडे भीष्मादिकांसारख्यांनीं सुद्धां कानाडोळा केला! धर्माला अनुसरून न्याय्य तें बोलून त्या बिचारीला हात देण्याला त्या एवढ्या थोरल्या सभेंत एकटे विदुर निघाले! त्यावेळीं ‘ तुला स्वतंत्रता नाहीं, तूं दासी आहेस, ’ इत्यादि कर्णाचे हृदयाला झोंबणारे शब्द, त्याचप्रमाणें ‘ तुझ्या धाकट्या भावांनाही पणांत जिंकिलें आहे, आतां कायती द्रौपदी उरली आहे, तिला पणाला लाव, ’ ह्मणून शकुनीचें टोचून बोलणें, लक्ष्यांत घेऊन मग आतां न्यायान्यायाचा उपदेश धर्मराजाला कर ह्मणजे झालें. इतकें झालें तरी ही बिघडलेली घडी बसवून दोघांचें सख्य जुळवून देण्याची खटपट करण्यासाठीं मीं स्वतः हास्तिनापुराला येणार आहें. पांडवांचें हित जाऊं न देतां या दोघांमध्यें सख्य जुळवून आणण्यांत जर मला यश आलें, तर हें एक मोठें पुण्यच माझ्या पदरीं पडल्यासारखें होणार आहे, व कौरवही मृत्यूच्या तावडींतून सुटतील. धृतराष्ट्र मनापासून माझें धर्मार्थाला धरून असणारें भाषण ऐकून घेईल तर चांगलें होणार आहे; नाहींपेक्षां स्वकर्मानेंच जळून भस्म झालेले हे पापी कौरव, नरवीर अर्जुन व स्वकर्मदक्ष भीमसेन यांच्याकडून वैभवाला मुकतील व मग योग्य वेळीं भीमसेन आपण बोललेल्या

शब्दांची आठवण दुर्योधनाला देईल. धृतराष्ट्र व त्याचे मुलगे हें एक मोठें वन असून पांडव त्यांत असणारे वाघ आहेत. ह्मणून वाघांसकट वनाचा उच्छेद होणें अगर वनांतून वाघांना हुसकून लावणें या दोन्ही गोष्टी इष्ट नाहींत. कारण वाघ वनाशिवाय उघडे पडतील तर त्यांचा नाश होईल व वनाचाही वाघ नसतील तर उच्छेद होईल. ह्मणून वाघांनीं वनाचें रक्षण करावें, व वनानें वाघांना जपावें, यांतच उभयतांचें हित आहे. धार्तराष्ट्र लतेप्रमाणें असून पांडव शालवृक्षासारखे आहेत. मोठ्या वृक्षाचा आश्रय केल्यावांचून लतेची वाढ कधीं होत नाहीं. पांडव सख्य करण्याला तयार असून प्रसंग पडल्यास युद्धालाही तयार आहेत; ह्मणून धृतराष्ट्राच्या मनांत असेल तसें त्यानें करावें.' हें कृष्णाचें भाषण ऐकून घेऊन संजय त्यांचा निरोप घेऊं लागला असतां सर्व कौरवांना निरोप सांगून युधिष्ठिरानें त्याला निरोप दिला, व 'मी ह्या पृथ्वीचें निष्कंटक राज्य करीन ह्मणून तूं जी हाव धरिली आहेस ती व्यर्थ आहे; कारण, त्याला आह्मी कधीं मुकाट्यानें कबूल होणार नाहीं; म्हणून आह्माला इंद्रप्रस्थ तरी दे नाहींपेक्षां युद्धाला तयार हो,' ह्मणून आपला निरोप त्यानें दुर्योधनाला कळविण्यास सांगितलें.

कृष्णार्जुनांचा कौरवांना निरोप.

यावर कृष्णार्जुनांनीं दुर्योधनाला पुढील निरोप पाठविला. श्रीकृष्ण ह्मणाला, 'तुमच्यावर आतां मोठा कठीण प्रसंग येऊन गुदरणार असल्यामुळें नानाप्रकारचीं कृत्यें उरकून घेऊन सुखोपभोग भोगून घ्या. धर्मराज जयश्रीची वाट पहात असून 'गोविंदा' म्हणून द्रौपदीनें जी माझी करुणा भाकिली तें तिच्या ऋणाचें ओझें माझ्या डोक्यावर आहे. ज्याकडे केवळ दृष्टि फे-

कणें कठीण असें तेजस्वी गांडीव ज्याचें धनुष्य आहे, त्या अर्जुनाबरोबर तुह्मी वैर बांधिलें आहे. कालानें घेरल्यावांचून प्रत्यक्ष इंद्रालासुद्धां हा अर्जुन पुढें उभा रहावा अशी इच्छा होणार नाहीं. ह्या एकट्या बहाद्दरानें विराट नगरींत तुम्हा सर्वांना पळवून लाविलें, एवढी गोष्ट त्याच्या सामर्थ्यासंबंधानें तुमची खात्री पटण्याला पुरी आहे. बल, तेज, वीर्य, इत्यादि गुण त्यासारखे इतरांमध्यें सांपडणें कठीण.' अर्जुन म्हणाला, 'भगवान् श्रीकृष्णाचें ह्मणणें सर्वथैव खरें होणार. धर्मराजाचा हिस्सा तुह्मी देऊन न टाकाल तर ज्या महायज्ञांत बाणांच्या परस्पर आघातानें उत्पन्न होणाऱ्या अग्नीचा धूर हाच होमधूम होऊन रथाच्या धावांचा घडघड शब्द हाच मंत्रघोष होईल, अशा महारणयज्ञांत तुह्माला बळी पडावें लागेल याचा पूर्ण विचार करा.'

दुर्योधनाचा हट्ट.

पांडवांकडून याप्रमाणें संजय निरोप घेऊन आल्यावरही दुर्योधनाचा युद्धाचा आग्रह पाहून धृतराष्ट्र त्याला ह्मणाला, 'आकौमार ब्रह्मचर्य धारण केल्यानें क्षात्रतेज ज्यांच्या अंगीं रसरसतें आहे, अशा पांडवांबरोबर, बा दुर्योधना, मी नको नको ह्मणत असतां तूं वैर जोडीत आहेस. युद्धाचा विचार बाजूला ठेव. कारण कोणत्याही कारणानें युद्ध कोणीं कधीं चांगलें ह्मटलें नाहीं. तुझें यथास्थित चालण्याला अर्धी पृथ्वी पुरी आहे. महात्म्या पांडवांशीं त्वां सख्य करावेंस, हेंच धर्माला अनुसरून असून सर्व कौरवांना संमत आहे. जरा विचार कर ह्मणजे ही तुझी सेनाच तुझ्या नाशाला कारणीभूत आहे, असें तुला कळून येईल. व्यर्थ मोहामुळें हें अद्यापि तुझ्या ध्यानांत येत नाहीं. मला, भीष्मद्रोणादिकांना, कोणालाच युद्ध करणें प्रशस्त वाटत नाहीं. तूं तरी

स्वतः कांहीं करीत नसून कर्ण, दुःशासन व शकुनि हेच तुला चिथवीत आहेत.' दुर्योधन ह्मणाला, 'मी कोठें भीष्मादिकांच्या जिवावर युद्धाला उठलों आहें? मी व कर्ण या दोघांनीं मिळून युधिष्ठिराला पशू कल्पून या रणयज्ञाला प्रारंभ केला आहे. या रणयज्ञामध्यें आत्माहुतीनें सिद्धि मिळवून शत्रूंचा नाश करून श्रीसंपन्न होऊन आह्मी फिरून एकत्र जुळूं. कर्ण, दुःशासन व मी मिळून पांडवांना मारूं. त्यांना मारून मी तरी या पृथ्वीचा एकटा उपभोग घेईन किंवा मला मारून ते तरी घेतील. जीवित, राज्य व संपत्ति या सर्वांवर मीं पाणी सोडिलें आहे. पांडव आणि मी मिळून जुळून रहाण्याची वेळ गेली. सुईच्या अग्राएवढी देखील भूमि मी त्यांना देणार नाहीं.'

युद्धासंबंधी श्रीकृष्णयुधिष्ठिरांचा विचार.

संजय परत गेल्यावर श्रीकृष्णाला शिष्टाईकरितां कौरवांकडे पाठविण्याचें; वेळीं युधिष्ठिर त्याला ह्मणाला, 'हे मित्रवत्सला, तुझ्या मित्रांना संकटांतून उद्धरण्याची वेळ आतां येऊन ठेपली आहे. ह्या संकटांतून आह्माला वर काढणारा तुझ्यावांचून दुसरा कोणी दिसत नाहीं. तुझ्या आश्रयानेंच आह्मी निर्भय असून दुर्योधनाशीं युद्ध करूं इच्छितों. ह्या मोठ्या संकटांतून पांडवांचें रक्षण तुझ्या हातूनच झालें पाहिजे. मीं पांच गांवांसाठीं तोंड परसलें असतां तेवढें सुद्धां देण्याला कौरव तयार नाहींत. मी राज्यापासून भ्रष्ट होऊन दिवस कसे काढिले, हें तूं प्रत्यक्ष पहात आहेस, व आतां कोणत्याही न्यायानें संपत्तीला मुकणें आह्माला वाजवी नसून त्यासाठीं झटत असतांना प्राण गेले तरी हरकत नाहीं. तरी दोघांमधील वैमनस्य नाहींसें होऊन सलोख्यानें दोघांनीं या संपत्तीचा उपभोग घ्यावा, हें आह्माला अधिक संमत आहे. कौरवांना मारणें जरी चांगलें नाहीं, तरी स्वधर्म पाळलाच पाहिजे;

युद्धामध्यें नेहमीं वैर माजून प्राणहानी होत असते; तरी नीति-बलावर मी युद्ध करणार. युद्धांत जय येणाराचीही खराबी व्हावयाचीच, व तो स्वतः निभावला तरी दुसरे कोणी त्याचे आवडते आप्त मरणारच, व ह्याप्रमाणें बलहीन होऊन मुलगे व भाऊ यांना मुकल्यावर त्याला सर्व वस्तूंचा व जीविताचा सुद्धां वीट वाटूं लागतो. शत्रूला मारणें देखील पश्चात्तापाला व परिणामीं दुःखाला कारण होतें. किती केलें तरी कांहीं शत्रु शिल्लक रहातातच, व ते साहाय्य मिळवून आपली बाकी ठेवीत नाहींत. वैराग्नि शमविण्यासाठीं पूर्ण फडशा पाडण्याला ते झटत असतात. जयानें वैर सुरू होतें व पराजय झालेल्याला दुःखांत दिवस कंठावे लागतात ज्याला वैरी उत्पन्न झाला आहे, अशा मनुष्याच्या मनाला कधीं शांति नसून घरांत साप असल्याप्रमाणें तो नेहमीं चिंतेंत असतो. बरें जो शत्रूचा पूर्ण फडशा उडवितो, तो लौकिकाला मुकून लोकांमध्यें त्याची कायमची अपकीर्ति होते. पुष्कळ दिवस लोटले तरी वैर कधीं शमत नाहीं. कुळांत एखादा पुरुष जिवंत असला ह्मणजे त्यास गतगोष्टी सांगून वैर पेटवून देणारे लोक त्यास भेटतात. वैरानें वैर कधीं शमत नसून तूप ओतलेल्या अग्नीप्रमाणें तें अधिकच पेट घेतें; ह्मणून नाश करण्याच्या हेतूनें एकमेकांचें छिद्र बघत बसणारांपैकीं एकाचा पूर्ण बीमोड झाल्याखेरीज कधीं शांति व्हावयाची नाहीं, व नेहमीं एकमेकांचें छिद्र बघत बसणारांना छिद्र दिसल्यावांचूनही रहावयाचें नाहीं. आपल्या मनगटाच्या जोराची धमक हाच मानसिक रोग त्याच्या हृदयाचा सोबती बनून रहातो, व त्याला मरणावांचून शांतीचें नांव मिळत नाहीं. आतां कदाचित् शत्रूचा बीमोड करून झळझळीत वैभव मिळालें ह्मणून काय त्याला क्रूर कर्म समजावयाचें नाहीं? बरें, राज्य सोडून देऊन जी शांति मिळणार ती स-

र्वस्वीं मरणप्रायच आहे. ह्मणून राज्य सोडण्यालाही आमचें मन घेत नाहीं, व कुलक्षय व्हावा अशीही पण आमची इच्छा नाहीं; ह्मणून या स्थितींत थोडी पड घेऊन सख्य जुळेल तर बरें. आतां युद्धाचा प्रसंग न यावा ह्मणून होईल तेवढी समेटाची खटपट करीत असतां ती फसेल तर युद्ध केलेंच पाहिजे, व त्यांत पराक्रमही दाखविला पाहिजे. सामोपाय फसला असतां भयंकर प्रसंग ओढवतो, व त्यामध्यें कुत्र्यांच्या झटापटींचीं सर्व लक्षणें शहाण्यांच्या दृष्टोत्पत्तीस येत असतात. शेपटी हलविणें, गुरगुरणें, एकमेकांच्या अंगावर भोकणें, लोळण घेणें, दांत विचकणें इत्यादि पूर्व विधीनंतर सामन्याला सुरवात होते, आणि मग दोघांत जो बळीं ठरेल तो दुसऱ्याचा तुकडा हिसकावून घेऊन खात बसतो. तेव्हां आतां तुला जसें बरें वाटेल तसें कर. तूं आमचा भाऊ व सखा असल्यामुळें आह्माला आतां बिलकुल काळजी नाहीं. काम फत्ते करून सुरक्षित परत ये ह्मणजे झालें. तूं आह्माला ओळखतोस व त्यांनाही ओळखतोस; आमचा उद्देशही तुला माहीत आहेच, व बोलावें कसें हें कांहीं तुला सांगावयाला नको. ज्यानें आमचें हित होईल असें करून ये ह्मणजे झालें ' श्रीकृष्ण ह्मणाला, ' मी कौरवांची समजूत घालण्यासाठीं जातों; पण ते तुझ्याशीं सख्य करतील असा कांहीं रंग दिसत नाहीं. भीष्मद्रोणादिकांच्या जोरावर आपण मोठें बलवान् आहों, असें त्यांना वाटत आहे. जों जों तूं यांच्याशीं सामोपचारानें वागूं पहाशील तों तों ते तुला पूर्ण नागविल्यावांचून रहाणार नाहींत. दयेनें, भीतीनें किंवा धर्मार्थाचा विचार मनांत आणून ते तुझ्या इच्छेप्रमाणें वागण्याला तयार होतील असें समजूं नकोस. प्रत्यक्ष भीष्म, विदुर प्रभृति शहाण्यांच्या व इतर राजे व कौरव यांच्या समक्ष दानशील, सौम्य, धर्मशील अशा तुला द्यूतांत कपटानें

जिंकून तुला लंगोटी घालावयास लावून त्या दुष्ट कृत्याबद्दल त्यांना एवढीसुद्धां लाज वाटली नाहीं, ही एकच गोष्ट माझ्या ह्मणण्याची साक्ष पटविण्याला पुरें आहे. तर अशा प्रकारचें ज्यांचें शील व वर्तन आहे, त्यांची फुकट कींव करूं नकोस. सर्व जगानें त्यांना ठार करावें अशी त्यांची योग्यता आहे. मग तुझ्यासंबंधानें प्रश्न कशाला पाहिजे? भलत्या शब्दांनीं त्या दुर्योधनानें तुला व तुझ्या भावांना दुखविलें व त्याची मोठी फुशारखी मानून आनंदानें तो दुष्ट ह्मणतो, 'ह्या जगांत पांडवांचें स्वस्व म्हणून कांहीं उरलें नाहीं. त्यांचें नांव व गोत्र हीं सुद्धां बाकी उरलीं नाहींत. माझ्यापुढें त्यांचे शौर्यादि गुण नष्टप्राय झाले आहेत!' द्यूत चाललें असतां त्या दुष्ट दुःशासनानें द्रौपदीला ती रडत असतां अनाथाप्रमाणें केसांला धरून सभेमध्यें राजेलोकांत ओढून आणिली. भीष्मद्रोणांच्या समक्ष तिच्या तोंडून दीन ह्मणविलें. विक्रमशाली तुझ्या भावांचें तूं निवारण केल्यामुळें धर्मपाशानें जखडले जाऊन त्यांना गप्प बसावें लागलें. तुला वनवासाला पाठवून ज्ञातीमध्यें त्याची तो फुशारकी मिरवीत आहे. त्यानें जे राजे तेथें जमविले आहेत, त्यांची देखील तूं निरपराधी आहेस अशी खात्री होऊन अश्रूंनीं गळा दाटून येऊन ते नेहमीं दुःख करीत असतात. राजे, ब्राह्मण कोणी त्याला बरें ह्मणत नसून सभेमध्यें ते त्याची निंदाच करीत असतात. कुलीनाला निंदा मरणप्रायच आहे. प्रसंगीं मरण बरें; परंतु जीवित कष्टमय करून सोडणारी निंदा चांगली नाहीं. ह्या निर्लज्जाची जेव्हां पृथ्वीवरील सर्व राजांनीं निंदा केली, तेव्हांच तो मेल्यासारखा झाला आहे. ज्याचें चरित्र अशा प्रकारचें आहे, त्याला आतां मारणें हें सर्व मुळें तुटून जाऊन केवळ पाराच्या आधारानें असणाऱ्या झाडाला तोडून टाकण्याप्रमाणें अगदीं सोपें काम आहे. हा अनार्य दुर्बुद्धि सापाप्रमाणें

वाटेल त्यांनीं झोडपावा असा आहे. याच्यापुढें तूं वाकांवेंस हें मला ठीक दिसत नाहीं. दुर्योधनासंबंधानें ज्यांचें मन अद्यापि साशंक आहे, अशा सर्वांकडे जाऊन मी त्यांचा संशय दूर करीन. त्या ठिकाणीं जाऊन राजांमध्यें तुझ्या थोर गुणांचा गुणानुवाद गाऊन त्यानें आजपर्यंत केलेलीं दुष्ट कृत्यें उघड करून दाखवीन. धर्मार्थाला धरून असें हितकर भाषण मी त्या ठिकाणीं करूं लागलों असतां तें ऐकून त्या ठिकाणीं जमलेले चोहोंकडचे राजे तुला न्यायी व दुर्योधनाला लोभी असेंच ह्मणूं लागतील. सर्व नगरवासी व ठिकठिकाणचे लोक यांच्यामध्यें त्याची निंदा करीन, आणि तुझ्याकडून संधीचा प्रयत्न होत असल्यानें तुला कोणी तेथें दोष देणार नाहीं. धृतराष्ट्रासकट सर्व कौरवांची राजेलोक निंदा करूं लागतील, व लोकांनीं त्याला याप्रमाणें सोडल्यावर करावयाचें तें काय उरलें ? म्हणून मी कौरवांकडे जाऊन तुमचा अर्थ जाऊं न देतां शक्य तेवढी खटपट करतों, व युद्धासंबंधानें त्यांच्या काय खटपटी चालल्या आहेत हेंही पाहून घेऊन तुला जय देण्याला परत येतों. त्यांच्याबरोबर युद्धाचाच प्रसंग येणार असें मला धोरण दिसतें व त्यासारखे शकूनही होऊं लागले आहेत. आतां दोघांचें हित करण्याला मी होईल तितका प्रयत्न करीन व दूत या नात्यानें ही गोष्ट माझ्या स्वाधीन आहे यांतही थोडें तथ्य आहे. तरी त्याला दैवाचें साहाय्य पाहिजे. जमीन जरी सुपीक व चांगली मिळाली तरी पावसावांचून तींत धान्य उगवणार नाहीं. तिला पाणी पाजणें हा जरी पुरुषयत्न असला तरी असें करूनही जें शोषण पडतें त्यालाच दैव ह्मणावयाचें. म्हणून शहाण्यांनीं असें ठरवूनच ठेविलें आहे कीं, जगांतील सर्व गोष्टी दैव व मनुष्ययत्न या दोहोंवर अवलंबून आहेत. पुरुषयत्नानें जेवढें म्हणून शक्य आहे तेवढें मी करीन;

परंतु दैविक गोष्ट घडवून आणणें माझ्या हातीं नाहीं. तो दुर्मति धर्माला बाजूला गुंडाळून ठेवून वागत आहे व तशा प्रकारचीं कामें करून त्याला पश्चात्तापही होत नाहीं, व शकुनि, कर्ण, दुःशासन प्रभृति त्याचे सल्लागार त्याच्या त्या दुर्बुद्धीला भरच देत आहेत. सर्व बंधुवर्गांसह मेल्यावांचून कांहीं तो राज्य देऊन टाकण्याला तयार होणार नाहीं व तूंही त्याच्यापुढें हार घेऊन राज्य सोडून देण्याला तयार नाहींस. तोंड पसरलें असतां जर तो राज्य देण्याला तयार होणार नाहीं, तर तुझा निरोप त्याला सांगण्यांत कांहीं अर्थ नाहीं खरा. तरी सर्व जगापुढें तो यानें दोषी ठरणार आहे. लहानपणापासून तुमच्याशीं वैर बांधून आतां ज्यानें तुमचें राज्य गट्ट केलें आहे, त्या दुष्टाला तुमचें वैभव पाहून तळमळ होत असे. तुझ्यापासून मला फोडण्याची त्यानें पुष्कळदां खटपट केली. त्याचा, तसाच माझा मुख्य हेतु तुला ठाऊक आहेच.' असें म्हणून श्रीकृष्ण कौरवांकडे शिष्टाईसाठीं निघाला.

द्रौपदीची उठावणी.

श्रीकृष्ण शिष्टाईसाठीं कौरवांकडे निघाला असतां डोळे पाण्यानें भरून येऊन द्रौपदी त्याला ह्मणाली, 'धर्म तुला कळत असून आह्मांला त्यांनीं कपटानें सुखाला कसें मुकविलें आणि संजयाला काय पढवून इकडे पाठविलें होतें, हें सारें तूं जाणतोसच. आणि संजयापाशीं महाराजांनीं पांच खेडीं मागितलीं असतां तीं सुद्धां त्यांनीं देण्याचें नाकारिलें; तर कांहीं न देतां दुर्योधनाच्या मनांतून संधि करण्याचें असेल, तर त्याला मात्र तूं मुळीं कबूल होऊं नकोस. सृंजयांच्या साहाय्यानें पांडव आज कौरवांचें किती मोठें सैन्य असलें तरी त्याचा फडशा पाडण्याला

समर्थ आहेत. सामदानाचें जर त्याच्यापाशीं कांहीं चालत नसेल, तर त्यावर कृपा न करतां दंडाचाच उपयोग केला पाहिजे, आणि असें करशील तरच तें तुला यशस्कर होऊन सर्व क्षत्रियांना सुखावह होणार आहे. क्षत्रियानें स्वधर्माला जागून लोभाच्यामागें लागलेल्याचा मग तो क्षत्रिय असो वा दुसरा कोणी असो फडशाच उडविला पाहिजे. अवध्याला मारण्यांत जसा दोष सांगितला आहे, तसाच वध्य असून त्याची गय करण्यांतही दोष आहे. म्हणून तुह्मा सर्वांकडे या कामांत दोष न येईल अशा प्रकारानें वागा. कृष्णा, माझ्यासारखी हतभागी स्त्री ह्या पृथ्वीवर कोणी तरी असेल काय ? द्रुपदराजाची मुलगी! वेदीमधून जन्म! धृष्टद्युम्नाची बहीण! तुझी आवडती सखी! आजमीढकुळाशीं संबंध जुळून पंडुराजाची सून व पांच इंद्रासारख्या वीर्यशाली पांडवांची पट्टराणी झालें! आणि या पाचांपासून मला पांच महारथ मुलगेही झाले! असें सारें असून कृष्णा, पांडुपुत्रांच्या देखत व तूं जिवंत असून माझ्या केसांला ओढून माझे धिंडवडे काढून यांनीं मला सभेंत नेली! आणि पांडव व पांचाळ जिवंत असून सभेमध्यें मी त्या दुष्टांची दासी झालें! पांडवांना त्याची मुळीं चीड न येतां हातपाय न हालवितां ते मुकाट्यानें पहात बसलेले पाहून ' कृष्णा, यावेळीं माझी लाज राख ' म्हणून मीं मनांत तुझा धावा केला. ते वेळीं ' पांचाली, तूं वराला पात्र आहेस, वर माग, ' म्हणून मामंजी मला म्हणाले; तेव्हां पांडव आपल्या रथासकट व आयुधांसकट दास्यापासून मुक्त असोत, ' असा वर मागून मीं यांना दास्यांतून सोडविलें; पण वनवास यांच्या कपाळीं आला तो आलाच. तर अशा प्रकारचें कष्ट सोसावे लागले असल्यामुळें आतां आम्हा सर्वांना यांतून सोडविणारा तूंच आहेस. कृष्णा, मी भीष्मांची व धृतराष्ट्रांची धर्मानें सून ना? त्या

मला बलात्कारानें दासी केली! हा दुर्योधन क्षणभर कां होईना जिवंत राहिल्यानें पार्थमहाराजांच्या धनुर्विद्येला तसेंच भीममहाराजांच्या बलाला मी धिकार समजतें. जर माझी तुला कींव असेल, तसेंच माझ्यावर तुझी कृपा असेल, तर धृतराष्ट्रांच्या मुलांवर तूं पूर्ण आग पाखड.' असें म्हणून आपला तुळतुळीत असा केशपाश डाव्या हातानें पुढें करून ती कृष्णाच्याजवळ सरकून फिरून म्हणाली, 'कृष्णा, प्रतिपक्ष्याशीं संधीचें बोलणें लावतांना दुःशासनानें ओढलेल्या ह्या वेणीची आठवण ठेव. आज गरीब बनून भीमार्जुन व महाराज यांच्या मनांत जरी युद्ध करण्याचें नसेल, तरी माझे वृद्ध बाबा आपल्या मुलांना घेऊन युद्ध करण्याला खंबीर आहेत. तसेंच माझे हे पांच वीर्यशाली बाळ, अभिमन्यूला पुढें करून कौरवांबरोबर लढतील. दुःशासनाचे मोडून तोडून रक्तानें व मातीनें भरलेले हात पाहिल्यावांचून माझ्या मनाला शांति कशी बरें मिळावी? पेटलेल्या अग्नीप्रमाणें रागाला पोटांत ठेवून मीं हीं तेरा वर्षें काढिलीं आहेत बरें! ज्या ह्या भीम महाराजांना आज धर्म दिसूं लागला आहे, त्यांचे हे शल्याप्रमाणें टोचणारे शब्द माझ्या हृदयाला घरें पाडीत आहेस!' असें ह्मणून घसा दाटून येऊन ती मोठ्यानें रडूं लागली. तेव्हां तिला आश्वासून पुढें श्रीकृष्ण समेटीचे बोलणें करण्याकरितां कौरवाकडे निघून गेला.

विदुरांचा धृतराष्ट्राला सल्ला.

इकडे श्रीकृष्ण शिष्टाईसाठीं येतो आहे हें ऐकून धृतराष्ट्रानें मोठ्या थाटानें त्याचें स्वागत करण्याचा हुकूम दिला. तेव्हां विदुर त्याला ह्मणाले, 'राजा, तूं सर्वांना मान्य आहेस. अशा वृद्धापकाळीं तूं जें बोलशील तें होण्यासारखें आहे. तूं मोठा धर्मनिष्ठ

अशी तुझ्या प्रजेची खात्री असून तुझ्या अनेक गुणांनींच तुझी प्रजा सुखी आहे; ह्मणून त्या गुणांचा सांभाळ करण्याला झटून सरळपणा धर. मूर्खपणानें पुत्रपौत्रादिकांचा नाश करून घेऊं नकोस. मी कृष्णाचें मोठ्या थाटानें स्वागत करून त्याला फसवीन असें तुला वाटत आहे; परंतु तुझें हें करणें धर्मबुद्धीनें किंवा त्याला संतुष्ट करण्याच्या हेतूनें नाहीं, हें मी खात्रीपूर्वक सांगतों, व तोही याला दिपणार नाहीं. हें तुझें केवळ कपट असून वरकरणी कृत्यानें खरा उद्देश छपवून ठेवण्याचा हा तुझा प्रयत्न आहे. पांडव नुसतीं पांच गांवें मागत आहेत, तीं त्यांना देऊन टाकून तुझ्यानें त्यांच्याशीं सख्य करवत नाहीं, आणि द्रव्यलोभ दाखवून याला त्यांपासून फोडून आपल्या बाजूला वळवूं पहात आहेस. द्रव्यानें किंवा इतर खटपटींनीं याला अर्जुनापासून फोडतां येणें शक्य नाहीं, हें मी तुला सांगून ठेवतों. त्याचा थोरपणा, पांडवांसंबंधानें त्याची दृढ भक्ति हीं मला माहीत असल्यानें मी खात्रीनें सांगतों कीं, त्या प्राणासमान धनंजयाला तो कधीं सोडणार नाहीं. पाय धुण्याला लोटाभर पाणी व गोड शब्द याशिवाय तो तुझ्यापाशीं कांहींच मागत नाहीं. या माननीयाला जें अतिथ्य, प्रिय आहे तें मात्र त्याला दे. सर्वांचें कल्याण असावें या उद्देशानें दोघांचें सख्य जुळविण्यासाठीं तो येत आहे तेवढा त्याचा हेतु शेवटास ने, आणि जे पांडव तुझ्याशीं मुलाप्रमाणें वागत आले आहेत त्यांच्याशीं वडिलाला साजेलसें वाग ह्मणजे झालें.

कृष्णकुंती भेट.

श्रीकृष्ण शिष्टाईला आला असतां प्रथम कुंतीकडे गेला. तेव्हां त्याला पाहून मुलांची आठवण होऊन त्याच्या गळ्याला मिठी मारून ती मोठ्यानें रडूं लागली. भगवान् बसल्यावर गळा दाटून

येऊन ती त्याला म्हणाली, ' हे केशवा, लहानपणापासून जे थोरांची शुश्रूषा करण्यांत दक्ष असून एकमेकांशीं प्रेमभावानें व सरळ वागत आले व कपटानें राज्यापासून भ्रष्ट झाल्यानें ज्यांच्या कपाळीं वनवास आला, ते सत्यापासून कधीं न ढळणारे पांडव खुशाल आहेतना ? लहानपणींच वडिलांना मुकून माझ्या लडिवाळपणांत वाढलेल्या त्यांनीं सिंह, वाघ, हत्ती यांनीं भरलेल्या वनामध्यें दिवस कसेरे काढिले असतील ? माझा शुद्धशील, धर्मात्मा युधिष्ठिर कसा आहे ? ज्याला दहा हजार हत्तींचें बळ आहे व जो तापट असूनही भावांचें नेहमीं प्रिय करण्यांत दक्ष असतो, असा माझा भीम कसा आहे ? जो सहस्रार्जुन आज केवळ नामशेष आहे, त्याच्यावर सुद्धां जो आपल्या दोनच बाहूंनीं नेहमीं वरचढ करूं पहातो, जो तेजामध्यें सूर्यासारखा, इंद्रियनिग्रहामध्यें महान् महान् ऋषींसारखा, व पराक्रमांत इंद्रासारखा आहे, ज्याच्या बाहुबलावर सर्व पांडव अवलंबून आहेत, व युद्धाला उभा राहिला असतां ज्याच्या हातून जिवंत सुटण्याची कोणाची छाती नाहीं, तो तुझा लाडका धनंजय कसा आहे ? विनयसंपन्न, सौम्य, धार्मिक, माझा लाडका, रणशाली व आपल्या भावांच्या शुश्रूषेंत नेहमीं दक्ष असून ज्याचें वर्तन वाखाणण्यासारखें आहे, तो माद्रीतनय सहदेव कसा आहे ? जो सुकुमार व देखणा असून पांडवांचा बाहेरचा प्राण आहे, असा नानाप्रकारच्या युद्धकलेंत कुशल नकुल कुशल आहेना ? जो नेहमीं सुखांत वाढला असून हल्लीं अशा दुःखांत पडला आहे, त्या बाळ नकुलाला मी कधीं पाहीन कां ? तो एक निमिषभर दृष्टिआड झाल्यानें मला चैन पडत नसे ! सर्व गुणसंपन्न लावण्यवती व कुलीन द्रौपदी माझ्या मुलांपेक्षांही मला आवडती आहे. ज्या सत्यभाषिणीला पुत्रलोकापेक्षां पतिलोकच आवडते असून प्रिय-

पुत्रांना देखील टाकून जी पांडवांच्याबरोबर राहते, ती कल्याणी द्रौपदी कशी आहे ? हिचे पांच शूर महाधनुर्धारी पती अग्नीसारखे असतांही हिला दुःख भोगावें लागत आहे! मुलाबाळांना आंचवलेल्या ह्या द्रौपदीला पाहून आज चवदा वर्षें झालीं ! चांगलीं कृत्यें केल्यानेंच मनुष्याला सुख मिळतें, असें खात्रीनें ह्मणतां येत नाहीं; कारण, द्रौपदीचें वर्तन तशा प्रकारचें असून तिला कायमचें सुख मिळालें आहे काय ? दुष्ट दुःशासनानें ती रजस्वला असतां एका लुगड्यानिशीं तिला सभेंत सासऱ्यांच्यापुढें आणून उभी केली व सर्व कौरव तें निमूटपणें पहात उभे राहिले. तेव्हां जें मला वाईट वाटलें त्याहून अधिक दुःख मला आजपर्यंत झालें नाहीं. त्यावेळीं धृतराष्ट्र महाराज, बाल्हीक, कृपप्रभृतींचीं तोंडें उतरून गेलीं; पण त्या सभेंत मी विदुरानांच सर्वांहून थोर समजतें. मनुष्य वर्तनानेंच श्रेष्ठ ठरत असून पैशानें किंवा विद्येनें त्याला थोरपणा येत नाहीं. त्या गंभीर, महाबुद्धिशाली महात्म्या विदुरांचा शीलरूपी अलंकार सर्व लोकांवर विशेष झळकत आहे. धृतराष्ट्रांच्या मुलांनीं जे सभेमध्यें द्रौपदीचे धिंडवडे केले, ते जी माझ्या अंगाची लाही उडवीत आहेत, तशी लाही प्रत्यक्ष मरण आल्यानें सुद्धां उडणार नाहीं. मुलांना नगरांतून घालवून देणें व त्यांचा वनवास यांचा अनुभव मला प्रत्यक्ष आला आहे. दुर्योधनानें माझ्या मुलांना संकटांत पाडल्याला हें चवदावें वर्ष आहे, आणि सुख जर पुण्यकर्माची फेड असेल, तर या दुःखानंतर आह्माला सुख मिळालेंच पाहिजे. धृतराष्ट्राचे मुलगे व पांडव यांना मीं आजपर्यंत जरी कधीं कमीजास्ती लेखिलें नाहीं, तरी आतां तुला मी खात्रीनें सांगते कीं, शत्रूना मारून या प्रसंगांतून पार पडून पांडवांसहवर्तमान मी तुला वैभवांत झळकतांना पाहीन. त्यांचा कधीं पराजय होणार नाहीं.

कारण त्यांचें वर्तनच तशा प्रकारचें आहे. मी लहान असून चेंडूनें खेळत असतां तुझ्या आजोबांनीं आपला मित्र जो कुंतिभोज त्याला मला देऊन टाकिली. याप्रमाणें बापानें व सासऱ्यांनीं टाकलेल्या दुःखशील अशा माझ्या जगण्यांत तरी काय अर्थ झाला? अर्जुनाला जेव्हां प्रसवलें, तेव्हां सोहेरामध्यें रात्रीच्या वेळीं जी आकाशवाणी झाली कीं, ' तुझा मुलगा पृथ्वीं जिंकील, त्याची कीर्ति स्वर्गाला जाऊन भिडेल व सर्व कौरवांना मारून भावांसहवर्तमान तो तीन अश्वमेध करील, ' ती खोटी कशी बरें व्हावी ? धर्मामध्यें जर कांहीं तथ्य असेल, तर ज्याप्रमाणें आकाशवाणी झाली आहे, तें सर्व तूं घडवून आणशीलच. मुलांचा वियोग ज्याप्रमाणें मला पिळून काढीत आहे, तितकें दुःख वैधव्य आल्यानें किंवा संपत्तीला मुकल्यानें सुद्धां मला कधीं झालें नाहीं. तो सर्व शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ गांडीवधन्वा माझ्या डोळ्याआड झाल्यानें माझ्या मनाला स्वस्थता कशी ती नाहीं. आज चवदा वर्षें मीं आपल्या मुलांना बघितलें नाहीं! कुडींतून प्राण निघून जाऊन मनुष्य नाहींसा झाल्यावर मात्र लोक त्याचें श्राद्ध करतात; परंतु वास्तविक पाहिलें असतां ते मला व मी त्यांना मुकल्यासारखेच झालों आहों. माझ्या त्या धर्मात्म्या युधिष्ठिराला सांग कीं, ' तुझें धर्माचें अवडंबर फारच माजत चाललें आहे. उगीच आतां त्यांच्या फार भानगडींत पडूं नकोस. जिला पोटासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे बघावें लागतें, तिचें जिणें फुकट आहे. यापेक्षां मरणें काय वाईट ? ' तसेंच त्या धनंजयाला व त्या तापट वृकोदराला सांग कीं, ' क्षत्रियस्त्री ज्या कारणाकरितां मुलांना जन्म देते, ती वेळ आतां आली आहे, आणि ही आलेली पर्वणी जर फुकट दवडाल तर आजपर्यंत लोकमान्य झालेले तुह्मी लोकांच्या छीःथूला पात्र व्हाल, व जर कां एकदां तुम्ही तसे झालां, तर मी तु-

म्हाला कायमची मुकलें समजा. वेळ आली असतां प्राणाची देखील पर्वा कामाची नाहीं.' नेहमीं क्षात्रधर्माला जागणाऱ्या माद्रीच्या मुलांना सांग कीं, 'प्राणसुद्धां खर्ची घालून पराक्रमानें मिळविलेले भोग भोगा. पराक्रमानें मिळविलेलें वैभव क्षात्रधर्मानें राहूं इच्छिणाऱ्या पुरुषाच्या मनाला नेहमीं संतोष देत असतें. येथून गेल्यावर सर्व शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ जो अर्जुन त्याला सांग कीं, 'द्रौपदी सांगेल त्या वाटेनें जा.' ते दोघे भीमार्जुन वीर खवळले असतां देवांनासुद्धां शेवटची गति देण्याला समर्थ आहेत हें तुला मीं सांगावयाला नको. द्रौपदी सभेमध्यें असतां कर्णदुःशासन तिला टाकून बोलले, हा अपमान त्या दोघांचाच आहे. ठळक ठळक थोर वीर पहात असतां दुर्योधन भीमावर चालून गेला, त्याचें फळ त्याला आतां कळून येईल. एकवार वैर पडल्यावर तें भीमाचें वैर पुष्कळ दिवस मध्यें लोटले तरी शत्रूचा पूर्ण फडशा उडविल्याखेरीज निवणारें नव्हे. कौरवांनीं द्यूतामध्यें राज्य बुचाडून घेऊन माझ्या मुलांना वनवासाला पाठविल्याचें मला इतकें दुःख होत नाहीं; परंतु त्या साध्वीला ती रजस्वला असतां सभेमध्यें जावें लागून जे कर्णकटू शब्द ऐकावे लागले, ते माझ्या मनाला फार झोंबत आहेत. त्या स्त्रीधर्म जाणणारीला सनाथ असतांही ते वेळीं कोणी नाथ मिळाला नाहीं! ज्या मला तूं, सर्व बलवानांमध्यें श्रेष्ठ राम, व महारथ प्रद्युम्न नाथ आहां ती मी, ज्यापुढें कोणाची मात्रा चालावयाची नाहीं असा भीम व कधीं न डगमगणारा अर्जुन जिवंत असून अशीं दुःखें सोशीत आहें पहा!' याप्रमाणें पुत्रशोकानें पीडलेल्या आपल्या आतेचें शांतवन करण्यासाठीं भगवान् म्हणाला, 'आते तुझ्यासारखी सीमंतिनी सर्व लोकांमध्यें आहे कोण? तूं शूर राजाची मोठी कुलीन कन्या असून एका सरोवरापासून दुसऱ्या सरोवराप्रमाणें

आजमीढांच्या घरीं येऊन पडली आहेस. व या पृथ्वीची स्वामिणी व सर्वमंगला अशी तूं पतीला परमपूज्य होतीस. वीरपुत्र प्रसवणारी वीरपत्नी तूं सर्व गुणांनीं मंडित आहेस. तुझ्यासारख्या मोठ्या शहाण्या स्त्रीनें येऊन पडणारीं सुखदुःखें सोसलींच पाहिजेत. पांडव ग्राम्यसुखाकडे लक्ष्य न देतां वीरसुखांत गढून आहेत, व ते फार उत्साहसंपन्न व मोठे बलशाली असल्यानें त्यांची थोड्या थोडक्यानें तृप्ति व्हावयाची नाहीं. थोर लोक कोणताही शेवट पतकरतात. ग्राम्यसुखाला सवकलेले मात्र मध्यम स्थितींत संतुष्ट असतात. शहाण्या लोकांनीं कोणत्याही स्थितीच्या कळसांतच आजपर्यंत सुख मानून घेतलें असून मधली स्थिति त्यांना दुःखमयच वाटते. द्रौपदीनें आणि सर्व पांडवांनीं अभिवंदनपूर्वक आपलें कुशल कळविण्यास सांगून तुझें कुशल विचारिलें आहे. ते सुरक्षित व सर्व हेतु परिपूर्ण होऊन आपल्या शत्रूंना मारून सर्व लोकांवर आधिपत्य मिळवितील.' याप्रमाणें तिचें शांतवन करून तिचा निरोप घेऊन भगवान् दुर्योधनाच्या वाड्याकडे गेला.

दुर्योधनाची भेट.

श्रीकृष्ण दुर्योधनाची गांठ घेण्यासाठीं त्याकडे गेला असतां दुःशासन, कर्ण व शकुनि हे त्याच्याजवळच बसले होते. भगवानाला येतांना पाहून दुर्योधनानें उठून त्याला मान दिला. नंतर सर्वांची भेट घेऊन नानाप्रकारच्या मूल्यवान् कपड्यांनीं मढविलेल्या सुवर्णमंचकावर भगवान् बसला. दुर्योधनानें त्याला जेवावयाला बोलाविलें असतां श्रीकृष्णानें तें नाकारिलें. तेव्हां 'तुझ्यासाठीं सर्व तयारी केली असून तूं नाहीं कां म्हणतोस, दोघे तुला सारखे असून दोघांना साहाय्य देण्याचें तूं कबूल केलें आहेस; तसेंच तातांच्या

तूं संबंधी आहेस; तेव्हां याचें कारण काय हें सांगशील काय; ' असें दुर्योधनाचें भाषण ऐकून श्रीकृष्ण म्हणाला, ' दूतांचा हेतु सफल झाल्यावरच ते जेवणखाण वगैरे सत्कारांकडे लक्ष्य देत असतात; म्हणून माझी इच्छा पूर्ण करून मग वाटेल तितका तूं माझा सत्कार कर. काम, राग, द्वेष, लोभ किंवा पैसा यांनीं किंवा लटपटीच्या बोलण्यानें मी कधीं फसून जाणार नाहीं. प्रेम असेल तेथें अन्न घ्यावें, किंवा अन्न न मिळेल तर वाटेल तेथें घ्यावें. तुझें आमच्यावर प्रेम नाहीं व आह्मी अजून अन्नार्थी बनलों नाहीं. सर्व गुणांनीं संपन्न व तुझ्या मनाप्रमाणें वागत असणाऱ्या पांडवांबरोबर आजन्म कांहीं कारण नसून तूं वैर करीत आला आहेस. विनाकारण असा त्यांचा द्वेष करणें तुला शोभत नाहीं. ते नेहमीं धर्मानें वागत असून त्यांच्यामध्यें एवढा देखील दोष काढण्याची कोणाची छाती नाहीं. त्यांचा जो द्वेष करतो, तो माझाच द्वेष करतो असें मी समजतों. धर्मानें वागणारे पांडव व मी एकच आहों असें समज. कामक्रोधांच्या तावडींत जाऊन जो गुणवानांशीं विरोध करून त्यांचा द्वेष करतो, तो मनुष्य नीच समजला पाहिजे. उत्तम गुणांनीं संपन्न अशा ज्ञातीकडे जो लोभदृष्टीनें पहातो, त्या नीच पुरुषापाशीं संपत्ति फार दिवस टिकत नाहीं. जो गुणवानांना जोडतो तो चिरकाल सुखी असतो. मला तुझ्याकडे अन्न घ्यावेंसें वाटत नाहीं. एकट्या विदुरांकडेसच अन्न घ्यावें असें माझें मन मला सांगतें. ' असें म्हणून तो विदुरांकडे निघून गेला.

विदुरांची भेट.

श्रीकृष्ण व विदुर आपल्या वाड्यांत बोलत बसले असतां, विदुर श्रीकृष्णाला म्हणाले, 'केशवा, तूं आलास हें कांहीं बरें केलें

नाहींस. हा मंदबुद्धी तापट दुर्योधन धर्मार्थाला न जुमानतां दुसऱ्याचा पाणउतारा करून स्वतःचा बडेजाव माजवून घेणारा आहे, व थोरांच्या उपदेशाचें याच्यापुढें कांहीं चालावयाचें नाहीं. धर्मशास्त्राची याच्यापुढें डाळ शिजावयाची नाहीं. हा मोठा दुराग्रही आहे. हा हिताच्या वाटेकडे वळणारा नव्हे; विषयलंपट व मित्रांचा द्वेष करणारा असा असून हा मोठा संशयखोर आहे. हा कोणावर उपकार करणारा नसून केलेला उपकार स्मरणाराही पण नव्हे. धर्माला झुगारून देऊन यानें कपटाला कवटाळिलें आहे. याची बुद्धि स्थिर नसून इंद्रियांवर याचा दाब नाहीं. हा मनःपूतं वागणारा आहे. अशा अनेक दोषांनीं याला घेरून टाकिलें असल्यामुळें तूं हिताची गोष्ट सांगितलीस तरी हा दुराग्रहानें ती ऐकणार नाहीं. भीष्म, द्रोण, कृप, कर्ण, अश्वत्थामा, जयद्रथ यांवर त्याची मोठी भिस्त असल्यानें संधि करण्याला हा तयार होणार नाहीं. भीष्मद्रोण प्रभृतींकडे पांडव नुसते पहाण्याला सुद्धां समर्थ नाहींत, असें कर्णदुर्योधनांना वाटत आहे. त्याचप्रमाणें हा स्वतःला न ओळखणारा मूढ पृथ्वीवरील सर्व सैन्य गोळा करून आपल्याला कृतकृत्य समजत आहे. तूं यांचें बंधुप्रेम जोडूं पहात आहेस; पण वाजवी रीतीनें जें पांडवांना द्यावयास पाहिजे तें सुद्धां देण्याला हा कबूल नाहीं. त्यांनीं आपसांत हा विचार अगदीं ठरवून टाकिला आहे. तुझे शब्द त्या ठिकाणीं फुकट जाणार. ज्या ठिकाणीं सदुपदेश व दुरुपदेश सारखेच विकले जातात, तेथें शहाण्यानें बहिऱ्यापुढें गीत गाण्याप्रमाणें कांहीं बोलूं नये हेंच चांगलें. सत्तेच्या घमेंडींत हा दुर्योधन तुझें ह्मणणें ऐकणार नाहीं. त्या चांडाळचौकडीमध्यें तूं जावेंस हें मला बरें वाटत नाहीं. दुर्बुद्धि, लौकिकज्ञानहीन अशा ह्या पापकर्माकडे कल असलेल्यांमध्यें जाऊन त्यांच्या उलट बोलत बसणें मला ठीक

दिसत नाहीं. वृद्धसेवा ह्यास ठाऊक नसून संपत्तीचा याच्या डोळ्यांवर धूर आला असल्यामुळें तारुण्याच्या मदांत हा तुझें हिताचें भाषण ऐकणार देखील नाहीं. तूं किती जरी याच्यापुढें कंठशोष केलास, तरी तुझ्यासंबंधानें याचें मन बिघडलें असल्यानें तुझें ऐकण्याला हा कधीं तयार होणार नाहीं. आपण गट्ट केलेलें राज्य युद्ध करून इंद्रादिकांना सुद्धां घेतां येणार नाहीं, असें त्याच्या मनानें घेतलें आहे. हत्ती, घोडे, रथ, पायदळ यांच्यामध्यें आपण सुरक्षित आहों, असें समजून ही पृथ्वी आपणच जिंकल्यासारखी हा समजत आहे. या अफाट पृथ्वीचें राज्य कोणी कांटा न उरतां आपल्याला असावेंसें याला वाटत आहे. याच्याशीं सख्य होणें अगदीं अशक्य आहे. कारण आपल्या ताब्यांतील परस्व देखील तो स्वतःचेंच समजतो. दिवस भरल्यामुळें ह्या पृथ्वीची ग्रहदशा फिरली आहे ह्मणूनच पृथ्वीवरील सर्व राजे दुर्योधनाबरोबर पांडवांवर उठले आहेत. ह्या सर्वांनीं पूर्वीं तुझ्याशीं वैर केलें असतां यांचें तूं सर्वस्व हरण केलें असल्यामुळें भीतीनें कर्णाची कास धरून ते कौरवांच्या बाजूला मिळाले आहेत. तेव्हां ह्या दुष्टांमध्यें तूं जावेंस हें मला ठीक दिसत नाहीं. तुझें सामर्थ्य, तुझी बुद्धि, तुझा पराक्रम हीं सर्व मी जाणून आहें. देवांनाही तूं अजिंक्य आहेस. पांडवांहून तूं मला विशेष प्रिय आहेस, ह्मणून प्रेमामुळें, तुझ्यासंबंधीं आदरामुळें, तसेंच जिव्हाळ्यामुळें हें मी तुला सांगत आहें. मला मात्र तुझा हा मोठा अलभ्य लाभ झाला आहे.' यावर श्रीकृष्ण म्हणाला, 'आपल्यासारख्या दूरदर्शी शहाण्यांनीं मला जसा उपदेश करावा त्याला अनुरूपच हें आपलें भाषण आहे. धर्मार्थाला धरून वडिलांप्रमाणें मोठ्या कळकळीचा मला आपण उपदेश केला आहे. आपलें म्हणणें जरी खरें आहे, तरी माझ्या येण्याचा उद्देश आपण नीट लक्ष्यांत आ-

णा. कौरवांचा दुष्टपणा, व क्षत्रियांचें सजसंबंधाचें वैर या सर्व गोष्टी लक्ष्यांत ठेवूनच मी येथें आलों आहें. ह्या पृथ्वीची घडी बिघडली असतां तिला कालपाशांतून जो सोडवील त्याच्या पदरीं उत्तम पुण्य पडणार आहे. शिवाय रास्त गोष्ट हातीं घेऊन जो त्यासंबंधानें यथाशक्ति झटतो, त्याला ती शेवटास नेल्याचें पुण्य लागतें. तसेंच मनांत कितीही पाप असून कृतीनें तें जर घडून न येईल, तर त्याचें फळ भोगावें लागत नाहीं, हेंही पण सर्वांना माहीत आहे. ह्मणून युद्धामध्यें मरूं घातलेल्या कौरवसृंजयांमध्यें सख्य जुळवून आणण्याची निरपेक्ष खटपट करण्याची माझी इच्छा आहे. कर्णदुर्योधनांमुळें हें महत्संकट कौरवांवर ओढवलें असून तेही डोळे मिटून त्याच्यामागून जात आहेत. संकटांत बुडत असलेल्या मित्राला जो यथाशक्ति हात देत नाहीं, त्याला शहाणे दोष देतात. मित्राला शेंडीधरून सुद्धां संकटांतून वर काढण्याची जो यथाशक्ति खटपट करतो, त्यावर कोणाचा बोल उरत नाहीं. ह्मणून माझा योग्य, चांगला व हितकर सल्ला दुर्योधन व त्याचे सल्लागार यांनीं ऐकावा, हें रास्त आहे. कौरवांच्या, पांडवांच्या, तसेंच पृथ्वीवरील क्षत्रियांच्या हितासाठीं मी सरळ रीतीनें झटेन. आतां त्यांच्या हितासाठीं मी झटत असतां जर दुर्योधनाला माझा संशय येईल, तर तेंही पण मला हवेंच आहे. आपलें कर्तव्य केल्यानें मी तरी ऋणांतून मोकळा होईन. ज्ञातीमध्यें भांडण उपस्थित झालें असतां जो मित्र मध्यस्ती करून तें मिटविण्याला झटत नाहीं, त्याला शहाणे खरा मित्र ह्मणत नाहींत. धर्मलंड, मूर्ख व माझ्या वाइटावर असणारांनीं ‘ या खवळलेल्या कौरवपांडवांना आळा घालण्याचें सामर्थ्य कृष्णामध्यें असून त्यानें तेवढें सुद्धां केलें नाहीं,’ असें पुढेंमागें ह्मणूं नये; ह्मणून दोघांचाही उद्देश शेवटास नेण्याच्या हेतूनें मी आलों आहें व त्या

दिशेनें यत्न केल्यानें मी लोकापवादापासून सुटेन. माझें रास्त व हितकर भाषण ऐकून तें जर तो मूढ घेणार नाहीं, तर त्याच्या नशीबीं असेल तें तो भोगील. आतां पांडवांचा उद्देश जाऊं न देतां मला जर दोघांचें सख्य जुळवून आणतां आलें, तर पुण्य माझ्या पदरीं पडून कौरवही मृत्यूच्या तडाक्यांतून सुटतील. धर्माला धरून असणाऱ्या माझ्या भाषणावर विचार करून तें त्यांना पटल्यास ठीक आहे. आतां माझें वाईट करण्याचें जर ते मनांत आणतील तर सिंहापुढें ज्याप्रमाणें कितीही श्वापदें एकत्र जुळलीं तरी त्यांचें कांहीं चालावयाचें नाहीं, त्याप्रमाणें पृथ्वीवरील सर्व राजे एकवटले तरी त्यांची माझ्यापुढें डाळ शिजावयाची नाहीं.

श्रीकृष्णशिष्टाई.

पुढें श्रीकृष्ण विदुराना बरोबर घेऊन सभेमध्यें आल्याबरोबर धृतराष्ट्र प्रभृति मंडळी आपापल्या आसनावरून उठून उभी राहिली. धृतराष्ट्राच्या आज्ञेनें तेथें भगवानासाठीं एक सोन्यानें शृंगारलेलें आसन तयार ठेविलें होतें. धृतराष्ट्र, भीष्म व द्रोण यांच्याशीं हासत हासत चार गोष्टी बोलून श्रीकृष्ण म्हणाला, ' हे भरतकुलोत्पन्न धृतराष्ट्रा, पांडवकौरवांमध्यें युद्ध जुळून वीरांचा फडशा उडूं नये, एवढेंच मागण्यासाठीं मी आलों आहें. तुला सगळें कळतें. हें कौरवकुल सर्वांमध्यें श्रेष्ठ असून परसुख, दयाभूतपणा, सरळ वर्तन, क्षमा, व सत्य यांकरितां हें विशेषकरून प्रसिद्ध आहे. तर अशा ह्या नांवाजलेल्या कुलांत विशेषकरून हल्लींसारख्या गोष्टी घडण्याला तूं कारण व्हावेंस, हें ठीक नाहीं. उघड किंवा परोक्ष रीतीनें आडमार्गाला जाणाऱ्या कौरवांना ताळ्यावर आणण्याचें काम तुझें आहे. तुझे दुर्योधनप्रभृति

मुलगे धर्माला झुगारून देऊन कोणी शास्ता न उरतां लोभामुळें मर्यादा सोडून आपल्या भावांशीं मनाला वाटेल तसें वागण्याला निघाले आहेत. याकडे डोळेझाक केल्यानें सर्व कौरवांचा फडशा पडणार आहे. आपल्या कुळाचा नाश व्हावा अशी जर तुझी इच्छा नसेल, तर सख्य जुळून येणें मला सोपें काम दिसतें. ही गोष्ट आपल्या दोघांच्या हातीं आहे. तूं आपल्या मुलांना ताळ्यावर आण, ह्मणजे मी पांडवासंबंधानें जबाबदारी घेतों. मुलांनीं तुझ्या आज्ञेप्रमाणें वागावें यांतच त्यांचें कल्याण आहे. दोघांमध्यें सख्य रहाण्यांतच तुह्मा दोघांचें कल्याण आहे. त्यांच्याशीं वैर चांगलें नव्हे. ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन त्यांच्याबरोबर सख्य करून त्यांच्या साहाय्यानें धर्मार्थ जोड. तूं कितीही झटलास तरी असे साहाय्यकारी तुला मिळणें कठीण आहे. पांडवांचा तुला पाठिंबा असल्यास प्रत्यक्ष इंद्रादि देवांची सुद्धां तुला जिंकण्याची छाती नाहीं. कौरवपांडवांचें तुला सहाय्य मिळेल तर तुला सार्वभौमत्व मिळून शत्रूची तुझ्यापुढें डाळ शिजणार नाहीं. तुझ्याबरोबरीचे राजे देखिल मग तुझी मर्जी संपादन करण्याकरितांच झटतील व याप्रमाणें पुत्रपौत्र, वडील, भाऊ, मित्र या सर्वांचा तुला पाठिंबा मिळाल्यावर मग तुला सुखाला काय कमी आहे? पूर्वींप्रमाणें यांना योग्य मान देऊन हातीं घेशील तर सर्व पृथ्वीचा तुला खास उपभोग मिळेल, व तुझे शत्रु वर तोंड काढणार नाहींत. हा तुझाच स्वार्थ यांत साधणार आहे. तुझ्या मुलांची तुला योग्य समजूत घालतां येईल तर पांडवांनीं मिळविलेली भूमी तुला भोगावयाला मिळेल. युद्धामध्यें मोठा नाश होणार. दोन्ही पक्षांचा याप्रमाणें नाश होण्यांत कोणता धर्म तुझ्या पदरीं पडणार? महाबलवान् पांडवांनीं किंवा तुझ्या मुलांनीं युद्धांत एकमेकांना मारल्यानें तुला काय सुख मिळणार तें सांग पाहूं? सर्व पांडव तसेंच तुझ्या बाजूचे शूर वीर

यांना या महासंकटापासून वाचीव. ह्या सर्व पांडवकौरवांच्या हातून दोन्ही पक्षांकडील शूरांचा फडशा पडलेला पहाण्याचें आमच्या कपाळीं न येवो. येथें जुळलेले सर्व राजे खवळतील तर सर्व प्रजेचा फडशा पाडतील. तूं शुद्धीवर येशील तरच हें संकट टळणार आहे. हे शुद्ध, उदार, विनयसंपन्न, थोर व उत्तम कुळांत जन्मलेले राजे परस्परांचे साहाय्यकर्ते आहेत; तेव्हां यांना राग व वैर विसरून शुद्ध मनानें परस्परांना भेटून प्रीतिभोजनानंतर उत्तम वस्त्रें व माळा यांचा सत्कार घेऊन आपापल्या घराकडे जाऊं देत. पांडवांच्याठिकाणीं जें तुझें पूर्वीं प्रेम होतें, तेंच तुझ्या आयुष्याच्या शेवटच्या घटकेपर्यंत त्यांजवर कायम राहूं दे. लहानपणींच वडिलांना आंचवल्यामुळें तूंच त्यांना वाढविलें आहेस. त्यांचा व तुझ्या मुलांचा तुला साजेल अशा रीतीनें संभाळ कर. त्यांना पाठीशीं घेणारा मुख्यत्वेंकरून तूंच आहेस. पायावर डोकें ठेवून विनवून पांडवांनीं तुला निरोप सांगितला आहे कीं, ' आपल्याच आज्ञेनें आह्मीं आजपर्यंत दुःखें सोसलीं आहेत. आपण बोलल्याप्रमाणें वागाल या भरंवशावर ते वेळीं आपली आज्ञा न मोडतां बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास आह्मीं काढिला. तेव्हां धर्मार्थ आपल्याला पूर्ण कळत असल्यानें आतां वचनाप्रमाणें आमचा हिस्सा आह्माला देऊन आपण आमचा सांभाळ करा. आपल्या ठिकाणीं असलेला वडीलपणा लक्ष्यांत घेऊनच आह्मी कष्ट सोसले. तर आपणही आतां त्या वडिलपणाला साजेलसें आमच्याशीं वागा. गुरूच्या ठिकाणीं जें शिष्याचें योग्य वर्तन असावें तसें आह्मी आपल्या ठिकाणीं ठेवीत आलों तर आपणही गुरूचें कर्तव्य बजावा. आह्मी आडमार्गाला जाऊं लागलों तर आम्हाला वाटेवर आणण्याचें काम आपलें आहे. तर स्वतः सरळमार्ग धरून आम्हाला वाटेला लावा.'

ह्या सभासदांनाही त्यांनीं पुढील निरोप कळविला आहे. ' सर्व सभासद धर्मज्ञ असतां ह्या ठिकाणीं कोणतीही अन्यायाची गोष्ट घडणें योग्य नाहीं. सभासदांच्या डोळ्यादेखत धर्माची अधर्माकडून व सत्याची असत्याकडून पायमल्ली होईल तर त्याच्या योगानें त्या सभासदांना दोष लागणार आहे. अधर्मरूपी बाणानें घायाळ होऊन धर्म सभेंत आला असतां त्याचा तो बाण जर सभासद काढणार नाहींत, तर तो त्यांचाच नाश करतो.' जे धर्माकडेच डोळे लावून त्यावर विचार करीत बसले आहेत, त्या पांडवांचें हें भाषण खरें, धर्मार्थाला अनुसरून व यथार्थ आहे. ' त्यांचें त्यांना देतों, ' या पलीकडे तुला त्यांना काय उत्तर देतां येणार आहे ? जे ह्या सभेंत बसले आहेत त्यांनाच सांगूं दे कीं, धर्मार्थाचा विचार करून मी हें खरें ह्मणतों किंवा खोटें ! रागाच्या तावडींत न सांपडतां संधी करून या क्षत्रियांना मृत्यूच्या तोंडांतून सोडीव. त्यांचा वडिलोपार्जित हिस्सा त्यांना देऊन कृतार्थ हो. धर्मराज नेहमीं भल्यांचा कित्ता वळवून आहे आणि त्याचें तुझ्या व तुझ्या मुलांच्या ठिकाणीं कसें वर्तन आहे, हें तू जाणतोसच. त्यांना जाळण्याचा प्रयत्न झाला, घालवून देण्यांत आलें, तरी ते तुमच्या बाहेर नाहींत. इंद्रप्रस्थाला तुह्मीं त्यांना घालविलें, तरी तेथून सुद्धां सर्व राजांना तुझ्या बाजूला वळवून त्यांनीं तुमचें हितच केलें. ते असें वागत असतां त्यांची संपत्ति गिळंकृत करण्यासाठीं शकुनीनें कपट मांडिलें व त्याचा कळस करून द्रौपदीला सभेमध्यें आणिली. तेव्हां देखील तो गंभीर धर्मराज क्षात्रधर्मापासून ढळला नाहीं. माझी इच्छा तर तुझें आणि त्यांचें कल्याण व्हावें अशी आहे. ह्या प्रजेला धर्म, अर्थ, व सुख यांपासून मुकवूं नकोस. अनर्थाला हित समजून हिताला अनर्थ समजणाऱ्या तुझ्या लोभी

मुलांना आवर. पांडव तुझी सेवा करण्याला तयार आहेत, व ते युद्धालाही तयार आहेत. तुला जें पटेल तें पतकर.'

यावर धृतराष्ट्रानें दुर्योधनाची समजूत घालण्यास श्रीकृष्णाला सांगितल्यावरून तो त्याकडे वळून ह्मणाला, 'हे बुद्धिमान् दुर्योधना, तुला व तुझ्या लोकांना सुख मिळावें म्हणून मी तुला सांगतों, तें ऐकून घेऊन त्याप्रमाणें वाग. थोर कुलांत तुझा जन्म झाला असून विद्या, आचार व दुसरे चांगले गुण तुझ्या ठिकाणीं आहेत. तूं मनांत योजिलें आहेस तशा प्रकारचें काम नीच कुलांत ज्यांचा जन्म झाला आहे त्यांनींच करावें. भल्यांचें वर्तन धर्म व अर्थ यांना सोडून कधीं असत नाहीं. तुझ्या ह्या कृतीचा परिणाम फार घोर व अनिष्टकारक होणार आहे. एकदां या कामाला सुरवात झाल्यावर मग तें कोणाला आवरतां येणें कठीण. तर आधींच सावध होऊन हा अनर्थ टाळशील, तर तुझें व तुझ्या आप्तबांधवांचेंच त्यांत कल्याण होणार आहे, व अपयशाचें खापर तुझ्यावर फुटणार नाहीं. शहाणे, शूर, उत्साहसंपन्न, मनोनिग्रही अशा पांडवांबरोबर सख्य करण्याला तुला भीष्म, विदुरप्रभृति मंडळी सांगत असून तुझ्या वडिलांचेंही तुला तेंच सांगणें आहे. तूं स्वतः विनयशील, कुलीन व बहुश्रुत आहेस. तुझा स्वभाव दुष्ट नाहीं; तेव्हां वडिलांच्या आज्ञेप्रमाणें वाग. बाप जो उपदेश करीत असतो तो हिताचा असून कोणालाही संकटसमयीं त्याची आठवण होत असते. सुहृदांच्या उपदेशाप्रमाणें न वागणाराला, कच्चें अन्न खाणाराला ज्याप्रमाणें पुढें तें निस्तरावें लागतें, त्याप्रमाणें परिणामीं फार ताप होतो. बुद्धीला भ्रंश पडून जो हितवचन ऐकत नाहीं, तो स्वार्थाला मुकतो. आपल्या मनाजोगें नसल्यामुळें आपल्या हितेच्छूंचें भाषण न ऐकतां त्याच्या उलट सांगणाऱ्यांच्या उपदेशाप्रमाणें जो वागतो, तो लवकरच संकटांत सांपडून

त्याबद्दल त्याच्या मित्रांना रडण्याची पाळी येते. चांगला मंत्री टाकून दुर्मंत्र्याच्या सल्ल्यानें जो वागतो, तो घोर संकटांत सांपडून त्यांतून त्याला पार पडतां येत नाहीं. जो सज्जनांचा उपदेश न ऐकतां दुर्जनांच्या तंत्रानें वागतो, खोटें वर्तन ठेवतो व परकीयांच्या नादीं लागून स्वकीयांचा द्वेष करतो, त्याला ही भूमाता सोडते. त्या वीरांशीं विरोध करूं नकोस. इंद्रासारख्या महारथी आपल्या भावांना सोडून साह्यासाठीं तूं दुसऱ्याच्या तोंडाकडे पहातोस ह्या वेडेपणाला काय म्हणावें ? जन्मापासून त्यांना तुच्छ करून तूं त्यांच्याबरोबर कपटानें वागत आहेस, तरी ते तुझ्याशीं सरळच वागत आहेत; तेव्हां तूंही त्यांच्याशीं तसाच वाग. शहाण्यांनीं हातीं घेतलेलें काम धर्म, अर्थ, काम या तिहींला धरून असतें, व ह्या तिहींशीं जेव्हां त्याचा मेळ बसवितां येत नाहीं, तेव्हां धर्म व अर्थ या दोहोंला तरी धरून ते चालतात. सामान्य मनुष्यच तंट्याला मूळ अशा पैशाच्या मागें लागतो. जो मूर्ख असेल तोच केवळ कामाच्या आधीन होतो. तो केवळ इंद्रियविषयांच्या नादीं लागून लोभानें भलत्या उपायानें पैसा मिळविण्याच्या खटपटींत पडून नाश पावतो. अर्थकामांकडे लक्ष्य असणारानें देखील धर्माचीच पाठ धरावी. कारण ते देखील बहुतेक धर्माला धरून असतात. धर्म हेंच त्रिवर्गप्राप्तीचें उत्तम साधन आहे; तेव्हां धर्मानें अर्थकाम मिळवूं इच्छिणाराच भरभराटीला येतो. तूं भलत्या उपायानें सर्व राजांवर उज्ज्वल व श्रेष्ठ स्वामित्व मिळवूं इच्छीत आहेस. आपल्याशीं सरळ वागणाराबरोबर जो वाकड्या रीतीनें वागतो, तो अखेरीस आपलाच घात करून घेतो. ज्याचा नाश होऊं नये अशी आपली इच्छा असते, त्याच्या बुद्धीला भ्रम कधीं पाडूं नये. ज्याचा आपल्या मनावर दाब आहे, अशा पुरुषानें यःकश्चित् सामान्य मनुष्यालासुद्धां तुच्छ

करूं नये; मग पांडवांसारख्यांची गोष्ट राहिली बाजूला. रागाच्या तावडींत गेलेल्या मनुष्याला सारासारविचार राहत नाहीं. जें जें ह्मणून भलतीकडेस अव्यवस्थित रीतीनें पसरत असेल, त्या सर्वाला कापून काढावें लागतें, हें तुला ठाऊक असलें पाहिजे. दुर्जनापेक्षां पांडवांशीं स्नेह करणें तुझ्याच कल्याणाचें आहे. त्यांच्याशीं तूं नीट वागूं लागलास ह्मणजे तुझे सर्व हेतू पूर्ण होतील. त्यांनीं मिळविलेल्या पृथ्वीचा तूं उपभोग घेत असून त्यांना टाकून दुःशासन प्रभृतींवर अधिकार सोपवून तूं वैभवामध्यें राहूं इच्छीत आहेस ! पांडवांची बरोबरी करणारा तुझ्या बाजूला कोण आहे ? तुझें हें सर्व राजमंडळ त्या खवळलेल्या भीमसेनाकडे पाहण्यालासुद्धां धजणार नाहीं, व त्या धनंजयापुढें उभे राहण्याला भीष्म, द्रोणप्रभृति मंडळीसुद्धां समर्थ नाहींत. अर्जुनाचा पराभव सर्व देवदानवांच्या हातूनही होणें शक्य नाहीं. आजपर्यंत त्या एकट्या वीरानें जीं शौर्याचीं कामें केलीं आहेत व विराट नगरामध्यें जी तुमची दशा उडविली, ती तुला ठाऊकच आहे. सर्व ज्ञातीचा तुमच्यासाठीं फडशा पडूं नये, म्हणून विचार कर. कौरव कांहीं शिल्लक राहूं देत. कुळाचा समूळ नाश करून घेऊन कीर्तीला मुकून कुलघातकी हें नांव मिळवूं नकोस. पांडव धृतराष्ट्राला राज्यावर ठेवून तुला युवराज करतील. तर ही चालत आलेली लक्ष्मी लाथळूं नकोस. अर्धें राज्य देऊन त्यांच्याशीं सख्य करून मित्र जोडून सुखोपभोग घेत आनंदांत नांद. ' यावर भीष्मद्रोण त्या हेकट दुर्योधनाला म्हणाले, ' जोंपर्यंत कृष्णार्जुन युद्धाला तयार झाले नाहींत, जोंपर्यंत गांडीव स्वस्थ पडून आहे, जोंपर्यंत धौम्यांनीं रणाग्नींत शत्रूंची आहुति देण्याला सुरवात केली नाहीं, जोंपर्यंत विनयशील युधिष्ठिरानें तुझ्या सैन्याकडे रागावून दृष्टि फेकिली नाहीं, जोंपर्यंत गदापाणी भीमसेन

तुझ्या सैन्यांत फिरूं लागून वीरांचा फडशा उडविणाऱ्या आपल्या गदेनें गजयोध्यांचीं मुंडकीं सपशेल उडवूं लागला नाहीं, जोंपर्यंत नकुल, सहदेव, धृष्टद्युम्न, पार्षत, विराट, शिखंडीप्रभृति अस्त्रपटु वीर महासागरांत शिरणाऱ्या सुसरीप्रमाणें रणामध्यें शिरून तीक्ष्ण बाण तुझ्या सैन्यावर सोडून त्याचा फडशा उडवूं लागले नाहींत व जोंपर्यंत त्यांच्या हं हं म्हणतां दूर दूर जाऊन पडणाऱ्या प्रचंड बाणांनीं हार व पदकें वर रुळणाऱ्या चंदन व अगरू फासलेल्या योध्यांच्या छातीवर बिऱ्हाड केलें नाहीं, तोंपर्यंतच ह्या वैराचा बऱ्या रीतीनें निकाल लावून टाक. तूं त्या सरळ वागणाऱ्या युधिष्ठिराच्या पायांवर डोकें लवविशील तर तो मोठ्या प्रेमानें तुला कवटाळील, आणि आपला उजवा हात स्नेहपूर्वक तुझ्या खांद्यावर टाकील, व तुझ्या पाठीवरून फिरवील. शालस्कंधी भीमसेनही तुला कडकडून भेटून तुझ्यापाशीं गोड बोलेल. अर्जुन व नकुलसहदेव तुला नमस्कार करूं लागले असतां तूं त्यांचें शीर हुंगून त्यांच्याबरोबर प्रेमानें बोल. पांडवाशीं एक होऊन दोघे मिळून ह्या पृथ्वीचा उपभोग घेऊं लागल्याबद्दल सर्व राजधान्यांमधून दांडोरा पिटून ही सुवार्ता ऐकून त्यांना आनंदाश्रु ढाळूं देत.'

यांप्रमाणें सभेमध्यें बडबड ऐकून दुर्योधन श्रीकृष्णाला म्हणाला, ' तूं जें बोलतो आहेस तें नीट विचारपूर्वक बोलशील तर बरें पडेल. तूं, विदुर, तात, भीष्म, द्रोण हे सर्वच तुम्ही नेहमीं पांडवांच्या गुणांचे गोडवे गाऊन माझी निंदा करीत असतां व हे सर्व राजेही माझा द्वेष करतात; परंतु सूक्ष्म विचारांतीं असा कांहीं मीं मोठा अपराध केला असावा असें मला वाटत नाहीं. आपखुषीनें जुगारांत पडले असतां शकुनीनें त्यांचें राज्य जिंकिलें त्यांत माझा अपराध कोणता ? शिवाय द्यूतांत बारीकसारीक जय

येऊन त्यांनीं जें द्रव्य मिळविलें होतें, तें सुद्धां त्यांचें त्यांना मीं तेव्हांच देऊन टाकिलें. प्रतिपक्ष धरून उठलेल्या वैऱ्याप्रमाणें ते दुर्बल असतां मोठ्या हौसेनें आमच्याशीं विरोध करीत आहेत; व सृंजयांच्या जोरावर आमचा फडशा उडवूं पहात आहेत. कितीही अवडंबर माजविलें किंवा बागुलबोवा दाखविला म्हणून भिऊन जाऊन राज्य सोडून देऊन आह्मी प्रत्यक्ष इंद्रापुढें सुद्धां वाकणार नाहीं. युद्धांत आम्हाला जिंकणारा तर कोणी क्षत्रिय मला दिसत नाहीं. भीष्म, द्रोण, कृप, कर्ण यांचा युद्धांत पाडाव प्रत्यक्ष देवांच्या हातून होणें नाहीं. शिवाय स्वधर्मानें चालत असतांना रणांत जरी आम्हाला मरण आलें, तरी तें सुद्धां स्वर्गप्राप्तीलाच कारण होणार आहे. रणांगणामध्यें शरशय्येवर कायमचा विसावा घेणें हा क्षत्रियांचा मुख्य धर्म आहे. तेव्हां शत्रूच्यापुढें मान न वाकवितां युद्धांत आम्हा वीरांना उचित अशी शय्या मिळेल तर त्याबद्दल वाईट वाटण्याचें कारण काय? थोर कुलांत जन्मलेला कोण क्षत्रिय प्रसंग पडला म्हणून या टीचभर खळीसाठीं भीतीनें दुसऱ्यापुढें मान वाकविण्याला तयार होईल? 'न नमतां छाती वर करून चालणें व स्वाभिमान बाळगणें हेंच पौरुष.' कळक ज्याप्रमाणें बिनकांड्याच्या ठिकाणीं मोडून जातो, त्याप्रमाणें मोडून जावें पण कोणापुढें वाकूं नये,' हें मातंगवचन आत्महितेच्छू पाळीत असतात. माझ्यासारख्यानें धर्मापुढें व ब्राह्मणांपुढें मस्तक ठेंगणें करावें व इतर कोणाची पर्वा न करतां वरील मातंगवचनाप्रमाणें वागावें हाच क्षात्रधर्म असून माझेंही सदा असेंच मत आहे. पूर्वी तातांनीं जो राज्याचा अंश देण्याचें कबूल केलें होतें, तो सुद्धां मी जिवंत असेतोंपर्यंत मिळणार नाहीं. महाराज जोंपर्यंत आहेत तोंपर्यंत दोघेही शस्त्र ठेवून पाहिजे तर स्वस्थ त्यांच्या आज्ञेंत राहूं. पण पूर्वी न कळत जें कांहीं थोडें-

बहुत त्यांनीं देऊं केलें होतें, त्यापैकीं सुईच्या टोकाएवढा देखील भाग मी पांडवांना देणार नाहीं. '

नंतर रागानें डोळे लाल होऊन कांहीं वेळ विचार करून भगवान् म्हणाला, ' खरोखरच तर मग वीरांना उचित अशी शय्या तुला मिळून तुझी इच्छा पूर्ण होईल. धीर धरून ऐस. घोर युद्ध कांहीं आतां टळत नाहीं. आतां, पांडवांचा तूं कांहीं अपराध केला नाहीं ह्मणतोस यांत तथ्य किती आहे, याचा येथें जमलेले राजेच विचार करतील. त्या महात्म्यांच्या संपत्तीनें तुझ्या अंगाची तळमळ उडूं लागल्यामुळें तूं शकुनीच्या मसलतीनें द्यूताचा घाट घातलास. शिष्टांना मान्य, श्रेष्ठ व निष्कपटी असे तुझे भाऊ मात्र जशास तसें या न्यायानें कपट्याशीं कपटानें वागण्यास तयार होत नाहींत. द्यूत हें भल्याच्या बुद्धीलासुद्धां मोह पाडणारें आहे; व दुर्जनांमध्यें तर याच्यायोगानें तंटे माजून संकटें ओढवतात. भल्यांचा विचार न घेतां दुष्टांच्या सल्ल्यानें तूं हें द्यूत आरंभून आपल्यावर संकट ओढवून घेतलेंस. नाहींपेक्षां कुलीन व सुशील पांडवांना प्राणापेक्षां प्रिय अशा आपल्या भावजयीला सभेमध्यें आणून तिला टाकून बोलून तिचा छळ करण्याला कोण बरें धजला असता ? शत्रुतापन पांडव वनाला निघाले असतां दुःशासन त्यांना टाकून बोलतो ! लोभहीन, सदाचारी व धर्मनिष्ठ अशा प्रत्यक्ष भावांबरोबर कोण भला मनुष्य असें अयोग्य वर्तन ठेवील ? दुष्ट व अनार्य पुरुषांना शोभणारें काम ह्या कर्णदुःशासनांनीं अनेक वेळां केलें आहे. वारणावतामध्यें कुंतीसह त्या बिचाऱ्यांना जाळून टाकण्याचीसुद्धां तुह्मी आपल्या हातून होईल तेवढी खटपट केली; परंतु ती दैवयोगानें शेवटास गेली नाहीं ! ते वेळीं बराच कालपर्यंत पांडवांना एका नगरांत लपून रहावें लागलें. विष देऊन, साप बांधून, अशा अ-

नेक उपायांनीं त्यांना मारण्याचा तूं प्रयत्न केलास, तोही निष्फळ झाला. नेहमीं अशा बुद्धीनें त्यांच्याशीं कपटानें वागून त्यांचा अपराध केला नाहीं म्हणतोस हें कसें बरें? वडिलोपार्जित राज्याचा हिस्सा ते मागत असतां त्यांना तो तूं देत नाहींस. माती खावयाला लागून ऐश्वर्याला मुकलास ह्मणजे मग याला तूं कबूल होशील. पांडवांचे तूं एक नाहीं असंख्य अपराध केले असून अजूनही त्यांच्याशीं तूं कपटानें व दुष्टपणानें वागत आहेस एवढेंच नव्हे, तर त्यांच्याबरोबर भांडण्याला तूं कंबर बांधिली आहेस. सर्व तुला त्यांच्याबरोबर सख्य करण्याला सांगत असून तूं ऐकत नाहींस. सख्य केल्यानें दोघांचेंही कल्याण होणार आहे, परंतु तें तुला रुचत नाहीं. तेव्हां याला तुझ्या बुद्धीचा दुष्टपणा हेंच कारण, दुसरें काय? सुहृदांचें न ऐकतां हें अकीर्तिकर व धर्मविरुद्ध कृत्य करण्याला तूं प्रवृत्त झाला आहेस. पण यापासून तुला सुख होणार नाहीं.' असें ह्मणून श्रीकृष्ण रागानें सभेंतून उठला.

गांधारीचा दुर्योधनाला उपदेश.

लोभग्रस्त दुर्योधनापुढें आपलें कांहीं चालत नाहींसें पाहून गांधारीकडून तरी त्याचें मन कांहीं वळल्यास पहावें ह्मणून धृतराष्ट्रानें तिला, त्याला चार गोष्टी सांगून पहाण्यास सांगितलें; तेव्हां ती धृतराष्ट्राला म्हणाली, 'धर्मभ्रष्ट झालेल्या हलकटाच्या हातीं राज्य जावें हेंच मुळीं रास्त नसतां या दांडगेश्वराच्या हातीं लाडानें राज्य सोपवून त्याचा दुष्टपणा ठाऊक असतांही नेहमीं आपण त्याच्या मनाप्रमाणें वागत आलां; तेव्हां आतां या कामीं दोष कोणाकडे? कामक्रोधलोभाच्या पूर्ण तावडींत गेलेल्या ह्याला आतां आवरतां येणें कठीण आहे. वाईट सल्लागारांच्या ना-

दानें वागणाऱ्या या मूर्ख, पोरकट, लोभी मुलाच्या हातीं राज्य सोपविल्याचें हें प्रायश्चित्त आहे. स्वजनांमध्यें फूट पडत असतां तिकडे राजांनीं डोळेझाक करून कसें चालेल? आपल्याला स्वजनांशीं विरोध करतांना पाहून आपले शत्रू देखील आपल्याला हासतील. जें संकट सामभेदादि उपायांनीं टाळतां येण्यासारखें असेल त्यासाठीं स्वजनांवर हत्यार उपसणें ठीक नव्हे.' असें ह्मणून ती दुर्योधनाला उद्देशून म्हणाली, 'माझें ह्मणणें ऐकशील तर त्यांत तुझें हित होऊन तुला सुख मिळेल. वडिलांचें सांगणें तूं तोडूं नकोस. केवळ दुराग्रहानेंच कोणीं आजपर्यंत राज्य मिळविलें, राखिलें अगर उपभोगिलें आहे काय? इंद्रियांच्या तावडींत गेलेल्या पुरुषाला राज्याचा उपभोग फार दिवस मिळत नाहीं. जो जितेंद्रिय व विचारी असतो त्याच्या हातूनच राज्याचें संरक्षण होतें. काम, क्रोध हे मनुष्याला वैभवापासून दूर ओढीत असतात व ज्याला ह्या दोन शत्रूंना जिंकतां येतें, तोच पृथ्वी जिंकूं शकतो. राजाधिराजपद मिळणें फार कठीण आहे व मिळालेलें राज्य सुद्धां दुष्टांना राखतां येत नाहीं. राज्य ज्याला पाहिजे, त्यानें इंद्रियांना धर्माकडेसच वळविलें पाहिजे. सारथ्याच्या आटोक्याच्या बाहेर गेलेले घोडे ज्याप्रमाणें वाटेंत सारथ्याला देखील खड्ड्यांत पाडूं शकतात, त्याप्रमाणें ज्याचीं इंद्रियें त्याच्या ताब्यांत नाहींत, त्याचा त्या इंद्रियांकडूनच नाश होत असतो. जितेंद्रिय, जितामात्य, अपराध्यांसाठीं नेहमीं शस्त्र तयार ठेवून असणारा व कोणतेंही काम विचार करून करणारा अशा विचारी पुरुषाला लक्ष्मी चिकटून असते. बारीक भोकांच्या जाळ्यांत गुरफटलेल्या दोन माशांप्रमाणें हे कामक्रोध शरीरामध्यें असून शहाणपणावर ते दडपण घालीत असतात. स्वर्गमार्ग सुधारणाऱ्या पुरुषांपासून भिऊन ह्या दोघांनाच त्यांच्या ठिकाणीं वाहूं देऊन

देवांनीं या योगानें त्यांना स्वर्गद्वार बंद केलें आहे. काम, क्रोध, लोभ, दंभ, अहंकार यांना जिंकण्याचें ज्या राजाला ठाऊक असतें, तोच पृथ्वी जिंकतो. धर्म, अर्थ व शत्रूचा पराभव हे ज्याला पाहिजे आहेत, त्यानें इंद्रियें ताब्यांत ठेवण्याला प्रथम झटलें पाहिजे. कामक्रोधांच्या आधीन होऊन जो कोणी स्वकीय किंवा परके यांबरोबर कपटानें वागूं लागतो, त्याला कोणी साहाय्य होत नाहीं. शत्रूचा फडशा पाडणाऱ्या शूर व विचारी पांडवांशीं एकी झाली असतां दोघांनाही चांगलें सुख मिळेल. वडिलांचें सांगणें खोटें नाहीं; ह्मणून शुद्धाचारसंपन्न, महापराक्रमी कृष्णाला तूं शरण जा. तो प्रसन्न होईल तर दोघांनाही सुख होईल. विचारी, शहाण्या अशा हितचिंतक जिव्हाळ्याच्या लोकांच्या सांगण्याप्रमाणें जो वागत नाहीं तो शत्रूंना आनंद देतो. युद्धापासून फायदा होण्याचा संभव नसून त्यांत धर्मार्थलाभही नाहीं. शिवाय युद्धांत नेहमींच जय येतो असें नाहीं. तेव्हां हा युद्धाचा विचार सोडून दे. तुझ्या वडिलांनीं पूर्वीं भांडणाला भिऊन त्यांना हिस्सा दिला, त्याचेंच फळ पांडवांनीं निष्कंटक केलेल्या पृथ्वीचा तुला अद्यापि उपभोग मिळत आहे; ह्मणून त्यांचा निम्मा हिस्सा त्यांना देऊन टाक. तुला यथेच्छ सुखोपभोगाला अर्धें राज्य पुरें आहे. जिव्हाळ्याच्या लोकांच्या उपदेशाप्रमाणें वागशील तर तुझें मोठें कल्याण होणार आहे. त्यांच्याबरोबर भांडण्याला उठशील तर खात्रीनें सुखाला मुकशील. त्यांचें त्यांना देऊन टाकून आपलें नीट संभाळ. तेरा वर्षें त्यांना दुःख भोगण्याला लाविलेंस तें पुरें आहे. तुझ्या हावरेपणानें व रागानें त्यांना होत चाललेलें दुःख आतां कमी कर. त्यांचा पैसा गिळंकृत करण्याची तुह्मी इच्छा करतां, पण त्या करण्याला तुमच्या अंगांत पुरेसें सामर्थ्य नाहीं. भीष्ममामंजी, दोघे आचार्य, कर्ण, भीमसेन व धनंजय खवळले

असतां सर्व जगाचा फडशा उडवितील, तेव्हां कौरवांच्या तसेंच सर्व पृथ्वीच्या नाशाला तूं कारण होऊं नकोस. भीष्ममामंजी वगैरे आपली सर्व शक्ति खर्चून तुझ्या बाजूनें लढतील असें तुला वाटत आहे, तो निव्वळ तुला भ्रम आहे. राज्यावर हक्कही दोघांचा सारखाच असून दोघांचें नातें सारखेंच असल्यामुळें त्यांचें प्रेम तुम्हा दोघांवर सारखेंच असणार. शिवाय पांडवांच्या बाजूला धर्माचा जोरा अधिक आहे. आपला पिंड ह्या राजान्नाचा आहे म्हणून भिडेनें जरी ही मंडळी तुझ्या बाजूनें लढून मरण्याला तयार झाली, तरी युधिष्ठिराकडे नुसतें पहाण्याचें सुद्धां यांना धैर्य होणार नाहीं. शिवाय अतिलोभानें कधीं मनुष्याला संपत्ति मिळत नसते; ह्मणून लोभ सोडून देऊन तूं त्यांबरोबर सख्य कर.' परंतु गांधारीच्या ह्या यथोचित भाषणाचाही अनादर करून दुर्योधन सभेंतून रागारागानें निघून गेला; व दुःशासन आणि शकुनि यांच्या सल्ल्यानें श्रीकृष्णाला बांधून ठेवण्याचा त्यानें विचार चालविला; परंतु श्रीकृष्णानें आपल्या तेजानें त्याचे डोळे दिपवून सोडून त्याचा तो हेतु निष्फळ करून तो तेथून निघून गेला.

कुंतीचा पांडवांना निरोप.

श्रीकृष्ण कौरवसभेंतून बाहेर पडल्यावर पांडवांकडे जाण्यापूर्वीं कुंतीच्या वाड्यांत शिरून तिच्या पायांवर डोकें ठेवून कौरवसभेंत घडलेली सर्व हकीकत त्यानें थोडक्यांत तिच्या कानावर घातली, व पुढील कार्यासाठीं पांडवांकडे जाण्याला तो तिचा निरोप मागूं लागला, तेव्हां कुंति म्हणाली, ‘ युधिष्ठिराला सांग कीं, ‘तुझा धर्म अगदीं बुडत चालला आहे. आतां व्यर्थ त्याच्या फार नादीं लागण्यांत अर्थ नाहीं. अर्थ कळत नसून

उगीच वेद पढणाऱ्या ब्राह्मणाप्रमाणें तूं हें धर्माचें वेड घेऊन बसला आहेस. अरे, ज्या वर्णामध्यें तुझा जन्म झाला आहे, त्याचें कर्तव्य मनांत आण. मोठीं कृत्यें करून प्रजेचें पालन करण्यासाठीं ब्रह्मदेवांच्या बाहूंपासून क्षत्रियांची उत्पत्ति असल्यानें आपल्या बाहुवीर्यावरच त्यांनीं पोट भरलें पाहिजे. यासंबंधीं वृद्धांच्या तोंडून ऐकलेली पुढील गोष्ट त्याला तूं सांग. पूर्वीं कुबेरानें प्रसन्न होऊन मुचकुंद राजर्षीला ही पृथ्वी दिली असतां मीं आपल्या बाहूंच्या पराक्रमानें मिळविलेल्या राज्याचाच उपभोग घेऊं इच्छितों, असें स्पष्ट सांगून त्यानें ती घेतली नाहीं. तेव्हां कुबेराला मोठा संतोष झाला. पुढें मुचकुंदानें आपल्या बाहूंच्या पराक्रमानें सर्व पृथ्वी जिंकून क्षात्रधर्माप्रमाणें तिचें राज्य केलें. राजाकडून उत्तम रक्षण होऊन प्रजा जो धर्म आचरण करते, त्याचा चवथा भाग राजाला मिळत असतो. याशिवाय जर राजा आणखी धर्म आचरील तर त्याला देवत्व येतें; परंतु तो अधर्माचरण करील तर नरकाला जातो. राजानें काळजीपूर्वक पाळलेली दंडनीति चारी वर्णांना अधर्मापासून परावृत्त करून आपापल्या धर्माकडे लावीत असते, राजा जेव्हां दंडनीति बरोबर पाळीत असतो, तेव्हां कृतनामक श्रेष्ठ काल सुरू होतो. काल हा राजाला कारण आहे किंवा राजा कालाला कारण आहे, यासंबंधानें संशय ठेवूं नकोस. राजा हाच कालाला कारण आहे. कृत, त्रेता, द्वापार व चौथा कली या चारी कालांचा राजा उत्पादक आहे. कालाला कृतयुग करून टाकणारा राजा श्रेष्ठ अशा स्वर्गसुखाचा उपभोग घेतो. तो कलियुग प्रवर्तवील तर मोठ्या पापाला धनी बनतो, व त्या योगानें अनेक कालपर्यंत त्याला नरकांत रहावें लागतें. राजाच्या पापाचें फळ जगाला व जगाच्या पापाचें फळ राजाला खात्रीनें भोगावें लागतें. आपल्या वाडवडि-

लांना शोभेलशा क्षात्रधर्माकडे लक्ष्य दे. ज्यानें तूं राहूं इच्छीत आहेस, तें कांहीं राजर्षीला शोभणारें वर्तन नव्हे. तुझें हृदय कोंवळें असल्यानें निरुपद्रवी मार्ग तूं पतकरूं पहात आहेस खरा; पण त्यामुळें प्रजापालनापासून मिळणाऱ्या अप्रतिम सुखाला तूं मुकत आहेस. ज्या बुद्धीनें तूं वागत आहेस ती ही बुद्धि तुला येवो ह्मणून तुझ्या कोणीच वडिलांनीं तुला कधीं आशीर्वाद दिला नसेल. शौर्य, दृढबुद्धि, मोठेपणा, बल व तेज यांची मीं तुझ्या ठिकाणीं आशा केली होती. दान, अध्ययन, यश व प्रजापालन हीं मुलांच्या हातून घडावीं अशी पितरांची आशा असते. ह्या गोष्टी धर्म्य असोत वा अधर्म्य असोत, जन्मतःच त्या तुझ्या पाठीमागें लागल्या आहेत. सर्व पांडव विद्वान् व थोर कुलांत जन्मले असून पोटाला न मिळाल्यामुळें दीन झाले आहेत. अन्नान्न करीत पृथ्वीवर भटकणारे लोक ज्या शूर व दानशील राजाकडे येऊन संतुष्ट होऊन परत जातात, त्याहून आणखी श्रेष्ठ धर्म तो कोणता ? धार्मिक राजानें राज्य मिळालें असतां कोणाला पैशानें तर कोणाला बलानें व कोणाला गोड शब्दांनीं याप्रमाणें लोकांना आपल्याकडे वळवून घ्यावें. ब्राह्मणानें भिक्षा मागावी, क्षत्रियानें प्रजापालन करावें, वैश्यानें द्रव्यार्जन करावें व शूद्रानें सेवा करावी; ह्मणून तुझ्यासारख्या क्षत्रियाला भिक्षा रास्त नाहीं व शेतीही करितां येत नाहीं. क्षतापासून त्राता असा तूं क्षत्रिय असल्यानें आपल्या मनगटाच्या जोरावरच तूं आपलें पोट भरलें पाहिजेस ! गडप झालेला वडिलोपार्जित वाटा साम, दान, दंड, भेद व नीति यांपैकीं वाटेल त्या उपायानें तुला मिळविला पाहिजे. तुह्माला अशी दीनदशा आल्यानें तुझ्यासारख्या अरिंदन मुलाला जन्म देऊन मला तुकड्यासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावें लागत आहे याहून ती वाईट स्थिति काय अ-

सावी ? राजधर्माला अनुसरून युद्ध कर. पूर्वजांना नरकांत घालूं नकोस, आणि स्वतः क्षीण पुण्य होऊन दुर्गतीला जाऊं नकोस. 'तुझ्या सोहेरांत 'हा इंद्रासारखा होऊन भीमसेनाच्या साहाय्यानें सर्व जुळलेल्या कौरवांना जिंकील व इकडचें जग तिकडे करून सोडून आपला यशोदुंदुभि स्वर्गाला नेऊन भिडवील व गडप झालेला वडिलोपार्जित हिस्सा परत मिळवून अश्वमेध करील,' ह्मणून आकाशवाणी झाली आहे ती खरी करण्याची वेळ आली आहे,' असें अर्जुनाला सांग. तसेंच त्याला व भीमाला असेंही सांग कीं, ' क्षत्रियस्त्री ज्याकरितां पुत्र प्रसवते, त्याची वेळ आतांच आली आहे. एकदां वैर जुंपल्यावर थोर लोक मध्यें कधीं हातपाय गाळीत नाहींत. ' भीमसेनाचें मनही तूं ओळखतच आहेस. शत्रूचा शेवट लावल्यावांचून तो कधीं शांत होणार नाहीं. सर्व धर्मांतील बारीकसारीक भेद देखील लक्ष्यांत घेणाऱ्या कल्याणी द्रौपदीला सांग कीं, ' माझ्या मुलांशीं जसें वागावें तसें तूं वागलीस हें तुझ्यासारख्या कुलीन, भाग्यशाली स्त्रीला रास्तच आहे. ' त्याचप्रमाणें क्षात्रधर्मांत दक्ष असणाऱ्या त्या नकुलसहदेवांना सांग कीं, ' जीव देखील धोक्यांत टाकून शौर्य गाजवून संपादलेले भोग भोगा. कारण अशा प्रकारानें मिळविलेले भोगच क्षत्रियाच्या मनाला आनंद देतात. तुह्मा सर्वांदेखत पांचालीला तसें टाकून बोललेलें कोण सहन करून घेईल ? राज्य गेलें, द्यूतांत जिंकला गेलां किंवा तुह्माला वनाला जावें लागलें याचें मला इतकें वाईट वाटत नाहीं; परंतु सभेमध्यें डोळ्यांतून टिपें गाळीत त्या थोर कृष्णेला निष्ठुर भाषण ऐकून घ्यावें लागलें, तेंच माझ्या मनाला फार झोंबून राहिलें आहे. क्षात्रधर्मांत दक्ष असून स्त्रीधर्माला जाणणाऱ्या त्या बिचारीला नाथ असून ते वेळीं हात देण्याला कोणीच उभा राहिला नाहीं. हे भीमार्जुन खवळतील तर

देवांचीही वाट लावितील हें तुला सांगावयाला नको. द्रौपदीला सभेंत आणली तेवेळीं दुःशासन भीमाला अनुलक्षून जे मर्मभेदक शब्द बोलला हा त्या दोघांचाच अपमान आहे, तेव्हां त्याची त्यांना चांगली आठवण दे. मी खुशाल आहें ह्मणून सांगून त्यांचें कुशल विचारिलें आहे ह्मणून सांग. निर्विघ्नपणें तूं खुशाल जाऊन पोहोंच.'

कर्णाला फोडण्याचा प्रयत्न व कर्णाचा करारीपणा.

यापमाणें इकडचें काम उरकून श्रीकृष्ण कर्णाला आपल्या रथांत बरोबर घेऊन नगराबाहेर पडला, आणि त्याला ह्मणाला, 'हे कर्णा, मनोनिग्रहानें व निर्मत्सरबुद्धीनें वेदपारंगत ब्राह्मणांची शुश्रूषा करून तत्त्वज्ञान तूं त्यांपासून शिकला आहेस, व श्रुतिवचनें काय आहेत व धर्मशास्त्रांतील सूक्ष्म निर्णय काय आहेत हे तुला ठाऊक आहेत. लग्नाच्या वेळीं मुलीच्या पोटांत असणारा व कुमारिकेला झालेला ह्या दोघांचाही बाप तिच्याबरोबर लग्न करणाराच होतो असें शास्त्र सांगतें; त्याप्रमाणें तूं पंडूचा सशास्त्र मुलगा आहेस. तेव्हां धर्मशास्त्राच्या आधारानेंच राज्य तुला मिळेल. पांडव तुझ्या पितृकुळांतील असून वृष्णि मातृकुळांतले आहेत. तेव्हां हा संबंध लक्ष्यांत घेऊन मजबरोबर चल. तूं युधिष्ठिराचा वडील भाऊ आहेस हें त्यांना कळलें ह्मणजे पांच पांडव सर्व द्रौपदीचे मुलगे, अजिंक्य अभिमन्यु व पांडवांसाठीं जुळलेले सर्व राजे आणि राजपुत्र, तसेंच सर्व वृष्णि व अंधक तुझे पाय धरतील, व सर्व राजे आणि राजकन्या अभिषेकासाठीं सोन्यारुप्याचे घडे भरून आणून तुला अभिषेक करतील. वर्षाच्या सहाव्या भागांत दोन महिने द्रौपदी तुझी होईल. पवित्र अशा धौम्य पुरोहितांकडून होमविधि उरकून चार वेद जाणणारे ब्राह्मण तुला

अभिषेक करतील. ब्रह्मकर्मामध्यें दक्ष असणारे पांडवांचे पुरोहित धौम्य,पांच पांडव व त्यांचे मुलगे आणि मी स्वतः तुझ्यावर अभिषेक करून तुला सर्व पृथ्वीचें स्वामित्व देऊं. कडकडीत नियम पाळणारा धर्मात्मा धर्मराज तुझा युवराज होईल, व रथामध्यें तुझ्यामागें बसून तुझ्यावर पांढरी शुभ्र चवरी धरील; व त्याचप्रमाणें तुझ्या अभिषिक्त मस्तकावर महाबलशाली भीम पांढरें छत्र धरील, व ज्यांच्या गळ्यांत घणघण घंटा वाजत आहेत असे पांढरे घोडे जोडलेला तुझा रथ स्वतः अर्जुन हाकील. अभिमन्यु तुला कधीं सोडून असणार नाहीं, व द्रौपदीचे मुलगे, नकुलसहदेव, पांचाल, महारथ शिखंडी, मी, तसेच वृष्णि व अंधक तुझ्यामागें राहूं. दाशार्ह व दाशार्ण हे तुझा लवाजमा बनतील. तेव्हां तुझे भाऊ जे पांडव यांच्याबरोबर जप, होम, व निरनिराळे मंगलविधि यांमध्यें गढून राहून राज्याचा उपभोग घे. द्रवीड, कुंतल, आंध्र, तालचर, चूचुष, वेणुप हे तुझ्यापुढें धावतील. सूत, मागध नानाप्रकारें तुझा स्तुतिपाठ गातील, व तुझा विजयाचा डंका पांडव जगभर पिटवीत राहतील. नक्षत्रांमध्यें झळकणाऱ्या चंद्राप्रमाणें पांडवांमध्यें राहून कुंतीला तूं आनंद दे.' हें ऐकून कर्ण ह्मणाला, 'केशवा, खरोखर जिव्हाळ्यामुळें, प्रेमामुळें, स्नेहसंबंधानें व माझें कल्याण व्हावें या बुद्धीनें तूं हें मला कळकळीनें सांगत आहेस. तूं ह्मणतोस तसा मी पंडूचा सशास्त्र मुलगा आहें खरा; परंतु लोकापवादाच्या भीतीनें कुंतीनें मला टाकिलें व सूताच्या दृष्टि पडून त्यानें मला घरीं घेऊन जाऊन प्रेमानें आपली बायको जी राधा हिच्या स्वाधीन केलें; ते वेळीं मजवरच्या प्रेमाच्या उमाळ्यामुळें तिला एकदम पान्हा फुटला. तर माझ्यासारख्या धर्मवेत्त्या, नेहमीं धर्मशास्त्र लक्ष्यपूर्वक ऐकणाऱ्यानें आतां तिला पिंडाला कसें बरें मुकवावें ? त्याचप्रमाणें अधिरथ सूत मला मुल-

गा समजत आहे व मीही प्रेमामुळें त्याला बाप ह्मणून समजत आलों आहें. पुत्रप्रेमामुळें त्यानें माझें जातकर्मादि सारे संस्कार सशास्त्र केले आहेत, व ब्राह्मणांकडून माझें वसुषेण ह्मणून नांवही ठेविलें आहे. त्याच्या कृपेमुळेंच यौवनदशेंत आलों असतां लग्न होऊन मी गृहस्थ बनलों व त्या बायकोपासून मला पुत्रपौत्र होऊन त्यांशीं प्रेमपाशानें मी बांधला गेलों आहें. सोन्याचा ढीग पुढें आणून ठेविल्यानें किंवा सर्व पृथ्वी मिळाल्यानें अथवा हर्षभयादि विकारांनीं हें सर्व विसरून जातां येईल काय? त्याचप्रमाणें दुर्योधनाच्या आश्रयानें आज तेरा वर्षें मी निष्कंटक राज्याचा उपभोग घेत आलों; व सूतामध्यें अनेक यज्ञ करून कुलाचार व विवाहसंबंधादिक घडले आहेत. माझ्या आधारावरच दुर्योधनानें पांडवांशीं वैर जोडून युद्धाला कंबर बांधिली आहे आणि रणामध्यें अर्जुनाशीं तोंड देण्याला त्यानें मला निवडून ठेविलें आहे; ह्मणून मरणाच्या भयानें अथवा लोभानें त्या बुद्धिमान् दुर्योधनाशीं मी असें कपट कसें बरें करूं? आज जर मी अर्जुनापुढें दंड थोपटून उभा रहाणार नाहीं, तर त्यांत आह्मा दोघांचेंही नांव जाणार आहे. कारण दोघेही एकमेकांना मारण्याची प्रतिज्ञा करून बसलों आहों. हितबुद्धीनें खरोखरच तूं ही गोष्ट पांडवांशीं काढशील तर ते सर्व तुझे आज्ञांकित असल्यानें खात्रीनें ते तुझ्या सांगण्याबाहेर वागणार नाहींत. ही गोष्ट तूं त्यांच्यापाशीं फोडिली नाहींस तरच ठीक होणार आहे. धर्मात्म्या युधिष्ठिराला मी कुंतीचा मुलगा आहें असें समजल्यावर तो राज्य कधीं पतकरणार नाहीं, व केवढेंही झगझगीत राज्य मला मिळालें तरी मी तें फिरून दुर्योधनाच्याच पायांवर ठेवणार; ह्मणून ज्याचा मंत्री तूं आहेस, तो युधिष्ठिरच कायम राज्य करो. अर्जुन, भीम, तूं, सात्यकि, धृष्टद्युम्नप्रभृति मंडळी ज्याच्या वतीनें युद्धाला त-

यार आहां त्याचीच निःसंशय ही पृथ्वी होणार. पांडवांकडे राजांचा जमावही चांगला मिळाला आहे; तेव्हां युधिष्ठिराला राज्य मिळाल्यासारखेंच आहे,हें सर्व राजे जाणून आहेत.यापुढें दुर्योधनाचा शस्त्रयज्ञ सुरू होणार असून त्यांत अध्वर्यु तुलाच व्हावें लागणार आहे; व तयार होऊन उभा राहिलेला कपिध्वज अर्जुन होता होईल. त्यांत गांडीव स्रुची व पुरुषांचें वीर्य आज्य होईल, व अर्जुनानें सोडलेलीं ऐंद्र, पाशुपत, ब्राह्म व स्थूणाकर्ण हीं अस्त्रें मंत्रांचें काम करतील. पराक्रमांत बापाच्या तोडीचा किंवा त्याहून कांकणभर जास्त असा सुभद्रातनय अभिमन्यु हाच योग्य साममंत्र होईल. रण गर्जून सोडून असंख्य सैन्याचा फडशा पाडणारा बलशाली भीम उद्गाता व प्रस्तोता होईल; व तो जपहोमांनीं संपन्न चिरकाल राज्यपद भोगणारा युधिष्ठिर यांत ब्रह्मत्व करील. शंख, मृदंग, नगारे यांचे शब्द तसेच रणांगणांत निघणारे मोठमोठे सिंहनाद मृत्युरूपी अतिथीला निमंत्रणादाखल सुब्रह्मण्य होतील. तसेंच या यज्ञांत यशस्वी नकुलसहदेव पशुमारणकर्म उत्तम प्रकारें बजावितील, व चित्रविचित्रित ध्वजांनीं शोभणारा चकचकीत रथसमुदाय हेच पशू बांधण्याला डांब होतील. वासराच्या दांतासारखे कर्णी, नालीक व नाराच बाण सोम वाढण्याचे चमचे होतील. तोमर सोमपात्रें होतील. धनुष्यें बोटांत अडकविण्याचीं पवित्रें होतील, पुरोडाश तयार करण्याच्या मडक्यांचें काम तरवारी करतील, व वीरांचीं छाटून काढलेलीं मुंडकीं पुरोडाश होतील. द्रोण व कृप यांचे शिष्य सदस्य होतील. गांडीवधन्वा अर्जुन, द्रोण, अश्वत्थामा व दुसरे महारथी यांनीं सोडलेले बाण सोम वाढण्याचे पळे (परिस्तोम) होतील. सात्यकि प्रतिपस्थात्यांचें काम करील. या यज्ञांत दुर्योधन दीक्षा घेऊन बसेल व अफाट सेना त्याची बायको होईल. तचेंच या महायज्ञांतील रात्रींचें कर्म सुरू

झालें असतां घटोत्कच पशुमारण कर्म करील. श्रौतयज्ञांत कर्मद्वारानें अग्नीपासून उत्पन्न झालेला प्रतापशाली धृष्टद्युम्न या यज्ञाची दक्षिणा होईल. मी पांडवांना आजपर्यंत जें लागून बोललों, त्या अनुचित कृत्याबद्दल ह्मणजे मला वाईट वाटत नाहीं असें नाहीं; परंतु तें केवळ दुर्योधनाला खुष करण्यासाठीं मी बोलत आलों. अर्जुन ज्यावेळीं मला मारील, त्या वेळीं या यज्ञाच्या पुनश्चित्तीला सुरवात होईल. टाहो फोडणाऱ्या दुःशासनाचें रक्त जेव्हां भीम प्राशन करील, त्यावेळीं सोमप्राशनविधि यथासांग शेवटास जाईल. तसेंच ज्यावेळीं पांचालराजपुत्र धृष्टद्युम्न व शिखंडी द्रोणाचार्य व भीष्म यांना मारतील, तेव्हां यज्ञावसान काल येईल, व बलशाली भीमसेन ज्यावेळीं दुर्योधनाला मारील तेव्हांच या यज्ञाचा शेवट होईल. आपले स्वामी, नवरे व मुलगे मेल्यामुळें धृतराष्ट्राच्या सुना व नातसुना गांधारीसहवर्तमान एके ठिकाणीं जुळून कुत्रें, गिधाडें, कुररी, यांनीं किच्च झालेल्या या रणयज्ञांत जेव्हां रडूं लागतील, त्यावेळीं तें ह्या यज्ञाचें अवभृत स्नान होईल.तुझ्या या एकी करण्याच्या खटपटीनें विद्यावृद्ध व वयोवृद्ध अशा क्षत्रियांना फुकट मरून जाण्याची पाळी न येतां त्रैलोक्यांत पुण्यकारक अशा ह्या कुरुक्षेत्रांत जमलेल्या अवाढव्य क्षत्रियसमुदायाला शस्त्रानें मरण येऊन खात्रीनें स्वर्ग मिळेल अशी तजवीज कर, ह्मणजे जोंपर्यंत हे पर्वत व नद्या कायम आहेत, तोंपर्यंत तुझ्या कीर्तीचा डंका वाजत राहील; व हें क्षत्रियांचें यशरूप धन वाढविणारें महाभारतयुद्ध ब्राह्मण सांगत रहातील. आतां तुला माझें इतकेंच हात जोडून मागणें आहे कीं, मी कुंतीचा वडील मुलगा आहें ही गोष्ट न फोडतां तूं अर्जुनाला माझ्या बरोबर युद्धाला उठीव. ' हें कर्णाचें भाषण ऐकून भववान् हासत हासत म्हणाला, ' हा राज्यप्राप्तीचा उपाय तुला रुचत नसून मीं दिलेल्या ह्या पृथ्वीवर रा

ज्य करण्याची तुझी इच्छा दिसत नाहीं. बरें तर मग पांडवांना खात्रीनें जय मिळणार यांत बिलकुल शंका नाहीं. कृष्णसारथी अर्जुनाला रणांत ऐंद्र, आग्नेय, वायव्य इत्यादि अस्त्रांचा प्रयोग करून कडकडणाऱ्या विजेप्रमाणें गांडीवाचा टणत्कार करतांना, तसेंच जपहोमसंपन्न सूर्यासारखा दुष्प्रेक्ष्य युधिष्ठिर आपल्या अफाट सैन्याचें रक्षण करून शत्रुसैन्याला ताप देतांना, जेव्हां पहाशील, जेव्हां समोर उभा राहिलेल्या हत्तीला मारून मस्त झालेल्या हत्तीप्रमाणें संग्रामांत बलशाली भीमाला दुःशासनाचें रक्त पिऊन थयथय नाचतांना पहाशील, जेव्हां अर्जुनाला, येऊन पडणाऱ्या भीष्म, द्रोण, कृप, दुर्योधन, जयद्रथ प्रभृतींना थोपवितांना पहाशील, जेव्हां घनघोर शस्त्रप्रहार चालले असतां शत्रूकडील वीरांच्या रथांना पीडा देणाऱ्या बलशाली नकुलसहदेवांना हत्तीप्रमाणें शत्रुसैन्य खळबळून सोडतांना पहाशील, तेव्हां मग कृत, द्वापार, त्रेता हे विसरून जा; तेव्हां कलीचीच तुला पूर्ण ओळख पटेल. कर्णा, येथून जाऊन दुर्योधनाला सांग कीं, ‘ हा महिना मोठा रम्य असून अन्नपाणी, लाकुडफाटा याची या दिवसांत समृद्धि आहे. सर्व प्रकारच्या वनस्पतींनीं वनें जोमदार फुललीं आहेत. झाडें फळांनीं गचच असून माशांचा त्रास बिलकुल नाहीं. चिखल नाहींसा झाला आहे; व पाण्याला मोठी गोडी आली आहे. फार उष्मा अगर फार थंडी नसल्यानें हा महिना मोठा सुखकर आहे. सात दिवसांनीं अमावास्या आहे, त्या सुमुहूर्तावर युद्धाला सुरवात होईल व त्यांत तुह्मा सर्वांना उत्तम गति मिळेल. ’ हें भगवानाचें कल्याणप्रद भाषण लक्ष्यपूर्वक ऐकून कर्ण आदरपूर्वक म्हणाला, ‘ कृष्णा, मला तूं ओळखत असून अशी भुरळ कां घालूं पहातोस ? हा जो पृथ्वीचा संपूर्ण नाश होण्याचा काल आला आहे त्याला शकुनि, मी, दुःशासन

भगर दुर्योधन केवळ निमित्तमात्र आहों. रक्ताचा चिखल उत्पन्न करणारे कौरवपांडवांचें हें घनघोर युद्ध खात्रीनें टळत नाहीं; व दुर्योधनाच्या छंदानें वागणारे राजे व राजपुत्र शस्त्रांच्या अग्नीनें खाक होऊन यमसदन खास पहाणार. मला भयंकर स्वप्नें पडत आहेत, व अनेक दुश्चिन्हें होत आहेत; तेव्हां आह्मा सर्वांची गांडीवरूपी अग्नींत आहुति पडून आह्मी लवकर यमसदनाची वाट धरणार यांत शंका नाहीं. कृष्णा, ज्यांत वीरक्षत्रियांचा फडशा पडणार अशा या महारणांतून जिवंत पार पडून तुला भेटण्याची तर आतां आशा नाहीं. असो. स्वर्गामध्यें मात्र फिरून खात्रीनें आपली भेट होईल. ह्मणून इहलोकीं मला तुला एकवार कडकडून भेटूं दे.' असें म्हणून भगवानाला कडकडून भेटून त्याचा निरोप घेऊन कर्ण परतला, व भगवान् पांडवांकडे जाऊन त्यानें शिष्टाईचा निकाल त्यांना कळविला.

कर्णानें कुंतीला दिलेलें वचन.

श्रीकृष्ण संधीचा उद्देश सिद्धीस न जातां पांडवांकडे निघून गेल्यावर कर्णाची भेट घेऊन त्याला पांडवांच्या बाजूला ओढतां येईल तर पहावें, असा मनाशीं विचार करून कुंति, कर्ण गंगातीरीं पूर्वाभिमुख वर सूर्याकडे हात करून वेदाध्ययन करीत असतां तें संपेपर्यंत त्याच्या मागें जाऊन वाट पहात उभी राहिली. सूर्य कलेपर्यंत जप करून कर्ण मागें वळतो तो कुंति त्याच्या दृष्टीस पडली. तिला अभिवादन करून हात जोडून तो नम्रपणें 'हा राधापुत्र तुला अभिवादन करीत आहे, काय काम आहे तें सांग,' असें म्हणाला. यावर कुंति म्हणाली, 'बा कर्णा, तूं राधापुत्र नसून प्रत्यक्ष सूर्यापासून मला झालेला तूं माझाच मुलगा आहेस. मी लहानपणीं बाबांकडे असतां कुवारपणीं तूं मला झा-

लास. मींच तुला ह्या आपल्या पोटांत वागविलें आहे. तेव्हां आपल्या भावांना न ओळखतां अज्ञानानें धृतराष्ट्रांच्या मुलांना धरून रहाणें तुझ्यासारख्याला शोभत नाहीं. ज्यांचे डोळे आपल्या मुलांकडे लागले असतात त्या आईबापांना संतुष्ट ठेवणें हाच मुलाचा उत्तम धर्म समजला आहे. पूर्वी अर्जुनानें मिळविलेली व पुढें धृतराष्ट्राच्या मुलांनीं लोभानें हिसकावून घेतलेली युधिष्ठिराची संपत्ति फिरून या कौरवांपासून हिसकावून घेऊन तिचा तूं उपभोग घे. बंधुप्रेमानें तूं व अर्जुन एकत्र जुळलां असतां मग हे दुष्ट खरोखर वाकतील. रामकृष्णांप्रमाणें तुह्मी दोघे एकत्र जुळल्यावर मग तुह्मा दोघांना असाध्य असें ह्या जगांत काय असणार? खरोखर पांच पांडवांमध्यें तूं फार शोभशील.' असें कुंति बोलत आहे तोंच 'कुंतीचें ह्मणणें खरें आहे, हा आईचा शब्द ऐकशील तर तुझें कल्याण होईल,' अशी पुत्रवत्सल सूर्याची वाणी कर्णानें ऐकिली. याप्रमाणें आईबापांचा आग्रह पडला असतांही त्या सत्यनिष्ठ कर्णाचें मन न डगमगतां तो ह्मणाला, 'हे क्षत्रिये,' 'माझ्या सांगण्याप्रमाणें वागणें हें धर्माचें आहे,' ह्या तुझ्या ह्मणण्यावर माझा विश्वास कसा बसावा? जन्मतांच मला टाकून देण्यांत तूं जें घोर पाप केलेंस तेंच माझ्या यशाला व कीर्तीला हानिकारक झालें आहे. मी क्षत्रिय कुलांत झालों असेन तर क्षत्रियाला उचित असे संस्कार तुझ्यामुळेंच मला मिळाले नाहींतना, तेव्हां एखादा मोठा दुष्ट शत्रु माझें याहून अधिक वाईट तें काय करूं शकणार? याप्रमाणें त्या वेळीं चुप्प बसून मला योग्य संस्कारही मिळूं न देतां आज तूं आईचा अधिकार बजाविण्याला आली आहेस! पूर्वी आईला साजेलसें माझ्या हिताकडे लक्ष्य न देतां केवळ स्वार्थाकडे दृष्टि देऊन आज तूं मला उपदेश करीत आहेस! अ-

र्जुन व कृष्ण यांना एकत्र झालेले पाहून कोण बरें घाबरणार नाहीं! तेव्हां आज मी पांडवांना जाऊन मिळालों तर मी भ्यालों असें कोण समजणार नाहींत! आजपर्यंत कोणी भाऊ ठाऊक नसून आतां युद्धाच्या वेळीं जर भावांचें नातें लावून मीं पांडवांना जाऊन मिळालों, तर सर्व क्षत्रिय मला काय ह्मणतील? कोणत्याही भोग्य वस्तूंचा माझ्यावांचून उपभोग न घेतां धृतराष्ट्रपुत्रांनीं यथायोग्य माझा मान राखिला असून तें सर्व मी फुकट कसें जाऊं द्यावें! जे माझ्या बलावर शत्रूंशीं वैर बांधून त्यांचा शेवट लावण्याची आशा धरून आहेत, त्यांचा आशाभंग आयत्यावेळीं मी कसा करूं! हा दुस्तर रणसागर मला नौका करून जे तरून पार जाऊं इच्छीत आहेत त्यांना कसें बरें मी मध्येंच सोडून देऊं! धार्तराष्ट्रांचें अन्न खाऊन त्याची चीज करण्याची वेळ आली असतां प्राणाची पर्वा न धरतां मला त्याची फेड केली पाहिजे. उत्तम रीतीनें पोसून सुख दिलेले जे लोक प्रसंगीं चंचल मनानें निमकहराम बनतात ते स्वामिपिंडापहारी स्वामिद्रोही इहपरलोकांना मुकतात. ह्मणून बुद्धि व बल दोन्ही खर्चीं घालून कृतज्ञता व भल्यांना उचित असें वर्तन ओळखून त्यांच्यासाठीं मला तुझ्या मुलांबरोबर युद्ध केलें पाहिजे. आणि म्हणून तूं सांगत आहेस ही गोष्ट जरी हिताची असली तरी ती मला करतां येत नाहीं. तरी पण तुझा हा यत्न मी अगदीं फुकट जाऊं देत नाहीं. ज्यांना मारणें मला बिलकुल जड नाहीं, अशा अर्जुनाखेरीज तुझ्या चार मुलांना मी मारणार नाहीं. मी फक्त एकट्या अर्जुनाशीं युद्ध करीन, व त्याला जर मला मारतां आलें तर माझ्या जन्माचें सार्थक होईल, व तसें न होतां त्यानें मला मारिलें तर त्यांतही माझी कीर्तिच होणार आहे. शिवाय भाग्यशाली तुला अर्जुनाशिवाय कर्ण धरून किंवा कर्णाशिवाय अ-

र्जुन धरून पांचच्या पांच मुलगे रहातील.' हें ऐकून लटलट कांपणाऱ्या कुंतीनें त्याला कवटाळिलें व 'दैव बलवत्तर असल्यानें सर्व कौरवांचा फडशा पडणार, तेव्हां ह्या दिलेल्या वचनाची तरी आठवण ठेव,' असें ती म्हणाली. आणि 'ठीक आहे' म्हणून त्याचें आश्वासन घेऊन ती घराकडे परतली.

पांडवांकडील सैन्याची व्यवस्था.

भगवानाचा निरोप कळल्यावर पांडवांनीं आपल्या सात अक्षौहिणी सैन्याच्या निरानिराळ्या तुकड्या केल्या व त्यांवर द्रुपद विराट, धृष्टद्युम्न, शिखंडि, सात्यकि, चेकितान व भीमसेन हे सात नांवाजलेले शूर, युद्धविशारद व सर्व अस्त्रांमध्यें हुषार असून प्रसंगीं प्राण खर्ची घालण्याला तयार असे सात सेनापती नेमिले व सर्वांवर सर्वानुमतें धृष्टद्युम्नाला सरसेनापति निवडिलें. या व्यवस्थेनें सर्व राजांना आनंद होऊन त्यांच्या आनंदाच्या आरोळ्यांनीं सर्व वातावरण दुमदुमून राहिलें. 'जुळा, जुळा,' म्हणून लगबगीनें इकडून तिकडे धावणाऱ्या सैनिकांच्या आरोळ्या व हत्ती, घोडे यांचे शब्द, रथांच्या चाकांचा घरघर आवाज, शंख व नगारे इत्यादि वाद्यांचा गजर यांनीं सर्व वातावरण भरून गेलें. हत्ती, रथ, घोडे व पायदळ यांनीं भरलेलें तें इकडून तिकडे धावणारें पांडवांचें अफाट सैन्य मोठमोठ्या भयंकर लाटांनीं खवळलेल्या समुद्राप्रमाणें दिसत होतें. चिलखतें चढवून एकमेकांना हाका मारीत सुटलेलें तें सैन्य गंगेप्रमाणें दुस्तर दिसत होतें. नकुल, सहदेव व भीमसेन चिलखतें चढवून सर्व सैन्याच्या पुढें होते. अभिमन्यु, द्रौपदीचे मुलगे, धृष्टद्युम्न, प्रभद्रक व पांचाल भीमसेनाच्या मागें होते. उत्साहयुक्त होऊन आनंदाच्या आरोळ्या देत चाललेल्या ह्या सैन्याचा सिंहनाद पौर्णिमा व अ-

मावास्या यांना निघणाऱ्या समुद्रांतील घों घों शब्दाप्रमाणें आकाशाला जाऊन भिडत होता. शत्रूच्या सैन्याच्या ठिकऱ्या उडविणाऱ्या, चिलखतें चढवून आनंदानें चाललेल्या ह्या सैन्याच्या मधून खटारे, दुकानें, डेरे, राहुट्या, गाड्या, खजिना, तोफखाना शस्त्रवैद्य, वैद्य, नोकरचाकर व बाजारबुणगे यांसह युधिष्ठिर चालला होता. द्रौपदी व इतर स्त्रिया दासदासींसह उपप्लव्यांतच राहिल्या. सभोंवार कांहीं शिपाई कायमचे व कांहीं फिरते या स्त्रियांच्या व पैशाच्या संरक्षणासाठीं ठेवून अफाट सैन्यानिशीं पांडव कुरुक्षेत्राला येऊन दाखल झाले; तेव्हां वीरांनीं आपापले शंख फुंकले. भगवानाच्या पांचजन्याच्या शब्दानें सर्व सैन्याच्या अंगावर हर्षरोमांच उभे केले. नंतर सपाट, छायाळ, रम्य, नापीक, शुद्ध, गवत व लाकूडफाटा यांची रेलचेल असलेल्या अशा प्रदेशांत स्मशानें, देवळें, मोठमोठ्या ऋषींचे आश्रम व तीर्थांचीं ठिकाणें सोडून युधिष्ठिरानें आपल्या सैन्याचा तळ दिला.

कर्णप्रतिज्ञा.

इकडे भगवान् हास्तिनापुराहून निघून गेल्यावर एकंदर सर्व स्वरूपावरून दोघांमधील संग्राम खात्रीनें घोर व अंगावर रोमांच उभे करण्यासारखा होणार ह्मणून दुर्योधनानेंही आपल्या सैन्याची जय्यत तयारी केली. त्याकडून स्वारीचा हुकूम सुटल्याबरोबर राजेलोक आपले फेटे आवळूं लागले. कोणी कपडे साफसूफ करूं लागले, कोणी आपलीं भूषणें सावरूं लागले, रथी, रथ, स्वार घोडे व गजयोद्धे आपले हत्ती सजवूं लागले; व सर्व नानाप्रकारचीं चित्रविचित्रित सोन्याचीं चिलखतें व निरनिराळीं हत्यारें अंगावर चढवूं लागले. त्याचप्रमाणें पायदळांतले लोकही नानाप्रकारच्या आयुधांनीं सज्ज होऊं लागले. तेवेळीं उल्हाससंपन्न लो-

कांनीं भरलेली दुर्योधनाची ती भव्य नगरी एखाद्या उत्सवाच्या प्रसंगाप्रमाणें गजबजून राहिली होती. जनसमूह हेच ज्याचे मोठे भोवरे, रथ, हत्ती, घोडे हेच ज्यामधील मासे, शंख व नौबती यांचा शब्द हाच ज्यामधील घों घों शब्द, खजिन्याच्या पेट्या हींच ज्याच्यांतील रत्नें, नानाप्रकारचीं भूषणें व चिलखतें ह्याच ज्याच्या लाटा, लखलखीत हत्यारें हाच ज्याचा फेस, उंचउंच वाडे हेच ज्याचे डोंगरी किल्ले, व रस्ते व बाजार हेच ज्यांतील मोठमोठे डोह असा वीरचंद्रोदयानें खवळलेला कौरवमहासागर चंद्रोदयाच्या वेळच्या महासागराप्रमाणें दिसत होता. रात्र उजाडल्यावर दुर्योधनानें आपल्या अकरा अक्षौहिणींची त्यांतील पायदळ, हत्तीदळ, घोडदळ व रथदळ यांमध्यें कसलेले, सामान्य व फालतु असे तीन तीन भाग करून त्यांची व्यवस्था लाविली. घोड्यांच्या जातींची परीक्षा असून शस्त्रज्ञानांत निपुण अशा शूर व कुलीन वीरांकडे सारथ्याचें काम दिलें होतें. रथावर ध्वज व पताका चढवून वर मेहरपी लावून दिल्या होत्या. त्यांत ढाली, तरवारी व पट्टे ठेविले होते. प्रत्येक रथाला चार चार जातिवंत घोडे जोडले होते. त्याचप्रमाणें प्रत्येक रथांत भाले, दंड व शेंकडों धनुष्यें ठेविलीं होतीं. पुढें जोडलेल्या दोन घोड्यांना एक व दोन चाकांच्या बाजूंच्या दोन घोड्यांना दोन असे प्रत्येक रथाला तीन सारथि होते; व दोघे चक्ररक्षकही उत्तम योद्धे असून रथ्यालाही घोड्यासंबंधीं ज्ञान चांगलें होतें. शत्रूच्या हल्ल्याचें कांहीं न चालूं देणाऱ्या तटबंदी शहराप्रमाणें सोन्यानें मढवून काढलेले हजारों रथ याप्रमाणें तयार होते. रथाप्रमाणेंच चांगले शृंगारून वर झुली घालून त्यांवर सात सात लोक बसलेले हत्ती रत्नमय पर्वताप्रमाणें भासत होते. या सातांपैकीं दोन अंकुशधारी माहुत, दोन उत्तम धनुर्धारी, दोन तरवारींच्या फेकांमध्यें हुषार

व एक शक्ति आणि त्रिशूल घेतलेला असे होते. त्याचप्रमाणें अंगावर चिलखतें व अलंकार चढविलेले स्वार ज्यावर स्वार झाले आहेत असे लाखों घोडे त्या सैन्यांत होते. नानाप्रकारच्या पायदळानें नानाविध पोषाख करून निरनिराळ्या प्रकारचीं चिलखतें चढवून निरनिराळीं हत्यारें हातांत घेतलीं होतीं. एका रथाबरोबर दहा हत्ती, एका हत्ती बरोबर दहा घोडे, एका घोड्याबरोबर दहा शिपाई अशी सैन्याची व्यवस्था लावून दिली असून एका रथाबरोबर पन्नास हत्ती, एका हत्तीच्याबरोगर शंभर घोडे, एका घोड्याच्याबरोबर सात सात शिपाई पडलेली उणीव भरून काढण्याला राखलेली फौज म्हणून होती. याप्रमाणें दुर्योधनानें आपल्या अकरा अक्षौहिणींची व्यवस्था लावून शूर व पराक्रमी वीरांना त्यांचे सेनापती केले; व त्यांचा चांगला मानपान केला. कृप, द्रोण, शल्य, जयद्रथ, सुदक्षिण, कृतवर्मा, अश्वत्थामा, कर्ण, भूरिश्रवा, शकुनि व बाल्हीक यांची तर तो रोजच्यारोज गांठ घेऊन मानमरातब ठेवीत असे; एवढेंच नव्हे तर त्यांच्या नोकरचाकरांची देखील त्यानें उत्तम बडदास्त ठेविली होती. याप्रमाणें सैन्याची व्यवस्था लावल्यावर सर्व राजांच्या समक्ष दुर्योधन भीष्मांना हात जोडून ह्मणाला, ‘ सेना वाटेल तेवढी मोठी असली तरी तिच्यावर कोणी अनुभवशीर सेनाधिपति नसेल तर मुंग्यांच्या घोळक्याप्रमाणें युद्धाचे वेळीं तिची फाकाफाक होते. आपण शुक्राचार्यांच्या तोडीचे असून धर्मनिष्ठ व कोणाच्या हातून न मरणारे आहां. तेव्हां आपण आमचे सेनापति व्हावें अशी माझी इच्छा आहे. ’ यावर भीष्म म्हणाले, ‘ तूं म्हणतोस तें खरें आहे, परंतु मला तुह्मी आणि पांडव सारखेच असल्यानें कराराप्रमाणें जरी मला तुझ्या बाजूनें लढलें पाहिजे, तरी त्यांनाही त्यांच्या हिताची गोष्ट मला सांगितलीच पाहिजे. त्या नरव्याघ्र धनंजया-

खेरीज माझ्या तोडीचा योद्धा मला कोणी दिसत नाहीं. महाबुद्धिमान् अशा त्या एकट्यालाच काय तीं सर्व दिव्यास्त्रांची पूर्ण माहिती आहे; परंतु तो कांहीं माझ्याशीं निर्भीडपणें लढणार नाहीं. तसेंच माझ्या अंगांत हें जग निर्मानुष करण्याचें सामर्थ्य आहे, तरी पांडवांना कांहीं मी मारणार नाहीं. आतां कर्णाला तरी प्रथम एकटा लढूं दे किंवा मी तरी एकटा लढेन. या अटीवर मी सेनाधिपतित्व पतकरण्याला तयार आहें. कारण युद्धांत तो नेहमीं माझ्याशीं स्पर्धा करीत असतो.' यावर 'भीष्म जिवंत आहेत तोंपर्यंत मी लढणार नाहीं,' अशी कर्णानें प्रतिज्ञा केली. नंतर दुर्योधनानें भीष्मांना सेनाधिपतीचा अभिषेक केला. तेव्हां शेंकडों हजारों नौबदी व शंख राजाज्ञेनें वाजूं लागले, व सिंहनाद सुरू झाले. इतक्यांत आकाशांत ढग वगैरे कांहीं नसतां रक्ताचा पाऊस पडून जिकडे तिकडे चिखलच चिखल होऊन गेला. वावटळ, धरणीकंप इत्यादि दुश्चिन्हांनीं योध्यांचीं मनें खचून गेलीं. कोल्ह्यांचीही भयसूचक कोल्हेकुई सुरू झाली. अशीं शेंकडों दुश्चिन्हें होऊं लागलीं असतां ब्राह्मणांना पुष्कळ गाई व मोहोरा देऊन त्यांच्याकडून स्वस्तिवाचन करवून त्यांकडून जयाशी घेत दुर्योधन सर्व प्रचंड सैन्यानिशीं भीष्मांना पुढें करून नगराबाहेर पडून कुरुक्षेत्राला येऊन दाखल झाला; व कुरुक्षेत्र हिंडून सपाट, रम्य, तृणकाष्ठांनीं संपन्न असा उखीर प्रदेश पाहून त्या ठिकाणीं त्यानें शिबिरांकरितां जागा आखिल्या.

बलरामाचें तीर्थाटन.

याप्रमाणें ज्यांत भयंकर फडशा पडणार असा हा युद्धप्रसंग जवळ येऊन ठेपला असतां बलराम पांडवांच्या गोटाकडे आला. हातांत हात घालून यथोचित नमस्कारचमत्कार होऊन सर्व आ-

पापल्या जागीं बसल्यावर श्रीकृष्णाकडे पाहून बलराम ह्मणाला, ‘ हा भयंकर संहाराचा काळ आला आहे. मला हा खात्रीनें विधीचा नियमानियमच दिसतो; ह्मणून हा टाळतां येणें शक्य नाहीं, तेव्हां ह्यांतून कांहीं अपाय न होतां तुह्माला पार पडलेले पाहण्याचा सुदिन येईल तो खरा. तुह्मी व दुर्योधन दोघेही मला सारखेच असल्यानें मला दोघांनाही साहाय्य दिलें पाहिजे होतें, व हें मीं कृष्णाला अनेकवार सांगितलें असतां तुमच्यासाठीं त्यानें माझें ह्मणणें न ऐकतां अर्जुनाकडे दृष्टि देऊन मनोभावानें तो तुमच्याकडे वळला आहे; तेव्हां कृष्णाच्या मनाप्रमाणें जय तुह्माला मिळणार हें खास. आतां कृष्णावांचून हें जग मला तुच्छ आहे आणि यासाठींच मी त्याच्या मर्जीप्रमाणें वागतों. दुर्योधन व भीमसेन हे दोघेही माझे प्रियशिष्य शूर व गदायुद्धांत निष्णात आहेत, यासाठीं कौरवांचा नाश स्वस्थपणें पहात बसणें माझ्या हातून होणार नाहीं. ह्मणून मी आपला सरस्वतीच्या तीरावरील तीर्थें हिंडत फिरतों.’ असें ह्मणून बलराम तीर्थयात्रेला निघून गेला.

रुक्मीची फजीति.

भारतीय युद्धाचे वेळीं वाटेल ती गोष्ट तडीस नेण्याचा मनगटांत जोर असलेला भीष्मक राजाचा रुक्मि नांवाचा मुलगा प्रथम पांडवांकडे आला. याला गांडीव व शार्ङ्ग यासारखें तेजस्वी इंद्राचें विजय धनुष्य मिळालें होतें. वरुणाचें गांडीव, इंद्राचें विजय व विष्णूचें शार्ङ्ग हीं तीनच देवांचीं मुख्य धनुष्यें गणलीं आहेत. पैकीं शार्ङ्ग श्रीकृष्णाला मिळालें होतें. खांडववन जाळल्यावर गांडीव अग्नीपासून अर्जुनाला मिळालें होतें, व हें मेघासारखा शब्द करणारें विजय द्रुमापासून रुक्मीला मिळालें होतें.

श्रीकृष्णानें रुक्मिणीचें हरण केलें असतां आपल्या बळाचा गर्व असणाऱ्या या वीराला तें सहन झालें नाहीं. व ' कृष्णाला मारल्याखेरीज मी परतणार नाहीं, ' अशी प्रतिज्ञा करून तो धनुर्धरश्रेष्ठ चतुरंग सेनेसह कृष्णावर चालून गेला. या झटापटींत त्याचा पूर्ण मोड होऊन त्याला लाजून कुंडिनपुराला परतावें लागलें. ज्याठिकाणीं या रुक्मीचा पराभव झाला, त्या जागेवर भोजकटक नांवाचें शहर वसविलें आहे. असा हा रुक्मि एक अक्षौहिणी सैन्य घेऊन पांडवांकडे येऊन त्यांना साहाय्य देण्याला तयार झाला असतां त्याची गर्वोक्ति ऐकून कृष्णयुधिष्ठिराकडे पाहून किंचित् हासून अर्जुन त्याला म्हणाला, ' कौरवकुलांत माझा जन्म झाला असून पंडूचा मी बच्चा आहें; तसाच मी आपल्याला द्रोणशिष्य म्हणवून घेत असतों, व श्रीकृष्णासारख्याचें मला साहाय्य आहे. तेव्हां आम्हाला भीति कशाची असणार. आजपर्यंत या एकट्या बहादरानें अनेक पराक्रम केले आहेत. ज्यानें अनेक देवांना संतोषविलें आहे, तो हा बहादर हातांत गांडीव तसेच अक्षय्यबाण व दिव्यास्त्रें आहेत तोंपर्यंत प्रत्यक्ष इंद्राशीं दोन हात करण्याला डगणार नाहीं; म्हणून आमची तुला विशेष काळजी नको. वाटेल तर आमच्या बाजूला रहा, नाहीं तर कौरवांकडे जा. ' हें अर्जुनाचें तुच्छ भाषण ऐकून रुक्मि आपलें सैन्य परतवून त्यापायीं दुर्योधनाकडे गेला, व तिकडेही त्याच्या गर्वोक्तीबद्दल मानी दुर्योधनाकडून तशीच संभावना झाल्यानें त्याला या भारतयुद्धापासून अलग रहावें लागलें. याप्रमाणें या महायुद्धापासून बलराम व रुक्मि हे दोघेच कायते अलग होते.

उलूकाबरोबर पांडवांना निरोप.

युद्ध सुरू होण्याचे पूर्वीं दुर्योधनानें फिरून उलूकाला पांडवांना हिणविण्याचा निरोप देऊन त्यांकडे पाठविलें. त्याप्रमाणें निरोप घेऊन पांडवाच्या गोटांत येऊन तो निरोप अक्षरशः त्यानें त्यांना कळविला. त्यावेळीं उलूकाचे ते कर्णकटू शब्द ऐकून अर्जुन अगदीं संतापून गेला. अर्जुनाच्या त्या वेळच्या स्वरूपाकडे कोणाच्यानें पहावेना देखील. अर्जुनाची व श्रीकृष्णाची त्यानें केलेली निंदा ऐकून सारे रागानें संतापून आपापल्या जाग्यावरून उठले. रागानें सर्वांचे डोळे लाल झाले. रक्तचंदन चोपडलेले अंगदादि भूषणांनीं विभूषित आपले हात पुढें करून ओठ चावून ते करकरां दांत खाऊं लागले. त्यांची मुद्रा व आशय ओळखून दांत करकरां खात व हात चोळीत भीम संतापानें उलूकाला म्हणाला, ' आम्हांला दुबळे समजून चेव आणण्यासाठीं दुर्योधनानें हा तुझ्याबरोबर निरोप पाठविला आहे. ठीक आहे म्हणावें! आतां सर्व राजांसमक्ष मी सांगतों तें त्या हट्टी दुर्योधनाला जाऊन कळीव. वडील भावाच्या इच्छेबाहेर जावयाचें नाहीं या संकल्पामुळें आम्ही आजपर्यंत जो कांहीं तुझा दुष्टपणा सोसून घेतला, तें तूं आपलें भाग्यच समजावयाला पाहिजे होतेस. कुलाचा नाश होऊं नये ह्मणून विचारी धर्मराजांनीं सख्य जुळविण्यासाठीं केशवालाही तुझाकडे पाठविलें. परंतु कालानेंच बुद्धि दिल्यामुळें तूं यमसदनाला जाऊं इच्छीत आहेस. ठीक आहे. उद्यां युद्धाला तयार हो. मीं जी प्रतिज्ञा केली आहे, ती निःसंशय खरी करीन. याबद्दल तुला मुळीं काळजी नको. समुद्र आपली मर्यादा सोडील, पर्वताचे तुकडे तुकडे होतील, पण माझी प्रतिज्ञा कधीं खोटी होणार नाहीं. तुझ्या साहाय्याला स्वर्गांतून देव जरी उतरले तरी पांडव आपली

प्रतिज्ञा खरी केल्याशिवाय सोडणार नाहींत. तुला हास्तिनापुरांत रहाण्याची पाळी येते कीं गिधाडांच्या पोटांत रहाण्याची येते पहा. मी दुःशासनाचें रक्त मनमुराद पिणार, व तुझी मांडी फोडून तुझ्या डोक्यावर पाय देणार. भीष्मांना पुढें करून जरी कोणी माझ्याबरोबर युद्धाला उठला तरी त्याला यमसदनाला पाठविल्याशिवाय मी सोडणार नाहीं. तूं निरोप पाठविला आहेस त्यांपैकीं कांहींएक केल्यावांचून मी बाकी ठेवणार नाहीं बरें ! ' सहदेव म्हणाला, ' धृतराष्ट्राचा व तुझा संबंध नसता तर कौरवांवर आज हा प्रसंग कधीं गुदरला नसता. धृतराष्ट्रकुलाचा व त्याबरोबर जगाचा फडशा पाडण्यालाच तूं कुलघाती दुष्ट निपजला आहेस. आजन्म तुह्मी आमच्या वाइटावर बसलां आहां; परंतु त्या सर्वांचा मी आतां शेवटचा निकाल लावून टाकतों. शकुनीच्या समक्ष आधीं तुला मारून मग त्याचा मी शेवट करीन. ' या दोघांचें भाषण ऐकून अर्जुन हासत हासत म्हणाला, ' भीमा, तुझ्याशीं ज्यांचें वैर जुळलें ते जगाला मुकल्यासारखेच मी समजतों. ते घरामध्यें आपल्याला जरी सुरक्षित समजत असले, तरी यमपाश त्यांच्या गळ्यांत आधींच जाऊन पडला आहे. वीरहो, दुर्योधनाचें चीड आणणारें, विशेषेंकरून माझ्या व कृष्णासंबंधाचें निंदात्मक भाषण तुह्मीं ऐकिलेंच आहे, तुह्मी आमच्यासाठीं कंबरा बांधून तयारच आहां, आणि ह्मणूनच कृष्णाच्या व तुमच्या जोरावर मी दुर्योधनाला हा निरोप पाठवितों. ' असें म्हणून ' उद्यां तुझ्या निरोपाचें उत्तर गांडीवाच्याच वाटें मिळून मी षंढ कां कोण, हें तुला कळून येईल, ' असा निरोप दुर्योधनाला कळविण्यास सांगून तो म्हणाला, ' अरे, जो आपल्या मनगटाच्या जोरावर शत्रूला आमंत्रण देऊन न कचरतां त्याबरोबर युद्ध करतो तोच मर्द. जो दुसऱ्याच्या जोरावर गरजतो

त्या वीर्यहीन क्षत्रियाधमाला नीचच समजलें पाहिजे. तेव्हां स्वतः तूं दुसऱ्या कोटींतला असून दुसऱ्याच्या जोरावर तिसऱ्याला टाकून बोलत आहेस; कारण आज त्या बिचाऱ्या म्हाताऱ्या भीष्मांना मरणाची दीक्षा देऊन तूं ह्या वल्गना चालविल्या आहेस. हे कुलकलंक्या, तुझा भाव आम्हीं ओळखिला. दयेनें पांडव भीष्मांना मारणार नाहींत, व त्यांच्या जिवावर वाटेल तशा उड्या मारतां येतील अशा घमेंडींत तूं आहेस; परंतु मी खास सांगतों कीं, ज्यांच्या आधारावर तुझ्या ह्या उड्या चालल्या आहेत, त्या भीष्मांनाच अगदीं आधीं मी मारीन. तुझ्या हुकुमाप्रमाणें उद्यां भल्या सकाळीं युद्ध सुरू करून सृंजय व शाल्वेय सैन्याचा खुद्द मी फडशा पाडीन. हें काम मीं आपल्या शिरावर घेतलें आहे. द्रोणावांचून सर्व जगाचा मी एकटा फडशा पाडीन. ' तुला पांडवांपासून भीति बिलकुल नको, ' असें भीष्म बोलल्याबरोबर राज्य आपल्या हातीं येऊन पांडव धुळीला मिळाले असें तुला वाटूं लागलें आहे ! गर्वानें आंधळा होऊन स्वतःवर तूं केवढा अनर्थ ओढवून घेत आहेस, हें तुला अद्यापि कळत नाहीं. ह्मणून सूर्योदय झाल्याबरोबर तुझ्या देखत प्रथम मी त्या भीष्मांनाच मारतों. त्यांना रथाखालीं आणून बाणांनीं झाकून काढलेले पहाशील तेव्हां ह्या फुशारकीचें महत्त्व तुला कळून येईल. कोत्या बुद्धीचा, धर्मलंड, नेहमीं वैर बांधून रहाणारा अशा दुष्ट दुःशासनासंबंधानें भीमानें जी मर सभेंत प्रतिज्ञा केली आहे, ती उद्यां खरी झालेली तुला दिसून येईल. हे नराधमा, अहंपणा, गर्व, राग, मर्मभेदक भाषण, निष्ठुरपणा, बढाई, उद्धटपणा, मीपणा, क्रूरपणा, धर्मद्वेष, अधर्म, दुसऱ्याला तुच्छ करणें, वृद्धांचें न ऐकणें, वाकडी दृष्टि ठेवणें व अशाच प्रकारचे जे अनेक दोष तुझ्या ठिकाणीं आहेत, त्यांचें घोर प्रायश्चित्त तुला लवकरच भोगावें लागेल. ज्या मला

कृष्ण साहाय्याला आहे, तो मी खवळलों असतां मग तूं प्राणाची आशा ठेवूं नकोस. भीष्म, द्रोण गार पडून कर्णानें हें जग सोडल्यावर मग तुला प्राण, राज्य व पुत्र या सर्वासंबंधानें निराशा वाटूं लागेल. तुझे भाऊ व मुलगे यांचा भीमानें फडशा पाडल्यावर मग आपल्या दुष्कृत्यांची तुला आठवण होईल. माझा शब्द फिरल्याचें मला कधींच आठवत नाहीं. तेव्हां मीं जें कांहीं म्हणतों तें सारें खरें होणार. आपल्या सर्व इष्टमित्रांसह पुढील कार्याला तयार हो. तुझा निरोप कळला. त्यांतील उद्देशही लक्ष्यांत आला. सर्व कांहीं तुझ्या मनाप्रमाणें घडून येईल. ' यावर ' आह्मी भल्याचे दास होण्यास नेहमीं मनापासून इच्छितों, आह्मी गुलाम असूं किंवा कोणी असूं त्याचें तुला काय करावयाचें आहे ? कोणाचा किती पराक्रम आहे हें लवकरच दिसून येईल, ' असा निरोप विराटद्रुपदांनीं; ' भीष्मांना मारण्यासाठींच माझा जन्म असल्यानें मी त्यांना खात्रीनें मारीन, ' असा शिखंडीनें व ' द्रोणासाठींच मी जन्मलों असल्यानें त्यांचा माझ्या हातून शेवट लागणार, ' असा धृष्टद्युम्नानें दुर्योधनाला निरोप कळविण्यास सांगितलें. याप्रमाणें सर्वांचे निरोप झाल्यावर भगवान् म्हणाला, ' माझाही त्याला लहानसा निरोप कळीव कीं, ' उद्यां यावेळीं पुरुषाप्रमाणें युद्धाला तयार हो. अर्जुनानें केवळ सारथ्य करण्यासाठीं मागून घेतल्यामुळें हा कांहीं युद्ध करणार नाहीं या समजुतीवर तूं निर्भय आहेस; पण एक पळभर देखील या विचाराला मनांत थारा देऊं नकोस. मी खवळलों असतां अग्नि ज्याप्रमाणें गवताला त्याप्रमाणें सर्व राजांना मी जाळून टाकीन. युधिष्ठिराच्या आज्ञेनें अर्जुन युद्ध करीत असतां त्याचें मी सारथ्य करीन. जरी तूं तिन्ही लोक उडून वर गेलास किंवा पाताळांत शिरलास, तरी त्या त्या ठिकाणीं उद्यां सकाळीं तुला अर्जुनाचा रथ दिसूं लागेल. दुःशास-

नाचें जें रक्त मी पिईन असें भीमानें ह्मटलें आहे, तें तो प्याला आहे असें समज. पांडवांपैकीं कोणीच तुझी खातर बाळगीत नाहींत; तरी ज्ञातीचा नाश होऊं नये, असें मला मनापासून वाटतें; परंतु तुझ्यामुळें हें सर्व आतां न मागतां वाढून येणार आहे.' हे सर्वांचे निरोप परत येऊन उलूकानें दुर्योधनाला जशाचे तसे कळविले.

भीष्मकर्णांचें भांडण.

युद्धाचे प्रारंभीं आपल्या व शत्रूच्या बाजूला रथी, महारथी कोण कोण आहेत ' म्हणून दुर्योधनानें विचारल्यावरून सर्वांचीं नांवें विल्हेवारीनें सांगून अखेरीस भीष्म म्हणाले, ' हा तुझा कलीजा, जो तुझी नेहमीं पांडवांवर उठावणी करून देत असतो, तो हा बढाईखोर कर्ण नीच, अभिमानी, चढेल व परनिंदक आहे, व अंगच्या कवचकुंडलांना आंचवून याला गुरुशाप व ब्रह्मशापहीं झाला आहे, म्हणून याला मी रथी तर नाहींच पण अर्धरथीही समजत नाहीं. अहंपणामुळें युद्धांत हा नेहमीं चुका करून पाठ दाखवीत असतो. अर्जुनाची गांठ पडून हा जिवंत सुटण्याची कांहीं आशा नाहीं.' हें ऐकून कर्ण संतापून ह्मणाला, ' अहो भीष्म, मज गरीबावर आपण केवळ द्वेषभावानें पदोपदीं असे वाग्बाण सोडीत असतां. दुर्योधनाकडे पाहूनच मी ते सारे सोसून घेत असतों. एखाद्या नीचाप्रमाणें मला मूर्ख समजून मी अर्धरथीसुद्धां नाहीं म्हणून जें आपण आपलें मत ठोकून दिलें त्यामुळें आपल्या खरेपणाचा डंका सर्व जगभर गाजत असल्यानें साऱ्या जगाला हें खरेंच वाटणार आहे. नेहमीं कौरवांचें आपण अहित करीत असून राजाला तें उमगत नाहीं. माझे गुण असह्य वाटून माझा हिरमोड करण्याला आपण जसे तयार आहां अशा

प्रकारचा हिरमोड आपल्यामध्यें फूट पाडण्याच्या हेतूनें करण्याला दुसरा कोण बरें तयार होईल? वयानें, केस पिकल्यानें, पैशानें किंवा पुष्कळ गोतावळ्यामुळें कोण रथी, कोण अतिरथी हें सांगण्याचा कोणाला अधिकार पोहोंचत नसतो. द्वेषानें घेरल्यामुळें आपण हा मूर्खपणा करीत आहां. दुर्योधना, नीट विचार कर. या भीष्मांच्या मनांत दुष्टभाव असून ते तुझें वाईट करूं पहात आहेत. परंपरागत सेवकांमधील फूट सुद्धां सांधतां येत नाहीं, मग नानादेशांतील एकत्र जुळलेल्या सैन्यामध्यें फूट पडेल तर ती कशी जुळून येणार? आतां या युद्धांत योध्यांमध्यें फुटीचें बीं तर रुजलेंच आहे. कारण आतां आमच्या तोंडापुढेंच आमचा हिरमोड होऊं लागला आहे! रथी, अतिरथी ओळखण्याचें ज्ञान कोणीकडे व हे मद्दड भीष्म कोणीकडे? मी एकटा सर्व पांडवसेनेला बस्स आहें. वाघासमोर आलेल्या बैलाप्रमाणें ज्याच्या बाणाच्या तडाक्यांतून एकही सुटावयाचा नाहीं, अशा माझ्यापुढें आल्यावर पांडव, पांचाल सर्व देशोधडीला पळ काढतील. कोठें युद्ध, कोठें आणीबाणीचा प्रसंग, कोठें सल्लामसलतीचे वेळीं प्रसंगोचित भाषण, आणि कोठें मरूं पडलेले थल्लड व मद्दड भीष्म? सर्व जगापेक्षां आपण श्रेष्ठ असून आपल्या तोडीचा कोणीच नाहीं, अशी यांना घमेंड आहे. वृद्धांचें ह्मणणें ऐकावें असें वचन आहे खरें; पण फारच वय झालेल्या ह्मातारड्याचें ऐकून घेण्याला मात्र कोठें शास्त्रांत वचन नाहीं; कारण फार ह्मातारपणीं फिरून बाळपण येत असतें, असें शास्त्र आहे. सर्व पांडवसेना मी एकटा नाहींसा करीन, पण युद्धाचें यश सर्व सेनाधिपतीला जात असतें, म्हणून पूर्वींच ठरल्याप्रमाणें भीष्म जिवंत आहेत तोंपर्यंत कशाही प्रसंगीं मी युद्ध करणार नाहीं. यांच्यामागून मला जें करावयाचें तें मी करीन.' हें ऐकून भीष्म

म्हणाले, ' ह्या घोर प्रसंगांत सर्व भार माझ्यावर पडणार हें स्वप्न मला कैक दिवस पडलें आहे. ह्या प्रसंगीं आपसांत फूट पाडण्याची माझी बिलकुल इच्छा नाहीं. नाहींपेक्षां ह्या ह्यातार्‍यानें तुझ्या तरण्याबांडाची युद्धाची खुमखुमी केव्हांच जिरविली असती. परशुरामांनीं मोठमोठीं दिव्यास्त्रें सोडिलीं ते वेळीं सुद्धां मी मुळीं डगलों नाहीं, त्या मला तूं काय करणार आहेस ? आपल्या पराक्रमाची आपणच फुशारकी मारणें भल्यांना संमत नाहीं. तरी हे नीचकुलाला देखील कलंकभूत कर्णा, तूं मला चिडविल्यामुळें सांगतों कीं, काशिराजाच्या घरीं स्वयंवराच्या वेळीं सर्व पृथ्वीवरील क्षत्रिय जुळले असतां त्यांना जिंकून मी त्या मुलींना घेऊन आलों. दुसर्‍याचें वैर करणार्‍या तुझ्यामुळें कौरवांवर त्यांच्या नाशासाठीं हा मोठा प्रसंग गुदरला आहे. तर ज्या पार्थाबरोबर तूं स्पर्धा करीत आहेस, त्याबरोबर पुरुषत्व धरून कसून युद्ध कर. यांतून जिवंत कसा बाहेर पडतोस पाहीन. मी तर एका शिखंडीखेरीज बाकी सर्व सोमकपांचालांचा फडशा पाडीन. शिखंडि मात्र प्रथम स्त्री जन्मून पुढें पुरुष झाला असल्यानें त्याला मी हात लावणार नाहीं.' यावर भीष्म जिवंत असत तोंपर्यंत युद्ध करावयाचें नाहीं ह्मणून प्रतिज्ञा करून कर्णानें युद्धांतून आपलें अंग काढून घेतलें.

शिखंडीचा इतिहास.

विचित्रवीर्याला राज्याभिषेक झाला असतां त्याच्यासाठीं काशिराजाच्या अंबा, अंबिका, अंबालिका या तीन रूपवती मुलींना भीष्मांनीं स्वयंवरांतून हरण करून आणिल्या होत्या. तेव्हां लग्नाची सर्व तयारी झाली असतां त्यांच्यामधील वडील जी अंबा तिनें 'मीं मनानें शाल्वदेशचा राजा पति वरला आहे,' असें सांगितलें. त्यावरून भीष्मांनीं तिची शाल्वराजाकडे रवानगी करून

दिली. परंतु भीष्मानीं तिला हरण केली असल्यामुळें शाल्वही तिला पतकरीना. तेव्हां या संकटाला कारणीभूत जे भीष्म त्यांवर सूड घेण्याच्या विचारानें ती कडक तप करूं लागली. याप्रमाणें ती यमुनेच्या तीरावरील आश्रमामध्यें अन्न देखील सोडून अलौकिक तपामध्यें शरीर झिजवीत राहिली असतां अनेक तापसांनीं तपापासून तिचें मन फिरविण्याचा प्रयत्न केला. तेव्हां ती त्यांना ह्मणे, ' ज्या भीष्मांनीं टाकल्यामुळें मी पतिधर्माला मुकून इहलोकच्या सुखाला व पतिलोकालाही मुकलें आहें, त्या भीष्मांवर सूड उगवून त्यांना मारण्यासाठीं हा माझा यत्न असून तो कशानेंही ढळणार नाहीं. पुरुषत्व मिळवून भीष्मांवर सूड घेण्याच्या निश्चयानें मी घोर तप करीत आहें. मला उत्तम लोक वगैरे कांहीं नको आहेत. ' याप्रमाणें निश्चयानें ती तप करीत असतां उमापती शंकरांनीं स्वप्नांत तिला दर्शन देऊन वर मागण्यास सांगितलें. तेव्हां ' मीं आपल्या हातानें भीष्मांना मारावें, ' असा तिनें वर मागितला. तेव्हां महादेवांनीं त्या दृढनिश्चयी मुलीला बरें ह्मणून ' प्रथम स्त्रीच्या जन्माला येऊन कांहीं कालानें तूं पुरुष होशील व भीष्मांना मारशील, ' असें सांगून ते अंतर्धान पावले. नंतर अंबेनें मोठी चिता पेटविली व रागानें मन अनावर होऊन ' भीष्मांना मारण्यासाठीं ' एवढेंच ह्मणून तिनें चितेंत उडी घेतली.

इकडे द्रुपदराजाच्या पट्टराणीला मूल नव्हतें ह्मणून याच सुमारास द्रुपदानें मुलासाठीं घोर तपश्चर्या करून शंकराला तोषविलें होतें, व ते प्रसन्न झाले असतां भीष्मांवर सूड घेण्यासाठीं त्यानें एक मुलगा मागितला. तेव्हां ' प्रथम मुलगी जन्मून पुढें पुरुष होणारें एक अपत्य तुला होईल, ' असें सांगून त्यांनीं त्याला परत पाठविलें. पुढें द्रुपदाच्या बायकोला योग्यकालीं गर्भ राहिला. राजा मुलाला हापापला असल्यामुळें त्यानें तिची चांगली

जोपासना ठेवून तिचे सर्व सोहाळे पुरविले. पुढें तिला एक रूपवती मुलगी झाली; परंतु त्या राणीनें सर्वांना ' मला मुलगा झाला आहे, ' असें सांगून खरी गोष्ट छपवून ठेविली. राजानेंही त्या मुलाचे जातकर्मापासून सर्व संस्कार पुत्राप्रमाणें करून त्याचें शिखंडि हें नांव ठेविलें. राणीनें ती गोष्ट मोठ्या खबरदारीनें गुप्त ठेविली असल्यामुळें नगरांत देखील कोणाला ती मुलगी आहे हें ठाऊक नव्हतें.

द्रुपदानें या मुलीला लेखन, शिल्प वगैरे कला शिकविल्या, व धनुर्विद्येंत ती द्रोणशिष्य झाली. पुढें तिचें लग्न करून तिला बायको करण्याविषयीं राणीनें राजाला सुचविलें. तेव्हां ती यौवन दशेंत आली असल्यामुळें आतां मुलगी ह्मणून लोकांना कळून येणार ह्याबद्दलची राजाला चिंता पडली. परंतु त्रैलोक्यकर्त्या शंकरांचें भाषण असत्य होणार नाहीं असा राणीनें त्याला धीर दिला. नंतर दोघांचा विचार ठरून त्यांनीं दशार्ण देशच्या राजाच्या मुलीला मागणी घातली व दशार्ण देशच्या प्रसिद्ध हिरण्यवर्म्यानें आपली मुलगी शिखंडीला दिली. हा राजा दुसऱ्यांना दुर्धर्ष व अजिंक्य असून याचें सैन्यही मोठें होतें. लग्न झाल्यावर शिखंडि कांपिल्य नगराला परत आला. पुढें लौकरच त्या मुलीला व शिखंडीला यौवनदशा आली व पुढें हिरण्यवर्म्याच्या मुलीला शिखंडि स्त्री असल्याचें कळून येऊन तिला व तिच्या दायांना फार दुःख झालें. तिच्या दासींनीं ती बातमी हिरण्यवर्म्याला कळविली. तेव्हां तो फार संतापून गेला. द्रुपदानें हा वृत्तांत आपल्या बायकोला एकांतांत कळविला. व पुढें काय करावें ह्मणून विचार करून त्यानें इष्टदेवतेचें आराधन चालविलें. इकडे त्या मुलीला आपल्या आईबापांना याप्रमाणें आपल्यासाठीं संकटांत पडलेले पाहून जीव नकोसा झाला, व घर सोडून एका

निबिड अरण्यांत जाणें बरें वाटलें. स्थूणाकर्ण नामक श्रीमान् यक्ष त्या वनांत रहात असे, व त्याच्या भयानें कोणी तेथें जात नसे. त्या वनांत स्थूणाकर्णाचा वाडा होता. ती त्यांत शिरून पुष्कळ दिवस अन्न न घेतां शरीर सुकवीत राहिली. स्थूणाकर्णाचें लक्ष्य तिकडे जाऊन त्याला दया आली व त्यानें तिला तिचा उद्देश विचारल्यावरून तिनें त्याला आपला हेतु कळविला. तेव्हां दैवाच्या फेऱ्यांत सांपडलेल्या त्या यक्षानें ती वेळेवर परत येईल या भिस्तीवर मुदतीच्या अटीवर आपलें पुरुषत्व तिला देऊन तिचें स्त्रीत्व घेतलें, व नगराकडे जाऊन सर्व यथास्थित झाल्यावर फिरून तिला आपल्याकडे येण्यास सांगितलें. तें कबूल करून शिखंडि कांतिमान् असा पुरुष बनून नगराकडे गेला. हें घडलेलें वर्तमान ऐकून राजाला आनंद झाला, व त्यानें दूताकरवीं, 'माझा मुलगा पुरुष आहे, वाटेल तर तुह्मी याची परीक्षा करा,' असा निरोप दशार्ण राजाला पाठविला. पुढें शिखंडि महावीर्यवान् पुरुष आहे असें त्या राजाला कळल्यावर त्याला मोठा आनंद झाला व प्रेमानें त्यानें द्रुपदाची भेट घेऊन संपत्ति, असंख्य गाई, हत्ती, घोडे व दासी शिखंडीला दिल्या. वेडेखुळे, आंधळे, बहिरे यांचीं सोंगें घेऊन द्रुपद नगरींत फिरणाऱ्या हेरांकडून भीष्मांना मात्र ही सर्व बातमी कळली होती. म्हणून त्यांनीं 'युद्धामध्यें त्याजवर उठावयाचें नाहीं,' अशी प्रतिज्ञा केली.

युद्धाचे वेळचे नियम.

कौरव व पांडव यांचीं दळें युद्धाला जय्यत तयार होऊन उभीं राहिलीं असतां युद्धाचे वेळीं पुढील नियम पाळावयाचे असें दोन्ही बाजूंच्या लोकांच्या विचारानें ठरलें.—रोजच्यारोज संध्याकाळीं युद्ध संपून परतल्यावर परस्परांनीं परस्परांशीं

स्नेहानें असावें. प्रत्येकानें आपापल्या तोडीच्या योध्याबरोबर युद्ध करावें. कमी अधिकाबरोबर युद्ध करणें अन्यायाचें समजलें जावें. तोंडाच्या भांडणाचा तोंडाच्या भांडणानेंच प्रतिकार करावा. सैन्य सोडून कोणीं माघार घेतली असतां त्याला मारूं नये. रथ्यानें रथ्याबरोबर, हत्तीवरच्यानें हत्तीवरच्याबरोबर, स्वारानें स्वाराबरोबर व पायदळानें पायदळाबरोबर युद्ध करावें. ज्याच्या त्याच्या जोडीप्रमाणें, ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें ज्याच्या त्याच्या हुरुपाप्रमाणें व ज्याच्या त्याच्या शक्तीप्रमाणें प्रथम सूचना देऊन प्रहार करावा. भरंवशानें असणारावर किंवा घायाळ झालेल्यावर कधीं प्रहार करूं नये. दुसऱ्याशीं भिडलेला, शरण आलेला, पाठ फिरवून परत चाललेला, शस्त्र किंवा चिलखत गळून पडलेला, यांवर कधीं प्रहार करूं नये. सारथी, गाड्या वहाणारीं जनावरें, शस्त्रें आणून देणारे, नौबदी व शंख वाजविणारे, यांवरही प्रहार करूं नये.–याप्रमाणें नियम करून उभयतांनीं आपापलीं दळें एकमेकांवर भिडविलीं.

युद्धाचा आरंभ.

युद्धासाठीं पूर्वपश्चिम बाजू रोखून पांडवकौरवांकडचीं दळें सज्ज होऊन उभीं राहिलीं असतां 'भिडा, भिडा' म्हणून ओरडणाऱ्या राजांच्या व शंख, नौबदी इत्यादि वाद्यांच्या शब्दांनीं, हरहर ओरडण्यांनीं, घोड्यांच्या खेंकाळण्यांनीं रथचक्रांच्या घरघर आवाजांनीं, हत्तींच्या गरजण्यांनीं व योध्यांच्या गर्जनांनीं व धावाधावींनीं तेथें एकच गडबड उडून राहिली. सूर्योदयाच्या वेळीं कौरवपांडवांचें सैन्य जय्यत तयार होऊन राहिलें. कोणाची मात्रा चालूं न देणारीं त्यांचीं शस्त्रास्त्रें व कवचें, त्याचप्रमाणें सशस्त्र होऊन तयार झालेल्या त्यांच्या अफाट सेना सू-

र्यकिरणामध्यें झळकूं लागल्या. धनुष्य, सैफ, कट्यार, तरवार, गदा, शक्ति, गुरगुंज इत्यादि लखलखीत हत्यारांनिशीं सज्ज होऊन योद्धे आपापल्या जागीं उभे राहिले. हजारों हत्ती, पायदळ, रथ, स्वार जाळ्याप्रमाणें पसरून राहिले होते. दोन्ही बाजूंला नानाप्रकारचे लखलखीत ध्वज फडकत होते. चिलखत वगैरे चढवून तयार झालेले वीर युद्धाला अगदीं आतुर झाल्यासारखे दिसत होते. सौबल देशाचा शकुनि, अवंतीचा शल्य, कैकेय देशचे जयद्रथ, विंद व अनुविंद, कंबोज देशाचा सुदक्षिण, कलिंग देशचा श्रुतायुध, राजा जयत्सेन, कोशल देशाचा बृहद्बळ व सात्वतांचा कृतवर्मा, हे व दुसरे पुष्कळ दुर्योधनाचे अंकित नीतिकुशल महारथी राजे व राजपुत्र चिलखत वगैरे चढवून उत्साहयुक्त व आनंदभरित होऊन दुर्योधनासाठीं ब्रह्मलोकाची दीक्षा घेऊन दहा अक्षौहिणी संभाळून राहिले. कौरवांची जी थोरली टोळी अकरावी अक्षौहिणी ती सर्व सैन्याच्यापुढें असून, पांढरा फेटा, पांढरी छत्री, पांढरें चिलखत यांनीं मंडित असे भीष्म त्यावर मुख्य होते. याप्रमाणें श्रीनें झळकणाऱ्या महावीरांच्या हातांखालीं असलेली कौरवांची अकरा अक्षौहिणी सेना तशीच पांडवांची सात अक्षौहिणी सेना युगांतीं एकमेकांशीं भिडणाऱ्या दोन सागरांप्रमाणें दिसत होत्या. अशा प्रकारचें अफाट सैन्य कधीं कोणाच्या पहाण्यांतच आलें नसेल. त्या ठिकाणीं सर्व मोठमोठे वीर जमले होते. मेलेल्यांचीं शरीरें खाण्याला मिळणार ह्मणून कावळे, गिधाडें शब्द करीत आकाशांत घिरट्या घालीत होतीं. पितामह भीष्म व द्रोणाचार्य एकाग्रतेनें ' पांडवांना जय मिळो, ' ह्मणून प्रार्थना करून मग कराराप्रमाणें कौरवांचे बाजूनें युद्धाला तयार झाले. सर्व धर्म पूर्ण ओळखणारे देवव्रत भीष्माचार्य राजांना आपल्यापाशीं आणवून म्हणाले, 'हे क्षत्रिय वीरांनो, स्वर्गाला

जाण्याला हें भलें मोठें द्वार तुमच्यासाठीं खुलें केलें आहे. तुमच्या पूर्वजांनीं व त्यांच्याही मागच्यांनीं हा तुमच्यासाठीं कायमचा मार्ग करून ठेविला आहे. लढाईमध्यें न कचरतां आपलें नांव राखा. नाभाग, ययाति, मांधाता, नहुष, नृग हे अशाच प्रकारच्या कृत्यांनीं यशस्वी होऊन श्रेष्ठ पदाला गेले. रोगराईनें कुजत पडून घरामध्यें मरणें हें क्षत्रियांना फार वाईट समजलें आहे. शस्त्रानें मरणें हा त्यांचा पूर्वापर धर्म आहे.' याप्रमाणें भीष्म उत्तेजनपर बोलल्यावर कौरवसैन्य शंखनाद करीत पांडवांवर चालून गेलं.

याप्रमाणें कौरवसैन्याची व्यवस्थित चाल पाहून ज्याला अनेक व्यूहांची पूर्ण माहिती होती असा धर्मराज त्यांच्या अनुरूप आपल्या सैन्याची उलट व्यवस्था लावण्याच्या उद्देशानें अर्जुनाला ह्मणाला, 'बाळा अर्जुना, महर्षी बृहस्पतींच्या वचनावरून पाहतां ज्यांचें सैन्य थोडें आहे, त्यांनीं जुळून राहून युद्ध करावें असें आहे. ज्यांचें पुष्कळ सैन्य आहे, त्यांनीं आपलें वाटेल तसें पसरून ठेवावें. थोड्या सैन्यानिशीं पुष्कळांबरोबर लढतांना त्या थोड्या सैन्याची व्यवस्था सुईच्या टोकाप्रमाणें संकुचित लावावी. आपल्या शत्रूपेक्षां आपलें सैन्य फारच थोडें आहे; तेव्हां वरील वचन ध्यानांत ठेवून आपल्या सैन्याची व्यवस्था लाव.' हें धर्मराजाचें भाषण ऐकून अर्जुन ह्मणाला, 'महाराज, ही पहा मी इंद्रानें ठरविल्याप्रमाणें शत्रूला दुर्जय अशी वज्र नांवाची आपल्या सैन्याची व्यूहरचना करतों. वावटळीप्रमाणें शत्रूला त्राहि त्राहि करून सोडणारा भीमसेन आपल्या सैन्याच्या आघाडीला युद्ध करील. हा पुढें झाला असतां ह्या तटाचा आपणा सर्वांना निर्भयपणें आश्रय करतां येईल. आचाट कर्म करणारा हा नरश्रेष्ठ खवळला असतां त्याच्याकडे पाहूं शकेल असा पुरुषच लोकांत सांपडणें कठीण.' असें ह्मणून सांगितल्याप्रमाणें सैन्याची व्यव-

स्था करून अर्जुन शत्रूवर चालून निघाला. ती पांडवांची मोठी सेना भरून संथ वहाणाऱ्या गंगेप्रमाणें दिसत होती.

याप्रमाणें पहाटेच्या प्रहरीं दोन्ही सैन्यें सूर्योदयाची वाट पहात सज्ज उभीं असतां वारा वाहूं लागून त्यामधून पावसाचे तुषार पडूं लागले, व आकाशामध्यें ढग वगैरे कांहीं नसतां गडगडाट होऊं लागला. रुक्ष वारा चोहोंबाजूंनीं वाहूं लागून तो आपल्याबरोबर पृथ्वीवरील खडे उडवून नेत होता. मोठी धूळ उठून अंधकारानें सर्व जग भरून गेलें. पूर्वेकडे मोठा उल्कापात होऊन सूर्य निस्तेज उगवला, व मोठा शब्द निघून धरणीकंप झाला. भूमि दुभंगली. कौरवसेना व पांडवसेना एकमेकांवर भिडत असतां त्या दोन्ही दळांचें स्वरूप फार उग्र दिसत होतें. कौरवसैन्याचें तोंड पश्चिमेकडे असून पांडवांच्या सैन्याचें पूर्वेकडे होतें. वारा पांडवांच्या बाजूनें कौरवांकडे वहात होता. कौरवसैन्यांत श्वापदें ओरडत होतीं. पांडवसैन्यांतील हत्तीच्या गंडस्थळांतून वहाणाऱ्या मदाचा दर्प कौरवसैन्यांतील हत्तींना सहन होत नव्हता.

अर्जुनाची उद्विग्नता व त्याला मिळालेलें प्रोत्साहन.

पवित्र अशा कुरुक्षेत्रामध्यें याप्रमाणें कौरवपांडवांकडील वीर युद्धाला आतुर होऊन भिडून त्यांनीं आपापले शंख फुंकले असतां आकाश व पृथ्वी दणाणून गेली. तेवेळीं त्या ठिकाणीं दोन्ही सैन्यांमध्यें वडील, चुलते, आजे, गुरू, मामे, भाऊ, पुतणे, नातू, स्नेही, सासरे वगैरे जिव्हाळ्याचे लोक युद्धाला तयार होऊन उभे असलेले पाहून अंतःकरण कळवळ्यानें खचून जाऊन अर्जुन म्हणाला, ‘ हे कृष्णा, या स्वजनांना युद्धाला तयार होऊन उभे राहिलेले पाहून माझीं गात्रें गळून गेलीं आहेत, तोंड सुकून गेलें

आहे. कांपरें भरून अंगावर कांटा उभा राहिला आहे. गांडीव हातामधून गळून पडत आहे. युद्धामध्यें स्वजनांना मारून कांहीं कल्याण होईलसें दिसत नाहीं. हे कृष्णा, मला विजय नको, राज्य नको, कांहीं नको. ज्यांसाठीं आह्मी राज्याची किंवा सुखाची इच्छा केली, ते हे संबंधी प्राणाची आशा सोडून युद्धाला तयार होऊन उभे राहिले आहेत. कृष्णा, मला कोणी मारिलें तरी पृथ्वीसाठीं तर कशाला पण त्रैलोक्याच्या राज्यासाठीं सुद्धां यांना मारण्याची माझी इच्छा नाहीं. ह्यांना मारून आम्हाला काय सुख होणार ? या आततांईना मारून आह्मी पापाला मात्र धनी होणार. लोभामुळें बुद्धि गेल्यानें यांना जरी कुलक्षय केल्यापासून जडणारा दोष व मित्रद्रोहाचें पातक दिसत नाहीं, तरी कुलक्षय केल्यानें लागणारें पाप आम्हास दिसत असल्यामुळें या पापापासून दूर रहावयाचें आम्हास समजूं नये का ? तेव्हां राज्यसुखाच्या लोभानें स्वजनांना मारण्याला तयार होऊन आह्मी हे महत्पाप करण्याला सिद्ध झालों, ही मोठी चूक झाली. हातामध्यें शस्त्र न घेतां स्वस्थ असतांना जरी धृतराष्ट्रपुत्रांनीं रणामध्यें मला मारिलें तरी तें सुद्धां पतकरलें.' असें म्हणून शोकाकुल होऊन हातांतील धनुष्यबाण टाकून अर्जुनानें हातपाय गाळिले. तें पाहून श्रीकृष्ण त्याला म्हणाला, ' बा अर्जुना, हलक्यांना उचित, स्वर्गाच्या आड येणारें, मर्दाला काळिमा आणणारें हें मोहपटल अशा आणीबाणीच्या प्रसंगीं तुझ्यावर कसें येऊन पडलें ? असा षंढपणा पदरीं घेऊं नकोस. हें तुला शोभत नाहीं. हे शत्रुतापना, हा कमीपणा आणणारा दुबळेपणा टाकून देऊन तयार हो. तूं मोठमोठ्या शहाणपणाच्या गोष्टी सांगतोस; आणि ज्यासंबंधानें शोक करण्याचें कारण नाहीं, अशासंबंधानें रडत बसतोस. शहाणे लोक मेलेल्यासाठीं किंवा जित्यासाठीं कधीं शोक

करीत नाहींत. मी, तूं, हे सारे लोक, पूर्वीं कधीं नव्हतों असें नाहीं किंवा पुढें होणार नाहीं असेंही नाहीं. देहधाऱ्याला या देहामध्यें ज्याप्रमाणें कौमार, यौवन, जरा इत्यादि अवस्था अनुभवाव्या लागतात, त्याचप्रमाणें त्याला एक देह टाकून दुसरा देह घ्यावा लागतो. म्हणून शहाण्याला याविषयीं कांहीं वाटत नाहीं. ज्यानें हें सर्व जग भरलें आहे, त्याचा कधीं नाश नाहीं. शाश्वत जो आत्मा त्याचे हे उपाधिभूत देह नाशवंत आहेत. म्हणून तुला युद्ध करण्याला कांहीं हरकत नाहीं. जो हा मारतो असें समजतो किंवा जो हा मरतो असें समजतों त्या दोघांनाही कांहीं कळत नाहीं. हा कोणाला मारीत नाहीं किंवा स्वतः मरत नाहीं. हा कधीं जन्मत नाहीं किंवा मरत नाहीं. एकदां असून फिरून नाहींसा होणारा हा नव्हे. देहाचा नाश झाला असतांही त्याबरोबर याचा नाश होत नाहीं. ज्याप्रमाणें जुनीं वस्त्रें टाकून मनुष्य दुसरीं नवीं घेतो, त्याप्रमाणें आत्मा जुनीं शरीरें टाकून देऊन नव्यांमध्यें शिरतो. शस्त्रें याला तोडूं शकत नाहींत, विस्तव याला जाळूं शकत नाहीं. पाण्यानें हा भिजत नाहीं किंवा वाऱ्यास याला शोषून घेतां येत नाहीं. हा सनातन आहे; तेव्हां यासंबंधानें तूं वाईट वाटून घेऊं नयेस. आतां हा नेहमीं उत्पन्न होणारा किंवा नेहमीं मरणारा आहे असें जरी तुला वाटत असलें, तरी पण यासंबंधानें शोक करण्याचें कारण नाहीं. कारण जो जन्मला त्याला मरण व मेला त्याला जन्म ठेवलाच आहे; तेव्हां या अपरिहार्य गोष्टीसंबंधानें शोक कां करावा? हा आत्मा नेहमीं अवध्य आहे ह्मणून कोणाही प्राणिमात्रासंबंधानें शोक करण्याचें कारण नाहीं. आतां स्वधर्माकडे लक्ष्य देशील तरी असें कचरणें तुला शोभत नाहीं. धर्म्य अशा युद्धाखेरीज क्षत्रियाला कल्याणप्रद असें दुसरें कांहींच नाहीं. आपोआप पुढें आलेलें स्वर्गाचें केवळ खुलें द्वार असें यु-

द्ध ज्या क्षत्रियांच्या नशीबीं येतें, ते धन्य समजले पाहिजेत. आतां हें धर्माला अनुसरून असणारें युद्ध जर तूं करणार नाहींस तर स्वधर्माला आणि कीर्तीला मुकून पाप तुझ्या माथीं बसेल, आणि सर्व लोक तुझी अपकीर्ति सांगत बसतील, आणि संभाविताला अपकीर्ति मरणापेक्षां वाईट आहे. मोठमोठे महारथी तूं रणांतून भिऊन पळालास असें मानतील आणि ज्यांना तूं आजपर्यंत मोठा वाटत होतास त्यांना तूं आतां तुच्छ वाटूं लागशील. तुझ्या वाइटावर असलेले तुझ्यासंबंधानें भलतेंसलतें बोलूं लागतील. तुझ्या सामर्थ्याची निंदा करूं लागतील; मग याहून दुःखद तें काय असणार? मेलास तर स्वर्ग मिळेल, जय मिळविशील तर पृथ्वीचा उपभोग घेशील; ह्मणून युद्ध करण्याचा निश्चय करून ऊठ. सुखदुःख, नफानुकसान, जयापजय सारखींच समजून युद्धाला तयार हो ह्मणजे तुला पाप मुळींच लागणार नाहीं. कर्म करण्यापुरताच तेवढा तुला अधिकार आहे. त्याच्या फलावर बिलकुल नाहीं. केलेल्या कर्मांच्या फलाची आशा मनामध्यें धरूं नकोस. बरें, फल नाहीं ह्मणून कांहीं न करतां स्वस्थही बसूं नकोस. पूर्ण ईश्वरनिष्ठ होऊन निर्लोभपणानें, काम साधलें तरी वाहवा न साधलें तरी वाहवा, अशा बुद्धीनें कर्तव्य करीत रहा. यशापयशासंबंधानें सारखेंच असणें यालाच ईश्वरनिष्ठा ह्मणतात. कारण अर्जुना, आसक्त बुद्धीनें केलेलें कर्मच फार वाईट. कर्म सोडून दिल्यानेंच फलसिद्धि होत नाहीं. कारण क्षणभरसुद्धां कोणी कर्म केल्यावांचून रहात नाहीं. हा जीव पराधीन असल्यामुळें स्वाभाविक गुणांच्या योगानें कर्में हीं करीतच असतो; ह्मणून जो इंद्रियांवर मनाचा दाब ठेवून फलावर आसक्ति न ठेवतां कर्मेंद्रियांनीं कर्में करीत रहातो तोच श्रेष्ठ. कर्म न करशील तर तुझी शरीरयात्रासुद्धां चालणार नाहीं. श्रेष्ठ लोक ज्याप्रमाणें वा-

गतात त्याप्रमाणें सामान्य लोक वागत असतात. ते जो कित्ता घालून देतात, तोच इतर लोक गिरवीत असतात. ह्या तिन्ही लोकांमध्यें मला कांहीं करावयाचें ह्मणून उरलें नाहीं. कांहीं मिळालें नाहीं असें नाहीं; किंवा कांहीं मिळवावयाचेंही नाहीं, तरी मी कर्म करीतच राहिलों आहें. कारण जर मी हुषारीनें कर्म करीत रहाणार नाहीं, तर अर्जुना, लोक माझ्या वाटेनेंच जाऊं लागतील. मी जर कर्म करणार नाहीं, तर ह्या सर्व प्रजा माझ्या सारख्याच वागूं लागल्यानें त्यांकडून कर्म न होतां त्या नाश पावतील; आणि सर्व गोलंकार करण्याला व ही प्रजा नाहींशी करण्याला मी कारणीभूत होईन. वेडेलोक कर्मामध्यें गढून ज्याप्रमाणें कर्म करीत असतात, त्याचप्रमाणें लोकांना सरळ वाट दाखविण्यासाठीं शहाण्यानें त्यांत गढून न राहतां कर्म करीत असावें. कर्मामध्यें गढलेल्या अज्ञानांच्या बुद्धीला भेद पाडून त्याची कर्मावरील श्रद्धा उडवूं नये. शहाण्यानें निष्कामबुद्धीनें कर्मामध्यें गढलें राहून सर्व कर्मे त्यांकडून करवून घ्यावीं. ज्ञानी असला तरी मनुष्य आपल्या प्रकृतीप्रमाणें वागत असतो. सर्व भूतमात्र आपापल्या प्रकृतीच्या वळणावर जात असतात. या ठिकाणीं एखादी गोष्ट करावयाची नाहीं ह्मणून त्याचा काय उपयोग होणार? इंद्रियासाठीं इंद्रियांचे लोभ, द्वेष इत्यादि विषय उत्पन्न झाले आहेत. त्यांच्या तावडींत मात्र जाऊं नये. कारण ते ह्याच्या आड येणारे आहेत. दुसऱ्याचा धर्म उत्तम रीतीनें पाळण्यापेक्षां आपला कसाबसा पाळला तरी तो कल्याणप्रद होतो. आपल्या धर्मानें वागत असतां मरण आलेलें पतकरलें. दुसऱ्याचा धर्म पतकरल्यानें परिणाम भयंकर होतो.

आतां अहंपणामुळें तूं जर माझें ऐकणार नाहींस, तर नाश पावशील. अहंकारामुळें मी युद्ध करणार नाहीं असें जें तुला वा-

टत आहे, ती तुझी खटपट व्यर्थ आहे. तुझी प्रकृती तें तुला करावयाला लावील. अर्जुना, तूं आपल्या स्वाभाविक कर्मानें बांधला गेला आहेस. मोहामुळें जें करावयाचें तुझ्या मनांत नाहीं, तें तूं निरुपायानें अवश्य करशील. अर्जुना, चाकावर चढलेल्या सर्व प्राणिमात्रांना मायेनें गरगरा फिरवीत ईश्वर सर्वांच्या हृदयांत राहिला आहे, त्यालाच अनन्यभावानें शरण जा. त्याच्या प्रसादानें तुला उत्तम समाधानवृत्ति मिळून चिरस्थायी स्थान मिळेल.'

याप्रमाणें श्रीकृष्णाचा उपदेश ऐकून मोह जाऊन अर्जुन बाण व गांडीव घेऊन फिरून तयार झाला आहेसें पाहून सोमक वगैरे त्याचे अनुयायी वीर हर्षभरित होऊन त्यांनीं आपापलें शंख फुंकले. नौबदी, शिंगें वगैरेंचा मोठा घोष झाला. सागरासारख्या तुफान झालेल्या त्या दोन सैन्यांमध्यें अगदीं चळवळ उडून गेली. अशा वेळीं महावीर युधिष्ठिर आपलें चिलखत व आयुध खालीं उतरून ठेवून रथांतून एकदम खालीं उतरला, व मुकाट्यानें हात जोडून शत्रुसैन्यांत भीष्मांकडे चालला. त्याला तसा निघालेला पाहून अर्जुनही झटकन् रथांतून खालीं उतरून आपल्या भावांसह श्रीकृष्णाला बरोबर घेऊन त्यामागून निघाला व ठळक ठळक राजेही हा काय करीत आहे ह्मणून टकमक त्याकडे पाहूं लागले.

इकडे कौरवसैन्यामध्यें धांदल उडून राहिली होती. पांडवसैन्य अगदीं स्तब्ध होतें. युधिष्ठिराला दुरून पाहून कौरवांचे सैनिक आपसांत बोलूं लागले कीं, ' हा राजा युधिष्ठिर आपल्या भावांना घेऊन उघडच भीष्मांना शरण येत आहे. अर्जुन, भीम, नकुल, सहदेव यांसारखे पाठीराखे असतांना हा कसा कचरला न कळे ? याचा जन्म खात्रीनें जगविख्यात क्षत्रिय कुळामध्यें झा-

ला नाहीं.' असें म्हणून त्यांनीं कौरवांची स्तुति करून आपल्या अंगवस्त्रांचे पदर उडविले.

इकडे युधिष्ठिर आपल्या भावांसह बाण, शक्ति इत्यादिक आयुधांनीं भरून राहिलेली कौरवसेना ओलांडून थेट भीष्मांकडे गेला व त्यांचे पाय घट्ट धरून त्यांना तो म्हणाला, 'तात, आपण कोणाला हार जाणारे नव्हे, आपल्याबरोबर आह्मी युद्ध करूं इच्छितों, तेव्हां आपला आशीर्वाद असावा.' भीष्म ह्मणाले, 'जर याप्रसंगीं तूं माझा आशीर्वाद घेण्याकरितां आला नसतास तर तुझा पराभव झाला असता. वत्सा, आतां मी संतुष्ट झालों आहें. युद्ध कर आणि जय मिळीव. माझ्यापासून काय पाहिजे असेल तें मांग. 'मनुष्य हा पैशाचा गुलाम आहे. पैसा कोणाचा गुलाम नाहीं,' ही जी ह्मण आहे ती खरी आहे. पैशानें मी कौरवांना बांधला गेलों आहें ह्मणून मी तुला सांगतों कीं, तुझ्या बाजूनें युद्ध करण्यावांचून वाटेल तें मागून घे.' यावर युधिष्ठिर ह्मणाला, 'तात, नेहमीं माझें हित मनांत धरून मला सल्ला देत जा. मग आपण कौरवांच्या बाजूनें खुशाल युद्ध करा.' भीष्म ह्मणाले, 'आतां मी तुझें साहाय्य काय करूं? तुझ्या शत्रूच्या बाजूनें युद्ध करणार हें तर ठरलेंच. तेव्हां तुझ्या मनांत जें काय असेल तें सांग.' युधिष्ठिर ह्मणाला, 'आपला तर कोणाच्या हातून पराभव होणें शक्य नाहीं, तेव्हां आपल्याला मी कसा जिंकणार? जर आमचें कल्याण आपल्या मनांत असेल तर या बाबतींत जो हिताचा सल्ला असेल तो द्या.' भीष्म ह्मणाले, 'मला रणांत जिंकण्याला कोणी समर्थ नाहीं आणि माझ्या मरणाची वेळही अजून आली नाहीं. तेव्हां आतां जा. फिरून गांठ घे.' हे भीष्मांचे शब्द मस्तकावर घेऊन, त्यांना फिरून नमस्कार करून, द्रोण, कृप, शल्य यांना नमस्कार करून त्यांचा

आशीर्वाद घेऊन युधिष्ठिर युद्धाला तयार झाला. मान्यांना मान देणाऱ्या पांडवांचा हा मोठेपणा पाहून राजांनीं त्यांची फार वाहवा केली. धृतराष्ट्राच्या राखेचा मुलगा युयुत्सु कौरवांना सोडून पांडवांच्या सैन्याला येऊन मिळाला.

युद्धाची गर्दी.

दुःशासन आपल्या भावांसह सर्व सैन्य घेऊन भीष्मांना पुढें करून पांडव सैन्यावर चालून गेला. इकडे पांडवही भीष्मांशीं सामना देण्याच्या इच्छेनें मोठ्या उत्साहानें भीमाला पुढें करून कौरवांवर चालून निघाले. राजांचे हत्ती, घोडे, रथ यांनीं खेचून गेलेल्या सैन्यांमधून वाऱ्यानें खवळून सोडलेल्या समुद्रांतून निघतो तसा घों शब्द निघत होता. याप्रमाणें भयंकर शब्द उठला असतां महाबाहु भीमानें मोठी गर्जना केली. विजेच्या कडाडण्यासारखा तो शब्द ऐकून सर्व सैन्य गर्भगळित झालें. ज्यामध्यें धनुष्याचा भयंकर टणत्कार व पंजांचा फडफड शब्द चालला होता, अशा ह्या पहिल्या चकमकीमध्यें दोन्ही बाजूंपैकीं कोणीही माघार घेतली नाहीं. अचूक नेम मारणाऱ्या द्रोणशिष्यांच्या हातून विलक्षण चलाखीनें बाण चटचट सुटत असतां धनुष्याचा घूं शब्द कांहीं थांबत नव्हता. व आकाशामधून फिरणाऱ्या लखलखीत ग्रहाप्रमाणें बाण चोहोंकडे फिरत होते. याप्रमाणें दोन्हीं सैन्यें एकमेकांशीं भिडत असतां सैन्यांच्या गर्दीनें उठलेल्या धुळीनें सूर्य झाकून गेला, व नेटानें लढणारे, घायाळ होऊन मागें जाणारे व फिरून युद्धाला तयार होऊन येणारे यांमध्यें आपला कोण व शत्रूकडील कोण हें कांहींच उमगून येत नव्हतें. सर्व कौरव मन निष्ठुर करून जिवाची पर्वा न धरतां पांडवांवर तुटून पडले. तेवेळीं शंतनुपुत्र भीष्म कालदंडासारखे उग्र धनुष्य घेऊ-

न अर्जुनावर चालून गेले. अर्जुनानेंही लोकविख्यात गांडीव हातांत घेऊन भीष्मांवर चाल केली. महाधनुर्धारी सात्यकि कृतवर्म्यावर चालून गेला. महाबलशाली वीरांचीं अंगें बाणांनीं भरून निघालीं असतां फुलून निघालेल्या चित्रविचित्रित पळसाच्या झाडाप्रमाणें दिसूं लागलीं. अभिमन्यु महाधनुर्धारी बृहद्बलाशीं युद्ध करीत होता. मानी, पांडवांशीं वैर बांधलेल्या महारथी दुर्योधनाबरोबर भीमसेन युद्ध करीत असतां ते दोन कुरुपुंगव परस्परांना बाणांनीं झाकून काढीत होते. दुःशासन नकुलावर चालून गेला. दुर्धर्षानें बाणांनीं नकुलाचे घोडे कापून काढून निशाण खालीं पाडलें. दुर्मुख बलशाली सहदेवावर चालून गेला. धृष्टद्युम्न द्रोणांवर चालून जाऊन त्या दोन खवळलेल्या योध्यांमध्यें घोर संग्राम चालला होता. त्या रणांमध्यें शंख सोमदत्तीवर चालून गेला. या दोघांमधील चकमक फारच निकराची झाली. ज्याच्या धैर्याचा कधीं अंत कळावयाचा नाहीं अशा नारसिंह स्वरूपी चेदीराज धृष्टकेतूनें बाल्हीकावर चाल केली. अलंबुष राक्षसावर अचाट कृत्य करणारा घटोत्कच तुटून पडला. शिखंडि अश्वत्थाम्यावर चालून गेला. शिखंडीला आलेला पाहून अश्वत्थाम्यानें तीक्ष्ण नाराच बाणानें त्याला पुष्कळ जखमा करून घाबरवून सोडिलें. शिखंडीनेंही चांगल्या पाजळलेल्या तीक्ष्ण बाणांनीं अश्वत्थाम्याला जर्जर केलें. सेनानी विराट भगदत्तावर चालून गेला. कैकयराज बृहद्रथावर कृप चालून गेले. या दोन तापट रथ्यांनीं एकमेकांचे घोडे व धनुष्यें कापून काढल्यावर ते एकमेकांशीं तरवारीनें लढण्याला तयार होऊन उभे राहिले. त्यांचें तें युद्ध फारच भयंकर झालें. द्रुपद हा सैंधवराज जरासंधावर चालून गेला. त्यांच्यामध्यें तर फारच भयंकर चकमक उडाली. मोठ्या सिंहानें ज्याप्रमाणें हत्तीवर चालून जावें, त्याप्रमाणें पराक्रमी शकुनीनें विक्रमशाली प्रति-

विंध्यावर चाल केली. याप्रमाणें दोन्ही पक्षांचे वीर प्रथम आपल्या तोडीच्या वीरांशीं भिडले असतां पुढें एकच गर्दी उडून ते आपापल्या जागा सोडून वाटेल तसें युद्ध करूं लागले. मुलगा बापाला ओळखीना. बाप आपल्या पोटच्या पोराला ओळखीना. भाऊ भावाला, मामा भाच्याला, भाचा मामाला, मित्र मित्राला, कोणी कोणाला न ओळखतां पिसाळल्यासारखे ते एकमेकांशीं लढत होते. कांहीं आपल्या रथानिशीं रथदळावर तुटून पडून जुवांनीं जूं, इसाडांनीं इसाड, दांड्यांनीं दांडे मोडून पाडीत होते. कांहीं टोळीनें टोळीवर तुटून पडत होते. कांहीं रथ रथांवर आपटून त्यांची गतचि बंद पडत होती. ज्यांचीं गंडस्थळें फुटलीं आहेत असे धिप्पाड हत्ती एकमेकांवर आदळून खवळून जाऊन आपल्या दांतांनीं एकमेकांना अनेक प्रकारें फाडून काढीत होते. हातांमध्यें गदा, मुसळ, गोफण, गुरगुंज, लखलखीत धारेच्या तरवारी वगैरे घेऊन एकमेकांना मारण्याचे उद्देशानें योद्धे चवताळून एकमेकांवर धावत होते. एकमेकांवर घाव करणाऱ्या वीरांच्या रक्तानें भरलेल्या तरवारी चमकत होत्या. वीरांनीं शत्रूंच्या मर्मस्थळावर तोलून फेकलेल्या तरवारींचा खणखण शब्द निघत होता. गदा व मुसळ यांनीं घायाळ झालेल्या, तरवारींनीं छाटून निघालेल्या, हत्तींच्या दांतांनीं फाडून काढलेल्या तसेंच हत्तींनीं चिरडून टाकलेल्या लोकांचा ते एकमेकांना हाका मारीत असतां हृदयद्रावक शब्द निघत होता. चमर हरणाच्या शेपटीचे तुरे ज्यांना लाविले होते अशा हंसासारख्या वेगवान् घोड्यावर बसून स्वार एकमेकांवर तुटून पडत होते. सोन्यानें सुशोभित अशा त्यांनीं सोडलेल्या लखलखीत विटा मोठमोठ्या सापांप्रमाणें जोरानें जाऊन शत्रूवर पडत होत्या. कांहीं स्वार आपल्या वेगवान् घोड्यांवरूनच मोठमोठ्या रथांवरून उड्या घेऊन रथ्यांना कापून काढीत

होते. त्याचप्रमाणें बाणांच्या माऱ्यामध्यें आलेल्या अनेक स्वारांना रथी धारेच्या भल्ल बाणांनीं मारून पाडीत होते. सोन्यानें शृंगारलेले नवमेघांसारखे कांहीं मस्त हत्ती घोड्यांना खालीं पाडून पायांनीं तुडवून काढीत होते. कांहीं हत्ती आपल्या दांतांनीं घोड्यांना त्यांच्या स्वारांनिशीं वर उचलून फेकून देऊन पुष्कळ रथांचा त्यावरील निशाणांसकट चुराडा उडवीत फिरत होते. स्वार व गजयोद्धे यांनीं सोडलेले तीक्ष्ण बाण हत्तींच्या गंडस्थळांवर, अंगांवर व पाठीवर सापासारखे जाऊन पडत होते. कोणी शक्तींनीं फाडले जाऊन, कोणी फरशांनीं छिन्नभिन्न होऊन, कोणी हत्तींखालीं चिरडून जाऊन, कोणी घोड्यांनीं घायाळ होऊन, कोणी रथाच्या चाकाखालीं सांपडून, कोणी मुलांना, कोणी बापांना, कोणी भावांना, कोणी बांधवांना, कोणी मामांना, कोणी भाचांना आणि कोणी शत्रूंना देखील हाका मारून एकच कल्होळ उडवून देत होते. पुष्कळांचीं आंतडीं बाहेर पडून, कांहींच्या मांड्या मोडून, कांहींचे हात तुटून, कांहींच्या बरगड्या छाटून निघून, तान्हेनें पीडित होऊन कसें तरी जगावें म्हणून ते धडपड करीत होते. कांहीं दुबळे तान्हेनें व्याकुळ होऊन जमिनीवर पडून पाणी मागत होते. कांहीं रागानें दांतओंठ चावून व भिवया चढवून एकमेकांकडे पहात होते. कांहीं मोठे शक्तिमान् व हिमतीचे होते तरी बाणांनीं अगदीं भरून निघाल्यामुळें जखमांनीं घायाळ होऊन बेशुद्ध होऊन पडले होते. निवडक निवडक वीरांचा असा भयंकर संहार चालला असतां सैन्यामध्यें एकच हाहाःकार उडून राहिला होता.

कृष्णप्रतिज्ञाभंग.

याप्रमाणें दोन दिवस घनघोर युद्ध होऊन त्यांत विराटाचा

मुलगा उत्तर व कौरवांकडील भानुमान मरून दोन्हीं दळांची बरीच नासाडी उडाली. तिसरे दिवशीं रथदळ व हत्तीदळ एकमेकांना भिडून भयंकर काटाकाटी सुरू झाली असतां एकच मोठा शब्द रणांतून उठून राहिला. त्यावेळीं अतिरथी अर्जुनानें युगांतकालीन काळाप्रमाणें बाणांनीं रथदळाचा फडशा पाडण्यास सुरवात केली असतां कौरवही अगदीं कसून त्याच्याशीं लढत होते. झगझगीत यशाची हाव धरून मरणावांचून परतावयाचें नाहीं अशा दृढ निश्चयानें पांडवसैन्याशीं भिडून त्याला ते ठिकठिकाणीं फोडीत होते. व्यूह फुटून पळणाऱ्या व परतणाऱ्या कौरवपांडवसैन्यांमध्यें कांहींच ओळखूं येत नव्हतें. पृथ्वीवरून उठलेल्या धुळीनें सूर्याला झाकून काढिलें. लोकांना दिशा, उपदिशा कांहींच ओळखूं येईनात. केवळ अनुमानानें, खुणांनीं, नांव किंवा गोत्र ऐकून लोक एकमेकांना मारीत होते. अशा वेळीं आपल्या सैन्याचा बराच फडशा पडलेला पाहून दुर्योधन भीष्मांना लागून बोलला. त्यानें खवळून जाऊन रागानें डोळे लाल करून भीष्म त्याला म्हणाले, ' दुर्योधना, खरा व तुझ्या हिताचा सल्ला मीं तुला पुष्कळ वेळा दिला. प्रत्यक्ष इंद्रासह देव आले तरी त्यांसही पांडवांना जिंकतां येणार नाहीं. आतां माझ्या ह्मातान्याच्या हातून जेवढें कांहीं होणें शक्य आहे तेवढें आज मी करतों. ' असें ह्मणून मोठें सैन्य पाठीवर घेऊन पांडवांच्या सैन्यावर ते चालून गेले. दोन्ही पक्षांचें अंगावर कांटा उभा करण्यासारखें युद्ध सुरू झालें. 'थांब, उभा रहा, हा उभा आहें, यावर बाण मार, मागें फीर, दे घाव,' असे शब्द जिकडे तिकडे ऐकूं येत होते. पर्वतावरून पडलेल्या धोंड्याप्रमाणें सैन्याचीं चिलखतें, किरीट, बाहुटे खालीं पडून त्यांचे शब्द उठत होते. कापून टाकलेलीं शेंकडों हजारों मुंडकीं जमिनीवर गडबडा लोळत होतीं. कांहीं नरवीर तर मुंडकीं उडून

गेलीं असतांही हातामध्यें धनुष्य व हत्यारें तशींच सज्ज धरून उभे दिसत होते. मोठमोठ्या हत्तींचीं धडें हेच जिच्यांतील भयंकर खडक आहेत अशी उत्तम उत्तम हत्ती, घोडे व नरवीर यापासून निघून परलोकसमुद्राला जाऊन मिळणारी, रक्तमांसांनीं राड झालेलीं, गिधाडें व कोल्हीं यांना आनंद देणारी, मोठ्या जोरानें वहाणारी, रक्ताची नदी वाहूं लागली. मारून पाडलेल्या योध्यांच्या योगानें त्या ठिकाणीं रथांना वाट मुळींच सांपडत नव्हती. भीष्म विषारी सापाप्रमाणें लखलखीत बाण सर्व दिशांना एकासारखे सोडीत. नेम धरधरून पांडवांच्या रथ्यांना मारीत जणूं काय नर्तनच चालविलें आहे अशा रीतीनें रथांमधून आलातचक्राप्रमाणें ते आपलें हस्तलाघव दाखवीत फिरत असतां त्यांवर पांडवांकडच्या लोकांची कांहीं नजर ठरत नव्हती. मात्र त्यांचे बाण पांडवसैन्याचा फडशा पाडतांना दिसत होते. प्रतिपक्षाच्या एवढ्या अफाट सैन्यामध्यें त्यांच्या हत्तींवर व घोड्यांवर मारलेल्या ह्यांच्या बाणांपैकीं एकही फुकट जात नव्हता. कृष्णसारथी अर्जुन अगदीं कटून युद्ध करीत होता, तरी भीष्मांनीं अगदीं खवळून जाऊन हजारों बाण सोडून त्याच्या रथाची वाट अगदीं बंद करून टाकिली व वरचेवर मोठ्यानें हासून बाण सोडीत त्यांनीं अर्जुनाला घाबरवून सोडून श्रीकृष्णाला तोंडांत बोटें घालावयाला लाविलें. तो भीष्मांचा पराक्रम, तो अर्जुनाचा पुळपुळीतपणा, तो भीष्मांनीं मध्यान्हकाळच्या सूर्याप्रमाणें दोन्हीं सैन्यांमध्यें उभें राहून चालविलेला पांडवांच्या ठळक ठळक सैनिकांचा फडशा हें सर्व पाहून, आतां युधिष्ठिराचें सैन्य कांहीं बाकी रहात नाहीं असें श्रीकृष्णाला वाटलें. याप्रमाणें कृष्णार्जुनांना भीष्मांनीं आपल्या चतुरंग सैन्यानिशीं गराडलेलें पाहून त्या सैन्यावर एकदम चालून येऊन सात्यकि अर्जुनाच्या कुमकीला आला.

याप्रमाणें एकंदर स्थिति होऊन ठळक ठळक राजे सुद्धां पळत असतां व सर्व कौरव आपल्यावर चालून येत असतां सात्यकीला त्यामध्यें घुसून आपल्याकडे वाट काढीत येतांना पाहून श्रीकृष्ण त्याची वाहवा करून ह्मणाला, ' जे पळताहेत त्यांना पळूं दे; एवढेंच नव्हे तर जे उभे आहेत, त्यांना सुद्धां वाटेल तर जाऊं दे. भीष्मांना तसेंच द्रोणांना आज मी रथांतून खालीं आणतों. मी खवळलों असतां कौरवांकडचा कोणीही रथी माझ्या तावडींतून सुटणार नाहीं. ह्मणून आज हातामध्यें हें चाक घेऊन मी महाव्रत भीष्मांना ठार करतों, व धर्मराजाला आज राज्य मिळवून देऊन सुखी होतों. ' असें ह्मणून वसुदेवपुत्र भगवान् श्रीकृष्णानें सूर्याप्रमाणें लखलखीत सुनाभ नांवाचें आपलें चक्र हातानें उचलून लगाम सोडून रथाखालीं उडी घेतली, व मदानें डोळे भरून जाऊन पायांनीं भूमि दणाणून सोडीत मोठ्या ताठ्यानें मस्त हत्तीवर धावून जाणाऱ्या सिंहाप्रमाणें-तो झपाट्यानें भीष्मांवर चालून गेला. तेव्हां हवेमध्यें उडणाऱ्या पिंवळ्या पीतांबराच्या योगानें ज्यामध्यें वीज लकाकत आहे अशा नव मेघाप्रमाणें तो दिसत होता. याप्रमाणें रागानें चक्र घेऊन त्याला मोठ्यानें गरजतांना पाहून कौरवांचा फडशा पडणार असें वाटून जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. याप्रमाणें त्याला हातामध्यें चक्र घेऊन येतांना पाहून भीष्म आपल्या प्रचंड धनुष्याचा टणत्कार करून न गांगरतां न भितां त्या अतुल पराक्रमी कृष्णाला म्हणाले, 'हे जगाच्या आधारभूत देवेशा, चल ये; हे चक्रपाणे तुला नमस्कार असो; सर्वांना आश्रय देणाऱ्या परमेश्वरा, मला एकदम रथाखालीं आण. आज तूं मला मारल्यानें माझें इहपरलोकीं कल्याणच होणार आहे. तूं आज मजवर चालून आल्यानें माझा तिन्ही लोकांमध्यें बहुमान होणार आहे. ' तेव्हां अर्जुनानें लगबगीनें र-

थाखालीं उडी घेऊन आपल्या भक्कम लांब हातांनीं यदुश्रेष्ठ भगवानाचा हात धरिला. तेव्हां रागानें खवळून जाऊन वावटळीनें ज्याप्रमाणें एखाद्या मोठ्या झाडाला आपल्याबरोबर ओढून न्यावें, त्याप्रमाणें श्रीकृष्ण त्याला आपल्याबरोबर फरफटत ओढून घेऊन चालला. परंतु अर्जुनानें जोरानें पाय रेलून मोठ्या कष्टानें त्याला आवरून धरिलें. नंतर सप्रेम त्याला नमस्कार करून अर्जुन म्हणाला, 'कृष्णा, राग आवर, पांडवांना गति तूंच आहेस. प्रतिज्ञा केलेलें काम मी शेवटास नेल्यावांचून ठेवणार नाहीं. मी खात्रीनें तुझ्या आज्ञेनें सर्व कौरवांचा शेवट लावीन.' याप्रमाणें ती त्याची प्रतिज्ञा मोठ्या संतुष्ट मनानें ऐकून अर्जुनाचें प्रिय करण्यामध्यें दक्ष असा भगवान् हातांतील चक्रानिशीं फिरून रथावर चढला, आणि फिरून हातामध्यें लगाम धरून त्यानें आपला पांचजन्य शंख फुंकून त्याच्या शब्दानें सर्व दिशा दणाणून सोडिल्या.

दुर्योधनाची पिरपिर.

याप्रमाणें आठ दिवस युद्ध होऊन त्यांत सायंतती, इरावान वगैरे ठळक ठळक वीरांचा फडशा पडला तरी पांडव मरेनातसें पाहून दुर्योधन कर्णाशीं विचार करूं लागला. तो म्हणाला, ' भीष्म, द्रोण, कृप, शल्य व सोमदत्ती हे पांडवांना हात लावीत नाहींत, व ते निर्धास्तपणें माझ्या सेनेची खच्ची करीत आहेत, व सैन्य कमी होत जाऊन शस्त्रांचीही तूट पडत चालली आहे. पांडवांना रणामध्यें मी कसा जिंकीन याची मला शंका पडली आहे. ' कर्ण म्हणाला, ' भरतश्रेष्ठा, वाईट वाटून घेऊं नकोस. मी सर्व तुझ्या मनाप्रमाणें करून टाकीन. ह्या महारणामधून शस्त्र खालीं ठेवून भीष्मांना आपलें अंग काढून घेऊं दे; ह्मणजे त्यांच्या देखत मी ह्या सर्व जमलेल्या पांडवसोमकाचा फडशा पाडतों.

भीष्म पांडवांवर नेहमीं दया करतात; शिवाय ह्या महारथ्यांना जिंकण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्यही नाहीं; तेव्हां तूं त्यांच्या शिबिराकडे जाऊन त्यांच्याकडूनच हत्यार खालीं ठेवीव म्हणजे मी पुढील सर्व काम उरकून टाकतों.' हें कर्णाचें भाषण ऐकून दुर्योधन भीष्मांकडे जाऊन त्यांना अभिवादन करून डोळ्यांत पाणी आणून गद्गदवाणीनें त्यांना म्हणाला, 'तात, आपला आश्रय करून आह्मी देवांनासुद्धां जिंकण्याची उमेद धरतों, मग पांडवांची कांहीं विशेष गोष्ट नाहीं; तेव्हां आतां आपण माझ्यावर कृपा करून पांडवांना तेवढें मारा म्हणजे बाकीच्यांचा मी समाचार घेतों. दयेमुळें किंवा माझ्या कमनशीबामुळें आपण पांडवांना राखीत असाल तर त्या कर्णाला परवानगी द्या म्हणजे तो पांडवांचा समाचार घेईल.' याप्रमाणें दुर्योधनानें त्यांना टोचलें असतां फार वाईट वाटून दुःखानें व रागानें उचंबळून बराच वेळ विचार केल्यावर डोळे वटारून भीष्म दुर्योधनाला म्हणाले, 'दुर्योधना, तुझ्या मनाप्रमाणें करण्यासाठीं यथानुशक्ति झटत असून या प्राणाची रणामध्यें आहुति द्यावयाला तयार झालों असतां अशा वाक्शल्यानें तूं मला कां टोचतोस? अर्जुनानें इंद्रालासुद्धां जिंकून खांडववनांत अग्नीला तृप्त केलें. तुला गंधर्वांनीं बलात्कारानें पकडून नेलें असतां तुझे भाऊ व कर्ण यांनीं पळ काढिला; पण तुला त्यांपासून अर्जुनानें सोडविलें. विराटनगरामध्यें त्या एकट्या बहाद्दरानें आह्मा सर्वांना आणि त्याचप्रमाणें मीच कायतो पुरुष असें वाटणाऱ्या त्या कर्णाला जिंकून आमचे कपडे काढून घेऊन उत्तराला दिले. त्याचप्रमाणें इंद्राला देखील अजिंक्य अशा निवातकवचांना यानें जिंकिलें; हीं उदाहरणें त्याच्या पराक्रमाची ओळख पटवून द्यावयाला पुरीं आहेत. सर्व सृष्टीला राखणारा व तिचा संहार करणारा अनंतशक्ति परमात्मा ज्याचा

पाठीराखा आहे, त्या पराक्रमी अर्जुनाला रणांत जिंकणें कोणाच्याही हातून होणार नाहीं. नारदप्रभृति मोठमोठ्या ऋषींनीं तुझी पुष्कळ कानउघाडणी केली; परंतु मूर्खपणानें काय बोलावें, काय न बोलावें हें कांहीं तुला कळत नाहीं. आतां माझ्या संबंधानें म्हणशील तर एका शिखंडीखेरीज करून बाकी सर्व पांचाल व सोमकांना मी मारीन तरी किंवा त्यांच्या हातून मरून स्वर्गाला तरी जाईन. शिखंडि मात्र पूर्वीं स्त्री असून पुढें वरदानानें पुरुष झाला असल्यानें हा प्राण गेला तरी त्याला मी मारणार नाहीं. तेव्हां आतां तूं खुशाल जाऊन नीज. ' हें ऐकून त्यांना अभिवादन करून दुर्योधन आपल्या शिबिराकडे परत आला. दुर्योधनाचें रडगाणें ऐकून भीष्मांना परवशतेचें फारच वाईट वाटलें. त्यानीं नवव्या दिवशीं रणांत फारच पराक्रम गाजविला.

भीष्मांचा युधिष्ठिराला सल्ला.

रणामधील भीष्मांचें त्या दिवशींचें अचाट कृत्य पाहून पांडवांना चैन पडेना. तेव्हां धर्मराज श्रीकृष्णाला ह्मणाला, ‘ कृष्णा, पहा. अचाट पराक्रमी भीष्म कमलवनाला तुडवून टाकणाऱ्या हत्तीप्रमाणें माझ्या सैन्याचा चेंदा उडवीत आहेत. या महात्म्यांवर आमची नुसती नजरसुद्धां ठरत नाहीं. पेटलेल्या अग्नीप्रमाणें ते माझें सर्व सैन्य चाटून घेत आहेत. तेव्हां आतां यांच्याशीं तोंड देण्यापेक्षां वनाला जावें हेंच मला बरें दिसतें. मला हें युद्ध नको. माझे भाऊसुद्धां बाणांनीं अगदीं जर्जर झाले आहेत. माझ्यासाठीं बंधुप्रेमानें राज्याला मुकून, मजबरोबर वनाला येऊन त्यांनीं क्लेश सोसले; तेव्हां आतां ‘दुर्योधनाकरितां मी लढेन, परंतु तुला सल्ला देईन,’ असें भीष्मांनीं मला सांगितलें आहे; तेव्हां त्यांच्या मरणाचा उपाय त्यांनाच विचारण्यासाठीं आपण सर्व

मिळून त्यांजकडे जाऊं; ते सांगतील त्याप्रमाणें मी करीन.' हा विचार कृष्णालाही पसंत पडून सर्व पांडव चिलखतें व हत्यारें काढून ठेवून भीष्मांच्या शिबिराकडे गेले, व आंत शिरून पायांवर डोकें ठेवून ते त्यांना शरण गेले; तेव्हां त्या सर्वांचें सप्रेम स्वागत करून 'तुमच्या मनाजोगें मी काय करूं,' ह्मणून त्यांनीं त्यांना विचारिलें. तेव्हा धर्मराज प्रेमळ व दीन वाणीनें त्यांना ह्मणाला, 'तात, आपल्याला सर्व कांहीं कळत आहे. मला जय कसा मिळणार? मला राज्य कसें मिळणार? आणि प्रजेची ही कत्तल बंद कशी पडणार? आपण कशानें मरणार हें आपलें आपण आह्मांला सांगा. रणांत आपल्यापुढें आमचा टिकाव कसा लागणार?' भीष्म ह्मणाले, 'मी जिवंत असेतोंपर्यंत तुला जय खात्रीनें मिळणार नाहीं. आतां मी तुह्मांला परवानगी देतों. माझ्यावर खुशाल प्रहार करा. तुह्मीं मला बरोबर ओळखिलें एवढें बस्स आहे. मी मेल्यावर सर्व मेल्यासारखें होणार आहें. जोंपर्यंत हातांत शस्त्र घेऊन रणामध्यें मी सज्ज आहे, तोंपर्यंत मला जिंकण्याची कोणाची छाती नाहीं. तेव्हां मी शस्त्र खालीं ठेवीन त्यावेळीं महारथ्यांनीं मला मारावें. ज्यानें हत्यार खालीं ठेविलें आहे, जो पडला आहे, ज्याचें कवच किंवा ध्वज पडलें आहे, जो पळतो आहे, जो भ्याला आहे, जो विकलेंद्रिय आहे, ज्याला एकुलता एक मुलगा आहे, जो नांवजलेला नाहीं, जी स्त्री आहे किंवा ज्याला स्त्रीचें नांव आहे, इतक्यांबरोबर मला युद्ध आवडत नाहीं. अमंगळ ध्वज पुढें पाहिल्यावर मी युद्ध करणार नाहीं असा मीं पूर्वींच संकल्प करून ठेविला आहे. हा जो लढाईला आतुर असून नेहमीं फत्ते मिळविणारा शूर महारथी शिखंडि, हा पूर्वी स्त्री असून पुढें पुरुष झाला आहे हें सर्व तुम्हालाही ठाऊक आहेच. त्याचा तो अमंगळ ध्वज पुढें पाहून

हातांत बाण घेऊन त्याला मारण्याला माझें मन कधींही घेणार नाहीं. रणामध्यें महाभाग श्रीकृष्ण किंवा धनंजय यांवांचून दुसरा कोणी मला मारण्याला समर्थ नाहीं; म्हणून अर्जुनाला कवच वगैरे चढवून व शिखंडीला पुढें करून माझ्यावर मारा करूं दे, ह्मणजे मी पडल्यावर तुह्मी सर्व कौरवांना मारण्याला समर्थ होऊन तुम्हाला खात्रीनें जय मिळेल. ' याप्रमाणें भीष्मांचा विचार घेऊन त्यांना अभिवादन करून पांडव आपल्या शिबिराला गेले; तेव्हां अर्जुन कष्टी होऊन लाज वाटून श्रीकृष्णाला म्हणाला, ' कौरवांमध्यें थोर अशा गुरूंशीं मी युद्ध कसें करावें ? कृष्णा, लहानपणीं खेळतांना धुळीच्या अंगांनीं त्याच्या मांडीवर बसून यांचें अंग मीं मळविलें आहे ! या आजोबांना मी 'बाबा' असें म्हटलें असतां ' मी तुझा बाबा नव्हे, तुझ्या बाबाचा बाबा, ' असें जे मला ह्मणत; त्यांना मीं कसें मारावें ? माझ्या सैन्याचा त्यांना खुशाल फडशा पाडूं दे. मला जय मिळो किंवा मी मरो, मी कांहीं त्यांच्याशीं युद्ध करणार नाहीं. कृष्णा, तुझा काय विचार आहे ? ' श्रीकृष्ण म्हणाला, ' अर्जुना, पूर्वीं मी भीष्मांना मारीन अशी प्रतिज्ञा करून क्षात्रधर्माला जागत असून आज त्यांना मारणार नाहीं म्हणतोस हें कसें ? युद्धांत यांना मारल्यावांचून तुला जय कधीं येणार नाहीं. दैवानें पूर्वीं ठरवून ठेवलेला नियमानियमच असा आहे व तें तसें झालेंच पाहिजे. आ पसरून तयार असलेल्या काळासारख्या या भीष्मांना तुझ्यावांचून दुसरा कोणी मग तो प्रत्यक्ष इंद्र असला तरी जिंकण्याला समर्थ नाहीं; म्हणून माझें सांगणें ऐकून स्वस्थपणें तूं भीष्मांना मार. पूर्वीं बृहस्पतींनीं इंद्राला सांगितलें आहे कीं, आपल्यावर हत्यार उपसून आपल्याला मारण्याच्या हेतूनें येणारा वडील, वृद्ध व गुणवान् असला तरी त्याला मारावें. शिखंडि हा भीष्मांच्या मरणा-

ला कारण आहे. कारण याला पाहिल्याबरोबर ते मागें फिरतील.

भीष्मपतन.

दहाव्या दिवशीं सूर्योदय झाल्यावर शत्रूचा फडशा पाडणारा उत्तम व्यूह रचून ढोलकीं, मृदंग, नगारे यांच्या गजरामध्यें पांढरे शुभ्र शंख फुंकीत शिखंडीला पुढें करून पांडव बाहेर पडले. शिखंडि सर्व सैन्याच्या अघाडीला असून भीमसेन व अर्जुन त्याच्या रथाच्या चाकांचें रक्षण करीत होते. त्याच्यामागें द्रौपदीचे मुलगे व अभिमन्यु असून चेकितान व सात्यकि त्यांचें रक्षण करीत होते. धृष्टद्युम्न पांचालांसह बरोबर चालला होता. युधिष्ठिर व नकुलसहदेव सिंहनाद करीत त्यांचे मागून चालले असून त्यांच्यामागून विराट, द्रुपद, पांच कैकेय बंधू व धृष्टकेतु पांडवसैन्याची पिछाडी राखीत होते. याप्रमाणें सैन्याची रचना करून जिवाची पर्वा न धरतां ते कौरवांवर चालून निघाले. तसेंच महारथ भीष्मांना पुढें करून कौरवांनीं पांडवांवर चाल केली. कोणाला हार न जाणाऱ्या या भीष्मांचें धृतराष्ट्राचे मुलगे रक्षण करीत होते त्याचप्रमाणें द्रोण, अश्वत्थामा, भगदत्त, कृप वगैरे मंडळी कौरवसैन्याची पिछाडी राखीत होते. भीष्मांनीं आपल्या सैन्याची पैशाच्य व्यूहरचना केली, व दोन्ही दळांचें यमपुरीला भर घालणारें भयंकर युद्ध सुरू झालें. अर्जुनप्रभृति पांडव शिखंडीला पुढें करून भीष्मांवर चालून गेले असतां भीमानें कौरवसेनेवर पुष्कळ बाण सोडून त्यांना रक्तस्नान घालून परलोकाला पाठविण्याचा सपाटा चालविला, नकुलसहदेव व सात्यकि हे कौरवसैन्याला अगदीं जर्जर करून सोडीत असतां त्यांच्या त्या शब्दानें घाबरलेलें कौरवसैन्य सिंहाच्या शब्दानें घाबरलेल्या पशूंप्रमाणें भिऊन पळूं लागलें. तें पाहून दुर्योधनानें घाबरून आप-

त्या सैन्यास धीर देऊन परतविण्याविषयीं भीष्मांची प्रार्थना केली. तेव्हां दुर्योधनाचें समाधान करीत भीष्म म्हणाले, ' दुर्योधना, ऐक. पूर्वीं मीं तुझ्याशीं प्रतिज्ञा केली आहे कीं दररोज दहा हजार क्षत्रिय वीरांना मारून मी रणांतून परतेन. त्याप्रमाणें आजपर्यंत मीं केलें आहे. आज देखील मी अचाट कृत्य करून दाखवीन. आज मी एक मरून तरी पडेन किंवा पांडवांना मारीन. आज मी सैन्याच्या अघाडीला मरून पडतों व स्वामिपिंडाच्या ऋणांतून मोकळा होतों. ' असें ह्मणून बाणांचा भडिमार करीत ते पांडवसैन्यावर तुटून पडले, व त्यांनीं दहाव्या दिवशीं आपली पूर्ण शक्ति दाखवून एक लाख लोक मारिले. याप्रमाणें भीष्मांचा पराक्रम पाहून अर्जुन ' न भितां भीष्मावर चालून जा, मी यांना मारून पाडतों, ' असें शिखंडीला म्हणाला. तेव्हां शिखंडि भीष्मांवर चालून गेला, व सर्व पांडववीर मागोमाग भीष्मांवर तुटून पडले. तें पाहून द्रोण आपल्या प्रतापशाली अश्वत्थामाला म्हणाले, ' वत्सा, आजचा दिवस असा आहे कीं, आज भीष्मांना मारण्यासाठीं महाबलशाली अर्जुन आपली पराकाष्ठा करणार भीष्मार्जुन एकमेकांशीं भिडणार, हा विचार मनांत येऊन माझ्या अंगावर कांटा उभा रहात आहे, व माझें मन उद्विग्न झालें आहे. त्या पापी शिखंडीला पुढें करून अर्जुन भीष्मांबरोबर युद्ध करीत आहे. या शिखंडीचा ध्वज अमंगळ समजून भीष्म त्यावर प्रहार करणार नाहींत. अर्जुन बुद्धिमान्, बलशाली, शूर, अस्त्रनिपुण, चलाख, दूरचा नेम मारणारा, वेळप्रसंग ओळखणारा व इंद्रादि देवांना देखील अजिंक्य असून युद्धांत श्रम ह्मणून त्याला मुळीं ठाऊक नाहीं. त्याला भैरवास्त्र मिळालें असून तो रणांत नेहमीं विजयी असतो. तेव्हां आजच्या ह्या प्रसंगांत भयंकर कत्तल उडणार आहे. झटपट जा व स्वर्ग डोळ्यांपुढें ठेवून कीर्ति मिळ-

विण्यासाठीं त्याला अटकाव कर. दुसऱ्यावर पोट भरणाऱ्यांना जीव जतन करण्याची ही वेळ नव्हे. आपला लाडका मुलगा चिरकाळ जगावा असें कोणाला वाटणार नाहीं? परंतु क्षात्रधर्म मनांत आणून मी तुला हें सांगत आहें.'

इकडे शिखंडीनें अर्जुनाच्या आश्रयानें भीष्मांवर दहा बाण सोडून दहांनीं त्यांचा सारथि मारून पाडला, व एकानें त्यांचा ध्वज मोडून पाडला. पुढें भीष्मांनीं दुसरें मोठें बळकिट धनुष्य घेतलें असतां तेंही अर्जुनानें तीक्ष्ण बाणानें मोडून टाकलें. याप्रमाणें ते जसजसें धनुष्य हातीं घेत तसतसें अर्जुन तें मोडून पाडी. याप्रमाणें धनुष्य मोडून कांहीं चालेनासें झालेलें पाहून रागानें दांतओठ चावीत भीष्मांनीं आवेशानें पर्वताला सुद्धां फोडून काढणारी शक्ति उचलून घेऊन ती अर्जुनावर सोडिली. त्या घोर शक्तीला आपल्याकडे येतांना पाहून अर्जुनानें पांच तीक्ष्ण भल्लबाण सोडून तिचे पांच तुकडे करून ढगांतून खालीं पडणाऱ्या विजेप्रमाणें तिला खालीं पाडलें. तें पाहून भीष्मांनीं मनांत विचार केला, 'हा बलशाली श्रीकृष्ण या पांडवांचा पाठीराखा नसता तर या सर्व पांडवांना मी एका धनुष्यानें मारण्याला समर्थ होतों. परंतु श्रीकृष्णसाहाय्यानें पांडव अवध्य झाले आहेत, व माझ्या पुढें असणारा शिखंडि स्त्री आहे. या दोन कारणांनीं मीं आतां पांडवांशीं युद्ध करीत नाहीं. कालीशीं तातांचें लग्न लागलें, तेवेळीं त्यांनीं संतुष्ट होऊन 'तुझ्या मनांत येईल त्या वेळेला तूं मरशील व रणामध्यें तुला मरण येणार नाहीं,' असा मला वर दिला आहे. तेव्हां माझ्या मरण्याची वेळ आली असें मला वाटतें.' असा ते विचार करताहेत तोंच मंगलकारक, अनुकूल तुषारांनीं युक्त असा सुगंध वारा सुटला. आकाशांत दुंदुभि मोठ्यानें वाजूं लागून भीष्मांवर पुष्पवृष्टि झाली. सर्व लो-

कांना पूज्य असे भीष्म रथांतून खालीं येणार, या विचारानें जि-कडे तिकडे चळवळ उडून गेली. भीष्म यापुढें अर्जुनावर चा-लून गेले नाहींत. शिखंडीनें तीक्ष्ण बाणांनीं त्यांचें सर्व चिलखत फोडून काढून त्यांच्या छातीवर नऊ बाण मारिले, तरी धरणी-कंपाच्या वेळीं सुद्धां न डगणाऱ्या पर्वताप्रमाणें ते स्वस्थ होते. नंतर अर्जुनानें हासत हासतच गांडीव ओढून कांहीं क्षुद्रक बाण त्यांच्या मर्मस्थळावर सोडिले. याप्रमाणें अर्जुनानें त्यांना बाणानीं भरून काढिलें तेव्हां भीष्म दुःशासनाला म्हणाले, ' वज्र व वीज ह्यांसारख्या तीक्ष्ण बाणांनीं ह्या अर्जुनानें मला घायाळ केलें आ-हे. उग्रविषानें युक्त अशा चावा घेणाऱ्या मोठमोठ्या सापांसा-रखे माझ्या मर्मस्थळीं घुसणारे हे बाण खात्रीनें शिखंडीचे नसून अर्जुनाचे आहेत. अर्जुनाखेरीज बाकी सर्व राजे एकवटले तरी मला पीडा देण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं नाहीं. ' ज्यावर बाण लागला नव्हता अशी भीष्मांच्या अंगावर दोन अंगुळें सुद्धां जा-गा नव्हती. याप्रमाणें अर्जुनाच्या बाणांनीं सर्व अंग छिन्नभिन्न होऊन सूर्य थोडा बाकी उरला असतां पूर्वेकडे तोंड करून भीष्म रथांतून खालीं आले. ते खालीं येतांना राजांमध्यें एकच हाहाः-कार उडून राहिला, व त्याबरोबर सर्व कौरवांचीं हृदयें खचून गेलीं. याप्रमाणें खालीं येऊन अंग जमिनीला न लागतां शरशय्ये-वर ते पडल्याबरोबर दिव्य स्वरूप झाले. याप्रमाणें कौरवश्रेष्ठ महातेजस्वी भीष्म पडले असतां पांडव व सृंजय यांनीं सिंहनाद केला. कौरव अगदीं वेडे बनून जागच्या जागीं खिळले. कृप, दुर्योधन प्रभृति मंडळी मोठ्यानें सुस्कारा टाकून रडूं लागली. कोणी पळूं लागले, कोणी वेडे बनून गेले, कोणी 'क्षात्रधर्माला धि-कार असो,' ह्मणूं लागले, व कोणी भीष्मांची वाहवा करूं लागले.

दुर्योधनाला भीष्मांचें शेवटचें सांगणें.

याप्रमाणें संध्याकाळचे वेळीं कौरवांना उदास करून पांचालांना आनंदवीत जमिनीला न शिवतां भीष्म शरशय्येवर पडले असतां कौरवांचा सीमावृक्ष उमळून पडल्यानें जिकडे तिकडे हाहाःकार उडून एकच गोंधळ झाला. 'हेच खरे ब्रह्मवेत्ते, हेच ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ; पूर्वीं बापासाठीं यांनीं कायमचें ब्रह्मचर्य पत्करलें,' याप्रमाणें शरशय्येवर पडलेल्या भीष्मांसंबंधानें जिकडे तिकडे उद्गार निघूं लागले.

दुःशासन द्रोणांकडे येऊन त्यानें भीष्मांची पतनवार्ता त्यांस सांगितली तेव्हां लगेच लढाई बंद ठेवून चिलखतें उतरून ठेवून सर्व भीष्मांभोंवतीं जमले. सर्व कौरवपांडव त्यांना अभिवादन करून त्यांचे जवळ उभे राहिले असतां त्यांचें स्वागत करून तुमच्या दर्शनानें मी संतुष्ट झालों आहें' असें म्हणून 'माझें डोकें लोंबत आहे, मला कांहीं उशी द्या,' असें ते म्हणाले. तेव्हां राजांनीं लहान लहान मऊ उशा आणल्या. तें पाहून भीष्म हासून म्हणाले, 'वीरशय्येला ह्या उशा काय कामाच्या?' नंतर नरवीर अर्जुनाकडे पाहून ते म्हणाले, 'धनंजया, माझें डोकें लोंबत आहे. या वीरशय्येला योग्य अशी मला उशी दे.' अर्जुनानें बरें म्हणून त्यांचा उद्देश ओळखून आपलें गांडीव घेऊन त्याला तीक्ष्ण बाण जोडून त्या भरतश्रेष्ठ भीष्मांची आज्ञा घेऊन तीन बाणांनीं त्यांच्या डोक्याला टेका दिला. याप्रमाणें आपला उद्देश अर्जुनानें ओळखिला असें पाहून भीष्मांना संतोष झाला, व दिलेल्या उशीबद्दल त्याची वाहवा करून ते म्हणाले, 'अर्जुना, या शयनाला योग्य अशी उशी तूं मला दिली आहेस. हे महाबाहो, धर्मानें चालणाऱ्या क्षत्रियानें रणामध्यें अशा शरशय्येवरच निजलें पाहिजे.' असें त्याला म्हणून तेथील सर्व

राजांना ते म्हणाले, ' अर्जुनानें मला कशी उशी दिली पहा. राजांनों आतां तरी वैर सोडून लढाई बंद करा. ' इतक्यांत बाण उपटून काढण्यामध्यें पटाईत असे वैद्य आपल्या सर्व हत्यारांनिशी तेथें आले. त्यांना पाहून भीष्म दुर्योधनाला म्हणाले, ' यांना बहुमानानें द्रव्य देऊन जाण्याला सांग. मी अशा रीतीनें पडलों असतां मला आतां वैद्याची काय गरज आहे ? क्षात्रधर्मामध्यें नांवाजलेली उत्तम गति मला मिळाली आहे. याप्रमाणें मी शय्येवर पडलों असतां बाण उपटून काढणें हा कांहीं क्षात्रधर्म नव्हे. याच बाणांनिशीं मला जाळलें पाहिजे. ' हें त्यांचें भाषण ऐकून दुर्योधनानें त्या वैद्यांना परत पाठवून दिलें. याप्रमाणें त्यांची ती चोख धर्मनिष्ठा पाहून चोहोंकडून जमलेल्या राजांना मोठें आश्चर्य वाटलें. नंतर दुर्योधनाकडे पाहून भीष्म म्हणाले, ' दुर्योधना, दुःख बाजूला ठेवून मी म्हणतों तें ऐक. बुद्धिशाली अर्जुनाचा प्रभाव तूं पाहिलासच. आग्नेय, वारुण, वायव्य, वैष्णव, ऐंद्र, पाशुपत, ब्रह्म वगैरे सर्व अस्त्रांची माहिती सर्व जगामध्यें एकट्या अर्जुनाला किंवा त्या श्रीकृष्णाला आहे. पांडवांना युद्धामध्यें जिंकतां येणार नाहीं. जोंपर्यंत श्रीकृष्ण वळण्याचा संभव आहे, जोंपर्यंत तुझ्या सैन्याचा फडशा उडाला नाहीं, जोंपर्यंत तुझे अवशिष्ट भाऊ व राजे जिवंत आहेत, जोंपर्यंत युधिष्ठिरानें आपल्या लाल डोळ्यानें तुझ्या सैन्याला जाळून टाकिलें नाहीं, तोंपर्यंत तूं पांडवांशीं संधि कर. या पांडववीरांशीं तुझें सख्य असावें असें मला वाटतें. पांडवांबरोबर संधि करून युद्ध बंद पाड. हे माझें भाषण तुला पटूं दे. हेंच तुला व तुझ्या कुलाला हितकारक होणार आहे. अर्जुनानें आतांपर्यंत केलेलें काम पुरे आहे. या भीष्मांबरोबरच वैराचा शेवट होऊन तुमचें सख्य जुळूं दे. माझ्यावर कृपा कर.

पांडवांना अर्धे राज्य देऊन धर्मराजाला इंद्रप्रस्थामध्यें राहूं दे. मित्रांचा द्रोह करून नीच राजांच्या मालिकेला जाऊन दुर्लौकिक पदरीं घेऊं नकोस. बाप, मुलगे, मामे, भाचे या सर्वांना प्रेमानें एकमेकांना भेटूं दे. मूर्खपणानें बुद्धीला भ्रंश होऊन हें माझें समयोचित भाषण तूं जर न ऐकशील, तर तुला पुढें ताप होईल. मी हें अगदीं खरें बोलत आहें. तेव्हां या वैराचा येथेंच शेवट लाव. ' परंतु हा उपदेश दुर्योधनाला पटला नाहीं; व सर्व मंडळी आपापल्या गोटाकडे परत गेली.

कर्णाला भीष्मांचा उपदेश.

भीष्म पडल्याची बातमी ऐकून किंचित् मनाची चलबिचल उडून जाऊन कर्ण लगबगीनें त्यांना भेटण्याला आला, व त्यांना डोळे मिटून पडलेले पाहून गळा दाटून येऊन ' भीष्म ! भीष्म !' ह्मणून उद्गार काढून, ' नेहमीं आपल्या डोळ्यांत सलणारा, आपल्याला नेहमीं वैऱ्याप्रमाणें दिसणारा हा मी कर्ण आलों आहें,' असें म्हणाला. तें ऐकून वळ्यांनीं ज्यांचे डोळे झाकून गेले होते, असे भीष्म हळूहळू डोळे उघडून रक्षकांना बाजूला करवून तेथें कोणी नाहींसें झाल्यावर बापानें ज्याप्रमाणें मुलाला कवटाळावें, त्याप्रमाणें एका हातानें त्याला कवटाळून स्नेहपूर्वक ते त्याला म्हणाले, ' कर्णा, ये. तूं नेहमीं माझ्या उलट जाऊन माझ्याशीं स्पर्धा मांडतोस. तूं कुंतीचा मुलगा असून राधेचा नव्हेस. सूर्य तुझा बाप आहे, हें नारदांकडून व व्यासांकडून मला कळलें आहे. मला तुझा द्वेष मुळींच नाहीं. तूं उगीच पांडवांना टाकून बोलत होतास ह्मणून तुझा हिरमोड करण्यासाठीं मी तुला निष्ठुर बोलत असें. कांहीं संस्कार न घडतां तुझा जन्म झाला असल्यामुळें व हलक्या लोकांशीं संबंध जुळल्यामुळें तुझी बुद्धि

17

अशी झाली असून गुणवानांचा सुद्धां तूं द्वेष करूं लागला आहेस. ह्मणून मी तुला सभेमध्यें पुष्कळ लागून बोललों. रणामध्यें शत्रूला सहन करण्याला कठीण असें तुझें वीर्य, ब्राह्मणावरची तुझी भक्ति, तुझें शौर्य, त्याचप्रमाणें दानाकडे तुझें पूर्ण लक्ष्य, हें सर्व मी जाणतों. तुझ्यासारखा पुरुष मनुष्यामध्यें कोणी सांपडणार नाहीं. परंतु कुळामध्यें फूट पडण्याच्या भीतीनें मी तुला नेहमीं निष्ठुर बोलत असें. धनुर्विद्येंत, शरसंधानामध्यें, चलाखीमध्यें अस्त्रसामर्थ्यामध्यें तूं त्या अर्जुनाच्या व श्रीकृष्णाच्या तोडीचा आहेस. कर्णा, मुलीसाठीं काशीपुराला जाऊन तूं एकट्यानें सर्व राजांना चिरडून टाकिलेंस. त्याचप्रमाणें कोणाला हार न जाणारा बलशाली जरासंधसुद्धां रणांत तुझ्या बरोबरीला लागला नाहीं. आपल्या तेजाच्या व बलाच्या जोरावर नेहमीं तूं धर्मानें युद्ध करीत असून देवगुण तुझ्यामध्यें आहेत. मनुष्याला तूं भारी आहेस. तुझ्यासंबंधी जो माझा राग होता, तो आज नाहींसा झाला आहे. मनुष्यप्रयत्नानें दैव बदलतां येणें शक्य नाहीं; परंतु माझें जर तुला ऐकावयाचें असेल तर तूं आपल्या पांडव भावांशीं जाऊन मीळ. माझ्याबरोबरच या वैराचा शेवट लागूं दे.' यावर कर्ण म्हणाला, 'आपण ह्मणतां तें सर्व मला ठाऊक आहे. कुंतीनें मला सोडून सूतानें वाढविलें. दुर्योधनाच्या ऐश्वर्याचा उपभोग घेऊन, तात, आतां माझ्या हातून नांवाला बट्टा आणवत नाहीं. ज्याप्रमाणें तो श्रीकृष्ण त्या पांडवांना घट्ट धरून आहे, त्याप्रमाणें मी पैसा, शरीर, मुलगा, बायको, यश सर्व सोडून दुर्योधनाला चिकटून राहिलों आहें. क्षत्रियांना आंथरुणावर पडून मरण येऊं नये ह्मणून दुर्योधनाची बाजू घेऊन मीं नेहमीं पांडवांना खवळविलें आहे. ही अवश्य घडून येणारी गोष्ट उलटविणें शक्य नाहीं. पुरुषप्रयत्नानें दैव कोणाला फिरवितां येणार?

पृथ्वीचा पूर्ण फडशा पाडणारीं झालेलीं दुश्चिन्हें आपण सभेमध्यें सांगितलींच आहेत. मी पांडवांना ओळखतों. तसाच त्या श्रीकृष्णालाही पूर्ण ओळखतों. ते सर्वांना अजिंक्य आहेत. आणि ह्मणूनच त्यांना जिंकण्याचा मीं निश्चय केला आहे. हें भयंकर पेटलेलें वैर सोडून देतां येणें शक्य नाहीं. आपल्या धर्माला जागून उत्साहानें मी अर्जुनाशीं युद्ध करणार. तेव्हां माझा असा युद्धाचा निश्चय ठरला असल्यामुळें आपण मला युद्धाची आज्ञा द्या. आपल्या परवानगीनें युद्ध करावें असें माझ्या मनांत आहे. अविचारानें किंवा वेडेपणामुळें जें कांहीं मी आपणाला टाकून बोललों असेन किंवा आपल्या कधीं उलट गेलों असेन त्या सर्वांची आपण क्षमा करा.' यावर भीष्म ह्मणाले, 'कर्णा, हें भयंकर वैर जर सोडतां येणें शक्य नसेल तर मी तुला आज्ञा देतों. राग, चुरस कांहीं न धरतां भल्यांचा कित्ता डोळ्यांपुढें ठेवून तुझ्या शक्त्यनुरूप व उत्साहानुरूप मीपणा सोडून देऊन स्वर्गाची इच्छा धरून खुशाल युद्ध कर, आणि अर्जुनाच्या हातून तुला पाहिजेत ते लोक क्षात्रधर्मानें मिळवून घे. धर्मयुद्धाखेरीज क्षत्रियाला कल्याणकारक कांहीं नाहीं. समेट करण्यासाठीं मीं पुष्कळ दिवस बरीच खटपट केली; परंतु तें कांहीं घडून आलें नाहीं. असो.'

याप्रमाणें भीष्म बोलल्यावर त्यांना अभिवादन करून भीष्मांची समजूत घालून कर्ण रथांत बसून दुर्योधनाकडे निघून गेला.

चक्रव्यूहभेद व अभिमन्यूचा वध.

भीष्म पडल्यावर द्रोणांना सेनाधिपति करून कौरव युद्धाला तयार झाले असतां सर्व पांडवांना मारून जय मिळविणें दुर्घट असल्यानें युधिष्ठिराला जिवंत पकडून फिरून द्यूतांत त्याला जिं-

कून वनवासाला पाठविल्यानें आपलें काम होणार आहे, असें वाटून दुर्योधनानें द्रोणांना युधिष्ठिराला जिवंत पकडण्यास सांगितलें. त्यावरून पहिले दिवशीं द्रोणांनीं आपली शिकस्त केली, तरी अर्जुनापुढें त्यांचें कांहीं चालेना. तेव्हां संशप्तकांकडून अर्जुनाला युद्धाला बोलावून दूर नेऊन मागें युधिष्ठिराला पकडावा असा बेत ठरवून त्याप्रमाणें संशप्तकांकडून अर्जुनाला युद्धाला बोलावून रणांतून दूर नेवविलें; आणि तिकडे अर्जुन संशप्तकांशीं युद्धांत गुंतला असतां कौरवांनीं आतां अर्जुन नाहीं तेव्हां युधिष्ठिराला पकडण्याला कांहीं उशीर लागणार नाहीं, असा विचार करून आनंदानें युद्धाची तयारी केली. आचार्यांनीं व्यूहाची रचना चक्राकार केली, व त्यांत मोठमोठ्या शूर राजांची त्यांच्या त्यांच्या पथकांसह चांगल्या माऱ्याच्या ठिकाणीं योजना केली. व्यूहाच्या तोंडांवर सूर्यवंशांतील राजेलोकांची योजना केली. ते सर्व योद्धे तांबडीं वस्त्रें नेसून तांबडीं भूषणें घालून तांबड्या पतका घेऊन मरेन किंवा मारीन या निश्चयानें प्राण जाईपर्यंत एकमेकांना मदत करावयाची अशा प्रतिज्ञेनें युद्धाला उभे राहिले. हे योद्धे दहा हजार होते. यांवर लक्ष्मण सेनापति होता. कर्ण, दुःशासन व कृपाचार्य वगैरे महारथी बरोबर घेऊन राजा दुर्योधन त्या व्यूहाच्या मध्यभागीं उभा होता. सर्व सैन्याचे पुढें सूर्यासारखे तेजस्वी द्रोणाचार्य उभे होते. त्यांच्याजवळच जयद्रथ, बाकीचे कौरव, शकुनि, शल्य, भूरिश्रवा व अश्वत्थात्मा वगैरे बडी बडी मंडळी आपापलीं पथकें बरोबर घेऊन त्या व्यूहाचें रक्षण करण्याकरितां तयारीनें उभी होती.

अशी ही कौरवपक्षाची कडेकोट तयारी पाहून पांडवांनीं भीमाला पुढें करून एकदम कौरवांवर चाल केली; परंतु द्रोणाचार्यांनीं बाणांचा मारा करून त्यांना पुढें येऊं दिलें नाहीं. आप-

ल्या सैन्याचें द्रोणाचार्यांच्या माऱ्यापुढें कांहीं चालत नाहींसें पाहून युधिष्ठिराला मोठी काळजी पडली. नंतर तो अभिमन्यूला ह्मणाला, ' बाळा, अर्जुन येऊन जेणेंकरून आह्माला दोष देणार नाहीं असें कर. चक्रव्यूहाचा भेद कसा करावा, हें आह्माला मुळींच माहीत नाहीं. तूं, अर्जुन, श्रीकृष्ण किंवा प्रद्युम्न यांपैकींच कोणीतरी हा व्यूह फोडून पार जाईल. ह्या चौघांशिवाय चक्रव्यूहाचा भेद करण्याला कोणी समर्थ नाहीं. हे महाबाहो, लौकर चाल करून जाऊन हा व्यूह फोड. ' यावर अभिमन्यु ह्मणाला, ' वडिलांच्या अशीर्वादानें मी हा व्यूह सहज फोडून टाकीन. मला माझ्या वडिलांनीं युद्धकला उत्तम शिकविली आहे; परंतु मला व्यूहांतून परत येतां येणार नाहीं. ' हें ऐकून युधिष्ठिर ह्मणाला, ' हे युद्धविशारद महाबाहो, तूं नुसती वाट पाडलीस कीं पुरे, लगेच आह्मी सर्वजण तेथील लोकांची कत्तल करीत तुझ्या मागोमाग येतों. ' यावर बरें ह्मणून अभिमन्यूनें सारथि सुमित्राला आचार्यांच्या सैन्यावर घोडे नेण्यास सांगितलें. ' बरें ' ह्मणून सुमित्रानें घोडे हाकले. ते घोडे थोडीशी इशारत मिळाल्याबरोबर शत्रूंच्या माऱ्याला न जुमानतां वाऱ्यासारखे शत्रूवर जाऊन भिडले. बाकीचे पांडवही त्याच्या पाठोपाठ निघाले. पांडव अशा रीतीनें अभिमन्यूला पुढें करून चालून आलेले पाहून सर्व कौरवसैन्य त्यांच्यावर जास्त जोरानें तुटून पडलें. हा वीराचा बच्चाही सिंहाच्या छाव्याप्रमाणें आपल्या बाणरूपी नखांनीं त्यांचीं मर्मस्थळें फोडीत व्यूह फोडून आंत घुसण्याच्या खटपटीला लागला. तेव्हां कांहीं वेळ व्यूहाच्या तोंडाजवळ दोन्ही पक्षांचें बरेंच तुंबळ युद्ध झालें; पण शेवटीं पुढें येऊन अडथळा करणाऱ्या सर्व योध्यांना मागें हटवून अभिमन्यु वाट पाडून आंत घुसला. अभिमन्यूनें चक्रव्यूहाचा भेद केला हें पाहून चहूंकडील शूर शूर

राजे ' थांब थांब, पुढें कोठें चाललास? हे आह्मी तुझा समाचार घ्यावयाला आलों, ' असें ह्मणत त्याच्या भोंवतीं गोळा झाले; पण ह्या पठ्ठ्यानें त्यांना न जुमानतां बाणांचा मारा करीत तशीच पुढें वाट काढिली. कौरवांकडील लोक त्याच्यावर पतंगाप्रमाणें झडप घालून शेवटीं प्राणाला मुकत होते. या रणबहाद्दरानें सर्व समरांगण शत्रूंच्या छिन्नविच्छिन्न झालेल्या शरीरांनीं भरून सोडिलें. दांतओठ चावत रागानें त्यांच्यावर तुटून पडलेल्या लोकांचीं मुंडकीं यानें वरच्यावरच उडविल्यामुळें तीं तशींच धूळ खात पडलीं. हजारों लोकांची कत्तल उडाल्यामुळें नानाप्रकारचीं किरीटें, कुंडलें, बाहुभूषणें, लोखंडाच्या कांबीसारखे बळकट असे शूर योध्यांचे हात, हत्तींच्या पायासारख्या मांड्या, नानाप्रकारचीं शस्त्रास्त्रें व हत्ती, घोडे वगैरे जनावरें यांचीं हाडें यांनीं सर्व रणभूमी अगदीं गच्च भरून गेली. मर्मस्थळीं वार लागल्यामुळें शूर शिपाई घायाळ होऊन जिकडे तिकडे कण्हत पडले. त्यांचा दीन स्वर ऐकून कौरवांना पुष्कळ चेव आला; पण अभिमन्यूच्या माऱ्यापुढें त्यांचा कांहींच इलाज चालेना. शेवटीं अगदीं हताश होऊन पळण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं असा विचार करून कण्हत पडलेल्यांची काळजी न करतां घोड्यांना टाच देऊन तेथून त्यांनीं पळ काढण्याला सुरवात केली.

अशा रीतीनें एकट्या अभिमन्यूनें आपल्या सर्व सैन्याची त्रेधा उडविलेली पाहून दुर्योधनाला फार त्वेष चढला, व त्या त्वेषांत तो अभिमन्यूवर चाल करून गेला. हें पाहून द्रोणाचार्यांनीं ' राजाचें रक्षण करा, राजाचें रक्षण करा; नाहीं तर अभिमन्यु आह्मा सर्वांच्या देखत त्याचा फडशा पाडील, ' अशी मोठ्यानें आरोळी ठोकिली. ती ऐकून मोठमोठे वीर दुर्योधनाचें रक्षण करण्याकरितां त्याकडे धावले. अश्वत्थामा, कृपाचार्य, कृतवर्मा, श-

ल्य व भूरिश्रवा वगैरे बडी बडी मंडळी एकट्या अभिमन्यु बाळावर तुटून पडली; परंतु अग्नीवर गवताचें ओझें कितीही पडलें तरी त्याचें अग्नीला जसें कांहीं वाटत नाहीं, त्याचप्रमाणें अभिमन्यूला त्याचें कांहींच वाटलें नाहीं. आपल्या बाणांच्या माऱ्यानें या सर्वांना मागें हटवून त्यानें मोठ्यानें सिंहगर्जना केली. इतक्यांत कर्ण, कृपाचार्य, द्रोणाचार्य वगैरे मंडळी पुन्हा अभिमन्यूवर जास्त नेटानें मारा करूं लागली. तेव्हां या सर्वांचा मारा सहन करून अभिमन्यूनें कर्णाच्या चिलखताचे तिळा एवढे तुकडे करून पाडिले, व सुषेण आणि कुंभभेदी यांचा समाचार घेऊन शल्यावरही जोरानें मारा केला. तो मारा असह्य होऊन शल्य मूर्च्छा येऊन रथांत मटदिशीं खालीं बसला. आपल्या भावाची झालेली ही दशा पाहून शल्याचा धाकटा भाऊ अभिमन्यूवर तुटून पडला; पण पहिल्याच सलामीसरसा अभिमन्यूनें त्याला स्वर्ग दाखविला. त्याचें हस्तलाघव पाहून दोन्ही पक्षांतील लोक ‘ शाबास, शाबास ’ असें मोठ्यानें ओरडले, व द्रोणाचार्य त्याचें शौर्य पाहून आनंदानें कृपाचार्यांना ह्मणाले, ‘ हा अर्जुनाचा बच्चा त्याच्याच तोडीचा आहे. ह्याचें शौर्य पाहून त्याच्या वडिलाला, युधिष्ठिरादि चुलत्यांना, बाकीच्या आप्तांना किंबहुना शत्रूंना देखील विस्मय वाटल्यावांचून रहाणार नाहीं. ह्याच्या तोडीचा एकही धनुर्धर या मोठ्या सैन्यांत असेल असें मला वाटत नाहीं. हा मनांत आणील तर सर्व सैन्याचा एका क्षणांत धुवा उडवून देईल.’ हें द्रोणाचार्यांचें प्रेमळ, पक्षपाती भाषण ऐकून दुर्योधनाला फार राग आला. तो कर्ण, दुःशासन, बाल्हीक वगैरे राजांना म्हणाला, ‘सर्व राजांचें ह्या ब्रह्मश्रेष्ठ द्रोणाचार्यांनीं सेनाधिपत्य स्वीकारिलें आहे. असें असूनही ते या मूर्ख पोराला मारावयाचें सोडून याची प्रशंसा करीत बसले आहेत. यांच्यापुढें प्रत्यक्ष

काळाच्यानें सुद्धां उभें राहवणार नाहीं; मग त्या यःकश्चित् पोराची काय कथा ? अर्जुन आपला शिष्य आहे व हा त्याचा मुलगा आहे, हें मनांत आणून आचार्य याची गय करितात; पण हें मूर्ख पोर एवढ्यानेंच चढून जाऊन लौकरच त्यांना देखील पाणी पाजील.' असें दुर्योधन ह्मणाल्याबरोबर सर्व राजे द्रोणाचार्यांच्या देखत अभिमन्यूला ठार करण्याकरितां तयार झाले. दुःशासन झपाट्यानें बाण सोडीत अभिमन्यूवर धावून गेला. त्याला पाहून हासत हासतच अभिमन्यु ह्मणाला, 'हा दुष्ट धर्मलंड मजपुढें रणांगणांत येत आहे हें ठीक झालें. हे नीचा, भरसभेंत युधिष्ठिरकाकांची जी तूं फजीति केलीस, भीमांना जे अपशब्द बोललास व माता द्रौपदीची जी विटंबना केलीस त्या सर्वांचें प्रायश्चित्त आतां भोग.' असें ह्मणून त्यानें त्याच्यावर तीक्ष्ण बाण सोडिले. ते दुःशासनाच्या छातींत व बगलेंत जोरानें घुसल्यामुळें विव्हळ होऊन तो रथांत मूर्च्छित होऊन पडला. दुःशासनाची ती दशा पाहून त्याच्या सारथ्यानें वेगानें घोडे हाकून रणांगणांतून पळ काढिला. दुःशासनासारख्या वीरानें रणांतून घायाळ होऊन माघार घेतली हें पाहून दुर्योधन कर्णाला ह्मणाला, 'बा कर्णा, एका क्षणांत अभिमन्यूनें दुःशासनाची कशी अवस्था केली पहा. हा आपल्या प्रखर बाणांनीं सूर्याप्रमाणें आमच्या सैन्याला कसा तापवीत आहे! सर्व पांडवही गर्जना करीत याला मदत करण्याकरितां याच्या पाठोपाठ धावून येत आहेत.' हें ऐकून कर्ण बाणांचा मारा करीत अभिमन्यूवर धावून गेला. पण अभिमन्यूनें त्याचा तो सर्व मारा सहन करून त्याचे घोडे, सारथि, रथ, ध्वज व धनुष्य ह्या सर्वांचे आपल्या बाणांनीं तुकडे तुकडे करून सोडिले. कर्णाची अशी फजीति उडाली म्हणून त्याचा धाकटा भाऊ त्याचें उसनें फेडण्याकरितां ऐटीनें अभि-

मन्यूवर चालून आला; परंतु दोघांची दृष्टादृष्ट होते न होते तोंच अभिमन्यूनें त्याचें मुंडकें उडवून दिलें. हें पाहून कर्ण भयानें व लाजेनें तेथून पळून गेला. कर्णानें पळ काढलेला पाहून तर कौरवसैन्याची पांचांवर धारण बसली. तें चोहोंकडे सैरावैरा पळूं लागलें. इतक्यांत जयद्रथ ह्या सर्वांना थोपवून धरून आपल्या धनुष्याचा टणत्कार करीत पुढें सरसावला.

यानें पूर्वीं द्रौपदीला उपटून नेण्याचा बेत केला होता, ते वेळीं भीमानें याची फजीति उडविली असल्यामुळें वाईट वाटून या मानी पुरुषानें शंकराची कडक तपश्चर्या करून त्यापासून 'अर्जुन नसेल तेव्हां तुला बाकीच्या पांडवांना जिंकतां येईल,' असा वर मिळविला होता.

त्या वरप्रभावानें अर्जुन जवळ नसल्यानें यावेळीं ह्याला अधिक जोर आला होता. यानें आल्याबरोबर सात्यकि, भीमसेन व धृष्टद्युम्न वगैरे सर्व योद्ध्यांना आपल्या बाणांनीं झाकून सोडिलें. हें सहन न होऊन भीमानें तीनच बाणांत त्याचें धनुष्य, छत्र, व ध्वज हीं तोडून पाडिलीं. जयद्रथानेंही लगेच दुसरें धनुष्य घेऊन भीमाचे घोडे मारिले व धनुष्यही तोडून टाकिलें. हें पाहून भीमानें तेथूनच सात्यकीच्या रथावर उडी घेतली! नंतर पांचाल, केकयादि पांडव वीर अभिमन्यूनें पाडलेल्या वाटेनें व्यूहामधून आंत घुसूं लागले.

परंतु जयद्रथानें एकट्यानेंच त्या सर्वांना अडवून धरिलें. इतक्यांत अभिमन्यूनें वृषसेनाचा सारथि मारिला, व त्याच्या धनुष्याची दोरीही तोडून टाकिली. सारथि मेल्याबरोबर घोड्यांना कोणी आवरता नाहींसा झाल्यामुळें ते वृषसेनाला घेऊन सर्व रणांगणांतून सैरावैरा धावूं लागले. तेव्हां सर्व कौरववीर एकदम अभिमन्यूवर तुटून पडले. त्याबरोबर अभिमन्यूच्या सारथ्यानें मो-

ठ्या शिताफीनें त्या सर्वांची नजर चुकवून त्यांच्या मधूनच आपला रथ बाजूला काढिला. पुढें दुर्योधनाचा मुलगा लक्ष्मण अभिमन्यूवर तुटून पडला. तेव्हां दुर्योधनही आपल्या मुलाच्या रक्षणाकरितां पुन्हा परतला व त्याचे सरदारही अभिमन्यूवर तुटून पडले. लक्ष्मण व दुर्योधनादि वीर त्याच्यावर सारखा बाणांचा मारा करूं लागले. त्यामुळें साप जसा काठीच्या तडाक्यानें खवळून जाऊन चवताळून उलट अंगावर धावतो त्याप्रमाणें खवळून अभिमन्यूनें एक रुंद पात्याची चांगली पाणीदार अशी तलवार म्यानांतून उपसून ती लक्ष्मणावर फेकिली. चिडलेली नागीण जशी बिळांतून वेगानें बाहेर पडतें, त्याप्रमाणें ही तलवार त्याच्यापासून जी जोरानें गेली तों तिनें लक्ष्मणाचें डोकें किरीटकुंडलांसह वरच्यावर उडविलें. लक्ष्मणासारखा राजबिंडा ठार झाला हें पाहून सर्व लोक हाय हाय करूं लागलें. दुर्योधन तर पुत्रशोकानें चवताळून, ' मारा, याला मारा, ' असें मोठ्यानें ओरडूं लागला.

हें ऐकून कर्ण, द्रोण अश्वत्थामा वगैरे सर्व वीर मोठ्या नेटानें अभिमन्यूवर तुटून पडले. कर्णानें अभिमन्यूचें धनुष्य तोडिलें, कृतवर्म्यानें घोडे मारिले. कृपाचार्यांनीं सारथि ठार केला; आणि बाकीच्या सर्वांनीं मिळून या विरथ झालेल्या एकट्या लहान बाळावर बाणांचा भडिमार केला; परंतु या पठ्ठ्यानें क्षात्रधर्माला स्मरून पाठ न दाखवितां हातांत ढालतरवार घेऊन रथावरून खालीं उडी घेतली. आपली तरवार चमकावीत तो खालीं उतरल्याबरोबर त्याची नजर चोहोंकडे सारखी फिरत असल्यामुळें त्याला गराडा देऊन उभे राहिलेल्या प्रत्येक वीराला आतां ह्या रणसिंहाची झडप आपल्यावरच येऊन पडते कीं काय असें वाटूं लागून जो तो आपापल्या ठिकाणींच स्तब्ध होऊन उभा राहिला. इतक्यांत द्रो-

णाचार्यांनीं एक रुंद फाळाचा बाण सोडून मुठीपासून याची तरवार वेगळी केली. कर्णानें ढालीचे तुकडे तुकडे केले. तेव्हां जवळ पडलेलें एक रथाचें चाकच घेऊन हा रणशूर रागानें डोळे लाल करून द्रोणाचार्यांवर धावला. त्याचे ते रक्तानें भरलेले कपडे, रागानें लाल झालेले डोळे व ती क्रूर मुद्रा पाहून व सिंहासारखी भयंकर गर्जना ऐकून सभोंवारच्या वीरांची अगदीं गाळण उडून गेली. त्यांच्यानें त्याच्याकडे पाहवेना देखील! तरी सर्वांनीं कसेंबसें अंगांत धैर्य आणून त्याच्या चक्रावर सारखा बाणांचा मारा सुरू केला. इतक्या महारथ्यांच्या माऱ्यापुढें रथाचें चक्र तें किती वेळ टिकणार? तें लगेच तुकडे तुकडे होऊन खालीं पडलें. तरी न डगमगतां या रणबहादरानें हातीं गदा घेऊन अश्वत्थाम्यावर चाल केली. अग्नीप्रमाणें तेजस्वी अशी ती गदा घेऊन अभिमन्यु आपल्यावर धावून येत आहेसें पाहून अश्वत्थाम्यानें तेथून पळ काढिला. तेव्हां दौशासनी रागानें आपली गदा हातीं घेऊन अभिमन्यूवर धावला. कांहीं वेळ गदायुद्ध केल्यावर शेवटीं दोघांनींही एकमेकांवर जोरानें गदेचा तडाखा दिला. तो दोघांच्याही वर्मीं लागला. त्यामुळें दोघेही मूर्छित होऊन खालीं पडले. नंतर दौशासनी थोडा आधीं सावध होऊन उठला, व अभिमन्यु उठतो आहे इतक्यांत त्यानें आपली गदा त्याच्या डोक्यावर हाणिली. इतका वेळ झालेल्या श्रमानें व या वर्मीं बसलेल्या तडाख्यानें अभिमन्यु फिरून निचेष्ट होऊन खालीं पडला.

यावप्रमाणें पुष्कळांनीं मिळून या लहान बाळाला एकटा गांठून मारिलें. हा पडल्याबरोबर कौरववीरांनीं आनंदानें शिंग फुंकून सिंहगर्जना केली. चंद्राप्रमाणें आल्हादकारक मुख, डोक्यावरील ती झुलपी, अंगावर लागलेले ते वार वगैरे पाहून पांडवांकडील प्रत्येक योद्धा ढळढळां रडूं लागला. ‘ द्रोणकर्णासारख्या सहा महा-

रथ्यांनीं मिळून एकट्या लहान बालकाला गांठून मारिलें हा मोठा अधर्म झाला, ' असें सर्व ह्मणूं लागले. द्रोणकर्णासारख्या अतिरथ्यांना त्राही त्राही करून क्षत्रियधर्माला अगदीं योग्य अशा रीतीनें या शूर अभिमन्यूनें शत्रूशीं टक्कर देत धारातीर्थी आपला देह ठेविला ! याचा हा पराक्रम पाहून राजा युधिष्ठिराला तर अनावर शोक झाला.

जयद्रथाचा वध.

इकडे संध्याकाळपर्यंत सर्व संशप्तकांना मारून अर्जुन आपल्या शिबिराकडे परतला असतां त्याचें मन अगदीं जाग्यावरून उडालें होतें. आपल्या गोटांत आल्यावर जयद्रथानें सर्व पांडवपक्षीयांना व्यूहाच्या बाहेर थोपवून धरल्यानें अभिमन्यु व्यूहांत एकटा सांपडून अनेक वीरांनीं मिळून त्या एकट्याला अधर्मानें मारल्याची बातमी त्याला कळली. त्यानें शोकसंतप्त होऊन ' अभिमन्यूच्या वधाला कारणीभूत झालेल्या जयद्रथाला मी उद्यां ठार मारणार. जर मी उद्यां त्या पाप्याला मारणार नाहीं तर मी रौरव नरकांत पडेन,' अशी पुत्रशोकानें खवळून जाऊन अर्जुनानें घोर प्रतिज्ञा केली. हेरांनीं ही बातमी जयद्रथाला दिली. ती कानीं पडल्याबरोबर त्याचे हातपाय गळले; त्याला काय करावें हें सुचेना. तेव्हां त्याला धीर देऊन दुर्योधन ह्मणाला, ' हे वीरश्रेष्ठा, घाबरूं नकोस. मी, कर्ण, द्रोणाचार्य, अश्वत्थामा, शल्य व भूरिश्रवा वगैरे आह्मी सर्व मंडळी आपापलीं पथकें घेऊन तुझ्या रक्षणाकरितां तुझ्या पाठोपाठ हजर राहूं. तूं त्याबद्दल मुळींच काळजी करूं नकोस. भीति अगदीं सोडून दे. माझें हें अकरा अक्षौहिणी सैन्य उद्यां तुझ्याकरितां लढत राहील. '

इकडे अर्जुनानें केलेली ही दुर्धर प्रतिज्ञा पाहून श्रीकृष्ण अर्जुनाला ह्मणाला, 'तूं आपल्या भावांना न विचारितां व माझाही सल्ला न घेतां 'उद्यां जयद्रथाला मारीन,' अशी एकदम प्रतिज्ञा केलीस, हें फार साहस केलेंस. मीं कौरवांकडे आपले हेर पाठविले होते. त्यांनीं आतांच येऊन सांगितलें कीं, ' तूं जयद्रथाच्या वधाबद्दल केलेली प्रतिज्ञा त्याच्या कानावर गेली तेव्हां तो घाबरून दुर्योधनाकडे धांवत गेला, व दुर्योधनाच्या विनंतीवरून उद्यां आपली शिकस्त करून जयद्रथाला संभाळण्याचें द्रोणांनीं त्याला वचन दिलें आहे. तेव्हां त्या द्रोणापुढें तुझी प्रतिज्ञा कशी खरी होणार ?' ह्यावर अर्जुन ह्मणाला, ' कृष्णा, द्रोणाचार्यांच्या देखत सर्वांची कत्तल करून मी उद्यां आपल्या बाणानें जयद्रथाचें डोकें उडवीन. त्याच्या साहाय्याला जरी स्वर्गांतले देव खालीं उतरले, तरी सुद्धां जयद्रथाचें डोकें अर्जुनाच्या बाणानें उडालेलें उद्यां तुझ्या दृष्टीस पडल्यावांचून राहणार नाहीं. ह्या पाप्याचे साहाय्यकारी जे द्रोणाचार्य त्यांचाच आधीं मी समाचार घेऊन मग जयद्रथाचा समाचार घेईन. दुर्योधनाची सर्व मदार काय ती ह्या द्रोणाचार्यांवरच आहे. जयद्रथानें आजपर्यंत माझे पुष्कळ अपराध केले आहेत. तेव्हां त्या सर्वांचा वचपा मी उद्यां काढीन. मी उद्यां कौरवांची इतकी भयंकर कत्तल उडवीन कीं, जेणेंकरून माझ्याशिवाय या पृथ्वीवर दुसरा कोणीच धनुर्धर नाहीं, अशी त्या दुर्योधनाची पक्की खातरी होईल. ह्या गांडीवासारखें दिव्य धनुष्य व तुझ्यासारखा सारथि असल्यावर मला या जगांत अजिंक्य तें काय असणार ? माझी ही प्रतिज्ञा कधीं खोटी व्हावयाची नाहीं. माझी शक्ति, पराक्रम किंवा अस्त्रविद्या याबद्दल तूं आपल्या मनांत मुळींच शंका बाळगूं नकोस. '

तिसरे दिवशीं उजाडल्यावर द्रोणाचार्यही युद्धाच्या जय्यत

तयारीला लागले. त्यामुळें कौरवसैन्यामध्यें बरीच चळवळ उडू-
न राहिली. जिकडे तिकडे शूरांच्या गर्जना ऐकूं येऊं लागल्या.
कित्येक जोरानें आपल्या धनुष्याचा टणत्कार करूं लागले. कि-
त्येक म्यानांतून आपली तरवार उपसून तिच्याकडे उत्साहानें
पाहूं लागले. कित्येक शूर पुरुष युद्धाला आतुर होऊन उगीच
इकडे तिकडे पवित्रे चाळीत व हातवारे करीत हिंडूं लागले. कि-
त्येकजण आपली गदा जोरानें हालवून तिच्यावर लोंबत सोड-
लेल्या घांटांचा घणघण आवाज करूं लागले, व कित्येक रणन-
वरे तर जडावाचे वगैरे मूल्यवान् अलंकार घालून व उत्तम उ-
त्तम रेशमी वस्त्रें परिधान करून ऐटीनें आपलीं शस्त्रें पडताळीत
" अर्जुन कोठें आहे ? " " श्रीकृष्ण कोणीकडे गेला ? "
" भीम अद्यापि कां येत नाहीं ? " असें एकमेकांना विचारूं
लागले. आणि अशा गर्दींतच कौरव सेनापति द्रोणाचार्य हे आ-
पल्या सैन्याची नीट व्यवस्था लावून जयद्रथाला संभाळण्याला त-
यार होऊन राहिले.

इकडे अर्जुनानेंही आपल्या सैन्याच्या अग्रभागीं उभा राहून
मोठ्यानें आपला देवदत्त शंख फुंकला. मारुतीनेंही वरून भुभुः-
कार केला. तेव्हां विजेचा कडकडाट कानीं पडल्याप्रमाणें कौ-
रवसैन्य घाबरून गेलें. नंतर कौरव व अर्जुन हे एकमेकांवर बा-
णांचा मारा करूं लागले. तेव्हां अर्जुन शत्रूंचे बाण तोडून आ-
पल्या बाणांनीं त्यांचीं डोकीं भराभर तोडून खालीं पाडूं लागला.
आपल्या सैन्याची अर्जुनानें अशी त्रेधा उडविलेली पाहून दुः-
शासन आपलें हत्तीदळ बरोबर घेऊन अर्जुनावर वेगानें तुटून
पडला. त्यावेळीं हत्तीवरील घांटांच्या घणघण आवाजानें, शंखां-
च्या नादानें, धनुष्यांच्या टणत्कारानें, वीरांच्या आरोळ्यांनीं व
हत्तींच्या गरजण्यानें सर्व भूमि दुमदुमून गेली. इतक्यांत अर्जु-

नानें बाण मारण्याचा सपाटा चालविला, त्यासारशीं कित्येकांचीं डोकीं उडालीं, कित्येकांचे हात तुटले, कित्येकांचे पाय तुटले. कित्येक वेळां तर एका बाणानेंच दोन दोन तीन तीन वीर घायाळ होऊन पडूं लागले. अर्जुनाच्या ह्या तीक्ष्ण बाणांनीं गंडस्थळें फुटून जाऊन हत्ती तोंडानें रक्त ओकत चीं चीं करीत पटापट खालीं पडूं लागले. ह्यावेळीं हजारों वीरांची कत्तल झाल्यामुळें वीरांचे छिन्नविच्छिन्न झालेले देह, हत्तींचीं फुटलेलीं गंडस्थळें, धनुष्यबाण, तलवारी वगैरे शस्त्रें व ध्वजपताकादि राजचिन्हें ह्या सर्वांचा रणभूमीवर एकच सडा होऊन राहिल्यामुळें ती फारच भयाण दिसूं लागली.

अशा रीतीनें कत्तल उडवीत सूर्य अस्ताचलाच्या बाजूला वळला असतां अर्जुन व वासुदेव हे दोघे जयद्रथाला गांठण्याकरितां शत्रुसैन्यामधून झपाट्यानें चालले. अर्जुन आपल्या तीक्ष्ण बाणांनीं शत्रूच्या सैन्यांतून रथापुरतीच वाट काढीत असे, व तेवढ्याच अकुंचित वाटेनें जनार्दन त्याचा रथ मोठ्या शिताफीनें हाकीत असे. अर्जुनाचे घोडे लठ्ठ व फार वेगवान् होते. व त्यांना कृष्णासारखा नेता मिळाल्यामुळें त्यांनीं आपल्या वेगानें सर्व जगाला थक्क करून सोडिलें. याप्रमाणें वेगानें घोडे हाकीत श्रीकृष्ण कौरवसेनासमूहामधून रथ काढीत असतां पांडवपक्षीयांनीं कौरव प्रभृतींशीं नेटानें युद्ध करून विंदानुविंद, जलसंध, सुदर्शन, वीरकेतु वगैरे कौरववीरांना ठार केलें.

अशा धांदलीमध्यें भूरिश्रवा व सात्यकि यांची रणांगणीं गांठ पडल्याबरोबर उन्मत्त हत्ती आपआपसांत ज्याप्रमाणें निकरानें लढतात त्याप्रमाणें हे दोघे वीर एकमेकांशीं फारच निकरानें लढूं लागले. प्रथमतः कांहीं वेळ ह्यानें त्याच्यावर बाण सोडावेत ते त्यानें तोडून टाकावे, पुन्हा त्यानें सोडावे ते ह्यानें तोडावे असा

क्रम चालला होता; पण शेवटीं दोघांच्याही हातांतील धनुष्यें तुटलीं व दोघांचेही घोडे मारले गेले; त्यामुळें अर्थात् हातघाईवर प्रसंग आला; तेव्हां दोघेही हातांत नागव्या तरवारी व ढाला घेऊन मोठ्या आवेशानें एकमेकांवर तुटून पडले. व्यवस्थेशीर रीतीनें मागेंपुढें पवित्रे चाळणें, मध्येंच उडी मारून शत्रूवर वार करणें, अर्धवर्तुळाकृति मंडळ घेणें, शत्रूला फसविण्याकरितां एकदम वळसा घेऊन पुन्हा मागें फिरून एकाएकी वार करणें व मध्येंच हुलकावणी दाखविणें वगैरे प्रकारच्या युद्धकलेमध्यें दोघेही सारखेच निपुण असल्यामुळें हें तलवारींचें युद्ध बराच वेळ चाललें होतें; तरी त्याचा कांहींच निकाल लागेना. जेव्हां दोघांच्याही ढाली तुटल्या तेव्हां मात्र ही तलवारींची खणाखणी बंद झाली; पण लगेच दोघांची कुस्ती जुंपली. दोघांचीही छाती चांगली रुंद असून भरलेली होती. दंड पिळदार होते. मांड्या तयार होत्या. शिवाय दोघांनाही कुस्तींतील पेच चांगले माहीत होते. दस्ती ओढणें, कसोटा देणें, टकरा देणें, पट काटणें, ढुंगणी देणें, उखाड देऊन खालीं पाडणें व कंबरखोडा घालणें वगैरे कुस्तींतील सर्व प्रकार चालले होते. पण दोघांनाही त्या त्या पेचाच्या तोडी चांगल्या माहीत असल्यामुळें कांहीं वेळ कोणाचेंच कांहीं चालेना; पण सात्यकि आधींच दमला होता व त्यांतच हें भूरिश्रव्यासारख्या ताज्या दमाच्या रणशूर योध्याबरोबर बराच वेळ चाललेलें युद्ध, त्यामुळें तो अगदींच टेकीस आला. अशा स्थितींत भूरिश्रव्यानें उखाड देऊन सात्यकिला खालीं आपटला, व लांबडा करून स्वारी घातली. सात्यकीनें ती स्वारी सोडविली; पण लगेच भूरिश्रव्यानें पुन्हा त्याला खालीं पाडून त्याच्या छातीवर पाय दिला व एका हातानें त्याची शेंडी धरून गर्दन उडविण्याकरितां ह्मणून तलवार उगारिली. त्या

सरशीं सात्यकीनें त्याला वार करतां येऊं नये ह्मणून कुंभाराच्या चाकाप्रमाणें आपलें शरीर गरगर फिरवण्याला आरंभ केला. अशी सात्यकीची त्रेधा उडालेली पाहून श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाला, ' हे महाबाहो, तुझ्या देखत तुझ्या शिष्याची भूरिश्रव्यानें अशी त्रेधा उडवावी हें तुझ्या पराक्रमाला शोभत नाहीं. ' हें ऐकून अर्जुनाला मनामध्यें भूरिश्रव्याच्या पराक्रमाबद्दल फार आनंद झाला होता तरी तो श्रीकृष्णाला म्हणाला, 'केशवा, माझें सारें लक्ष्य जयद्रथाकडे गुंतल्यामुळें हें मला दिसलें नाहीं.' असें ह्मणून त्यानें झटदिशीं एक रुंद पात्याचा बाण सोडिला. ज्याप्रमाणें आकाशांतून वीज पडावी, त्याप्रमाणें हा बाण चटकन् भूरिश्रव्याच्या खाकेंतून पार झाला. त्यामुळें त्याचा हात वरील बाहुभूषणें व तलवार त्यांच्यासह एकदम तुटून खालीं पडला.

अशा रीतीनें सात्यकीला ठार करण्याचा आपला बेत फसलेला पाहून भूरिश्रव्यानें सात्यकीला तसाच सोडून देऊन आपण सात्यकीशीं युद्ध करीत असतां अर्जुनानें अधर्मानें आपल्यावर बाण सोडलेले पाहून युद्धाचा वीट येऊन त्यानें शरासन आंथरलें व त्याच्यावर मांडी घालून प्रायोपवेशनाच्या निश्चयानें सूर्याकडे दृष्टि लावून प्राणायाम करण्याला आरंभ केला. इतक्यांत सात्यकीनें भूरिश्रव्याचें डोकें उडविलें. त्याबरोबर सर्व सैनिक सात्यकीची निंदा करूं लागले.

याप्रमाणें भूरिश्रव्याचा निकाल लागल्यावर अर्जुन जयद्रथाला मारण्याकरितां झपाट्यानें पुढें चालला. तेव्हां दुर्योधन, कर्ण, वृषसेन, शल्य, अश्वत्थामा व कृपाचार्य वगैरे बडे बडे वीर त्याला अडविण्याकरितां मोठ्या नेटानें पुढें सरसावले; पण सूर्य अगदीं अस्ताचलाजवळ जात चालला असें पाहून श्रीकृष्ण अर्जुनाला ह्मणाला, ' ह्या कर्णादि सहा महावीरांच्या मध्यें तुझा शत्रु

जयद्रथ आपल्या जीवाच्या भीतीनें लपून बसला आहे. तेव्हां यांना जिंकल्याशिवाय त्याला मारतां यावयाचें नाहीं. याकरितां मी आतां आपल्या योगमायेनें सूर्याला झाकून टाकतों. तेणेंकरून जयद्रथाला सूर्यास्त झाला असें वाटेल. मग अर्थात् तो दुष्ट अत्यानंदानें तुझा मरण्याचा समारंभ पाहण्याकरितां बाहेर पडेल. मग तूं मनांत शंका न आणतां त्याला मार.' असें ह्मणून श्रीकृष्णानें लगेच योगमाया उत्पन्न करून सूर्याला झाकून सोडिलें. त्याबरोबर सर्व कौरवसैन्याला अतिशय हर्ष झाला, व जयद्रथ सुद्धां सर्वजण मोठ्या आनंदानें अर्जुनाकडे पाहूं लागले. तेव्हां श्रीकृष्ण अर्जुनाला ह्मणाला, 'अर्जुना, हा सूर्य आणि हा जयद्रथ. तुझी भीति सोडून सूर्याकडे हा कसा निर्भयपणें पहात आहे! ह्याला मारण्याचा योग्य काल हाच आहे; तर आतां ह्याचें डोकें तोडून तूं आपली प्रतिज्ञा पूर्ण कर.' असें श्रीकृष्णानें सांगितल्याबरोबर अर्जुनानें आकर्ण धनुष्य ओढिलें व पूर्वींच अभिमंत्रित करून ठेवलेला तेजस्वी बाण जोरानें त्यावर सोडिला. अर्जुनाच्या गांडीवापासून सुटलेल्या ह्या बाणानें जयद्रथाचें शीर उडवून दिलें.

घटोत्कचाचा वध.

जयद्रथ पडल्यावर कर्णानें द्रोणांची, पांडवांकडे त्यांचा ओढा आहे ह्मणून खूप खरडपट्टी काढून चवथे दिवशीं स्वतः पांडवांशीं निकरानें युद्ध चालवून त्यांची बरीच नासधूस चालविली. आपल्या सैन्याची अशी फजीति झालेली पाहून अर्जुन श्रीकृष्णाला कर्णाकडे आपला रथ नेण्याविषयीं आग्रह करूं लागला. तेव्हां श्रीकृष्ण अर्जुनाला ह्मणाला, 'ह्यानें मुद्दाम तुझ्याकरितां वासवी शक्ति राखून ठेविली आहे; ह्मणून ह्या वेळीं तूं त्याच्यावर चालून जाणें बरोबर होणार नाहीं. घटोत्कचाला लावून दे. तो बलवान् व

अस्त्रसंपन्न असून शिवाय त्याच्याजवळ राक्षसी माया आहे, यामुळें तो कर्णाला सहज जिंकून टाकील.' हें ऐकून अर्जुनानें घटोत्कचाचें स्मरण केलें. त्याबरोबर अंगांत चिलखत चढवून सशस्त्र असा तो मायावी राक्षस अर्जुनापुढें हजर झाला, व कृष्णार्जुनांना नमस्कार करून हात जोडून पुढें उभा राहिला. त्याला पाहून श्रीकृष्ण म्हणाला, 'कर्णानें पांचालांना फार त्रास दिला आहे. त्याची खोडकी जिरविणारा तुझ्यावांचून कोणी नाहीं. तूं स्वतः शूर असून राक्षसांना रात्रीं जास्ती बल येतें, म्हणून हे भीमपुत्रा, तूं आतांच जाऊन कर्णाला मार.'

ही आज्ञा मोठ्या उल्हासानें मान्य करून घटोत्कच कर्णावर चालून गेला. तेव्हां कर्णानेंही त्याच्याशीं निकरानें युद्ध केलें. बाणांनीं व शक्त्यांनीं एकमेकांचें शरीर अगदीं घायाळ होऊन गेलें होतें. मध्यरात्रीचा समय असल्याकारणानें घटोत्कचाबरोबरचे राक्षस आपल्या मायेनें आकाशांतून कर्णसैन्यावर दगड, मुसळ, गर्दे, तलवारी, व गदा ह्यांचा वर्षाव करीत होते. कर्णानें ह्या सर्व मायेचा फडशा पाडून घटोत्कचाचा व त्याच्या सेनेचा चांगलाच समाचार घेतला. आपल्या मायेचा प्रभाव चालत नाहींसें पाहून घटोत्कचानें ज्याला हजार कर्णे बसविले आहेत, असें एक मोठें चाक घेऊन कर्णावर फेकिलें; पण त्याचाही कर्णाच्या बाणांनीं मधल्यामध्येंच चुराडा उडविला. त्यानें लगेच पुन्हा गदा फेकिली. तिचीही पण तीच वाट लागली; नंतर दांतओठ खाऊन महा घोर अशी शक्ति त्यानें कर्णावर सोडिली. कर्णानें आपल्या हातांतील धनुष्य खालीं ठेवून ती शक्ति झेलली आणि नंतर ती तशीच पुन्हा घटोत्कचावर फेकिली. घटोत्कचानें ती पुन्हा आपल्यावरच आली असें पाहून रथाखालीं उडी घेतली त्याबरोबर रथ, घोडे व सारथि ह्या सर्वांचा चुराडा झाला. हें पाहून घटो-

त्कच लगेच गुप्त झाला व त्याच्या सैन्यानें कर्णावर लगट केली. इतक्यांत बकासुराचा भाऊ अलायुध याला युद्धाची वार्ता समजली. पूर्वीं भीमानें त्याचे भाऊ मारून हिडिंबेशीं संबंध केला होता; त्या कृत्याचा सूड घेण्याकरितां दुर्योधनाच्या संमतीनें तो या संधीस घटोत्कचावर तुटून पडला. घटोत्कचही कर्णाला सोडून त्यावर धावला. दोघेही मायावी असल्यामुळें त्यांचें युद्ध फार भयंकर झालें. अलायुधानें घटोत्कचावर लगट केली व त्याच्या डोक्यावर जोरानें परीघ हाणला. तो अगदीं मर्मस्थलावर बऱ्याच जोरानें बसल्यामुळें घटोत्कचाला मूर्छा आली; पण तो लवकरच शुद्धीवर येऊन त्यानें अलायुधावर गदा सोडिली ती त्यानें आपल्या गदेनेंच झाडून पाडिली, व आपल्या मायेनें घटोत्कचावर रक्त, मांस दगड व मुसल वगैरे फेकण्याला व झाडें उपटून मारण्याला सुरवात केली. घटोत्कचानेंही तेंच सुरू केलें. त्यामुळें दोघेही रक्तबंबाळ होऊन अगदीं दमून गेले. शेवटीं दोघांची कुस्ती जुंपली. त्यांत घटोत्कचानें अलायुधाची शेंडी ओढून त्याला खालीं पाडिलें व तलवारीनें त्याचें शीर कापून दुर्योधनापुढें नेऊन ठेविलें, व त्वेषानें दगड, बाण, गुर्दे, मुसळ, उखळ, तलवारी, रथांचीं चाकें व गदा यांचा वर्षाव करण्याला सुरवात केली. यामुळें कित्येक दगडांखालीं चिरडून मेले, कित्येक बाणांनीं घायाळ झाले, कित्येकांचे तलवारीनें हात, पाय व डोकीं तुटलीं, कित्येकांचे रथ मोडून पडले, घोडे ठार झाले व हत्ती निचेष्ट झाले. अशा रीतीनें एकच गोंधळ उडून गेला. ह्याच्या ह्या असह्य माऱ्यानें एकंदर एक अक्षौहिणी सैन्य मेलें. हें पाहून कौरवांच्या तोंडचें पाणी पळालें; तेव्हां कर्णानें आपल्या लोकांच्या रक्षणाकरितां पुष्कळ प्रयत्न केला. त्यानें दाही दिशांना झपाट्यानें बाणांचा वर्षाव केला; त्या राक्षसाची मायाशक्ति नष्ट करण्याकरितां पुष्क-

ळ अस्त्रप्रयोग केला; परंतु त्या सर्वांचा कांहीं उपयोग होईना. उलट अधिकाधिकच त्रास होऊं लागला. हें पाहून सर्व कौरवांनीं त्याची विनंति केली कीं, 'हे महाबाहो, आतां आमची उपेक्षा करूं नकोस. तूं जर उपेक्षा करशील तर आजच्या रात्रींच सर्व कौरवसैन्य नाहींसें होईल. तुझ्यांवाचून आह्माला दुसरा त्राता नाही. आतां तूं अर्जुनाकरितां राखून ठेविलेली ती अमोघ वासवी शक्ति सोड. त्यावांचून हा राक्षस मरावयाचा नाहीं. आज ह्यांतू-न जगलों तर उद्यां पांडवांचा समाचार घेतां येईल.' असें ते ह्मणत आहेत इतक्यांत आकाशांतून एक मोठी शिळा येऊन क-र्णाच्या रथावर पडली. त्यासरशीं घोडे व सारथि यांच्यासह सर्व रथाचा अगदीं चुराडा झाला. कर्णानें त्यांतून झटदिशीं बाहेर उडी मारली ह्मणून तो तेवढा वांचला. अशा रीतीनें घटोत्कचानें त्रास दिलेला पाहून कर्णानें मुद्दाम अर्जुनाकरितां ह्मणून राखून ठेविलेली आपली वासवी शक्ति घटोत्कचावर सोडिली. ती शक्ति सुटलेली पाहिल्याबरोबर घटोत्कचानें पर्वतरूप धारण केलें. पण त्या शक्तीनें त्या पर्वताला फोडून त्या भयंकर राक्षसाच्या काळ-जाचा ठाव घेतला. त्यासरशीं त्याचें तें अक्राळविक्राळ शरीर धाडकन् खालीं पडलें.

द्रोणांचा वध.

चार दिवसांत द्रोणांच्या हातून पांडवांचा नाश झाला नाहींसें पाहून दुर्योधन द्रोणाचार्यांकडे जाऊन त्यांना ह्मणाला, 'अहो आचार्य, तुमच्यासारखा शस्त्रास्त्रसंपन्न वीर देवलोकांतही कोणी नाहीं. असें असून तुमच्यानें या यःकश्चित् पांडवांचा नाश करणें होत नाहीं, हें माझेंच मंदभाग्य ह्मणावयाचें!' हें ऐकून द्रोणा-चार्यांना फारच राग येऊन ते त्याला ह्मणाले, 'दुर्योधना, मी

म्हातारा असूनही माझ्या शक्तीप्रमाणें युद्ध करीत आहें. आतां ज्यांना अस्त्रविद्या येत नाहीं अशांवर मीं अस्त्रप्रयोग करावा असें तुझ्या मनांत आहे त्याप्रमाणें मीं आज करतों; मग तें शुभ असो, अगर अशुभ असो. आज मी सर्व पांचालांचा नाश करून मगच कवच उतरीन हें तूं खास समज.' याप्रमाणें प्रतिज्ञा करून द्रोण जय्यत तयारीनें पांडवांवर चालून गेले असतां अर्जुन आपल्या लोकांनिशीं त्यांना तोंड देण्यास तयार होऊन उभा राहिला. आधींच पहाटेची वेळ. त्यांतून अर्जुनाच्या व दुर्योधनादि कौरवांच्या बाणवर्षावानें व योध्यांच्या गडबडीनें सर्व समरांगणावर धूळ उठली होती. त्यामुळें आपला व परका हें सुद्धां ओळखेना. इकडे समरभूमीच्या उत्तरेच्या बाजूला द्रोणाचार्य आपल्या तीक्ष्ण बाणांनीं पांचाल वीरांना देमाय धरणी ठाय करून सोडीत होते. त्यांच्या त्या असह्य माऱ्यापुढें कोणाच्यानें टिकाव धरवेना. हें पाहून, विराट, द्रुपद व द्रुपदाचे तिघे नातू द्रोणाचार्यांवर तुटून पडले. पैकीं द्रुपदाच्या नातवांना तर आचार्यांनीं पहिल्या सलामीसरसें एकेका बाणांतच स्वर्ग दाखविला. तें पाहून द्रुपद व विराट यांनीं त्यांवर बऱ्याच निकराचा हल्ला केला. तेव्हां आचार्यांनीं त्या दोघांचींही धनुष्यें तोडून टाकिलीं. तरीही न डगमगतां द्रुपदराजानें आचार्यांवर दहा तोमर व विराटराजानें एक तीक्ष्ण धारेची बर्ची फेंकिली. आचार्यांनीं त्यांचे तोमर व बर्ची ह्यांचा आपल्या रुंद फाळांच्या बाणांनीं चुराडा केला, व दोन भाले फेकून दोन्ही राजांना यमलोकीं पाठविलें.

राजा द्रुपद, त्याचे तीन नातू व विराट राजा यांचा वध झालेला पाहून धृष्टद्युम्न फारच चवताळला; त्यानें आपल्या सर्व सैनिकांना 'आज ज्याच्या हातून द्रोणाचार्य जिवंत सुटतील, किंवा द्रोणाचार्यांकडून जो आज पराभव पावेल, त्याचें आजपर्यंतचें

संचित पुण्य नाहींसें होईल, ' अशी शपथ घालून पांचालवीर धृष्टद्युम्न हा आपल्या सर्व सैन्यानिशीं वेगानें आचार्यांवर तुटून पडला. त्यासरशीं दुर्योधनादि कौरववीरही अर्जुनाला सोडून आचार्यांच्या रक्षणाला धावले. त्यांच्या बाणांच्या तडाक्यानें पांचालवीर पटापट मरून पडूं लागले. वणव्याप्रमाणें हे आमचें सर्वच सेनावन जाळून टाकताहेत कीं काय असें पांडवांना वाटूं लागलें. अशा रीतीनें सर्व सेना घाबरून गेलेली पाहून श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाला, ' इंद्रादि देवांच्यानें सुद्धां ह्यांना जिंकवणार नाहीं. हे ज्या वेळेस शस्त्र खालीं ठेवतील त्याच वेळेस ह्यांना जिंकतां येईल. अश्वत्थामा मेल्यावर मात्र हे युद्ध करणार नाहींत, असें मला वाटतें. ह्मणून कोणी तरी जाऊन ह्यांना अश्वत्थामा मेला असें सांगा. ' हें श्रीकृष्णाचें बोलणें अर्जुनाला मुळींच आवडलें नाहीं. बाकीच्या पांडवांना मात्र तें आवडलें. ह्याला धर्मराजाची संमति मिळाली; पण पूर्ण संमति मिळाली नाहीं. पांडवांच्या सैन्यांमध्यें इंद्रवर्मा नांवाच्या मालवाधिपतीचा अश्वत्थामा नांवाचा एक हत्ती होता; त्याला भीमानें आपल्या गदेनें मारिला व द्रोणांजवळ जाऊन ' अश्वत्थामा ठार झाला अश्वत्थामा ठार झाला, ' असें तो मोठ्यानें ओरडला. त्याबरोबर आचार्यांचे पाय गळाले; पण इतक्यांत त्यांना आपल्या मुलाच्या शौर्याची आठवण झाली, त्यामुळें त्यांना आपल्या मुलाच्या मरणाबद्दल शंका वाटली व थोडासा धीरही आला. त्याबरोबर पुन्हा त्यांनीं दुप्पट वेगानें धृष्टद्युम्नावर हल्ला केला; तेव्हां एकदम वीस हजार पांचालवीरांनीं त्यांच्यावर बाणांचा मारा करून त्यांना अगदीं झाकून टाकिलें. ह्या सर्व बाणांचा फडशा पाडून आचार्यांनीं रागानें त्यांच्या नाशाकरितां ब्रह्मास्त्राचा प्रयोग केला, व पुन्हा बाणांचा वर्षाव करण्याला सुरवात केली. त्याबरोबर कोणाचे हात, कोणाचे पाय, कोणाचें डोकें

व कोणाचें सबंध धड तुटून पडूं लागलें. हत्ती व मनुष्यें ह्यांचा सारखा नाश होऊं लागल्यामुळें सर्व रणांगणांतून रक्तमांसाचा चिखल होऊन राहिला. ह्या कत्तलीमध्यें एकंदर वीस हजार पांचालरथी, मत्स्यांकडील पांचशें रथी, सृंजयाकडील सहा हजार रथी, दहा हजार हत्ती व दहा हजार घोडे इतकें सैन्य द्रोणाचार्यांच्या बाणांना बळी पडलें. त्याचप्रमाणें वसुदानाचें शीर ह्याच कत्तलींत उडालें. द्रोणांनीं चालविलेली ही भयंकर कत्तल पाहून विश्वामित्र, जमदग्नि, भरद्वाज, गौतम व वसिष्ठ वगैरे सर्व ऋषींनीं अग्नीसह येऊन आचार्यांना सांगितलें कीं, ' तूं अधर्मानें युद्ध करीत आहेस, तेव्हां तुझा अंतकाळ जवळ आला आहे. आतां हातांतलें शस्त्र खालीं ठेवून आमच्याकडे पहा, व पुन्हा असलें क्रूर कर्म करूं नकोस. सर्व वेद व वेदांगें ह्यांचें ज्याला ज्ञान आहे व जो नेहमीं सत्यधर्मानें वागत आहे अशा सत्वशील ब्राह्मणाला असलें कृत्य शोभत नाहीं. ज्यांना अस्त्रविद्या येत नाहीं अशा मनुष्यांवर तूं अस्त्रप्रयोग केला आहेस ह्मणून हे द्रोणा, आतां शस्त्र खालीं ठेवून हा अधर्म बंद कर ' हें ऋषींचें भाषण ऐकून व भीमाच्या शब्दाची आठवण होऊन द्रोणाचार्यांना फार वाईट वाटलें. नंतर त्यांनीं अश्वत्थाम्याच्या मरणाबद्दल खरें खोटें समजून घेण्याकरितां युधिष्ठिराला विचारिलें. तिन्ही लोकांकरितां सुद्धां युधिष्ठिर खोटें बोलणार नाहीं अशी त्यांची खात्री होती. आतां जर युधिष्ठिर खरें सांगेल तर हा ब्राह्मण आतांच्या आतां निष्पांडवी पृथ्वी करील, कधींही सोडणार नाहीं, हें लक्ष्यांत आणून श्रीकृष्ण धर्मराजाला म्हणाला, 'मी तुला खात्रीनें सांगतों कीं, हा द्रोण जर दोनप्रहरपर्यंत अशाच आवेशानें लढेल तर तुह्मा सर्वांचा नाश करून टाकील; ह्मणून ह्या वेळीं खोटें बोलून आमचे प्राण वांचीव. अगदीं जिवाशीं येऊन बेतल्यावर खो-

टें बोललें असतां दोष नाहीं.' अशा रीतीनें श्रीकृष्ण धर्माला सांगत असतांना भीम मध्येंच ह्मणाला, 'द्रोणाचार्यांच्या वधाची युक्ति श्रीकृष्णानें सांगितल्यावर मीं मालवाधिपतीच्या अश्वत्थामा नांवाच्या हत्तीला मारून टाकिली आहे. तेव्हां अश्वत्थामा मेला असें सांगण्याला कांहीं हरकत नाहीं.' हें भीमाचें व श्रीकृष्णाचें भाषण ऐकून राजा धर्मानें भीत भीत 'होय, अश्वत्थामा मेला,' असें सांगितलें. युधिष्ठिराच्या तोंडचे हे शब्द ऐकल्याबरोबर द्रोणाचार्यांचे हातपाय गळले. ते पुत्रशोकानें स्वतःच्या जीविताबद्दल सुद्धां निराश झाले. 'आपण पांडवांचे फार अपराधी आहों,' असें त्यांना वाटूं लागलें याप्रमाणें पुत्रशोकानें त्यांचें मन उद्विग्न झाल्यामुळें धृष्टद्युम्न त्यांच्यापुढेंच उभा होता तरीही त्यांच्यानें त्याच्याशीं युद्ध करवेना. धृष्टद्युम्न आपलें धनुष्य सज्ज करून द्रोणांवर चालून आला. त्यांनीं धनुष्य खालीं फेकून देऊन कर्ण, कृपाचार्य व दुर्योधन यांना हाक मारून सांगितलें कीं, धीर धरून शौर्यानें लढा. मी आतां शस्त्र खालीं ठेवतों.' असें ह्मणून द्रोणाचार्यांनीं अश्वत्थाम्याबद्दल शोक करीत करीत धनुष्य खालीं ठेविलें, व एकाग्र मन करून ताठ बसून हनुवटी उराला लावून ॐकारस्वरूपी परमात्म्याचें ध्यान चालविलें. त्यावेळचें आचार्यांचें तेज प्रतिसूर्यासारखें होतें. इतक्यांत धृष्टद्युम्नानें विजेसारखी चमकणारी तीक्ष्ण धारेची तलवार घेऊन आचार्यांच्या रथावर उडी घेतली; व सर्वजण 'नको नको,' ह्मणत असतां पंचाऐशी वर्षांचे वृद्ध पण सोळा वर्षांच्या तरुणाप्रमाणें शूर व चलाख अशा आचार्यांचें टक्कल पडलेलें पांढऱ्या केसांचें डोकें झटदिशीं धडापासून वेगळें केलें.

आचार्यांच्या मरणानें कौरव सनत फारच हाहाःकार उडाला. सर्वांच्या डोळ्यांतून एकदम दुःखाश्रूंचे लोट चालले. त्यांचे

हातपाय लटपटून भयानें ते पळूं लागले. आपले सर्व लोक पळताहेतसें पाहून ' भ्याल्यासारखी ही सेना पळत कां सुटली आहे, ' ह्मणून अश्वत्थाम्यानें दुर्योधनाला विचारिलें. अश्वत्थाम्याला पाहून दुर्योधनाचा कंठ दाटून आला. डोळे पाण्यानें भरून आले. त्याच्यानें कांहींच बोलवेना, ह्मणून त्यानें मोठ्या कष्टानें, जवळच उभे असलेल्या कृपाचार्यांना अश्वत्थाम्याला सर्व हकीकत सांगण्यास सांगितलें. त्यावरून कृपाचार्यांनीं मोठ्या दुःखानें झालेली सर्व हकीकत त्याला सांगितली. त्याबरोबर अश्वत्थाम्यानें लाथ लागलेल्या सापाप्रमाणें फुसफुसून करकर दांत खात पाय आपटले. पितृवियोगानें त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या. तो रागानें दुर्योधनाला ह्मणाला, ' या नीचांनीं माझ्या तातांना कसें मारिलें हें कळलें. युद्धांत जय किंवा अपजय ह्यांपैकीं कांहीं तरी एक येणारच. रणांत मरण येणें हें फार चांगलें. धर्मानें युद्ध करीत मेल्यानें माझे वडील सद्गतीला गेले आहेत, तेव्हां त्याबद्दल मला मुळींच वाईट वाटत नाहीं; पण सर्व राजे लोकांच्या देखत शत्रूनें त्यांची शेंडी धरून मान कापिली हें ऐकून मात्र माझें काळीज तुटतें. जे जशीं कर्मे करितात तशीं तें फळें भोगतात. त्याचप्रमाणें या दुरात्म्या धृष्टद्युम्नानें हें मोठें अघोर कर्म केलें आहे. आतां त्याला त्याचें फळही तसेंच मिळेल. तसेंच ह्या धर्मानेंही खोटें बोलून आपल्या गुरूंना फसविलें व त्यांना शस्त्र ठेवावयास लाविलें ! मी आतां तुला शपथपूर्वक सांगतों कीं, ह्या धृष्टद्युम्नाला ठार केल्याशिवाय मी जिवंत रहाणार नाहीं. मी जिवंत असतांना शत्रूनें माझ्या तातांची शेंडी धरिली तेव्हां धिक्कार असो ह्या माझ्या पुत्रत्वाला व या माझ्या क्षात्रविद्येला ! जेणेंकरून आतां माझ्या स्वर्गस्थ वडिलांच्या ऋणांतून मी मुक्त होईन असेंच कर्म मला केलें पाहिजे. शहाण्यानें आप-

ली स्तुति कधींही करूं नये; परंतु हा अपमान मला सहन होत नाहीं; ह्मणून मी आपलें सामर्थ्य बोलून दाखवीत आहें. ह्या लोकांमध्यें मजवांचून व अर्जुनावांचून अस्त्रविद्या पूर्ण येणारा कोणीच नाहीं. पण आज मी ज्या अस्त्राचा प्रयोग करणार आहें, तें अस्त्र अर्जुनालाही माहीत नाहीं. भगवान् नारायणानें प्रसन्न होऊन माझ्या वडिलांना तें अस्त्र दिलें व तें त्यांच्यापासून मला मिळालें. हें अस्त्र इतकें दिव्य आहे कीं, तें कधींही विफल व्हावयाचें नाहीं. शिवाय ह्याच्यावर कोणत्याही अस्त्राची मात्रा चालणार नाहीं. म्हणून 'तूं सहसा ह्याचा प्रयोग करूं नकोस,' असें माझ्या वडिलांनीं मला सांगितलें आहे. म्हणून तुला सत्य सांगतों कीं, मी ह्या अस्त्रप्रभावानें आज सर्व पांडवांचा पराभव करून त्यांच्या देखत ह्या धृष्टद्युम्नाला–ब्रह्मघातकी, मित्रघातकी व गुरुद्रोही अशा ह्या अधमाधमाला–यमलोकाला पाठवितों.' असें म्हणून अश्वत्थाम्यानें डोळ्यांना पाणी लावून शुचिर्भूत होऊन नारायणास्त्राचा पांडवांवर प्रयोग केला. त्याबरोबर बाण, भाले, बर्च्या, शूल, गुर्दे, मुसळ, फरशा व तलवारी वगैरे हत्यारें पांडवांवर येऊन पडूं लागलीं. पांडवांनीं आपली शिकस्त केली, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. ते जसजसे नेटानें युद्ध करीत तसतसे त्यांचे अधिकच लोक गारद होऊं लागले. हें पाहून राजा धर्म अगदीं घाबरून गेला. तो ह्मणाला, 'धृष्टद्युम्ना, तूं आपल्या सर्व पांचालांसह येथून लवकर निघून जा. सात्यकि, तूंही आपले लोक घेऊन येथून पळ काढ. श्रीकृष्ण आपल्या स्वतःच्या रक्षणापुरता समर्थ आहे. तो दुसऱ्यांना युक्त्या सांगतों, मग त्याचें स्वतःचें रक्षण करणें त्याला काय अवघड आहे? मी तुह्मा सर्वांना सांगतों कीं, आतां तुह्मी युद्धाच्या नादीं लागूं नका. मीही आपल्या सर्व भावांसहवर्तमान चितेमध्यें प्रवेश करितों.

भीष्मद्रोणासारख्यांच्या पराक्रमसागरांतून तरून आतां अश्वत्थाम्याच्या एवढ्याशा डबक्यांत सर्व गणगोतांसह बुडून मरण्याची पाळी आली आहे. युद्धामध्यें मीं आचार्यांसारख्या पुण्य पुरुषांचा वध केला ! युद्धाविषयीं अजाण असा माझा बाळ अभिमन्यु शस्त्रहीन होऊन जेव्हां शत्रूंच्या कचाट्यांत एकटाच सांपडला, तेव्हां मीं त्याचें रक्षण केलें नाहीं. साध्वी द्रौपदीचा जेव्हां ह्या दुष्टांनीं छळ केला, तेव्हांही मीं तिची उपेक्षाच केली. माझ्या सुखाकरितां मीं आजपर्यंत हजारों पांचालांचे धारातीर्थी व्यर्थ बळी पाडिले. आतां उगीच जिवंत राहून तरी काय उपयोग ? आजपर्यंत माझ्याकरितां जे जे मेले त्या सर्वांकरितां मी आज माझ्या सर्व भावांसह चितेंत उडी घेतों. ' असें धर्मराज म्हणत आहे तोंच श्रीकृष्ण सर्वांना मोठ्यानें म्हणाला, ' आधीं हातांतलीं शस्त्रें खालीं टाका. तुह्मी जसजसे लढाल तसा तसा तुमचा संहारच होत जाईल. ह्या अस्त्राचा असा नियम आहे कीं, जो ह्याच्या प्रतिकाराबद्दल प्रयत्न करील त्यालाच हें अस्त्र ठार करील, व जो कोणी शस्त्रें टाकून देऊन जमिनीवर उभा राहील, त्याला हें अस्त्र शिवणार सुद्धां नाहीं म्हणून तुह्मी आपापले रथ, हत्ती व घोडे वगैरे सर्व सोडून देऊन खालीं जमिनीवर उभे रहा व शस्त्रें टाकून द्या. ' असें श्रीकृष्णानें सांगितल्याबरोबर सर्वजण पटापट हत्यारें खालीं टाकूं लागले. हें पाहून भीमसेनानें आपली व आपल्या गदेची प्रशंसा करून सैनिकांना शस्त्रें ठेवूं नका म्हणून सांगितलें, व अर्जुनालाही गांडीव खालीं न ठेवण्याविषयीं आग्रह केला; परंतु अर्जुन म्हणाला, ' नारायणास्त्र, गाय व ब्राह्मण ह्यांच्याशीं जेव्हां प्रसंग येईल, तेव्हां मला माझें गांडीव खालीं ठेविलेंच पाहिजे. ' भीमानें अश्वत्थाम्यावर चाल केली व त्याला आपल्या बाणांनीं झाकून टाकिला. तेव्हां अश्व-

त्थाम्यानें हासून त्याचा थोडासा धिक्कार केला. अश्वत्थाम्याच्या अस्त्रप्रभावानें जे बाण सुटत ते सर्व भीमावरच येऊन धडकत. त्यामुळें सर्व पांडववीर अगदीं घाबरून गेले. नारायणास्त्राचें तेज जसें जसें अधिक होऊं लागलें तसातसा अश्वत्थाम्याला अधिकाधिक आनंद होऊं लागला. हें पाहून कृष्णार्जुनांनीं वारुणास्त्राचा प्रयोग केला. त्यामुळें त्या दोन्ही अस्त्रांची टक्कर चालली. इतक्यांत कृष्णार्जुन भीमाच्या रथांकडे गेले व त्याच्या हातांतलीं शस्त्रें काढून घेऊन त्यालाही खालीं ओढला; त्याबरोबर तें नारायणास्त्र शांत झालें.

कर्णसेनापत्य.

द्रोणाचार्य पडून अश्वत्थाम्याचा मोड झाल्यावर युद्ध बंद करून सर्व कौरववीर आपापल्या तळाकडे परतले. भीष्माचार्य व द्रोणाचार्य यांच्यासारखे अतिरथी युद्धांत कामीं आल्यामुळें कौरवांचीं तोंडें अगदीं सुकून गेलीं. अपजयानें चित्त उद्विग्न होऊन आतां पुढें काय करावें हें त्यांना सुचेना. तळावर गेल्यावर सर्वजण एके ठिकाणीं जमून विचार करूं लागले, व सर्वानुमतें कर्णाला सेनाधिपतीचा अभिषेक करण्याचें ठरलें. दुर्योधनाच्याही मनांत तेंच होतें. कर्णाइतका त्याचा भरवसा कोणावरही नव्हता. काय करील तर कर्णच करील असें त्याला वाटत होतें. त्यांत पुन्हा अश्वत्थाम्याचा रुकार पडल्यामुळें त्याला फार बरें वाटलें. प्रतिसूर्यासारख्या कर्णाला दिव्य रथांत बसलेला पाहून कौरववीरांना धीर आला. नौबदीच्या आवाजानें, कर्णाच्या शंखनादानें थोड्याच वेळांत राजेलोक आपापल्या पथकांसह कर्णाच्या रथाभोंवतीं जमले. मग लगेच कर्णानें मकरव्यूहाची रचना केली. सैन्याच्या अघाडीला ह्मणजे त्या व्यूहाच्या अगदीं तोंडावर, स्वतः

कर्ण आपल्या खाजगी सेनेनिशीं उभा राहिला. शकुनि व उलूक दोन्ही डोळ्यांच्या ठिकाणीं उभे राहिले. अश्वत्थाम्यानें डोक्याची बाजू संभाळिली. मानेवर सर्व कौरवबंधू राहिले. मध्यभाग राजा दुर्योधनानें आपणाकडे घेतला. नारायणाच्या शूर गोपालसेनेला बरोबर घेऊन कृतवर्म्यानें डाव्या पायाकडची बाजू रोखून धरिली. शूर दक्षिणी लढवय्यांना आपल्या हाताखालीं घेऊन कृपाचार्यांनीं उजव्या पायाकडची बाजू पतकरिली. शल्य आपल्या पथकानिशीं मागल्या डाव्या पायावर उभा राहिला. तीनशें हत्ती व हजार रथी ह्यांना बरोबर घेऊन सुषेणानें उजवी बाजू रोखून धरिली व अगदीं पिछाडीला ह्मणजे त्या कूर्मव्यूहाच्या शेकटीवर चित्र व चित्रसेन ह्या दोघा भावांची नेमणूक झाली. अशा रीतीनें आपल्या सेनेची कूर्मव्यूहामध्यें रचना करून कर्णानें कुचाची नौबद वाजविण्यास सांगितलें.

ती नौबद वाजतांना ऐकून अर्जुनानें आपल्या सेनेची अर्धचंद्राकार रचना केली. डाव्याबाजूला भीम, उजव्या बाजूला धृष्टद्युम्न, मध्यें राजा धर्म, त्याच्यामागें त्याचें रक्षण करण्याकरितां नकुलसहदेव यांना उभे करून बाकीच्या वीरांनाही त्यांच्या योग्यतेप्रमाणें कमीजास्त मान्याच्या जागीं ठेवून स्वतः अर्जुन व्यूहाच्या मध्यभागीं धर्माच्या शेजारींच उभा राहिला. युधामन्यु व उत्तमौजा हेही अर्जुनाचें चक्ररक्षण करण्याकरितां त्याच्याबाजूला उभे राहिले. नंतर अर्जुनानेंही कुचाची इशारत केली. त्याबरोबर शंख, भेरी डंके, लगेडंके, नगारे, झांजा व नौबदी इत्यादि रणवाद्यांचा गजर चालू झाला. हा गजर ऐकून योध्यांना स्फुरण चढून त्यांनींही सिंहगर्जना करण्याला प्रारंभ केला.

याप्रमाणें गर्जना करीत विजयाच्या लालसेनें व स्वर्गाच्या आशेनें जिवावर उदार झालेले वीर एकमेकांच्या नरडीचा घोट घे-

ण्याकरितां आतुर होऊन एकदम एकमेकांवर तुटून पडले. पहिल्या प्रथम कांहीं वेळ रथी रथ्यांवर, हत्ती हत्तींवर, स्वार स्वारांवर व पायदळ पायदळांवर अशा रीतीनें व्यवस्थेशीर युद्ध चाललें होतें; पण लौकरच ती घडी बिघडली. हत्तीवरील लोक रथ्यांवर घसरले, रथ्यांनीं घोडेस्वारांवर हल्ला केला, व घोडेस्वारांनीं पायदळांवर चाल केली. अशा रीतीनें ज्याच्या तडाक्यांत जो सांपडेल किंवा ज्याच्या निर्बलतेची खात्री असेल त्याला गांठून कंठस्नान घालण्याचा सपाटा सुरूं झाला.

अशाप्रकारें युद्धाची गर्दी चालली असतां मध्येंच भीम आपली बाजू सोडून हत्तीवर बसून कौरवसैन्यांत घुसला. हें पाहून क्षेमधूर्तीनें त्याच्यावर लगट केली. दोघेही वीर बलवान् होते, व दोघेही वीर हत्तींवरच स्वार झाले होते. त्यामुळें हत्तीहत्तींची टक्कर व योध्यायोध्यांची लढाई एकदम चालू झाली. दोघांचेही हत्ती उत्तम शिकविलेले असल्यामुळें चक्राकार फेरा घेऊन एकदम शत्रूशीं लगट करण्यांत व तसाच झटदिशीं वळसा घालून शत्रूपासून लांब उभे रहाण्यांत ते चांगले पटाईत होते. ह्यामुळें ह्या दोघांही वीरांना आपल्या प्रतिपक्ष्यावर वार करून त्याचा वार चुकविण्याला चांगली सवड सांपडत असे. प्रथमतः कांहीं वेळ ह्या दोघांनीं एकमेकांवर बाणांचा वर्षाव केला; पण पुढें लौकरच दोघांचींही धनुष्यें तुटून पडलीं; त्यामुळें केवळ भाल्याशींच प्रसंग आला. क्षेमधूर्तीनें जो भाला मारिला तो इतक्या जोरानें मारिला कीं, भीमाच्या अंगांतील चिलखत फोडून तो आंत घुसला. तरी स्वस्थ न बसतां भीमानें तसाच उलट त्याच्यावरती एक भाला फेंकिला; तेव्हां क्षेमधूर्तीच्या हत्तीनें रणांतून पळ काढिला. क्षेमधूर्तीनें त्याला आवरून धरण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. आपला

प्रतिपक्षी पळत सुटला हें पाहून भीमाच्या हत्तीनें त्याच्यावर लगट केली. आतां पळून निभाव लागणार नाहीं असा विचार करून क्षेमधूर्तीनें आपला हत्ती चटकन् तेथेंच उभा केला, व भीमाच्या हत्तीवर तीक्ष्ण बाणांचा वर्षाव चालविला. त्याबरोबर भीमाचा हत्ती घायाळ होऊन खालीं पडला; पण त्याच्या आधींच, ह्मणजे हत्ती खालीं पडणार असें वाटल्याबरोबरच, भीमानें खालीं उडी टाकिली, व क्षेमधूर्तीवर गदा फेंकिली. त्यासरशीं क्षेमधूर्ती व त्याचा हत्ती या दोघांचाही एकदम चुराडा झाला.

दुःशासनवध.

पहिले दिवशीं कौरवांचा बराच मोड होऊन ते हताश झाले होते. दुसरे दिवशीं सकाळीं अगदीं पहाटेस कर्ण दुर्योधनाकडे जाऊन ह्मणाला, ' राजा, मी आज अर्जुनाशींच लगट करतों. मी तरी त्याला मारीन किंवा तो तरी मला मारील. दोन्ही पक्षांकडे पुष्कळ वीर शिल्लक असल्यामुळें आजपर्यंत माझी त्याची प्रत्यक्ष गांठ पडली नाहीं. आतां आमच्यापैकीं बहुतेक सैन्य कामास आलें आहे. हें माझें विजय नांवाचें धनुष्य पूर्वी विश्वकर्म्यानें मुद्दाम इंद्राकरितां तयार केलें होतें. हें दिव्य धनुष्य मजजवळ असतांना अर्जुनाचें मजपुढें काय चालणार आहे? आतां ज्याप्रमाणें मीं तुजपुढें माझें सामर्थ्य सांगितलें, त्याप्रमाणेंच मला माझा कमीपणाही तुला सांगितला पाहिजे. अर्जुनाच्या धनुष्याची दोरी दिव्य असून ती कधीं तुटत नाहीं. त्याच्या बाणांचे भाते अक्षय्य आहेत. तो युगानुयुगें जरी युद्ध करीत राहिला, तरी त्याच्या भात्यांतील बाण ह्मणून सरावयाचे नाहींत; तसाच त्याचा रथही दिव्य आहे, तो कधींही व कशानेंही मोडावयाचा नाहीं. घोडे तर मनोजवच आहेत. केवळ आपल्या भुभुःकारानें-

च सर्व सेनेला पळवून लावणारा मारुती त्याच्या ध्वजावर आहे. पण या सर्वांत विशेष गोष्ट ही कीं, प्रत्यक्ष श्रीकृष्ण त्याचा सारथि आहे. मद्राधिप शल्य हा सारथ्य करण्यांत श्रीकृष्णाच्या तोडीचा आहे. तो जर माझें सारथ्य करील तर फार बरें होईल.' हें ऐकून दुर्योधन शल्याकडे वळून अतिशय नम्रपणें त्याला ह्मणाला, ' हे महाभाग मद्रेश्वर, आतां कर्ण जें बोलला, तें आपण ऐकिलेंच. तेव्हां आमच्यासाठीं आपण आज कर्णाचें सारथ्य करा एवढी मी आपल्याला हात जोडून प्रार्थना करतों. आपण सारथि झालांत ह्मणजे कर्ण अर्जुनाला सहज जिंकील. ' हें दुर्योधनाचें भाषण ऐकून शल्य रागानें डोळे लाल करून कपाळाला आठ्या घालून दुर्योधनाला ह्मणाला, ' हे अंधपुत्रा, माझा असा अपमान करतोस काय? अगदीं निःशंकपणें मला कर्णाचा सारथि हो म्हणतोस त्यांत तुला कांहींच वाटत नाहींना? तुला माझ्यापेक्षां कर्णाची योग्यता जास्त आहे असें वाटतें; पण मी त्याला कस्पटाप्रमाणें लेखतों. आतांच पाहिजे असेल तर त्याला मजपुढें उभा कर. मी त्याचा फडशा पाडून आल्या वाटेनें परत जातों, किंवा मी एकटाच त्या पांडवांवर चालून जाऊन त्यांचा नाश करतों. तूं मला काय ह्मणून या हीनकुलांत जन्मलेल्या राधेयाचें सारथ्य करण्यास सांगतोस? तिन्ही वर्णांची सेवा करावी हेंच शूद्रांना विहित आहे. त्या शूद्रांपैकींच हे सूत! मग त्यांची सेवा उच्च कुलांत जन्मलेल्या क्षत्रियानें करावी असें कोठें तरी ऐकिलें आहेस काय? व तें कधीं योग्य होईल काय? मी मूर्धाभिषिक्त राजा आहें; शिवाय महारथ्यांमध्यें माझी गणना होते. मग मी अशा प्रकारचा बलवान् व ऐश्वर्यसंपन्न असून मला यःकश्चित् शूद्रपुत्राची सेवा कर म्हणतोस हें मला मुळींच सहन होत नाहीं. ' असें म्हणून शल्य निघून जाऊं लागला. नंतर

दुर्योधनानें पुष्कळ आर्जव करून त्याला थांबवून धरिलें. तो त्याला अत्यंत गोड शब्दांनीं म्हणाला, ' आपण ह्मणतां तें सर्व खरें आहे. कर्ण आपल्यापेक्षां अधिक आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. शत्रूच्या डोळ्यांत आपल्या पराक्रमानें रात्रंदिवस आपण सलत असतां म्हणूनच आपल्याला शल्य असें ह्मणतात. आपण गुणांनीं व पराक्रमानें कर्ण, अर्जुन व श्रीकृष्ण या सर्वांपेक्षां अत्यंत श्रेष्ठ आहां असें मला वाटतें, व सर्व जगहीं असेंच म्हणतें. कर्ण अस्त्रविद्येंत अर्जुनापेक्षां अधिक निपुण आहे व सारथ्यकलेंत आपण श्रीकृष्णापेक्षां अधिक कुशल आहां. शिवाय रथ्यापेक्षां सारथिच अधिक शूर व कुशल असावा लागतो. त्याप्रमाणें आपण कर्णापेक्षां युद्धकलेंत अधिक निपुण आहां, म्हणूनच आपल्याला मीं त्याचें सारथ्य करण्यास सांगितलें.' हें ऐकून शल्य दुर्योधनाला आलिंगन देऊन ह्मणाला, ' बा दुर्योधना, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें मी सर्व करतों, पण युद्धप्रसंगीं मला जें योग्य वाटेल मग तें प्रिय असो वा अप्रिय असो, तें मी बोलत जाईन. त्याबद्दल तूं किंवा कर्णानें रागावतां कामा नये.' यावर दुर्योधनानें बरें ह्मणून तें कबूल केल्यावर शल्यानें कर्णाचें सारथ्यकर्म पतकरिलें.

नंतर कर्णानें आपल्या रथाची विधिपूर्वक पूजा करून प्रथम शल्य रथावर चढल्यावर त्याचे मागोमाग तोही आपलें धनुष्य सज्ज करून रथांत बसून युद्धाला निघाला. त्यामुळें कौरवांना हर्ष होऊन ते त्याच्या मागोमाग निघाले. शुभसूचक रणवाद्यांचा गजर चालू झाला. दोन्ही दळें एकमेकांशीं भिडल्याबरोबर शंख वाजूं लागले, नगारे दुमदुमूं लागले, भेरींचा भयंकर शब्द ऐकूं येऊं लागला, व त्यांतच दोन्ही पक्षांकडील योद्धे वीरश्रीनें बेफाम होऊन सिंहगर्जना करूं लागले. त्याबरोबरच घोड्यांचें

खिंकाळणें व हत्तींचें ओरडणें हीं सुरू झालीं, व सर्व आवाजांच्या मिश्रणानें एक मोठा आवाज निघून तो त्या रणभूमीवरील भ्याडांना घाबरवून पळवूं लागला. पण धीट पुरुषांना त्यानें जास्त जास्तच चेव चढत चालला. त्यामुळें त्यांचें युद्धही फार भयंकर होऊं लागलें. रणांगणांत जिकडे तिकडे मुडद्यांची रास पडूं लागली. घोडे, हत्ती, उंट वगैरे जनावरें बाणांच्या व शस्त्रांच्या माऱ्यांनीं घायाळ होऊन जागच्या जागीं उताणीं पडूं लागलीं. मोठमोठे रथी शत्रूंच्या बाणांनीं गतप्राण होऊन पडूं लागले. रणभूमि शिरकमलांनीं भरून गेली. घायाळ झालेल्या लोकांच्या दुःखकर आरोळ्या, मारा सहन न झाल्यामुळें होणारा हत्तींचा चीत्कार, घोड्यांचे खिंकाळणें, व आवेशांत आलेल्या शत्रूंच्या गर्जना या सर्वांचा एकच गोंधळ उडून गेला. कांहीं वेळ रथी रथ्यांशीं झुंजूं लागले, पायदळांनीं पायदळांवर लगट केली, स्वारांनीं स्वारांवर चाल केली, व गजयोधी गजयोध्यांशीं टक्कर देऊं लागले; पण लवकरच सर्वांचा संकर होऊन ज्याला जो सांपडेल त्याला तो मारीत सुटला. कित्येक वीर आपल्या शस्त्रास्त्रांची पुंजी संपल्यामुळें धैर्य खचूं न देतां उलट अधिक त्वेषानें आपल्या शत्रूवर चालून जाऊन आपल्या मुष्टींचा प्रहार करूं लागले, शत्रूंचे केस धरून त्यांना खालीं पाडूं लागले, व नखांनीं बोचकारूं लागले. अशा रीतीनें युद्धाची गर्दी चालल्यामुळें त्या रणभूमीवर अतिशय धुरळा उठला; त्यामुळें आपला व परका हें देखील कांहीं वेळ ओळखूं येईना. लवकरच त्या रणांगणांतून रक्ताचा पाट वाहूं लागला. जिकडे तिकडे योद्ध्यांच्या शरीरांतून रक्तांच्या चिळकांड्या उडत असल्यामुळें सर्व समरभूमि व तींत लढणारे योद्धे अगदीं लालबुंद होऊन रणभूमीला भयंकर स्वरूप आलें.

या घनघोर गर्दीमध्यें भीमदुःशासनांची गांठ पडून दोन मदोन्मत्त हत्ती ज्याप्रमाणें एकमेकांशीं अति त्वेषानें झुंजतात त्याप्रमाणेंच हे दोघेही वीर आजपर्यंत मनांत साठून राहिलेल्या वैराचा वचपा काढण्याकरितां एकमेकांवर आवेशानें तुटून पडले. त्यांचें युद्ध फारच भयंकर झालें. दुःशासनाला पाहिल्याबरोबर भीमानें दोन तीन रुंद फाळांचे बाण सोडून त्याचें कपाळ फोडिलें व सारथ्याचें डोकें उडविलें; तरी न डगमगतां दुःशासनानें स्वतःच घोडे आवरून धरून भीमावर जोरानें बाणांची वृष्टि केली. त्यांतील बरेच बाण मर्मीं लागल्यामुळें भीम मूर्च्छित होऊन रथांत पडला. थोड्याच वेळानें सावध होऊन आपलें धनुष्य घेऊन पुन्हा तो युद्धाला सुरवात करीत आहे इतक्यांतच दुःशासनानें त्याचें धनुष्य तोडिलें व सारथ्याला जखमी केला. त्याबरोबर तें तुटकें धनुष्य टाकून देऊन भीमानें विजेसारखी चकाकणारी अशी एक तीक्ष्ण धारेची बर्ची जोरानें दुःशासनावर फेंकिली; पण दुःशासनानें तिचे मधल्यामध्येंच दोन तुकडे करून पाडिले. दुःशासनानें पुन्हा भीमावर बाणांचा वर्षाव केला, त्यामुळें भीमाला बरीच चीड आली. तो कालदंडासारखी आपली भयंकर गदा हातांत घेऊन डोळे लाल करून तक्षकाप्रमाणें रागानें फुस्कारे टाकीत दुःशासनाला म्हणाला, ‘ तूं इतका वेळ आपलें युद्धकौशल्य दाखविलेंस. आतां मीं माझी गदा घेतली आहे, हिचा एवढा तडाखा सहन कर ह्मणजे झालें ? मी आज तुझें रक्त पिणार आहें. ’ असें भीम ह्मणत आहे इतक्यांत दुःशासनानें अतिशय जड अशी एक बर्ची भीमावर फेंकिली. भीमानें चटदिशीं आपल्या गदेचा तडाखा देऊन तिचा रोख दुःशासनाकडेच वळविला. त्याबरोबर ती दु;शासनाचे कपाळावर आदळली. त्यामुळें कपाळ फुटून त्यांतून भळभळ रक्त वाहूं लागलें व हीं बर्ची परत जाते

न जाते इतक्यांतच भीमानें त्याच्या रथावर आपली गदाही फेकिली. त्याबरोबर रथ व घोडे ह्या सर्वांचा एका क्षणांत चुराडा झाला. कपाळ फुटून त्यांतून जोरानें रक्त वहात होतें, तरी दुःशासनानें त्यांतल्या त्यांत चलाखी करून ती गदा येऊन आपटण्यापूर्वींच खालीं उडी टाकिली ह्मणून तो वांचला. तरी ह्या प्रचंड गदेचा थोडा तडाखा बसलाच व तेवढ्यानें त्याच्या अंगांतील चिलखताचे तुकडे झाले. कपाळांतून रक्त वहात आहे, अंगांतील चिलखताचे तुकडे झाले, रथाचा चुराडा उडाला व हा यमस्वरूपी भीम आपली गदा सांवरून पुढें उभा. दुःशासनानें आपली सर्व शक्ति खर्च करून जोरानें भीमावर आपली गदा फेकिली; पण भीमानें तिला आपल्या गदेच्या तडाख्यानें हाणून पाडिली; व लगेच आपल्या रथावरून गरुडाप्रमाणें दुःशासनावर टाणदिशीं उडी टाकून मोठ्यानें सिंहगर्जना केली. दुःशासनाला पुढें पाहिल्याबरोबर भीमाला त्याच्या सर्व पापकृत्यांची आठवण झाली. त्यामुळें आगींत तेल ओतल्याप्रमाणें होऊन भीमाचा क्रोधाग्नि जास्तच पेटला. कर्ण, कृपाचार्य, अश्वत्थामा, दुर्योधन व कृतवर्मा ह्या सर्वांना मोठ्यानें हाक मारून ' मी आज दुःशासनाचें रक्त पितों, तुमची शक्ति असेल तर सर्वजण मिळून याचें रक्षण करा, ' असें म्हणून त्यानें राजा दुर्योधनाच्या समक्ष दुःशासनाला ओढून खालीं पाडिलें. नंतर त्याच्या नरडीवर पाय देऊन छाती फोडण्याकरितां तरवार उगारिली. त्याबरोबर दुःशासनाची बोबडी वळली. तो लटलट कांपूं लागला. तें पाहून भीम रागानें म्हणाला ' राजसूय यज्ञामधील अवभृत स्नानानें पवित्र झालेले, साध्वी द्रौपदीचे केस कोणत्या हातानें ओढलेस तें सांग पाहूं? हा भीम त्याचा आतां समाचार घेणार आहे. ' हें ऐकून दुःशासनाला त्वेष येऊन तो आपला हात पुढें करून म्हणाला, ' हा पहा तो हात. ' सर्व कौरवपांडवां-

च्या देखत हें दुःशासनाचें मग्रुरीचें भाषण ऐकून भीमाला अतिशय चीड आली. त्यानें दुःशासनाच्या छातीवर पाय देऊन तो हात बळकट धरिला व 'कोणाची छाती असेल तर या, हा भीम आतां याचा हात उखळीत आहे,' असें मोठ्यानें ओरडून त्याच्या हाताला एक जोराचा हिसडा दिला. त्यासरशीं दुःशासनाचा हात निखळून बाहेर आला. नंतर भीम खालीं बसला, व आपल्या वज्रासारख्या बळकट हाताच्या तडाक्यानें दुःशासनाची छाती फोडून त्यांतील ऊन ऊन रक्त आपल्या ओंजळीनें पिऊन मटमट् मिटक्या मारूं लागला. त्याला या दुःशासनाच्या रक्ताइतकी गोडी दुसऱ्या कशांतच वाटेना. तो म्हणाला, 'आईच्या दुधापेक्षां, मधापेक्षां, फार काय, स्वर्गांतील अमृतापेक्षांही हें रक्त मला गोड लागत आहे. अशी गोडी ह्या पृथ्वींतील दुसऱ्या कोणत्याही पदार्थांत नाहीं.' असें म्हणत तो रागानें दुःशासनाकडे पहात आहे तों त्याचा प्राण निघून गेला होता. तेव्हां आपल्या शत्रूचा आपणाला आतां आणखी कोणत्याही रीतीनें सूड घेतां येत नाहीं असें पाहून त्याला फार वाईट वाटलें. तो दुःशासनाकडे पाहून म्हणाला, 'काय करूं. काळानेंच तुला पदरांत घेतला, नाहीं तर सांगितलें असतें. आतां 'गायरे गाय' ह्मण पाहूं. पूर्वीं आमच्याकडे पाहून आम्हाला 'गायरे गाय' म्हणून जे कोणी नाचले होते, त्या सर्वांना उद्देशून 'गाय' म्हणून आज आह्मी नाचतों. आम्हाला विष चारिलें, लाक्षागृहामध्यें जाळण्याचा प्रयत्न केला, सर्पांकडून चावविलें, कपटद्यूतानें आमचें राज्य घेऊन आम्हाला वनवास करावयास लाविलें, भरसभेंत द्रौपदीचे केस धरून तिला ओढिली. शेवटीं आह्मी विराटाच्या घरामध्यें दीनवेषानें असतांनाही आमचा नानातऱ्हेनें छळ केला. या सर्व दुःखाला हे दुष्टा, तूंच कारण आहेस.' असें ह्मणून वृकोदर तशीच र-

क्ताची ओंजळ घेऊन कृष्णार्जुनाकडे गेला, व त्यांना म्हणाला, ‘ दुःशासनाबद्दल मीं जी प्रतिज्ञा केली होती ती आज मीं खरी केली. आतां याचप्रमाणें या रणदेवीला दुर्योधनाचा बळी देऊन त्याचें डोकें सर्व कौरवांच्या देखत मीं आपल्या पायानें तुडविलें ह्मणजे मी कृतकृत्य झालों. ’ असें ह्मणून भीमानें आनंदानें एक भयंकर गर्जना केली. त्याचे त्या वेळचे रक्तानें भरलेले कपडे, तोंडावर व मिशांवर रक्त पिण्यानें आलेली लाली, त्याचप्रमाणें रक्तानें भरलेली ओंजळ, हें सर्व भयंकर स्वरूप पाहून कौरवांची गाळण उडून जाऊन पांडवांकडील वीरसुद्धां चकित झाले.

भीमानें दुःशासनाची छाती फोडून आपली प्रत्तिज्ञा खरी केलेली पाहून, त्याचे दहा भाऊ चिडून जाऊन भीमावर बाणांचा मारा करूं लागले. आधींच दुःशासनाच्या वधामुळें भीमाच्या अंगांत वीरश्री चढली होती; त्यांतच पुन्हा यांची टुरटूर चाललेली पाहून त्याला फार राग आला. त्यानें प्रत्येकावर एकेक असे एकंदर दहा रुंद फाळाचे बाण सोडून तेवढ्यांनींच त्यांना यमसदन दाखविलें.

दुःशासनाच्या वधाच्या पाठोपाठ या दहा भावांचें धारातीर्थीं पडणें व भीमाचें तें उग्र स्वरूप पाहून कर्णाला फार भीति वाटली. शल्यानें त्याच्या चेहऱ्यावरून हा घाबरला आहे असें तत्काळ ताडिलें. ह्मणून तो त्याला ह्मणाला, ‘ कर्णा, तुझ्यासारख्याला रणांगणांत घाबरणें शोभत नाहीं. हे सर्व कौरवांकडील राजे भीमाचें हें अघोर कर्म पाहून भयानें पळत आहेत. दुर्योधनही आपल्या भावांच्या मरणानें अतिशय दुःखी होऊन वेड्यासारखा झाला आहे. कृपाचार्यादि महावीर व हे बाकीचे कौरव बंधू राजाची समजूत करून पांडवांशीं टक्कर देण्याचा प्रयत्न करीत आहेत. हे धनंजयादि पांडववीर तर तुझ्यावरच चा·

लून येत आहेत. ह्मणून हे नरव्याघ्रा, क्षात्रधर्माला अनुसरून धैर्यानें धनंजयावर चालून जा. राजा दुर्योधनाचा सर्व भार तुज-वर आहे, तर त्याला यथाशक्ति हात दे. जय झाला तर तुझी अक्षय कीर्ति होईल; नाहींतर स्वर्गसुख आहेच. तुला भांबावले-ला पाहून हा तुझा मुलगा वृषसेन पांडवांचा समाचार घेत आहे.' असें म्हणून शल्यानें कर्णाचा रथ हाकिला.

कर्णवध.

इकडे वृषसेन दुःशासनाच्या वधाचा सूड घेण्याकरितां का-लदंडासारखी भयंकर गदा हातांत घेतलेल्या व प्रलयकालच्या रुद्राप्रमाणें भयंकर स्वरूप धारण केलेल्या भीमावर धावून आला. पण इतक्यांत मध्येंच नकुलानें त्याला अडविलें. नकुलानें पहिल्या सलामीबरोबर वृषसेनाचा बावटा उतरून खालीं पाडिला. तें पा-हून वृषसेनानें आपल्या तीक्ष्ण बाणांनीं नकुलाचे चारी घोडे मा-रिले. त्याबरोबर नकुलानें ढालतरवार घेऊन रथाखालीं उडी ठोकिली. नंतर तो त्या समरांगणावर विजेप्रमाणें इकडून तिकडे चमकूं लागला. त्यानें खालीं उतरल्यापासून एका क्षणाच्या आंत दोन कौरववीरांचें रक्त आपल्या तरवारीला पाजिलें. इतक्यांत वृषसेनानें श्रीकृष्णावरही बाण सोडिले; ते पाहून अर्जुनाचा क्रो-धाग्नि भडकला, व तो मोठ्यानें कर्ण, दुर्योधन, अश्वत्थामा वगैरे सर्व वीरांना हाक मारून ' मी आज तुह्मा सर्वांच्या देखत वि-शेषेंकरून कर्णा, तुझ्या देखत तुझ्या मुलाला ठार करतों. तुह्मीं सर्वांनीं मिळून माझ्या मुलाला एकटा गांठून तो निःशस्त्र असतां-ना त्याला ठार केलेंत; पण मीं तुह्मा सर्वांच्या देखत याला मा-रतों, ' असें ह्मणून त्यानें वृषसेनाचें मुंडकें वर उडवून देऊन धड जमिनीवर पाडिलें.

याप्रमाणें अर्जुनानें गर्दींत आपल्या मुलाला मारलेलें पाहून रागानें डोळे लाल करून कर्ण कृष्णार्जुनांवर चालून आला. दोघेही वीर अत्यंत तेजस्वी होते. त्यांचे रथही दिव्य होते. त्यामुळें आकाशांतून प्रत्यक्ष सूर्य व चंद्रच या समरांगणीं येऊन उभे राहिले आहेत कीं काय असा भास होत होता. त्यांच्या धनुष्यांचा टणत्कार, आपापल्या सैन्यांना आवेश येण्याकरितां त्यांनीं केलेली सिंहगर्जना व रथांचा घडघडाट या योगें सर्व समरांगण दुमदुमून गेलें, आणि त्यांतच दोन्ही सैन्यांतील वीरांनीं, आपापल्या नायकांचा केलेला जयजयकार येऊन मिळाला; त्यामुळें एकच गर्दी उसळून राहिली. कर्णाला आनंद होऊन त्याला वीरश्री चढावी ह्मणून कौरवांनीं गंभीर रणवाद्यें वाजवून मोठ्यानें सिंहनाद करण्याला सुरवात केली; त्याचप्रमाणें पांडवांनींही शंख, भेरी, नगारे व आपल्या सिंहगर्जना यांनीं दाही दिशा दणाणून सोडिल्या. कर्ण व अर्जुन हे दोघेही अत्यंत शूर होते, दोघेही बलवान् होते, दोघेही सारखेच अस्त्रसंपन्न होते, दोघांच्या अंगांत चिलखतें होतीं, दोघांचीं शस्त्रास्त्रें सारखींच दिव्य होतीं, दोघेही एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्यासाठीं डोळे फाकून रागानें एकमेकांकडे पहात होते. त्यांची ती विशाल छाती, लांब व पुष्ट असे बाहू, तीक्ष्ण शस्त्रें, व जवान घोडे, कृष्णशल्यासारखे अद्वितीय सारथी व सूर्यासारखी कांति पाहून देवादिकांना सुद्धां या योद्ध्यांपैकीं कोण विजयी होईल याचा निर्णय करवेना. सर्व कौरव कर्णाचें रक्षण करण्याकरितां त्याच्यासभोंवार आपलीं शस्त्रास्त्रें सांवरून सज्ज होऊन उभे राहिले. त्याचप्रमाणें धृष्टद्युम्नादि पांडववीरही आपलीं धनुष्यें सज्ज करून व समशेरी बाहेर काढून अर्जुनाच्या जवळ उभे राहिले. या वेळच्या ह्या युद्धरूपी जुगारामध्यें कर्ण व अर्जुन हेच फासे होते. त्यांच्यावरच सर्व

जयापजयाची मदार अवलंबून होती. म्हणून दोन्ही पक्षांकडील वीर मोठ्या आतुरतेनें आपल्या पराक्रमशाली सेनानायकांकडे पहात होते. ह्या दोघा वीरांची गांठ पडल्याबरोबर आतां हें युद्ध फार भयंकर होणार म्हणून अखिल भूमंडळ भयानें थरथर कांपूं लागलें. शल्य व कृष्ण हे एकमेकांची नजर चुकवून एकमेकांचे रथ आपल्या कचाट्यांत आणण्याकरितां एकमेकांकडे रोखून पहात होते. त्याचप्रमाणें कर्णार्जुनही बाण कोठें सोडावा व कसा सोडावा हें पहाण्याकरितां एकमेकांकडे डोळे फाकून त्वेषानें पाहूं लागले. एकमेकांना टाकून बोलत बोलतच ते एकमेकांशीं भिडले व त्यांनीं बाणांच्या वर्षावाला प्रारंभ केला. त्याबरोबर हत्ती, घोडे व लोक पटापट मरून कौरवसैन्याची फार नासाडी उडाली. अर्जुनानें सोडलेल्या सर्व अस्त्रांचें कर्णानें निवारण केलेलें पाहून श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाला, 'धनंजया, तूं जें जें अस्त्र सोडिलेंस त्या प्रत्येक अस्त्राचा कर्णानें फडशा पाडला आहे. सर्व कौरव, कर्णानें तुझ्या अस्त्रांचें निवारण केलें म्हणून आनंदानें त्याचा जयघोष करीत आहेत. किरातरूपी पिनाकपाणी शंकरांशीं युद्ध करतेवेळीं तूं काय पराक्रम केलास त्याची आठवण धरून आतां या दुर्बुद्धि सूतपुत्राला ठार कर.' यावर अर्जुनानें कर्णासाठीं लढत असलेल्या रथ्यांपैकीं दोन हजार रथ्यांना आपल्या तीक्ष्ण बाणांनीं यमलोकाला पाठविलें; त्याबरोबर थोडेबहुत जिवंत राहिलेले कौरव कर्णाला सोडून आपला जीव वांचविण्याकरितां युद्धांतून पळून जाऊं लागले; तथापि कर्ण मुळींच डगमगला नाहीं. त्यानें रामापासून मिळालेल्या अथर्वास्त्राचा प्रयोग करून अर्जुनाच्या अस्त्राचें निवारण केलें. दोघेही वीर युद्धकलेंत सारखेच निपुण असल्यामुळें केव्हां केव्हां कर्ण आपली शिताफी दाखवी व केव्हां केव्हां अर्जुन आपल्या चतुराईनें सर्व प्रेक्षकांना थक्क क-

रून सोडी. रणवाद्यांचा गंभीर ध्वनि, समरांगणांत जखमी होऊन पडलेल्या लोकांचें कण्हणें व प्रेक्षकांचें मधून मधून 'शाबास शाबास' असें ओरडणें हीं एकमेकांत मिसळून एकच गर्दी उठून राहिली. अर्जुनाचा सूड घेण्याला हीच वेळ चांगली आहे, असा विचार करून अश्वसेन नांवाचा साप खांडववनामध्यें अर्जुनानें आपल्या आईला मारल्याबद्दल सूड घेण्याकरितां बाणाचें रूप घेऊन कर्णाच्या भात्यांत शिरला. नंतर कर्णानें तो सर्पाकार तोंड असलेला अतिशय तीक्ष्ण व वज्रासारखा बळकट असा बाण घेऊन आपल्या धनुष्याला लाविला, व आकर्ण धनुष्य ओढून अर्जुनाचें डोकें उडविण्याकरितां त्याच्या कंठावर नेम धरिला. शल्यानें कर्णाचा तो नेम बरोबर नाहीं असें पाहून कर्णाला सांगितलें कीं, 'कर्णा, ह्या बाणाचा अर्जुनाच्या गळ्यावर नेम लागत नाहीं, हा डोक्यावर लागेल, तर नीट पाहून नेम धर.' हें ऐकून कर्ण अतिशय रागावला. तो डोळे लाल करून शल्याला ह्मणाला, 'शल्या, हा कर्ण दोन वेळां कधीं नेम लावीत नसतो, व याचा नेमही कधीं चुकत नाहीं.' असें म्हणून कर्णानें 'फाल्गुना, आतां ठार झालास,' असें मोठ्यानें ओरडून धनुष्याची दोरी आकर्ण ओढून जोरानें बाण सोडिला. धनुष्यापासून सुटल्याबरोबर तो बाण अर्जुनाच्या रोखानें आकाशांतून विजेसारखा चमकत येऊं लागला. तें पाहून श्रीकृष्णानें झटदिशीं घोड्यांना थोडीशी इशारत देऊन गुडघे टेकावयाला लाविलें व आपल्या पायानें दाबून रथाला थोडेसें जमिनींत दाबिलें. आधींच शल्यानें सांगितल्याप्रमाणें कर्णाचा बाण थोडासा डोक्याच्या रोखानें सुटला होता, त्यांत श्रीकृष्णानें रथाला खालीं दडपलें त्यामुळें कर्णाचा नेम अजीबात चुकला. धनुष्यापासून जो बाण सुटला तो नीट किरीटावर थडकला. त्यामुळें अर्जुनाच्या डोकीवरील किरीट

मात्र खालीं पडला. बाणरूप धरलेल्या सापाला अर्जुनाच्या नरडीचा घोंट घ्यावयास सांपडला नाहीं यामुळें फार वाईट वाटलें, व पुन्हा कर्णाच्या भात्यांत शिरण्यासाठीं तो चालला; पण इतक्यांत कर्णानें त्याला पाहिलें, तेव्हां त्याला त्यानें 'तूं कोण आहेस' ह्मणून विचारिलें. अश्वसेन म्हणाला, 'मी सर्प आहें. खांडववनामध्यें अर्जुनानें माझ्या आईला मारिलें म्हणून मी त्याचा सूड घेण्याकरितां आलों आहें. तूं मला आतां अर्जुनावर सोडलेंस; पण तुझा नेम चुकला त्यामुळें मला अर्जुनाच्या नरडीचा घोंट घ्यावयास सांपडला नाहीं. पुन्हा थोडेंसें लक्ष्य देऊन चांगला नीट नेम धर आणि मग मला सोड, म्हणजे मग मी याचें डोकें तेव्हांच उडवीन.' हें ऐकून कर्ण म्हणाला, 'हे सर्पश्रेष्ठा, हा कर्ण दुसऱ्याच्या जिवावर विजयी होऊं इच्छीत नाहीं. शिवाय हा कर्ण केव्हांही दोनदां नेमही धरीत नाहीं. जरी दुसऱ्यानदां नेम धरून शेंकडों अर्जुन मारण्याची संधि सांपडली तरी सुद्धां हा कर्ण पहिला नेम कधींही परतवीत नसतो. मी याला व्यालास्त्राचा प्रयोग करून आतांच ठार करितों. तूं खुशाल जा. नंतर अर्जुनानें बरेंच बाण कर्णाच्या मर्मस्थळांवर सोडून त्याला अगदीं रक्तबंबाळ केलें. त्यामुळें कर्ण निःशस्त्र होऊन मूर्छित होऊन पडला. त्याबरोबर त्याच्या हातून धनुष्यही गळून खालीं पडलें. आपला शत्रु मूर्छित पडला आहे ह्या संधींत आपण त्याच्यावर बाण सोडणें बरोबर नाहीं असा विचार करून त्याच्यावर मारा न करितां अर्जुन स्वस्थ बसला. हें पाहून श्रीकृष्ण ह्मणाला, 'धनंजया, स्वस्थ कां बसलास? शहाणे लोक शत्रूला पेचांत पाहून त्याच्यावर जास्तच लगट करतात. ह्मणून तूं या वेळीं स्वस्थ न बसतां जलदीं करून हा पुन्हा शुद्धीवर यावयाच्याआंत याला ठार कर.' त्याबरोबर 'बरें आहे' म्हणून अर्जु-

नानें कर्णावर सपाट्यानें बाणांचा वर्षाव केला. सर्व अंग रक्तानें लाल झाल्यामुळें व अंगांत चोहोंकडे बाण शिरल्यामुळें अस्ताचे वेळच्या आरक्त सूर्याप्रमाणें कर्ण दिसत होता. इतक्यांत कर्णाच्या रथाचें चाक जमिनींत घुसलें, त्यामुळें तें वर उचलून काढण्याकरितां तो खालीं उतरला. कर्ण इतका सामर्थ्यवान् असूनही त्याच्या हातून तें चाक वर काढवेना. म्हणून त्याबद्दल त्यास फार वाईट वाटलें. तो अर्जुनाला ह्मणाला, 'अर्जुना, थोडा वेळ दम धर, मी हें चाक वर उचलून काढतों. तुझी शौर्याबद्दल व धर्मनिष्ठेबद्दल फार ख्याति आहे. कोणी हात जोडून शरण आला किंवा शस्त्र टाकून पळत सुटला किंवा त्याचें चिलखत अगर शस्त्रास्त्रें नष्ट झालीं तर त्याच्यावर शूर लोक केव्हांही हत्यार उचलीत नाहींत; म्हणून मी हें चाक उचलून काढीतोंपर्यंत माझ्यावर बाण सोडूं नकोस.' हें ऐकून श्रीकृष्ण त्याला म्हणाला, 'राधेया, आतां मात्र तुला धर्म सुचतो. प्रायः दुष्ट लोक संकटांत सांपडले म्हणजे देवाचीच निंदा करितात. पण आपल्या पापकृत्याला ते मुळींच दोष देत नाहींत. राधेया, दुःशासन, शकुनि व दुर्योधन यांच्या साहाय्यानें तूं द्रौपदीला फरफर सभेंत ओढून आणून जेव्हां तिची विटंबना करून तिला नाहीं नाहीं तें बोललास, त्या वेळीं मात्र तुला धर्म आठवला नाहीं. ठरल्याप्रमाणें तेरा वर्षें वनवास करून हे पांडव नम्रपणें तुमच्याकडे राज्य मागावयाला आले असतांना त्यांना तुह्मीं झिडकारून लाविलें. तुह्मीं सहाजणांनीं मिळून एकट्या अभिमन्यु बाळाला निःशस्त्र गांठून ठार केलें. त्या वेळीं जर तुह्माला धर्म नको होता, तर आतां कां उगीच धर्माची कास धरूं पहातोस?' हें ऐकून कर्णानें लाजेनें मान खालीं घालून कांहींच उत्तर दिलें नाहीं. चाक उचलणें सोडून देऊन तो तसाच रथावर चढला व पुन्हा धनुष्य

हातीं घेऊन युद्ध करूं लागला. अर्जुनानें आकर्ण धनुष्याची दोरी ओढून दिव्य मंत्राचा उच्चार करून एक बाण कर्णावर सोडिला त्याबरोबर कर्णाचें डोकें धडापासून वेगळें झालें. हें पाहून कृष्णानें आनंदानें आपला पांचजन्य व अर्जुनानें आपला देवदत्त फुंकून सिंहगर्जना केली. पांडवांकडे जयसूचक वाद्यें वाजूं लागलीं. आणि त्यांच्याकडील कित्येक वीर कर्णाला रणशय्येवर निजलेला पाहून आनंदानें नाचूं लागले.

शल्य सैनापत्य.

विजयी अर्जुनाची ही आनंदाची सिंहगर्जना ऐकून कौरव भयानें वेडे होऊन पळूं लागले. त्या गडबडींत कित्येकांचे घोडे गेले, कित्येकांचे हत्ती गेले, कित्येकांचे हातपाय तुटले, आणि प्रत्येकाला सर्व पृथ्वी भीमार्जुनमय दिसूं लागली. अशा रीतीनें सर्व सैन्यामध्यें हाहाकार उडाला असतां दुर्योधन कृष्णाला व भीमार्जुनांना हाक मारून कर्णाच्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं न डगतां अर्जुनावर चालून आला; व सैरावैरा पळत सुटलेल्या सैन्याला परतवून त्यांना धीर देऊन तो ह्मणाला, ' तुह्मी कोठेंही पळाला तरी पांडव तुह्माला सोडीत नाहींत, शिवाय त्यांचें सैन्य आतां थोडें उरलें असून कृष्णार्जुनही घायाळ झाले आहेत. आपण जर थोडा वेळ नेट धरून राहिलों तर आपल्याला खात्रीनें जय मिळेल. युद्धामध्यें पाठ दाखविणाऱ्या क्षत्रिया इतका महापापी कोणीच नाहीं. सुखानें स्वर्गप्राप्ति करून देणारा धर्मयुद्धासारखा दुसरा मार्ग नाहीं. ' ह्यानें कौरवसैन्याला जरा धीर येऊन तें फिरून उत्साहानें लढूं लागलें. याहीवेळीं कौरवांचा बराच फडशा उडालेला पाहून कृपाचार्य दुर्योधनाला ह्मणाले, ' युद्धापासून आतां कांहीं फायदा होईलसें मला दिसत

नाहीं, व ज्यांसाठीं युद्ध करावयाचें ते मुलगे, बंधू, मामे, भाचे इत्यादि सर्व संबंधी, आणि भीष्म, द्रोण, कर्ण, यांसारखे महारथी हा नश्वर देह टाकून स्वर्गाला गेले आहेत; त्यामुळें आम्ही फार कष्टीही झालों आहों. महाबाहु अर्जुन श्रीकृष्णसाहाय्यानें देवादिकांना सुद्धां अजिंक्य आहे, भीमाच्या गर्जनेनें, पांचजन्याच्या शब्दानें व अर्जुनाच्या धनुष्याच्या टणत्कारानेंच आह्मी घाबरून जाऊन विजेप्रमाणें चमकणाऱ्या गांडीवानें आमचे डोळे दिपून जात आहेत. ज्याप्रमाणें एखादा मस्त हत्ती सरोवरांत शिरून सर्व पाणी खळबळून सोडून मराभर कमलें तोडून टाकतो, त्याप्रमाणें अर्जुनानें तुझ्या सैन्यामध्यें शिरून एकच गर्दी उडवून पुष्कळांचीं शिरकमलें तोडून पाडिलीं आहेत. युद्धाला प्रारंभ होऊन आज सतरा दिवस झाले. एवढ्या अवधींत सारखा आमचाच नाश मोठा होत आहे. दुःशासनाची अवस्था काय झाली, कर्णाच्या हातून काय झालें, जयद्रथाचा कितीसा पाड लागला, तुझ्या पराक्रमांचा काय परिणाम झाला, हें सर्व तूं पहातच आहेस. व्यूहामध्यें जयद्रथाच्या संरक्षणाला, मोठमोठे योद्धे असतांनाही त्या सर्वांच्या देखत तुझ्या सर्व वीरांच्या छातीवर पाय देऊन अर्जुनानें त्याला कसें मारिलें याची आठवण तुझी अजून बुजाली नसेल. दिव्यास्त्रसंपन्न अर्जुनाला जिंकण्याला समर्थ असा एकही वीरपुरुष आमच्यामध्यें नाहीं. भीमानें आपली प्रत्येक प्रतिज्ञा खरी केली आहे व तो आणखीही करील. सत्यप्रतिज्ञ पांडवांना तूं विनाकारण फार छळिलें आहेस, त्याचें हें फळ आतां भोगावें लागत आहे. आपल्यासाठीं तूं स्वतःला व पुष्कळ राजांना विनाकारण संकटांत घालून घेतलें आहेस. आतां तरी तूं स्वतःचें रक्षण करून घे. स्वतःचा नाश झाल्यावर सर्व कांहीं असून नसल्यासारखेंच. ज्याची दिवसेंदिवस चढती कमान असेल त्या-

नेंच युद्ध करावें, व ज्याचा पाय आंत आंत येत असेल त्यानें तह करावा हेंच उचित. जो आपलें कल्याण कशांत आहे व अकल्याण कशांत आहे हें पहात नाहीं, तो लवकरच राज्यभ्रष्ट होऊन दुःखाचा वाटेकरी होतो. उगीच मूर्खासारखें युद्ध चालू ठेवून दुःख भोगण्यापेक्षां धर्माला शरण जावेंस हें बरें.' असें ह्मणून कृपाचार्यांनीं दुःखाचा सुस्कारा टाकिला.

हें ऐकून दुर्योधन दुःखातिरेकानें क्षणभर स्तब्ध राहून कृपाचार्यांस म्हणाला, 'आपण जीवाचीही पर्वा न करितां महारथी पांडवांबरोबर निकरानें लढला हें सर्व लोकांनीं पाहिलें आहे, व सुहृदांप्रमाणें जें जें कांहीं सांगणें योग्य आहे, तेंच आपण मला सांगितलें. परंतु मरणोन्मुखाला परिणामीं हितकर असा काढाही ज्याप्रमाणें कडू वाटतो त्याप्रमाणें हें आपलें हितवचनही मला पटत नाहीं. कारण, ज्याला आह्मीं राज्यापासून दूर केलें व खोट्या फाशांनीं द्यूतांत जिंकिलें तो अभिमानी धर्मराज पुन्हा कशी बरें आमची कींव करील? नेहमीं पार्थाचें हितचिंतन करणारा कृष्ण ज्यावेळीं आम्हाकडे शिष्टाई करण्याकरितां आला होता, त्यावेळीं आह्मीं त्याचें ऐकिलें नाहीं, मग आतां तो आमचें बोलणें काय म्हणून ऐकेल? द्रौपदीला फरफरां ओढीत आणून भरसभेमध्यें तिचे आह्मीं हाल केले त्याबद्दल महावीर पार्थ क्षमा कधीं तरी करिल काय? आपला भाचा अभिमन्यु याला आह्मीं युद्धामध्यें अधर्मानें मारल्याचें पाहून कंसारी कृष्ण कसा बरें स्वस्थ बसेल? पराक्रमशाली भीमाच्या प्रतिज्ञेचा भंग होणें शक्य आहे काय? जे भीमार्जुन हातांमध्यें शस्त्रें घेऊन युद्धाला उभे राहिले असतां काळालाही काळ वाटणार आहेत, अशा त्या वीर पुरुषांना मजसारख्या वैऱ्याबरोबर चालविलेल्या युद्धापासून कोणी तरी परतवूं शकेल काय? आपल्यावर ओढवलेल्या दुर्धर प्रसं-

गाच्या योगानें संतापून गेलेली द्रौपदी माझा नाश होण्याकरितां घोर तपश्चर्या करीत बसली आहे ! ती रोज जमिनीवर निजत असते ! कृष्णभगिनी सुभद्रा आपला मान एका बाजूला सारून यःकश्चित् दासीप्रमाणें तिची सेवा करीत आहे. माझा नाश होईपर्यंत हें व्रत न चुकतां चालविण्याचा त्यांचा निर्धार आहे. अशी सर्व स्थिति असतां तह कसा बरें होईल ? शिवाय सर्व पृथ्वीवर आजपर्यंत महाचक्रवर्ती म्हणवून घेऊन आतां पांडवांपुढें मान वाकविणें माझ्यानें कधींही होणार नाहीं. हा वेळपर्यंत मीं स्वतः पुष्कळ भोग भोगिले व माझ्या आप्तइष्टांनाही ते दिले; असें असतां मीच आतां पांडवांवर पोट जाळण्याला तयार व्हावें हें किती लाजिरवाणें आहे ? मी द्वेषबुद्धीनें आपल्या बोलण्याचा तिरस्कार करतों असें मात्र समजूं नका. आपण जें कांहीं सांगितलें तें सर्व मजविषयीं आपल्या मनामध्यें वसत असलेल्या प्रेमबुद्धीमुळेंच आहे हें खरें; परंतु ह्या प्रसंगीं तह करणें हें मला प्रशस्त दिसत नाहीं. आतां युद्धच केलें पाहिजे. मनुष्याचें या जगांत जर कांहीं कर्तव्य असेल तर तें कीर्ति मिळविणें हें आहे; व ती कीर्ति क्षत्रियानें युद्ध करूनच मिळविली पाहिजे. घरीं अंथरुणावर पडून मरणारा क्षत्रिय अधम होय. धारातीर्थीं देह ठेवणाऱ्या क्षत्रियाला ब्राह्मणांना शेंकडों यज्ञांच्या योगानेंही दुष्प्राप्य असा अक्षय स्वर्गवास मिळतो. म्हणून मी आतां ह्या सर्व ऐहिक सुखांवर लाथ मारून शूर पुरुषांना मिळणाऱ्या स्वर्गाचीच वाट धरणार. आपल्या आजाच्या, भावांच्या, व स्नेह्यांच्या नाशाला कारण होऊन जर मी आतां आपला मात्र जीव वांचवीन तर खरोखर लोक माझी छीः थूः करतील; शिवाय पांडवांच्या पायां पडून राज्य परत मिळविलें तरी भाऊ किंवा मित्र यांपैकीं कोणीही न उरल्यामुळें त्या राज्योपभोगापासून तरी काय सुख

मिळणार ? म्हणून मी शत्रूंबरोबर धैर्यानें लढून हें तुच्छ जग सोडून स्वर्गाचीच वाट धरणार.' हें दुर्योधनाचें मानी भाषण ऐकून त्याच्या बाजूचे सर्व क्षत्रिय आनंदानें 'शाबास शाबास' म्हणाले. ह्या भाषणानें सर्वांना मागील दुःखाचा विसर पडून पुन्हा लढण्याला धैर्य आलें, व सर्वानुमतें शल्याला सेनाधिपति करून ते युद्धाला तयार झाले.

शल्यवध.

उजाडल्यावर मद्रराज शल्य आपला सेनाधिपति आहे हें जाणून ते मृत्यूलाही न भितां युद्धाकरितां पुढें सरसावले. त्यावेळीं कृपाचार्य, कृतवर्मा, अश्वत्थामा, शल्य व आणखी बरेच राजे दुर्योधनाकडे आले, व प्रत्येकानें एकमेकांचें संरक्षण करावें आणि सर्वांनीं मिळून लढावें असें ठरवून ते शल्याला पुढें करून युद्धाला तयार झाले. शल्यानें सर्व बाजूंनीं सुरक्षित असा व्यूह रचिला, व आपण स्वतः एका काठेवाडी घोडे जोडलेल्या रथामध्यें बसला. त्याच्याबरोबर त्याच्या पथकांतील लोक व कर्णाचे मुलगे होते. त्याच्या डाव्या बाजूला त्रिगर्तांसह कृतवर्मा होता, उजव्या बाजूला कृपाचार्य, शक व यवनलोक घेऊन उभे राहिले, व त्यांच्या पाठीमागें अश्वत्थामा कांबोजांतील लोक घेऊन उभा राहिला, व सर्व सैन्याच्या मध्यभागीं दुर्योधन आपल्या कौरवसैन्यानिशीं उभा राहिला. सुबलपुत्र शकुनि बरोबर मोठा रिसाला घेऊन निघाला, व राजा उलूकही बरोबर आपलें सैन्य घेऊन बाहेर पडला. अशा व्यवस्थित थाटानें कौरवांचें सैन्य पांडवांवर चाल करून निघालें.

पांडवही आपल्या सैन्याचे तीन भाग करून त्यांवर धृष्टद्युम्न, शिखंडि व सात्यकि ह्यांना मुख्य नेमून कौरवांवर चालून गेले.

राजा युधिष्ठिर आपल्या सैन्यानिशीं शल्यावर चालून गेला. त्यावेळीं कौरवांकडील सैन्य अकरा हजार रथ, दहा हजार सातशें हत्ती, दोन हजार घोडे व तीन कोटी पायदळ इतकें उरलें होतें. तसेंच पांडवांकडे सहा हजार रथ, सहा हजार हत्ती, दहा हजार घोडे व एक कोट पायदळ इतकें उरलें होतें.

पायदळ, हत्ती, घोडे, रथी हे एकदम एकमेकांशीं भिडले असतां हत्ती वर्षाकाळांतील मेघगर्जनेप्रमाणें मोठ्यानें गर्जना करूं लागले. त्यांनीं कित्येक रथ्यांवर हल्ला करून त्यांच्या रथाचा चुराडा उडवून दिला, व पायदळांतील कित्येक लोक त्यांच्या हल्याला भिऊन इकडे तिकडे धावूं लागले. रथी आपल्या बाणांच्या वर्षावांनीं घोड्यांचा व पायदळाचा फडशा पाडूं लागले. घोडेस्वारांनीं आपल्या तलवारीनें व भाल्यानें पुष्कळ रथ्यांचा फडशा उडविला. घोड्यांचें खिंकाळणें, त्यांच्या टापांचा टपटप आवाज, रथांचा घडघडाट, शिपायांच्या आरोळ्या, हत्तींची गर्जना, रणवाद्यांचा घोष, शंखांचा नाद ह्या सर्वांच्या योगानें दाही दिशा दणाणून गेल्या. धनुष्याचा टणत्कार, हत्यारांची चमक, चिलखतांचें तेज ह्यांनीं इंद्रियें बधिर होऊन कांहींच उमगेनासें झालें. जमिनीवर रक्तानें भरलेलीं डोकीं पसरल्यामुळें ती सोन्याच्या कमलांनीं भरून निघाल्याप्रमाणें दिसत होती. चंदनाची उटी लाविलेले, अलंकार घातलेले असे रणभूमीवर पडलेले हात, इंद्रमहोत्सवाचे वेळीं उभारलेल्या गुढ्यांप्रमाणें भासत होते. जिकडे तिकडे शूर योद्ध्यांचीं धडें, छत्रें व चामरें पडल्यामुळें सर्व रणांगणावर रंगीबेरंगी फुलेंच पसरल्याप्रमाणें दिसत होतीं. धैर्यानें लढणाऱ्या शूर योद्ध्यांचे देह रक्तानें भरल्यामुळें फुललेल्या पळसासारखे दिसत होते. धर्मराज आपल्या सैन्यानिशीं शल्यावर घसरून पडला तेव्हां शनीजवळ चंद्र आला असतां जशी शोभा दि-

सावी तशी शोभा दिसत होती. शल्य धर्माला आपल्या तलवारीचें पाणी दाखवून लगेच भीमावर धावून गेला. शल्याचा मारा सहन न झाल्यामुळें पांडवांचें सैन्य रणांगणांतून पळूं लागलें, तेव्हां धर्माला फार त्वेष चढून मारीन अथवा मरेन असा निश्चय करून तो शल्यावर तुटून पडला. धर्मानें शल्याकडे जेव्हां रागानें डोळे वटारून पाहिलें तेव्हांच तो बहुतेक मृतप्राय झाला. धर्मानें लगेंच एक तीक्ष्ण शक्ति घेतली. ही शक्ति विश्वकर्म्यानें मुद्दाम शंकरांकरितां निर्माण केली होती. त्या शक्तीवर धर्मानें घोर मंत्राचें अभिमंत्रण केलें, व शंकरांनीं ज्याप्रमाणें पूर्वीं ती अंधकावर सोडिली होती, त्याप्रमाणें त्यानें ती शक्ति जोरानें शल्यावर सोडिली. शल्यानेंही पाठ न दाखवितां धैर्यानें छाती पुढें केली, व अग्नि ज्याप्रमाणें यथाशास्त्र हवन केलेल्या तुपाच्या धारेचा आ पसरून स्वीकार करतो, त्याप्रमाणें त्यानें पुढें जाऊन तिला अंगावर घेतली. ती शक्ति शल्याच्या छातींतून पार निघून जमिनींत घुसली, आणि शल्य मृत होऊन जमिनीवर पडला.

शकुनीचा वध.

रणशूर शल्य मेल्यामुळें कौरवसेनेचे फिरून हातपाय गळले. परंतु शकुनीनें शत्रुसैन्याला अडवून धरिलें. सर्व शरीरावर बाण लागले असतांही एकटा शकुनि शत्रूंशीं नेटानें लढत आहेसें पाहून पळून जाणारें सैन्य परतलें, व ' मेलों तरी बेहेत्तर ' असें म्हणून कौरववीर पुन्हा पांडवांबरोबर लढूं लागले. शकुनि पांडवांच्या फौजेच्या पिछाडीवर चालून जाऊन त्या फौजेमध्यें धुमाकूळ उडवूं लागला. त्याचे दहा हजार घोडेस्वार होते. त्यांच्या हातांत लांब विटा असून ते विटा सोडण्यांत पटाईत होते. युधिष्ठिरानें सैन्याच्या पिछाडीचें रक्षण करण्याकरितां रण-

शूर सहदेवाला आपल्याजवळील सर्व हत्ती, घोडे व तीन हजार पायदळ देऊन शकुनीवर पाठविलें. त्यानें जाऊन शकुनीच्या तुकडीचा बराच फडशा उडविला. त्यानें शकुनीचे सुमारें चार हजार घोडेस्वार कापून काढिले, व शेवटीं शकुनीच्या उलूक मुलाचा बळी घेतला. मुलाच्या मरणानें शकुनीला फार दुःख झालें, आणि मोठ्यानें सुस्कारा टाकून विदुरांच्या सांगण्याची आठवण झाल्यामुळें तो त्याचा विचार करूं लागला. कांहीं वेळ विचार करून त्यानें सहदेवावर धावून जाऊन तीक्ष्ण असे तीन बाण सोडिले. सहदेवानें ह्या बाणांचे आपल्या बाणानें मधल्यामध्येंच तुकडे करून शकुनीचें धनुष्य तोडिलें. शकुनीनें त्याच्यावर तलवार फेंकिली; परंतु तिचेही त्या बहादरानें दोन तुकडे केले; तेव्हां शकुनीनें आपल्या शत्रूवर एक जंगी गदा फेंकिली; परंतु तिचा नेम चुकून ती मध्येंच जमिनीवर पडली. गदाही विफल झालेली पाहून शकुनीनें त्याच्यावर भयंकर शक्ति सोडिली; पण तिचेही रणशूर सहदेवानें तीन तुकडे केले. शक्तीचा नाश झाला व शकुनीही घाबरला हें पाहून कौरव घाबरले. शेवटीं सहदेव शकुनीला पूर्वींच्या गोष्टीची आठवण देऊन ह्मणाला, ‘ क्षत्रियधर्माप्रमाणें पुढें उभा राहून युद्ध कर. अरे नीचा, सभेमध्यें फाशांनीं जुगार खेळून आमच्यापासून जें कांहीं उपटलेंस, त्याचें फळ आज भोग. जे जे ह्मणून आम्हाला हासले, त्या सर्वांचा पार फडशा उडाला आहे. फक्त कुलांगार दुर्योधन आणि त्याचे मामा आपण असे दोघेच कायते उरले आहां. काठीनें फळ जसें झाडावरून अलग खालीं पाडावें त्याप्रमाणें तुझें डोकें वरच्यावर उडवितों पहा. ’ असें बोलून सहदेव रागानें शकुनीवर चालून गेला; तेव्हां शकुनि रागावून सहदेवाला मारण्याकरितां भाला घेऊन आवेशानें हात वर करून त्या-

च्यावर धावून आला; परंतु सहदेवानें चलाखीनें रुंद फाळाचे तीन तीक्ष्ण बाण सोडून भाल्यासकट त्याचा हात वरच्यावरच छाटून टाकिला व दुसरा एक रुंद तोंडाचा बाण घेऊन तो नेमका त्याच्या मानेवर सोडून त्यानें त्याचें डोकें छाटून खालीं पाडिलें. ह्याप्रमाणें कौरवांच्या दुर्बुद्धीचा गड्डा सहदेवानें अजीबात उपटून काढिला. रक्तबंबाळ झालेलें शकुनीचें धड जमिनीवर लोळत पडलेलें पाहून कौरवांकडील योद्धे गर्भगळित होऊन त्यांचीं तोंडें अगदीं उतरून गेलीं.

युद्धामध्यें आपला राजा मेला हें पाहून शकुनीच्या सैनिकांनीं आपल्या जिवाची पर्वा सोडून पांडवांवर चाल केली. सहदेवाचा प्राण घेण्याकरितां सज्ज होऊन आलेल्या सैन्याचा सहदेव, अर्जुन व भीम ह्यांनीं फडशा पाडिला. आपल्या सैन्याची ही दुर्दशा पाहून दुर्योधन शिल्लक राहिलेलें रथदळ, रिसाला, हत्तीदळ व पायदळ ह्यांना एके ठिकाणीं जमवून ह्मणाला, ‘ तुह्मी सर्वजण मिळून एकदम पांडवांवर तुटून पडा, व त्यांची त्यांच्या स्नेह्यांसह कत्तल करून झटदिशीं रणागणांतून परतून बाजूला व्हा. ’ त्या वीरांनीं हा दुर्योधनाचा हुकूम निमूटपणें ऐकून पांडवांवर चाल केली. भीष्मद्रोणांसारखे सर्व शूर सेनापति नष्ट झाल्यामुळें त्याचें रक्षण करण्याला कोणीही न उरल्यामुळें ह्या सैन्याचा पांडवांनीं एका क्षणांत फडशा उडवून दिला.

दुर्योधनाचा पाठलाग.

याप्रमाणें पांडवांनीं अकरा अक्षौहिणी सैन्याची कत्तल करून हजारों राजांना स्वर्गलोकीं पाठविलें. एकटा दुर्योधनच कायतो उरला. आपलें सर्व सैन्य नष्ट झालेंसें पाहून दुर्योधनाला सर्व पृथ्वी

अगदीं शून्य भासूं लागली, व कोठें तरी पळून जावें असा विचार त्याच्या मनांत आला.

ह्या वेळी पांडवांकडे दोन हजार रथ, सातशें हत्ती, पांच हजार घोडे व दहा हजार पायदळ इतकें सैन्य शिल्लक होतें. एवढें सैन्य व्यवस्थित रीतीनें उभें करून धृष्टद्युम्न युद्धाला तयार झाला होता. इकडे दुर्योधनानें आपल्या मेलेल्या घोड्याला टाकून हातांत गदा घेऊन भयानें पूर्वेकडे पळ काढिला. पहा! अकरा अक्षौहिणी ज्याचें सैन्य व जो स्वतः पृथ्वीपति, तो आतां आपले प्राण वांचविण्याकरितां एकटाच पायानें धावतो! काय ही दैवाची विचित्र गति! चार पावलें गेला नाहीं तोंच त्याला विदुरांच्या शब्दांची आठवण झाली. सर्व क्षत्रियांचा या युद्धांत फडशा पडणार, हें महात्म्या विदुरांनीं पूर्वींच भाकित केलें होतें. अशा रीतीनें विचार करीत, आपल्या सर्व सैन्याचा नाश झालेला पाहून दुःखित अंतःकरणानें दुर्योधन डोहांत शिरून स्तंभनीमंत्राच्या साहाय्यानें त्यांत लपून राहिला.

दुर्योधन डोहांत शिरल्यानंतर पांडवांनीं त्याचा पुष्कळ शोध केला; परंतु तो त्यांना मुळींच सांपडला नाहीं. नंतर पांडवांनीं सर्व घोडे दमून गेल्यामुळें विश्रांति घेण्याकरितां सर्व सैन्यासह आपल्या गोटाकडे मोर्चा वळविला. पांडव आपल्या तळावर जाऊन स्वस्थ बसले, असें पाहून कृपाचार्य, कृतवर्मा व अश्वत्थामा हे तिघे रथी दुर्योधन ज्या डोहांत शिरला होता, त्या डोहाजवळ हळूच जाऊन, दुर्योधन आंत असतांनाच त्याला म्हणाले, ' हे राजा दुर्योधना, ऊठ. आह्माला बरोबर घेऊन पांडवांशीं लढ. शत्रूकडील बहुतेक सैन्य तूं मारिलेंच आहेस. आतां थोडें उरलें आहे. ' ह्यावर दुर्योधन ह्मणाला, ' पांडवकौरवांच्या भयंकर रणकंदनांतून तुह्मी जिवंत सुटलां, ही मोठ्या आनंदाची गोष्ट

आहे. थोडासा विसावा मिळाला म्हणजे आह्मी त्यांना खात्रीनें जिंकूं; परंतु आतां तुह्मी दमलेले आहां व मलाही पुष्कळ वार लागले आहेत. शिवाय त्यांचें सैन्य नुकतेंच मिळालेल्या जयानें उमेदींत आहे, त्यामुळें या वेळीं मला युद्ध करणें बरें दिसत नाहीं. माझ्या ठिकाणीं तुमची भक्ति आहे म्हणून तुह्मी मला युद्धाला उठवीत आहां हें ठीकच आहे; परंतु ही लढण्याची वेळ नव्हे. आजची रात्र विश्रांति घेऊन उद्यां शत्रूंशीं लढूं.' असें यांचें बोलणें चाललें आहे इतक्यांत कांहीं पारधी डोकीवर मांसाचीं ओझीं घेऊन थकल्यामुळें पाणी पिण्याकरितां सहजगत्या या डोहाकडे आले. हे पारधी भीमाला रोज मांस नेऊन देत असत. ह्यांनीं गुप्त रीतीनें दुर्योधन व अश्वत्थामादि वीर यांच्या मधील भाषण ऐकून दुर्योधन पाण्यांत दडला आहे हें ताडिलें. त्यांनीं पांडवांकडे जाऊन त्यांना ही बातमी कळविली. त्याबरोबर पांडवसेनेमध्यें जिकडे तिकडे 'दुर्योधन सांपडला, दुर्योधन सांपडला,' असा एकच शब्द उठला नंतर सर्व पांडववीर श्रीकृष्णाला बरोबर घेऊन वेगानें त्या डोहाकडे निघाले. ह्या वीरांच्या रथांचा घडघडाट, शंखांचा शब्द व धनुष्यांचा टणत्कार हीं ऐकून कृतवर्मादि महारथी दुर्योधनाचा निरोप घेऊन दूर एका वडाच्या झाडाखालीं जाऊन उभे राहिले.

इकडे युधिष्ठिर आपल्या लोकांनिशीं त्या द्वैपायन नांवाच्या डोहाकडे येऊन श्रीकृष्णाला म्हणाला, 'वासुदेवा, हें पाहिलेंस का? दुर्योधन आपल्या स्तंभिनी विद्येच्या प्रभावानें सर्व पाणी शांत करून डोहांत कसा दडून बसला आहे तो?' हें ऐकून भगवान् वासुदेव ह्मणाला, 'शत्रु जर कुटिल असेल तर आपणही त्यांच्याशीं तसेंच बनलें पाहिजे. म्हणून तुला सांगतों कीं, जशास तसें वागल्याशिवाय या जगांत कांहींच व्हावयाचें नाहीं.' हें

वासुदेवाचें भाषण ऐकून राजा धर्म दुर्योधनाला वरूनच ह्मणाला, ' दुर्योधना, हें तूं काय आरंभिलें आहेस ? सर्व क्षत्रियकुळांचा व आपल्याही कुळाचा नाश करून आतां आपले प्राण वांचविण्याकरितां पाण्यांत लपून बसला आहेस ! हे सुयोधना, ऊठ, आमच्याशीं युद्ध कर. अरे, तूं एवढा मानी स्वभावाचा असून आतां भिऊन पाण्यांत कसा लपून बसलास ? तुझा तो अभिमान कोठें गेला ? राजा, तूं अस्सल क्षत्रिय आहेस. कौरवकुळांत तुझा जन्म आहे हें लक्ष्यांत आण. असा भितोस कां ? युद्धामध्यें पाठ दाखविणें ह्मणजे नरकाचें साधन करणें आहे. हा क्षत्रियांचा धर्म न्हे. हे तुझे वडील, आजे, भाऊ, मुलगे, मामे व मित्र ह्या सर्वांना मारवून आतां आपला तेवढा प्राण वांचवावयाला पहातोस अं ! आजपर्यंत ' मी शूर, मी शूर, ' म्हणून बढाई मारीत होतास ती उगीचच. शूर कधींही शत्रूला भिऊन पळत नाहींत. तर तूं आतां ऊठ. ' हें ऐकून दुर्योधन पाण्यांतूनच ह्मणाला, ' जिवंत प्राण्याला भीति वाटावी हें जरी साहजिक असलें तरी मी कांहीं आपल्या प्राणाच्या भीतीनें पळालों नाहीं. माझ्या रथाचा चुराडा झाला, सारथि मेला, माझ्याजवळ बाण नाहीं व दुसरें कोणी माझ्या मदतीला नाहीं. ह्मणून थोडासा विसावा घ्यावा ह्या हेतूनें मी पाण्यांत बुडून बसलों आहें. हे युधिष्ठिरा, थोडासा दम खा. तुझ्या सैनिकांनाही थोडासा दम खाऊंदे. मी उठून तुह्मा सर्वांचा समाचार घेतों. ज्यांच्याकरितां मी राज्याची इच्छा करीत होतों ते माझे सर्व भाऊ युद्धांत कामास आले. जिच्यांतील सर्व क्षत्रिय नाहींसे झाले आहेत, अशा ह्या पृथ्वीचा विधवेप्रमाणें उपभोग घेणें मला आवडत नाहीं. तरीही पांचाल व पांडव ह्यांना जर्जर करून तुला जिंकण्याचें माझ्या मनांत आहे. युद्धापासून आतां दुसरा कांहीं फायदा नाहीं. राजा, ह्या पृथ्वीचें

राज्य तुलाच लखलाभ असो. अंगावर कातडें पांघरून मी आतां अरण्यांत जाणार. माझे सर्व लोक नाहींसे झाल्यामुळें राज्य करण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. ह्या निर्वीर पृथ्वीचें राज्य तूंच कर.'

हें दुर्योधनाचें भाषण ऐकून युधिष्ठिर ह्मणाला, 'बाबा, असा वैतागून जाऊं नकोस. तूं जरी ह्या पृथ्वीचें दान करण्याला तयार झालास तरी तुझ्याकडून दान घेऊन राज्य करण्याची माझी मुळीं इच्छा नाहीं. कारण कीं, हात पसरून दान घेणें हा क्षत्रियाचा धर्म नव्हे. तुला जिंकून ह्या पृथ्वीचें राज्य मी करणार. बरें, ह्या पृथ्वीचें दान करणारा तूं कोण ? तूं आतां राजा आहेस काय ? आणि तुझ्या मनांत जर द्यावयाचीच होती तर जेव्हां आह्मी आपल्या कुलाचा नाश होऊं नये ह्मणून तुझ्याकडे गरीबीनें मागण्याकरितां आलों होतों, तेव्हां कां ती नाहीं दिलीस ? तेव्हां श्रीकृष्णाच्या सांगण्याचासुद्धां तूं अपमान केलास. पूर्वी तूं आह्माला सुईच्या टोका एवढीही जमीन देण्याला तयार नव्हतास, तो तूं आज सर्व पृथ्वी देण्याला कसा तयार झालास ? तर ऊठ, ऊठ, लढाईला उभा रहा.' ही निर्भर्त्सना ऐकून दुर्योधनानें एक मोठा सुस्कारा टाकिला व युद्धाचा निश्चय करून हातवारे करीत पाण्यांतून ह्मणाला, 'हे पार्थांनो, तुह्माला रथ आहेत, घोडे आहेत व तुमच्या मदतीला मोठमोठे शूर स्नेही आहेत. मी एकटा, शस्त्रहीन असून वाहन नसल्यानें पायानेंच मला युद्ध करावें लागणार. तेव्हां तुह्मी एकएकटे तरी येऊन माझ्याशीं लढा. पुष्कळांनीं मिळून एकट्याशीं लढणें कांहीं धर्म नव्हे. तशांत विशेषेंकरून ज्याला चिलखत नाहीं, जो शस्त्रहीन व दमलेला असून ज्याच्या सर्व अंगावर वार लागले आहेत, त्याच्याशीं सर्वांनीं एकदम लगट करणें तर फारच अन्यायाचें आहे. हे राजा, मी तुला

भीत नाहीं, तुझ्या भीमाला भीत नाहीं, अर्जुनाला भीत नाहीं, श्रीकृष्णाला भीत नाहीं, किंवा नकुल, सहदेव, पांचाल व सात्यकि यांनाही भीत नाहीं.' युधिष्ठिर ह्मणाला, 'हे सुयोधना, तूं क्षत्रियधर्म पूर्णपणें जाणतोस खरा; पण तुह्मी सर्व धर्मज्ञ अतिरथी, महारथी यांनीं मिळून एकट्या अभिमन्यूला मारिलें त्या वेळीं तुमचा हा धर्म कोठें गेला होता? मनुष्य संकटांत असेल तेव्हां त्याला धर्म आठवतो. परंतु त्याची चढती कमान असतांना जणूं स्वर्गाचें दार बंदच आहे असें त्याला वाटत असतें. तुझी आमच्यापैकीं एकएकट्याशीं युद्ध करण्याची इच्छा आहे तर कांहीं चिंता नाहीं. तुझ्याशीं लढण्याकरितां वाटेल तो वीर देतों व तूं वाटेल तें हत्यार घेऊन युद्ध कर. आमच्यापैकीं एकाला जरी तूं मारिलेंस तरी सर्व राज्य तुझें आहे.' दुर्योधन म्हणाला, 'माझ्याशीं लढण्याला जर कोणी एकच उठणार असेल तर मी ह्या आपल्या गदेनें युद्ध करतों. माझ्याशीं गदायुद्ध करण्याला तुह्मापैकीं जो कोणी समर्थ असेल व ज्याला मी दुर्योधनाला जिंकीन असें वाटत असेल त्यानें माझ्याशीं लढण्याला उठावें.' युधिष्ठिरानें तें कबूल केल्यावर दुर्योधन सापाप्रमाणें सुस्कारे टाकीत आपली लोखंडाची मोठी गदा घेऊन एकदम पाण्यांतून बाहेर आला. तेव्हां त्याला पाहून सर्वांना हा दंडधारी यम आहे किंवा वज्रधारी इंद्र आहे, कीं शूलधारी रुद्र आहे असें वाटूं लागलें. त्याला पाहून युधिष्ठिर म्हणाला, 'चल हें कवच घे. केस नीट बांध. शिरस्त्राण घाल व तुला जें जें कांहीं कमी आहे तें सर्व घे, व युद्धाला तयार हो.'

नंतर दुर्योधनानें उत्तम सोनेरी चिलखत अंगांत घातलें. डोक्याला शिरस्त्राण बांधिलें, व हातांत गदा घेऊन तो युधिष्ठिराला म्हणाला, 'चला कोण येणार तो उठूं द्या. तूं ये किंवा अर्जुन

येऊं दे किंवा भीम येऊं दे अथवा नकूलसहदेव येऊं देत. कोण पाहिजे ते या. माझ्याबरोबर गदायुद्धांत कोणीच टिकणार नाहीं.

अशा रीतीनें दुर्योधन गर्जना करीत असतांना भगवान् श्रीकृष्ण रागानें युधिष्ठिराला म्हणाला, 'अरे, आमच्यापैकीं कोणा पाहिजे त्याच्याबरोबर लढ व त्याला ठार करून राज्य घे, असें जें तूं दुर्योधनाला म्हणालास तें केवढें साहस केलेंस. जर त्यानें तुला किंवा अर्जुनाला किंवा नकुळसहदेवांना युद्धाला बोलाविलें असतें, तर मग कसें झालें असतें? गदायुद्धांत याच्याबरोबर टिकणारा कोणीच नाहीं. त्यानें भीमाला मारण्याकरितां गदायुद्धाचा तेरा वर्षें अभ्यास केला आहे. ह्याच्या तोडीला भीमावांचून दुसरा कोणी येईलसें मला तरी वाटत नाहीं. पण त्यानें झालें तरी ह्या विद्येंत म्हणावा तसा अभ्यास केला नाहीं. भीम बलवान् आहे खरा, परंतु दुर्योधन फार कसबी आहे. शक्तिवानापेक्षां युक्तिवानाचीच योग्यता जास्त आहे. ह्मणून तूं आपल्या शत्रूचा फायदा करून स्वतःचें मात्र नुकसान करून घेत होतास. सर्व शत्रूंचा नाश करून त्यांच्यापैकीं एकटाच उरला असतां व तोही संकटांत असतां, त्याच्याबरोबर लढण्याला एकाला उठवून आपलें मिळालेलें राज्य गमावण्याला निघाला होतास? तुह्मापैकीं एकाच्याही हातून दुर्योधनाला न्यायानें जिंकतां येणार नाहीं. एवढेंच नव्हे, तर प्रत्यक्ष इंद्रसुद्धां त्याच्याबरोबर गदेनें युद्ध करण्याला टिकणार नाहीं. तो गदायुद्धांत फारच निपूण आहे; म्हणून भीमाला तरी जय मिळेल किंवा नाहीं ह्याबद्दल मला संशय वाटतो. पण तूं तर 'आमच्यापैकीं कोणाही एकट्याला मारून सर्व राज्य घे,' असें दुर्योधनाला म्हणालास. ह्यावरून पुन्हा तूं पूर्वींप्रमाणेंच जुगार आरंभिलीस! ह्यावरून असें वाटतें कीं, ही पंडूची संतति राज्यभोगासाठीं जन्मली नसून कायमचा

वनवास करावा व भिक्षा मागून पोट भरावें एवढ्याच करितां हिचा जन्म आहे.' ह्यावर भीम म्हणाला, 'हे कृष्णा, तूं असें वाईट वाटून घेऊं नकोस. काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं. मी आज ह्याला खात्रीनें ठार करतों. ह्या गदेनें ह्याच्याशीं युद्ध करण्याकरितां माझे बाहू फुरफुरूं लागले आहेत.' असें बोलून हातामध्यें गदा घेऊन तो दुर्योधनापुढें युद्धाला दंड थोपटून उभा राहिला. तेव्हां तो मानी दुर्योधनही रागानें त्याच्यावर आपली गदा उगारून चालून गेला. हें आपल्या प्रिय शिष्यांचें गदायुद्ध पाहण्यासाठीं बलरामही तीर्थयात्रेहून परतून त्या ठिकाणीं आला.

भीमदुर्योधनांचें गदायुद्ध.

भीम आपली गदा सांवरून दुर्योधनावर मोठ्या रागानें चालून गेला; तेव्हां दुर्योधनही त्यावर तुटून पडला. अशा रीतीनें मोठ्या त्वेषानें तुटून पडून एकमेकांवर जेव्हां त्यांनीं गदेचे प्रहार केले तेव्हां त्याचा मोठा शब्द झाला. हें गदायुद्ध फार निकराचें झालें. हे योद्धे एकमेकांना इतक्या जोरानें मारीत होते कीं, जेव्हां ते आपल्यावरील तडाक्याची गदेनेंच पत करीत तेव्हां त्या गदेपासून ज्या ठिणग्या उडत त्यांच्या योगानें सर्व आकाश भरून जाऊं लागलें. उन्मत्त हत्ती ज्याप्रमाणें आपआपसांत भांडतात व एकमेकांवर दंतप्रहार करतात, त्याप्रमाणें हे वीर एकमेकांना आपल्या प्रचंड गदांनीं झोडीत होते. हे लढवय्ये पवित्रे चाळीत आपल्या प्रचंड गदेनेंच जेव्हां एकमेकांना रोखून धरीत, तेव्हां त्यांच्या ह्या गदेला पाहून प्रेक्षकांना यमदंडाची आठवण होऊं लागे. भीम आपली प्रचंड गदा जोरानें फिरवी तेव्हां तींतून घूंऽऽऽ असा मोठा आवाज निघे. ते स्वतःचे रक्षण करीत संधि साधून एकमेकांवर गदा सोडीत असत. हूल

दाखवून एकदम मागें सरत, एकीकडे मारण्याचें ढोंग करून दुसरीकडेच ठोकीत, आपली गदा उगीच वाकडी तिकडी फिरवून एकमेकांना चकवीत. आपल्यावर गदेचा तडाका येत आहे असें पाहून एकदम खालची बैठक घेऊन पत करून पुन्हा उठून स्वतःची गदा सोडीत. एकदम पुढें होऊन एकमेकांना मारीत किंवा मागें वळून तडाके देत. कित्येक वेळां तर ते वीर एकमेकांवर एकदम उडी मारून आपल्या गदेचा प्रहार करीत असत.

अशा प्रकारें आपल्या अंगीं असलेली सर्व बुद्धिमत्ता व युद्धकौशल्य यांचा उपयोग करून एकमेकांना हाणून पाडण्याकरितां ते दोघेही फार निकरानें लढत होते. उजवीकडून अर्धचंद्राकृति वाटोळा फेरा घेऊन दुर्योधन भीमाला मारण्याकरितां झपाट्यानें निघाला असतां भीमाला हें त्याचें कसब कळून येऊन त्यानें लगेच स्वतः डावीकडून फिरून दुर्योधनाचा बेत फसविला, तरीही न डगमगतां दुर्योधनानें त्यांतल्या त्यांत संधि साधून भीमाच्या बरगडींत एक जोराचा तडाखा दिला. दुर्योधनाच्या या तडाख्यानें चेव येऊन त्याला उलट मारण्याकरितां भीम आपली जंगी गदा झपाट्यानें गरगर फिरवूं लागला. हें पाहून दुर्योधनानेंही आपली गदा तशीच उलट दिशेनें फिरविली. त्या गदेवर गदा आपटून दुर्योधनाचा तडाका चुकला. इतक्यांत दुर्योधन वाकडे तिकडे वळसे घेत मोठ्या वेगानें भीमावर धावून आला; परंतु भीमानें त्याच्या तडाक्याची आपल्या गदेनें पत केली. ह्या वेळीं दोघांच्याही गदा फार जोरानें सुटल्यामुळें त्यांतून चोहोंकडे अग्नीच्या ठिणग्या उडाल्या. आपला तडाखा व्यर्थ गेला हें सहन न होऊन दुर्योधनानें पुन्हा डावीकडून गिरकी घेऊन परत भीमाच्या डोक्यावर खूप जोरानें गदा मारिली. एवढा जोराचा तडाखा बसला असूनही भीम एक पाऊलभर सुद्धां हालला नाहीं.

नंतर भीमानें आपल्या प्रतिपक्ष्यावर जोरानें गदा सोडिली; परंतु दुर्योधनानें खूप चलाखीनें त्याचा नेम चुकवून तेथून एक पवित्रा काढिला. त्यामुळें भीमाचा नेम चुकून ती गदा तशीच खालीं जमिनीवर आदळली. तिच्या योगानें सर्व पृथ्वी हादरून गेली. पुन्हा भीमानें गदा सोडिली; परंतु दुर्योधनानें आपल्या चलाखीनें व युद्धकौशल्यानें तिचीही पहिल्यासारखीच वाट लाविली; एवढेंच नव्हे, पण दुर्योधनानें भीमाची गडबड उडालेली पाहून त्या गडबडींत त्याच्या छातीवर एक गदेचा तडाखा दिला. त्यानें भीम अगदीं वेडावून जाऊन त्याला आतां पुढें काय करावें हें सुचेना. ही भीमाची स्थिति पाहून पांडवांचीं तोंडें उतरलीं; परंतु इतक्यांत भीमानें रागाच्या आवेशांत दुर्योधनाला खूप जोरानें गदेचा तडाखा दिला. हा तडाखा बऱ्याच जोरानें बसल्यामुळें दुर्योधनाला तो सहन न होऊन तो मटकन् खालीं बसला; परंतु पुन्हा तो झटकन् उठून उभा राहिला. लगेच त्यानें जवळच उभा असलेल्या भीमाला आपल्या गदेच्या तडाक्यानें ज़मिनीवर पाडिलें. आपलें रक्तानें भरलेलें तोंड पुसून व भोवंड आल्यामुळें मिटलेले डोळे उघडून रागानें मुसमुसत भीम दुर्योधनाकडे पहात पहात उठून पवित्र्यांत उभा राहिला.

अशा रीतीनें इकडे युद्धाची गर्दी चालली असतां, 'हे कृष्णा, ह्या योद्ध्यामध्यें कोण अधिक आहे असें तुला वाटतें, म्हणून अर्जुनानें श्रीकृष्णाला विचारिलें. तें ऐकून कृष्ण म्हणाला, 'हे दोघेही सारखेच शिकलेले आहेत; पण भीम शक्तीनें अधिक आहे व दुर्योधन कलेनें अधिक आहे. न्यायानें लढेल तर भीमाच्यानें कांहीं दुर्योधनाला जिंकवणार नाहीं. म्हणून यावेळीं भीमाला कपटयुद्ध करण्याला कांहीं हरकत नाहीं. शिवाय भीमानें द्यूताच्या वेळीं दुर्योधनाची मांडी फोडून त्याला ठार करण्याची प्रतिज्ञा के-

ली आहे. आतां ती प्रतिज्ञा खरी करून भीमानें कपट्याला कपटानेंच ठार करावें; कारण, ह्यानें या गदायुद्धाचा एकसारखा तेरा वर्षें अभ्यास केला आहे. हा पहा भीमाला ठार करण्याकरितां इकडून तिकडे पवित्रे चाळीत कशी खटपट करीत आहे.' हे श्रीकृष्णाचें भाषण ऐकून अर्जुनानें भीमाच्या नजरेस पडेल अशा रीतीनें आपल्या डाव्या मांडीवर थाप मारिली. ही खूण मिळाल्याबरोबर भीम नानाप्रकारचीं मंडलें घेऊन व वाकडे तिकडे पवित्रे चाळून आपल्या प्रतिपक्ष्याला भेवडावण्याच्या खटपटीला लागला हें पाहून गदायुद्धामध्यें निष्णात असलेला दुर्योधनही मागेंपुढें पवित्रे चाळून त्याला ठार करण्याची संधि पाहूं लागला. हे दोघेही वीर एकमेकांना ठार करण्याकरितां एकसारखे टपून राहिले होते. ते जेव्हां रागानें एकमेकांवर गदा सोडीत व त्याची गदेनेंच पत करीत, तेव्हां खवळलेल्या समुद्राप्रमाणें मोठा भयंकर आवाज निघत असे, व विस्तवाच्या ठिणग्या पडत असत. अशा रीतीनें जिवाचीही पर्वा न करितां खूप नेटानें युद्ध केल्यामुळें ते दोघेही दमून गेले.

चिखलामध्यें खेळणारे रेडे ज्याप्रमाणें टकरा देऊन युद्ध करतात, त्याप्रमाणें जोरानें आपल्या गदेच्या प्रहारानें त्यांनीं एकमेकांना अगदीं जर्जर करून सोडिलें. सर्वांगावर गदेचे तडाखे बसल्यामुळें दोघांच्याही शरीरांतून सारखें रक्त वहात होतें. अशारीतीनें युद्ध चाललें असतां मध्येंच भीमानें आपण गैरसावध आहोंसें दाखविलें. तेव्हां दुर्योधन झपाट्यानें त्याला मारण्याकरितां पुढें सरसावला. हें पाहून भीमानें आपली गदा खूप जोरानें त्याच्यावर सोडिली; पण दुर्योधन युद्धकलेंत निष्णात असल्यामुळें लगेच चलाखीनें पवित्रे काढून तो मागें सरला, त्यामुळें भीमाचा नेम चुकून गदा जमिनीवर आपटली. पुढें थोडासा विसावा घे-

ऊन भोवंड आल्यामुळें मंद झालेली दृष्टि साफ झाल्यावर भीमानें आपली गदा सांवरून दुर्योधनावर सिंहाप्रमाणें झडप घातली. ह्यावेळींही दुर्योधनानें ह्याचा नेम चुकविण्याच्या बेतानें वर उडी मारिली; परंतु हा त्याचा बेत भीमाला कळून आल्यामुळें त्यानें दुर्योधन वर उठतो आहे इतक्यांतच त्याच्या दोन्ही मांड्यावर एकदम गदेचा तडाखा देऊन सिंह जसें हत्तीचें गंडस्थळ फोडतो, त्याप्रमाणें त्या फोडून काढिल्या. त्यासरशीं दुर्योधन धाडदिशीं खालीं आला. तेव्हां भीम मोठ्या ऐटीनें त्याच्या डोक्यावर लाथ मारून 'गायरे गाय' म्हणत नाचूं लागला.

हें पाहून बळरामाला फार राग आला; तिरस्कारयुक्त अशा स्वरानें सर्व राजेलोकांच्या देखत तो भीमाला ह्मणाला. ' भीमा, तुला धिक्कार असो. गदायुद्धांत बेंबीच्या खालीं मारलेलें आपण आजपर्यंत कोठेंच पाहिलें नाहीं; कारण, गदायुद्धांत बेंबीच्या खालीं मारूं नये असा नियमच आहे. ह्या नियमाला झुगारून देऊन तूं वाटेल तसा वागलास. ' असें ह्मणून बलराम रागानें आपला नांगर उचलून भीमावर धावला. तेव्हां श्रीकृष्ण पुढें होऊन नम्रपणानें त्याला आवरून धरून त्याचें सांत्वन करून म्हणाला, ' आपल्या पक्षाचा उदय होणें किंवा आपल्या शत्रुपक्षाचा क्षय होणें ही आपल्याच ऊर्जित काळाचीं लक्षणें आहेत. ह्याच्या उलट होऊं लागलें तर मात्र आपला विनाशकाल जवळ आला असें समजून प्रत्येकानें त्याच्या प्रतिकारार्थ झटलें पाहिजे. पांडव हे आमचे मित्र आहेत. शिवाय ते सत्वशील असून आपल्या आतेचे मुलगे आहेत; त्यांना त्यांच्या शत्रूंकडून बराच त्रास झाला आहे आणि मला माहीत आहे कीं, प्रतिज्ञा पालन करणें हा क्षत्रियांचा धर्म आहे. ' युद्धामध्यें सुयोधनाच्या मांड्या मी आपल्या गदेनें फोडीन, ' अशी पूर्वीं भीमानें प्रतिज्ञा केली होती. शिवाय 'तुझ्या मांड्या भीम

आपल्या गदेनें फोडील,' असा मैत्रेयांनीं दुर्योधनाला शापही दिला होता. म्हणून झालें हें कांहीं वावगें झालें नाहीं असें मला वाटतें. आप्तपणानें व स्नेहभावानें पांडवांवर आमचें प्रेम जडलें आहे; तेव्हां त्यांचा उदय होणें ह्मणजे आपला उदय झाल्यासारखाच आहे.' हें वासुदेवाचें भाषण ऐकून बलराम म्हणाला, 'सज्जनांकडून रक्षिलेल्या धर्माची पायमल्ली दोघांकडून होते. एक लोभी मनुष्याकडून व दुसरी कामी मनुष्याकडून. धर्म, अर्थ व काम ह्यांपैकीं एकाचीही पायमल्ली न करतां हे तिन्ही योग्य रीतीनें जो प्राप्त करून घेतो त्यालाच खरें व शाश्वत सुख मिळतें. हे कृष्णा, तूं कांहीं म्हटलेंस तरी ह्या युद्धांत भीमसेनानें धर्माला गुंडाळून ठेविलें हें खास. यथान्याय युद्ध करणारा हा दुर्योधन उत्तम गतीला जाईल. ह्यानें युद्धदीक्षा घेऊन रणयज्ञाला प्रारंभ केला व शेवटीं त्यांत आपली स्वतःचीच आहुति देऊन यशोरूपी अवभृत स्नान करून मुक्ति मिळविली.' असें म्हणून बलराम रथांत बसून द्वारकेला निघून गेला.

अश्वत्थाम्याचें सैनापत्य.

इकडे दुर्योधन मरणोन्मुख पडला असतां आपल्या दुःसह वेदनेला न जुमानतां हात टेकून कपाळाला आठ्या घालून रागीट मुद्रेनें कृष्णाकडे पहात तो त्याला म्हणाला, 'अरे कंसाच्या गुलामा, गदायुद्धांत अन्यायानें माझ्या मांड्या फोडविल्यास ह्याबद्दल तुला लाज नाहीं वाटत? माझी मांडी फोडण्याविषयीं भीमाला आठवण देण्यास तूं अर्जुनाला सांगितलेंस तें मला मुळींच समजलें नाहीं अशी का तुझी कल्पना आहे? अगदीं सरळ मार्गानें युद्ध करणाऱ्या अशा हजारों वीरांना तूं कपटानें मारविलेंस ह्यांत तुला कांहींच लाज वाटत नाहींना? मी, कर्ण व भीष्मद्रो-

ण यांच्याशीं तुह्मी न्यायानें युद्ध करतां तर तुह्माला खचित यश आलें नसतें. मी सर्व विद्या संपादन करून व यथान्याय सर्व पृथ्वीचें राज्य करून आतां क्षत्रिय ज्याच्याकरितां नेहमीं तयार असतात असा युद्धांतला मृत्यु मला मिळाला, तेव्हां याहून अधिक भाग्य तें काय पाहिजे ? मी मी म्हणणाऱ्या क्षत्रियांना दुर्लभ असे केवळ स्वर्गींचे भोग भोगून, आप्त, मित्र व चाकर या सर्वांसह मी आतां स्वर्गाला चाललों आहें ! ' हें दुर्योधनाचें उत्साहभरित शब्द ऐकून सर्व सिद्ध मोठ्यानें 'शाबास शाबास ' म्हणाले. आकाशांतून पुष्पवृष्टि झाली. गंधर्व मंजुळ वाद्यें वाजवूं लागले; व अप्सरा दुर्योधनास उद्देशून कीर्तिपर गाणीं गाऊं लागल्या. असा चोहोंकडून दुर्योधनाचा त्याच्या मरणसमयीं जयजयकार झाला.

पुढें पांडव तेथून निघून गेल्यावर दुर्योधन मांडी मोडून तेथें कण्हत पडला असतां कांहीं लोक डोळ्यांतून अश्रू गाळीत अश्वत्थाम्याकडे गेले व त्यांनीं त्याला ही हकीकत सांगितली. तेव्हां अश्वत्थामा, कृपाचार्य व कृतवर्मा दुर्योधनाकडे धावून आले. सर्व अंग रक्तानें भरून जाऊन, दुःखानें व्याकूळ होऊन जमिनीवर लोळत पडलेल्या राजा दुर्योधनाला पाहून त्या तिघांनाही फार वाईट वाटलें. कांहीं वेळानें अश्वत्थामा पाण्यानें डोळे भरून येऊन दुःखानें सुस्कारा टाकीत दुर्योधनाला म्हणाला, 'तुझ्यासारखा सार्वभौम राजा आज जमिनीवर धूळ खात पडला आहे, हें पाहून या मृत्युलोकीं कशाचाच भरंवसा नाहीं हें अगदीं खरें ठरतें.' हें ऐकून राजा दुर्योधन म्हणाला, 'ब्रह्मदेवानें ह्या लोकची वस्ती अशीच करून ठेविली आहे. कालगतीनें प्रत्येक वस्तूचा नाश व्हावयाचा. आतां आनंदाची गोष्ट हीच कीं, मीं आजपर्यंत युद्धांत पाठ कधींच दाखविली नाहीं. पांड-

वांनीं मात्र मला अन्यायानें मारिलें. तुम्हीही आजपर्यंत मला जय मिळावा म्हणून पुष्कळ झटला; पण दैवगतीच फिरली त्याला तुह्मी तरी काय कराल ? ' असें ह्मणत असतां दुर्योधनाचे डोळे पाण्यानें भरून आले व गळा दाटून येऊन त्याला एक अक्षरही बोलवेना. अशी ही दुर्योधनाची दुःखद स्थिति पाहून अश्वत्थाम्याला वाईट वाटलें. पांडवांचा अन्याय लक्ष्यांत घेऊन तो रागानें दुर्योधनाला म्हणाला, ' ह्या नीचांनीं माझ्या तातांनाही कपटानेंच मारिलें. पण तुझी ही स्थिति पाहून जितकें मला वाईट वाटतें तितकें त्याबद्दल वाटत नाहीं. आतां मी तुला, आजपर्यंत केलेल्या पुण्याची शपथ घेऊन सांगतों कीं, ' त्या कृष्णाच्या देखत आज मी सर्व पांचालांना तुझ्या कृपेनें ठार करतों. ' हें आश्वासन ऐकून दुर्योधनानें कृपाचार्यांना एक लोटा पाण्यानें भरून आणावयाला सांगितलें. त्याप्रमाणें कृपाचार्यांनीं तो भरून आणल्यावर दुर्योधनानें अश्वत्थाम्याला सैनापत्याचा अभिषेक केला. विधिपूर्वक अभिषेक झाल्यानंतर अश्वत्थामा दुर्योधनाला आलिंगन देऊन मोठ्यानें सिंहनाद करीत तेथून निघून गेला.

पांडवांच्या गोटावर छापा व कत्तल.

याप्रमाणें दुर्योधनानें आपल्या अंतकाळीं अश्वत्थाम्याला सेनापति केल्यावर अश्वत्थामा, कृपाचार्य व कृतवर्मा हे तिघे आपल्या गोटाकडे परतले. अंगावर वार लागल्यामुळें व बरेच श्रम झाल्यामुळें त्यांचीं सर्व गात्रें अगदीं थकून गेलीं होतीं, तरी पांडवांनीं आपल्या गोटावर तळ दिला आहे हें पाहून ते आपला पाठलाग करतील ह्या भीतीनें हे तसेच पळत सुटले. त्यांचे घोडे अगदीं

दमून गेले होते, व त्यांनाही पुष्कळ तहान लागली होती; पण ह्या धांदलींत याचेंही त्यांना भान राहिलें नाहीं. अशा रीतीनें पळत पळत ते संध्याकाळचे सुमारास पूर्वेकडील एका मोठ्या किर्र अरण्यांत शिरले. हें अरण्य नानाप्रकारच्या पक्ष्यांनीं व श्वापदांनीं अगदीं गजबजलें होतें. सर्व अरण्यभर झाडें व वेली दाट पसरल्या होत्या. चहूंकडे उत्तम पाण्याचे झरे वहात होते. तसेंच त्या पाण्यांतून उत्तम प्रकारचीं कमळें उगवलीं होतीं. येथें घोड्यांना पाणी पाजून ते आपणही पाणी प्याले. नंतर येथेंच आपलीं संध्योपासनादि नित्यकर्में आटोपून हे रणवीर रात्र झाल्यामुळें निवाऱ्याकरितां एका भल्या मोठ्या वडाच्या आश्रयाला जाऊन राहिले. कांहीं प्राणी झोपेच्या गडबडींत होते व राक्षसादिकांसारखे कांहीं प्राणी रात्र झालेली पाहून आनंदानें नाचत मोठ्यानें गर्जना करीत होते. अशा वेळीं हे तिघे वीर कौरवपांडवांच्या ह्या भयंकर रणकंदनासंबंधानें विचार करीत या झाडाखालीं बसले होते. दिवसभर झालेल्या दगदगीनें बराच थकवा आला असल्यानें कृपाचार्य व कृतवर्मा ह्यांना लवकरच गाढ झोप लागली; परंतु रागानें फुणफुणणाऱ्या अश्वत्थाम्याला मात्र या वेळीं मुळींच झोप आली नाहीं. तो सापाप्रमाणें एकसारखे फुस्कारे टाकीत नानाप्रकारच्या प्राण्यांनीं भरलेल्या अशा त्या वनामध्यें इकडे तिकडे पहात जागाच होता. तेव्हां त्याला त्या झाडावर पुष्कळ कावळे आपापल्या घरट्यांमध्यें निर्धास्तपणें झोप घेतांना दिसले. त्यांच्याकडे कांहीं वेळ पहात असतां एक मोठें थोरलें घुबड त्या झाडाच्या फांद्यांमध्यें शिरलें. त्यानें त्या दाट फांद्यांमध्यें शिरून पुष्कळ कावळे मारून, कित्येकांचे पंख उपटून, कित्येकांच्या मुंड्या मुरगाळून व कित्येकांचे पाय मोडून खालीं टाकिले. याप्रमाणें जे जे ह्मणून त्याला दिसले त्या सर्वांचा

त्यानें फडशा पाडिला. एका क्षणांत ह्या घुबडानें तें सर्व झाड कावळ्यांच्या छिन्नभिन्न झालेल्या शरीरांनीं भरून टाकिलें.

हें त्या घुबडाचें कृत्य पाहून आपणही असेंच करावें असा विचार अश्वत्थाम्याच्या डोक्यांत शिरला. 'ह्या पक्ष्यानें मला उत्तम उपदेश केला,' असें त्याला वाटलें. शत्रूंचा नाश करण्याला हीच वेळ योग्य आहे. नाहींपेक्षां पांडवांना मारणें माझ्या हातून होणार नाहीं. ते बलवान् आहेत, त्यांच्याजवळ शस्त्रास्त्रेंही बरींच आहेत, शिवाय युद्धांत जय मिळाल्यानें त्यांना दुप्पट जोर आला आहे; पण ह्यांचा फडशा पाडीन ह्मणून राजा दुर्योधनापाशीं मी तर प्रतिज्ञा करून चुकलों आहें. मी जर आतां ह्यांच्याशीं न्यायानें युद्ध करीन तर खात्रीनें माझी प्रतिज्ञा खरी होणार नाहीं; परंतु गनिमी कावा लढविला तर मात्र निःसंशय सर्व शत्रूंचा फडशा पडेल. प्रत्येकानें जेणेंकरून कार्यसिद्धि होईल असाच मार्ग पत्करला पाहिजे, हीच जगाची नीति आहे. शत्रूचें सैन्य दमलें असतांना किंवा तें जेवण्याच्या गडबडींत असतांना, कूच करीत असतांना किंवा गाढ झोपेंत असतांना, त्यांतील मोठमोठे वीर नाहींसे झाले असतांना, किंवा त्यांमध्यें दुफळी झाली असतांना त्याच्यावर हल्ला करून त्याचा फडशा पाडिला पाहिजे.' असा विचार करून त्यावेळीं पांडवांना पांचालपुत्रांसह कंठस्नान घालण्याच्या निश्चयानें अश्वत्थाम्यानें कृपाचार्य व कृतवर्मा यांना जागें केलें.

कृपाचार्य व कृतवर्मा हे दोघेही वीर उठून बसल्यावर डोळे पाण्यानें भरून येऊन अश्वत्थामा त्यांना ह्मणाला, 'आह्मीं ज्यांच्याकरितां पांडवांशीं एवढें वैर मांडिलें तो राजा दुर्योधन भीमाकडून कपटानें मारिला गेला, एवढेंच नव्हे; तर क्षुद्र भीमानें राजाचे डोकीवर लाथ मारिली! उत्तम तऱ्हेनें मशागत केलेल्या ज-

मिनीवर पाऊस पडल्यानें जसें पीकही फार चांगलें येतें, त्याचप्रमाणें उद्योगशील पुरुषांस दैवाची अनुकूलता झाल्यास मोठमोठीं कार्यें उठतात; कारण केलेल्या कार्याचें मुळींच फळ आलें नाहीं, असें या जगांत कधींच होत नाहीं; परंतु उलट कांहींच न करणारे मात्र वारंवार संकटांत पडलेले दृष्टीस पडतात. ह्मणून मी आज स्वीकारलेल्या क्षात्रधर्माप्रमाणें वागून बापाच्या व राजाच्या ऋणांतून मुक्त होतों. सर्व पांचाल, जय प्राप्त झाला आहे. या आनंदाच्या भरांत कवचें वगैरे काढून ठेवून व रथ सोडून दिवसभर खूप श्रम झाल्यामुळें दमून जाऊन आतां अगदीं सुस्त पडले आहेत. तेव्हां आतांच त्यांच्यावर छापा घालून सर्वांची कत्तल करून सोडावी. पांचालांना मारल्याशिवाय माझें मन शांत होणार नाहीं. पशूच्या मुंडक्याप्रमाणें मी आज धृष्टद्युम्नाचें डोकें ठेचून पांचाल व पांडव यांच्या मुलांचे माझ्या तरवारीनें तुकडे तुकडे करून टाकतों व अशा रीतीनें एकदां कृतकार्य होऊन सर्वांच्या ऋणांतून मोकळा होतों.' असें ह्मणून तो तडक पांडवांच्या गोटांत शिरला. ह्या वेळीं सर्व पांडववीर दिवसभर झालेल्या श्रमानें व जयाच्या आनंदानें गाढ झोपीं गेले होते. अश्वत्थामा प्रथमतः धृष्टद्युम्नाच्या तंबूंत गेला. त्यावेळीं धृष्टद्युम्नाला गाढ झोप लागली होती. हें पाहून अश्वत्थाम्यानें त्याला जोरानें एक लाथ मारून जागें केलें. धृष्टद्युम्न पुरा जागा होऊन अश्वत्थाम्याला ओळखून त्याच्यावर एकदम तुटून पडणार तोंच अश्वत्थाम्यानें त्याच्या शेंडीला धरून त्याला खालीं पाडिलें व त्याच्या छातीवर एक पाय देऊन दुसऱ्या पायानें त्याची नरडी दाबिली. त्यामुळें त्याचा कांहीं उपाय चालेना; तरी त्यानें अश्वत्थाम्याला आपल्या नखांनीं खूप ओरबडलें. अश्वत्थाम्यानें बकऱ्याप्रमाणें त्याची नरडी खूप जोरानें दाबिली, त्यासरशी त्यानें मोठ्यानें किंकाळी

फोडिली. पुढें लाथाबुक्यांनीं त्याला ठार करून मोठ्यानें गर्जना करीत अश्वत्थामा तेथून निघाला. पुढें उत्तमौजा हा जवळच आपल्या आंथरुणावर स्वस्थ निजला आहे हें पाहून त्यालाही अश्वत्थाम्यानें पायानें गळा दाबूनच मारिलें. इतक्यांत युधामन्यूनें अश्वत्थाम्याच्या छातीवर आपली गदा सोडिली. अश्वत्थाम्यानें लगेच त्याला ओढून खालीं पाडिलें, व त्याचीही बकऱ्याप्रमाणें पायानें ठेचूनच वाट लाविली. नंतर तो हातांत तरवार घेऊन डेऱ्यांत शिरला. तेथें निजलेल्या सर्वांना त्यानें आपल्या तरवारीनें कापून काढिलें. नंतर आपल्या तीक्ष्ण तरवारीनें बऱ्याच प्रभद्रकांना यमलोकची वाट दाखवून त्यानें शिखंडीला गांठून त्याचेही दोन तुकडे करून खालीं पाडिलें. तेव्हां बरेच लोक घाबरून पळूं लागले. पुढें त्यानें द्रुपदराजाचे मुलगे व नातू यांना त्या गर्दींतून हुडकून काढून ठार केलें. त्यानें कित्येकांचे पाय मोडिले, कित्येकांचे हात तोडिले, कित्येकांच्या बरगडींत वार केला, कित्येकाचीं डोकीं उडविलीं, कित्येकांचीं जानवीं उतरलीं; त्याचप्रमाणें त्यानें हत्ती, घोडे, उंट वगैरे पशूंचेही तुकडे तुकडे करून खालीं पाडिले. ह्याप्रमाणें ह्या काळासारख्या क्रूर अश्वत्थाम्यानें हें अमानुष कृत्य करून सर्व रणभूमि योद्ध्यांच्या व पशूंच्या छिन्नविछिन्न झालेल्या देहांनीं अगदीं झाकून काढिली. कित्येक जागे होऊन हा काय प्रकार आहे ह्मणून पाहून आपलीं शस्त्रें सांवरताहेत तोंच ह्या काळरूपी वीराची त्यांवर धाड पडे. पांडव व श्रीकृष्ण यावेळीं येथें नसल्यानें ते मात्र त्याच्या तडाक्यांतून सुटले.

ह्याप्रमाणें कत्तल उडवून पांडवांच्या शिबिराला आग लावून निघून जाऊन दुर्योधनाला त्यानें ती बातमी दिली. ती ऐकून दुर्योधनानें सुखानें प्राण सोडिला.

अश्वत्थाम्याचा मोड.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं धृष्टद्युम्नाच्या सारथ्यानें राजा धर्माकडे जाऊन अश्वत्थाम्यानें रात्रीं येऊन मोठ्या क्रूरपणानें कत्तल केल्याची सर्व हकीकत त्याला सांगितली. ती ऐकून युधिष्ठिराला फार दुःख झालें. भीमाला अश्वत्थाम्याबद्दल फार राग आला. रागाच्या सपाट्यांतच तो धनुष्यबाण घेऊन अश्वत्थाम्याला ठार करण्याकरितां झपाट्यानें निघून गेला. भीम जो निघाला तो तडक गंगेच्या कांठीं अश्वत्थामा बसला होता त्या ठिकाणीं येऊन पोहोंचला. तेथें व्यासमुनी ऋषींसहवर्तमान आनंदानें भागीरथीच्या तीरीं ईशचिंतन करीत बसले होते. अश्वत्थामाही त्यांच्याजवळच दर्भासन टाकून बसला होता. त्याला पाहून भीम चवताळून ‘ थांब थांब ’ असें ह्मणत जोरानें त्याच्यावर धावला. भीम आपल्यावर चाल करून येत आहे व त्याच्या पाठोपाठ श्रीकृष्णाच्या रथांत बसून त्याचे दोघे भाऊही त्याला मदत करण्याला येत आहेत हें पाहून अश्वत्थाम्याला मोठी चिंता पडली. इतक्यांत आपल्या बापापासून मिळालेल्या दिव्य अस्त्राची त्याला आठवण झाली. लगेच त्यानें सर्व पांडवांचा फडशा पाडण्यासाठीं त्या अस्त्राचें अभिमंत्रण करून तें भीमावर सोडिलें. त्यासरशीं त्यानें सोडलेल्या बाणांतून विस्तवाच्या ठिणग्या पडूं लागल्या, व आतां ह्या अस्त्रानें सर्व त्रैलोक्य जळून खाक होतें कीं काय अशी सर्व लोकांना भीति पडली. त्या अस्त्राचा तो प्रभाव पाहून श्रीकृष्ण अर्जुनाला गडबडीनें ह्मणाला, ‘ अर्जुना, अर्जुना, द्रोणाचार्यांनीं जें तुला अस्त्र दिलें आहे, त्याचा उपयोग करण्याची ही वेळ आहे. तूं आपल्या अस्त्रानें याचें निवारण कर, व आपलें आणि भावांचें रक्षण कर.’ हें ऐकून अर्जुनानें आपलें धनुष्य हातीं घेऊन रथाखालीं उडी टाकिली. नंतर ‘ प्रथमतः अश्वत्थाम्याचें व त्यानंतर

आपलें व आपल्या भावांचें ह्या अस्त्रानें कल्याण होवो,' असें ह्मणून अश्वत्थाम्यानें सोडलेल्या अस्त्राचें निवारण करण्याकरितां अर्जुनानें आपलें दिव्यास्त्र सोडिलें. तेव्हां ह्या दोघांच्या अस्त्रांपासून प्रलयाग्नीप्रमाणें भयंकर ज्वाला उत्पन्न झाल्या. आकाशामध्यें मेघगर्जनेप्रमाणें भयंकर नाद उत्पन्न झाला, व त्यानें दाही दिशा दणाणून गेल्या. सर्व पृथ्वी तिच्यावरील पर्वतांसह डळमळूं लागली. आतां ह्या अस्त्रांच्या योगानें सर्व ब्रह्मांडाची राखरांगोळी उडते कीं काय अशी सर्वांना भीति पडली. इतक्यांत नारदमुनी तेथें आले. नंतर नारद व व्यास हे दोघेही त्या अस्त्रांपासून प्राणिमात्रांना त्रास होऊं नये ह्मणून आपण त्या अस्त्रांच्या मध्यें उभे राहून 'आजपर्यंत पुष्कळ अतिरथी महारथी झाले; पण त्यांपैकीं एकानेंही ह्या अस्त्राचा धनुष्यावर प्रयोग केला नाहीं; असें असून तुह्मींच या अस्त्राचा प्रयोग काय ह्मणून केलात,' ह्मणून त्यांनीं त्यांना विचारिलें. तें ऐकून अर्जुन नम्रपणानें हात जोडून त्यांना म्हणाला, 'अश्वत्थाम्यांच्या अस्त्राचें निवारण व्हावें एवढ्याचकरितां मीं आपलें अस्त्र सोडिलें. आतां जर मी आपलें अस्त्र परत घेईन तर हे आपल्या अस्त्रानें सर्व जगाची राखरांगोळी करतील. आतां जेणेंकरून आमचें व सर्व जगाचें कल्याण होईल अशी तजवीज आपण करावी. आपणाला अशक्य कांहींच नाहीं.' असें ह्मणून अर्जुनानें आपलें अस्त्र परत घेतलें. एकदां सोडलेलें अस्त्र पुन्हा परत घेणें फार कठीण आहे. तें देवाधिपति इंद्राच्यानें सुद्धां होणार नाहीं. ज्यानें आजन्म कडकडीत ब्रह्मचर्य पाळलें असेल त्यालाच तें परत घेतां येतें. ज्याचें ब्रह्मचर्य ढळलें आहे, अशानें जर तें सोडून परत घेण्याचा प्रयत्न केला तर त्याचें व त्याच्या सर्व सुहृदांचें डोकेंच तुटून खालीं पडतें. अर्जुन नेहमीं खरें बोलणारा, शूर, कडकडीत ब्रह्मचर्य पाळणारा

व सदोदित गुरुसेवेंत तत्पर असा होता; ह्मणूनच त्याच्यानें हें अस्त्र परत घेववलें. अश्वत्थाम्याचें अस्त्र सुटलें असून व स्वतः-च्या अंगीं सामर्थ्य असून अर्जुनानें पुन्हा अश्वत्थाम्यावर अस्त्रप्रयोग केला नाहीं.

इकडे अश्वत्थाम्यानें ते ऋषी मध्यें उभे आहेत असें पाहिलें; परंतु त्याला तें अस्त्र परत घेतां येईना. तेव्हां तो दीन होऊन व्यासांना ह्मणाला, ' हे महामुने, भीमाच्या भीतीनें स्वतःचें रक्षण करण्याकरितां सर्व पांडवांचा नाश व्हावा ह्मणून अग्नितेजाचें अभिमंत्रण करून मीं हें दिव्य अस्त्र सोडिलें. आतां ह्या अस्त्रतेजानें सर्व पांडव जळून खाक होतील. मला तर हें परत घेतां येत नाहीं. हे ब्रह्मन्, रागाच्या सपाट्यांत मीं हें अस्त्र सोडिलें ही मोठी चूक झाली. ' हें ऐकून व्यास म्हणाले, ' बापा, अर्जुनानें जें अस्त्र सोडिलें तें कांहीं तुझ्या नाशाकरितां सोडिलें नाहीं. आपल्या अस्त्रानें तुझ्या अस्त्राचें निवारण व्हावें एवढ्याचकरितां त्यानें तुझ्यावर उलट अस्त्रप्रयोग केला; परंतु ज्या ठिकाणीं ब्रह्मास्त्राचा ब्रह्मास्त्रानेंच नाश होतो त्या ठिकाणीं बारा वर्षेंपर्यंत पाऊस पडत नाहीं, हें जेव्हां त्याच्या लक्ष्यांत आलें, तेव्हां त्यानें लगेच आपलें अस्त्र परत घेऊन सर्व राष्ट्रावरचे संकट टाळलें. तुझ्या बापापासून ब्रह्मास्त्रासारखें दिव्य अस्त्र मिळवूनही अर्जुनानें क्षात्रधर्माचें उल्लंघन केलें नाहीं. मग अशा सत्पुरुषाच्या नाशाची तूं कां इच्छा करितोस ? हे महाबाहो, हें अस्त्र परत घे, आणि तुझें, पांडवांचें आणि सर्व राष्ट्राचें रक्षण कर. ' अश्वत्थामा म्हणाला, ' पांडवांनीं व कौरवांनीं आजपर्यंत जेवढी संपत्ति मिळविली असेल त्या सर्वांपेक्षां माझ्या ह्या मण्याची मातब्बरी जास्त आहे. हा अंगावर असला म्हणजे तहान, भूक किंवा कोणत्याही प्रकारचा रोग ह्यापासून मुळींच पीडा होत

नाहीं. म्हणून मीं हा मणि कधीं कोणाला दिला नसता; तथापि आपल्यासाठीं म्हणून आपण सांगत असल्यास हा मणि देतों, व हा मीही आपल्याच पुढें रहातों; परंतु माझें अस्त्र मला परत घेतां येत नाहीं. आतां आपण सांगत आहांत म्हणून पांडवांचा जीव वांचविण्याकरितां मीं तें अस्त्र त्यांच्या बायकांच्या गर्भस्थानीं सोडतों. मुनिश्रेष्ठ, मला आपल्या आज्ञेच्या बाहेर जातां येत नाहीं.' हें ऐकून व्यासमुनि म्हणाले, 'बरें, कांहीं हरकत नाहीं. गर्भामध्यें सोड. मात्र दुसरीकडे कोठेंही सोडूं नकोस.' हें व्यासांचें बोलणें ऐकून अश्वत्थाम्यानें आपलें अस्त्र पांडवस्त्रियांच्या गर्भांत सोडिलें.

अश्वत्थाम्यानें आपलें ब्रह्मशिर नांवाचें अस्त्र पांडवस्त्रियांच्या गर्भांत सोडिलें हें पाहून श्रीकृष्ण त्याला म्हणाला, 'विराटराजाची मुलगी, अर्जुनाची सून उपप्लव्यामध्यें असतां एका व्रतस्थील ब्राह्मणानें तिला सांगितलें आहे कीं, सर्व कुरुकुल नष्ट झालें असतां तुला परीक्षित् नांवाचा एक मुलगा होईल. हें त्या साधूचें बोलणें खरें होऊन परीक्षितीच्या योगानें तरी पुन्हा हा वंश वाढेल ना ?' हें श्रीकृष्णाचें भाषण ऐकून अश्वत्थामा रागानें म्हणाला, 'हे केशवा, तुझें हें बोलणें पक्षपाताचें आहे. माझें बोलणें कधींही खोटें व्हावयाचें नाहीं. ज्याचें तूं रक्षण करण्याची इच्छा करितोस, त्या विराटकन्येच्या गर्भाचाही माझ्या अस्त्रानें नाश होईल.' ह्यावर श्रीकृष्ण म्हणाला, 'तुझ्या अस्त्राच्या योगानें नाश होऊनही हा पुन्हा जिवंत होईल, पण तुला मात्र बालहत्या लागेल, व ह्या पातकाचें फळ म्हणून तुला नानाप्रकारच्या व्याधि जडतील. तुझ्या सर्वांगांतून पू व रक्त वाहूं लागेल. तशीच सर्वांगाला अतिशय दुर्गंधि सुटेल. आणि अशा रीतीनें दुःखामध्यें तूं एकटाच निर्जन प्रदेशांत तीन हजार वर्षें

भटकत रहाशील. तेथें तुला एकही माणूस भेटणार नाहीं, व एवढ्या अवधींत तुझें कोणाशीं भाषणही होणार नाहीं. परीक्षित् वयांत आल्यावर वेदाध्ययन करील व कृपाचार्यांपासून अस्त्रविद्या संपादन करून क्षात्रधर्माप्रमाणें यथान्याय साठ वर्षेपर्यंत सर्व पृथ्वीचें पालन करील. हें सर्व तुझ्या डोळ्यांदेखत होईल.' नंतर व्यास म्हणाले, 'ज्याअर्थीं तूं उत्तम ब्राह्मण कुलांत जन्मून क्षात्रधर्माचा स्वीकार करून हें नीच कृत्य केलेंस, त्याअर्थीं भगवान् श्रीकृष्ण म्हणाला तें सर्व खरें होऊन तुला फार कष्टदशा येईल.' ह्यावर 'ठीक आहे' म्हणून अश्वत्थाम्यानें पांडवांना आपला मणि दिला व आपण तडक अरण्याकडे चालता झाला.

धृतराष्ट्राचा शोक व विदुरांनीं केलेलें त्याचें समाधान.

इकडे फांद्या तोडून काढलेल्या झाडाप्रमाणें शंभर मुलें मेल्यामुळें धृतराष्ट्र शोकाकुल होऊन पडला असतां विदुर त्याला धीर देऊन ह्मणाले, 'राजा, ऊठ. मनाला धीर दे. सर्व प्राणिमात्रांची अखेरची वाट हीच आहे. सर्व संचयाचा नाशामध्यें, वैभवाचा ऱ्हासामध्यें, संयोगाचा वियोगामध्यें शेवट असून ह्या जीविताचा शेवट मरण्यामध्यें आहे. ज्या अर्थीं शूराला त्याचप्रमाणें भित्र्याला यम खेचल्यावांचून सोडीत नाहीं, तेव्हां क्षत्रियवीर युद्ध केल्यावांचून कां बरें स्वस्थ बसतील? न लढतां मनुष्य मरतो व लढूनही जगतो. शोक केल्यानें आपल्याला मरून मरणाराच्या मागून जातां येत नाहीं हें जर ठरलें आहे, तर रडण्यांत काय अर्थ आहे? ज्याप्रमाणें वारा गवताच्या शेंड्यांना वाकवितो, त्याप्रमाणें सर्व भूतमात्रांना काळ वाकवितो. एकाच वाटेला लागून एकेच ठिकाणीं चाललेल्यांपैकीं अमक्याला काळानें आधीं नेलें ह्मणून त्यासंबंधानें रडत बसण्यांत काय अर्थ आहे? शिवाय या

रणामध्यें मेलेल्यासंबंधानें तर शोक करण्याचें मुळींच कारण नाहीं. शास्त्रें जर तुला प्रमाण असतील, तर त्यांनीं उत्तम गति मिळविली आहे. मेल्यानें स्वर्ग मिळतो व मारल्यानें नांव होतें. हीं दोन्ही फायदेशीरच असल्यानें युद्धांत फुकट कांहींच नाहीं. हजारों बायकामुलें व आईबाप यांचा या संसारामध्यें अनुभव आला आहे. ते कोणाचे? आपण कोणाचे? काळाला कोणी आवडता किंवा कोणी नावडता नाहीं. काल सर्व भूतमात्रांना शिजवून काढतो. काल सर्वांचा संहार करतो. सर्व प्राणिमात्र गाढ झोपेंत असतां काल जागा असतो. काळाला टाळतां येणें शक्य नाहीं. तारुण्य, रूप, जीवित, द्रव्यसंचय, आरोग्य व आवडत्याचा संबंध यांवर शहाण्यानें फार असक्ति ठेवूं नये. जनपदाच्या दुःखासंबंधानें एकट्यानें रडत बसण्यांत अर्थ नाहीं. त्या रडणारावर स्वतः नाहींसें होऊन जाण्याची पाळी येईल; पण त्याचें दुःख कांहीं कमी होत नाहीं दुःखासंबंधानें विचारच न करणें हेंच त्यावर उत्तम औषध आहे. त्यावरच विचार करीत बसल्यानें अप्रिय गोष्ट घडून आल्यानें व प्रिय गोष्ट न घडल्यानें तें दूर न होतां उलट वाढतें मात्र. कोत्या बुद्धीचे लोक मात्र मानसिक दुःखानें व्यग्र होतात. शहाणे लोक मनुष्यांच्या शरीरांना केवळ घरें समजतात. काळानें हीं मोडून जातात. एक आत्मा मात्र शाश्वत आहे. ज्याप्रमाणें मातीचें भांडें चाकावर चढविलें असतां, घडलें जात असतां, खालीं उतरतांना, ओलेपणीं, वाळल्यावर, भाजतांना, अन्न शिजवून खालीं उतरतांना, उतरल्यावर, वाटेल तेव्हां मोडतें, तीच स्थिति मनुष्यांच्या देहाची आहे. मनुष्य गर्भामध्यें, जन्मल्याबरोबर, एका दिवसानें, अर्ध्या महिन्यानें, महिन्यानें, एका वर्षानें, दोन वर्षांनीं, तारुण्यामध्यें, मधल्या वयांत किंवा म्हातारपणीं, केव्हांना केव्हां तरी मरतो. सर्व प्राणिमात्र प्राक्तन कर्मा-

नुरूप जन्माला येतात व मरतात. हा जर व्यवहार ठरला आहे, तर उगीच संताप कां करून घ्यावा? ज्याप्रमाणें पाण्यांत शिरलेला कोणी मजेखातर मधून मधून बुडतो, मधून मधून वर येतो, त्याप्रमाणें या संसारसागरामध्यें बुडण्याच्या व वर येण्याच्यासंबंधानें मनुष्य आपापल्या कर्माच्या आधीन असतो. जे मंदबुद्धि असतात, त्यांनाच यापासून दुःख होतें; परंतु जे शहाणे या जगामध्यें भूतमात्रांच्या संबंधाचें खरें इंगित ओळखून खऱ्या हिताचा विचार मनांत ठेवून वागतात, ते कधीं डगमगत नाहींत.'

धृतराष्ट्र व पांडव यांची भेट.

लढाई संपल्यानंतर पांडव धृतराष्ट्राला भेटण्याला आले असतां शोकरूपी वाऱ्यानें चांगला पेट घेतलेल्या आपल्या कोपरूपी वणव्यानें भीमरूपी वनाचा जाळून फडशा पाडण्याचा धृतराष्ट्राचा विचार होता. भीमासंबंधानें हा त्याचा वाईट विचार ओळखून श्रीकृष्णानें हातानें भीमाला एकीकडे ओढून भीमाचा लोखंडी पुतळा धृतराष्ट्राच्या पुढें केला. त्याला कडकडून भेटून धृतराष्ट्रानें त्या लोखंडी पुतळ्याचा मोडून चुराडा उडवून दिला. भीमाच्या लोखंडी पुतळ्याचा चुराडा उडविल्यानें त्याची छाती चिरडून जाऊन तोंडावाटें तो रक्त ओकूं लागला. भीम मेलासें वाटून पश्चात्ताप पावून ' अरे भीमा, ' ह्मणून तो रडूं लागला. त्याला भीमाच्या मरणानें शोक झाला आहेसें पाहून श्रीकृष्ण त्याला ह्मणाला, ' धृतराष्ट्रा, शोक करूं नकोस. तुझ्या हातून भीम मेला नाहीं. त्याच्या लोखंडी पुतळ्याला तूं चिरडिलें आहेस. तुला रागाच्या तावडींत गेलेला पाहून मृत्यूच्या दाढेंत सांपडलेल्या भीमाला मीं बाजूला केला; कारण बलामध्यें तुझ्या तोडीचा दुसरा कोणी नसल्यानें काळाच्या तावडींत गेल्याप्रमाणें तुझ्या बाहूंस-

धून जिवंत सुटण्याचें कोणाला सामर्थ्य नाहीं. म्हणून तुझ्या मुलानें जो हा त्याचा लोखंडाचा पुतळा जाळण्यासाठीं तयार करून ठेविला होता, तो मीं तुझ्यापुढें केला. पुत्रशोकानें खवळून गेल्यामुळें तुझ्या मनाला न्यायान्याय कळेनासें झालें आहे. म्हणून तूं भीमाला मारूं इच्छिलेंस; परंतु हें कांहीं तुला योग्य नाहीं. सख्य करण्याविषयीं आम्हीं जी कांहीं खटपट केली ती सर्व लक्ष्यांत घेऊन शोक करूं नकोस. '

नंतर धृतराष्ट्राची आज्ञा घेऊन कृष्णासह सर्व मंडळी गांधारीकडे जाऊन त्यांनीं तिची गांठ घेतली. याप्रमाणें शत्रूंची वाट लावून युधिष्ठिर आल्याचें कळतांच पुत्रशोकानें व्याकुल झाल्यामुळें तिच्या मनांत त्याला शाप देण्याचें आलें. तिच्या मनांतला तो पापविचार अंतर्ज्ञानानें पूर्वींच ओळखून व्यासांनीं तिचें शांतवन केलें. नंतर तिनें सर्वांची भेट घेतली.

युधिष्ठिराचा पश्चात्ताप व द्रौपदीचा उपदेश.

भारतयुद्धांत सर्व कौरवांचा फडशा पडून सुहृद्बांधवांना मुकल्यानें शोकाकुल होऊन युधिष्ठिर मोठ्या सायासानें मिळविलेलें झगझगीत राज्य सोडून देऊन फिरून वनवासाला जाण्याला निघाला; तेव्हां त्याच्या भावांनीं त्याची नानाप्रकारें समजूत घातली; पण ती त्याला न पटून तो गप्प आहेसें पाहून द्रौपदी गोड शब्दांनीं त्याला म्हणाली, ' महाराज, हे आपले भाऊ चातकाप्रमाणें सुकत चाललेले आहेत, व हे फिरून फिरून आपल्यापुढें रडत आहेत. यांना त्यांच्या मनाप्रमाणें कांहीं योग्य उत्तर देऊन आपण कां सुखवीत नाहीं ? आजपर्यंत यांनीं कष्टच सोसले आहेत. पूर्वीं द्वैतवनामध्यें थंडी, वारा व ऊन्ह सोशीत आपल्याबरोबर हे भटकत असतांना ' आपण दुर्योधनाला मारू-

न सर्व कामना पूर्ण करणाऱ्या संपूर्ण पृथ्वीचा उपभोग घेऊं, तेव्हां वनवासामुळें झालेल्या दुःखाचा तुह्माला विसर पडून तुह्मी सुखी व्हाल, ' असें स्वतः बोलून आज फिरून असें बोलून आमचीं मनें उद्विग्न कां करतां ? दंडावांचून क्षत्रिय झळकत नाहीं, दंडावांचून त्याला पृथ्वीचा उपभोग मिळत नाहीं व शासन न करणाऱ्या राजाच्या प्रजेला सुख मिळत नाहीं. सर्व जगाशीं मैत्री, अध्ययन व तप हा ब्राह्मणाचा धर्म आहे, राजाचा नव्हे. दुष्टाला शासन करून भल्यांचें परिपालन करणें व लढाईत पाय मागें न घेणें हा राजांचा श्रेष्ठ धर्म आहे. ज्या राजाच्या ठिकाणीं क्षमा व राग, दान व आहार, भय व अभय, दंड व अनुग्रह ह्या जोड्या असतात, त्यालाच खरा धर्म कळला. कोणी देऊन, कोणाला फसवून, किंवा कोणापुढें तोंड पसरून आपण ही पृथ्वी मिळविली नाहीं. वैऱ्यांच्या सैन्याचा फडशा पाडून ती मिळविली आहे. आपले हे भाऊ आपल्यामुळें वेडे बनले आहेत. अथवा मीच सर्व स्त्रियांमध्यें अभागी समजलें पाहिजे. हिंसेवांचून असणारा असा या जगामध्यें एकही प्राणी मला दिसत नाहीं. सर्व प्राणी, बलवान् दुर्बलावर, याप्रमाणेंच रहात असतात. मुंगूस उंदरांना, मांजर मुंगसाला, कुत्रा मांजराला व चित्ता कुत्र्याला खातो. हें सर्व स्थावरजंगम जग बलवानाचें आहे. जगामध्यें दंड नसेल तर पाण्यांतील माशाप्रमाणें बलवानांनीं दुर्बलाला खाऊन टाकिलें असतें. योग्य रीतीनें योजिलेला दंडच प्रजेला राखतो. बऱ्यावाइटाची निवड करण्याला जर या लोकीं दंड नसता तर सर्व जग निर्मर्याद होऊन यांत कांहींच ओळखतां आलें नसतें. लोकांना सुखांत ठेवण्यासाठीं, चांगली नीति राहण्यासाठीं, धर्म व अर्थ यांचें रक्षण होण्यासाठीं ब्रह्मदेवानें हा दंड निर्माण केला आहे. दंडांतच सर्व भीति आहे. दंडावरच मनुष्याचा हा लोक अवलंबून आहे. शत्रूला मान वर न काढूं देणारा हा

दंड ज्या ठिकाणीं मोठ्या दक्षतेनें फिरत आहे, त्या ठिकाणीं कपट, पाप किंवा फसवेगिरी यांचें नांव दिसून येत नाहीं. आतां हें धर्मानें मिळालेलें राज्य शोक न करितां भोगीत राहून धर्मामध्यें गढून रहा. धर्मनियम तरी या जगांत लोकयात्रा चालावी ह्मणूनच घालून ठेविले आहेत. अहिंसा किंवा धर्मविचारानें घडणारी हिंसा दोहींची गणना चांगल्यामध्येंच आहे. यांपैकीं एक अति उत्कृष्ट व दुसरी अगदीं टाकाऊ असें मुळींच नाहीं. सर्व गोष्टींत दोहींचाही बरेवाईटपणा दिसून येतो. बैलांना वठणीला आणतात तेव्हांच ते ओझें व गाड्या वाहण्यास योग्य होतात. ह्या जगामध्यें वरील निरनिराळ्या कारणांसाठीं पुरातन धर्म आचरून आपण प्रजेचें चांगलें रक्षण करा. धर्माचें योग्य रीतीनें पालन करा. शत्रूला मारतांना मनांत कींव अगदीं धरूं नका. त्यांत मारणाऱ्याला पाप बिलकुल लागत नाहीं. कारण शत्रूच्या रागानेंच तो राग उत्पन्न होत असतो. भीष्मद्रोणांशीं आपलें जें युद्ध झालें त्याहून निराळें आपल्या मनाशीं आणि तेंही एकट्यानें करावयाचें युद्ध आतां उपस्थित झालें आहे. या ठिकाणीं बाणांचा, मित्रांचा किंवा बांधवांचा कांहीं उपयोग नसून आपल्याला एकट्यालाच त्याशीं झगडलें पाहिजे. या झगड्यांत आपण हारलां तर त्याचे भयंकर परिणाम आपल्यालाच भोगावे लागणार हें लक्ष्यांत घेऊन आतां पुढचा मार्ग धरा.' पुढें पांडवांनीं प्रजेचें यथान्याय धर्मानें संरक्षण करून उत्तम गति मिळविली.

समाप्त.

५ **रामसुधा**–अध्यात्मरामायणाचें सद्दहू–
प्रमाणें भाषांतर .... १८४— ८४
६ **सार्थभगवद्गीता**–शेंकडा वीस प्रती फुकट. ८२८६—८८६
७ **धर्मपद**–गौतम बुद्धाचीं सामान्य नीतितत्वें. ८४––८८६
८ **नेदर्लंडांतील बंडाचा इतिहास**– १८८–– ८४

वरील सर्व पुस्तकें एकदम घेणारांस शेंकडा दहा टक्के कमिशन मिळून टपालखर्च निम्मा पडेल.

सदाशिव पेठ,
पुना सिटी

ब. त्र्यं. द्रवींड.